
सत्यमेव जयते

# नगरपरिषद / नगरपंचायती निवडणूक

# वारंवार विचारले जाणारे प्रश्न

## [ Frequently Asked Questions ]




राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणूक

## वारंवार विचारले जाणारे

# प्रश्न

# Frequently Asked Questions

(ऑक्टोंबर २०२५)


## राज्य निवडणूक आयोग

१ ला मजला, नवीन प्रशासकीय भवन,

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२

दूरध्वनी : ०२२-२२८४६७२१

ई-मेल : sec.council@mah.gov.in

**श्री.दिनेश वाघमारे,**
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र.

**सुरेश काकाणी**
सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

स्थानिक स्वराज्य संस्था एफएक्यू अद्ययावतीकरण समिती (वर्ष २०२५)
सदस्य

श्री.गणेश पांडे,
मुख्याधिकारी बुलढाणा नगरपरिषद, बुलढाणा

श्री.धनंजय बोरीकर,
मुख्याधिकारी, काटोल नगरपरिषद, नागपूर

श्री.रामदास कोकरे,
मुख्याधिकारी, संगमनेर, अहिल्यानगर

समन्वयक
राजेंद्र पाटील,
उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग, महा

---

## डिस्क्लेमर

राज्य निवडणूक आयोग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कार्यपध्दती, माहिती व कायदेशीर तरतुदी सोप्या शब्दांत मांडण्याच्या हेतूने हे पुस्तक तयार केले असून त्याची आवृत्ती प्रारूप स्वरूपात वर्ष २०१५ मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. एखाद्या मुद्याच्या माहितीमध्ये विसंगती अथवा कायदेशीर अर्थाबाबत (legal interpretation) प्रश्न निर्माण झाल्यास कृपया संबंधित मूळ कायदे, नियम; तसेच राज्य निवडणूक आयोगाचे आदेश व परिपत्रके पाहावीत.

**मार्गदर्शक**

**श्री.ज.स.सहारिया,**

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र.

**डॉ.प्रदीप व्यास**

सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

स्थानिक स्वराज्य संस्था एफएक्यू समिती(वर्ष २०१५)

अध्यक्ष

डॉ.श्रीकर परदेशी

तत्कालीन नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र

सदस्य

डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार
अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई

श्री.बी.एम.कांबळे
उपमहानिरीक्षक, नोंदणी व उपनियंत्रक मुद्रांक औरंगाबाद

श्री.संतोष पाटील
प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड

श्री.दीपक नलावडे
विभागीय अधिकारी, महाराष्ट्र ऊर्जा निकास अभिकरण, कोल्हापूर

श्री.जगदीश मिनियार
सहाय्यक आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण राजगार हमी योजना, नागपूर

श्री.उदय टेकाळे
उप आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे

डॉ.कमलकिशोर फुटाणे
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर

श्री.रवींद्र धुरजड,
उपजिल्हा निवडणूक अधिकारी, अमरावती

श्री.रत्नाकर वाघमारे
उपायुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

श्री.हनुमंत अरगुंडे,
प्रशासक, सिडको, औरंगाबाद

समन्वयक
श्री.नि.ज.वागळे
अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग

## प्रस्तावना

राज्य निवडणूक आयोगावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची संविधानिक जबाबदारी आहे. निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शक वातावरणात व सुलभरीत्या पार पाडण्यावर आयोगाचा नेहमीच भर असतो. त्यासाठी निवडणूक यंत्रणा, मतदार, उमेदवार, राजकीय पक्ष इत्यादींपर्यंत सोपी व सुलभ माहिती उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असतो. त्याचाच एक भाग म्हणून 'वारंवार विचारले जाणारे प्रश्न' (एफएक्यू) या पुस्तकाची सुधारित आवृत्ती प्रकाशित करण्यात येत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात वारंवार विविध प्रकारची माहिती विचारली जाते. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने 'वारंवार विचारले जाणारे प्रश्न' याबाबत जून २०१५ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय पुस्तके प्रसिद्ध केली होती. या निवडणुकांसंदर्भातील कायद्यांमध्ये वेळोवेळी दुरुस्त्याही होतात. त्याचबरोबर राज्य निवडणूक आयोगाकडूनही प्रसंगानुरूप विविध आदेश निर्गमित केले जातात किंवा काही आदेशांमध्ये सुधारणा केल्या जातात. त्यामुळे पूर्वीची 'वारंवार विचारले जाणारे प्रश्न' ही पुस्तके आता अद्ययावत करण्याची आवश्यकता होती. ही बाब विचारात घेऊन आम्ही आता नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसदर्भातील पुस्तकाची अद्ययावत आवृत्ती प्रसिद्ध करीत आहोत.

पुस्तक अद्ययावत करताना ते परिपूर्ण करण्याचा आम्ही पुरेपूर प्रयत्न केला आहे; परंतु तरीही त्यात काही त्रुटी आढळल्यास त्यासंदर्भातील सूचनांचे स्वागतच असेल. उचित सूचनांची भविष्यातील आवृत्तीत दखल घेण्यात येईल; तसेच एखाद्या मुद्याच्या माहितीमध्ये विसंगती किंवा कायदेशीर अर्थाबाबत प्रश्न निर्माण झाल्यास कृपया संबंधित मूळ कायदे, नियमच; तसेच राज्य निवडणूक आयोगाचे आदेश/ परिपत्रके पाहावित, असे मी आवाहन करतो.

नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसंदर्भातील हे पुस्तक निश्चितच सर्व संबंधितांसाठी उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास आहे.

**दिनेश वाघमारे**

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

१३ ऑक्टोबर २०२५

अनुक्रमाणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **प्रकरण-१** | **राज्य निवडणूक आयोगाबाबत राज्यघटनेतील तरतूद** | |
| १ | राज्य निवडणूक आयोगाची स्थापना | १ |
| २ | राज्य निवडणूक आयोगाचे कामकाज व प्रशासकिय संरचना | १ |
| ३ | राज्य निवडणूक आयोगाचे कर्तव्य व कार्यकक्षा | २ |
| ४ | भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग यामधील तुलनात्मक फरक | ३ |
| ५ | राज्य निवडणूक आयोगाचा पत्ता व संकेतस्थळ | ४ |
| **प्रकरण-२** | **स्थानिक स्वराज्य संस्था अधिनियम व निवडणूक नियम** | |
| १ | स्थानिक स्वराज्य संस्था अधिनियम व नियमातील तरतूदी | ६ |
| २ | स्थानिक स्वराज्य संस्थेचा कालावधी | ७ |
| ३ | सदस्यांचा पदावधी, राजीनामा व पोटनिवडणुक | ७ |
| ४ | निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करणे व अधिप्रमाणित करणे | ९ |
| ५ | निवडणुकीत मत देण्याचा अधिकार व मतदानाची पध्दत | १० |
| ६ | सदस्य म्हणून निवडूण येण्यासाठीची अर्हता | ११ |
| ७ | सदस्य होण्यास अनर्हता (अपात्रता) | ११ |
| ८ | सदस्य म्हणून पदावर राहण्यास असमर्थता | १२ |
| ९ | अनर्हता / सदस्य पदावरुन काढूण टाकणे | १२ |
| १० | अधिनियमात नमूद राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार | १३ |
| ११ | निवडणूक नियमातील तरतूदी | १४ |
| **प्रकरण -३** | **राजकीय पक्षांची नोंदणी** | |
| १ | राजकीय पक्ष-व्याख्या | १६ |
| २ | स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राजकीय पक्ष नोंदणी करणे, प्रथामिक माहिती व प्रक्रिया | १६ |
| ३ | राजपत्रातील प्रसिध्दी व आक्षेप | १८ |
| ४ | नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्ष-अधिकारी व निकष | १९ |
| ५ | राजकीय पक्षांना देण्यात येणारी चिन्हे व मार्गदर्शक तत्वे | १९ |
| ६ | राजकीय पक्षाचा उमेदवार | २० |
| ७ | नोंदणीकृत पक्षाची नोंदणी रद्द करणे | २२ |
| ८ | राजकीय पक्षांची आघाडी | २२ |
| ९ | राजकीय पक्षांबाबत अन्य तरतुदी | २३ |
| १० | पक्षांतर बंदी अधिनियम | २४ |
| **प्रकरण-४** | **सदस्य संख्या निश्चिती** | |
| १ | स्थानिक स्वराज्य संस्थेची संरचना व सदस्य संख्या | २६ |
| २ | सदस्य संख्येचे निकष | २७ |

| | | |
|---|---|---|
| **प्रकरण -५** | **प्रभाग रचना** | |
| १ | प्रभाग रचना करणेसाठी अधिकार | २९ |
| २ | प्रभाग रचनेची संरचना | २९ |
| ३ | गृहित धरावयाची जनगणना | ३१ |
| ४ | परिसीमनाचा कालावधी | ३२ |
| ५ | प्रभाग रचनेची कार्यपध्दत | ३२ |
| ६ | आरक्षण निश्चित करणे | ३४ |
| ७ | प्रभाग रचना सोडत ( प्रारुप प्रभाग रचना ) | ३५ |
| ८ | प्रभाग रचना प्रसिध्दी, अक्षेप व हरकती | ३६ |
| ९ | आक्षेप व हरकतीवरील सुनावणी | ३६ |
| १० | अंतिम प्रभाग रचना प्रसिध्दी | ३७ |
| ११ | इतर | ३७ |
| **प्रकरण-६** | **आरक्षण** | |
| १ | निवडणुकीसाठी प्रभाग रचनेची पध्दत व आरक्षण | ३८ |
| २ | आरक्षणाचे प्रवर्ग | ३९ |
| ३ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षण | ४० |
| ४ | नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षण | ४२ |
| ५ | महिलांसाठी आरक्षण | ४४ |
| ६ | आरक्षण चक्रानुक्रमे फिरवणे | ४५ |
| ७ | आरक्षण निश्चिती पूर्व प्रसिध्दी व सोडत | ४६ |
| ८ | आरक्षण निश्चिती आक्षेप ( हरकती) व सुनावणी | ४७ |
| ९ | आरक्षण निश्चिती अंतिम प्रसिध्दी | ४८ |
| **प्रकरण-७** | **मतदारयादी** | |
| १ | मतदार पात्रता | ५० |
| २ | निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करणे व अर्हता दिनांक | ५१ |
| ३ | मतदार नोंदणी पध्दत | ५३ |
| ४ | विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नाव नोंदणीसाठी आवश्यक दस्तऐवज | ५५ |
| ५ | भारत निवडणूक आयोगातर्फे मतदार नोंदणीसाठी विविध उपाययोजना | ५६ |
| ६ | प्रभागनिहाय प्रारुप मतदारयादी तयार करणे व प्रसिध्द करणे | ५७ |
| ७ | विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीतील दुबार नाव, मयत व स्थानांतरित मतदारांचे नावाबाबत. | ५८ |
| ८ | प्रभागनिहाय प्रारुप मतदारयादीवरील आक्षेप / हरकती | ६० |
| ९ | अंतिम मतदारयादी प्रसिध्द करणे | ६१ |
| १० | नगरपालिकेची मतदारयादी अधिप्रमाणित करण्याचे अधिकार | ६१ |
| ११ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी छपाई व प्रसिध्दी | ६२ |

| | | |
|---|---|---|
| **प्रकरण-८** | **मतदान केंद्र** | |
| १ | मतदान केंद्राचे निकष | ६३ |
| २ | मतदान केंद्र व मतदार संख्या निश्चिती | ६५ |
| ३ | प्रभागातील मतदान केंद्र निश्चित करणे | ६६ |
| ४ | मतदान केंद्रास किमान व कमाल मतदार जोडेणे | ६८ |
| ५ | मतदान केंद्र यादी प्रसिध्दी | ६९ |
| ६ | संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रे निश्चित करणे | ७० |
| ७ | मतदान केंद्रावरील सुविधा | ७१ |
| **प्रकरण-९** | **सदस्य-अर्हता / अनर्हता** | |
| १ | निवडून येण्यास पात्रता ( अर्हता ) | ७३ |
| २ | निवडून येण्यास अपात्रता (अनर्हता ) | ७४ |
| **प्रकरण-१०** | **नामनिर्देशन प्रक्रिया** | |
| १ | निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करणे | ८२ |
| २ | निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती व कर्तव्य | ८४ |
| ३ | नामनिर्देशनपत्राचा नमूना व शपथपत्रे | ८५ |
| ४ | राखीव प्रभागातील उमेदवारांनी सादर करावयाचे प्रमाणपत्र | ८७ |
| ५ | अपत्य व दायीत्व, गुन्हेगारी पार्श्वभूमीचे शपथपत्र | ९० |
| ६ | अनामत रक्कम तरतूद | ९५ |
| ७ | नामनिर्देशनपत्राची संख्या | ९८ |
| ८ | सूचक-संख्या व अर्हता | ९८ |
| ९ | नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा कालावधी, वेळ व ठिकाण | १०१ |
| १० | मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी जोडपत्र एक व जोडपत्र दोन सादर करणे | १०२ |
| ११ | प्राथमिक छाननी | १०५ |
| १२ | नामनिर्देशनपत्र स्विकारण्याची प्रक्रिया | १०६ |
| १३ | उमेदवारांना द्यावयाची कागदपत्रे | १०७ |
| १४ | दैनंदिन प्रसिध्दी / अहवाल | १०८ |
| **प्रकरण-११** | **नामनिर्देशनपत्राची छाननी** | |
| १ | प्राधिकृत अधिकारी | १०९ |
| २ | छाननी-अर्धन्यायिक प्रक्रिया | १०९ |
| ३ | उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांची उपस्थिती | १११ |
| ४ | वैध व अवैध ठरविण्याचे निकष | ११३ |
| ५ | छाननीची कार्यपध्दती | १२१ |
| ६ | आक्षेप व आक्षेपकांची जबाबदारी व संक्षिप्त चौकशी | १२५ |
| ७ | आक्षेपावरील सूनावणी स्थगित करणेबाबत | १२७ |

| | | |
|---|---|---|
| ८ | नामनिर्देशनपत्र स्विकारणे अथवा नाकारणे यावरील अपील | १२७ |
| ९ | वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी तयार करणे व प्रसिध्द करणे | १३० |
| **प्रकरण-१२** | **उमेदवारी मागे घेणे** | |
| १ | उमेदवारी मागे घेणेबाबत तरतूदी | १३२ |
| २ | उमेदवारी कोण मागे घेऊ शकतो | १३६ |
| ३ | उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | १३८ |
| ४ | बिनविरोध निवडणूक | १३९ |
| **प्रकरण-१३** | **चिन्ह वाटप व मतपत्रिका छपाई** | |
| १ | चिन्हांची यादी- राखीव व मुक्त चिन्हे | १४१ |
| २ | आघाडीची राखीव / पसंती क्रमांकाची चिन्हे | १४३ |
| ३ | चिन्ह वाटप पध्दती | १४८ |
| ४ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | १५३ |
| ५ | मतपत्रिका तयार करणे व छपाई | १५६ |
| ६ | आवश्यक EVM संख्या निश्चिती | १६१ |
| **प्रकरण-१४** | **निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे निवडणूक, मतदान तथा मतमोजणी प्रतिनिधी** | |
| १ | निवडणूक प्रतिनिधी नेमणूक | १६३ |
| २ | मतदान प्रतिनिधी नेमणूक | १६४ |
| ३ | मतमोजणी प्रतिनिधी | १७० |
| **प्रकरण-१५** | **मतदान प्रक्रियेची तयारी व कर्मचारी प्रशिक्षण** | |
| १ | आवश्यक मनुष्यबळ निश्चिती | १७२ |
| २ | निवडणुकीसाठी लागणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करणे | १७३ |
| ३ | मतदान पथक व त्यांची कर्तव्ये | १७५ |
| ४ | मतदान कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण | १७८ |
| ५ | मतदान साहित्य | १७९ |
| ६ | निवडणूक कार्य प्रमाणपत्र व टपाली मतपत्रिका | १८१ |
| ७ | मतदार यादीच्या कार्यप्रती | १८९ |
| ८ | वाहने अधिग्रहित करणे | १९० |
| ९ | पोलिस बंदोबस्त | १९१ |
| १० | मतदानापूर्वी उमेदवाराचा मृत्यू झाल्यास | १९३ |
| ११ | झोनल ऑफिसर | १९५ |
| **प्रकरण-१६** | **मतदान यंत्राबाबत** | |
| १ | मतदानयंत्राची सर्वसाधारण माहिती | १९७ |
| २ | मतदानयंत्र आवश्यकता व उपलब्धता | २०० |
| ३ | प्रथम स्तरीय तपासणी | २०० |

| | | |
|---|---|---|
| ४ | मतदानयंत्रे मतदानासाठी केंव्हा तयार करण्यात येणार आहेत याबाबत उमेदवारांना सूचना | २०१ |
| ५ | मतदान यंत्रासाठी आवश्यक साहित्य | २०१ |
| ६ | मास्टर ट्रेनर तयार करणे | २०२ |
| ७ | EVM-BU तयार करणे | २०२ |
| ८ | EVM -CU तयार करणे | २०३ |
| **प्रकरण-१७** | **मतदान साहित्य वाटप व मतदान पथकांची रवानगी** | |
| १ | मतदान पथकांची सरमिसळ व मतदान केंद्र नियुक्ती आदेश | २०५ |
| २ | मतदान केंद्रनिहाय साहित्य वाटप | २०६ |
| ३ | मतदान पथकाद्वारे साहित्य पडताळणी | २०९ |
| ४ | मतदान पथके रवानगी | २१० |
| ५ | मतदान पथके पोहोचल्याची खात्री व पूर्वतयारी | २११ |
| ६ | झोनल अधिकाऱ्यास द्यावयाचे मतदान साहित्य | २१३ |
| **प्रकरण-१८** | **मतदानाच्या दिवशीची कार्यवाही** | |
| १ | मतदान पथके पोहोचल्याची खात्री व मतदान केंद्रावरील पूर्वतयारी | २१४ |
| २ | अभिरुप मतदान व मतदानासाठी मतदान यंत्र तयार करणे | २१५ |
| ३ | मतदान प्रतिनिधी | २१६ |
| ४ | मतदान कर्मचारी | २१८ |
| ५ | मतदान कार्यपध्दती | २२० |
| ६ | मतदाराची ओळख पटविणे | २२१ |
| ७ | मतदान केंद्रावरील विविध प्रसंग, अपंगाचा सोबती वगैरे | २२२ |
| ८ | दर दोन तासाचे अहवाल | २२८ |
| ९ | मतदान केंद्रावरील सुरक्षा व्यवस्था व प्रवेशावरील निर्बंध | २२८ |
| १० | मतदारांची कर्तव्ये | २३० |
| ११ | उमेदवार व राजकीय पक्षांवरील निर्बंध | २३० |
| १२ | राजकीय पक्षांचे मतदार सहाय्यता केंद्र | २३१ |
| १३ | केंद्राध्यक्षांची घोषणापत्रे व विविध अभिलेख | २३१ |
| १४ | मतदानानंतर नोंदविलेल्या मतदानाचा हिशोब | २३२ |
| १५ | मतदान संपल्यानंतर अभिलेखे सील करणे व अहवाल | २३२ |
| १६ | मतदान साहित्य तपासून घेणे | २३४ |
| १७ | मतदान साहित्य संकलन केंद्र | २३५ |
| १८ | मतदान यंत्रे सुरक्षा कक्षात ठेवणे | २३७ |
| १९ | फेरमतदान | २३८ |
| **प्रकरण-१९** | **मतमोजणी** | |
| १ | बिनविरोध उमेदवार घोषित करणे | २४१ |
| २ | मतमोजणी तारीख, ठिकाण व वेळ निश्चिती | २४१ |

| | | |
|---|---|---|
| ३ | मतमोजणी अधिकारी, कर्मचारी नियुक्ती | २४२ |
| ४ | मतमोजणी प्रशिक्षण | २४३ |
| ५ | मतमोजणी केंद्राची रचना | २४३ |
| ६ | निवडणूक माहिती केंद्र | २४४ |
| ७ | सुरक्षा व्यवस्था व प्रवेश नियमन | २४४ |
| ८ | स्ट्रॉग रुम उघडणे व कंट्रोल युनिट वाहतूक आराखडा | २४६ |
| ९ | टपाली मतपत्रिका मोजणी | २४६ |
| १० | मतदान यंत्राद्वारे नोंदविलेल्या मतांची मोजणी | २४८ |
| ११ | समसमान मते व फेर मतमोजणी | २५२ |
| १२ | विजयी उमेदवार घोषित करणे व प्रमाणपत्र देणे | २५२ |
| १३ | मतमोजणीचा अहवाल | २५३ |
| १४ | मतमोजणीनंतर मतदान यंत्राबाबत करावयाची कार्यवाही | २५४ |
| १५ | निवडणुकीसंबंधी अन्य कागदपत्रे जतन करणे अथवा त्यांचे निरीक्षण | २५४ |
| १६ | निवडणूक निकाल व राजपत्रामध्ये प्रसिध्दी | २५५ |
| १७ | अनामत रक्कम जप्त करणे / परत करणे | २५६ |
| १८ | एकापेक्षा जास्त जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांबाबत | २५६ |
| **प्रकरण-२०** | **निवडणूक खर्च** | |
| १ | कायदेशीर तरतूद | २५७ |
| २ | उमेदवारासाठी खर्चाची मर्यादा | २५७ |
| ३ | दर निश्चिती | २६० |
| ४ | दक्षता पथक | २६१ |
| ५ | राजकीय पक्षाने केलेला खर्च सादर करणे | २६३ |
| ६ | स्टार प्रचारकांबाबत | २६४ |
| ७ | पेड न्यूजबाबत | २६६ |
| ८ | निवडणूक खर्च विहित नमुन्यात सादर करण्याबाबत विवरणपत्रे | २६८ |
| ९ | दैनंदिन निवडणूक खर्च सादर करणे व न केल्यास होणारी कारवाई | २६९ |
| १० | निवडणूक खर्चासाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे | २७१ |
| ११ | निवडणूक निकालानंतर अंतिम हिशोब सादर करणे व होणारी कार्यवाही | २७२ |
| १२ | खर्च मर्यादेचे उल्लंघनाबाबत | २७४ |
| **प्रकरण-२१** | **निवडणुकीसंदर्भातील गुन्हे** | |
| १ | आदर्श आचार संहितेसंदर्भातील गुन्हे | २७५ |
| २ | मालमत्ता विरुपण संदर्भातील गुन्हे | २७८ |
| ३ | मतदान प्रक्रियेदरम्यान व्यत्यय | २७९ |
| ४ | मतमोजणी प्रक्रियेदरम्यान व्यत्यय | २८६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कामकाजात अडथळा व व्यत्यय | २८६ |
| ६ | भारतीय दंड संहिता मधील इतर तरतुदी | २८७ |
| **प्रकरण–२२** | **आदर्श आचारसंहिता** | |
| १ | सर्वसाधारण | २८९ |
| २ | कर्मचारी | २९० |
| ३ | नामनिर्देशन व छाननी | २९१ |
| ४ | जाहिराती व प्रचार | २९२ |
| ५ | वाहने व मालमत्ता | ३०० |
| ६ | मंत्री व लोकप्रतिनिधी | ३०३ |
| ७ | शासकीय योजना व स्थानिक स्वराज्य संस्थांची कामे | ३०४ |
| ८ | मतदानाचा दिवस व मतमोजणी | ३०८ |
| ९ | विविध परवानग्या | ३१२ |
| **प्रकरण–२३** | **कायदा व सुव्यवस्था** | |
| १ | सर्वसाधारण | ३१४ |
| २ | प्रतिबंधात्मक आदेश | ३१५ |
| ३ | निवडणुकीसाठी सुरक्षा प्रबंध | ३१७ |
| ४ | संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रे निश्चित करणे | ३१८ |
| **प्रकरण–२४** | **प्रसार माध्यमाविषयक तरतुदी** | ३२० |
| **प्रकरण–२५** | **निवडणुकीबाबत विविध अहवाल** | |
| १ | विविध अहवाल | ३२३ |
| २ | अहवालांचे नमुने | ३२४ |
| ३ | अहवालाकरीता वेळापत्रक / कालमर्यादा | ३२४ |
| ४ | अहवाल पाठविण्याची जबाबदारी | ३२९ |
| **प्रकरण–२६** | **प्रपत्रांची यादी** | ३३० |

# प्रकरण १.

# राज्य निवडणूक आयोगाबाबत राज्यघटनेतील तरतूद

# (Provisions in the Constitution about State Election Commission)

## १. राज्य निवडणूक आयोगाची स्थापना

**प्रश्न १ राज्य निवडणूक आयोगाची स्थापना भारतीय राज्यघटनेतील कोणत्या तरतुदीनुसार झाली आहे?**

उत्तर भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद २४३ के व २४३ झेड ए नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना झालेली आहे. आयोग स्थापनेची अधिसूचना राज्यपाल यांचेकडून निर्गमित केली जाते.

**प्रश्न २ महाराष्ट्रात राज्य निवडणूक आयोगाची स्थापना कशासाठी व केव्हा झाली ?**

उत्तर महाराष्ट्र राज्यात सर्व स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, नगरपंचायती व महानगरपालिका) यांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली असून राज्य निवडणूक आयोगाची स्थापना दिनांक २३ एप्रिल १९९४ रोजी करण्यात आलेली आहे.

## २. राज्य निवडणूक आयोगाचे कामकाज व प्रशासकीय संरचना (स्थानिक स्वराज्य संस्था)

**प्रश्न १ राज्य निवडणूक आयोगाचे प्रमुख कोण असतात ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाचे प्रमुख राज्य निवडणूक आयुक्त असतात.

**प्रश्न २ राज्य निवडणूक आयोगाची प्रशासकीय संरचना कशी आहे ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगामध्ये राज्य निवडणूक आयुक्त हे प्रमुख असतात. त्यांच्या अधिनस्त भारतीय प्रशासन सेवेतील सचिव दर्जाचे अधिकारी आयोगाचे सचिव म्हणून व त्यांच्या नियंत्रणाखाली उप आयुक्त, उपसचिव, सहाय्यक आयुक्त, अवर सचिव, कक्ष अधिकारी इ. अधिकारी कार्यरत असतात. आयोगाचे कामकाज विभागीय पातळीवर विभागीय आयुक्त, जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी व महानगरपालिका स्तरावर महापालिका आयुक्त यांचेमार्फत पार पाडले जाते.

**प्रश्न ३ या निवडणूक आयोगास कोणकोणते घटनात्मक अधिकार आहेत ?**

उत्तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांसाठी मतदारयाद्या तयार करण्याच्या कामाचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण आणि अशा निवडणुकांचे आयोजन या बाबी राज्य निवडणुक आयोगाकडे निहित आहेत.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०(अ)(१))

## ३. राज्य निवडणूक आयोगाचे कर्तव्य व राज्य निवडणूक आयोगाची कार्यकक्षा

**प्रश्न १ नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुकांसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाची कर्तव्ये काय आहेत ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुका स्वच्छ, भयमुक्त व पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यासाठी त्या संबंधित संस्थांच्या कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी करून निवडणूक प्रक्रिया कार्यक्षमरित्या राबविण्याचे व सर्व निवडणूक प्रक्रियेवर देखरेख करणे, निर्देश देणे आणि नियंत्रण ठेवणे हे राज्य निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे.

नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुकांकरिता स्वतंत्रपणे मतदारयाद्या राज्य निवडणूक आयोगाकडून तयार केल्या जात नाहीत. याकरिता, राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास भारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीसाठी तयार केलेल्या मतदारयाद्याच वापरल्या जातात.

**प्रश्न २ राज्य निवडणूक आयोग राज्यातील कोणत्या निवडणुका घेण्यासाठी जबाबदार आहे ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगावर राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (ULB) म्हणजेच महानगरपालिका, नगरपालिका / नगरपंचायती व ग्रामीण भागातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी आहे.

मात्र लोकसभा, विधानसभा व विधान परिषद इ.च्या निवडणुका पार पाडण्याची जबाबदारी भारत निवडणूक आयोगावर असते. त्याचा राज्य निवडणूक आयोगाशी संबंध नसतो.

**प्रश्न ३ राज्य निवडणूक आयोग आपले कोणकोणते अधिकार आणि कामे आदेश देऊन कोणाकडे सोपवू शकते ?**

उत्तर राज्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या अधिकारापैकी आणि कामांपैकी कोणतेही अधिकार व कामे,आदेशाद्वारे राज्य निवडणूक आयोगाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा राज्य शासनाच्या उपजिल्हाधिकारी / मुख्याधिकारी पेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपविता येतात.

(संदर्भ:- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०(अ)(२))

**प्रश्न ४ राज्य निवडणूक आयुक्तांची नेमणूक करण्याबाबत काय तरतूद आहे ?**

उत्तर राज्य निवडणूक आयुक्तांची नेमणूक राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, १९९४ प्रमाणे होते. राज्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती, शासनाच्या प्रधान सचिवांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे पद ज्या व्यक्ती धारण करीत असतील किंवा ज्यांनी धारण केलेले असेल अशा व्यक्तींमधून राज्यपालांद्वारे करण्यात येते.

**प्रश्न ५ राज्य निवडणूक आयुक्तांचा दर्जा काय असतो ?**

उत्तर भारतीय राज्यघटनेने ज्याप्रमाणे भारत निवडणूक आयोगाला दर्जा दिला आहे, तसाच दर्जा राज्य निवडणूक आयोगाला देण्यात आला आहे. ही बाब मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र.५६५७/२००५ किशनसिंग तोमर विरूध्द अहमदाबाद महानगरपालिका व इतर या प्रकरणात दि.१९/१०/२००६ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये आधोरेखित झाली आहे. राजशिष्टाचारासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२/९/२०११ च्या शासन निर्णयान्वये सर्व शासकीय समारंभासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांनंतर राज्य निवडणूक आयुक्त यांचा समावेश केलेला आहे.

(संदर्भ:- महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग क्र. सा.प्र.वि./डब्लू आर पी/१०१०/६७६/XXX दि.१२/९/२०११)

**प्रश्न ६ राज्य निवडणूक आयुक्त यांच्या कार्यकाळाबाबत काय तरतुदी आहेत?**

उत्तर राज्य निवडणूक आयुक्त ज्या दिनांकास ते आपले पदग्रहण करतील त्या दिनांकापासून पाच वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी पद धारण करतात आणि ते पुर्ननियुक्तीस पात्र होत नाहीत. त्यांच्या नियुक्ती अथवा कार्यरत राहण्यासाठी उच्च वयोमर्यादा नाही. परंतु राज्य निवडणूक आयुक्त आपल्या सहीनिशी राज्यपालांना उद्देशून पत्र लिहून आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात.

**प्रश्न ७ राज्य निवडणूक आयुक्त यांना पदावरून दूर करण्यासाठी कोणती प्रक्रिया अवलंबावी लागते ?**

उत्तर राज्य निवडणूक आयुक्तांना भारताच्या राज्यघटनेच्या अनुच्छेद २४३-ट च्या खंड २ च्या परंतुकामध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या रीतीने असेल त्याव्यतिरिक्त अन्य प्रकारे पदावरुन दूर करता येत नाही. राज्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांकरिता संसदेद्वारे महाभियोगाची जी पध्दत अवलंबविली जाते तीच पध्दत अवलंबावी लागते.

(संदर्भ- आयोगाचे परिपत्रक दि.२.८.२००६)

## ४. भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग या मधील तुलनात्मक फरक

**प्रश्न १ भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग यांच्यामध्ये काय फरक आहे ?**

उत्तर दोन संस्थामधील फरक खालीलप्रमाणे :-

| | | **भारत निवडणूक आयोग (ECI)** | **राज्य निवडणूक आयोग (SEC)** |
|---|---|---|---|
| १. | कार्यक्षेत्र | संपूर्ण देश | संपूर्ण राज्य |
| २. | कार्यकक्षा | विधानसभा, विधान परिषद, लोकसभा, राज्यसभा, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या निवडणुका | स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक व पोट निवडणुका |
| ३. | रचना | मुख्य निवडणूक आयुक्त, व इतर दोन निवडणूक आयुक्त | राज्य निवडणूक आयुक्त |
| ४. | राज्य पातळीवरील अधिकारी | मुख्य निवडणूक अधिकारी | ----- |

**प्रश्न २ राज्य निवडणूक आयोग हा भारत निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाखाली आहे काय ?**

उत्तर नाही. ही राज्यस्तरावरील स्वतंत्र घटनात्मक संस्था आहे.

**प्रश्न ३ मुख्य निवडणूक अधिकारी (Chief Electoral Officer) हे कोण असतात ? स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये त्यांची काय कर्तव्ये आहेत ?**

उत्तर मुख्य निवडणूक अधिकारी हे भारत निवडणूक आयोगाचे राज्य स्तरावरील अधिकारी असतात.राज्यातील लोकसभा, विधानसभा व विधान परिषदांच्या निवडणुकांच्या कामकाजावर देखरेख, निर्देश व नियंत्रणाचे काम ते पाहतात. विधानसभा मतदारसंघनिहाय मतदारयादी तयार करण्याच्या कामाचे नियंत्रण मुख्य निवडणूक अधिकारी यांचेकडे असते. विहित तारखेच्या विधासभा मतदारसंघाच्या मतदारयाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी वापरल्या जातात. अशा मतदारयाद्या उपलब्ध करून देण्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कर्तव्य आहे. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पाडण्यामध्ये मुख्य निवडणूक अधिकारी यांचा कोणताही संबंध नसतो.

## ५. राज्य निवडणूक आयोगाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी व संकेतस्थळ

**प्रश्न १ राज्य निवडणूक आयोगाचे कार्यालय कोठे आहे ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाचे कार्यालय मुंबई येथे आहे.

**प्रश्न २ राज्य निवडणूक आयोगाशी संपर्क कसा करावा (पत्ता, दूरध्वनी क्र., फॅक्स क्र., ई-मेल आयडी काय आहे ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाशी संपर्कासाठी तपशील खालीलप्रमाणे :-

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
पहिला मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०००३२.
दूरध्वनी:- ०२२ - २२८४६७२० फॅक्स ०२२ - २२८४६७१९ / २१, २२०२६९०९
ई-मेल :- sec.mh@gov.in, sec.council@mah.gov.in

**प्रश्न ३ राज्य निवडणूक आयोगाशी पत्रव्यवहार कोणाच्या नावे करावा ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाशी करावयाचा पत्रव्यवहार हा सचिव, राज्य निवडणूक आयोग यांच्या नावे करावा.

**प्रश्न ४ राज्य निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ काय नावाने आहे ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ www.mahasec.com असे आहे.

**प्रश्न ५ राज्य निवडणूक आयोगामध्ये जन माहिती अधिकारी कोण आहेत व त्यांचे अपिलीय प्राधिकारी कोण आहेत ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाचे कक्ष अधिकारी, तहसिलदार हे अधिकारी जन माहिती अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी हे सहायक जन माहिती अधिकारी व उप आयुक्त हे प्रथम अपिलीय प्राधिकारी आहेत.

# प्रकरण २.

# स्थानिक स्वराज्य संस्था अधिनियम व निवडणूक नियम

# (Local Body Act & Election Rules)

## १. स्थानिक स्वराज्य संस्था अधिनियम व नियमातील तरतूद

**प्रश्न १ महाराष्ट्रामध्ये नगरपरिषद अथवा नगरपंचायतीचे कामकाज कोणत्या अधिनियमानुसार चालते ?**

उत्तर महाराष्ट्रामध्ये नगरपरिषद / नगरपंचायतीचे कामकाज हे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतूदीनुसार चालते.

**प्रश्न २ नगरपरिषद अथवा नगरपंचायत यांच्या निवडणुका कोणत्या कायद्यानुसार व नियमानुसार पार पाडल्या जातात ?**

उत्तर नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या निवडणुका या महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ आणि त्याअंतर्गत महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ मधील तरतूदीनुसार पार पाडल्या जातात.

**प्रश्न ३ नगरपरिषद अथवा नगरपंचायतीचे लोकसंख्येनुसार वर्गीकरण कसे केले आहे ?**

उत्तर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ४ नुसार पुढीलप्रमाणे वर्गीकरण करणेत आले आहे.

१ लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या - अ वर्ग लहान नागरी क्षेत्र

४० हजार ते १ लक्ष लोकसंख्या - ब वर्ग लहान नागरी क्षेत्र

४० हजार किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या - क वर्ग

**प्रश्न ४ नगरपरिषद अथवा नगरपंचायत सदस्यांची संख्या किती असते ?**

उत्तर नगरपरिषदेच्या सदस्यांची संख्या लोकसंख्येशी संबंधित असते. वर्गनिहाय किमान व कमाल सदस्य संख्या खालीलप्रमाणे असते :-

| वर्ग | किमान | कमाल संख्या |
|---|---|---|
| अ | ४० | ७५ |
| ब | २५ | ३७ |
| क | २० | २५ |
| नगर पंचायत | - | १७ |

**प्रश्न ५ नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणुकीसाठी मतदारयादी तयार करण्यासाठी अधिक्षण, संचालन व नियंत्रणाचे काम कोण पाहते ?**

उत्तर नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी मतदारयादी तयार करण्याचे संपूर्ण कामकाज जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली " प्राधिकृत " अधिकारी करीत असतात.

**प्रश्न ६ नगरपंचायतीची सदस्य संख्या किती असते ?**

उत्तर नगरपंचायतीमध्ये जास्तीत जास्त १७ सदस्य असतात.

**प्रश्न ७ नगरपरिषद अथवा नगरपंचायतीची प्रभागामध्ये विभागणी कोण करते ?**

उत्तर नगरपरिषदेचा वर्ग विचारात घेऊन शहराची विभागणी करण्याचे अंतिम अधिकार खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| अ वर्ग नगरपरिषदा | राज्य निवडणूक आयोग |
| ब वर्ग नगरपरिषदा | आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन |
| क वर्ग | विभागीय आयुक्त |
| नगर पंचायती | विभागीय आयुक्त |

## २. स्थानिक स्वराज्य संस्थेचा कालावधी

**प्रश्न १ नगरपरिषद अथवा नगरपंचायतीचा कालावधी किती वर्षाचा असतो ? हा कालावधी केव्हापासून गणला जातो ?**

उत्तर नगरपरिषदेचा कालावधी पाच वर्षांचा असतो. हा कालावधी नवीन निवडून आलेल्या सदस्यांच्या पहिल्या सभेपासून सुरुवात होतो.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४०(१))

**प्रश्न २ विसर्जित / बरखास्त, विघटीत अथवा बरखास्तीनंतर त्यांचा कालावधी किती वर्षांचा असतो ?**

उत्तर बरखास्तीनंतर बरखास्तपूर्व कालावधीचा विचार करून उर्वरीत कालावधी इतका असतो.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४०(२))

## ३. सदस्यांचा पदावधी, राजीनामा व पोट निवडणूक

**प्रश्न १ निवडून आलेल्या सदस्यांचा सर्वसाधारण पदावधी किती वर्षाचा असतो ?**

उत्तर निवडून आलेल्या **नगरपरिषद अथवा नगरपंचायत** सदस्यांचा सर्वसाधारण कालावधी ५ वर्षांचा असतो. परंतू, पालिका सदस्यांचा पदावधी हा पालिकेच्या मुदतीबरोबरच समाप्त होतो.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४१(१))

**प्रश्न २ जागा रिक्त झाल्यामुळे अथवा अन्य कारणांमुळे पोट निवडणूक झाल्यास निवडून आलेल्या सदस्याचा कालावधी किती असतो ?**

उत्तर पोटनिवडणुकीमध्ये निवडून आलेल्या सदस्यांचा कालावधी इतर सदस्यांच्या कालावधी इतकाच असतो.

**प्रश्न ३ नगरपरिषद अथवा नगरपंचायतीमध्ये निवडून आलेल्या सदस्यांच्या कालावधीची सुरुवात केव्हापासून होते ?**

उत्तर निवडून आलेल्या सदस्यांच्या कालावधीची सुरुवात पहिल्या सभेच्या दिनांकापासून होते.

**प्रश्न ४ नगरपरिषद अथवा नगरपंचायतीमध्ये एकापेक्षा जास्त जागांवर निवडून आलेल्या सदस्याने काय करणे आवश्यक आहे ?**

उत्तर एखादी व्यक्ती एकापेक्षा अधिक प्रभागामध्ये निवडून आली असेल तर, तिने निकाल प्रसिध्द करण्यात आल्याच्या तारखेपासून ७ दिवसांच्या मुदतीमध्ये स्वत:च्या सहीची लेखी नोटीस जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाधीन करून, ज्या प्रभागात काम करण्याची इच्छा असेल त्या प्रभागाची निवड केली पाहिजे आणि अशी निवड अंतिम असेल.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९ (२))

**प्रश्न ५ एकापेक्षा जास्त जागांवर निवडून आलेल्या सदस्याने एक सोडून इतर जागांचा राजीनामा विहित केलेल्या अवधीमध्ये न दिल्यास काय परिणाम होतील ?**

उत्तर एकापेक्षा जास्त प्रभागांवर निवडून आलेल्या सदस्याने एका प्रभागाची पसंती नियमानूसार दिलेल्या मुदतीमध्ये जिल्हाधिकारी यांना कळविली नाही तर,जिल्हाधिकारी अशा प्रभागांपैकी ज्या प्रभागामध्ये अशा सदस्याने काम करावे तो चिठ्ठया टाकून ठरविला पाहिजे आणि जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच उर्वरित प्रभागामध्ये नवीन निवडणूका घेण्याबद्दल राज्य निवडणूक आयोगास अहवाल सादर करतील.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९(४))

**प्रश्न ६ एकापेक्षा जास्त जागांवर निवडून आल्यास एक सोडून इतर जागांचा राजीनामा देण्यासाठी विहित मुदत किती दिवस आहे ?**

उत्तर अशा व्यक्तीने निकाल प्रसिध्द करण्यात आल्याच्या तारखेपासून ७ दिवसांच्या मुदतीमध्ये स्वत:च्या सहीची लेखी नोटीस जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाधीन केली पाहिजे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९(२))

**प्रश्न ७ राजीनामा द्यावयाचा झाल्यास तो कोणाकडे द्यावा लागतो ?**

उत्तर अशा व्यक्तीने निकाल प्रसिध्द करण्यात आल्याच्या तारखेपासून ७ दिवसांच्या मुदतीमध्ये स्वत:च्या सहीची लेखी नोटीस जिल्हाधिकाऱ्यांकडे समक्ष स्वाधीन केली पाहिजे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९ (२))

**प्रश्न ८ सदर राजीनामा केव्हापासून अंमलात येतो ?**

उत्तर राजीनामा दिल्यापासून तात्काळ अंमलात येतो.

**प्रश्न ९ पद रिक्त झाल्याबाबत राज्य निवडणूक आयोगाला केव्हा कळवावे लागते ?**

उत्तर पद रिक्त झाल्याबाबत राज्य निवडणूक आयोगाला १५ दिवसांच्या आत मुख्याधिकारी यांनी कळविणे आवश्यक आहे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४८ (२))

**प्रश्न १० पद रिक्त झाल्याबाबत राज्य निवडणूक आयोगाला कळविण्याची जबाबदारी कोणावर असते ?**

उत्तर पद रिक्त झाल्याबाबत कळविण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सचिवाची म्हणजेच नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांची आहे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४८(२))

**प्रश्न ११ एखादा नगरपरिषद अथवा नगरपंचायतीचा सदस्य विधिमंडळाचा अथवा संसदेचा सदस्य म्हणून निवडून आल्यास त्याला नगरपरिषद अथवा नगरपंचायतीचे सदस्यत्व कायम ठेवता येते का ?**

उत्तर संबंधित नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या सदस्यास त्याचा नगरपरिषद सदस्यपदाचा कालावधी संपेपर्यंत त्यास नगरपरिषद अथवा नगरपंचायतीचे सदस्यत्व कायम ठेवता येते.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१)(I))

## ४. निवडणुकीसाठी मतदारयादी तयार करणे व अधिप्रमाणित करणे

**प्रश्न १ नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणुकीकरिता कोणती मतदारयादी वापरली जाते ?**

उत्तर नगरपालिका / नगरपंचायत निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयुक्त जी तारीख अधिसूचित करतील त्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदारयादी वापरण्यात येते.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५(१))

**प्रश्न २ मतदारयादी तयार करण्याच्या कामाचे सनियंत्रण कोण करते ?**

उत्तर विधानसभेची यादी प्राप्त झाल्यानंतर शहरासाठी मतदारयादी तयार करण्याच्या कामाचे सनियंत्रण प्राधिकृत अधिकारी तथा मुख्याधिकारी करतात.

**प्रश्न ३ कैदेची शिक्षा किंवा कारागृहात बंदिस्त किंवा पोलिसांच्या कायदेशीर ताब्यात असणारा व्यक्ती मतदान करु शकेल काय ?**

उत्तर मतदानासाठी प्रत्यक्ष मतदान केंद्रामध्ये उपस्थित असणे आवश्यक आहे. प्रतिनिधीद्वारा मतदान करता येत नाही.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३)

**प्रश्न ४ मतदारयादी अधिप्रमाणित करण्याबाबत काय तरतूद आहे ?**

उत्तर प्रभागनिहाय विभागणी केलेली मतदारयादी राज्य निवडणूक आयोग निर्देशित करेल त्या तारखेला " प्राधिकृत अधिकारी तथा मुख्याधिकारी " यांनी अधिप्रमाणित करण्याची तरतूद आहे.

## ५. निवडणुकीत मत देण्याचा अधिकार व मतदानाची पध्दत

**प्रश्न १ नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणुकीमध्ये मत देण्याचा अधिकार कोणाला आहे ?**

उत्तर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११ अन्वये ठेवलेल्या मतदारांच्या यादीमध्ये नाव असलेल्या प्रत्येक मतदारास मत देण्याचा अधिकार आहे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२(१))

**प्रश्न २ मतदानास पात्र होण्यासाठी व्यक्तीचे वय किती असावे लागते ?**

उत्तर वय वर्षे १८ पूर्ण असणे आवश्यक आहे.

(संदर्भ- लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० चे कलम १९ (a))

**प्रश्न ३ एखाद्या व्यक्तीचे एकापेक्षा जास्त वेळा एकाच प्रभागातील मतदारयादीत नाव असल्यास त्याला एकापेक्षा जास्त वेळा मतदान करता येईल का ?**

उत्तर नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १४(१))

**प्रश्न ४ एकापेक्षा जास्तवेळा मतदान केल्यास काय परिणाम होईल ?**

उत्तर एकापेक्षा जास्तवेळा मतदान केल्यास संबंधित मतदाराची एक किंवा अनेक प्रभागामधील सर्व मते रद्द ठरतील आणि तिच्याविरूध्द गुन्हा दाखल होवू शकेल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १४ )

**प्रश्न ५ एकापेक्षा जास्त प्रभागामधील मतदारयादीमध्ये नाव असलेली व्यक्ती एकापेक्षा जास्त प्रभागामध्ये मतदान करू शकेल काय ?**

उत्तर नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १४(२))

**प्रश्न ६ निवडणुकीमध्ये मतदान करण्याची काय पध्दत असते ?**

उत्तर एक सदस्य पध्दतीमध्ये एक मत देता येते. मतदान गुप्त पद्धतीने सर्वसाधारणपणे मतदान यंत्राद्वारे (EVM द्वारे) घेण्यात येते. प्रतिनिधीद्वारे (By Proxy) मतदान करता येत नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३)

## ६. सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अर्हता

**प्रश्न १ सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी काय पात्रता असावी लागते ?**

उत्तर जी व्यक्ती कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीसाठी किंवा पोटनिवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र सादर करण्याकरीता निश्चित करण्यात आलेल्या अंतिम दिनांकाला २१ वर्षांपेक्षा कमी वयाची नसेल आणि कलम ११ खालील ठेवलेल्या मतदार यादीत तिचे नाव समाविष्ट केले आहे अशी आणि या अधिनियमाखाली किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली, पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास तिला अनर्ह ठरविण्यात आले नसेल अशी प्रत्येक व्यक्ती, कोणत्याही निवडणुकीत पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास अर्हत असेल.

(संदर्भ-महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ कलम १५ (१) (२))

**प्रश्न २ सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यासाठी वयोमर्यादा किती असणे आवश्यक आहे ?**

उत्तर सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यासाठी नामानिर्देशनपत्र सादर करण्याकरिता निश्चित करण्यात आलेल्या अंतिम दिनांकाला २१ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५(१))

**प्रश्न ३ सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यासाठी त्या नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५(१))

## ७. सदस्य होण्यास अनर्हता (अपात्रता )

**प्रश्न १ राज्य निवडणूक आयोगाने निरर्ह (अपात्र) ठरविलेली व्यक्ती निवडणूक लढविण्यास पात्र आहे काय ?**

उत्तर नाही. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूकीच्या खर्चाच्या संदर्भात निरर्ह (अपात्र) ठरविलेली व्यक्ती आयोगाच्या आदेशापासून आदेशामध्ये नमूद केलेल्या कालावधीपर्यंत निवडणूक लढविण्यास पात्र ठरत नाही.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१-D))

**प्रश्न २ नगरपरिषद अथवा नगरपंचायत सदस्य होण्यासाठी कोणत्या कायदयाखाली अपात्रता नमुद करण्यात आली आहे ?**

उत्तर नगरपालिका / नगरपंचायत सदस्य होण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ मध्ये अपात्रता / अनर्हता नमूद करण्यात आली आहे.

**प्रश्न ३ निवडणूक लढविण्यासाठी अथवा सदस्य म्हणून राहण्यास निरर्हतेचा (अपात्रतेचा) कालावधी किती?**

उत्तर वेगवेगळ्या प्रकरणी तीन, पाच किंवा सहा वर्षापर्यंत असू शकतो.

**प्रश्न ४ भारत निवडणूक आयोगाने निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविलेली व्यक्ती नगरपरिषद अथवा नगरपंचायतीची निवडणूक लढवू शकते काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ५ निरर्ह (अपात्र) ठरविलेल्या व्यक्तींची यादी कोठे पाहता येईल ?**

उत्तर निरर्ह (अपात्र) ठरविलेल्या व्यक्तींची यादी संबंधित जिल्हाधिकारी आणि नगरपरिषद अथवा नगरपंचायत यांचे कार्यालयामध्ये पाहता येईल.

**प्रश्न ६ निरर्हता (अपात्रता) दूर करण्याचा अथवा निरर्हतेचा (अपात्रतेचा) कालावधी कमी करण्याचा अधिकार कोणाला आहे ?**

उत्तर निवडणूकीमधील खर्चाच्या मुद्दयावरून अपात्र किंवा निरर्ह ठरविण्यात आल्यानंतर अपात्रता किंवा निरर्हता दूर किंवा कालावधी कमी करण्याचा अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१)(१-E))

## ८. सदस्य म्हणून पदावर राहण्यास असमर्थता (अपात्रता)

**प्रश्न १ नगरपरिषद अथवा नगरपंचायत सदस्यांच्या बाबतीतील कायदेशीर निरर्हता (अपात्रता) कोणती आहे ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायत सदस्यांच्या बाबतीतील कायदेशीर निरर्हता (अपात्रता) ही महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ मध्ये नमूद केल्यानुसार आहे.

**प्रश्न २ निरक्षरता हे निरर्हतेचे (अपात्रतेचे) कारण होऊ शकेल काय ?**

उत्तर नाही.

## ९. अनर्हता / सदस्य पदावरुन काढून टाकणे

**प्रश्न १ नगरपरिषद अथवा नगरपंचायत सदस्यांना पदावरुन काढून टाकणे किंवा अनर्ह ठरविण्यासंदर्भात काय नियम आहेत ?**

उत्तर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४२, ४४ व ५५ (B) तसेच महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ मध्ये नगरपरिषद अथवा नगरपंचायत सदस्यांना पदावरून काढून टाकणे किंवा अनर्ह ठरविण्यासंदर्भात तरतूद नमूद केली आहे.

**प्रश्न २ नगरपरिषद अथवा नगरपंचायत सदस्यांना पदावरुन काढून टाकणे किंवा अनर्ह ठरविण्याचे अधिकार कोणाला आहेत ?**

उत्तर प्रकरणपरत्वे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४२ व ५५ (B) नुसार राज्य शासन आणि कलम ४४ नुसार तसेच महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ नुसार जिल्हाधिकारी यांना नगरपरिषद अथवा नगरपंचायत सदस्यांना पदावरुन काढून टाकणे किंवा अनर्ह ठरविण्याचे अधिकार आहेत.

**प्रश्न ३ नगरपरिषद अथवा नगरपंचायत सदस्यांना पदावरुन काढून टाकणे किंवा अनर्ह ठरविण्याच्या आदेशाविरुध्द कोणाकडे व किती दिवसात अपील करता येते ?**

उत्तर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४४ अन्वये अनर्ह ठरविण्याच्या आदेशाविरूध्द संबंधितास राज्य शासनाकडे जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांमध्ये अपील दाखल करता येते. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम १६ (१) (१-D) अन्वये अपात्र ठरविण्याच्या जिल्हाधिकारी यांच्या आदेशाविरूध्द संबंधितास राज्य निवडणूक आयोगाकडे जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांमध्ये अपील दाखल करता येते.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (१-D) आणि ४४ (४))

## १०. अधिनियमात नमूद राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार

**प्रश्न १ नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम कोणाकडून निश्चित केला जातो ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाकडून निश्चित केला जाते.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १० अ(१))

**प्रश्न २ नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीचा कार्यक्रम कोणाकडून जाहीर केला जातो ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोग हे निवडणूकीचा कार्यक्रम निश्चित करतात आणि आयोगाने प्रदान केलेल्या नियम ४ मधील अधिकारान्वये जिल्हाधिकारी हे निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४ आणि राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ-१०९४/१६४/१९९४, दिनांक २९/११/१९९४)

**प्रश्न ३ निवडणुकीच्या तारीखवार कार्यक्रमाची अंमलबजावणी जिल्हा पातळीवर करण्याची जबाबदारी कोणाची आहे ?**

उत्तर जिल्हाधिकारी.

**प्रश्न ४ आरक्षित जागेवर उमेदवार निवडणुकीसाठी उमेदवार उपलब्ध न झाल्यास काय कार्यवाही केली जाते ?**

उत्तर नव्याने निवडणूक प्रक्रिया सुरू करावी लागते.

## ११. निवडणूक नियमातील तरतूद

**प्रश्न १ नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणुकीमध्ये एक किंवा अनेक प्रभागांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक कोण करतो ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार जिल्हाधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५ आणि राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ-१०९४/१६४/१९९४, दिनांक २९/११/१९९४)

**प्रश्न २ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची नेमणूक करण्याची तरतूद आहे काय ? व त्यांची संख्या जास्तीत जास्त किती असावी ?**

उत्तर होय; नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणूकीसाठी दोन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नेमणेबाबत निर्देश आहेत. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी हे तहसिलदार संवर्गातील किंवा समकक्ष दर्जाचे असतील.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५(२)(a) आणि राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र . रानिआ/मनपा /२०११/प्र.क्र. १६/का ०५ दिनांक १२/११/२०११)

**प्रश्न ३ मतदान केंद्राध्यक्षाची नेमणूक कोण करु शकतो ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ९)

**प्रश्न ४ मतदान केंद्राध्यक्ष म्हणून निवडणुकीत किंवा निवडणुकीच्या संबंधात एखाद्या उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने कामावर लावलेल्या किंवा काम करणाऱ्या व्यक्तीची नियुक्ती करता येईल काय ?**

उत्तर नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ९ (१))

**प्रश्न ५ मतदान केंद्राध्यक्षाच्या अनुपस्थितीमध्ये त्याचे कामकाज पूर्ण करण्यासाठी काय पर्यायी व्यवस्था करावी लागते ?**

उत्तर प्रथम मतदान अधिकारी मतदान केंद्राध्यक्ष म्हणून काम पार पाडतील.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ९ (३))

**प्रश्न ६ उमेदवाराला मागणीप्रमाणे नामनिर्देशनपत्र पुरविण्याची जबाबदारी कोणाची आहे ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची आहे.

# ३. राजकीय पक्षांची नोंदणी

# (Registration of Political Party)

## १. राजकीय पक्ष – व्याख्या

**प्रश्न १ मान्यताप्राप्त राजकीय पक्ष म्हणजे काय ?**

उत्तर भारत निवडणूक आयोगाद्वारे काढण्यात आलेल्या निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, १९६८ आणि त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा अन्वये राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळालेला आणि तसेच राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदविण्यात आलेला राष्ट्रीय पक्ष किंवा राज्यस्तरीय पक्ष म्हणजे मान्यता प्राप्त राजकीय पक्ष होय.

(संदर्भ – महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद २ (५))

**प्रश्न २ राजकीय पक्षाची नोंदणी कोणाकडे करण्यात येते ?**

उत्तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता राजकीय पक्षाची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाकडे करण्यात येते.

(संदर्भ – महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३)

**प्रश्न ३ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षाची नोंदणी स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय. राज्य निवडणूक आयोगाकडे स्वतंत्रपणे नोंदणी करणे आवश्यक आहे.

(संदर्भ – महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३)

**प्रश्न ४ ज्या राजकीय पक्षांची भारत निवडणूक आयोगाकडे नोंदणी झाली आहे त्यांना राज्य निवडणूक आयोगाकडे पुन्हा नोंदणी करावी लागेल काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ – महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३)

## २. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राजकीय पक्ष नोंदणी करणे, प्राथमिक माहिती व प्रक्रिया

**प्रश्न १ निवडणुकीसाठी राजकीय पक्षाच्या नोंदणीची प्रक्रिया काय आहे ?**

उत्तर राजकीय पक्षाला नोंदणीसाठी राज्य निवडणूक आयोगाकडे विहीत नमुन्यात (परिशिष्ट एक व दोन) परिपूर्ण अर्ज करणे आवश्यक आहे. हा अर्ज आयोगाच्या पत्त्यावर आयोगाच्या सचिवांकडे सादर करावा किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावा.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३)

**प्रश्न २ निवडणुकीसाठी राजकीय पक्षांची नोंदणी करण्यासाठी कोणकोणती कागदपत्रे आवश्यक आहेत?**

उत्तर निवडणुकीसाठी राजकीय पक्षांची नोंदणी करण्यासाठी पक्षाचे नाव, कार्यालय, ठिकाण व पत्ता, पदाधिकारी निवडीबाबत ठरावाची प्रत, कमीत कमी १५० सदस्य संख्या व त्यांच्या मतदारयादीतील नोंदणीबाबत पुरावा, पक्षाच्या नियमावलीची प्रत विहित, नमुन्यातील (परिशिष्ट तीन) घोषणापत्र आणि प्रक्रिया शुल्क म्हणून रूपये १००००/- चा धनाकर्ष ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३ (३))

**प्रश्न ३ निवडणुकीसाठी राजकीय पक्षांची नोंदणी करावयाच्या अर्जावर कोणाची सही आवश्यक असते ?**

उत्तर सदर अर्जावर पक्षाचे अध्यक्ष / सचिव / सभापती किंवा कोणत्याही नावाने ओळखले जाणारे संघ अथवा संस्था अथवा राजकीय पक्ष यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी आवश्यक आहे. परंतू मान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांचे बाबतीत अर्जावर कोणत्याही राज्यस्तरीय पदाधिकारी यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३(२))

**प्रश्न ४ राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्यासाठी अर्जाचे प्रारुप नमुने उपलब्ध आहेत काय ?**

उत्तर होय. दि. ३१ मार्च, २००९ च्या राज्य निवडणूक आयोगाच्या अधिसूचनेमध्ये परिशिष्ट १ व २ मध्ये नमूद प्रमाणे उपलब्ध आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३(१))

**प्रश्न ५ निवडणुकीसाठी राजकीय पक्ष म्हणून नोंद करताना त्यांच्या सदस्यांचे संख्याबळ कमीत कमी किती असावे ?**

उत्तर मतदार म्हणून नोंदविलेले सदस्यांचे असे संख्याबळ कमीत कमी १५० असावे.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३(३)(इ))

**प्रश्न ६ निवडणुकीसाठी राजकीय पक्षांची नोंदणी करताना राजकीय पक्षाचे नाव पूर्वी नोंदणी झालेल्या पक्षाच्या नावाप्रमाणे असल्यास नोंदणी नाकारण्याचा अधिकार कोणाला आहे ?**

उत्तर हा अधिकार राज्य निवडणूक आयोग यांना आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ९ (चार))

**प्रश्न ७ निवडणुकीसाठी राजकीय पक्षाच्या नोंदणीसाठी नोंदणी प्रक्रिया शुल्क / रक्कम किती भरावी लागते ? व ती कोणाच्या नावाने भरावी लागते ?**

उत्तर अर्जासोबत नोंदणी प्रक्रिया शुल्क रु. १०,०००/- ( दहा हजार) चा धनाकर्ष (डी.डी) Assistant Commissioner, State Election Commission, महाराष्ट्र, मुंबई यांच्या नावाने काढावा लागतो.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३(६) आणि राज्य निवडणूक आयोग यांचेकडील अधिसूचना क्र. एसईसी/ २००९/ सी.आर. ४९/ डी-११, दि.२ सप्टेंबर, २००९)

**प्रश्न ८ राजकीय पक्षाची नोंदणी करण्याचे काय फायदे आहेत ?**

उत्तर भारत निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्षाने राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केल्यास त्या त्या पक्षासाठी राखीव असलेले निवडणूक चिन्ह मिळते. मान्यताप्राप्त नसलेला परंतु नोंदणीकृत पक्ष असल्यास मुक्त चिन्हातील चिन्ह प्राधान्याने मिळते. पक्षांतर बंदी कायद्याचा लाभ मिळतो. नोंदणीकृत पक्षामार्फत निवडून आलेल्या सर्व सदस्यांना एक गट गणला जातो. त्यामुळे संख्याबळाचा आक्षेप मिळणारा लाभ प्राप्त होतो.

**प्रश्न ९ राजकीय पक्षाची नोंदणी करण्यासाठी साधारण किती कालावधी लागतो ?**

उत्तर असा कालावधी निश्चित नाही. परंतु परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर नोंदणी करण्यासाठी साधारणपणे ३ महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे.

**प्रश्न १० राजकीय पक्षासाठी नोंदणी करण्याकरिता अर्ज सादर करण्यासाठी काही ठराविक कालावधी असतो का ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ११ राजकीय पक्ष म्हणून नोंदणी झाल्यानंतर पक्षाचे नाव वापरण्याबाबत कोणती खबरदारी घ्यावी?**

उत्तर ज्या नावाने नोंदणी झाली आहे, तेच नाव त्याच पध्दतीने वापरणे बंधनकारक आहे.

**प्रश्न १२ राजकीय पक्षाचे कार्यालय कोठे असावे याबाबत काही निकष आहेत काय ?**

उत्तर आयोगाच्या अशा सूचना नाहीत. तथापि, सर्वसाधारणपणे निवासी घरामध्ये राजकीय पक्षाचे कार्यालय असणे अपेक्षित नाही.

## ३. राजपत्रातील प्रसिध्दी व आक्षेप

**प्रश्न १ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राजकीय पक्षाची नोंदणी सर्वसाधारणपणे झाल्यानंतर प्रारूप प्रसिध्दी करण्यात येते का ? प्रारुप प्रसिध्दी कोठे करण्यात येते व कशा पध्दतीने ?**

उत्तर राजकीय पक्षांची नोंदणी करण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये पक्षाचे नाव आणि पत्ता, पक्षाचे अध्यक्ष, चिन्ह देण्यात येणार असेल तर ते चिन्ह अशा तपशिलाचा समावेश असलेली पूर्व सूचना प्रसिध्द करण्यात येते. परंतू भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्याबाबतीत प्रारूप प्रसिद्धीची आवश्यकता असणार नाही.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३(९)(एक))

**प्रश्न २ प्रारूप प्रसिध्दीवर आक्षेप नोंदविता येतो काय ? त्याचा कालावधी किती आहे ?**

उत्तर होय. महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये पूर्व सूचना प्रसिध्द केलेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या मुदतीमध्ये आक्षेप नोंदविता येतो.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३ (९) (दोन))

**प्रश्न ३ प्राप्त आक्षेपांसंदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार कोणाला आहे ?**

उत्तर सदर अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३ (९) (दोन)(तीन))

## ४. नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्ष -अधिकार व निकष

**प्रश्न १ नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्षाचे प्रकार कोणते ?**

उत्तर नोंदणीकृत मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष किंवा नोंदणीकृत मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष हे नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्षाचे प्रकार आहेत.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद २ (५))

**प्रश्न २ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मान्यताप्राप्त राजकीय पक्ष व अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांचे अधिकार काय आहेत ?**

उत्तर १. मान्यताप्राप्त राजकीय पक्षाला चिन्ह राखीव असते. मात्र अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाला मुक्त चिन्हापैकी एका चिन्हाची मागणी करावी लागते व त्यांना उपलब्ध मुक्त चिन्हातून प्राधान्याने (अपक्षांच्या आधी) चिन्ह नेमून दिले जाते.

२. मान्यताप्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्ष यांना निवडणुकीतील प्रचारासाठी २० स्टार प्रचारक (Star Campaigner) आणि इतर अमान्यताप्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्ष यांना १० स्टार प्रचारक यांची यादी राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करता येते.

**प्रश्न ३ राजकीय पक्षाची नोंदणी कोणत्या नियमानुसार होते ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाच्या महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ प्रमाणे राजकीय पक्षांची नोंदणी होते.

## ५. राजकीय पक्षांना देण्यात येणारी चिन्हे व मार्गदर्शक तत्वे

**प्रश्न १ राजकीय पक्षांना चिन्ह वाटप कोणत्या नियमानुसार केले जाते ?**

उत्तर महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील तरतुदीनुसार सर्व मान्यताप्राप्त नोंदणीकृत पक्ष व अमान्यताप्राप्त नोंदणीकृत पक्ष यांना चिन्ह वाटप करण्यात येते.

**प्रश्न २ मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना देण्यात येणारी चिन्हे राखीव ठेवली जातात काय व त्याची तरतूद काय आहे ?**

उत्तर मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्षांना त्यांचेसाठी भारत निवडणूक आयोगाद्वारे राखीव केलेल्या चिन्हाची निवड करता येते. त्यांना इतर कोणतेही चिन्ह दिले जात नाही. मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षांना तो पक्ष

महाराष्ट्र राज्यातील असो किंवा नसो त्यांचे पक्षांसाठी भारत निवडणूक आयोगाने आरक्षित ठेवलेले चिन्ह दिले जाते. त्यांना इतर कोणतेही चिन्ह दिले जात नाही. परंतु महाराष्ट्र राज्याबाहेरील एकापेक्षा अधिक राज्यातील मान्यताप्राप्त राज्य पक्षाकरिता विविध राज्यात समान चिन्हे आरक्षित असतील तेव्हा राज्य निवडणूक आयोग अशा राज्य पक्षापैकी ज्या पक्षाने राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीसाठी सर्व प्रथम अर्ज केला असेल त्याच पक्षाला त्यांचेसाठी आरक्षित चिन्ह नेमून देईल व इतर नोंदणी अर्ज करणाऱ्या पक्षांना त्यांचेसाठी आरक्षित असलेल्या चिन्हा व्यतिरिक्त इतर चिन्ह नेमून देईल.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ४ (२) आणि ६)

**प्रश्न ३ इतर राज्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची चिन्हे राखीव करण्याचे अधिकार कोणाला आहेत ?**

उत्तर सदर अधिकार राज्य निवडणूक आयोगाला आहेत.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ६ (२))

**प्रश्न ४ अमान्यताप्राप्त नोंदणीकृत पक्ष, आघाडी यांना चिन्ह वाटप करण्याची तरतूद काय आहे?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या अशा इतर पक्षांच्या उमेदवारांना मुक्त चिन्हांमधील त्यांनी मागणी केलेले एक चिन्ह प्राधान्याने देण्याची तरतूद आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ८ )

**प्रश्न ५ मुक्त चिन्हे ठरविण्याचे अधिकार कोणाला आहेत व मुक्त चिन्ह कोणाला देण्यात येतात ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाला मुक्त चिन्हे ठरविण्याचे अधिकार असून, सर्वसाधारणपणे मान्यताप्राप्त पक्ष वगळून उर्वरित नोंदणीकृत पक्ष, आघाडी व अपक्ष उमेदवारांना मुक्त चिन्हे देण्यात येतात.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ८ आणि १०)

## ६. राजकीय पक्षाचा उमेदवार

**प्रश्न १ राजकीय पक्षाच्या उमेदवारास निवडणुकीसाठी राजकीय पक्षाचा उमेदवार केव्हा समजले जाईल?**

उत्तर उमेदवाराने नामनिर्देशनपत्रामध्ये त्या राजकीय पक्षाकडून निवडणूक लढवित असल्याबाबतची घोषणा केली असेल व संबंधित पक्षाने सदर उमेदवारास पुरस्कृत केलेबाबतचा जोडपत्र एक व जोडपत्र दोन भरून विहित वेळेमध्ये सक्षम प्राधिकाऱ्याकडे दिले असेल तर अशा उमेदवारास त्या राजकीय पक्षाचा उमेदवार समजण्यात येईल.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ९)

**प्रश्न २ एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्रे भरणा-या व त्यामध्ये एकापेक्षा जास्त उमेदवार राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केले असल्याबाबत नमूद असल्यास काय कार्यवाही करावी ?**

उत्तर एकाच उमेदवाराने एकापेक्षा जास्त राजकीय पक्षांचे जोडपत्र एक व जोडपत्र दोन सादर केले असल्यासनामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विहित वेळेमध्ये एक राजकीय पक्ष वगळता अन्य राजकीय पक्षाने लेखी सूचना देऊन जोडपत्र दोन मागे घेतल्यास त्या उमदेवारांस ज्या पक्षाने जोडपत्र दोन मागे घेतलेले नाही त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे मानावे. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विहित कालावधीनंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त राजकीय पक्षाने दिलेले जोडपत्र दोन शिल्लक राहिले असल्यास त्या उमेदवाराने तो कोणत्या पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो याबाबत लेखी दिल्यास त्याला त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे मानण्यात यावे. परंतु जर त्यांने तो कोणत्याही पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो असे लेखी न कळविल्यास त्याने ज्या पक्षाच्या वतीने प्रथम नामनिर्देशनपत्र दाखल केले आहे. त्या पक्षाचा तो अधिकृत उमेदवार असल्याचे मानण्यात येते.
(संदर्भ:- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील परिपत्रक क्रमांक एसईसी/२००९ / सीआर-४९/का-११ दिनांक ०५/०२/२०१२)

**प्रश्न ३ एकाच राजकीय पक्षाने एकाच मतदारसंघासाठी एकापेक्षा जास्त उमेदवार पुरस्कृत केल्यास त्यापैकी कोणता उमेदवार त्या राजकीय पक्षाचा अधिकृत उमेदवार मानावा ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाच्या महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) सुधारणा आदेश २०११ नुसार राजकीय पक्षामार्फत पर्यायी अथवा डमी उमेदवार देण्याची तरतूद केली असून जोडपत्र २ मधील तरतुदीनुसार मान्यता दिलेल्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये रद्द झाल्यास अथवा मूळ उमेदवाराने माघार घेतल्यास पर्यायी अथवा डमी उमेदवारास पक्षाचा अधिकृत उमेदवार मानण्याची तरतूद आहे. परंतु एखाद्या राजकीय पक्षाने एकाच जागेकरिता एकापेक्षा जास्त उमेदवार पुरस्कृत केले असल्यास व नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा शेवटच्या दिवशी विहित वेळेच्या आत पक्षाने त्यापैकी एकाचे जोडपत्र दोन रद्द करण्याचे न कळविल्यास ज्या उमेदवाराचे नावे नामनिर्देशनपत्र प्रथम प्राप्त झाले असेल तो अधिकृत उमेदवार राहील व दुसरा उमेदवार अपक्ष उमेदवार ठरेल. (संदर्भ:- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. रानिआ/मनपा/२००६/प्रक्र-१९/का-०५ दिनांक ६ जानेवारी, २००७)

**प्रश्न ४ राजकीय पक्षाच्या उमेदवारास राखीव चिन्ह वाटप कोणत्या वेळी होते ?**

उत्तर चिन्ह वाटपाच्या दिवशी प्रथम मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांना त्यांचे पक्षाकरीता राखीव ठेवलेले चिन्ह वाटप केले जाते. त्यानंतर अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांना मुक्त चिन्हांपैकी एक चिन्ह नेमून दिले जाते व त्यानंतर अपक्ष उमेदवारांना मुक्त चिन्हांपैकी चिन्ह वाटप केले जाते.

## ७. नोंदणीकृत पक्षाची नोंदणी रद्द करणे

**प्रश्न १ नोंदणीकृत पक्षाची नोंदणी रद्द करता येते का ?**

उत्तर होय.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ४ )

**प्रश्न २ नोंदणीकृत राजकीय पक्षाची नोंदणी रद्द करण्याचे अधिकार कोणाला आहेत ?**

उत्तर सदर अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ४ )

**प्रश्न ३ नोंदणीकृत पक्षाची नोंदणी कोणत्या कारणामुळे रद्द होऊ शकते ?**

उत्तर राजकीय पक्षाची नोंदणी खालील कारणामुळे रद्द होऊ शकते. :-

१. नोंदणीच्या आदेशातील तरतुदीची पूर्तता न केल्यास

२. आदर्श आचारसंहितेचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास

३. आयोगाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे व सूचनांचे पालन होत नसल्यास

४. आदर्श आचारसंहितेची अथवा आयोगाच्या निर्देशाची अथवा सूचनांचे पालन होत नसल्याचे तक्रार प्राप्त झाल्यास व त्यात तथ्य आढळल्यास

५. त्या राजकीय पक्षाने स्वत:हून नोंदणी रद्द करण्याचे आयोगाकडे विनंती केल्यास

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ४ )

**प्रश्न ४ मान्यताप्राप्त नोंदणीकृत पक्षाची मान्यता काढून घेतल्यास काय परिणाम होतो ?**

उत्तर संबंधित पक्षाला त्यांचासाठी राखीव असलेले चिन्ह मिळत नाही.

**प्रश्न ५ राजकीय पक्षाची नोंदणी रद्द झाल्यास काय परिणाम होतो ?**

उत्तर संबंधित पक्षाचे उमेदवार हे अपक्ष उमेदवार म्हणून गणले जातील.

## ८. राजकीय पक्षांची आघाडी

**प्रश्न १ आघाडी / फ्रंट म्हणजे काय ?**

उत्तर एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी उमेदवार उभा करण्यासाठी स्वतः चा पक्ष तयार करणाऱ्या व्यक्तींचा गट म्हणजे आघाडी किंवा फ्रंट होय.

(संदर्भ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ मधील कलम २ (अ))

**प्रश्न २  राजकीय पक्षांची निवडणूकपूर्व आघाडी म्हणजे काय ?**

उत्तर      निवडणुकीपूर्वी स्थापन केलेली आघाडी म्हणजे निवडणूकपूर्व आघाडी होय.

**प्रश्न ३  राजकीय पक्षांच्या आघाडीस कोणाकडून मान्यता दिली जाते ?**

उत्तर   अशी मान्यता देण्याची तरतूद नाही. निवडणूक झाल्यानंतर यथा:स्थिती विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांना ३० दिवसांमध्ये विहित पद्धतीने माहिती देण्याची तरतूद आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता नियम १९८७ )

**प्रश्न ४    निवडणुकीकरिता आघाडी स्थापन करता येते काय ? त्यास कोण मान्यता देते ?**

उत्तर    होय. निवडणुकीपूर्व आघाडी करून त्याची पक्ष म्हणून राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करण्याची तरतूद आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९)

## ९.    <u>राजकीय पक्षांबाबत अन्य तरतुदी</u>

**प्रश्न १  राजकीय पक्षांबाबत अन्य कोणत्या तरतुदी आहेत ?**

उत्तर   राजकीय पक्षाने राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेले विविध आदेश, निर्देश / सूचनांचे  पालन करणे बंधनकारक आहे. पक्षाच्या नावातील बदल, पत्ता व पदाधिकारी बदल विनाविलंब कळविणे आवश्यक आहे. पक्षाच्या नावामधील बदलासाठी आयोगाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. राजकीय पक्षाने त्यांचे मिळकत व खर्च यांचे हिशेब योग्यरितीने ठेवावे आणि विशेषता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीवर करण्यात आलेला खर्च, पक्षाच्या सर्वसाधारण प्रसिध्दीवर करण्यात आलेल्या खर्चाचा तपशिल व निवडणूकीमध्ये उभा करण्यात आलेल्या उमेदवारांच्या किंवा पक्षाव्दारे पाठिंबा देण्यात आलेल्या उमेदवारांच्या प्रचाराकरीता करण्यात आलेल्या खर्चाचे उमेदवार निहाय वेगळे हिशेब ठेवावेत. पक्षाच्या वार्षिक लेखापरिक्षीत लेख्याची एक प्रत व संबंधित वर्षातील कायद्यान्वये भरलेल्या आयकर विवरणाची एक प्रत संबंधित वित्तीय वर्ष संपल्यापासून एक वर्षाच्या आत आयोगास सादर करावी.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३ (१०))

**प्रश्न २ राजकीय पक्षाच्या वर्तणुकीवर कोणाचे सनियंत्रण असते ?**

उत्तर निवडणूक सुरळीतपणे व पारदर्शक वातावरणामध्ये पार पाडण्याच्या दृष्टीने राजकीय पक्षाच्या वर्तणुकीवर राज्य निवडणूक आयोगाचे संनियंत्रण असते.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ४ व ५)

**प्रश्न ३ नोंदणीकृत राजकीय पक्षांना वार्षिक लेखा परीक्षण बंधनकारक आहे काय ? ते कोणाकडून करुन घेणे अपेक्षित आहे ?**

उत्तर होय. नोंदणीकृत राजकीय पक्षांना वार्षिक लेखा परिक्षण बंधनकारक आहे. सनदी लेखापालाकडून करणे अपेक्षित आहे.

**प्रश्न ४ राजकीय पक्षांनी त्यांचे वार्षिक लेखापरिक्षण अहवाल कोणत्या कालावधीमध्ये व कोणास सादर करणे आवश्यक आहे ?**

उत्तर पक्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल व आयकर विवरणपत्राची प्रत आर्थिक वर्ष संपल्यापासून एक वर्षाच्या आत आयोगाकडे सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील परिच्छेद ३ (१०))

**प्रश्न ५ नोंदणीकृत राजकीय पक्षांना आयकर विवरणपत्र भरणे बंधनकारक आहे काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ६ नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या अंतर्गत निवडणुका घेणे बंधनकारक आहे काय ?**

उत्तर होय.

## १०. पक्षांतर बंदी अधिनियम (Anti Defection Law)

**प्रश्न १ पक्षांतर बंदी म्हणजे काय ?**

उतर निवडून आल्यानंतर राजकीय पक्षाचे / आघाडीचे / फ्रंटचे सदस्यत्व सोडून देणे व इतर पक्षामध्ये प्रवेश करण्यावर घातलेले निर्बंध म्हणजे पक्षांतर बंदी होय.

**प्रश्न २ पक्षांतर बंदी अधिनियमातील तरतूदी काय आहेत ?**

उत्तर महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ मधील तरतुदींनुसार कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या असणाऱ्या सदस्याने निवडून आल्यानंतर अशा राजकीय पक्षाचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे सदस्यत्व स्वेच्छेने सोडून दिले आणि तो ज्या पक्षाचा सदस्य आहे त्या राजकीय पक्षाकडून किंवा आघाडीकडून किंवा फ्रंटकडून किंवा त्यापैकी कोणाकडून ही या संबंधात प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अगर प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही निर्देशाचे पालन केले नाही तर अनर्हतेसंबंधी तरतुदी आहेत.

(संदर्भ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ मधील कलम ३)**प्रश्न ३ पक्षांतर बंदी अधिनियम स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू आहे काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६)

**प्रश्न ४ पक्षांतर बंदी अधिनियम लागू करण्यामागील भूमिका काय आहे ?**

उत्तर पक्षांतर करून मर्जीप्रमाणे पाठिंबा देणे मतदान करणे महत्वाच्या विषयासंदर्भात पक्षाच्या भूमिकेविरुद्ध वागणे या कृत्यांना प्रतिबंध करून लोकशाही सुदृढ करण्याची भूमिका आहे.

**प्रश्न ५ पक्षांतर बंदी अधिनियमानुसार कायदेशीर प्रक्रिया कोणत्या प्राधिकाऱ्यासमोर चालते ? अशा प्रकरणी अंतिम आदेश कोण पारित करतो ?**

उत्तर नगरपालिका / नगरपंचायत सदस्यांच्या बाबतीत जिल्हाधिकारी हे सक्षम प्राधिकारी आहेत. अशा प्रकरणी जिल्हाधिकारी हे अंतिम आदेश पारीत करतात.

# प्रकरण ४.

# सदस्य संख्या निश्चिती

# (Fixing no.of members)

## १. स्थानिक स्वराज्य संस्थेची संरचना व सदस्य संख्या

**प्रश्न १ नगर परिषदेची संरचना कशी असते ?**

उत्तर प्रत्येक नगर परिषदेसाठी निवडणुकीच्या प्रयोजनासाठी नगरपालिकेचे क्षेत्र ज्या प्रभागात विभागले जाईल त्याची संख्या व सीमा शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येते. प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी लगतच्या जनगणनेच्या प्रसिध्द आकडेवारीनुसार सदस्य संख्या ठरविण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०)

**प्रश्न २ नगरपालिकेमध्ये नियमानुसार कमीत कमी व जास्तीत जास्त किती सदस्य असू शकतात ?**

उत्तर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९ अन्वये पालिका सदस्य संख्या निश्चित करण्याची तरतूद आहे. यात खालीलप्रमाणे सदस्य संख्या असते:-

| **परिषदेचा वर्ग** | **निवडून द्यावयाच्या परिषद सदस्यांची संख्या** |
|---|---|
| "अ" वर्ग | किमान सदस्य संख्या - ३८<br>१,००,००० पेक्षा अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ८,००० लोकसंख्येकरिता, एक जादा सदस्य देय असेल, तथापि, एकूण सदस्य संख्या ६५ हून अधिक नसते; |
| "ब" वर्ग | किमान सदस्य संख्या - २३<br>४०,००० पेक्षा अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ५,००० लोकसंख्येकरिता, एक जादा सदस्य देय असेल, तथापि, एकूण सदस्य संख्या ३७ हून अधिक नसते; |
| "क" वर्ग | किमान सदस्य संख्या - १७<br>२५,००० पेक्षा अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ३,००० लोकसंख्येकरिता, एक जादा सदस्य देय असेल, तथापि, एकूण सदस्य संख्या २३ हून अधिक नसते; |
| नगर पंचायत | नगर पंचायतीकरिता एकूण १७ सदस्य देय होतात. |

**प्रश्न ३ नगर परिषदेकरिता सदस्य संख्या कोण व कशी निश्चित करतात ?**

उत्तर नगर परिषदेकरिता सदस्य संख्या निश्चित करण्याचा अधिकार प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त यांना आहेत. सदस्य संख्या लगतच्या जनगणनेच्या प्रसिध्द आकडेवारीनुसार निश्चित करण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२) आणि नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र. नपसु- २००१/प्र.क्र.१/२००१/५, दिनांक ०१/०१/२००१)

**प्रश्न ४ नगर परिषद क्षेत्रात विभागणी करण्यात आलेल्या मतदार संघांना काय म्हणतात ?**

उत्तर नगर परिषद क्षेत्रात विभागणी करण्यात आलेल्या मतदार संघास प्रभाग अथवा वॉर्ड असे म्हणतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० (१)

## २. <u>सदस्य संख्येचे निकष</u>

**प्रश्न १ निश्चित केलेली सदस्य संख्या किती कालावधीसाठी असते ?**

उत्तर नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पहिल्या सभेसाठी नेमून दिलेल्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीपर्यंत असते. परंतु, नगर परिषदेच्या हद्दीत वाढ झाल्यास त्यात बदल होऊ शकतो.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ४० व ४१)

**प्रश्न २ सदस्य संख्या निश्चित केल्यानंतर त्यासंबंधीचे आदेश कसे प्रसिध्द केले जातात ?**

उत्तर सदस्य संख्या निश्चितीचे आदेश शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९(२))

**प्रश्न ३ राखीव जागेवरील सदस्यांची संख्या कशाच्या आधारे निश्चित करण्यात येते ?**

उत्तर नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी निश्चित करण्यात आलेले एकूण प्रभागातील जागांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीकरिता जागा संबंधित नगर परिषदेच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती/जमातीच्या लोकसंख्येच्या आधारे ठरविण्यात येते. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी एकूण सदस्य संख्येच्या २७% जागा राखीव होतात. महिलांकरिता एकूण सदस्य संख्येच्या ५०% जागा राखीव ठेवण्यात येतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९(२)(c))

**प्रश्न ४ नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी सदस्य संख्या कशा प्रकारे निश्चित करण्यात येते ?**

उत्तर नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या सदस्यांसाठी एकूण सदस्य संख्येच्या २७% जागा (महिलांसह) निश्चित करण्यात येतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९(२)(d))

**प्रश्न ५ महिलांसाठी सदस्य संख्या कशा प्रकारे निश्चित करण्यात येते ?**

उत्तर नगरपालिका निवडणुकीमध्ये महिलांसाठी सदस्य संख्या ही एकूण निवडून द्यावयाच्या सदस्य संख्येच्या ५०% जागा (राखीव जागेसह) निश्चित करण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९(२)(b))

**प्रश्न ६ नगर परिषद क्षेत्रामध्ये वाढ झाल्यास काय कार्यवाही करण्यात येते ?**

उत्तर नगर परिषदेच्या क्षेत्रामध्ये वाढ झाल्यास वाढ झालेल्या क्षेत्राकरिता लोकसंख्येच्या आधारे देय असलेले सदस्य देण्याकरिता पोटनिवडणूक घेण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०(५))

**प्रश्न ७ वाढीव क्षेत्राच्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्यांचा कालावधी किती असतो ?**

उत्तर वाढीव क्षेत्राकरिताच्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्याचा कालावधी नगर परिषदेच्या कालावधी एवढाच असतो.

( संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०(५))

# प्रकरण ५.

# प्रभाग रचना

# (Delimitation of Constituencies)

## १. प्रभाग रचना करणेसाठी अधिकार

**प्रश्न १ नगरपरिषद / नगरपंचायत निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाने कोणाकडे सोपविलेली आहे ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषद / नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्यावर सोपविली आहे.

( संदर्भ : १) महाराष्ट्र नगरपरिषदा / नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० ए अन्वये २) राज्य निवडणूक आयोग आदेश क्र. मनपा-२००५-प्र.क्र. १७ - का ५ दिनांक ३ मे २००५ )

**प्रश्न २ प्रभाग रचना करण्यासाठी प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव कोण तयार करतो ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने प्रभाग रचना करणेसाठी आवश्यक ती सदस्य संख्या निश्चित करुन दिल्यानंतर प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी तयार करतात.

**प्रश्न ३ प्रभाग रचना करतांना प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव कोणते अधिकारी, कोणाकडे मान्यतेसाठी सादर करतात ?**

उत्तर नगरपरिषद / नगरपंचायतीच्या बाबतीत प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव अ व ब वर्गाच्या नगरपरिषदांसाठी जिल्हाधिकारी तयार करून राज्य निवडणूक आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करतात. क वर्ग नगरपरिषदा व नगरपंचायती ची प्रारूप प्रभाग रचना जिल्हाधिकारी तयार करून विभागीय आयुक्ताकडे मान्यतेसाठी सादर करतात.

( संदर्भ : राज्य निवडणूक आयोग आदेश क्र. मनपा-२००५-प्र.क्र. १७ -का ५ दिनांक ३ मे २००५ )

## २. प्रभाग रचनेची संरचना

**प्रश्न १ नगरपरिषद / नगरपंचायतीच्या प्रभाग रचनेची संरचना कशी असते ?**

उत्तर नगरपरिषद / नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी लगतच्या लोकसंख्येच्या आधारावर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी निश्चित करुन दिल्यानुसार सदस्य संख्या व आरक्षण ठरविण्यात येते.

( संदर्भ : महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२) अन्वये )

**प्रश्न २ प्रभाग रचना कधी करावी लागते ?**

उत्तर सक्षम प्राधिकाऱ्याने सदस्य संख्या निश्चित झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाच्या,आदेशाप्रमाणे प्रभाग रचना करावी लागते. सर्वसाधारणपणे स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार, दर्जा अथवा अद्ययावत जनगणना आकडेवारी जाहीर झाल्यानंतर प्रभाग रचना करण्यात येते. मात्र अशी प्रभाग रचना ही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्याच्या सर्वसाधारणपणे सहा महिने अगोदर करावी लागते.

**प्रश्न ३ प्रभाग रचनेमध्ये आरक्षण कशाच्या आधारे निश्चित करण्यात येते ?**

उत्तर प्रभाग रचनेमध्ये आरक्षण हे अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीची लोकसंख्या विचारात घेऊन सदर प्रवर्गासाठी सदस्य संख्या निश्चित करण्यात येते. तसेच नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी एकूण सदस्य संख्येच्या २७% जागा राखून ठेवण्यात येतात. महिलांसाठी देखील एकूण सदस्य संख्येच्या ५०% जागा (राखीव जागासहीत) ठेवण्यात येतात.

( संदर्भ : १) महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२) (बी),(सी) अन्वये )

**प्रश्न ४ नगरपरिषद व नगरपंचायतीच्या क्षेत्राची निवडणूक विभाग ( वॉर्ड / प्रभाग) ची संख्या कोण निश्चित करते ?**

उत्तर नगरपरिषद, नगरपंचायतीच्या बाबतीत आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन यांना सदस्य संख्या निश्चित करण्याचे अधिकार आहेत. हे अधिकार प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत.

( संदर्भ: )

**प्रश्न ५ नगरपरिषद / नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचना करतांना कोणत्या बाबींचे पालन करणे आवश्यक आहे ?**

उत्तर सक्षम प्राधिकाऱ्याने ठरवून दिलेल्या सदस्य संख्येनुसार प्रभाग रचना करणे व राज्य निवडणूक आयोगाचे विविध आदेश व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ व नगरपरिषदा, नगरपंचायती निवडणूक नियम, १९६६ च्या तरतुदीनुसार प्रभाग रचना करणे आवश्यक आहे.

**प्रश्न ६ अपवादात्मक परिस्थितीमध्ये नगरपरिषदा, नगरपंचायती निवडणुकीसाठी प्रभाग रचना करताना प्रगणक गट फोडावा लागल्यास कोणती काळजी घ्यावी ?**

उत्तर नगरपरिषदा, नगरपंचायती निवडणूकीकरिता प्रभाग रचना करताना शक्यतो जनगणनेचा गट फोडण्यात येत नाही. तथापि, अपावादात्मक परिस्थितीत प्रगणक गट फोडावा लागल्यास सर्वसाधारणपणे एक कुटुंब दोन वेगवगळ्या प्रभागामध्ये विभागले जाणार नाही. तसेच दृश्य स्वरुपात ठळक भौगोलिक खुणा दर्शविल्या जाऊ शकतील, तसेच या गटाची प्रत्यक्ष लोकसंख्येची माहिति प्राप्त करून घेणे इ. बाबी संबंधी दक्षता घ्यावी लागते.

( संदर्भ : आयोगाचे आदेश क्र.मनपा, २००५ / प्र. क्र. १७/ कार्यासन ५ दिनांक १५ डिसेंबर २००५ परि. १६ व १७ )

## ३. गृहित धरावयाची जनगणना

**प्रश्न १ प्रभाग रचना करताना केव्हाची व कोणत्या क्षेत्राची जनगणना विचारात घेतात ?**

उत्तर नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या निवडणूकीकारीता प्रभाग रचना करताना यापूर्वीच्या लगतच्या काळाची प्रसिध्द झालेली संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संपूर्ण क्षेत्राची जनगणनेची लोकसंख्या विचारात घेतली जाते.

( संदर्भ : १) महाराष्ट्र नगरपरिषदा / नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (ए) अन्वये २) राज्य निवडणूक आयोग आदेश दिनांक ३ मे २००५ परि. १२ )

**प्रश्न २ प्रभाग रचनेसाठी प्रसिध्द झालेल्या जनगणनेप्रमाणे प्रगणक गटनिहाय नकाशे व तपशील कोठे उपलब्ध असतात ?**

उत्तर संचालक, जनगणना कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रश्न ३ लगतच्या जनगणनेची आकडेवारी प्रसिध्द न झाल्यास कोणती कार्यपध्दती अवलंबितात ?**

उत्तर प्रभाग रचना करताना लगतच्या जनगणनेची संपूर्ण आकडेवारी उपलब्ध नसल्यास त्या आधीच्या जनगणनेनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांची लोकसंख्येची आकडेवारी लक्षात घ्यावी लागते.

**प्रश्न ४ जनगणनेच्या आकडेवारीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे आरक्षण निश्चित केले जाते, त्याप्रमाणे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित केले जाते अथवा नाही?**

उत्तर नाही. तथापि, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित करताना एकूण सदस्य संख्याच्या २७% जागा राखून ठेवण्यात येतात. मात्र, संपूर्णत: अनुसूचित क्षेत्रातील सदस्यांच्या बाबतीत अनुसूचित जाती / जमातीचे सदस्य वगळून उर्वरित सदस्य संख्येच्या २७% सदस्य नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात येतात.

## ४. परिसीमनाचा कालावधी

**प्रश्न १ प्रत्येक निवडणुकीकरिता वॉर्डच्या / प्रभागाच्या हद्दींची पुन्हा आखणी करुन नवीन प्रभाग रचना करणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थेचा दर्जा बदलल्यास, हद्दीमध्ये बदल झाल्यास, जनगणनेची नवी आकडेवारी जाहीर झाल्यास पुढील / लगतच्या निवडणुकीसाठी **वॉर्डच्या /** प्रभागाच्या हद्दींची पुन्हा आखणी करुन नवीन प्रभाग रचना करणे आवश्यक ठरते. (संदर्भ : महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० (५) अन्वये )

**प्रश्न २ निवडणुकीनंतर हद्दवाढ झाल्यास नव्याने प्रभाग रचना करण्यात येते काय?**

उत्तर नगरपरिषद / नगरपंचायती च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर हद्दीत नव्याने वाढ झालेल्या क्षेत्रापुरती प्रभाग रचना करण्यात येते.

( संदर्भ : महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० (५) अन्वये )

**प्रश्न ३ एखादया प्रभागाची पोट निवडणूक घ्यावयाची असल्यास प्रभाग रचना नव्याने करण्यात येते काय ?**

उत्तर नाही.

## ५. प्रभाग रचनेची पध्दत

**प्रश्न १ नगरपरिषद / नगरपंचायतीच्या क्षेत्राची प्रभाग रचनेची पध्दत काय आहे ? प्रभाग रचना करताना कोणत्या दिशेकडून कोणत्या दिशेकडे करावी ?**

उत्तर प्रभाग रचना करताना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्राचा एकत्रित नकाशा तयार करण्यात येतो. एकूण प्रभागांची संख्या विचारात घेऊन भौगोलिक क्षेत्राची विभागणी करण्यात येते. प्रभाग रचना सुरु करताना सर्व प्रथम उत्तर दिशेने सुरुवात करुन उत्तरेकडून ईशान्य (उत्तर पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पश्चिमेकडे प्रभाग रचना करुन शेवट दक्षिणेत करण्यात येतो व त्याप्रमाणे प्रभागाना क्रमांक देण्यात येतात.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि.३ मे, २००५ परि १८ )

**प्रश्न २ नगरपरिषद / नगरपंचायतीच्या क्षेत्राची प्रभाग रचना करताना कोणत्या महत्वाच्या बाबी विचारात घेण्यात येतात ?**

उत्तर नगरपरिषद / नगरपंचायतीच्या क्षेत्राची प्रभाग रचना करताना खालील महत्वाच्या बाबी विचारात घेण्यात येतात :-

- भाग रचना करताना एकूण लोकसंख्या भागिले एकूण सदस्य संख्या याप्रमाणे जी संख्या येईल त्याच्या १०% जास्त अथवा कमी या मर्यादेत प्रभागांची लोकसंख्या ठेवण्यात येते. असे करताना प्रभागाचे क्षेत्र सलग व आटोपशीर (Compact) असावे.
- प्रत्येक प्रभाग हा भौगोलिक दृष्टया सलग असला पाहिजे. त्याची सीमा रेषा रस्ते, गल्ल्या, नद्या नाले, मोठे रस्ते, फ्लायओव्हर, लोहमार्ग इ. विचारात घेऊन निश्चित करण्यात येते.
- प्रभाग रचनेत एका इमारतीचे, चाळीचे अथवा घराचे विभाजन दोन प्रभागामध्ये होणार नाही याची दक्षता घेण्यात येते.
- प्रभाग रचनेत मोकळया जागेसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या प्रभागाच्या हद्दीत समाविष्ट करुन दर्शविण्यात येतात.
- प्रभाग रचना सुरु करताना सर्व प्रथम उत्तर दिशेने सुरुवात करुन उत्तरेकडून ईशान्य (उत्तर पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पश्चिमेकडे प्रभाग रचना करुन शेवट दक्षिणेत करण्यात येतो व त्याप्रमाणे प्रभागांना क्रमांक देण्यात येतात.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि.३ मे, २००५)

**प्रश्न ३ प्रभागाच्या सीमा रेषेचे वर्णन कशा प्रकारे नमूद करण्यात येते ?**

उत्तर प्रत्येक प्रभागाच्या सीमारेषेचे वर्णन करताना उत्तर, पूर्व, दक्षिण व पश्चिम अशा दिशा नमूद करुन सीमारेषेचे वर्णन करावे. सीमारेषा नमूद करताना शहरातील कुठल्याही नागरिकास प्रभागाच्या सीमांची पूर्ण कल्पना येईल याची काळजी घ्यावी.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि.३ मे, २००५ परि १९ )

**प्रश्न ४ प्रभाग रचना करताना प्रभागांना अनुक्रमांक कशा प्रकारे देण्यात येतो ?**

उत्तर प्रभागांना क्रमांक देताना सर्वप्रथम उत्तर दिशेकडून सुरुवात करुन Zigzag पध्दतीने उत्तरेकडून ईशान्य (उत्तर पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकावे व शेवट दक्षिणेकडे करण्यात यावा.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि.३ मे, २००५ परि १८ )

**प्रश्न ५ प्रभाग रचना करताना नैसर्गिक हद्द, मुख्य रस्ते ओलांडता येतात काय ?**

उत्तर प्रभाग रचना भौगोलिक सलगता विचारात घेऊन करण्यात येते. यात प्रामुख्याने रस्ते, गल्ल्या,नद्या, नाले, डोंगर, मोठे रस्ते, फ्लाय ओव्हर इ. नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन निश्चित करण्यात येते. अपवादात्मक परिस्थितीत त राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मुख्य रस्ते ओलांडून प्रभाग रचना तयार करण्यात येऊ शकते.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि.३ मे, २००५ परि १७ )

**प्रश्न ६ निवडणूक विभाग (जिल्हा परिषद) व निर्वाचक गण (पंचायत समिती) चा नकाशा कसा असावा?**

उत्तर अशा नकाशात निवडणूक विभागाची हद्द लाल रंगाने दर्शवावी तर दोन गणांचे विभाजन निळया रंगाने दर्शवावे. यामध्ये असलेले नागरी क्षेत्र हिरव्या रंगाने दर्शवावे.

## ६. आरक्षण निश्चित करणे

**प्रश्न १ एकूण सदस्य संख्येमध्ये आरक्षित सदस्यांची संख्या किती असावी ?**

उत्तर १) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी आरक्षित सदस्यांची संख्या खालील सूत्रान्वये निश्चित करण्यात येते. :-

सूत्र – अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीची लोकसंख्या ~~भागिले~~ x एकूण सदस्य संख्या

प्रसिध्द झालेल्या जनगणनेची लोकसंख्या

२) नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या सदस्यांसाठी एकूण सदस्य संख्यांच्या २७% जागा (महिलांसह) निश्चित करण्यात येतात. (महाराष्ट्र मनपा अधिनियम चे कलम– ५ अ)

३) महिलांसाठी सदस्य संख्या ही एकूण निवडून द्यावयाच्या सदस्य सख्येच्या ५०% जागा (राखीव जागेसह) निश्चित करण्यात येते.

(संदर्भ : १) महाराष्ट्र नगरपरिषदा / नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२)( बी),(सी) अन्वये)

**प्रश्न २ आरक्षण निश्चितीसाठी कोणत्या सामाजिक प्रवर्गाची प्रभागनिहाय / वार्डनिहाय लोकसंख्या विचारात घेतली जाते ?**

उत्तर नगरपरिषद / नगरपंचायतीच्या निवडणुकीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी प्रभागनिहाय / वॉर्डनिहाय लोकसंख्या विचारात घेऊन आरक्षण निश्चित करण्यात येते.

(संदर्भ : १) महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२)( बी),(सी) अन्वये)

**प्रश्न ३ महिलांसाठी एकूण आरक्षण किती असते व ते कसे ठरविण्यात येते ?**

उत्तर महिलांसाठी सदस्य संख्याही एकूण निवडून द्यावयाच्या सदस्य सख्येच्या ५० टक्के जागा (राखीव जागेसह) इतके आरक्षण असते.

(संदर्भ : महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२)( बी) अन्वये)

## ७. प्रभाग रचना सोडत (प्रारुप प्रभाग रचना)

**प्रश्न १ प्रारुप प्रभाग रचना म्हणजे काय ?**

उत्तर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या भौगोलिक क्षेत्रासाठी सदस्य संख्या विचारात घेऊन केलेली विभागणी म्हणजे प्रारुप प्रभाग रचना होय.

( संदर्भ : महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० (१))

**प्रश्न २ प्रारुप प्रभाग रचना कोणाद्वारे व कशी प्रसिध्द केली जाते ?**

उत्तर नगरपरिषद / नगरपंचायतीच्या क्षेत्रासाठी प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास सक्षम प्राधिका-याने मान्यता दिल्यानंतर व आरक्षणाची सोडत काढण्याची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर निश्चित केलेल्या दिनांकास संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी प्राधिकृत केलेले आहे. प्रारुप प्रभाग रचना ही महापालिकेच्या मुख्य कार्यालयात, क्षेत्रिय कार्यालयात व नगरपरिषद / नगरपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील मुख्य ठिकाणी तसेच नगरपरिषद / नगरपंचायतीच्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाते.

( संदर्भ- १) महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० (१)
२)राज्य निवडणूक आयोगाचे सुधारित आदेश दि.०६.०२.२०१५ )

**प्रश्न ३ प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दीनंतर नागरिकांचे आक्षेप मागविण्यात येतात काय त्याची कार्यपध्दती कशी असते ?**

उत्तर होय. प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्धीनंतर हरकती व सूचना सादर करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने कालावधी निश्चित करुन दिल्यानुसार प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडे लेखी स्वरुपात आक्षेप दाखल करता येतो व प्राप्त आक्षेपावर राज्य निवडणूक अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांकडे सुनावणी ठेवण्यात येते.

**प्रश्न ४ प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दीपूर्वी आरक्षण निश्चित करण्यात येते काय?**

उत्तर होय. प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्धीपूर्वी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी व महिलांसाठी राखून ठेवावयाचे आरक्षण निश्चित करण्यात येते.

( संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि.३ मे, २००५ परि २४ )

**प्रश्न ५ प्रारुप प्रभाग रचना सोडतीच्या वेळी नगरपरिषद / नगरपंचायतीच्या नकाशावर कोणकोणत्या बाबी दर्शविण्यात येतात?**

उत्तर प्रारुप प्रभाग रचना सोडतीच्यावेळी सर्व प्रभाग दर्शविणारा एकत्रित नकाशा तसेच प्रत्येक प्रभागाची हद्द, सीमा इ. बाबी दर्शविण्यात येतात. तसेच प्रभाग क्रमांक, समाविष्ट लोकसंख्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठीचा आरक्षणाचा प्रवर्ग इ. बाबी दर्शविण्यात येतात.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि.३ मे, २००५ परि २३ )

## ८. प्रभाग रचना प्रसिध्दी, आक्षेप व हरकती

**प्रश्न १ प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दीनंतर आक्षेप व हरकती घेण्यासाठी किती मुदत असते ?**

उत्तर प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्धीनंतर आक्षेप व हरकती घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून वेळापत्रक देण्यात येते. ~~सर्वसाधारणपणे~~ हा कालावधी ७ दिवसांचा असतो.

( संदर्भ - महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० (१)

**प्रश्न २ आक्षेप दाखल करण्याचे ठिकाण निश्चित करण्यात येते काय ?**

उत्तर होय. सर्वसाधारणपणे नगरपरिषद / नगरपंचायती कार्यालयात आक्षेप स्वीकारण्यात येतात.

**प्रश्न ३ आक्षेप व हरकती राजकीय पक्षांतर्फे अथवा मान्यता प्राप्त संघटनांतर्फे दाखल करता येऊ शकतात काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ४ राखीव प्रभागाच्या बदलाच्या संदर्भात आक्षेप दाखल करता येतो काय?**

उत्तर होय.

**प्रश्न ५ आक्षेप व हरकती स्विकारण्याची जबाबदारी कोणाची आहे ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याची असते .

## ९. आक्षेप व हरकतीवरील सुनावणी

**प्रश्न १ प्रभाग रचना आक्षेप व हरकतीवर सुनावणी घेण्याचे अधिकार कोणाला आहेत ?**

उत्तर नगरपरिषद / नगरपंचायती च्या बाबतीत आलेले आक्षेप व सूचना यांना अनुसरुन संबंधितांना सुनावणी जिल्हाधिकारी स्वत: किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडे असते.

( संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि.३ मे, २००५ परि ९ )

**प्रश्न २ आक्षेप व हरकतीच्या सुनावणीकरिता लेखी कळविण्यात येते काय ? या सुनावणीस कोण उपस्थित राहू शकतात ?**

उत्तर होय. सदर सुनावणीस संबंधित हरकतदार उपस्थित राहू शकतो.

**प्रश्न ३ आक्षेप व हरकतीसंबंधी सुनावणी झाल्यानंतर प्रभाग रचनेत बदल करण्यात येतो काय?**

उत्तर नगरपरिषद / नगरपंचायतीच्या प्रभाग रचने बाबत सुनावणी नंतर हरकतीचा गुणवत्तेवर विचार करून आक्षेप / हरकतीमध्ये तथ्य आढळल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने प्रभाग रचनेत बदल होऊ शकतो.

( संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि.३ मे, २००५ परि १० )

**प्रश्न ४ आक्षेपधारकाचे आक्षेपावरील झालेला निर्णय लेखी कळविण्यात येतो काय?**

उत्तर होय. स्वयंस्पष्ट आदेश पारीत करून निर्णयाच्या प्रती तक्रारदारास उपलब्ध करून देण्यात येतात.

( संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाचे पत्र नप २०११/ प्र क्र ५/ का ६ दिनांक १/७/२०११ )

**प्रश्न ५ आक्षेपधारकांच्या आक्षेपावर सक्षम अधिका-याने दिलेल्या निर्णयाविरुध्द अपिल कोणाकडे दाखल करता येते?**

उत्तर अशा प्रकरणी अपील करण्याची तरतूद नाही.

**प्रश्न ६ आक्षेप मान्य केल्यानंतर प्रभाग रचनेत बदल झाल्यास त्यावर अन्य व्यक्तीस पुन्हा आक्षेप घेता येऊ शकतो काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ७ आक्षेप मान्य केल्यानंतर प्रभाग रचनेत बदल झाल्यास आरक्षण बदलण्याची शक्यता असते अशा वेळी आरक्षणाची सोडत पुन्हा काढावी लागते का ?**

उत्तर होय.

## १०. अंतिम प्रभाग रचना प्रसिध्दी

**प्रश्न १ नगरपरिषद / नगरपंचायतीच्या निवडणूकीकरीता अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्याचे अधिकार कोणाला आहेत ?**

उत्तर नगरपरिषद / नगरपंचायतीच्या निवडणूकीकरीता अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत.

**प्रश्न २ अंतिम प्रभाग रचनेच्या नकाशावर कोणत्या अधिका-याची स्वाक्षरी अथवा साक्षांकन असते?**

उत्तर अंतिम प्रभाग रचनेच्या नकाशावर जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

**प्रश्न ३ अंतिम प्रभाग रचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येते काय?**

उत्तर होय.

## ११. इतर

**प्रश्न १ प्रभागाची लोकसंख्या व मतदार संख्या ही समान असते काय ?**

उत्तर नाही.

# प्रकरण ६.

# आरक्षण

# (Reservation)

## १. निवडणुकीसाठी प्रभाग रचनेची पध्दत व आरक्षण

**प्रश्न १ नगरपरिषद / नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचनेची पध्दत कोण ठरविते ?**

उत्तर **नगरपरिषद / नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचनेची पध्दत** राज्य निवडणूक आयोग ठरविते.

( संदर्भ : महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० अ )

**प्रश्न २ प्रभाग म्हणजे काय ? बहुसदस्यीय प्रभाग म्हणजे काय ?**

उत्तर प्रभाग म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेचे असे क्षेत्र ज्याचा विस्तार व ज्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याने ठरवून दिलेली असते आणि अशा क्षेत्रातून स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य निवडून दिले जातात. एका पेक्षा जास्त सदस्य ज्या क्षेत्रातून निवडून दिले जातात अशा निवडणूक क्षेत्राला बहुसदस्य प्रभाग म्हटले जाते. प्रभाग ही निवडणूक क्षेत्राशी संबंधित भौगोलिक संकल्पना आहे.

**प्रश्न ३ बहुसदस्य प्रभाग पध्दतीमध्ये एका प्रभागातील सर्व जागा आरक्षित ठेवण्यात येतात काय ?**

उत्तर नाही. प्रत्येक प्रभागामध्ये व्यवहार्य असेल तेथवर किमान एक जागा बिनराखीव ठेवण्यात येते

**प्रश्न ४ बहुसदस्य प्रभाग पध्दतीमध्ये एका प्रभागातील आरक्षित जागेवरुन व खुल्या जागेवरुन एकच उमेदवार निवडणूक लढू शकतो काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ५ प्रभाग पध्दतीमध्ये आरक्षण ठरविण्याचे निकष काय आहेत ?**

उत्तर प्रभाग पद्धतीमध्ये आरक्षण ठरविण्याचे निकष खालीलप्रमाणे आहेत :-

१. लगतच्या प्रसिध्द झालेल्या जनगणनेची आकडेवारी.
२. सदस्य संखेच्या ५०% जागा महिलांसाठी राखीव ठेवणे.
३. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार जागा उतरत्या क्रमाने आरक्षित करणे.
४. नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरिता एकूण जागांच्या २७% जागा सोडत पद्धतीने आरक्षित करणे. मात्र संपूर्णत: अनुसूचित क्षेत्रासाठी अनुसूचित जाती व जमातीच्या जागा वगळून उर्वरित जागांपैकी २७% जागा नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखीव.

५. प्रत्येक आरक्षण गटात (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, व नागरिकांचा मागास प्रवर्ग) ५०% जागा महिलांसाठी तसेच तीन जागांच्या प्रभागात जास्तीत जास्त दोन आणि दोन जागांच्या प्रभागात जास्तीत जास्त एक जागा महिलांसाठी राखीव ठेवणे.

६. अनुसूचित जाती / जमातीसाठी राखीव जागांची संख्या प्रभागाच्या संख्येपेक्षा जास्त असल्यास प्रत्येक प्रभागात एक जागा नेमून देणे. अनुसूचित जाती / जमातीतील एकापेक्षा जास्त जागा एका प्रभागात त्या प्रवर्गासाठी आरक्षित झाल्या असतील तेथे प्रथम एक जागा महिला राखीव होईल. उर्वरित जागा सोडत पद्धतीने निश्चित करणे.

७. नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला आरक्षण अशा प्रवर्गाकरिता राखीव प्रभागामधून सोडत पद्धतीने जागा राखीव ठेवणे. (आधी इतर प्रवर्गातील महिलांसाठी दोन जागा राखीव झालेला प्रभाग सोडतीतून वगळावा)

८. अनुसूचित जाती प्रवर्गातील महिला, अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिला व नागरिकांचा मागास प्रवर्ग या वर्गवारीच्या महिला राखीव जागा वजा केल्यानंतर शिल्लक राहणा-या जागा सर्वसाधारण स्त्रियांकरिता राखीव राहतील.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि. १० जुलै, २००९ )

**प्रश्न ६ बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीत प्रभागातील प्रत्येक जागेसाठी प्रभागाअंतर्गत स्वतंत्र क्षेत्र निश्चित केले जाते का ?**

उत्तर नाही.

बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये निवडून येणारा प्रत्येक प्रतिनिधी हा त्या संपूर्ण प्रभागाचे प्रतिनिधीत्व करतो. त्यामुळे अशा बहुसदस्यीय प्रभागात मतदार सर्व जागांसाठी मतदान करु शकतात.

## २. आरक्षणाचे प्रवर्ग

**प्रश्न १ कोणकोणत्या प्रवर्गांना आरक्षण लागू होते ?**

उत्तर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गातील महिलांसह) या प्रवर्गांना आरक्षण लागू होते.

(संदर्भ :- महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ३०.१०.१९९६)

**प्रश्न २ प्रवर्गनिहाय जातींची यादी कोठे उपलब्ध होवू शकते ?**

उत्तर अशी यादी राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णयामध्ये उपलब्ध असते. तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर व स्थानिक तहसिल कार्यालयात उपलब्ध असते.

**प्रश्न ३ प्रवर्गनिहाय लोकसंख्या कोण प्रसिध्द करते व कोठून उपलब्ध होते ?**

उत्तर प्रवर्गनिहाय लोकसंख्या प्रत्येक जणगणनेनंतर अधिकृतरित्या केंद्र शासनाच्या गृह विभागांतर्गत भारताचे महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त यांचेकडून प्रसिद्ध केली जाते. जनगणनेबाबतसर्व प्रकारची सांख्यिकीय माहिती www.censusindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रश्न ४ लगतच्या जनगणनेची प्रवर्गनिहाय लोकसंख्येची आकडेवारी उपलब्ध नसल्यास आरक्षण कसे ठरविण्यात येते ?**

उत्तर शेवटच्या प्रसिध्द झालेल्या जनगणनेच्या प्रवर्गनिहाय लोकसंख्येच्या आकडेवारीवरुन.
( संदर्भ : महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम २(३३) मधील व्याख्येप्रमाणे )

**प्रश्न ५ इतर राज्यातील राखीव प्रवर्गांना महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी आरक्षणाचे फायदे मिळू शकतात का ?**

उत्तर नाही. महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेल्या प्रवर्गांनाच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी त्या त्या प्रवर्गाचे आरक्षणाचे फायदे मिळू शकतात.

**प्रश्न ६ नव्याने जाहिर झालेले जात आरक्षणास (मराठा मुस्लीम) निवडणुकीत जागा आरक्षित ठेवण्याची तरतूद आहे काय ?**

उत्तर नाही. सदरचे आरक्षण स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी लागू नाही.

## ३ <u>अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षण</u>

**प्रश्न १ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांची लोकसंख्या कोठून उपलब्ध होते ?**

उत्तर प्रवर्गनिहाय लोकसंख्या प्रत्येक जणगणनेनंतर अधिकृतरित्या केंद्र शासनाच्या गृह विभागांतर्गत भारताचे महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त यांचेकडून प्रसिद्ध केली जाते. जनगणनेबाबत सर्व प्रकारची सांख्यिकीय माहिती www.censusindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रश्न २ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे आरक्षण ठरविण्याचे निकष काय आहेत ?**

उत्तर १. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार जागा उतरत्या क्रमाने आरक्षित करणे.

२. प्रत्येक आरक्षण गटात (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती) ५०% जागा महिलांसाठी तसेच तीन जागांच्या प्रभागात जास्तीत जास्त दोन आणि दोन जागांच्या प्रभागात जास्तीत जास्त एक जागा महिलांसाठी राखीव ठेवणे.

३. संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रामध्ये एकूण लोकसंख्येशी अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवण्याची तरतूद आहे. तथापि, किमान ५०% जागा अनुसूचित जमातीकरिता राखीव असाव्या लागतात.

४. अनुसूचित जाती / जमातीसाठी राखीव जागांची संख्या प्रभागाच्या संख्येपेक्षा जास्त असल्यास प्रत्येक प्रभागात एक जागा नेमून देणे. अनुसूचित जाती / जमातीतील एकापेक्षा जास्त जागा एका प्रभागात त्या प्रवर्गासाठी आरक्षित झाल्या असतील तेथे प्रथम एक जागा महिला राखीव होईल उर्वरित जागा सोडत पद्धतीने निश्चित करणे.

( संदर्भ - १) महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती / निवडणूक नियम, १९६६ § ३ ए अन्वये २) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. मनपा २००९ प्र के ५ / कार्यासन ५ दि. १० जुलै, २००९.)

**प्रश्न ३ आरक्षणाचे शेकडा प्रमाण (%) किती असते ?**

उत्तर १. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या एकूण लोकसंख्येशी अनुसूचित जाती व जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणावर सदर प्रवर्गाच्या आरक्षित जागांची संख्या निश्चित केली जाते.

२. संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रामध्ये एकूण लोकसंख्येशी अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवण्याची तरतूद आहे. तथापि, किमान ५०% जागा अनुसूचित जमातीकरिता राखीव असाव्या लागतात.

३. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी एकूण जागांच्या २७% जागा राखीव ठेवल्या जातात. मात्र संपूर्णत: अनुसूचित क्षेत्रासाठी अनुसूचित जाती व जमातीच्या जागा वगळून उर्वरित जागांपैकी २७% जागा नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखीव ठेवल्या जातात.

४. महिलांकरिता राखीव ठेवायच्या ५०% जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागास प्रवर्ग या प्रत्येक वर्गवारीतील आरक्षित जागांच्या ५०% आणि एकूण जागांच्या ५०% जागा आरक्षित ठेवण्यात येतात.

( संदर्भ - महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद /्योगिक नगरी अधिनियम चे १९६५ ,कलम ९ (२), (बी) (सी))

**प्रश्न ४ बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एकाच प्रभागात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता जागा आरक्षित ठेवता येतात काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ५ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे आरक्षणात महिलांसाठी ठेवावयाचे आरक्षण कशा पध्दतीने निश्चित करण्यात येते ?**

उत्तर १. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या राखीव जागांपैकी ५०% जागा त्या प्रवर्गाच्या महिलांकरिता सोडत पद्धतीने राखीव ठेवण्यात येतात.

२. अनुसूचित जाती / जमातीसाठी राखीव जागांची संख्या प्रभागाच्या संख्येपेक्षा जास्त असल्यास प्रत्येक प्रभागात एक जागा नेमून देणे. अनुसूचित जाती / जमातीतील एकापेक्षा जास्त जागा एका प्रभागात त्या प्रवर्गासाठी आरक्षित झाल्या असतील तेथे प्रथम एक जागा महिला राखीव होईल. उर्वरित जागा सोडत पध्दतीने निश्चित करणे.

**प्रश्न ६ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांची प्रभागातील लोकसंख्या समान असल्यास त्या प्रभागात आरक्षण कसे ठरविण्यात येते ?**

उत्तर अनुसूचित जाती / जमाती यांचे आरक्षण त्या प्रवर्गाच्या लोकसंख्येच्या टक्केवारी नुसार ठरविले जात असल्याने

१. राखून ठेवावयाच्या जागांची संख्या व प्रभाग संख्या सारखी असल्यास अनुसूचित जाती / जमातीस प्रत्येक प्रभागात एक जागा

२. राखून ठेवावयाच्या जागांची संख्या प्रभागांच्या संख्येपेक्षा कमी असेल तर लोकसंख्येच्या टक्केवारीच्या उतरत्या क्रमाने (अधिक लोकसंख्या असलेला प्रभाग पहिले )

३. राखून ठेवावयाच्या जागांची संख्या प्रभागांच्या संख्येपेक्षा जास्त असेल प्रत्येक प्रभागात एक जागा त्यामुळे अनुसूचित जाती अनुसूचित जमाती यांची लोकसंख्या एका प्रभागात समान असली तरी वरील पद्धतीनेच आरक्षण ठरविले जाईल.

परंतु जर एखादा प्रभाग अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या दोन्हीसाठी आरक्षित होऊ शकत असेल तर प्राधान्य अनुसूचित जमातींना देण्यात यावे. याचे मुख्य कारण असे की, अनुसूचित जमातींची लोकसंख्या नागरी भागात अनुसूचित जातींपेक्षा फार कमी आहे.

**प्रश्न ७ नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र दाखल करणे बंधनकारक आहे का?**

उत्तर होय. नामनिर्देशनपत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्राची सत्यप्रत दाखल करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्राच्या मुळ प्रती तपासणीसाठी छाननीच्या वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

( संदर्भ - महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ ए)

## ४. नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षण.

**प्रश्न १ नागरिकांचा मागास प्रवर्ग यामध्ये कोण कोणत्या संवर्गाचा समावेश होतो ?**

उत्तर इतर मागास वर्गातील जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांचेसह विशेष मागास प्रवर्गातील जातींचा समावेश होतो.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग पत्र दि.०७.१०.१९९६)

**प्रश्न २ आरक्षण निश्चित करताना नागरिकांचा मागास प्रवर्गांची लोकसंख्या विचारात घेण्यात येते काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ३ नागरिकांचा मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग हे एकच प्रवर्ग आहेत काय ?**

उत्तर नागरिकांचा मागास प्रवर्गाची कक्षा मोठी असून त्यात इतर मागास वर्गाबरोबर भटक्या व विमुक्त जाती प्रवर्ग, मागासवर्ग विशेष प्रवर्ग हे संवर्ग सुद्धा समाविष्ट आहेत.

**प्रश्न ४ नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षणाचे निकष काय आहेत ?**

उत्तर नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरिता एकूण जागांच्या २७% जागा सोडत पद्धतीने आरक्षित करण्यात येतात व या आरक्षित जागांपैकी ५०% जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी सोडत पद्धतीने आरक्षित करण्यात येतात. मात्र संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रासाठी अनुसूचित जाती व जमातीच्या जागा वगळून उर्वरित जागांपैकी २७% जागा नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात येतात.

( संदर्भ : १)महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ ( १) ( बी), (सी) २) नगरपरिषद, नगरपंचायती निवडणूक नियम १९६६ - ३ सी अन्वये )

**प्रश्न ५ नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षणामध्ये महिलांसाठी ठेवावयाचे आरक्षण कसे निश्चित करतात ?**

उत्तर नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरिता एकूण जागांच्या २७% जागा सोडत पद्धतीने आरक्षित करण्यात येतात व या आरक्षित जागांपैकी ५०% जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी सोडत पध्दतीने आरक्षित करण्यात येतात.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि. ६/२/२०१५ )

**प्रश्न ६ बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एका प्रभागात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची जागा राखीव असल्यास त्यात नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी जागा आरक्षित ठेवता येते काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ७ नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र नामनिर्देशनपत्रासोबत जोडणे बंधनकारक आहे काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ७ नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या संवर्गासाठीच्या राखीव जागा आळीपाळीने कशा वाटून देता येईल?**

उत्तर अधिनियमाच्या कलम ९ च्या पोटकलम (२) च्या खंड (ड) च्या तरतुदीच्या प्रयोजनासाठी नागरिकांचे मागासर्वगाच्या संवर्गासाठी असलेल्या राखीव जागा प्रभागांना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्या राखीव असलेल्या जागा वगळून चिठ्ठया वाटून देण्यात येतील.

(संदर्भ - महाराष्ट्र नगर पालिका निवडणूक नियम १९६६ चे कलम ३ (क)

## ५.    <u>महिलांसाठी आरक्षण:-</u>

**प्रश्न १   महिलांसाठी ठेवावयाचे जागाचे आरक्षण ठरविण्याचे निकष काय आहेत ?**

उत्तर   १. एकूण जागांच्यापैकी ५०% जागा महिलांसाठी आरक्षित ठेवल्या जातात.

२. महिलांसाठी जागा आरक्षित करताना मागासवर्गीयांसाठी आरक्षित प्रत्येक प्रवर्गासाठी आरक्षित जागांच्या ५०% जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात येतात.

३. असे करतांना प्रत्येक तीन जागांच्या प्रभागात जास्तीत जास्त २ आणि दोन जागांच्या प्रभागात जास्तीत जास्त १ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जातात.

४. महिलांकरिता राखीव असलेल्या एकूण जागांपैकी अनुसूचित जाती / जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग या वर्गवारीच्या महिलांकरिता राखीव जागा वजा केल्यानंतर शिल्लक राहणाऱ्या जागा सर्वसाधारण महिलांकरिता राखीव ठेवल्या जातात.

५. मात्र एकच जागा असल्यास महिला आरक्षण सोडत पध्दतीने ठरविले जाते. तथापि, त्यापुढील निवडणुकीमध्ये मागील निवडणुकीच्या आरक्षणाचा विचार करता ते आळीपाळीने दिले जाते.

६. ज्या प्रभागात एकापेक्षा जास्त जागा अनुसूचित जाती / जमातीसाठी राखीव झाल्यास प्रथम प्रत्येकी एक जागा त्या प्रवर्गातील महिलेसाठी राखीव ठेवण्यात येते.

(संदर्भ- १)महाराष्ट्र नगरपरिषद, /नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ ,चे कलम ९ (२)(बी),(सी) २) नगरपरिषद, नगरपंचायती निवडणूक नियम १९६६ - ३ बी अन्वये )

**प्रश्न २   बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये प्रभागातील सर्व जागा महिलांसाठी आरक्षित होवू शकतात का ?**

उत्तर   नाही. आरक्षण टक्केवारीनुसार ५०% पर्यंतच जागा महिलांसाठी आरक्षित होऊ शकतात. प्रभागामध्ये ३ जागा असल्यास महिलांकरीता २ व प्रभागामध्ये २ जागा असल्यास महिलांकरीता १ जागा आरक्षित होवू शकते.

**प्रश्न ३  महिला आरक्षणांतर्गत विविध सामाजिक प्रवर्गासाठी आरक्षण असते का ?**

उत्तर   महिला आरक्षण, समांतर आरक्षण असून ते विविध सामाजिक प्रवर्गाच्या अंतर्गत समाविष्ट असते.

**प्रश्न ४  महिलांसाठी आरक्षित जागेशिवाय इतर जागेवरुन महिलांना निवडणूक लढविता येते काय ?**

उत्तर   होय.

( संदर्भ : महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० (४))

**प्रश्न ५ महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागांचे वाटप आणि आळीपाळी क्रम कसा ठरविता येईल ?**

उत्तर अधिनियमाच्या कमल ९ च्या पोटकलम (२) चा खंड (ब),(क) चे परंतुक व खंड (ड) चे परंतुक आणि कलम १० यांच्या तरतुदीला अधिन राहून महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा या अ.क्र. १ ते ५ तत्त्वानुसार वाटून देण्यात आणि आळीपाळीने देण्यात येतील.

( संदर्भ : महाराष्ट्र नगर पालिका निवडणूक नियम १९६६ चे कलम ३ (ब))

## ६. आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे

**प्रश्न १ आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे म्हणजे काय ? त्याचे निकष काय आहेत ?**

उत्तर आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि महिला यांचेसाठी विहित पद्धतीने आरक्षित झालेल्या जागा व यापूर्वीच्या प्रभाग निवडणुकीमधील प्रवर्गनिहाय आरक्षणाचा विचार करता पुढील निवडणुकीसाठी आळीपाळीने बदलणे. चक्रानुक्रमे आरक्षण फिरविणे यासाठी खालील सर्वसाधारण निकष खालीलप्रमाणे :-

१. अनुसूचित जाती व जमातीची प्रवर्गाची लोकसंख्येची टक्केवारी प्रभागनिहाय उतरत्या क्रमाने लावणे.
२. प्रभाग संख्या व आरक्षित करावयाच्या जागा यांची संख्यात्मक तुलना करणे.
३. आरक्षण पूर्ततेसाठी पूर्वीच्या निवडणुकीमध्ये आरक्षित असलेल्या जागा विचारात घेऊन तो यावेळी आळीपाळीने बदलण्यासाठी क्रम निश्चित करणे.

(संदर्भ - नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण फिरविण्यासंबंधी आदेश दि. १०/७/२००९ व आदेश दि. २/८/२०११)

**प्रश्न २ आरक्षण चक्रानुक्रमे फिरविताना राखीव जागांसाठी लोकसंख्येची टक्केवारी विचारात घेतली जाते काय ?**

उत्तर होय. आरक्षण चक्रानुक्रमे फिरविताना अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या लोकसंख्येची टक्केवारी विचारात घेतली जाते. मात्र नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी पूर्वीच्या निवडणुकीतील आरक्षण विचारात घेऊन सोडत पध्दतीने आरक्षण निश्चित केले जाते.

**प्रश्न ३ लोकसंख्येनुसार अनुसूचित जमातीची / अनुसूचित जातीची प्रत्येकी एक जागा आरक्षित झाल्यास त्याचे आरक्षण चक्रानुक्रमे कसे निश्चित केले जाते ?**

उत्तर अनुसूचित जमातीची / अनुसूचित जातीची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या प्रभागापासून सुरुवात करुन उतरत्या क्रमाने.

**प्रश्न ४ एकच प्रभाग एका प्रवर्गासाठी अथवा महिलांसाठी वारंवार आरक्षित होवू शकतो का ?**

उत्तर एकाच प्रवर्गाचे अथवा महिलांचे वारंवार आरक्षण एकाच प्रवर्गात टाळण्यासाठी चक्रानुक्रम पध्दत अंमलात आणली जाते.

( संदर्भ : राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. मनपा २००९ प्र के ५ / कार्यासन ५ दि. १० जुलै, २००९ परि.(७)

**प्रश्न ५ महिला आरक्षणाचा लाभ सर्व निवडणूक विभाग व निर्वाचक गणांना मिळावा यासाठी कोणती काळजी घेण्यात येते ?**

उत्तर लगतच्या निवडणुकीमध्ये जे प्रभाग महिलांसाठी आरक्षित झाले असतील तेथे पुन्हा शक्यतोवर महिलांचे आरक्षण येणार नाही याची काळजी घेण्यात येते.

(संदर्भ :- राज्य निवडणूक आयोग आदेश दि.१० जुलै २००९)

## ७. आरक्षण निश्चिती पूर्व प्रसिध्दी व सोडत:-

**प्रश्न १ आरक्षण निश्चिती सोडतीकरीता पूर्व प्रसिध्दी देण्यात येते काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न २ आरक्षण सोडतीच्या प्रसिध्दीसाठी ठिकाण, दिनांक व वेळ निश्चित करण्यात येतो काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ३ सोडतीसाठी कोण कोण उपस्थित राहू शकतात ?**

उत्तर इच्छूक सर्व व्यक्ती उदा. राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रामध्ये राहणारे मतदार इत्यादी.

**प्रश्न ४ सोडतीच्या वेळी प्रभाग दर्शविणारा एकत्रित नकाशा तसेच प्रत्येक प्रभागाची हद्द दर्शविणारा स्वतंत्र नकाशा सोडतीच्या ठिकाणी प्रसिध्द करण्यात येतो काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ५ आरक्षण कोण निश्चित करतो व सोडतीचे नियम काय आहेत ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेला अधिकारी आरक्षण निश्चित करतो. सोडतीसंबंधी पूर्व प्रसिध्दी देण्यात यावी व सोडतीच्या वेळी उपस्थित राहू इच्छिणाऱ्यांना परवानगी द्यावी.

**प्रश्न ६ सोडत काढताना कोणत्या बाबी विचारात घ्याव्या लागतात ?**

उत्तर सोडत काढतांना आरक्षित प्रवर्गाच्या या पूर्वीच्या निवडणुकीमधील त्या प्रभागाचे आरक्षण त्याचप्रमाणे प्रभागांची एकूण संख्या, आरक्षणाचे प्रमाण इ. बाबी विचारात घ्याव्या लागतात.

**पश्न ७ आरक्षण सोडतीसाठी कोणकोणती व्यवस्था करण्यात येते ?**

उत्तर सर्व अनुषंगिक व्यवस्था उदा. पूर्व प्रसिध्दी, बैठक व्यवस्था, ध्वनीक्षेपण, सदस्य संख्येचा तक्ता, प्रभाग तक्ता, आरक्षण तक्ता, प्रभाग नकाशा, सोडतीसाठी पारदर्शक डबा, चिठ्ठी काढण्यासाठी लहान मुले, उपस्थिती पत्रक, स्टेशनरी व व्हिडीओ चित्रिकरण व्यवस्था करावी लागते. त्याचप्रमाणे सर्व उपस्थितांना आरक्षण तक्ता व सोडतीची कार्यपध्दती एका माहितीपत्रकाद्वारे (Pamphlet) दिली जाते इत्यादी.

**प्रश्न ८ सोडतीचे चित्रीकरण (व्हिडीओग्राफी) करणे गरजेचे आहे काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ९ सोडतीच्या प्रक्रियेचे इतिवृत्त ठेवणे गरजेचे आहे काय ?**

उत्तर होय. दिलेल्या विहीत नमुन्यामध्ये इतिवृत्त ठेवणे गरजेचे आहे.

## ८. आरक्षण निश्चिती आक्षेप (हरकती) व सुनावणी

**प्रश्न १ प्रारुप प्रभागरचनेमध्ये आरक्षणाबाबत आक्षेप (हरकत) नोंदविता येतो काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न २ आक्षेप नोंदविण्यासाठी किती दिवसाचा कालावधी असतो ?**

उत्तर आक्षेप नोंदविण्यासाठी कालावधी ७ दिवसांचा असतो.

( संदर्भ - महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ चे कलम १० (१))

**प्रश्न ३ आक्षेप कोणाकडे दाखल करता येतात व कशा स्वरुपात ?**

उत्तर जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी स्वरूपात आक्षेप दाखल करता येतात.

**प्रश्न ४ आक्षेपाची सुनावणी कोण घेतो व आक्षेपावरील अंतिम निर्णय कोण घेतात ?**

उत्तर जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी सुनावणी घेतो व अंतिम आदेश पारीत करतो.

**प्रश्न ५ आक्षेपाच्या सुनावणीसाठी आक्षेप धारकास लेखी कळविणे गरजेचे आहे काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ६ सुनावणीचा निर्णय आक्षेपधारकास कळविणे गरजेचे आहे काय ?**

उत्तर सुनावणीनंतर घेण्यात आलेला निर्णय वैयक्तिकरीत्या कळविला जात नाही. अंतिम अधिसूचनेद्वारे तो जाहीर केला जातो.

**प्रश्न ७ आक्षेप मान्य झाल्यानंतर आरक्षणात बदल करता येतो काय ?**

उत्तर होय. अशी परिस्थिती उद्भवल्यास आवश्यकतेप्रमाणे बदल केला जातो.

## ९. आरक्षण निश्चिती अंतिम प्रसिध्दी:-

**प्रश्न १ आरक्षण निश्चिती अंतिम झाल्यानंतर प्रसिध्दी देण्यात येते काय ? सदर प्रसिध्दी कोणत्या ठिकाणी व कशा प्रकारे करण्यात येते ?**

उत्तर होय. अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेमध्ये आरक्षण निश्चितीची अंतिम प्रसिध्दी राजपत्रामध्ये व शहरातील प्रमुख ठिकाणी केली जाते.

**प्रश्न २ आरक्षण निश्चिती अंतिम प्रसिध्दी झाल्यानंतर अपिल दाखल करता येते काय ?**

उत्तर नाही.

## १०. आरक्षित जागेवर निवडणूक लढविण्यासाठी आवश्यक बाबी:-

**प्रश्न १ आरक्षित जागेवर निवडणूक लढविण्यासाठी जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय.

( संदर्भ - महाराष्ट्र नगरपरिषदा / नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चेकलम ९ ए)

**प्रश्न २ आरक्षित जागेवर निवडणूक लढविण्यापूर्वी जात वैधता प्रमाणपत्र तपासणीसाठी कालावधी निश्चित करण्यात येतो काय ?**

उत्तर यासाठी जात पडताळणी समित्यांद्वारे विशेष मोहिम हाती घेतली जाते. नामनिर्देशनपत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडून सादर करणे आवश्यक आहे.

**प्रश्न ३ निवडणूक लढविताना जातीचा दाखला व वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता कोणत्या कायद्यामध्ये नमूद केली आहे ?**

उत्तर महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ ए प्रमाणे सदर प्रमाणपत्रे आवश्यक आहेत.

**प्रश्न ४ जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र कधी दाखल करावे लागते ?**

उत्तर नामनिर्देशनपत्राबरोबर जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची सत्यप्रत व छाननीचे वेळी मूळ प्रमाणपत्र तपासणीसाठी सादर करणे बंधनकारक आहे.

( संदर्भ - महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ ए )

**प्रश्न ५ स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढविण्यासाठी कोणत्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला ग्राहय मानला जातो ?**

उत्तर महाराष्ट्र शासनाने जातीचे दाखले देण्यास वेळोवेळी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेला विहित नमुन्यातील दाखला ग्राह्य धरण्यात येतो.

**प्रश्न ६ महिलांनी माहेरच्या (लग्नापूर्वीच्या) नावाने दाखल केलेले जात प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र ग्राहय धरले जाते का ?**

उत्तर होय. महिलांनी दोन्ही नावाची व्यक्ती एकच असल्याबाबत प्रतिज्ञालेख विहित वेळेत (नामनिर्देशनपत्रासोबत) सादर केल्यास ग्राहय धरले जाते. मात्र परराज्यातून लग्नानंतर महाराष्ट्रात आलेल्या महिलांच्याबाबतीत महाराष्ट्रातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय नामनिर्देशनपत्र ग्राहय धरले जात नाही.

**प्रश्न ७ आरक्षित जागेवर उमेदवार निवडणुकीसाठी उपलब्ध न झाल्यास काय कार्यवाही केली जाते ?**

उत्तर त्या निवडणुकीकरिता सदर जागा रिक्त ठेवण्यात येते व अधिनियमातील तरतूदीनुसार विहित कालावधीत पोटनिवडणूक घेण्यात येते.( संदर्भ : महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १८ )

# प्रकरण ७.

# मतदारयादी

# (Electoral List)

## १. मतदार पात्रता:-

**प्रश्न १ नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी कोणती मतदारयादी उपयोगात आणली जाते?**

उत्तर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० च्या तरतुदीखाली विधानसभेसाठी तयार केलेली आणि विधानसभेच्या मतदार संघाचा जो भाग नगरपालिकेच्या कार्यकक्षेत समाविष्ट करण्यात आला असेल अशा भागासाठी राज्य निवडणूक आयोग अधिसूचित करील अशा तारखेस अंमलात असलेली विधानसभा मतदार संघाची मतदारयादी नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उपयोगात आणली जाते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११)

**प्रश्न २ मतदार होण्यासाठी पात्रता काय आहेत ?**

उत्तर मतदार होण्यासाठी पात्रता खालीलप्रमाणे आहेत :-

(i) भारताचा नागरिक असावा.

(ii) मतदारयादी तयार करण्याच्या अर्हता दिनांकास १ जानेवारीला १८ वर्ष वय पूर्ण झालेला असावा.

(iii) नाव नोंदणी करावयाच्या मतदार संघातील सर्वसाधारण रहिवासी असावा.

(iv) लोकप्रतिनिधीत्व अधिनियमाचे तरतुदीनुसार अन्य कारणामुळे अपात्र नसावा.

(संदर्भ- लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० चे कलम १६ व १९)

**प्रश्न ३ मतदार म्हणून मतदारयादीत नाव केव्हा नोंदविता येते?**

उत्तर भारत निवडणूक आयोग जेव्हा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर करतो त्या कालावधीत किंवा अन्य कोणत्याही वेळी मतदार नोंदणीसाठी तहसिल कार्यालयात अर्ज करता येतो व नाव नोंदविता येते.

**प्रश्न ४ कोणत्या कारणांवरुन एखादया व्यक्तीचे नाव मतदार यादीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही ?**

उत्तर लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० चे कलम १६ नुसार (i) जी व्यक्ती भारताचा नागरिक नाही. (ii) सक्षम न्यायालयाने विकल मनाची ठरविला आहे. (iii) भ्रष्ट मार्ग वापरल्यासाठी कायदयाने मतदानास अपात्र ठरविले आहे. (iv) लोकप्रतिनिधीत्व कायदा१९५० चे कलम ११ -अ नुसार अन्य गुन्हयासाठी मतदानाला अपात्र ठरविले. या कारणांवरुन एखादया व्यक्तीचे नांव मतदार यादीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही.

**प्रश्न ५ भारताचा नागरिक (Citizen) नसलेली व्यक्ती मतदार यादीमध्ये नांव नोंद करु शकते काय ?**

उत्तर नाही. भारताचा नागरिक (Citizen) नसलेल्या व्यक्तीचे नाव मतदारयादीमध्ये नोंदविता येत नाही.
(संदर्भ- लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० चे कलम १६ )

**प्रश्न ६ दुसऱ्या देशामध्ये वास्तव्य करणारे भारतीय नागरिक जर त्यांनी भारताव्यतिरिक्त इतर देशाचे नागरिकत्व स्विकारलेले नसेल तर ते मतदारयादीत नाव नोंदवू शकतात काय ?**

उत्तर होय. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० चे कलम २० अ नुसार अशा व्यक्तींची नोंदणी मतदारयादीमध्ये करता येईल. सदरची बाब दिनांक १०.०२.२०११ पासून लागू करण्यात आलेली आहे.

**प्रश्न ७ NRI (परदेशस्त नागरिक ) मतदार म्हणून नोंदणी करु शकतात का ?**

उत्तर होय. म्हणजेच परदेशात वास्तव्यास असलेले भारतीय नागरिक भारतात मतदार म्हणून नोंदणी करु शकतात.
(संदर्भ - लोकप्रतिनिधी अधिनियम १९५० चे कलम २०)

**प्रश्न ८ नगरपालिकेच्या मतदारयादीमध्ये नाव असल्यास कोठेही मतदान करता येते का ?**

उत्तर नाही. ज्या प्रभाग व मतदान केंद्राच्या यादीत नाव आहे त्याच ठिकाणी मतदान करता येते.

## २. निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करणे व अर्हता दिनांक (Cut off date)

**प्रश्न १ अर्हता दिनांक म्हणजे काय ?**

उत्तर अर्हता दिनांक म्हणजे असा ठराविक दिवस ज्या दिवशी नागरिकाची वयोमर्यादा नागरिकत्व व निवास या अटी पूर्ण असल्या पाहिजेत.
(संदर्भ -लोकप्रतिनिधी अधिनियम १९५० चे कलम ११)

**प्रश्न २ नगरपालिका निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करण्यासंबंधातील अधिक्षण, संचालन व नियंत्रण कोण करते ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोग विशिष्ट दिनांक निश्चित करून त्या दिनांकास उपलब्ध असलेल्या भारत निवडणूक आयोगाने तयार केलेल्या विधानसभा मतदारसंघाच्या (त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राशी संबंधित) मतदारयाद्या प्राप्त करतो. या प्राप्त झालेल्या मतदारयाद्या निवडणुकीसाठी तयार करण्याच्या कामकाजाचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण राज्य निवडणूक आयोगाद्वारे केले जाते.

**प्रश्न ३ नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी मतदारयादी कोणत्या अधिनियमातील तरतुदीनुसार तयार केली जाते ?**

उत्तर नगरपालिका निवडणूकीसाठीची मतदारयादी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११ नुसार तयार केली जाते.

**प्रश्न ४ नगरपालिका निवडणूकीत मतदारयादी केव्हा तयार करण्यात येते ?**

उत्तर प्रत्येक सार्वत्रिक व पोटनिवडणुकीपूर्वी राज्य निवडणूक आयोग सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिसूचित करेल अशा तारखेस विधानसभेसाठी अंमलात असलेल्या मतदारयादीवरुन नगरपालिकेची प्रभागनिहाय मतदारयादी तयार करण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११)

**प्रश्न ५ नगरपालिकेच्या मतदारयादीसाठीचा अर्हताकारी दिनांक (cut off date) कोण ठरविते ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोग.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११)

**प्रश्न ६ मूळ यादी म्हणजे काय ?**

उत्तर भारत निवडणूक आयोगाच्या मतदार नोंदणी कार्यक्रमानुसार विहित तारखेला प्रसिध्द केलेली अंतिम मतदारयादी व ज्याला कोणतीही पुरवणी जोडलेली नाही अशी यादी म्हणजे मूळ यादी होय.

**प्रश्न ७ पुरवणी यादी म्हणजे काय ?**

उत्तर मूळ मतदारयादीसोबत त्या यादीतील मतदारांच्या नावातील दुरुस्त करण्यात आलेली नावे, नवीन समाविष्ट नावे, वगळलेली नावे यांचा समावेश असलेली वेगळी जोडलेली यादी म्हणजे पुरवणी यादी होय.

**प्रश्न ८ भाग क्रमांक म्हणजे काय ?**

उत्तर विधानसभा मतदारसंघाची मतदारयादी मतदान केंद्रनिहाय विभाजित केल्यानंतर प्रत्येक मतदान केंद्रनिहाय मतदारयादीच्या भागास अनुक्रमांक दिला जातो त्याला भाग क्रमांक असे म्हणतात.

**प्रश्न ९ नगरपालिका निवडणुकीकरिता मतदारयादी तयार करताना नवीन नावे समाविष्ट करता येतात काय ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकाच्यानंतर कोणतीही नवीन नावे समाविष्ट करता येत नाहीत.

**प्रश्न १० नगरपालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदारयादी कशा प्रकारे तयार करता येते ?**

उत्तर

१. राज्य निवडणूक आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या दिनांकाला अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदारयादीला प्रभागामध्ये विभाजित करण्यात येते.

२. अशा प्रभागनिहाय यादीची प्रारुप प्रसिध्दी करण्यात येते व हरकती - सूचना मागविण्यात येतात.

३. प्रारुप हरकती -सूचनांवर चौकशी करुन अंतिम निर्णय घेण्यात येतात.

४. त्यानंतर सदर यादी अधिप्रमाणित करुन आयोगाच्या सूचनेनुसार प्रभागनिहाय प्रसिध्द केली जाते.

५. त्यानंतर मतदान केंद्रनिहाय मतदारयादी निवडणूक निर्णय अधिकारी तयार करतात.

**प्रश्न ११ एकापेक्षा जास्त मतदारसंघामध्ये मतदारयादीत नाव नोंदविता येईल काय ?**

उत्तर नाही. असे करणे लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० चे कलम ३१ नुसार गुन्हा असून अपराध सिध्द झाल्यास एका वर्षापर्यंतचा कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा देण्याची तरतदू आहे.

**प्रश्न १२ एखादया मतदाराचे नाव राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस विधानसभेच्या मतदारयादीत आहे, मात्र नगरपालिका निवडणूकीच्या प्रभाग मतदारयादीत नसेल तर काय करावे?**

उत्तर मतदारयादी अधिप्रमाणित करण्यासाठी सक्षम असलेल्या अधिका-याने अशा नावांची यादी करुन व त्याखाली तारखेसह स्वाक्षरी करुन संबंधित प्रभाग मतदारयादीसोबत सदरील यादी जोडावी. तथापि, अशी दुरुस्ती नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या वेळेपर्यंतच करता येऊ शकते.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी/एमसी २००२/प्र.क्र /१ .का ,१०. दिनांक ०२/०१/२००२)

**प्रश्न १३ सर्व्हिस व्होटर्सबाबत नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुकीत काय तरतूद आहे ?**

उत्तर सर्व्हिस व्होटर्सबाबत नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये कोणतीही तरतूद नाही.

**प्रश्न १३ कोणत्या व्यक्तींना मतदार म्हणून अपात्र ठरविले जावू शकते?**

उत्तर १. काही गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषी ठरलेली व्यक्ती तुरुंगात असतांना किंवा शिक्षा संपेपर्यंत अपात्र असते.

२. जर न्यायालयाने एखाद्या व्यक्तीस मानसिक दृष्ट्या असमर्थ घोषित केले असेल तर ती व्यक्ती अपात्र ठरते.

३. फक्त भारतीय नागरिकांना मतदानाचा अधिकार आहे. परदेशी नागरिक मतदानाकरीता अपात्र ठरतात.

(संदर्भ - लोकप्रतिनिधी अधिनियम १९५० चे कलम १६)

## ३. मतदार नोंदणी पध्दत

**प्रश्न १ नगरपालिकेला स्वतःची मतदारयादी तयार करण्याचे अधिकार आहेत का ?**

उत्तर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० नुसार विधानसभेसाठी मतदारयादी तयार करण्याचे अधिकार भारत निवडणूक आयोगाला आहेत. त्या यादीवरुन नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदारयादी तयार करण्याचे अधिकार संबंधित नगरपालिकेला आहेत.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११ )

**प्रश्न २ मतदार नोंदणी केव्हा व कोठे करावी लागते ?**

उत्तर भारत निवडणूक आयोग जेव्हा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर करतो त्यावेळी पदनिर्देशित अधिकारी (Designated Officer) यांचेकडे अथवा तहसिल कार्यालयात मतदारांची नोंदणी करावी लागते. या व्यतिरिक्त अन्य कालावधीत देखील मतदार नोंदणी अधिकारी अथवा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे मतदार नोंदणीसाठी अर्ज दाखल करता येऊ शकतो. नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणुकीसाठी वेगळ्याने मतदार नोंदणी केली जात नाही.

**प्रश्न ३ विधानसभेच्या मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नाव नोंदविण्यासाठी कोणता फॉर्म भरावा लागतो ?**

उत्तर विधानसभेच्या मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नाव नोंदण्यासाठी फॉर्म नंबर ६ भरावा लागतो. नमुना ६-अ हा अनिवासी भारतीयांच्या नोंदणीसाठी वापरावा लागतो.

**प्रश्न ४ विधानसभेच्या मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नोंदविलेल्या नावामध्ये मुद्रणदोष असल्यास तो दुरुस्त करण्यासाठी कोणता फॉर्म भरावा लागतो ?**

उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीतील मुद्रणदोष दुरुस्तीसाठी फार्म नंबर ८ भरावा लागतो.

**प्रश्न ५ स्वत:च्या निवासी पत्त्यामध्ये झालेला बदल विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये करुन घेण्यासाठी कोणता फॉर्म भरावा लागतो ?**

उत्तर त्याच मतदारसंघामधील स्वत:च्या निवासी पत्त्यामध्ये झालेला बदल त्या विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये करुन घेण्यासाठी फार्म नंबर ८-अ भरावा लागतो.

**प्रश्न ६ विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नवीन नाव नोंदविणे, वगळणे अथवा त्यामध्ये सुधारणा करण्याचे काम कोण करु शकतो ?**

उत्तर मतदारयादीमध्ये नवीन नांव नोंदविणे, वगळणे अथवा त्यामध्ये सुधारणा करण्याचे काम मतदार नोंदणी अधिकारी करु शकतात. विधानसभा क्षेत्रासाठी मतदार नोंदणी अधिकारी हे उपविभागीय अधिकारी / प्रांत / उपजिल्हाधिकारी हे असतात. तर सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तहसिलदार हे असतात.

**प्रश्न ७ विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नवीन नाव नोंदविणे, वगळणे अथवा त्यामध्ये सुधारणा करण्याची तरतूद कोणत्या नियमात आहे ?**

उत्तर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० मधील कलम २२ व २३ मध्ये विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नवीन नाव नोंदविणे, वगळणे अथवा त्यामध्ये सुधारणा करण्याची तरतूद आहे.

**प्रश्न ८ राज्य निवडणूक आयोगाकडून नगरपालिकेच्या निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर नगरपालिकेच्या मतदारयादीमध्ये नाव दाखल करता येते काय ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूक कार्यक्रमाची घोषणा झाल्यानंतर नगरपालिकेच्या

मतदारयादीमध्ये नाव नोंदविता येत नाही. राज्य निवडणूक आयोगाद्वारे मतदारयादी ग्राह्य धरण्यासाठी अधिसूचित केलेल्या दिनांकापूर्वी ज्यांचे नाव विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नोंदविले असेल त्याच व्यक्तींचे नाव नगरपालिकेच्या मतदारयादीमध्ये समाविष्ट होते.

**प्रश्न ९ मतदार यादी नमुना ४ प्रभागनिहाय प्रसिध्द केली जाते किंवा नाही ?**

उत्तर होय, प्रसिध्द केल्या जातात.

## ४. <u>विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नाव नोंदणीसाठी आवश्यक दस्तऐवज:-</u>

**प्रश्न १ विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नाव नोंदणीसाठी आवश्यक दस्तऐवज कोणते आहेत ?**

उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नाव नोंदणीसाठी खालील दस्ताऐवज आवश्यक आहेत :-

वयाचा पुरावा (ii) रहिवासी पुरावा (iii) २ पासपोर्ट आकाराची छायाचित्रे

**प्रश्न २ विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नाव नोंदणीसाठी आवश्यक दस्तऐवज कोणाकडे सादर करावेत ?**

उत्तर मतदान पदनिर्देशित अधिका-यांकडे (Designated Officer) अथवा तहसिलदार कार्यालयात.

**प्रश्न ३ विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नाव नोंदणीसाठी रेशनकार्ड आवश्यक आहे काय ?**

उत्तर नाही. रेशनकार्ड (शिधापत्रिका) हा रहिवासाचा पुरावा मानला जात नाही. रहिवासी संदर्भात इतर कोणताही पुरावा उदा.पासपोर्ट, बँक पासबुक, वाहन परवाना, लाईट बिल इ. सादर करता येतो.

**प्रश्न ४ रहिवासासंबंधी कोणताही पुरावा नसल्यास मतदार नोंदणीसाठी काय करावे ?**

उत्तर केवळ फॉर्म नंबर ६ भरुन दयावा. मतदार नोंदणी अधिकारी BLO मार्फत सत्यता पडताळतील.

**प्रश्न ५ पूर्वी एका ठिकाणी मतदार म्हणून नोंद असल्यास तेथील नाव कमी केल्याबाबत दाखला आवश्यक आहे का ?**

उत्तर नाही. मात्र फॉर्म नंबर ६ च्या भाग ४ मध्ये याबाबतचा तपशिल भरुन दयावा.

**प्रश्न ६ भाडेकरु व्यक्तीला मतदारयादीमध्ये नाव नोंदविता येईल काय ?**

उत्तर होय. याकरिता फॉर्म नंबर ६ भरावा.

**प्रश्न ७ वयाचा दाखला म्हणून कोणते दस्तऐवज मतदार नोंदणीसाठी ग्राहय धरले जातात ?**

उत्तर खालील दस्तऐवज वयाचा पुरावा म्हणून ग्राहय धरले जातात :-

(i) ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका यांनी दिलेला जन्म दाखला

(ii) शाळा, कॉलेज सोडल्याचे प्रमाणपत्र ज्यावर जन्मतारीख नमूद आहे.

(iii) एस.एस.सी. अथवा एच.एस.सी. बोर्डाचे प्रमाणपत्र

(iv) जन्मदाखला अथवा जन्मतारीख नमुद असलेला अन्य शासकीय दस्तऐवज

(v) अशिक्षित अर्जदाराबाबत घोषणापत्र.

**प्रश्न ८ बेघर व्यक्तीला मतदारयादीमध्ये नाव नोंदविता येईल काय ?**

उत्तर होय.

## ५. भारत निवडणूक आयोगातर्फे मतदार नोंदणीसाठी विविध उपाययोजना

**प्रश्न १ विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणीसाठी भारत निवडणूक आयोगाकडून कोणकोणत्या उपाययोजना करण्यात येतात ?**

उत्तर (i) विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणीसाठी भारत निवडणूक आयोगाकडून मतदार नोंदणीबाबत जागरुकता निर्माण करणे.

(i) मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची नेमणूक करणे.

(ii) मतदार नोंदणी कार्यक्रमाला विशेष प्रसिध्दी देणे.

(iii) २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करणे इ. उपाययोजना करण्यात येतात.

त्याचप्रमाणे भारत निवडणूक आयोगाकडून संक्षिप्त पुनरिक्षण, विशेष पुनरिक्षण, मतदार जागृती अभियान, ऑन-लाईन मतदार नोंदणी इत्यादी कार्यक्रम घेण्यात येतात.

**प्रश्न २ विधानसभा मतदारसंघाकरिता मतदार नोंदणीसाठी वर्षातून किती वेळा नोंदणी वेळापत्रक ठरविण्यात येते ?**

उत्तर मतदार नोंदणी ही निरंतर प्रक्रिया आहे. तथापि, मतदार नोंदणीसाठी सर्वसाधारणपणे एकदा संक्षिप्त पुनरिक्षण व निवडणुकीच्या वर्षामध्ये एकापेक्षा जास्त वेळा विशेष पुनरिक्षण करण्यात येते.

**प्रश्न ३ मतदार नोंदणी प्रक्रियेसाठी कोणत्या अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते ?**

उत्तर मतदार नोंदणी प्रक्रियेसाठी मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, पदनिर्देशित अधिकारी, पर्यवेक्षक व मतदान केंद्रस्तरीय अधिका-यांची नेमणूक केली जाते.

**प्रश्न ४ मतदान केंद्र पातळीवर मतदारांच्या नोंदणीसाठी कोण अधिकारी नेमला जातो ?**

उत्तर मतदान केंद्र पातळीवर मतदारांच्या नोंदणीसाठी पदनिर्देशित अधिकारी नेमला जातो.

**प्रश्न ५ मतदार यादीचे संक्षिप्त पुनरिक्षण व विशेष पुनरिक्षण म्हणजे काय ?**

उत्तर मतदार यादीमध्ये दरवर्षी नवीन पात्र मतदारांचा नव्याने समावेश व मृत, स्थलांतरीत इ. मतदारांना वगळण्याच्या प्रक्रियेसाठी आणि नावातील अथवा तपशिलातील दुबार दुरुस्तीकरिता

राबविण्यात येणा-या मोहीमेला संक्षिप्त पुनरिक्षण तर निवडणुकीच्या वर्षामध्ये नवीन मतदार नोंदणी व इतर बाबींसाठी विशेष कार्यक्रम जाहीर केला जातो त्याला विशेष पुनरिक्षण असे म्हणतात.

**प्रश्न ६ मतदार नोंदणीसंबंधी सविस्तर माहिती कोठे मिळेल ?**

उत्तर मतदार नोंदणीसंबंधी सविस्तर माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा प्रांताधिकारी त्याचप्रमाणे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार, त्याचप्रमाणे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तसेच तहसिलदार कार्यालयात मिळेल. अधिक माहितीसाठी निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ www.eci.gov.in अथवा www.ceo.maharashtra.gov.in येथे भेट देता येईल.

## ६. प्रभागनिहाय प्रारुप मतदारयादी तयार करणे व प्रसिध्द करणे

**प्रश्न १ प्रभागनिहाय प्रारुप मतदारयादी तयार करण्याचे अधिकार कोणाला आहेत ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणुकीसाठी संबंधित मुख्याधिकारी यांना प्रभागनिहाय प्रारुप मतदारयादी तयार करण्याचे अधिकार आहेत.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११ आणि )

**प्रश्न २ प्रभागनिहाय मतदारयादी केव्हा तयार करण्यात येते ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोग अधिसूचित करेल अशा दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरुन निवडणुकीच्या पूर्वी ठरवून दिलेल्या तारीखवार कार्यक्रमानुसार प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्यात येते.

**प्रश्न ३ प्रभागनिहाय मतदारयादी तयार करण्याची सर्वसाधारण प्रक्रीया कशी आहे ? अशा वेळी कोणती दक्षता घ्यावी ?**

उत्तर (i) राज्य निवडणूक आयोग अधिसूचित करेल त्या तारखेस अस्तित्वात असणारी विधानसभेची (मतदारयादी (सर्व पुरवणीसह) वापरणे.

(ii) नगरपालिकेच्या प्रभागांची रचना लक्षात घेऊन मतदारयादीचे प्रभाग निहाय विभाजन करणे.

(iii) अशा प्रभागनिहाय यादीची प्रारुप प्रसिध्दी करण्यात येते व हरकती - सूचना मागविण्यात येतात.

(iv) प्रारुप हरकती -सूचनांवर चौकशी करुन अंतिम निर्णय घेण्यात येतात.

(v) त्यानंतर सदर यादी अधिप्रमाणित करुन आयोगाच्या सूचनेनुसार प्रभागनिहाय प्रसिध्द केली जाते.

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसाठी मतदारयादी तयार करताना संबंधित प्रभाग रचनेच्या भौगोलिक क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या मूळ मतदारयादीतील सर्व मतदार समाविष्ट होणे आवश्यक आहे. त्या समाविष्ट भागातील कोणताही मतदार सुटणार नाही किंवा क्षेत्राबाहेरील कोणताही मतदार समाविष्ट होणार नाही यासाठी गरज वाटल्यास स्थल निरीक्षण करून मतदारयादी विभागण्याची विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच त्यामध्ये कोणतीही नावे वाढविणे, कमी करणे किंवा त्यामध्ये सुधारणा करणे यास अनुमती देण्यात आलेली नाही.

**प्रश्न ४ अंतिम मतदारयादी प्रसिध्द झाल्यानंतर त्यात दुरुस्ती करता येऊ शकते काय ?**

उत्तर विधानसभा मतदार यादीवरुन नगर परिषद अथवा नगर पंचायतीच्या निवडणूकांसाठी विधानसभा मतदार यादी प्रभाग निहाय विभागुन, छापून व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द केल्यानंतर काही मतदारांची नावे ज्या प्रभागात असणे आवश्यक आहे, त्या ऐवजी दुसऱ्याच प्रभागाच्या मतदार यादीत चुकीने छापण्यात आल्यास अथवा राज्य निवडणूक आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या तारखेस ज्या मतदाराचे नाव संबंधित क्षेत्राच्या विधानसभा मतदार यादीत असून देखील ते नाव नगर परिषदा अथवा नगर पंचायतीच्या निवडणूकीच्या प्रभागनिहाय मतदार यादीत छापावयाचे राहून गेल्यास मतदार यादी तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याने त्या संदर्भात काही तक्रारी प्राप्त झाल्यास त्याबाबत योग्य त्या दुरुस्त्या पुरवणी यादीच्या स्वरुपात कराव्यात.

सदर दुरस्त्या नगर परिषदा अथवा नगर पंचायतीच्या निवडणूकांची नामनिर्देशन पत्रे भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत करता येतील. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, मतदार यादीत नवीन नावे समाविष्ट करण्याची अथवा वगळण्याची परवानगी देण्यात आली आहे.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी/एमसी/२००२ प्र.क्र. १/ का.१०, दिनांक ०२/०१/२००२ )

**प्रश्न ५ मतदारयादी केव्हा, कशी, कोठे व कोणाच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध करण्यात येते ?**

उत्तर नगरपालिकेची प्रारुप मतदारयादी तयार झाल्यानंतर ती प्राधिकृत अधिकारी तथा मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीने नगरपालिका कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येते. प्रसिध्द केलेल्या प्रारूप मतदारयादीची माहिती जनतेस होण्यासाठी प्रभाग समिती, नगरपालिकेची इतर कार्यालये, स्थानिक वर्तमानपत्र (जाहिरातीच्या स्वरूपामध्ये) आणि स्थानिक केबल टी.व्ही. वर नगरपालिकेतर्फे पत्रक प्रसिध्दी करण्यात येते.

**प्रश्न ६ मतदारयादी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे काय?**

उत्तर नगरपालिका निवडणुकीसाठी अशी तरतूद अस्तितवात नाही.

## ७. विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीतील दुबार नाव, मयत व स्थलांतरित मतदारांचे नावाबाबत

**प्रश्न १ एखादया व्यक्तीने विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयादीत एकापेक्षा जास्त वेळा नावाची नोंदणी केली असेल तर भारतीय लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० मध्ये काय तरतूद आहे ?**

उत्तर या प्रकरणी दावा चालविता येतो व न्यायालयात आरोप (जाणीवपूर्वक कृती केल्याचे) सिध्द झाल्यास जास्तीत जास्त एक वर्षाची शिक्षा संबंधितांना देण्याची लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० मधील कलम ३१ मध्ये तरतूद आहे.

**प्रश्न २ विधानसभेच्या मतदारयादीतील नावे नगरपालिकेच्या मतदार यादीत प्रसिध्द झाल्यानंतर दुबार नाव कमी करण्यात येतात काय ?**

उत्तर दुबार नाव वगळण्यात येत नाही. मात्र दुबार मतदान होऊ नये यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे दि. २४ एप्रिल २००७ च्या पत्रानुसार काळजी घेतली जाते. (अधिक माहितीसाठी पहा प्रश्न-६)

**प्रश्न ३ नगरपालिका निवडणुकीकरिता मतदारयादीतील मयताचे व स्थलांतरिताचे नाव आक्षेप घेतल्यानंतर कमी करता येते काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ४ मयत मतदारांची नावे मतदारयादीत कशी दर्शविली जातात ?**

उत्तर मयत मतदाराच्या नावासमोर "E" अशी चौकोनात खूण केली जाते.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/मनपा - २०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ११/१०/२०१० )

**प्रश्न ५ स्थलांतरित झालेल्या मतदारांच्या नावापुढे कोणती खूण असते ?**

उत्तर स्थानांतरित झालेल्या मतदाराच्या नावांसमोर "S" अशी खुण असते.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/मनपा - २०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ११/१०/२०१० )

**प्रश्न ६ मतदारयादीमध्ये एकापेक्षा जास्त वेळा नाव असेल तर त्याच्या नावावर अन्य कोणी मतदान करण्याची शक्यता असते हे टाळण्यासाठी काय करावे ?**

उत्तर (i) मतदारयादीमध्ये एकापेक्षा जास्त वेळा नाव असणे हा गुन्हा आहे. तथापि, असे नाव असल्यास ज्या मतदाराचे नांव एकापेक्षा जास्त वेळा आले असेल तो मतदार एकच आहे याची खात्री करुन घ्यावी.

(ii) एकापेक्षा जास्त प्रभागात नांव असल्यास कोणत्या प्रभागात मतदान करणार हे विचारावे व जेथे मतदान करणार नसेल त्या मतदार यादीवर त्याच्या नावासमोर अभिप्राय लिहावा.

(iii) एकाच प्रभागात जास्त वेळा नांव आल्यास तो कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार हे विचारावे व त्याप्रमाणे नोंद घ्यावी. उपरोक्त बाबी मतदारयादीमध्ये एकापेक्षा जास्त वेळा नाव असेल तर त्याच्या नावावर अन्य कोणी मतदान करु नये यासाठी कराव्यात.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/मनपा - २००७ / प्र.क्र. ६/ का.०५, दिनांक २४/०४/२००७ )

**प्रश्न ७ प्रभागनिहाय मतदारयादी तयार झाल्यानंतर त्यामध्ये मुद्रणदोष असल्यास त्यात बदल करता येईल काय ?**

उत्तर होय.

## ८. प्रभागनिहाय प्रारुप मतदारयादीवरील आक्षेप / हरकती

**प्रश्न १ नगरपालिकेच्या निवडणूकीकरिता तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदारयादीवर आक्षेप घेता येतात काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न २ मतदारयादीवरील आक्षेप, दावे अथवा दुरुस्ती अर्ज कोणत्या कालावधीमध्ये सादर करण्याची तरतूद आहे ?**

उत्तर नगरपालिकेच्या प्रभागनिहाय प्रारूप मतदारयादीवरील आक्षेप, दावे अथवा दुरुस्ती अर्ज हे राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या कार्यक्रमानुसार विहित मुदतीमध्ये सादर करण्याची तरतूद आहे.

**प्रश्न ३ आक्षेप घेण्यासाठी विहित नमुने उपलब्ध करुन देण्यात येतात का ? व आक्षेप कुठे दाखल करता येतो ?**

उत्तर नाही. मतदारयादी तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिकृत अधिकारी तथा मुख्याधिकारी यांच्याकडे आक्षेप साध्या कागदावर लिहून दाखल करता येतात.

**प्रश्न ४ मतदारयादीवरील आक्षेप घेण्याबाबत सर्वसाधारण कोणते मुद्दे गृहित धरण्यात येतात ?**

उत्तर (i) मतदाराचे नाव चुकून दुसऱ्या प्रभागाच्या मतदारयादीत असणे

(ii) विधानसभेच्या मतदारयादीमध्ये नाव असताना देखील प्रभागाच्या मतदारयादीमध्ये नाव समाविष्ट नसणे मुद्रण दोष इ. सर्वसाधारण मुद्दे मतदारयादीवरील आक्षेप घेण्याबाबत गृहीत धरले जातात.

**प्रश्न ५ प्रभागाच्या मतदारयादीमध्ये नागरिकांडून प्राप्त हरकती / सूचनांवर सुनावणी घेण्यात येते काय ?**

उत्तर सुनावणी घेण्यात येत नाही. संक्षिप्त चौकशी करुन निर्णय घेण्यात येतो.

**प्रश्न ६ आक्षेपावर अंतिम निर्णय कोण घेतो ?**

उत्तर मतदारयादी तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेला प्राधिकृत अधिकारी तथा मुख्याधिकारी हा आक्षेपावर अंतिम निर्णय घेतो.

**प्रश्न ७ प्रारुप मतदारयादीवरील आक्षेप मान्य झाल्यास प्रभागाच्या मतदारयादीत बदल करण्यात येतो काय ?**

उत्तर होय.

## ९. अंतिम मतदारयादी प्रसिध्द करणे

**प्रश्न १ आक्षेप व हरकतीनंतर अंतिम मतदारयादी केव्हा व कोठे प्रसिध्द करण्यात येते ?**

उत्तर प्राप्त आक्षेप व हरकतींचा निपटारा झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाच्या मतदारयादी बाबतच्या कार्यक्रमानुसार विहित दिनांकास अंतिम मतदारयादी नगरपालिका कार्यालयाचा सूचना फलक त्याचप्रमाणे राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येते.

**प्रश्न २ अंतिम मतदारयादी तयार असल्याची सूचना कोण व कशा प्रकारे प्रसिध्द करतात ?**

उत्तर प्रसिध्द केलेल्या अंतिम मतदारयादीची माहिती जनतेस होण्यासाठी अंतिम मतदारयादी तयार असल्याची सूचना प्राधिकृत अधिकारी तथा मुख्याधिकारी नोटीसद्वारे प्रभाग समिती, नगरपालिकेची इतर कार्यालये, स्थानिक वर्तमानपत्र (जाहिरातीच्या स्वरूपामध्ये) आणि स्थानिक केबल टी.व्ही. वर प्रसिध्द करतात.

**प्रश्न ३ अंतिम मतदारयाद्या पाहणीसाठी व माहितीसाठी उपलब्ध करुन दिल्या जातात काय ? असल्यास कोठे ?**

उत्तर होय. नगरपालिका निवडणुकीसाठी प्राधिकृत अधिकारी तथा मुख्याधिकारी यांच्या कार्यालयामध्ये याशिवाय अशी यादी राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिली जाते.

**प्रश्न ४ अंतिम मतदारयादी नागरिकांना / उमेदवारांना शुल्क भरुन उपलब्ध करुन देण्यात येते काय ?**

उत्तर होय. निश्चित केलेले शुल्क आकारुन मतदारयादी पुरविली जाते.

**प्रश्न ५ संकेतस्थळावरील मतदारयादीचा वापर करुन एखाद्या मतदाराला आपले नाव, प्रभाग व मतदान केंद्र शोधता येऊ शकते का ?**

उत्तर होय. सदर सुविधा फक्त नगरपरिषद व नगरपंचायती क्षेत्राकरिता उपलब्ध आहे.

## १०. नगरपालिकेची मतदारयादी अधिप्रमाणित करण्याचे अधिकार

**प्रश्न १ नगरपालिकेची मतदारयादी अधिप्रमाणित करणे म्हणजे काय ?**

उत्तर अंतिम मतदारयादीच्या खाली सक्षम प्राधिकाऱ्याने नावानिशी सही करुन दिनांक व पदनामाचा शिक्का उमटविणे व त्यावर मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक नमुद करणे म्हणजे मतदारयादी अधिप्रमाणित करणे होय.

**प्रश्न २ नगरपालिकेची मतदारयादी अधिप्रमाणित करण्याचे अधिकार कोणाला आहेत ?**

उत्तर त्या नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी तथा मुख्याधिकारी यांना मतदारयादी अधिप्रमाणित करण्याचे अधिकार आहेत.

**प्रश्न ३ निवडणुकीसाठी मतदारयादी अधिप्रमाणित करण्यासाठी कोणत्या दर्जाचा अधिकारी नियुक्त करण्यात येतो ?**

उत्तर नगरपालिकेच्या निवडणुकीकरिता मुख्याधिकारी पदाच्या दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी मतदारयादी अधिप्रमाणित करण्यासाठी नियुक्त करण्यात येतो.

## ११. मतदान केंद्रनिहाय मतदार यादी छपाई व प्रसिध्दी

**प्रश्न १ निवडणुकीसाठी प्रभागाच्या मतदारयादीवरुन मतदान केंद्रनिहाय मतदारयादी तयार करण्यात येते काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न २ मतदान केंद्रनिहाय मतदारयादी केव्हा व कशा प्रकारे तयार करण्यात येते ? व कोठे प्रसिद्ध करण्यात येते ?**

उत्तर निवडणुकीपूर्वी मतदान केंद्रनिहाय मतदारयादी प्रसिध्द करण्यात येते आणि ती निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या सूचना फलकावर व मतदान केंद्रावर प्रसिध्द करण्यात येते.

**प्रश्न ३ मतदान केंद्रनिहाय मतदारयादीत कोणकोणत्या बाबींचा तपशिल दर्शविण्यात येतो ?**

**उत्तर** मतदान केंद्राची व्याप्ती मतदाराचे नाव, छायाचित्र, घर क्रमांक, वय व लिंग यासोबत मतदारयादीच्या शिर्षस्थानी प्रभाग क्रमांक, मतदान केंद्र क्रमांक, गांव व वस्ती, निवडणुकीचे वर्ष इ. बाबींचा तपशील दर्शविण्यात येतो.

**प्रश्न ४ मतदान केंद्राच्या इमारतीत बदल झाल्यास मतदारयादीत बदल करण्यात येतो का ?**

उत्तर मतदान केंद्रनिहाय मतदारयादी तयार करण्यात येत असल्यामुळे तसा बदल करण्यात येत नाही.

**प्रश्न ५ मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदारयादी कोणाच्या स्वाक्षरीने प्रसिध्द केली जाते ?**

उत्तर मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदारयादी ही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्वाक्षरीने प्रसिध्द केली जाते.

**प्रश्न ६ मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदारयादी कोणत्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाते ?**

उत्तर ज्या ज्या नगरपालिकेचे संकेतस्थळ उपलब्ध आहे त्या त्या संकेतस्थळावर अंतिम मतदारयादी प्रसिध्द करण्यात येते.

**प्रश्न ७ मतदान केंद्रनिहाय मतदारयादी विकत मिळू शकते काय ?**

उत्तर होय.

# प्रकरण ८.

# मतदान केंद्र

# (Polling Station)

## १. मतदान केंद्राचे निकष

**प्रश्न १ मतदान केंद्र स्थापन निश्चितीचे सर्वसाधारण निकष काय आहेत ?**

उत्तर शक्यतो एका प्रभागासाठी एक मतदान केंद्र किंवा आवश्यकतेप्रमाणे पूरक मतदानकेंद्र असावे. नगरपरिषद निवडणूकीसाठी १२०० ते १४०० मतदारांसाठी एक मतदान केंद्र असावे. त्याचप्रमाणे लोकसभा / विधानसभा निवडणुकीचे मतदान केंद्र ज्या ठिकाणी असते शक्यतो त्याच ठिकाणी मतदान केंद्र असावे. मतदान केंद्र स्थापन करणेबाबत सर्वसाधारण निकष खालीलप्रमाणे :-

(i) कमीत कमी क्षेत्रफळ २० चौ.मीटर असावे. (ii) प्रवेश आणि निर्गम यासाठी स्वतंत्र दरवाजे असावेत. (iii) मतदारांना मतदानासाठी २ कि.मी. पेक्षा जास्त प्रवास करण्याची गरज असू नये.

(iv) शहरी भागामध्ये एका इमारतीमध्ये ०४ व ग्रामीण भागामध्ये एका इमारतीमध्ये ०२ पेक्षा जास्त मतदान केंद्रे असू नयेत. (v) मतदान केंद्र हे मतदान क्षेत्रामध्येच असावे मात्र शक्य नसल्यास मतदान क्षेत्रापासून सर्वात जवळ असावे. (vi) मतदान केंद्रासाठी शक्यतोवर शाळा (शासकीय किंवा अनुदानित) आणि सरकारी किंवा निमसरकारी संस्थांच्या इमारतींची निवड करावी. (vii) खाजगी जागेमध्ये मतदान केंद्र ठेवायचे असल्यास इमारतीचे अधिग्रहण करावे. (viii) पोलीस स्टेशन, दवाखाना, मंदिर किंवा धार्मिकतेशी संबंधित जागी मतदान केंद्र ठेवू नये. (ix) शक्यतोवर मतदान केंद्र इमारतीच्या तळमजल्यावर असावे. (x) राजकीय पक्षाचे कार्यालय २०० मीटरच्या परिसरात नसावे.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. रानिआ/२०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ३०/०७/२०११ आणि पत्र क्र. रानिआ/मनपा- २०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ०७/०१/२०१५ )

**प्रश्न २ आदर्श मतदान केंद्राची रचना कशी असावी ?**

उत्तर आदर्श मतदान केंद्राची रचना खालीलप्रमाणे असावी :-

(i) कमीत कमी क्षेत्रफळ २० चौ मीटर असावे.

(ii) स्वतंत्र प्रवेशाचा व बाहेर पडण्याचे दरवाजे असावेत.

(iii) विद्युत व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वतंत्र पुरुष-स्त्री प्रसाधनगृह असावे. या बाहय बाबीसोबत आदर्श मतदान केंद्राची अंतर्गत रचना खालीलप्रमाणे असावी.

(iv) मतदान केंद्राध्यक्षाची बसण्याची व्यवस्था अशी असावी ज्यामुळे त्याला मतदान केंद्रावरील प्रत्येक बाब दिसू शकेल.

(v) मतदान अधिकारी क्र.१, २, व ३ यांची बसण्याची व्यवस्था मतदान केंद्रात प्रवेश होईल त्या ठिकाणापासून असावी. म्हणजे प्रथम मतदान अधिकारी १, त्यानंतर २ व त्यानंतर-३.

(vi) मतदान अधिकारी क्र. ३ यांचे बाजूला मतदान कक्ष असावा त्याची रचना मतदानाची गोपनीयता राखण्याच्या दृटीकोनातून असावी.

(vii) त्यानंतर मतदाराला मतदान केंद्राच्या बाहेर पडता येईल यासाठी स्वतंत्र दरवाजा असावा.

(viii) मतदान प्रतिनिधी यांची बसण्याची व्यवस्था अशा जागी करावी जेथून त्यांना मतदार ओळखता येतील तसेच मतदान केंद्राध्यक्ष व तिसरा मतदान अधिकारी यांच्या टेबलवरील कंट्रोल युनिट व त्याबाबतची सर्व कार्यवाही पाहता येईल.

(ix) मतदान केंद्राबाहेर १०० व २०० मीटर हद्दीची निशानी चुना टाकून दर्शविलेली असावी त्याचप्रमाणे मतदान केंद्राबाहेर इशारा, नमुना मतदारयादी, सूचना इ. मतदाराला दिसतील अशा दर्शनी भागात लावलेली असावीत.

(x) शारिरिकदृष्टया नि:समर्थ व्यक्तींसाठी Ramp ची व्यवस्था करावी.

(xi) मतदारांसाठी सावलीची व्यवस्था करावी.

**प्रश्न ३ खाजगी इमारतीमध्ये मतदान केंद्र देता येईल का?**

उत्तर होय, खाजगी इमारतीमध्ये मतदान केंद्र देता येईल.

( संदर्भ आयोगाचे आदेश क्र. मनपा/२०२५/प्र.क्र.३/का-५ , दि. २६/०६/२०२५)

**प्रश्न ४ एका आदर्श मतदान केंद्रावर काय काय मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे ?**

उत्तर विद्युत व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, रॅम्प सावलीकरिता उपाययोजना, खोली हवेशीर व पुरेसा उजेड असावा, महिला कर्मचारी असल्यास स्वतंत्र स्वच्छतागृह, इत्यादी

( संदर्भ - रानिआ/ मनपा/२०२५/प्र.क्र.३/का-५,दि.२६/०६/२०२५)

**प्रश्न ५ मतदान केंद्राला आत व बाहेर असे स्वतंत्र दरवाजे असावेत का?**

उत्तर होय, मतदान केंद्राला शक्यतोवर आत व बाहेर असे स्वतंत्र दरवाजे असावेत, जेथे अशी सोय नसेल तेथे दोरीच्या सहाय्याने तात्पुरती व्यवस्था करावी.

( संदर्भ आयोगाचे आदेश क्र. मनपा/२०२५/प्र.क्र.३/का-५ , दि. २६/०६/२०२५)

**प्रश्न ६ मतदान केंद्राच्या सुरक्षिततेसाठी काय काय उपाय योजना केल्या जातात. ?**

उत्तर पोलिस बंदोबस्त सी.सी.टि.व्ही कॅमेरे, इत्यादी.

( संदर्भ - रानिआ/ मनपा/२०२५/प्र.क्र.३/का-५,दि.२६/०६/२०२५)

**प्रश्न ७ मतदान केंद्राच्या इमारतीमध्ये कोणत्याही पक्षाचे कार्यालय, उमेदवार हितचिंतक पाठीराखा यांचे कार्यालय असावेत का ?**

उत्तर मतदान केंद्राच्या इमारतीमध्ये कोणत्याही पक्षाचे कार्यालय असु नये. मतदान केंद्रावर केवळ मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यासंबंधी आवश्यक असलेली सोय असावी.

( संदर्भ - रानिआ/ मनपा/२०२५/प्र.क्र.३/का-५,दि.२६/०६/२०२५)

**प्रश्न ८ मतदान केंद्रासाठी खाजगी इमारत किती कलावधी आधी ताब्यात घेण्यात यावी?**

उत्तर मतदान खाजगी इमारतीत असल्यास मतदान प्रक्रिया सुरु होण्याच्या २४ तास अगोदर असे मतदान केंद्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ताब्यात घेणे आवश्यक आहे.

( संदर्भ - रानिआ/ मनपा/२०२५/प्र.क्र.३/का-५,दि.२६/०६/२०२५)

**प्रश्न ९ उन्हाळा तसेच पावसाळा मध्ये मतदानासाठी कोणती काळजी घेण्याची गरज आहे?**

उत्तर मतदान केंद्रावर उन्हाळ्यामध्ये रांगेतील मतदारांसाठी सावली, पिण्याचे पाणी, वातावरण थंड ठेवण्यासाठी आवश्यक तसेच उष्णतेपासून सुरक्षा देणारे पर्याय उपलब्ध असावे. उष्मघाताचा त्रास होऊ नये म्हणून आवश्यक ती प्रथमोपचार, औषधे (जसे De-hydration Medicine)मतदान अधिकाऱ्यासोबत द्यावीत. मतदारांना पावसापासून संरक्षण करणे, व कोरडी जागा उपलब्ध करून देण्यात यावी व मतदान केंद्रावर ओलावा निर्माण होणार याची काळजी घेण्यात यावी.

( संदर्भ - रानिआ/ मनपा/२०२५/प्र.क्र.३/का-५,दि.२६/०६/२०२५)

## २. मतदान केंद्र व मतदार संख्या निश्चिती

**प्रश्न १ नगरपालिका निवडणुकीत प्रभागातील मतदान केंद्राची संख्या कशी निश्चित केली जाते ?**

उत्तर प्रभागातील एकूण मतदारांच्या संख्येला १२०० ने भागून नगरपालिका निवडणुकीत प्रभागातील मतदान केंद्राची संख्या निश्चित केली जाते. मात्र, निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या खूप जास्त असल्यास मतदान केंद्रांची संख्या वाढवावी लागते.

**प्रश्न २ मतदान केंद्राची संख्या निश्चित करताना प्रभाग हा निकष विचारात घेतला जातो काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ३ मतदान केंद्रांची संख्या ठरविण्यावर काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर नाही.

## ३. प्रभागातील मतदान केंद्र निश्चित करणे

**प्रश्न १ मतदान केंद्र निश्चित करण्याचे अधिकार कोणास आहेत ?**

उत्तर मतदान केंद्र निश्चित करण्याचे अधिकार हे निवडणूक निर्णय अधिकारी यांना आहेत.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ८)

**प्रश्न २ मतदान केंद्र ठरविण्यासाठी कशाचा आधार घेण्यात येतो ?**

उत्तर मतदार संख्या व मतदारयादी विभाजित झालेल्या भागांच्या आधारावर मतदान केंद्र ठरविले जातात. साधारणत: एका भागासाठी एक किंवा आवश्यकतेप्रमाणे जास्त मतदान केंद्र निश्चित केले जातात.

**प्रश्न ३ वाडी, तांडे व वस्त्या येथे मतदान केंद्र स्थापनेबाबत काही तरतूद आहे काय ?**

उत्तर वाडी, तांडे व वस्त्या असल्यास त्या ठिकाणी मतदार संख्येचे निकष शिथिल करुन आवश्यकतेप्रमाणे मतदान केंद्र स्थापन करण्याबाबत तरतूद आहे.

**प्रश्न ४ नगरपालिका निवडणुकीत एका इमारतीत किती मतदान केंद्र स्थापन करु शकतात ?**

उत्तर नगरपालिका निवडणुकीत एका इमारतीत सर्वसाधारणपणे ०४ मतदान केंद्र स्थापन करता येऊ शकतात. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत कायदा व सुव्यवस्थेचा विचार करता अधिक मतदान केंद्रे त्याच इमारतीत ठेवता येऊ शकतील.

**प्रश्न ५ मतदान केंद्र प्रभागाच्या हद्दीत किती अंतरावर असणे आवश्यक आहे ?**

उत्तर मतदान केंद्र हे शक्यतो प्रभाग क्षेत्राच्या मध्यवर्ती ठिकाणी असावे.

**प्रश्न ६ प्रभागात मतदान केंद्रासाठी इमारत उपलब्ध नसल्यास इतर प्रभागात मतदान केंद्र ठेवता येते काय ?**

उत्तर अपवादात्मक परिस्थितीमध्ये ठेवता येते. मात्र अपवादात्मक परिस्थितीमध्ये नगरपरिषद निवडणूकसंदर्भात संबंधित जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेवून असे मतदान केंद्र ठेवता येईल. अशा मतदान केंद्राबाबतचा अहवाल आयोगास पाठविण्यात येईल.
(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. रानिआ/२०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ३०/०७/२०११)

**प्रश्न ७ प्रभागाची व्याप्ती वाडे, तांडया व वस्त्यामध्ये विखुरली असल्यास मतदान केंद्रे कशी निश्चित करावीत ?**

उत्तर अशा प्रसंगी सर्वात जास्त मतदार असलेल्या ठिकाणी मतदान केंद्र प्राधान्याने ठेवावे. मात्र इतर ठिकाण अधिक मध्यवर्ती आणि अधिक सुविधायुक्त असल्यास त्या ठिकाणी मतदान केंद्र ठेवता येईल.

**प्रश्न ८ मतदान केंद्र इमारतीच्या वरच्या (पहिल्या) मजल्यावर ठेवता येते काय ?**

उत्तर शक्यतोवर मतदान केंद्र इमारतीच्या खालच्या मजल्यावरच असावे. वयोवृध्द आणि शारिरीकदृष्टया नि:समर्थ व्यक्तींसाठी रॅम्पची सुविधा असावी. मतदान केंद्र इमारतीच्या वरच्या मजल्यावर असल्यास शक्यतोवर लिफ्टची सुविधा असावी.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. रानिआ/२०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ३०/०७/२०११ )

**प्रश्न ९ मतदान केंद्र धार्मिक स्थळात ठेवता येते काय ?**

उत्तर नाही. मतदान केंद्र धार्मिक स्थळात ठेवता येत नाही.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. रानिआ/२०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ३०/०७/२०११ )

**प्रश्न १० मतदान केंद्र पोलिस स्टेशन अथवा रुग्णालयात ठेवता येते काय ?**

उत्तर नाही. मतदान केंद्र पोलीस स्टेशन अथवा रुग्णालयात ठेवता येत नाही.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. रानिआ/२०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ३०/०७/२०११ )

**प्रश्न ११ मोठया सोसायटी व निवासी संकुले यामध्ये मतदारांची संख्या मोठया प्रमाणावर असल्यामुळे या मतदारांच्या सोयीसाठी सोसायटीच्या आवारात अथवा संकुलामध्ये मतदान केंद्राची सोय उपलब्ध करून देता येईल काय ?**

उत्तर होय. राज्य निवडणूक आयोगाने विहीत केलेल्या निकषाप्रमाणे मतदान केंद्रासाठी आवश्यक असणाऱ्या सोई सुविधा उपलब्ध करून देण्यास संबंधित संस्था तयार असल्यास अशा ठिकाणी मतदारांच्या सोयीसाठी मतदान केंद्र निश्चित करण्यात यावे.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. रानिआ/२०१०/प्र.क्र. ४/का.०५, दिनांक ३०/०७/२०११)

**प्रश्न १२ लोकसभा / विधानसभा निवडणुकीसाठी असलेल्या मतदान केंद्रातच प्रत्येक मतदाराचे नाव नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणुकीसाठी जोडले जाते काय ?**

उत्तर असे असेलच असे नाही.

**प्रश्न १३ खासगी इमारत अधिग्रहीत करून त्यामध्ये मतदान केंद्र स्थापन करता येईल काय ?**

उत्तर होय. मतदान केंद्राकरिता शासकीय / निमशासकीय इमारत उपलब्ध नसल्यास अपवादात्मक परिस्थितीत खाजगी इमारत अधिग्रहीत करुन त्यामध्ये मतदान केंद्र स्थापन करता येईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३५)

**प्रश्न १४ तंबू, शामीयाना इत्यादी तात्पुरत्या इमारतीत मतदान केंद्र स्थापित करता येईल काय ?**

उत्तर अपवादात्मक परिस्थितीत तंबू, शामियाना इ. तात्पुरत्या ठिकाणी मतदान केंद्र स्थापित करता येऊ शकते.

## ४. मतदान केंद्रास किमान व कमाल मतदार जोडणे

**प्रश्न १ नगरपालिका प्रभागाच्या निवडणुकीत एका मतदान केंद्रास कमाल किती मतदार जोडता येतात ?**

उत्तर नगरपालिका प्रभागाच्या निवडणुकीत एका मतदान केंद्रास कमाल १२०० ते १४०० पर्यंत मतदार जोडता येतात.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. रानिआ/२०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ३०/०७/२०११ आणि पत्र क्र. रानिआ/मनपा- २०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ०७/०१/२०१५)

**प्रश्न २ मतदान केंद्रास मतदार जोडणेचे निकष काय आहेत ?**

उत्तर (i) एका मतदान केंद्रावर कमाल १२०० ते १४०० मतदार असावेत. (ii) मतदाराला मतदान केंद्रावर पोहोचण्यासाठी दोन कि. मी. पेक्षा जास्त प्रवास करावा लागू नये. हे मतदान केंद्रास मतदार जोडण्याचे सर्वसाधारण निकष आहेत.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. रानिआ/२०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ३०/०७/२०११ आणि पत्र क्र. रानिआ/मनपा- २०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ०७/०१/२०१५ )

**प्रश्न ३ मतदान केंद्रास मतदार जोडतांना काय दक्षता घेणे आवश्यक आहे ?**

उत्तर मतदान केंद्रास जोडलेले मतदार हे सलग क्षेत्रातील असावेत ही दक्षता घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे एकाच कुटुंबातील मतदार एकाच मतदान केंद्रात जोडले जाणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही मतदाराला मतदान केंद्रावर पोहोचण्यासाठी शक्यतो दोन कि. मी. पेक्षा जास्त प्रवास करावा लागू नये.

**प्रश्न ४ मतदान केंद्रास पुरुष मतदार व स्त्री मतदार वेगवेगळे जोडण्यात येतात काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ५ परदासीन मतदारांबाबत कोणती कार्यवाही करण्यात यावी?**

एका पुरुष मतदारामांगे दोन स्त्री मतदारांना प्रवेश देण्यात यावा का ? परदासीन मतदान प्रक्रियेत मतदारांची ओळख पटविण्यासाठी पात्र महिला मतदान अधिकारी यांची नेमणूक करण्यात यावी.

( संदर्भ - रानिआ/ मनपा/२०२५/प्र.क्र.३/का-५,दि.२६/०६/२०२५)

**प्रश्न ६ एका पुरुष मतदारामांगे दोन स्त्री मतदारांना प्रवेश देण्यात यावा का ?**

उत्तर होय, एका पुरुष मतदारांमागे दोन स्त्री मतदारांना मतदान कक्षात एकत्र प्रवेश देणे ही एक प्रशासकीय सुविधा आहे.

( संदर्भ - रानिआ/ मनपा/२०२५/प्र.क्र.३/का-५,दि.२६/०६/२०२५)

**प्रश्न ७ मतदान केंद्रास जोडावयाचे मतदार प्रभाग यादीमधील मतदारांच्या अनुक्रमांकानुसार (सलगपणे) जोडणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर बंधनकारक नाही. आवश्यकतेप्रमाणे बदल करता येईल.

## ५. मतदान केंद्र यादी प्रसिध्दी

**प्रश्न १ मतदान केंद्राची यादी व व्याप्ती कोण तयार करतो ?**

उत्तर संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ८)

**प्रश्न २ नगरपालिका निवडणूक जाहीर झाल्यानंतर किती दिवसानंतर मतदान केंद्राची यादी जाहीर करण्यात येते ?**

उत्तर मतदानाच्या तारखेपूर्वी ७ दिवस अगोदर मतदान केंद्र दर्शविणारी व ज्या क्षेत्रासाठी अशा मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली असेल ती क्षेत्रे दर्शविणारी यादी (परिशिष्ट- ) प्रसिध्द करण्यात येईल. या यादीसोबत त्या मतदान केंद्राचा क्षेत्र दर्शविणारा नकाशा सुध्दा प्रसिध्द करण्यात येईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ८ आणि राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. रानिआ/२०१०/प्र.क्र. ४/का.०५, दिनांक ३०/०७/२०११)

**प्रश्न ३ मतदान केंद्राच्या यादीत कोणता तपशिल देण्यात येतो ?**

उत्तर या यादीमध्ये मतदान केंद्र ज्या इमारतीमध्ये असेल त्या इमारतीचे वर्णन, त्या मतदान केंद्रास जोडण्यात आलेल्या प्रभाग मतदार यादीमधील मतदारांचे अनुक्रमांक, गावाचे नाव आणि मतदारांची एकूण संख्या नमूद करण्यात येते.

**प्रश्न ४ मतदान केंद्र निश्चित करुन यादी प्रसिध्द झाल्यानंतर मतदान केंद्राची इमारत बदलता येते काय ? त्यासाठी कोणाची परवानगी आवश्यक असते ?**

उत्तर अपवादात्मक परिस्थितीमध्ये मतदान केंद्राचे स्थान किंवा इमारतीमध्ये बदल करावयाचा असल्यास संबंधित जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेवून असा बदल करता येईल. तसेच त्याबाबत राज्य निवडणूक आयोगास अवगत करावे लागेल.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. रानिआ/२०१०/प्र.क्र. ४/का.०५, दिनांक ३०/०७/२०११)

**प्रश्न ५ मतदान केंद्रनिहाय यादी सोबत नकाशा प्रसिध्द करण्यात येतो काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ६ मतदान केंद्राची यादी कोठे व कशारितीने प्रसिध्द केली जाते ?**

उत्तर मतदान केंद्राची यादी ही निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय आणि संबंधित नगरपालिकेच्या कार्यालयातील सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येते.

**प्रश्न ७ मतदान केंद्राची यादी राजकीय पक्ष व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना मोफत देण्याची तरतूद आहे काय ?**

उत्तर नाही.

## ६. <u>संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रे निश्चित करणे</u>

**प्रश्न १ संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्र म्हणजे काय, त्यांच्या निश्चितीचे निकष काय आहेत ?**

उत्तर मतदान प्रक्रियेमध्ये संभाव्य अडथळयाबाबत ज्या मतदान केंद्रासंदर्भात पूर्वानुमान केले जाते त्यांना संवेदनशील व अडथळयांची शक्यता अधिक असल्यास त्यांना अतिसंवेदनशील मतदान केंद्र म्हणून घोषित केल्या जाते. त्यांच्या निश्चितीचे निकष खालील प्रमाणे आहेत :-

(i) मागील निवडणुकीमध्ये मतदान विषयक हिंसेमूळे फेरमतदान झालेले मतदान केंद्र.

(ii) पूर्वीच्या निवडणुकीमध्ये गैरप्रकार निदर्शनास आलेले मतदान केंद्र.

(iii) निवडणूक निर्णय अधिकारी व पोलिस अधिकारी यांच्या संयुक्त अहवालानुसार अन्य मतदान केंद्र.

उपरोक्त निकषाच्या आधारावर जिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक व निवडणूक निर्णय अधिकारी संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रे ठरवितात.

**प्रश्न २ सदर केंद्राबाबत कोणत्या विशेष उपाययोजना करण्यात येतात ?**

उत्तर संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रावर अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था पुरविली जाते.

**प्रश्न ३ असुरक्षित मतदारांसाठी काय उपाययोजना करावी?**

उत्तर असुरक्षित मतदार म्हणजे असे मतदार जे धमकी, दबाव, सामाजिक किंवा राजकीय कारणांनी मतदानापासून रोखले जावू शकतात.ज्यांचे सुरक्षिततेवर मतदानाच्या वेळी धोका निर्णाण होवू शकतो. भारत निवडणूक आयोग यासाठी विशेष उपाययोजना करतो.

१. असुरक्षित भागांची नोंद,

२ . सुरक्षा व्यवस्था,

३. बुथ लेवल टिम व निरिक्षक ,

४. विशेष प्रबोधन मोहिम,

५. पोस्टल सुविधा

( संदर्भ -  रानिआ/ मनपा/२०२५/प्र.क्र.३/का-५,दि.२६/०६/२०२५)

# ७. मतदान केंद्रावरील सुविधा

**प्रश्न १  मतदान केंद्रावर कोणकोणत्या सुविधा पुरविणे आवश्यक आहे ?**

उत्तर  मतदान केंद्रावर उन्हाळ्यामध्ये रांगेतील मतदारांसाठी सावली मिळेल अशी व्यवस्था असावी. मतदान केंद्र असलेल्या इमारतीमध्ये पिण्याच्या पाण्याची, प्रसाधनगृहाची, लाईटची आणि वृध्द, गरोदर स्त्रिया व अपंग व्यक्ती यांचेसाठी रॅम्पची सुविधा असणे आवश्यक आहे. एखाद्या मतदान केंद्रावर पाच पेक्षा अधिक अपंग मतदार असतील तर त्या मतदान केंद्रासाठी रॅम्पची सुविधा करणे आवश्यक आहे. मतदानकेंद्रावरील सोयी-सुविधा इत्यादी सर्व लोकसभा व विधानसभा निवडणूकीप्रमाणे असतील याची खबरदारी घेण्यात यावी.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र. ३४/का.०५, दिनांक २४/१२/२००५ आणि पत्र क्र. रानिआ/२०१०/प्र.क्र. ४/का.०५, दिनांक ३०/०७/२०११ आणि पत्र क्र. रानिआ/मनपा- २०१० / प्र.क्र. ४/ का.०५, दिनांक ०७/०१/२०१५)

**प्रश्न २  मतदान केंद्रावर वृध्द मतदारास, गरोदर महिला, शारीरिकदृष्ट्या नि:समर्थ मतदारास कोणत्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात ?**

उत्तर  शक्यतोवर मतदान केंद्र तळमजल्यावर ठेवावे. त्याचप्रमाणे रॅम्पची सुविधा असावी. तसेच अशा मतदारांना मतदान करताना प्राधान्य देण्यात यावे.

**प्रश्न ३  उमेदवार / राजकीय पक्षांच्या बूथ स्थापनेविषयीचे निकष काय आहेत ?**

उत्तर  उमेदवार / राजकीय पक्षांच्या बूथ स्थापनेविषयीचे निकष खालील प्रमाणे आहेत.:-

(i) सदरील बूथ मतदान केंद्रापासून २०० मी. पेक्षा जास्त अंतरावर असावे.

(ii) एका उमेदवाराला / राजकीय पक्षाला एका मतदान केंद्रासाठी एकच बूथ स्थापित करता येईल.

(iii) अशा बूथवर केवळ एक टेबल व दोन खुर्च्या असाव्यात.

(iv) बूथ हे छोटया मंडपाच्या स्वरुपात असावे.  त्यावर ऊन व पावसापासून संरक्षणासाठी छत्री अथवा ताडपत्रीचा वापर करावा.

(v) या बूथमुळे वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**प्रश्न ४ मतदान सहायता केंद्र कोठे व का असावे?**

उत्तर मतदारांना सहाय्य, मार्गदर्शन व माहिती देण्यासाठी मतदान सहायता केंद्र हे मतदान केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ असावे.

( संदर्भ - रानिआ/ मनपा/२०२५/प्र.क्र.३/का-५,दि.२६/०६/२०२५)

**प्रश्न ५ मतदार सहाय्य केंद्रावर काय सुविधा असाव्यात?**

उत्तर मतदार सहाय्यक केंद्रावरील कर्मचाऱ्यांकडे चिन्हांकित मतदार यादीची एक प्रत मतदारांनी वर्णानुक्रमे नोंद असलेली एक यादी मतदान केंद्राचा मतदार अनुक्रमांक -----ते मतदान केंद्र क्रमांक तपशील असावा.

( संदर्भ - रानिआ/ मनपा/२०२५/प्र.क्र.३/का-५,दि.२६/०६/२०२५)

# प्रकरण ९.

# सदस्य - अर्हता / अनर्हता

# (Qualifications & Disqualifications for Members)

## १. निवडून येण्यास पात्रता (अर्हता)

**प्रश्न १ नगरपरिषद अथवा नगरपंचायतीचे सदस्य होण्यासाठी कोणती किमान पात्रता असणे आवश्यक आहे?**

**उत्तर** नगरपरिषद अथवा नगरपंचायतीचे सदस्य होण्यासाठी खालील किमान तीन पात्रता असणे आवश्यक आहे.:-

अ) नामनिर्देशनपत्र सादर करण्याकरिता निश्चित करण्यात आलेल्या अंतिम दिनांकास त्या व्यक्तीचे वय २१ वर्षापेक्षा कमी नसावे.

ब) नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या विद्यमान मतदारयादीमध्ये नाव समाविष्ट केलेले असावे.

क) कोणत्याही कायद्याखाली पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास अपात्र ठरविण्यात आले नसावे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५ (१))

**प्रश्न २ एखाद्या व्यक्तीने कोणत्याही नगरपरिषद अथवा नगरपंचायत क्षेत्रामध्ये मतदार म्हणून नाव नोंदणी केलेली नाही, तर ती व्यक्ती नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूक लढवू शकते काय?**

**उत्तर** नाही. ज्या नगरपरिषद अथवा नगरपंचायतीची निवडणूक लढविण्याची आहे, त्या नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या विद्यमान मतदारयादीमध्ये नाव असणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५ (१))

**प्रश्न ३. एखादी व्यक्ती कोणत्याही निवडणुकीच्यावेळी निवडून येण्यासाठी पात्र आहे किंवा कसे हे ठरविण्याचा निर्णायक पुरावा कोणता आहे ?**

**उत्तर** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५ (१) मधील पालिका सदस्य होण्यासाठीच्या पात्रतेस अधिन राहून त्या पालिका क्षेत्राच्या विद्यमान मतदारयादीमधील नाव व इतर तपशील हा निर्णायक पुरावा असेल.

(संदर्भ:- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५ (२))

**प्रश्न ४  राखीव जागेवरील निवडणुकीसाठी उमेदवाराला कोणते पुरावे दयावे लागतील ?**

**उत्तर**  अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेवरील निवडणूक लढविण्यासाठी संबंधित व्यक्तीने नामनिर्देशनपत्राबरोबर सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आणि पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९ (अ))

**प्रश्न ५  स्त्रियांसाठी राखीव असलेल्या जागांवर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागास प्रवर्गातील स्त्री अर्ज सादर करु शकेल काय ?**

**उत्तर**  होय. स्त्रियांसाठी राखीव असलेल्या जागांवर सर्व प्रवर्गातील पात्र स्त्रिया अर्ज सादर करु शकतील. (संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०)

**प्रश्न ६  महाराष्ट्र राज्याबाहेरुन महाराष्ट्रात स्थलांतरीत झालेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचे मागास प्रवर्गातील व्यक्तींना राखीव प्रभागातून निवडणूक लढविता येईल काय ?**

**उत्तर**  अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचे मागास प्रवर्गामधील महाराष्ट्र राज्याबाहेरील ज्या व्यक्ती इतर राज्यातून महाराष्ट्रामध्ये स्थलांतरीत झाल्या आहेत त्या व्यक्तींनी नगरपालिका निवडणुकामध्ये त्या जातीसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून नामनिर्देशनपत्र जरी दाखल केले असले तरी त्यांना निवडणूक लढविता येणार नाही.

(संदर्भ-१. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ मधील नियम ६ आणि राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. रानिआ/२०१०/एसईसी/एमएनसी ११९६/ प्र.क्र. १९६/ का.०३, दिनांक ०७/०२/१९९७)

## २. निवडून येण्यास अपात्रता (अनर्हता)

**प्रश्न १  नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये सदस्याच्या अपात्रतेबाबत कोणत्या कायद्यात तरतूद आहे ?**

**उत्तर-**  नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये सदस्याच्या अपात्रतेबाबतची तरतूद ही महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ मध्ये करण्यात आलेली आहे.

**प्रश्न २  एखाद्या व्यक्तीस राज्य विधानमंडळाने कोणत्याही कायद्याव्दारे अपात्र ठरविले असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकेल काय ?**

**उत्तर**  एखाद्या व्यक्तीस राज्य विधानमंडळाने कोणत्याही कायद्याव्दारे अपात्र ठरविले असेल तर अपात्रतेचा कालावधी संपेपर्यंत ती व्यक्ती नगरपरिषद अथवा नगरपंचायतीची निवडणूक लढवू शकणार नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१)(a१) (ii))

**प्रश्न ३ एखाद्या व्यक्तीला भारतामधील न्यायालयाने अपराधासाठी दोषी / सिध्दापराधी ठरविले असेल आणि तिला दोन वर्षांपेक्षा अधिक कैदेची शिक्षा झालेली असेल तर ती निवडणूक लढवू शकते काय?**

**उत्तर-** एखाद्या व्यक्तीला कोणत्याही कायद्यान्वये अपराधासाठी दोषी ठरविले असेल आणि तिला दोन किंवा अधिक वर्षे कैदेची शिक्षा झाली असेल तर ती व्यक्ती तिची कारावासातून सुटका झाल्यापासून पुढील पाच वर्षांचा कालावधी संपल्याशिवाय निवडणूक लढविण्यास पात्र होवू शकत नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (a))

**प्रश्न ४ जर अशा व्यक्तीला जामीनावर सोडले असेल, तर तिचे अपील निकालात निघेपर्यंत ती व्यक्ती निवडणूक लढवू शकते काय ?**

**उत्तर** जर एखाद्या व्यक्तीला अपराधसिध्दीनंतर जामीनावर सोडले असेल परंतु तिचे अपील निकालात काढण्यासाठी प्रलंबित असेल तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ती व्यक्ती निवडणूक लढविण्यासाठी अपात्र ठरेल. परंतु तिच्या अपराधसिध्दीलाही स्थगिती दिली असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकते.

(संदर्भ- Supreme Court Ruling in Writ Pitition (Civil ) No. ४९० of २००५ Lily Thomas Vs Union of India and WP (Civil) No. २३१ of २००५ Lokprahari through its Genral Secretary S.N. Shukla Vs Union of India)

**प्रश्न ५ एखाद्या व्यक्तीला भारतीय दंड संहितेच्या कलम १५३ - (अ) किंवा कलम ५०५ च्या पोटकलम (२) किंवा (३) मधील अपराधाबद्दल दोषी / सिध्दापराधी ठरविले असेल तर ती निवडणूक लढवू शकते काय ?**

उत्तर एखाद्या व्यक्तीला भारतीय दंड संहितेच्या कलम १५३ - (अ) किंवा कलम ५०५ च्या पोटकलम २) किंवा (३) मधील अपराधाबद्दल दोषी / सिध्दापराधी ठरविले असेल तर ती व्यक्ती अपराधसिध्दीचे तारखेपासून ६ वर्ष कालावधीकरिता (अपात्रतेची मुदत असेपर्यत) निवडणूक लढवू शकत नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (aa) )

**प्रश्न ६ एखाद्या व्यक्तीला अस्पृश्यता अधिनियम १९५५ खालील अपराधाबद्दल दोषी / सिध्दापराधी ठरविले असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकते काय ?**

**उत्तर** एखाद्या व्यक्तीला वर नमूद कायद्यान्वये अपराधासाठी दोषी ठरविले असेल आणि तिला केवळ दंड किंवा कोणत्याही मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल तर ती व्यक्ती अनुक्रमे अपराधसिध्दीच्या

तारखेपासून (Date of Conviction) किंवा तिची कारावासातून सुटका झाल्यापासून पुढील सहा वर्षांचा कालावधी संपल्याशिवाय निवडणूक लढविण्यास पात्र होवू शकत नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (ab))

**प्रश्न ७ एखाद्या व्यक्तीला भारतामधील न्यायालयाने नैतिक अध:पाताचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषी / सिध्दापराधी ठरविले असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकते काय ?**

**उत्तर** एखाद्या व्यक्तीला भारतामधील न्यायालयाने नैतिक अध:पाताचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषी / सिध्दापराधी ठरविले असेल तर ती व्यक्ती अपराध सिध्दीच्या दिनांकापासून ६ वर्षाचा अपात्रतेचा कालावधी संपेपर्यंत निवडणूक लढवू शकणार नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (ac))

**प्रश्न ८ एखाद्या व्यक्तीला महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४२ नुसार पालिका सदस्य पदावरून दूर केले असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकते काय ?**

**उत्तर** एखाद्या व्यक्तीला वरील अधिनियमाच्या कलम ४२ नुसार पालिका सदस्य पदावरून दूर केले असेल तर अशारितीने दूर करण्याच्या तारखेपासून पुढील सहा वर्षाचा कालावधी संपल्याशिवाय ती व्यक्ती निवडणूक लढविण्यास पात्र होवू शकत नाही. परंतु अशारितीने निश्चित होणारा अपात्रतेचा कालावधी हा राज्य शासन आदेशाव्दारे कमी अथवा दूर करू शकते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (b))

**प्रश्न ९ एखाद्या व्यक्तीला महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ५५ (B) नुसार पदावरून काढून टाकण्यात आले असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकते काय ?**

**उत्तर** एखाद्या व्यक्तीला वरील अधिनियमाच्या कलम ५५ (B) नुसार पदावरून काढून टाकण्यात आले असेल तर उक्त तरतूदीनुसारच्या आदेशामध्ये नमूद केलेला अपात्रतेचा कालावधी संपल्याशिवाय ती व्यक्ती निवडणूक लढविण्यास पात्र होवू शकत नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (ba))

**प्रश्न १० एखादी व्यक्ती अमुक्त नादार (Undischarged insolvent) असेल तर ती निवडणूक लढवू शकते काय ?**

**उत्तर** नाही. तथापि, संबंधित व्यक्तीस सक्षम न्यायालयाने अमुक्त नादार (Provincial Insolvency Act,१९२० अन्वये ) म्हणून घोषित केलेले असणे आवश्यक आहे. केवळ आरोप ठेवणे पुरेसे नाही. (संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (c))

**प्रश्न ११ एखादी व्यक्ती विकल मनाची (Unsound mind) असेल तर ती निवडणूक लढवू शकते काय ?**

**उत्तर** नाही.

तथापि, संबंधित व्यक्तीस सक्षम न्यायालयाने विकल मनाची (Indian Lunacy Act,१९१२ अन्वये ) म्हणून घोषित केलेले असणे आवश्यक आहे. केवळ आरोप ठेवणे पुरेसे नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (d))

**प्रश्न १२ एखादी व्यक्ती भारताची नागरिक नसेल तर ती निवडणूक लढवू शकते काय ?**

**उत्तर** नाही. एखाद्या व्यक्तीने स्वेच्छेने परकीय देशाचे नागरिकत्व मिळविले असेल किंवा कोणत्याही परकीय देशाला निष्ठा किंवा इमान देण्यास कोणत्याही कबुलीने बध्द असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकत नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (e))

**प्रश्न १३ एखादी व्यक्ती न्यायाधीश असेल तर ती निवडणूक लढवू शकते काय ?**

**उत्तर** नाही. (संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (f))

**प्रश्न १४ एखाद्या व्यक्तीने शासन अथवा स्थानिक प्राधिकरणामध्ये कोणतेही लाभाचे पद धारण केले असेल तर ती निवडणूक लढवू शकेल काय ?**

**उत्तर** नाही. एखाद्या व्यक्तीने शासन अथवा स्थानिक प्राधिकरणामध्ये लाभाचे पद धारण केले असेल तर त्या व्यक्तीस निवडणूक लढविता येत नाही. अशावेळी सदर व्यक्तीची पात्रता खालील कसोटीवर तपासणे आवश्यक आहे.

अ) ज्या पदावरील नियुक्ती शासनाने केली असेल

ब) धारकास त्या पदावरून काढून अथवा निलंबित करण्याचा अधिकार शासनास असेल

क) त्यासाठी वेतन / मोबदला दिला जात असेल

ड) त्या पदाची कार्ये ही शासनाकडून नियंत्रित केली जात असतील

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (g))

**प्रश्न १५ एखाद्या व्यक्तीने शासन अथवा स्थानिक प्राधिकरणामध्ये कोणतेही लाभाचे पद धारण केले असून तिला गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकेल काय ?**

**उत्तर** अशा व्यक्तीस जर गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असेल आणि तिच्या बडतर्फीपासून पाच वर्षाचा कालावधी लोटलेला नसेल तर ती व्यक्ती निवडणूक लढविण्यास पात्र होवू शकत नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१)(ga))

**प्रश्न १६ एखाद्या व्यक्तीकडे नगरपालिकेची थकबाकी असेल तर ती निवडणूक लढवू शकेल काय ?**

**उत्तर** नगरपालिकेस देय असलेल्या कोणत्याही रक्कमेबद्दल कलम १५० अन्वये एखाद्या व्यक्तीस बिल देण्यात आले असेल आणि त्या बिलाची रक्कम विहीत मुदतीमध्ये भरण्यास कसूर करेल तर ती व्यक्ती निवडणूक लढविण्यास पात्र होवू शकत नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (h) आणि आण्णासाहेब राजमाने विरूध्द टी. के. कांबळे, १९७१ महाराष्ट्र लॉ जर्नल ७४९ )

**प्रश्न १७ एखाद्या व्यक्तीने लेखापरिक्षा आक्षेपानुसार देय असलेली रक्कम दिली नसेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकेल काय ?**

**उत्तर** एखाद्या व्यक्तीने नगरपालिकेच्या लेखापरिक्षा आक्षेपानुसार निश्चित करण्यात आलेल्या भार-अधिभारानुसार देय असलेली कोणतीही रक्कम दिली नसेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकत नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६- (१)(ha))

**प्रश्न १८ एखादी व्यक्ती नगरपरिषद अथवा नगरपंचायतीची कंत्राटदार असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकेल काय ?**

**उत्तर** एखाद्या व्यक्तीने स्वता किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंधाव्दारे धंदा किंवा व्यवसाय करताना नगरपरिषद अथवा नगरपंचायतीला माल पुरविण्यासाठी किंवा नगरपरिषद अथवा नगरपंचायतीने हाती घेतलेली कोणतीही कामे पार पाडण्यासाठी केलेला कोणताही करार जोपर्यंत अस्तित्वात असेल तोपर्यंत ती व्यक्ती निवडणूक लढविण्यास अपात्र ठरेल. तथापि, त्या कोणत्याही करारामधील भाग त्या व्यक्तीने पूर्ण केलेला असेल आणि नगरपरिषद अथवा नगरपंचायतीने तिचा भाग पूर्णपणे किंवा अंशत: पार पाडलेला नसेल तर तो करार अस्तित्वात नाही असे मानण्यात येईल आणि ती व्यक्ती निवडणूक लढविण्यास पात्र ठरू शकेल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (i))

**प्रश्न १९ नगरपरिषदेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास दिलेल्या किंवा त्याच्याकडून घेतलेल्या कोणत्याही कर्जाऊ रक्कमेच्या व्यवहारामध्ये एखाद्या व्यक्तीचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हितसंबंध असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढविण्यासाठी पात्र ठरेल काय ?**

**उत्तर** नाही. (संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) ( j ))

**प्रश्न २० एखाद्या व्यक्तीस दोनपेक्षा अधिक मुले असतील तर ती निवडणूक लढवू शकेल काय ?**

**उत्तर** दि.१२ सप्टेंबर २००१ नंतर झालेल्या मुलांमुळे एकूण अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक झाल्यास अथवा आधीच दोन पेक्षा अधिक असलेल्या अपत्यांच्या संख्येत दि.१२ सप्टेंबर २००१ नंतर भर पडल्यास अशी व्यक्ती नगरपालिकेची निवडणूक लढविण्यास अपात्र असेल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम (१) (k))

| **जन्मलेल्या मुलांची संख्या** | | | **एकूण मुलांची संख्या** | **निवडणूक लढविण्यास पात्र किंवा अपात्र** |
|---|---|---|---|---|
| **१३ सप्टेंबर, २००० पूर्वी** | **१३ सप्टेंबर, २००० ते १२ सप्टेंबर, २००१ या कालावधीमध्ये** | **१२ सप्टेंबर, २००१ नंतर** | | |
| ३ | निरंक | निरंक | ३ | पात्र |
| ३ | १ किंवा २ | निरंक | ४ किंवा ५ | पात्र |
| २ | १ | निरंक | ३ | पात्र |
| २ | निरंक | १ | ३ | अपात्र |
| २ | १ | १ | ४ | अपात्र |
| १ | निरंक | जुळे अथवा त्यापेक्षा जास्त | ३ किंवा त्यापेक्षा जास्त | पात्र |
| १ | १ | १ | ३ | अपात्र |
| १ | निरंक | १ | २ | पात्र |
| निरंक | निरंक | ३ (सिंगल बर्थ) | ३ | अपात्र |
| निरंक | निरंक | १+जुळे | ३ | पात्र |
| निरंक | निरंक | २ | २ | पात्र |
| निरंक | १ | २ (जुळे नाही) | ३ | अपात्र |
| निरंक | जुळे | १ | ३ | अपात्र |
| निरंक | २ (सिंगल बर्थ) | १ | ३ | अपात्र |
| निरंक | १ | १ | २ | पात्र |

**प्रश्न २१ एका व्यक्तीस दिनांक १२ सप्टेंबर, २००१ रोजी अथवा त्यानंतर तीन मुले होती. नंतर त्यापैकी एक मूल त्याने दत्तक दिले आहे. परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी त्या व्यक्तीकडे दोन मुले असतील तर ती निवडणूक लढवू शकेल काय ?**

**उत्तर** नाही. दिनांक १२ सप्टेंबर, २००१ रोजी अथवा त्यानंतर व्यक्तीस तिसरे मूल झाले असेल तर त्याच दिवशी ती व्यक्ती निवडणूक लढविण्यास अपात्र ठरते. तसेच मूल जरी दत्तक दिले असले तरी त्या मुलाचे पालकत्व हे त्याच्या नैसर्गिक पालकांकडे (Biological Parents) गृहीत धरले जाते. (संदर्भ- सुलेमान अब्बास चिरागली हैदर विरूध्द प्रमोद नंदलाल यादव आणि इतर, २००८ (१) Bom CR ८८७: २००७(५) All MR २५५)

**प्रश्न २२ एखाद्या व्यक्तीस राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक खर्चाचा हिशेबाच्या मुद्यावरून अपात्र ठरविले असेल तर ती व्यक्ती पुन्हा निवडणूक लढवू शकेल काय ?**

**उत्तर** राज्य निवडणूक आयोगाने राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे ती व्यक्ती अनर्ह असल्याचे घोषित केल्यास अशी व्यक्ती अशा आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीकरिता नगरपालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा निवडणूक लढविण्यास अनर्ह असेल अशी तरतूद आहे. उक्त तरतुदीनुसार अनर्हतेचा कालावधी संपल्यानंतर अशी व्यक्ती पुन्हा निवडणूक लढवू शकेल. (संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१- D))

**प्रश्न २३ एखाद्या व्यक्तीस भारत निवडणूक आयोगाने निवडणूक खर्चाचा हिशेबाच्या मुद्यावरून अपात्र ठरविले असेल तर ती व्यक्ती पुन्हा नगरपालिकेची निवडणूक लढवू शकेल काय ?**

**उत्तर** नाही. एखाद्या व्यक्तीस भारत निवडणूक आयोगाने निवडणूक खर्चाच्या हिशेबाच्या मुद्यावरून आदेश पारीत करून अपात्र ठरविले असेल तर अपात्रतेचा कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून सूरू होतो आणि आदेशामध्ये नमूद केलेल्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहतो. त्यामुळे या अपात्रतेच्या कालावधीदरम्यान संबंधित व्यक्ती नगरपालिकेची निवडणूक लढवू शकत नाही. (संदर्भ-विद्याधर विनायक मथाने विरूध्द महाराष्ट्र शासन आणि इतर, २००४ (३) Mh LJ ३२८)

**प्रश्न २४ राखीव जागेवरील निवडणुकीबाबत जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास निवडणूक लढविता येईल काय?**

उत्तर नाही. राखीव जागेवरील निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्राबरोबर सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आणि पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र यांची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे. तसेच छाननीच्या वेळी यांची मूळप्रत सादर करणे बंधनकारक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९ (अ))

**प्रश्न २५ खाजगी अनुदानित शैक्षणिक संस्थेतील शिक्षक / कर्मचारी यांना निवडणूक लढविता येईल काय?**

**उत्तर** होय.

**प्रश्न २६ पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका यांना निवडणूक लढविता येईल काय ?**

**उत्तर** नाही.

**प्रश्न २७ स्थानिक स्वराज्य संस्थेचे कर्मचारी / शिक्षक यांना निवडणूक लढविता येईल काय ?**

**उत्तर** नाही.

**प्रश्न २८ परकीय राष्ट्राचे नागरिकत्व संपादन केलेली व्यक्ती स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढवू शकेल काय?**

**उत्तर** नाही.

**प्रश्न २९ एखादी व्यक्ती राज्य विधानमंडळ अथवा संसदेची सदस्य असेल तर ती नगरपरिषद अथवा नगरपंचायतीची सदस्य होऊ शकेल काय ?**

**उत्तर** नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (I))

# प्रकरण १०.

# नामनिर्देशन प्रक्रिया

# (Nomination Process)

## १. निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करणे

**प्रश्न १ नगरपरिषदा किंवा नगरपंचायतीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याचा अधिकार कोणास आहे?**

उत्तर राज्य निवडणूक आयोग हे निवडणुकीचा कार्यक्रम निश्चित करतात आणि आयोगाने प्रदान केलेल्या नियम ४ मधील अधिकारान्वये जिल्हाधिकारी हे निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४ आणि राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ-१०९४/१६४/१९९४, दिनांक २९/११/१९९४)

**प्रश्न २ निवडणूक कार्यक्रमातील प्रमुख / महत्वाचे टप्पे कोणते ?**

उत्तर नामनिर्देशनपत्र दाखल करणे, छाननी, उमेदवारी मागे घेणे, चिन्ह वाटप, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे, मतदान आणि मतमोजणी हे निवडणूक कार्यक्रमातील महत्वाचे टप्पे आहेत.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४)

**प्रश्न ३ नमुना-१ मधील नगरपरिषदा किंवा नगरपंचायतीचा निवडणूक कार्यक्रम कशा रितीने व कोठे प्रसिध्द केला जातो?**

उत्तर नगरपरिषद किंवा नगरपंचायतीचा निवडणूक कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येतो:-

१. जिल्हाधिकारी, तहसिलदार, नगरपरिषद किंवा नगरपंचायतीच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर निवडणुकीची सूचना प्रसिध्द करुन
२. नगरपरिषद किंवा नगरपंचायतीच्या कार्यक्षेत्रात वितरीत होणाऱ्या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये निवडणुकीची सूचना प्रसिध्द करुन

३. नगरपरिषद किंवा नगरपंचायतीच्या कार्यक्षेत्रामधील महत्वाच्या प्रमुख ठिकाणी जाहीर सूचना (Public Notice) प्रसिध्द करुन

४. दवंडी देऊन किंवा इ. योग्य अशा पध्दतीने विस्तृत प्रसिध्दीव्दारे
(संदर्भ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्यगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३२६ आणि महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४ (२))

**प्रश्न ४ निवडणूक कार्यक्रमात कोणकोणत्या कारणास्तव बदल होऊ शकतो व असा बदल करण्याचे अधिकार कोणास आहेत ?**

उत्तर अ) नामनिर्देशनपत्र स्विकारणे किंवा नाकारणे याविरूध्द दाखल केलेल्या अपीलामध्ये निर्णय झाल्यापासून तीन दिवसापर्यंत माघारीचा कालावधी हा वाढविण्यात येतो. परंतु या वाढविलेल्या कालावधीमधील शेवटचा दिवस म्हणजेच माघारीचा शेवटचा दिवस आणि मतदानाचा दिवस यामध्ये आठ दिवसांपेक्षा कमी कालावधी रहात असेल तर मतदान आणि आवश्यकतेनुसार मतमोजणी यांच्या तारखामध्ये बदल करण्यात येतो. अशारितीने निवडणूक कार्यक्रमामध्ये बदल करण्याचा अधिकार राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या शक्तीनुसार जिल्हाधिकारी यांना आहे. तथापि, जिल्हाधिकारी हा अधिकार राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार वापरतात.

ब) निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यानंतर राष्ट्रीय किंवा राज्य दुखवटा जाहीर झाल्यास निवडणूक कार्यक्रमामध्ये बदल होऊ शकतो व असा बदल करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्यांच्याव्दारे प्राधिकृत अधिकारी यांना आहेत.

क ) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचा मृत्यु झाल्यास, तसेच सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे असे जिल्हाधिकाऱ्याचे मत होईल त्याबाबतीत त्यास,त्या सार्वजिनक प्रयोजनाशी संबंधित कारणाची आदेशात नोंद करुन,राज्य निवडणूक आयोग त्या बाबतीत देईल अशा निर्देशाच्या अधिन राहून निवडणूक कार्यक्रमात बदल करता येईल.

ड ) मतदानाच्या दिवशी कोणत्याही मतदान केंद्रावर दंग्यामुळे किंवा उघड हिंसाचारामुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे मतदान घेणे शक्य नसल्यामुळे अशा मतदान केंद्राचा मतदान केंद्राध्यक्ष मतदान तहकुब करेल व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास अहवाल सादर करेल.स्थगित करण्यात आलेले मतदान राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पुर्ण केले जाई पर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणी करणार नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४(२), ४अ, २३ आणि ४६ )

**प्रश्न ५ राष्ट्रीय किंवा राज्य दुखवट्याच्या कालावधीचा निवडणूक कार्यक्रमावर काय परिणाम होतो ?**

उत्तर राष्ट्रीय किंवा राज्य दुखवट्याच्या कालावधीचा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक कार्यक्रमामध्ये राज्य निवडणूक आयोग किंवा त्यांच्याव्दारे प्राधिकृत अधिकाऱ्याव्दारे खालीलप्रमाणे बदल करण्यात येतात. :-

अ नामनिर्देशनपत्र दाखल करावयाचा अंतिम दिनांक राष्ट्रीय किंवा राज्य दुखवटयाच्या कालावधित येत असेल तर राज्य निवडणूक आयोग त्यामध्ये बदल करुन दुखवटा कालावधी नंतर निवडणुकीच्या विविध टप्प्यासाठींचा निवडणूक कार्यक्रम सुधारीत करण्यात येतो.

ब. राष्ट्रीय किंवा राज्य दुखवटा हा छाननीच्या दिनांकास किंवा उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिनांकास सुरु होत असल्यास त्यामध्ये बदल करण्यात येत नाही. परंतु निवडणूक कार्यक्रमातील त्यानंतरचे टप्पे हे दुखवटा कालावधी संपल्यानंतर सुरु होतील या दृष्टीने आवश्यक बदल करण्यात येतात.

क. राष्ट्रीय किंवा राज्य दुखवटा हा मतदान किंवा मतमोजणीच्या दिवशी सुरु होत असल्यास आणि मतदान किंवा मतमोजणी सुरु झाली असल्यास निवडणूक कार्यक्रमामध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही. परंतु त्या व्यतिरिक्त इतर वेळी निवडणुकीतील उर्वरित टप्पे हे दुखवटा कालावधी संपल्यानंतर सुरु होतील अशाप्रकारे निवडणूक कार्यक्रमामध्ये बदल करण्यात येतात.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६ चा नियम ४ - अ)

## २. निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती व कर्तव्य

**प्रश्न १ नगरपालिका / नगरपंचायत निवडणूकीसाठी निवडणूक अधिकारी कोण असतात ?**

उत्तर नगरपालिका / नगरपंचायत निवडणूकीसाठी जिल्हाधिकारी हे निवडणूक अधिकारी असतात.

**प्रश्न २ निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती कोण करतात ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार जिल्हाधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५ आणि राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ-१०९४/१६४/१९९४, दिनांक २९/११/१९९४)

**प्रश्न ३ कोणत्या संवर्गातील अधिकाऱ्यांना निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येते?**

**उत्तर** नगरपालिका निवडणुकीकरिता सर्वसाधारणपणे उपजिल्हाधिकारी संवर्गामधील किंवा त्यांच्या समकक्ष अधिकाऱ्यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५(१) आणि राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/मनपा /२०११/प्र.क्र. १६/का ०५ दिनांक १२/११/२०११)

**प्रश्न ४ निवडणूक निर्णय अधिकारी यांची प्रमुख कर्तव्ये काय आहेत?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधित अधिनियम व त्याखालील निवडणूक नियमामधील तरतुदीनुसार तसेच राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेले आदेश, सूचना, परिपत्रके या नुसार निवडणुकीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याची प्रमुख जबाबदारी असते.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ७)

**प्रश्न ५ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची प्रमुख कर्तव्ये काय आहेत ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नियंत्रणाखाली छाननीचे कामकाज वगळता अन्य सर्व निवडणुकीचे कामकाज स्वतंत्ररित्या पार पाडण्यास सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी हे सक्षम आहेत. तसेच कोणत्याही अपरिहार्य परिस्थितीमुळे निवडणूक निर्णय अधिकारी हे छाननीचे काम करण्यास असमर्थ असतील तर सदरचे कामकाज हे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पार पाडू शकतात. मात्र त्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांना लेखी प्राधिकृत करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५)

## ३. नामनिर्देशनपत्राचा नमुना व सोबत सादर करावयाची सहपत्रे / शपथपत्रे

**प्रश्न १ नगरपालिका / नगरपंचायत निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्राचा नमुना उपलब्ध करुन देण्यात येतो काय व त्याचे शुल्क आकारण्यात येते काय ?**

उत्तर होय. त्यावेळी अस्तित्वात असलेल्या सूचनेनुसार शुल्क आकारण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १२ (२))

**प्रश्न २ नामनिर्देशनपत्रातील भाग एक मधील उमेदवाराने करावयाचे घोषणापत्र स्वाक्षरीत न केल्यास, त्याचा काय परिणाम होवू शकतो ?**

उत्तर उमेदवाराने नामनिर्देशनपत्रामधील करावयाचे भाग एक मधील घोषणपत्र स्वाक्षरीत न केल्यास छाननी दरम्यान सदर नामनिर्देशनपत्र फेटाळले जाईल.

**प्रश्न ३ नगरपालिका निवडणूकीसाठी नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने कोणती शपथपत्रे / कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे ?**

उत्तर नगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत खालील शपथपत्रे/कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे:-

१. राज्य निवडणूक आयोगाने दि.१५ मार्च २००४ रोजीच्या आदेशान्वये विहित केलेले. मातमत्ता, दायित्व आणि गुन्हेगारी संदर्भातील परिशिष्ट-एक मधील शपथपत्र.

२. राज्य निवडणूक आयोगाने दि. ३१ मार्च २००९ रोजीच्या पत्रान्वये विहित केलेले अपत्यासंदर्भातील शपथपत्र.

३. जोडपत्र-एक आणि जोडपत्र-दोन (फक्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांकरिता)

४. मतदारयादीची प्रमाणित प्रत (उमेदवार त्याच नगरपालिकेच्या अन्य प्रभागातील मतदार असेल तर)

५. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आणि पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र यांची सत्यप्रत अथवा जात वैधता प्रमाणत्र देण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा पडताळणी समितीकडे अर्ज केला असल्याबाबतचा अन्य कोणताही पुरावा आणि व्यक्ती निवडून आल्याच्या दिनांकापासून १२ महिण्याच्या मुदतीत पडताळणी समिती ने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबतचे हमीपत्र (उमेदवार राखीव जागेवरील निवडणूक लढवित असेल तर).

**प्रश्न ४ उमेदवारास ज्या प्रभागामधून निवडणूक लढविण्याची आहे, त्या प्रभागाच्या मतदारयादीमध्ये मतदार म्हणून नाव असणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर नाही. उमेदवार ज्या नगरपालिकेची निवडणूक लढवू इच्छितो त्या नगरपालिकेच्या विहित दिनांकास प्रसिध्द करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये त्याचे नाव समाविष्ट असणे बंधनकारक आहे. तसेच उमेदवाराचे नाव ज्या प्रभाग मतदारयादीमध्ये आहे त्या भागाची प्रमाणित प्रत नामनिर्देशनपत्राबरोबर सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १२)

**प्रश्न ५ नामनिर्देशनपत्रामधील निवडणूक चिन्हांच्या निवडीबाबतचे घोषणापत्र उमेदवाराने स्वाक्षरीत न केल्यास, छाननीवेळी नामनिर्देशनपत्र नामंजूर होऊ शकते काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ६ नामनिर्देशनपत्र लेखी स्वरूपामध्ये आणि विहित नमुन्यामध्ये सादर करणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय. तोंडी नामनिर्देशन करण्याची तरतूद नाही. आयोगाने / विहित केलेल्या नमुन्यामध्ये नामनिर्देशनपत्र असले पाहिजे. जर अधिकृत छापील नमुने उपलब्ध नसतील किंवा मिळवता आले नाहीत तर खाजगीरित्या छापलेले, टंकलिखित, चक्रमुद्रीत, हस्तलिखीत नमुनाही वापरता येईल. परंतू ते आयोगाने विहित केलेल्या नमुन्यानुसार असले पाहिजेत.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १२ आणि राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. रानिआ/मनपा/२०११/ प्र.क्र. ८/का.०५, दिनांक २०/०९/२०११)

**प्रश्न ७ नामनिर्देशनपत्रासोबत पोलीसांचे वर्तणूक प्रमाणपत्र अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेचे नादेय प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर नाही.

परंतु नगरपालिकेस देय असलेल्या कोणत्याही रक्कमेत बद्दल नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम१९६५ च्या कलम १६ (हा) व १६(ह-अ) प्रमाणे पडताळणी करीता आवश्यक आहे.

**प्रश्न ८ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये विवाहित महिला उमेदवारांच्या नामनिर्देशित पत्र व मतपत्रिकेवरील नावाबाबत.**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.०१/का-६, दि. १३/०३/२०२५ नुसार निवडणूक लढविणाऱ्या विवाहित महिलांच्या बाबतीत नामनिर्देशनपत्र तसेच मतपत्रिकेवर नाव कशा प्रकारे असावे बाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

## ४. राखीव प्रभागातील उमेदवारांनी सादर करावयाचे प्रमाणपत्र

**प्रश्न १ नागरिकांचा मागास प्रवर्ग म्हणजे काय ?**

उत्तर नागरिकांचा मागास प्रवर्ग याचा अर्थ, राज्य शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती म्हणून घोषित केलेले असे वर्ग किंवा अशा वर्गांचे भाग अथवा त्यामधील गट असा होतो.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम कलम २ (१अ) )

**प्रश्न २ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्याकरीता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत जातीच्या पुराव्याबाबत कोणती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे ?**

उत्तर सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आणि पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र यांची सत्यप्रत अथवा जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा पडताळणी समितीकडे अर्ज केला असल्याबाबतचा अन्य कोणताही पुरावा आणि व्यक्ती निवडून आल्याच्या दिनांकापासून १२ महिण्याच्या मुदतीत पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबतचे हमीपत्र.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम कलम ९ अ)

**प्रश्न ३ निवडणुकीसाठी इच्छूक उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र कधी मिळविणे अपेक्षित आहे?**

उत्तर निवडणुकीसाठी इच्छूक उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र नामनिर्देशनपत्र दाखल करण्यापूर्वी मिळविणे आवश्यक आहे.

**प्रश्न ४ निवडणुकीसाठी जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाने कोणास प्राधिकृत केले आहे ?**

उत्तर अनुसूचित जमाती वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाने आदिवासी विकास विभागामार्फत स्थापन केलेल्या पडताळणी समितीस आणि अनुसूचित जाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग अंतर्गत जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी, शासनाने सामाजिक न्याय विभागामार्फत स्थापन केलेल्या पडताळणी समितीस प्राधिकृत केले आहे.

**प्रश्न ५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशपत्राच्या छाननीच्या वेळी मूळ जाती प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे काय?**

उत्तर होय.

सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आणि पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र यांची सत्यप्रत अथवा जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा पडताळणी समितीकडे अर्ज केला असल्याबाबतचा अन्य कोणताही पुरावा आणि व्यक्ती निवडून आल्याच्या दिनांकापासून १२ महिण्याच्या मुदतीत पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबतचे हमीपत्र.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम कलम ९ अ)

**प्रश्न ६ नामनिर्देशनपत्रामध्ये असलेले भाग दोन मधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांच्या मागास प्रवर्गातील उमेदवाराने करावयाचे प्रतिज्ञापत्र स्वाक्षरीत न केल्यास काय परिणाम होवू शकतो ?**

उत्तर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरिता राखीव जागेवरून निवडणूक लढविण्यासाठी उमेदवाराने नामनिर्देशनपत्रामध्ये भाग दोन मधील करावयाचे प्रतिज्ञापत्र स्वाक्षरीत न केल्यास असा उमेदवार राखीव जागेवरून निवडणूक लढविण्यास पात्र आहे असे मानण्यात येत नाही. अशा उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये नामंजूर करण्यात येईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १२ (४) )

**प्रश्न ७ राखीव प्रवर्गातील उमेदवार खुल्या जागेवरील निवडणूक लढवू शकतो काय ?**

उत्तर होय. खुल्या जागेवरून सर्व प्रवर्गातील पात्र उमेदवार निवडणूक लढवू शकतात.

**प्रश्न ८ एखाद्या व्यक्तीकडे महाराष्ट्र राज्याव्यतिरिक्त अन्य राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र असेल तर त्या व्यक्तीस महाराष्ट्र राज्यामधील स्थानिक स्वराज्य संस्थेची त्या प्रवर्गाकरिता आरक्षित असलेल्या जागेवरून निवडणूक लढविता येईल काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ९ जातीचे प्रमाणपत्र व जातीचे वैधता प्रमाणपत्र यामध्ये कोणता फरक आहे ?**

उत्तर महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याचे पडताळणीचे विनियम) अधिनियम २००० च्या तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याने म्हणजेच उपजिल्हाधिकारी किंवा त्यापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या अधिकाऱ्याने दिलेले तसेच दिनांक ०६ जून १९९६ पूर्वी शासनाने वेळोवेळी सक्षम प्राधिकारी म्हणून प्राधिकृत केलेले तहसिलदार व नायब तहसिलदार यांनी दिलेले प्रमाणपत्र म्हणजेच जात प्रमाणपत्र आणि सदर प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले प्रमाणपत्र म्हणजे जात-वैधता प्रमाणपत्र होय.

**प्रश्न १० अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांचेसाठी राखीव जागा नेमून देणे व त्यांचा आळीपाळीने क्रम कसा देता येईल?**

उत्तर अधिनियमाचे कलम ९ च्या तरतुदींना अधिन राहून अनुसूचित जाती, अनुसूचित जामाती यांचेसाठी राखीव जागा ह्या ज्या प्रभागातील लोकसंख्येची टक्केवारी सर्वात जास्त असेल अशा प्रभागापासून सुरुवात करुन उतरत्या क्रमाने वाटून देण्यात येते.जागांची संख्या मोजतांना जागेचा अर्धा भाग किंवा त्यापेक्षा अधिक भाग हा एक जागा मोजण्यात येईल तर अर्ध्या भागापेक्षा कमी भाग अपूर्णांक म्हणून सोडला जाईल.

( संदर्भ-महाराष्ट्र नगर पालिका निवडणूक नियम १९६६ चे कलम ३ अ (१))

**प्रश्न ११ ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती अनुसूचित जमाती , नागरिकांच्या मागासवर्ग किंवा महिलांकरीता जागा राखून ठेवली असेल तर त्यांनी नामनिर्देशन पत्रासोबत जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे काय?**

उत्तर अशा प्रभागांच्या बाबतीत विशिष्ट अनुसूचित जाती, जमातीचा किंवा नागरिकांच्या मागासवर्गांचा सदस्य किंवा महिला उमेदवार असलेल्या उमेदवाराने ती जात किंवा जमात निर्दिष्ट करणारे प्रतिज्ञापत्र नामनिर्देशपत्रासोबत समाविष्ट केलेले नसेल तर असा उमेदवार ती राखीव जागा भरण्यासाठी निवडला जाण्यास पात्र आहे असे मानण्यात येणार नाही.

( संदर्भ-महाराष्ट्र नगर पालिका निवडणूक नियम १९६६ चे कलम १२ (४)

## ५. <u>अपत्य व दायीत्व, गुन्हेगारी पार्श्वभूमीचे शपथपत्र</u>

**प्रश्न १ नामनिर्देशनपत्रासोबत अपत्याबाबतचे शपथपत्र जोडणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय. नामनिर्देशनपत्रासोबत अपत्याबाबतचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. एसईसी/ जीईएन/२००१/ प्र.क्र. २९/का.१०, दि.३१/०३/२००९)

**प्रश्न २ शपथपत्रावर साक्षांकन करण्यास सक्षम प्राधिकारी कोण असतात?**

उत्तर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (First Class Magistrate), ओथ कमिशनर, नोटरी पब्लिक आणि उपविभागीय दंडाधिकारी व तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी (Executive Magistrate) हे साक्षांकन करण्यास सक्षम आहेत.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. एसईसी/ जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का.१०, दि.३१/०३/२००९)

**प्रश्न ३ अपूर्ण व अर्धवट माहितीचे शपथपत्र स्विकारता येते काय ?**

उत्तर नामनिर्देशनपत्रासोबत अपूर्ण व अर्धवट माहितीचे शपथपत्र सादर केल्यास, ज्या रकान्यामधील माहिती अपूर्ण आहे त्या रकान्यामधील माहितीसह पुन्हा नव्याने शपथपत्र छाननीच्या वेळेपूर्वी सादर करण्याची लेखी नोटीस निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून संबंधित उमेदवारास देण्यात येते आणि त्याची पूर्तता संबंधित उमेदवाराने मुदतीमध्ये न केल्यास, छाननीमध्ये त्याचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात येते.

**प्रश्न ४ शपथपत्रातील तपशिलाबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे इतर उमेदवार आक्षेप घेऊ शकतात काय?**

उत्तर शपथपत्रातील तपशिलाबाबत इतर उमेदवार आक्षेप घेऊ शकतील. तथापि, इतर उमेदवारांना स्वत: केलेल्या शपथपत्राव्दारे किंवा घोषणापत्राव्दारे परस्पर विरोधी माहिती सादर करण्याच्या सूचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून देण्यात येतील. परंतु शपथपत्रातील तपशीलाची सत्यता पडताळणी करण्याचे अधिकार निवडणूक निर्णय अधिकारी यांना नाहीत.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र ५/कार्या.०५,दि.१५/०३/२००४)

**प्रश्न ५ दिनांक १३ सप्टेंबर, २००० रोजी अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढविण्यासाठी अपात्र ठरेल काय ?**

उत्तर नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदयोगीक नगरी अधिनियम कलम १६ आणि राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र.एसईसी/ जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का.१०, दि. ३१/०३/२००९ )

**प्रश्न ६ दिनांक १३ सप्टेंबर, २००० ते दिनांक १२ सप्टेंबर, २००१ या एक वर्षाच्या कालावधीमध्ये एकाच प्रसुतीमध्ये जन्माला आलेले एक अपत्य किंवा एकापेक्षा अधिक अपत्ये यामुळे व्यक्तीच्या एकूण अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक होत असल्यास, ती व्यक्ती निवडणूक लढविण्यासाठी अपात्र ठरेल काय?**

उत्तर नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम कलम १६ आणि राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. एसईसी/ जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का.१०, दि. ३१/०३/२००९ )

**प्रश्न ७ १२ सप्टेंबर, २००१ नंतर झालेल्या अपत्यामुळे एकूण अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक झाल्यास अथवा आधीच दोनपेक्षा अधिक असलेल्या अपत्यांच्या संख्येत दिनांक १२ सप्टेंबर, २००१ नंतर भर पडल्यास अशी व्यक्ती निवडणूक लढविण्यासाठी पात्र ठरेल काय?**

उत्तर नाही. सदर व्यक्ती निवडणूक लढविण्यास अपात्र ठरेल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम कलम १६ आणि राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. एसईसी/ जीईएन/२००१/ प्र.क्र. २९/का.१०, दि.३१/०३/२००९ )

**प्रश्न ८ मूल या संज्ञेमध्ये दत्तक असलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होतो काय ?**

उत्तर नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम कलम १६ आणि राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का.१०, दि. ३१/०३/२००९ )

**प्रश्न ९  दोनपेक्षा अधिक अपत्ये या मुद्यावर एखादी व्यक्ती अपात्र ठरते किंवा कसे हे निवडणूक निर्णय अधिकारी कसे ठरवितात ?**

उत्तर याविषयी निवडणूक निर्णय अधिकारी यांना निर्णय घेणे सुलभ व्हावे या हेतूने राज्य निवडणूक आयोगाने अपत्याबाबतचे शपथपत्र विहीत केले आहे. कोणत्याही नगरपालिकेची निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीस नामनिर्देशनपत्रासोबत विहीत केलेले शपथपत्र सादर करणे बंधनकारक आहे.  या शपथपत्रामधील तपशीलाच्याआधारे निवडणूक निर्णय अधिकारी अपात्रतेबाबत निर्णय करतात.

१२ सप्टेंबर, २००१ नंतर झालेल्या अपत्यामुळे एकूण अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक झाल्यास अथवा आधीच दोनपेक्षा अधिक असलेल्या अपत्यांच्या संख्येत दिनांक १२ सप्टेंबर,  २००१ नंतर भर पडल्यास अशी व्यक्ती निवडणूक लढविण्यासाठी अपात्र ठरते.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. एसईसी/ जीईएन/२००१/ प्र.क्र. २९/का.१०, दिनांक ३१/०३/२००९ आणि सूलेमान अब्बास चिरागअली हैदर विरूध्द प्रमोद नंदलाल यादव व इतर, २००८ (१) Bom CR ८८७: २००७ (५) All MR २५५)

**प्रश्न १०  अपत्याच्या संदर्भातील  विहित केलेले शपथपत्र किती रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर व कोणासमोर केलेले आणि कधीपर्यंत सादर करणे आवश्यक आहे?**

उत्तर अपत्याच्या संदर्भातील विहित केलेले शपथपत्र हे स्टँप पेपरवर सादर करणे आवश्यक नाही. असे शपथपत्र साध्या कागदावर केले तरी स्विकारण्यात येते. तसेच असे शपथपत्र प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (First Class Magistrate ), ओथ कमिशनर, नोटरी पब्लिक आणि उपविभागीय दंडाधिकारी व तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी (Executive Magistrate) यांचेसमोर केलेले आणि ते नामनिर्देशनपत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. एसईसी/ जीईएन/२००१/प्र.क्र. २९/का.१०, दिनांक ३१/०३/२००९ आणि राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दिनांक ५ जानेवारी २०१५)

**प्रश्न ११ अपत्याच्या संदर्भातील विहित केलेले शपथपत्र दिलेल्या मुदतीमध्ये सादर न केल्यास त्याचा काय परिणाम होऊ शकतो ?**

उत्तर अपत्याच्या संदर्भातील विहित केलेले शपथपत्र दिलेल्या मुदतीमध्ये सादर न केल्यास छाननीमध्ये सदर उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र नामंजूर होईल.

**प्रश्न १२ गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबतच्या शपथपत्रामध्ये संपत्ती / मालमत्ता व गुन्हयांचे संदर्भात संपूर्ण तपशील देणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय. गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबतच्या शपथपत्रामध्ये संपत्ती / मालमत्ता व गुन्हयांचे संदर्भात संपूर्ण तपशील देणे आवश्यक आहे. तथापि, नामनिर्देशनपत्रासोबत अपूर्ण व अर्धवट माहितीचे शपथपत्र सादर केल्यास, ज्या रकान्यामधील माहिती अपूर्ण आहे त्या रकान्यामधील माहितीसह पुन्हा नव्याने शपथपत्र छाननीच्या वेळेपूर्वी सादर करण्याची लेखी नोटीस निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून संबंधित उमेदवारास देण्यात येते आणि त्याची पूर्तता संबंधित उमेदवाराने मुदतीमध्ये न केल्यास, छाननीमध्ये त्याचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात येते.

**प्रश्न १३ गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबत विहित केलेले शपथपत्र व त्यासोबतचे प्रपत्र याव्यतिरिक्त अपत्याच्या संदर्भातील विहित केलेले शपथपत्र सादर करावयाचे आहे काय?**

उत्तर होय. (संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. एसईसी/ जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का.१०, दि.३१/०३/२००९)

**प्रश्न १४ अपराधसिध्दी या मुद्यावर एखादी व्यक्ती अपात्र ठरते किंवा कसे हे निवडणूक निर्णय अधिकारी कसे ठरवितात ?**

उत्तर उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत सादर केलेल्या शपथपत्रामध्ये त्याच्या विरुध्द दाखल असलेले गुन्हे व त्यामध्ये न्यायालयाने दिलेले निर्णय नमुद केलेले असतात. सदर माहिती वरुन ज्या अधिनियमाच्या कलमा अंतर्गत उमेदवारास सिध्दापराधी ठरविण्यात आलेले असेल त्या आदेशाच्या दिनांकापासून अपात्रतेचा कालावधी संपला किंवा नाही याची खात्री केली जाते. तसेच उमेदवारास एखाद्या गुन्ह्यामध्ये ज्या आदेशान्वये सिध्दापराधी ठरविले आहे त्या आदेशाविरूध्द वरिष्ठ न्यायालयामध्ये अपिल दाखल आहे काय ? आणि असल्यास त्यामध्ये शिक्षेस स्थगनादेश देण्यात आला आहे काय ? याची खातर जमा केली जाते.

**प्रश्न १५ अपराधसिध्दी अथवा गुन्हेगारी पार्श्वभूमी संदर्भातील विहित केलेले शपथपत्र किती रूपयाचे स्टॅम्प पेपरवर व कोणासमोर करणे आणि कधीपर्यंत सादर करणे आवश्यक आहे ?**

उत्तर अपराधसिध्दी अथवा गुन्हेगारी पार्श्वभूमी संदर्भातील विहित केलेले शपथपत्र हे स्टँप पेपरवर सादर करणे आवश्यक नाही. असे शपथपत्र साध्या कागदावर केले तरी स्विकारण्यात येते. तसेच असे शपथपत्र प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (First Class Magistrate ), ओथ कमिशनर, नोटरी पब्लिक आणि

उपविभागीय अधिकारी व तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी (Executive Magistrate) यांचेसमोर केलेले आणि ते नामनिर्देशनपत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. एसईसी/ जीईएन/२००१/प्र.क्र. २९/का.१०, दिनांक ३१/०३/२००९ आणि राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दिनांक ५ जानेवारी २०१५)

**प्रश्न १६ उमेदवाराने अपराधसिध्दी अथवा गुन्हेगारी पार्श्वभूमी संदर्भातील विहित केलेले शपथपत्र सादर न केल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी कोणता निर्णय घेऊ शकतात ?**

उत्तर उमेदवाराने अपराधसिध्दी अथवा गुन्हेगारी पार्श्वभूमी संदर्भातील विहित केलेले शपथपत्र सादर न केल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी सदर नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये नामंजुर करू शकतात.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/कार्या.०५, दि.१५/०३/२००४)

**प्रश्न १७ उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत सादर केलेल्या शपथपत्रामधील तपशील अथवा माहिती जनतेस कशी माहित होते ?**

उत्तर उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत सादर केलेले शपथपत्र अथवा घोषणापत्र याची प्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येते. तसेच शुल्क आकारून त्याच्या प्रती प्रचाराचा कालावधी संपेपर्यंत निवडणूक लढविणारा कोणताही उमेदवार, मुद्रण / इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी व लोकप्रतिनिधी यांना उपलब्ध करून देण्यात येतात.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/कार्या.०५, दि.१५/०३/२००४)

**प्रश्न १८ एखाद्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत सादर केलेल्या शपथपत्रामधील तपशील अथवा माहिती चुकीची असल्याचे अन्य कोणत्याही व्यक्तीचे म्हणणे असेल तर ती व्यक्ती त्यासंदर्भात कशाप्रकारे कार्यवाही करू शकते ?**

उत्तर उमेदवाराच्या शपथपत्रामधील तपशील अथवा माहिती चुकीची असल्याचे अन्य कोणत्याही व्यक्तीचे म्हणणे असेल तर त्या व्यक्तीने स्वत: केलेल्या शपथपत्राव्दारे किंवा घोषणापत्राव्दारे परस्पर विरोधी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर असे शपथपत्र / घोषणापत्र हे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येते.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/कार्या.०५, दि.१५/०३/२००४)

**प्रश्न १९ उमेदवाराने सादर केलेल्या नामनिर्देशनपत्रासोबतच्या शपथपत्रामधील तपशिल अथवा माहितीची सत्यता पडताळून पाहण्याचा अधिकार निवडणूक निर्णय अधिकारी यांना आहे काय ?**

उत्तर नाही.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/कार्या.०५, दि.१५/०३/२००४)

**प्रश्न २० उमेदवाराने सादर केलेल्या नामनिर्देशनपत्रासोबतच्या शपथपत्रामधील तपशील अथवा माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांना चुकीची आढळून आली तर ते नामनिर्देशनपत्र नाकारु शकतात काय ?**

उत्तर नाही.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/कार्या.०५, दि.१५/०३/२००४)

## ६. अनामत रक्कम तरतूद

**प्रश्न १** नगरपरिषद किंवा नगरपंचायत निवडणुकीसाठी अनामत रक्कम ठेवणे आवश्यक आहे काय ?

उत्तर होय. नामनिर्देशनपत्रासोबत रोखीने अनामत रक्कम ठेवणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १४ )

**प्रश्न २ नगरपरिषद किंवा नगरपंचायत निवडणुकीसाठी अनामत रक्कम किती आहे ?**

उत्तर "उमेदवार अनु.जाती, अनु. जमाती, ना. मागासवर्ग व महिला यामधील असेल तर जाती वैधत प्रमाणपत्र आवश्यक आहे."

नगरपरिषद किंवा नगरपंचायत निवडणुकीसाठी अनामत रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| प्रकार | सर्वसाधारण जागा | उमेदवार अनु. जाती, अनु. जमाती, ना. मागासवर्ग व महिला यामधील असेल तर |
|---|---|---|
| अ - वर्ग | रू. ३०००/- | रू. १५००/- |
| ब - वर्ग | रू. २०००/- | रू. १०००/- |
| क - वर्ग | रू. १०००/- | रू. ५००/- |

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १४ आणि नगरविकास विभाग,महाराष्ट्रशासन यांचेकडील अधिसूचना दिनांक ०६/११/२०१० )

**प्रश्न ३ नगरपरिषद किंवा नगरपंचायत निवडणुकीसाठी अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागास प्रवर्ग किंवा महिला उमेदवाराला अनामत रक्कम भरण्यातून सूट देण्यात आली आहे काय ?**

उत्तर होय. सदर प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता ठरवून दिलेल्या अनामत रकमेच्या ५० % सूट देण्यात आलेली आहे. तथापि, अनु. जाती किंवा अनु. जमाती किंवा ना. मागासवर्ग मधील उमेदवारास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १४ )

**प्रश्न ४ कोणत्याही उमेदवाराचे नामनिर्देशन नाकारण्यात आले किंवा त्यांने आपली उमेदवारी मागे घेतली तर त्या उमेदवारास भरण्यात आलेली अनामत रक्कम परत मिळू शकते काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १४ (२))

**प्रश्न ५ एखादा उमेदवार सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी एकापेक्षा अधिक प्रभागांमधून निवडणूक लढवित असेल तर, त्याने प्रत्येक प्रभागामधील निवडणुकीसाठी जमा केलेली अनामत रक्कम परत करण्यात येईल काय ?**

उत्तर नाही, जर असा उमेदवार - अ ) एका प्रभागामधून निवडून आला आहे आणि उर्वरित प्रभागामधून निवडून आला नसेल तर निवडून आलेल्या प्रभागामधील अनामत रक्कम वगळता अन्य सर्व प्रभागामधील अनामत रक्कम जरी ती नियमानूसार जप्त झाली नाही तरी नगरपालिकेकडे जमा होईल. ब) एकापेक्षा अधिक प्रभागामधून निवडून आला असेल तर एका प्रभागामधील अनामत रक्कम वगळता अन्य सर्व प्रभागामधील अनामत रक्कम जरी तो त्या प्रभागांमधून निवडून आला आहे तरी नगरपालिकेकडे जमा होईल. क) कोणत्याही प्रभागामधून निवडून आला नसेल तर ज्या एका प्रभागामधील अनामत रक्कम नियमानूसार जप्त झाली नसेल तर तो प्रभाग वगळता अन्य सर्व प्रभागामधील अनामत रक्कम जरी त्या प्रभागामधील अनामत रक्कम नियमानूसार जप्त झाली नाही तरी नगरपालिकेकडे जमा होईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १४ (३))

**प्रश्न ६ नगरपरिषद किंवा नगरपंचायत निवडणुकीसाठी उमेदवारने अनामत रक्कम कधीपर्यंत जमा करणे आवश्यक आहे ?**

उत्तर नामनिर्देशनपत्र सादर करण्यासाठी नेमलेल्या तारखेस किंवा त्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे अनामत रक्कम जमा करणे आवश्यक आहे.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १४ (१))

**प्रश्न ७ नगरपरिषद किंवा नगरपंचायत निवडणुकीसाठी अनामत रक्कम धनादेशाव्दारे जमा करता येईल काय ?**

उत्तर नाही. अनामत रक्कम रोखीने भरणे आवश्यक आहे.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १४ (१))

**प्रश्न ८ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा विशेष मागास प्रवर्गातील उमेदवार हा खुल्या प्रवर्गाच्या जागेवरील निवडणूक लढवित असल्यास अनामत रकमेत सवलत मिळते काय ?**

उत्तर होय, सदर प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता ठरवून दिलेल्या अनामत रकमेच्या ५० % सूट देण्यात आलेली आहे. मात्र यासाठी त्याने नामनिर्देशनपत्रासोबत सक्षम प्राधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.

**प्रश्न ९ एका जागेसाठी एका व्यक्तीस जास्तीत जास्त ४ नामनिर्देशनपत्रे दाखल करता येवू शकतात. मग अनामत रक्कम सुध्दा ४ वेळा भरावी लागेल काय ?**

उत्तर नाही. एका जागेसाठी एकदाच अनामत रक्कम भरावी लागते.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १४ (१),
महाराष्ट्र शासन राजपत्र असाधानण १०९ दि. २१/१०/२०१६ )

**प्रश्न १० कोणताही उमेदवार मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी मृत्यु पावल्यास त्यांने ठेवलेली अनामत रक्कम परत मिळू शकते काय ?**

उत्तर होय. अशा उमेदवाराच्या कायदेशीर वारसास अनामत रक्कम परत मिळू शकते.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १४ (२))

**प्रश्न ११ अनामत रक्कम केव्हा जप्त होते?**

उत्तर उमेदवार पराभूत झाल्यास व त्यास एकूण वैध मतांच्या १/८ पेक्षा अधिक मते मिळाली नसेल तर त्याची अनामत रक्कम जप्त होते.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १४ (४) )

**प्रश्न १२ खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी अनामत रकमेला काही सवलत आहे काय?**

उत्तर होय. अनामत रकमेत ५०% सवलत आहे.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १४ (१) आणि राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दिनांक २८/०१/२०१२)

**प्रश्न १३ अनामत रक्कम परत मिळण्यासाठी अर्जासोबत रक्कमेची मूळ पावती सादर करणे आवश्यक आहे काय?**

उत्तर होय.

## ७. नामनिर्देशनपत्राची संख्या

**प्रश्न १ एका मतदारसंघामध्ये उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी जास्तीत जास्त किती नामनिर्देशनपत्रे भरता येतील ?**

उत्तर नगरपालिका निवडणुकीसाठी एका मतदारसंघामध्ये एका उमेदवारास जास्तीत जास्त चार नामनिर्देशनपत्र भरता येतील.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १२ (३)

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र पत्र क्र रानिआ/जिपपंस-२०१७/प. क्र १४/का-५ दि.०२/०२/२०१७)

**प्रश्न २ एखादी व्यक्ती एकापेक्षा अधिक मतदारसंघामधून निवडणूक लढवू शकते काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ३ दोन किंवा त्याहून अधिक प्रभागांमध्ये एकाचवेळी किंवा सामान्यपणे एकाच वेळी निवडणूका असतील त्यावेळेस एकाच व्यक्तीस कितीही प्रभागामध्ये निवडणूकीसाठी नाम निर्देशन पत्र भरता येईल काय?**

उत्तर जेंव्हा दोन किंवा त्याहून अधिक प्रभागांमध्ये एकाच वेळी किंवा सामान्यपणे एकाचवेळी निवडणुका घ्यावयाच्या असतील त्या बाबतीत एकच व्यक्ती पात्र असेल तर त्या व्यक्तीस उक्त प्रभागांपैकी सर्व किंवा कितीही प्रभागांमध्ये निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र भरता येईल.

(संदर्भ-महाराष्ट्र नगर पालिका निवडणूक नियम १९६६ चे कलम १२ (६)

## ८. सूचक - संख्या व अर्हता

**प्रश्न १ राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत मान्यताप्राप्त असलेल्या राजकीय पक्षाच्या उमेदवाराच्या नामनिर्देशनासाठी किती सूचकांची आवश्यकता आहे ?**

उत्तर नगरपालिका निवडणुकीसाठी नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवाराच्या नामनिर्देशनासाठी एक सूचकाची आवश्यकता आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १२ (२) )

**प्रश्न २ नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या आणि अपक्ष उमेदवाराच्या नामनिर्देशनासाठी किती सूचकांची आवश्यकता आहे?**

उत्तर नगरपालिका निवडणुकीसाठी नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या आणि अपक्ष उमेदवाराच्या नामनिर्देशनासाठी पाच सूचकाची आवश्यकता आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १२ (२) )

**प्रश्न ३ पाचपेक्षा अधिक सूचकांनी स्वाक्षरी केलेले नामनिर्देशनपत्र एखाद्या उमेदवाराने सादर केले तर ते वैध ठरेल काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ४ सूचक कोण होवू शकतो ?**

उत्तर उमेदवार ज्या प्रभागातून नामनिर्देशनपत्र दाखल करत आहे त्या प्रभागातील मतदार हा सूचक होऊ शकतो.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १२ (३) )

**प्रश्न ५ एकाच उमेदवाराच्या अथवा वेगवेगळ्या उमेदवारांच्या एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रावर सूचक म्हणून स्वाक्षरी करता येईल काय ? आणि स्वाक्षरी केल्यास काय होईल ?**

उत्तर नाही. एका पेक्षा जास्त नामनिर्देशनपत्रावर सूचक म्हणून स्वाक्षरी केल्यास त्यापैकी प्रथम प्राप्त झालेले नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येईल आणि उर्वरित नामनिर्देशनपत्रे ही फेटाळण्यात येतील.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १२ (३) )

**प्रश्न ६ एखाद्या व्यक्तीने सूचक म्हणून नामनिर्देशनपत्रावर स्वाक्षरी केल्यानंतर ती व्यक्ती सूचकाचा राजीनामा देवू शकते काय ? अथवा सूचक म्हणून माघार घेवू शकते काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ७ एकाच उमेदवाराच्या एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्रावरील सूचक वेगवेगळे असणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम १२ (३) )

**प्रश्न ८ सूचक त्याच प्रभागात उमेदवार म्हणून निवडणूक लढवू शकतो काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ९ एखादा उमेदवार अन्य उमेदवारास सूचक होऊ शकतो काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न १०  निरक्षर असलेल्या उमेदवाराचा / सूचकाचा अंगठ्याचा ठसा नामनिर्देशनपत्रावर घेण्याची कार्यपध्दती काय आहे ?**

उत्तर   नामनिर्देशनपत्र दाखल करणारा उमेदवार/सूचक हा निरक्षर असल्यामुळे स्वाक्षरी /सही करू शकत नसल्यास अशा उमेदवार /सूचकाने नामनिर्देशनपत्रात विहित केलेल्या ठिकाणी त्यांच्या अंगठयाचा ठसा निवडणूक निर्णय अधिकारी किंवा निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याच्या समक्ष उमटविणे आवश्यक आहे. अशावेळी निवडणूक निर्णय अधिकारी/ प्राधिकृत अधिका-याने संबंधित उमेदवार/सूचक यांची ओळख पटविली पाहिजे आणि संबंधिताचा अंगठ्याचा ठसा हा साक्षांकित केला पाहिजे.

**प्रश्न ११  एखाद्या उमेदवारास स्वत:च्या राजकीय पक्षासोबत अपक्ष अथवा इतर पक्षातर्फे उमेदवारी अर्ज दाखल करता येतो का ?**

उत्तर  होय.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०१७/प.क्र.१४/का-५ दि.०२/०२/२०१७)

**प्रश्न १३  निरक्षर असलेल्या सूचकाने नामनिर्देशनपत्रावरील त्याच्या अंगठ्याचा ठसा किंवा साक्षर सूचकाने सही नाकारल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अंगठ्याच्या ठश्याची वैधता कशी तपासावी ? त्यासाठी हस्ताक्षर तज्ञांना बोलवावे काय ?**

उत्तर   निरक्षर असलेल्या सुचकाचा नामनिर्देशनपत्रावरील अंगठ्याचा ठसा हा निवडणूक निर्णय अधिकारी किंवा उपविभागीय अधिकारी यांचे दर्जापेक्षा कमी नसलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्याच्या समोर घेण्यात आला असेल तर अशा सूचकाचा अंगठ्याचा ठसा नाकारण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. परंतू तरीही सूचकाने अंगठ्याचा ठसा किंवा स्वाक्षरी नाकारल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्याबाबत संक्षिप्त चौकशी करून निर्णय घ्यावा.

**प्रश्न १४  उमेदवाराचा सूचक निवडणूक प्रतिनिधी होऊ शकेल काय ?**

उत्तर   होय, उमेदवाराचा सूचक निवडणूक प्रतिनिधी होवू शकेल.

## ९. नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा कालावधी, वेळ व ठिकाण :-

**प्रश्न १ नामनिर्देशनपत्र केव्हा सादर करता येईल ?**

उत्तर निवडणूक कार्यक्रम घोषित केल्यानंतर त्यानुसार विहित केलेल्या दिनांकास व विहित केलेल्या कालावधीत, विहित ठिकाणी नामनिर्देशनपत्र सादर करता येते.

**प्रश्न २ नामनिर्देशनपत्र दुसरा किंवा चौथा शनिवार किंवा जिल्हा प्रशासनाकडून स्थानिक सुट्टी जाहीर केली जाते अशा शासकीय कार्यालये बंद असलेल्या दिवशी सादर करता येईल काय ?**

उत्तर नाही. राज्य निवडणूक आयोगाकडून जाहिर केलेल्या निवडणूक कार्यक्रमामध्ये नामनिर्देशन पत्रे ज्या दिवशी सादर करता येतील त्या दिवसांचा उल्लेख केला जातो. तथापी दुसरा किंवा चौथा शनिवार किंवा जिल्हा प्रशासनाकडून स्थानिक सुट्टी जाहीर केली जाते असा शासकीय कार्यालये बंद असलेला दिवस हा नियमानुसार सार्वजनिक सुटट्टीचा दिवस समजला जातो. त्यामुळे अशा दिवशी नामनिर्देशनपत्र सादर करता येणार नाही किंवा स्विकारता येणार नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चा नियम २ (ब १))

**प्रश्न ३ नामनिर्देशनपत्र कोठे (ठिकाण) सादर करता येवू शकेल ?**

उत्तर निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द केल्यानंतर त्यामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी / सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशनपत्र सादर करता येते.

**प्रश्न ४ नामनिर्देशनपत्र सादर करताना उमेदवाराने स्वतः हजर राहणे बंधनकारक आहे काय ? सूचकामार्फत नामनिर्देशनपत्र दाखल करता येऊ शकते काय ?**

उत्तर नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी उमेदवार स्वत: उपस्थित राहणे बंधनकारक नाही. सूचकामार्फत नामनिर्देशपत्र दाखल करता येते.

**प्रश्न ५ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नामनिर्देशनपत्र स्विकारु शकतात काय ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित नसल्यास सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नामनिर्देशनपत्र स्विकारु शकतात.

**प्रश्न ६ उमेदवारी दाखल करण्याच्या शेवटच्या वेळी उपस्थित सर्व उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे दाखल करुन घेता येऊ शकतील काय ?**

उत्तर होय, नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अंतिम दिवशी शेवटच्या क्षणी म्हणजे दुपारी ३.०० वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे ही स्विकारण्यात येतील आणि ही नामनिर्देशनपत्रे नियमानुसार विहित मुदतीमध्ये सादर केली आहेत असे समजले जाते. त्याकरीता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामधील प्रवेश ठिक दुपारी ३.०० वाजता बंद करणे आणि जे उमेदवार निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपस्थित आहेत अशा सर्व उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे स्विकारता येतील.

## १०. मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी जोडपत्र एक व जोडपत्र दोन सादर करणे

**प्रश्न १ एखाद्या उमेदवारास नोंदणीकृत राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केल्याचे केव्हा समजावे ?**

उत्तर उमेदवाराने नामनिर्देशनपत्रात नोंदणीकृत पक्षातर्फे निवडणूक लढवत असल्याचे घोषणापत्र दिल्यास व पक्षातर्फे जोडपत्र एक व दोन विहित कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्यास सदर उमेदवार हा राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केल्याचे समजावे.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ९)

**प्रश्न २ राजकीय पक्षांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठीचे जोडपत्र एक आणि जोडपत्र दोन हे कोणाकडे सादर करणे आवश्यक आहे ?**

उत्तर नगरपालिका निवडणूकीसाठी राजकीय पक्षांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठीचे जोडपत्र एक आणि जोडपत्र दोन हे जिल्हाधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ९)

**प्रश्न ३ जोडपत्र एक व जोडपत्र दोन स्वाक्षरीत करण्याचे अधिकार कोणाला आहेत ?**

उत्तर नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्ष व अमान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत जोडपत्र एक व जोडपत्र दोन सादर करणे आवश्यक आहे. जोडपत्र एक वर स्वाक्षरी करण्याचे अधिकार पक्षाचे अध्यक्ष किंवा सचिव किंवा अशी सूचना पाठविण्यास प्राधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकारी यांना असतात. पक्षातर्फे निवडणूक लढविणा-**या उमेदवारची नावे कळविण्यासाठी ज्या पक्ष पदाधिका-याला प्राधिकृत केले आहे** म्हणजेच जोडपत्र एक मध्ये ज्याचे नाव व स्वाक्षरी नोंदविलेली आहे त्यास जोडपत्र दोन वर स्वाक्षरीत करण्याचा अधिकार आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ९)

**प्रश्न ४ राजकीय पक्षांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठीचे जोडपत्र एक व जोडपत्र दोन हे निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे कधीपर्यंत सादर करणे आवश्यक आहे ?**

उत्तर नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचे शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. (आयोगाचे आदेश दि.२५.२.२०१३)

**प्रश्न ५ एखादा उमेदवार राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याची प्रतिरूप सही किंवा रबरी शिक्का इत्यादी साधनांनी केलेली सही असलेले जोडपत्र एक व जोडपत्र दोन देऊ शकतो का ?**

उत्तर नाही. असे जोडपत्र सादर केल्यास ते ग्राह्य धरण्यात येत नाही. दोन्ही जोडपत्रावरील सही ही शाईच्या पेनने / बॉलपेनने केलेली असणे आवश्यक आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ९)

**प्रश्न ६ राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे कळविणारे जोडपत्र दोन मधील सूचनापत्रामध्ये पर्यायी उमेदवाराचे नाव नमूद करणे बंधनकारक आहे का ?**

उत्तर नाही, पर्यायी उमेदवाराचे नाव नमूद करणे बंधनकारक नाही.

**प्रश्न ७ एखाद्या उमेदवाराने आपल्या नामनिर्देशनपत्रातील घोषणापत्रामध्ये तो ज्या पक्षातर्फे निवडणुकीसाठी उभा राहत असल्याचे नमुद केले असेल व संबंधित पक्षाचे चिन्ह वाटपाबाबतचे सूचनापत्र जोडपत्र एक व जोडपत्र दोन हे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित कालावधीत प्राप्त झाले असेल तर अशावेळी संबंधित पक्षाची उमेदवारी नाकारण्याचे अधिकार त्या उमेदवारास आहेत काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ८ एखाद्या नोंदणीकृत राजकीय पक्षाने एकापेक्षा जास्त उमेदवारांना चिन्ह वाटपाबाबतचे सूचनापत्र जोडपत्र एक व जोडपत्र दोन विहित कालावधीमध्ये दिले असेल व ते देताना आधीचे कोणतेही असे सूचनापत्र रद्द केले नसेल तर त्या पक्षाची अधिकृत उमेदवारी कोणास मिळेल ?**

उत्तर एखाद्या नोंदणीकृत राजकीय पक्षाने एकापेक्षा जास्त उमेदवारांना चिन्ह वाटपाबाबतचे सूचनापत्र जोडपत्र एक व जोडपत्र दोन विहित कालावधीमध्ये दिले असेल आणि कोणत्या उमेदवाराला उमेदवारी दयावयाची आहे यासंबंधीचे पत्र पक्षाने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत दिले नसेल तर ज्या उमेदवाराने संबंधीत पक्षातर्फे प्रथम नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल त्या उमेदवाराला पक्षाचा अधिकृत उमेदवार मानण्यात येईल.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा/२००६/प्रक्र.१९/का-५ दि.- ०६/०१/२००७)

**प्रश्न ९ एखाद्या नोंदणीकृत राजकीय पक्षास एखाद्या उमेदवारास दिलेली उमेदवारी रद्द करून, दुसऱ्या उमेदवारास पक्षाची उमेदवारी देण्याची कार्यपध्दती काय आहे ?**

उत्तर नगरपालिका निवडणूक संदर्भात जोडपत्र दोन मध्ये पर्यायी उमेदवार देण्याची तरतूद आहे. जोडपत्र दोन वर स्वाक्षरीसाठी प्राधिकृत पक्ष पदाधिका-याने पूर्वी देण्यात आलेले जोडपत्र दोन रद्द केल्याचे पत्र व दुस-या उमेदवाराचे नाव नमूद असणारे जोडपत्र दोन नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अंतिम वेळेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.

**प्रश्न १० एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त नोंदणीकृत राजकीय पक्षांची जोडपत्र - एक आणि जोडपत्र - दोन स्वतंत्र नामनिर्देशनपत्रासोबत विहित मुदतीमध्ये सादर केली असल्यास, त्या उमेदवारास कोणत्या पक्षाचा अधिकृत उमेदवार समजण्यात यावे ?**

उत्तर एखादया उमेदवाराने स्वतंत्र नामनिर्देशनपत्रासोबत एकापेक्षा जास्त मान्यताप्राप्त राजकीय पक्षाची जोडपत्र एक आणि जोडपत्र दोन सादर केली असतील तर त्यास चिन्ह वाटपासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात यावी. :-

१. अशा उमेदवारांच्या बाबतीत उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विहित वेळेत एक राजकीय पक्ष वगळता अन्य राजकीय पक्षाने लेखी सूचना देऊन जोडपत्र- दोन मागे घेतले असल्यास त्या उमेदवारास ज्या पक्षाने जोडपत्र-दोन मागे घेतलेले नाही त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे मानण्यात यावे व त्यास पक्षाचे राखीव चिन्ह देण्यात यावे.

२. जर उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विहित कालावधीनंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त राजकीय पक्षाने दिलेले जोडपत्र-दोन शिल्लक राहिले असल्यास त्या उमेदवाराने तो कोणत्या पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो याबाबत लेखी दिल्यास त्याला त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे मानण्यात यावे व त्यास पक्षाचे राखीव चिन्ह देण्यात यावे.

३. वरील अनुक्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एखाद्या उमेदवाराने तो कोणत्या पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो याबाबत लेखी न दिल्यास त्याने प्रथम ज्या पक्षाच्या वतीने नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल त्या राजकीय पक्षाचा तो अधिकृत उमेदवार आहे असे मानण्यात यावे व त्यास पक्षाचे राखीव चिन्ह देण्यात यावे.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्र.एसईसी-२००९/प्रक्र.४९/का-११ दि.- ५.२.२०१२)

**प्रश्न ११ एखाद्या उमेदवारास राजकीय पक्षाचे तिकीट मिळणे म्हणजे काय ?**

उत्तर एखाद्या उमेदवारास राजकीय पक्षाचे तिकीट मिळणे म्हणजे त्या पक्षाच्या प्राधिकृत पदाधिका-याच्या सहीचे जोडपत्र एक व जोडपत्र दोन नामनिर्देशनपत्रासोबत सादर करण्यासाठी प्राप्त होणे होय.

## ११. प्राथमिक छाननी

**प्रश्न १ उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्र स्विकारतेवेळी प्राथमिक छाननीमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने कोणत्या बाबी तपासणे आवश्यक आहे ?**

उत्तर सर्वसाधारणपणे नामनिर्देशनपत्रात उमेदवार, सूचक यांचे नाव व स्वाक्षरी, मतदार यादीतील अनुक्रमांक, घोषणापत्रावरील स्वाक्षरी, राखीव जागेकरिता उमेदवार असेल तर जातीचे घोषणापत्रावर स्वाक्षरी, जातीचे व वैधता प्रमाणपत्राची सत्यप्रत, अनामत रक्कम भरणा केलेली पावती, अपत्याबाबतचे व गुन्हेगारीबाबत शपथपत्र पूर्ण आहे काय ? या बाबीची प्राथमिक तपासणी करणे आवश्यक आहे.

**प्रश्न २ नामनिर्देशनपत्र स्विकारतेवेळी त्यामध्ये काही त्रुटी असल्यास त्याबाबत काय कार्यवाही करावी ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नामनिर्देशनपत्र दाखल करून घेतेवेळी त्याची प्राथमिक तपासणी सर्वसाधारणपणे खालील बाबतीत करून उमेदवारास त्रुटीपुर्ततेबाबत अवगत करावे .

१) नामनिर्देशनपत्रामध्ये उमेदवाराने करावयाची सर्व घोषणापत्रे स्वाक्षरित केली आहेत, नाव,वय, पत्ता, अचूक भरला असल्याची खात्री करणे,उमेदवार व सूचक यांच्या आवश्यक ठिकाणी सहया/अंगठा असल्याची खात्री करणे व सदर त्रुटी नामनिर्देशनपत्र दाखल करण्यापुर्वी दुर करण्याबाबत उमेदवारास अवगत करावे .

२) उमेदवार,त्याचा सूचक यांचे नामनिर्देशनपत्रात नमूद केलेले नाव व मतदार यादीतील अनुकमांक यांची अदयावत मतदार यादीतील तपशीलाशी पडताळणी करणे

३) उमेदवार दुस-या मतदारसंघातील मतदार असल्यास त्यांने सादर केलेल्या मतदारयादीच्या प्रमाणित प्रतिवरुन नामनिर्देशनपत्रातील तपशीलाची पडताळणी करणे .प्रमाणित प्रत छाननीच्या निश्चित दिनांकापुर्वीपर्यत सादर करता येईल.

४) नामनिर्देशनपत्रा सोबत सादर करावयाची अपत्याबाबतचे शपथ पत्र व गुन्हेगारी पार्श्वभूमी,मत्ता व दायित्व आणि शैक्षणिक अर्हतेबाबतचे शपथपत्रातील सर्व रकाने भरले असल्याची खात्री करावी . शपथपत्रे अपूर्ण असल्यास पुन्हा नव्याने शपथपत्रे नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या अंतिम वेळेपुर्वी सादर करणे आवश्यक आहे.

५) मान्यताप्राप्त पक्ष व नोंदणिकृत अमान्यताप्राप्त पक्षातर्फे अर्ज दाखल करणा-या उमेदवाराने अर्जा सोबत जोडपत्र एक आणि जोडपत्र - दोन दाखल केल्याचे खात्री करणे .

उपरोक्त त्रुटीपुर्ततेबाबत उमेदवारास अवगत करूनही त्रुटीपुर्तता न केल्यास त्याविषयी नामनिर्देशनपत्राच्या छाननीमध्ये नियमाप्रमाणे योग्य निर्णय घेण्यात यावा .

## १२. नामनिर्देशनपत्र स्विकारणेची प्रक्रिया व शपथ / प्रतिज्ञा

**प्रश्न १ नामनिर्देशनपत्र कोण दाखल करू शकेल ?**

उत्तर उमेदवार किंवा उमेदवाराचा सूचक हे नामनिर्देशनपत्र दाखल करु शकतात.
(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १२(२) )

**प्रश्न २ नामनिर्देशनपत्रात उमेदवाराने कोणकोणते घोषणापत्र व प्रतिज्ञापत्र करणे आवश्यक आहे ?**

उत्तर नामनिर्देशनपत्राच्या भाग १ मध्ये उमेदवाराने त्याचे वय, निवडून येण्यासाठी अपात्र नसल्याचे, ठेकेदार व थकबाकीदार नसल्याबाबतचे घोषणापत्र आणि भाग २ मध्ये अनु. जाती / जमाती / ना. मा. प्रवर्गातील उमेदवाराने करावयाचे जाती संदर्भातील प्रतिज्ञापत्र तसेच निवडणूक चिन्हांच्या निवडीबाबतचे घोषणापत्र करणे आवश्यक आहे.

**प्रश्न ३ नामनिर्देशनपत्र कोणाकडे दाखल करता येईल ?**

उत्तर नामनिर्देशनपत्र हे निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे दाखल करता येते.
(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १२(२) )

**प्रश्न ४ नामनिर्देशनपत्र कोणी स्वाक्षरीत करावयाचे आहे ?**

उत्तर नामनिर्देशनपत्र हे उमेदवार व सूचक यांनी स्वाक्षरीत करावयाचे आहे.
(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १२(२) )

**प्रश्न ५ स्वाक्षरी न केलेले / स्वाक्षरी नसलेले नामनिर्देशनपत्र हे उमेदवाराकडून दाखल करण्यात आले असेल तर त्या उमेदवारास छाननीपूर्वी त्या नामनिर्देशनपत्रावर स्वाक्षरी करता येईल काय ?**

उत्तर नाही. नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर केल्यानंतर त्यावर उमेदवारास स्वाक्षरी करता येणार नाही.छाननीवळी कोणतेही नामननिर्देशनपत्र हे उमेदवार किंवा सुचक यांच्या सही शिवाय आढळून आले तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी असे नामनिर्देशनपत्र मोठया स्वरुपाचा दोष आहे या कारणास्तव फेटाळणे आवश्यक आहे.

**प्रश्न ६ नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजणेपूर्वी काही क्षण अगोदर एक उमेदवार नामनिर्देशनपत्रासह निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षामध्ये उपस्थित आहे. परंतु त्याच्याकडे नामनिर्देशनपत्रासोबत दाखल करावयाची प्रतिज्ञापत्रे / कागदपत्रे नसतील तर त्याचे नामनिर्देशनपत्र दाखल करुन घ्यावे अगर कसे ?**

उत्तर एखादा उमेदवार नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अंतिम दिवशी दुपारी ३.०० वा. पूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कक्षात उपस्थित असल्यास त्याचे नामनिर्देशनपत्र दाखल करून घेतले जाईल.मात्र त्याच्याकडे नामनिर्देशनपत्रासोबत दाखल करावयाची प्रतिज्ञापत्रे / कागदपत्रे नसतील तर दुपारी ३.०० वाजलेनंतर ती दाखल करण्यास परवानगी दिली जाणार नाही. तथापी मनिर्देशनपत्रासोबत कोणती प्रतिज्ञापत्रे / कागदपत्रे दाखल केली नाहीत याची लेखी नोटीस संबंधीत उमेदवारास त्याचवेळी देण्यात येईल. नामनिर्देशनपत्र नाकारण्याचा निर्णय हा छाननीमध्ये घेण्यात

येईल.

**प्रश्न ७ नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये अनेक व्यक्ती नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी उपस्थित असल्यास अशा परिस्थितीमध्ये या सर्वांचे नामनिर्देशनपत्र स्विकारता येईल काय ?**

उत्तर होय,

नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अंतिम दिवशी शेवटच्या क्षणी म्हणजे दुपारी ३.०० वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे ही स्विकारण्यात येतील आणि ही नामनिर्देशनपत्रे नियमानुसार विहित मुदतीमध्ये सादर केली आहेत असे समजले जाते. त्याकरीता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामधील प्रवेश ठिक दुपारी ३.०० वाजता बंद करणे आणि जे उमेदवार निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपस्थित आहेत अशा सर्व उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे स्विकारता येतील.

**प्रश्न ८ अनामत रकमेची पावती नामनिर्देशनपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय, सत्यप्रत (Photocopy) जोडावी.

**प्रश्न ९ नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास उमेदवाराला पोच देण्यात येते काय ?**

उत्त होय.

**प्रश्न १० नामनिर्देशनपत्रे जशी प्राप्त होतील तशी त्याच क्रमाने ठेवणे बंधनकारक आहे काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ११ नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी शपथ / प्रतिज्ञा घेणे बंधनकारक आहे काय ?**

उत्तर नाही.

## १३. उमेदवारास द्यावयाची कागदपत्रे

**प्रश्न १ उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्र मिळाल्यानंतर, उमेदवारास कोणती कागदपत्रे देणे आवश्यक आहे ?**

उत्तर उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्र प्राप्त झाल्यानंतर उमेदवारास नामनिर्देशनपत्र मिळाल्याची पोहच, छाननीची नोटीस तसेच दैनंदिन खर्चाबाबतच प्रपत्र व आचारसंहितेबाबत माहिती पुस्तिका, निवडणूक कार्यक्रमासंदर्भात माहितीचे पत्र इत्यादी कागदपत्र उमेदवारास देण्यांत येतात.

**प्रश्न २ उमेदवारास खर्चाबाबतची सूचना व नमुने केव्हा देण्यात येतात ?**

उत्तर नामनिर्देशनपत्र दाखल केल्यानंतर उमेदवारास खर्चाबाबत कोरे नामनिर्देशनपत्रासोबतच विहित केलेले प्रपत्रे व खर्चाचे सूचना व नमुने देण्यात येतात.

## १४. दैनंदिन प्रसिध्दी / अहवाल

**प्रश्न १ नामनिर्देशनपत्र स्विकारण्याच्या कालावधीमध्ये दररोज प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशनपत्रांची माहिती प्रसिध्द करणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न २ नामनिर्देशनपत्र स्विकारण्याच्या कालावधी दरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दररोज नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर कोणती माहिती / शपथपत्रे प्रसिध्द करणे आवश्यक आहे ?**

उत्तर प्रत्येक उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्राची आणि त्यासोबत सादर केलेले अपत्य आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी,मत्ता व दायित्व,शैक्षणिक अर्हतेबाबतचे शपथपत्र यांची छायाप्रत व प्राप्त झालेल्या नामनिर्देशनपत्रांची विहीत नमून्यामध्ये माहिती कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

**प्रश्न ३ सदर नामनिर्देशनपत्र व शपथपत्रांची प्रसिध्दी कोणत्या ठिकाणी केली जाते ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय आणि नगरपालिकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येते.

**प्रश्न ४ नामनिर्देशनपत्र स्विकारण्याच्या कालावधी दरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दररोज कोणास अहवाल सादर करणे आवश्यक आहे ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगास व जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी यांचेकडे आयोगाने विहित करुन दिलेल्या प्रपत्रात अहवाल सादर करणे आवश्यक आहे

# प्रकरण ११.

# नामनिर्देशनपत्रांची छाननी

# (Scrutiny of Nominations)

## १. प्राधिकृत अधिकारी

**प्रश्न १ नामनिर्देशनपत्राची छाननी करणेचे अधिकार कोणास आहेत ?**

उत्तर नामनिर्देशनपत्रांची छाननी केवळ निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडूनच केली जाते. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला हे काम सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सोपविता येत नाही. परंतु छाननीचे काम पार पाडण्यास निवडणूक निर्णय अधिकारी हे अपरिहार्य अशा परिस्थितीमुळे असमर्थ असतील तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी हे छाननीचे काम करू शकतात. तथापि, त्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांना छाननीपूर्वी लेखी प्राधिकृत करणे आवश्यक आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५)

**प्रश्न २ निवडणूक निर्णय अधिकारी यांचे अनुपस्थितीत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी हे छाननी करु शकतात काय ?**

उत्तर होय. छाननीचे काम पार पाडण्यास निवडणूक निर्णय अधिकारी हे अपरिहार्य अशा परिस्थितीमुळे असमर्थ असतील तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी हे छाननीचे काम करू शकतात. त्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांना छाननीपूर्वी लेखी प्राधिकृत करणे आवश्यक आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५)

## २. छाननी - अर्ध न्यायिक प्रक्रिया

**प्रश्न १ नामनिर्देशनपत्रांची छाननी कोणत्या दिवशी, कोठे आणि कोणत्या वेळी करण्यात येते ?**

उत्तर नामनिर्देशनपत्रांची छाननी ही निवडणूक कार्यक्रमानुसार निश्चित केलेल्या दिवशी सकाळी ठिक ११.०० वाजता आणि त्यामध्ये नमुद केलेल्या ठिकाणी केली जाते. सर्वसाधारणपणे नामनिर्देशनपत्रे सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाच्या लगत नंतरच्या दिवशी नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात येते. परंतु लगतनंतरचा दिवस हा सार्वजनिक सुट्टीचा दिवस असेल तर त्या दिवसाच्या लगतनंतरच्या दिवशी छाननी करण्यात येते. मात्र, सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी छाननी करता येत नाही. छाननी करण्याचे ठिकाण हे सर्वसाधारणपणे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय असते, ज्याचा उल्लेख नमुना - १ मधील निवडणूक कार्यक्रमामध्ये केलेला असतो. त्याचबरोबर छाननीसाठी निश्चित केलेल्या दिवशी सकाळी ठिक ११.०० वाजता छाननीचे कामकाज सुरू करणे आवश्यक आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४)

**प्रश्न २ नामनिर्देशनपत्रांची छाननी ही कोणत्या प्रकारची चौकशी आहे ?**

उत्तर नामनिर्देशनपत्रांची छाननी ही अर्ध-न्यायिक स्वरूपाची कार्यवाही असते व करण्यात येणारी चौकशी ही संक्षिप्त चौकशी (Summary Inquiry) या प्रकारची असते.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न ३ छाननीसाठी उमेदवाराला लेखी कळविण्यात येते काय ? असल्यास केव्हा ?**

उत्तर होय. उमेदवाराने / सूचकाने नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर केल्यानंतर एक पोचपावती देण्यात येते. या पोचपावतीमध्ये नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी निश्चित केलेली तारीख, वेळ व ठिकाण याबाबतची लेखी सूचना समाविष्ट असते.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १२(५))

**प्रश्न ४ छाननीकरिता उमेदवारातर्फे विधिज्ञ / वकील / प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतो काय ?**

उत्तर होय. उमेदवाराने योग्यरित्या लेखी प्राधिकृत केलेली एक व्यक्ती मग ती विधिज्ञ / वकील किंवा अन्य कोणतीही व्यक्ती असेल तर तिला नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळी उपस्थित राहता येईल.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न ५ निवडणूक निर्णय अधिकारी यांना छाननीअंती नामनिर्देशनपत्रावर निर्णय देण्याचे अधिकार आहेत काय ?**

उत्तर होय. प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर ते स्विकारण्यात आले आहे किंवा नामंजूर करण्यात आले आहे.या संबंधीचा निर्णय निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नमूद करणे आवश्यक आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(६))

**प्रश्न ६ छाननीत एखाद्या उमेदवाराचे न्यायालयीन प्रकरण झाल्यास प्रभागाची निवडणूक स्थगित होते काय ?**

उत्तर नाही. छाननीमध्ये एखाद्या नामनिर्देशनपत्रावरील निर्णयाविरूध्द जिल्हा न्यायालयाकडे अपील दाखल झाल्यास, त्यामधील निर्णयानुसार संबंधित प्रभागाच्या निवडणूक कार्यक्रमामध्ये आवश्यकतेनुसार बदल केला जातो. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या छाननीमधील निर्णयाविरुध्द जिल्हा न्यायालयाव्दारे अपिलामध्ये देण्यात आलेल्या निर्णयानुसार निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादीमध्ये दुरूस्ती करण्यात येते व निवडणूक नियमाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येते.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(१))

**प्रश्न ७ छाननीमध्ये नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले असेल तर त्या नामनिर्देशनपत्रासोबत जमा केलेली अनामत रक्कम उमेदवारास परत मिळू शकते काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १४(२))

**प्रश्न ८ छाननीमध्ये उमेदवाराची सर्व नामनिर्देशनपत्रे फेटाळण्यात आली असतील तर त्याने निवडणूक खर्चाचा दैनंदिन आणि अंतिम हिशोब कधीपर्यंत सादर करणे आवश्यक आहे?**

उत्तर छाननीमध्ये एखाद्या उमेदवाराची सर्व नामनिर्देशनपत्रे फेटाळण्यात आली असतील तर त्यास निवडणूक खर्चाचा दैनंदिन हिशेब छाननीच्या दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे. परंतु निवडणूक खर्चाचा अंतिम हिशोब सादर करण्याची आवश्यकता नाही. निवडणूक खर्चाचा अंतिम हिशोब हा फक्त निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने सादर करणे बंधनकारक आहे.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/१०९५/१०१/ कार्या.३, दि.७/२/१९९५)

## ३. उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांची उपस्थिती

**प्रश्न १ छाननीसाठी उमेदवाराने उपस्थित राहणे बंधनकारक आहे काय ?**

उत्तर नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न २ उमेदवाराने प्राधिकृत केलेल्या किती व्यक्ती छाननीसाठी उपस्थित राहू शकतात ?**

उत्तर नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी उमेदवार, प्रत्येक उमेदवाराचा एक सूचक आणि प्रत्येक उमेदवाराने लेखी प्राधिकृत केलेल्या एका व्यक्तीला उपस्थित राहता येईल. याशिवाय अन्य कोणीही उपस्थित राहू शकत नाही.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न ३ छाननीकरिता उमेदवारासोबत त्याच्या सूचकाने उपस्थित राहणे बंधनकारक आहे काय ?**

उत्तर नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न ४ छाननीच्या वेळी एखादा उमेदवार अथवा त्याचा सूचक अथवा त्याचे प्रतिनिधी अनुपस्थित राहिल्यास छाननी स्थगित ठेवता येते काय ?**

उत्तर नाही.

(संदर्भ -महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न ५ नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी एखादा उमेदवार अथवा त्याचा सूचक अथवा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती यापैकी कोणीही उपस्थित नाही या मुद्याच्या आधारावरून त्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र नामंजूर करता येईल काय ?**

उत्तर नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न ६ एखाद्या उमेदवाराचा प्राधिकृत प्रतिनिधी उर्वरित उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रावर आक्षेप घेऊ शकेल काय ?**

उत्तर होय. नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी ज्या व्यक्तींना उपस्थित राहण्याची परवानगी नियमानुसार देण्यात आली आहे, त्यापैकी कोणतीही व्यक्ती उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रावर आक्षेप घेऊ शकते.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न ७ नामनिर्देशनपत्रांच्या छाननी करण्याचे कामकाज पार पाडण्याची जबाबदारी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावर आल्यास त्यांनी कागदपत्रांवर कोणत्या पदनामाने स्वाक्षरी करावी ?**

उत्तर नामनिर्देशनपत्रांच्या छाननी करण्याचे कामकाज पार पाडण्याची जबाबदारी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावर आल्यास त्यांनी कागदपत्रांवर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी या पदनामाने स्वाक्षरी करावी. तथापि, निवडणूक निर्णय अधिकारीकरिता म्हणून स्वाक्षरी करू नये.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५)

**प्रश्न ८ छाननीच्या वेळी उमेदवाराने कोणती कागदपत्रे व दस्तऐवजासह उपस्थित राहावे ?**

उत्तर नामनिर्देशनाविरूध्दच्या संभाव्य आक्षेपांना उत्तर देण्यासाठी उमेदवाराने छाननीच्या वेळी आपल्यासोबत सर्वसाधारणपणे खालील कागदपत्रे ठेवणे योग्य होईल.

१) अद्यावत मतदारयादीच्या संबंधित भागाची प्रत किंवा उमेदवार व सूचक यांचे नाव असलेल्या प्रभागाच्या / मतदारसंघाच्या अद्यावत मतदार यादीतील नोंदीची प्रमाणित प्रत,

२) वयासंबंधी समाधानकारक पुरावा,

३) अनामत रक्कम भरल्याची पावती किंवा चलनाची प्रत,

४) नामनिर्देशनपत्राची पोच आणि छाननीची सूचना,

५) अपराधसिध्दीच्या तपशिलासंबंधात आणि अपत्यासंबंधात विहित नमुन्यामध्ये दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत,

६) नामनिर्देशनाविरूध्द जो संभाव्य आक्षेप घेण्यात येईल अशा आक्षेपाचे खंडन करण्यासाठी आवश्यक असेल असा इतर कोणताही पुरावा किंवा साहित्य,

७) राखीव जागेवर निवडणूक लढविणा-या उमेदवाराने जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणापत्राच्या मूळ प्रती

## ४. वैध व अवैध ठरविण्याचे निकष

**प्रश्न १ नामनिर्देशनपत्र फेटाळण्याची सर्वसाधारण कारणे कोणती ?**

उत्तर नामनिर्देशनपत्र फेटाळण्याची सर्वसाधारण कारणे खालील प्रमाणे आहेत.:-

१) सदस्य होण्यास अर्हता प्राप्त नाही. २) सदस्य होण्यास कायद्यानुसार निरर्ह ठरविले आहे. ३) नामनिर्देशनपत्र नमुना - १ मधील निवडणूक कार्यक्रमामध्ये नमुद केलेल्या ठिकाणी आणि मुदतीमध्ये दाखल केले नाही. ४) नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उमेदवार किंवा त्याचा सूचक या व्यतिरिक्त अन्य व्यक्तीने सादर केले आहे. ५) नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या व्यतिरीक्त अन्य व्यक्तीकडे सादर केले आहे. ६) नामनिर्देशनपत्र विहित नमुन्यामध्ये नाही. ७) नामनिर्देशनपत्रावर उमेदवार किंवा आवश्यक तेवढ्या सूचकांनी स्वाक्षरी केली नाही. ८) नियमानुसार अनामत रक्कम ठेवली नाही. ९) नामनिर्देशनपत्रावरील उमेदवार किंवा सूचकाची स्वाक्षरी खरी नाही किंवा फसवणूकीने मिळविण्यात आली आहे. १०) उमेदवारास नामनिर्दिष्ट करण्यासाठी सूचक अपात्र आहे. ११) जागा ज्या प्रवर्गाच्या व्यक्तीसाठी राखून ठेवली आहे त्या प्रवर्गातील व्यक्ती नाही. १२) नामनिर्देशनपत्रामध्ये वय नमुद केले नाही. १३) नामनिर्देशनपत्रासोबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करण्यास कसूर केला आहे. १४) राखीव जागेवर निवडणूक लढविणा-या उमेदवाराने जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणापत्राच्या मूळ प्रती दाखविल्या / उपस्थित केल्या नाहीत. १५) उमेदवार अन्य मतदारसंघामधील आहे परंतु त्याने त्याचे नांव नमुद असलेल्या मतदार यादीच्या भागाची प्रमाणिम प्रत सादर केली नाही.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न २ निवडणुकीत प्रभाग यादीमध्ये उमेदवाराचे नाव मतदार म्हणून नोंदविले नसल्यास नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्यात येते काय ?**

उत्तर नाही, उमेदवार हा त्या नगरपालिकेच्या निवडणुकीकरीता राज्य निवडणूक आयोगाव्दारे अधिसूचित करण्यात आलेल्या दिनांकास मतदार असणे आवश्यक आहे. उमेदवार हा संबंधीत प्रभागातील मतदार नसल्यास त्याने त्याचे नाव ज्या प्रभागाच्या मतदार यादीत नोंदविलेले असेल त्याची प्रमाणित प्रत नामनिर्देशनपत्राबरोबर सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे १२(२))

**प्रश्न ३ मतदार यादीतील लेखन दोषासाठी उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र नाकारले जाते काय ?**

उत्तर नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न ४** **उमेदवार अथवा सूचक यांच्या नावामधील तांत्रिक दोष किंवा मतदार यादीमधील नमूद केलेला चुकीचा अनुक्रमांक टाकला असेल अथवा अनुक्रमांक टाकला नसेल या एकमेव कारणावरून नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात येईल काय ?**

उत्तर नाही. उमेदवाराने नामनिर्देशनपत्रामध्ये नमूद केलेले त्याचे व सूचकाचे नाव व अनुक्रमांक चूकीचा टाकला असेल तर नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी त्यामध्ये दुरुस्ती करण्याची संधी उमेदवारास देईल तसेच छाननीच्या वेळी अचूक नोंदीचा तपशील उमेदवाराने किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीने निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिल्यास त्याचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात येत नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न ५** **नामनिर्देशनपत्रामध्ये उमेदवाराचे वय नमुद केले नसेल तर नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात येईल काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न ६** **नामनिर्देशनपत्रावर उमेदवाराने स्वाक्षरी केली नसल्यास नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्यात येतेका?**

उत्तर होय. नामनिर्देशनपत्रावर उमेदवाराची संमतीदर्शक सही / अंगठा असणे आवश्यक आहे. जर नामनिर्देशनपत्रावर उमेदवाराने संमतीदर्शक सही / अंगठा केली नसेल तर त्याने कायदेशीर बाबींची पूर्तता केलेली नाही असे समजून त्याचे नामनिर्देशनपत्र फेटाळले जाईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न ७** **ज्या प्रभागाकरिता नामनिर्देशनपत्र भरले आहे त्याच प्रभागातील मतदार सूचक म्हणून असणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १२(२))

**प्रश्न ८** **सूचक यांनी एका उमेदवाराचे नामनिर्देशनपत्रावर स्वाक्षरी केल्यानंतर इतर उमेदवारांच्या देखील नामनिर्देशनपत्रावर स्वाक्षरी केल्यास कोणाचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात येते ?**

उत्तर कोणत्याही पात्र सूचक असलेल्या व्यक्तीस एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रावर स्वाक्षरी करता येत नाही. परंतु त्याने तसे केल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांना प्रथम मिळालेल्या नामनिर्देशनपत्राखेरीज अशारितीने सह्या केलेली सर्व नामनिर्देशनपत्रे ही अवैध ठरविण्यात येतील.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १२(२)(३))

**प्रश्न ९ उमेदवाराने अथवा सूचकाने नामनिर्देशनपत्रासोबत स्थानिक स्वराज्य संस्थेचे थकबाकीदार नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडले नसल्यास उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात येते काय ?**

उत्तर नाही. तथापि, छाननीच्या वेळी एखाद्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्रावर इतर उमेदवाराने किंवा प्राधिकृत प्रतिनिधीद्वारे पुराव्यासह तो निवडणूक लढवित असलेल्या नगरपालिकेचा थकबाकीदार असल्याचा आक्षेप घेतल्यास व संक्षिप्त चौकशीअंती उमेदवार थकबाकीदार असल्याचे सिध्द झाल्यास येणा-या अपात्रतेमुळे अशा उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्यात येते.

**प्रश्न १० छाननी अंतर्गत केलेल्या संक्षिप्त चौकशीमध्ये नामनिर्देशनपत्रावरील उमेदवाराची / सूचकाची स्वाक्षरी ही खरी नसल्याचे आढळून आले तर ते नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात येऊ शकते काय ?**

उत्तर होय. संक्षिप्त चौकशीअंती उमेदवाराची / सूचकाची स्वाक्षरी खरी नाही आणि आवश्यक इतक्या सूचकांनी नामनिर्देशनपत्रावर स्वाक्षरी केली नसल्याचे सिध्द झाले तर निवडणूक निर्णय अधिकारी असे नामनिर्देशनपत्र फेटाळू शकतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(२))

**प्रश्न ११ उमेदवाराच्या नामनिर्देशपत्रावरील सूचक यांनी छाननीच्या वेळी प्रतिज्ञापत्र देऊन आपले सूचकत्व मागे घेतले तर त्याबाबत कोणती कार्यवाही करावी ?**

उत्तर एखाद्या उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रावर एखाद्या व्यक्तीने सूचक म्हणून स्वाक्षरी केली असेल, तर त्या व्यक्तीस छाननीच्या वेळी प्रतिज्ञापत्र देवून सूचकत्व नाकारता येत नाही किंवा ते मागे घेता येत नाही. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यासंदर्भातील प्रतिज्ञापत्राची दखल घेवू नये.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(२))

**प्रश्न १२ एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या किंवा अपक्ष उमेदवाराचे नामनिर्देशपत्र हे आवश्यकतेनुसार पाच सूचकांनी स्वाक्षरीत केले आहे. परंतु, छाननी दरम्यान त्या नामनिर्देशपत्रावरील स्वाक्षरी आपली नाही, असे एका सूचकाने सांगितले, तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कोणता निर्णय घेणे आवश्यक आहे ?**

उत्तर याबाबत संबंधित सूचकास प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून देण्यात येतील. जर सूचकाने प्रतिज्ञापत्र दाखल केले तर निवडणूक निर्णय अधिकारी हे त्या सूचकाच्या स्वाक्षरीच्या सत्यतेबाबत संक्षिप्त चौकशी करतील. त्याचबरोबर संबंधित उमेदवारास त्याची बाजू मांडण्याची पूर्ण संधी देण्यात येईल. जर प्रकरणी सूचकाची स्वाक्षरी खरी नसल्याचे सिध्द झाले तर नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष किंवा अपक्ष उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र हे नियमानुसार आवश्यक असलेल्या संख्येएवढ्या सूचकांनी स्वाक्षरीत केले नाही या कारणास्तव फेटाळण्यात येईल.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १२(२))

**प्रश्न १३ महत्वाच्या स्वरुपाचा (Substantial) नसेल अशा कोणत्याही कारणास्तव नामनिर्देशनपत्र नामंजूर केले जाते काय ?**

उत्तर नाही, महत्वाच्या स्वरुपाचा दोष (Substantial) नसेल अशा कोणत्याही कारणास्तव नामनिर्देशनपत्र नामंजूर केले जात नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(४))

**प्रश्न १४ नामनिर्देशनाचे विहित दिवसापूर्वी थकबाकीदार असलेला उमेदवार छाननीचे दिवशी थकबाकीदार नसेल तर कोणती कार्यवाही करावी ?**

उत्तर जर एखादा उमेदवार नामनिर्देशनाचे दिनांकापूर्वी थकबाकीदार असेल परंतू छाननीचे दिवशी तो थकबाकीदार नसेल, तरी त्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र त्यास महा नगरपरिषदा, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम , १९६५ च्या कलम १६ (१) (K) नुसार येणाऱ्या अपात्रतेमुळे फेटाळण्यात येते. उमेदवाराची निवडणूक लढविण्यासाठीची पात्रता/अपात्रता ही नामनिर्देशनांच्या तारखेस विचारात घेणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

**प्रश्न १५ नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवाराने सादर केलेल्या जोडपत्र - एक आणि जोडपत्र - दोन वरील स्वाक्षरी ही निळ्या शाईने केली नाही या एकमेव कारणास्तव नामनिर्देशनपत्र फेटाळता येईल काय?**

उत्तर नाही. नोंदणीकृत राजकिय पक्षाच्या उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रासोबत सादर करण्यात येणा-या जोडपत्र एक व दोन वर पक्षाच्या प्राधिकृत पदाधिका-याने शाईने अथवा बॉलपेनने केलेली स्वाक्षरी असेल तर व इतर कोणत्याही कारणास्तव उमेदवार अपात्र नसेल तर असे नामनिर्देशपत्र फेटाळता येणार नाही. शाईच्या रंगाबाबत निवडणूक नियमात तरतूद नाही. जोडपत्र एक व दोन वर पक्षाच्या प्रतिनिधीची प्रतीरुप सही असलेली प्रत अथवा रबर स्टॅम्पची सही असलेली अथवा अन्य प्रकारे सही असलेली सूचनापत्र ग्राह्य धरता येणार नाही. इतर अपात्रता नसल्यास उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र फेटाळता येणार नाही.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ९)

**प्रश्न १६ राखीव प्रभागातील उमेदवाराने छाननीचे वेळी मूळ जात / वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात येते काय ?**

उत्तर राखीव प्रभागातील उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जात प्रमाणपत्राची व पडताळणी समितीने दिलेल्या जात वैधता प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे. छाननीच्या वेळी त्यांच्या तपासणीसाठी जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्राची मूळ प्रत सादर करणे बंधनकारक आहे. तथापि जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा पडताळणी समितीकडे अर्ज केला असल्याबाबतचा अन्य कोणताही

पुरावा आणि व्यक्ती निवडून आल्याच्या दिनांकापासून १२ महिण्याच्या मुदतीत पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबतचे हमीपत्र सादर केले असल्यास नामनिर्देशन पत्र अवैध ठरविण्यात येऊ नये.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९ (अ) )

**प्रश्न १७ छाननीमध्ये उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र अथवा पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र हे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने चुकीचे दिले आहे असा आक्षेप घेण्यात आला असेल तर काय करावे ?**

उत्तर अशा स्वरूपाचा आक्षेप छाननीमध्ये घेण्यात आला असेल तर संबंधित उमेदवारास जातीचे प्रमाणपत्र चुकीचे दिले आहे किंवा कसे याच्या तपशीलामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाऊ नये. परंतु सादर केलेले जातीचे प्रमाणपत्र हेच मूळात बनावट किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले नाही असा आक्षेप उपस्थित झाला असेल किंवा शंका आल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्याबाबत संक्षिप्त चौकशी करून निर्णय घेणे आवश्यक राहील. पडताळणीअंती जात प्रमाणपत्राचा खरेपणा सिध्द न झाल्यास संबंधित उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात यावे.

**प्रश्न १८ नगरपालिका निवडणुकीत नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे / शपथपत्रे / घोषणापत्रे कोणासमोर सत्यापित करणे आवश्यक आहे ? शपथपत्रे / प्रतिज्ञापत्रे / घोषणापत्रे नोटरी करणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर नगरपालिका निवडणुकीत नामनिर्देशन पत्रासोबत सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे शपथपत्रे / घोषणापत्रे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ओथ कमिशनर, नोटरी पब्लिक आणि उपविभागीय दंडाधिकारी, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांच्यासमोर साक्षांकित / सत्यापित करणे आवश्यक आहे. सदर शपथपत्रे, प्रतिज्ञापत्रे नोटरी करणे आवश्यक नाही.

**प्रश्न १९ लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १० अ च्या तरतुदीनुसार एखाद्या उमेदवारास अनर्ह ठरविल्यास नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुकीत त्याचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात येते का ?**

उत्तर होय. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १० अ च्या तरतुदीनुसार एखाद्या उमेदवारास जेवढ्या कालावधीसाठी अनर्ह ठरविण्यात आले आहे त्या कालावधी दरम्यान तो उमेदवार नगरपरिषद अथवा नगरपंचायतीची निवडणूक लढविण्यास अपात्र ठरतो.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (a-१) आणि विद्याधर विनायक मथाने विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर, २००४(३) महाराष्ट्र लॉ जर्नल ३२८)

**प्रश्न २०	एखाद्या व्यक्तीला अपराधाबद्दल सिध्दापराधी / दोषी ठरविले असून तिला २ वर्षापेक्षा अधिक कालावधीची शिक्षा झालेली आहे. परंतु आता त्या व्यक्तीला जामिनावर सोडले / त्याच्या शिक्षेस स्थगिती दिली असल्यास किंवा दोषारोपास स्थगिती दिली असल्यास तिचे अपील निकालात निघेपर्यंत ती व्यक्ती निवडणूक लढवू शकते काय ?**

उत्तर	होय. एखाद्या व्यक्तीला अपराधाबद्दल दोषी ठरविले असून, तिला दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीची शिक्षा झाली आहे आणि अपीलामध्ये त्या व्यक्तीच्या शिक्षेस किंवा दोषारोपास स्थगिती दिली असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकते. परंतु शिक्षेस किंवा दोषारोपास स्थगिती दिली नसेल व त्या व्यक्तीला अपराधसिध्दीनंतर केवळ जामीनावर सोडले असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढवू शकत नाही.

संदर्भ - Supreme Court Ruling in Writ Pitition (Civil ) No. ४९० of २००५ Lily Thomas Vs Union of India and WP (Civil) No. २३१ of २००५ Lokprahari through its Genral Secretary S.N. Shukla Vs Union of India)

**प्रश्न २१ ज्या नगरपालिकेची निवडणूक लढविण्याची आहे, त्या स्थानिक स्वराज्य संस्थेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेशी एखाद्या व्यक्तीने कोणत्याही कामामध्ये केलेल्या करारामध्ये प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध असेल तर त्या व्यक्तीस निवडणूक लढविण्यास बाधा येऊ शकते काय ?**

उत्तर	नाही.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (आय))

**प्रश्न २२ एकाच नगरपालिकेच्या सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकीमध्ये दोन पेक्षा अधिक जागेवरून निवडणूक लढविता येते काय ?**

उत्तर	होय. एखादया नगरपालिकेच्या एकापेक्षा अधिक प्रभागाच्या निवडणुका घेण्यात येत असतील तर नामनिर्देशित करण्यासाठी पात्र असलेल्या व्यक्तीला एकापेक्षा जास्त प्रभागातून निवडणूक लढविता येते.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १२(६) )

**प्रश्न २३	एखाद्या स्त्रिला दोन मुले आहेत आणि छाननीच्या दिवशी ती गरोदर असेल तर ती निवडणूक लढविण्यास पात्र ठरते काय ?**

उत्तर	होय.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (के))

| जन्मलेल्या मुलांची संख्या | | | एकूण मुलांची संख्या | निवडणूक लढविण्यास पात्र किंवा अपात्र |
|---|---|---|---|---|
| १३ सप्टेंबर, २००० पूर्वी | १३ सप्टेंबर, २००० ते १२ सप्टेंबर, २००१ या कालावधीमध्ये | १२ सप्टेंबर, २००१ नंतर | | |
| ३ | निरंक | निरंक | ३ | पात्र |
| ३ | १ किंवा २ | निरंक | ४ किंवा ५ | पात्र |
| २ | १ | निरंक | ३ | पात्र |
| २ | निरंक | १ | ३ | अपात्र |
| २ | १ | १ | ४ | अपात्र |
| १ | निरंक | जुळे अथवा त्यापेक्षा जास्त | ३ किंवा त्यापेक्षा जास्त | पात्र |
| १ | १ | १ | ३ | अपात्र |
| १ | निरंक | १ | २ | पात्र |
| निरंक | निरंक | ३ (सिंगल बर्थ) | ३ | अपात्र |
| निरंक | निरंक | १+जुळे | ३ | पात्र |
| निरंक | निरंक | २ | २ | पात्र |
| निरंक | १ | २ (जुळे नाही) | ३ | अपात्र |
| निरंक | जुळे | १ | ३ | अपात्र |
| निरंक | २ (सिंगल बर्थ) | १ | ३ | अपात्र |
| निरंक | १ | १ | २ | पात्र |
| निरंक | निरंक | निरंक | निरंक | पात्र |
| निरंक | निरंक | १ | १ | पात्र |

**प्रश्न २४ एखादे दत्तक दिलेले मूल हे त्याचे नैसर्गिक पालक किंवा दत्तक पालक यापैकी कोणाकडे मोजण्यात यावे ?**

उत्तर नगरपालिकेच्या निवडणुकीत उमेदवाराची अपात्रता तपासण्यासाठी दत्तक मुलाचे पालकत्व त्याच्या नैसर्गिक पालकांकडे मोजण्यात येते. मूल या संज्ञेमध्ये दत्तक मूल / मुलांचा समावेश होत नाही.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (के))

**प्रश्न २५ एखाद्या व्यक्तीस तीन मुले आहेत आणि त्यापैकी एक मूल हे छाननीच्या दिनांकापूर्वी मयत झाले असेल तर ती व्यक्ती निवडणूक लढविण्यासाठी पात्र ठरू शकते काय ?**

उत्तर सदर उमेदवाराची पात्रता ही त्याच्या मुलांच्या जन्म दिनांकावरून ठरवावी लागेल. जर उमेदवाराच्या अपत्यांच्या संख्येत दिनांक १२ सप्टेंबर २००१ नंतर वाढ होऊन दोन पेक्षा अधिक अपत्य झाली असल्यास व त्यापैकी एखादे मूल मयत होऊन मुलांची संख्या दोन झाली असली तरी सदर व्यक्ती निवडणूक लढविण्यास अपात्र ठरते. तथापि, एखाद्या व्यक्तीची तीनही मुले दिनांक १२ सप्टेंबर २००१ पूर्वी जन्मलेली असल्यास सदर व्यक्ती निवडणूक लढविण्यास पात्र ठरते.

तसेच एखाद्या व्यक्तीस दिनांक १२ सप्टेंबर, २००१ पूर्वी दोन मुले असून, त्या दिनांकानंतर त्यास झालेले तिसरे मूल हे जन्मता मयत आहे. तर ती व्यक्ती निवडणूक लढविण्यास अपात्र ठरत नाही. परंतू एखाद्या व्यक्तीस दिनांक १२ सप्टेंबर, २००१ पूर्वी दोन मुले आहेत. दिनांक १२ सप्टेंबर, २००१ नंतर त्यास तिसरे मूल झाले असून, त्यानंतर ते लगेच किंवा काही कालावधीनंतर मयत झाले आहे. तर ती व्यक्ती निवडणूक लढविण्यास अपात्र ठरते.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (के))

**प्रश्न २६ एखाद्या व्यक्तीस दि.१२.९.२००१ नंतर पहिल्या पत्नी पासून दोन मुले असून पहिली पत्नी हयात नाही अथवा दोघांचा कायदेशीर घटस्फोट झाला आहे. आता त्या व्यक्तीस दुसऱ्या पत्नीपासून एक मूल झाले आहे. तर ती व्यक्ती आणि त्याची दुसरी पत्नी हे निवडणूक लढविण्यासाठी पात्र ठरू शकतात काय ?**

उत्तर त्या व्यक्तीस दिनांक १२ सप्टेंबर २००१ नंतर पहिल्या पत्नी पासून झालेली दोन मूले आणि दुसऱ्या पत्नी पासून झालेले एक मूल यामुळे त्या व्यक्तीच्या एकूण मुलांची संख्या ही तीन होते. त्यामुळे त्या व्यक्तीच्या एकूण मुलांची संख्या ही दोनपेक्षा अधिक झाल्यामुळे, ती व्यक्ती निवडणूक लढविण्यासाठी पात्र ठरत नाही. तथापि, त्या व्यक्तीच्या घटस्फोटीत पत्नीस दोनच मुले असल्यामुळे व दुसऱ्या पत्नीला एकच मूल असल्यामुळे त्या दोघीही निवडणूक लढविण्यास पात्र ठरतात.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (के))

**प्रश्न २७ नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या मुख्य उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात आले असेल तर त्या पक्षाच्या पर्यायी उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्राबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कोणता निर्णय घेणे आवश्यक आहे ?**

उत्तर नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या मुख्य उमदेवाराचे नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात आले असेल व पर्यायी उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र हे अधिनियम व निवडणूक नियमान्वये सूचकांची संख्या व इतर पात्रता निकष पूर्ण करत असल्यास, त्या उमेदवाराचे नामनिर्देशपत्र स्विकारण्यात येईल आणि तो अपक्ष उमेदवार म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

**प्रश्न २८ शपथपत्रातील तपशील खोटा आहे या कारणासाठी उमेदवारी अर्ज नामंजूर केला जातो का ?**

उत्तर नाही. शपथपत्रातील तपशीलाची सत्यता तपासण्याचे अधिकार निवडणूक निर्णय अधिकारी यांना नाहीत.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी/जीईएन/२००२/ प्र.क्र.-८५ कार्या.०५, दिनांक १५/०३/२००४ मधील परिच्छेद ४(६))

**प्रश्न २९ अविभक्त कुटुंबातील एखादी व्यक्ती मालमत्ता धारण करीत असेल व त्या मालमत्तेचा कर थकित असेल आणि त्या कुटुंबातील इतर कोणताही सदस्य निवडणुकीस उभा असेल तर त्याचे नामनिर्देशनपत्र वैध असेल काय ?**

उत्तर कर थकीत असल्याचे समजणे आवश्यक , ज्यामुळे महा नगरपरिषदा, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १६ (१) (ह) प्रमाणेच अर्हता नामनिर्देशनाचे वेळी धारण करीत आहे किंवा नाही या विषयी निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय घेवू शकतील.

**प्रश्न ३० नमुना ४ मधील उमेदवाराच्या नावात बदल / सुधारणा असेल तर अशा स्वरुपाची सूचना / बदल करता येतो का ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कडील लेखी स्वरुपात सूचना करुन मत पत्रिकेतील असावयाच्या नावाप्रमाणे बदल करण्यासाठी लेखी विनंती करता येईल.

## ५. छाननीची कार्यपध्दती

**प्रश्न १ निवडणूक निर्णय अधिकारी यांनी छाननीची काय पूर्वतयारी करावी ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी छाननीसाठी खालील प्रमाणे पूर्वतयारी करावी :-

१) नामनिर्देशनपत्र दाखल करावयाच्या विहीत कालावधीत दररोज नामनिर्देशनपत्र दाखल केलेल्या उमेदवारांची यादी आणि नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या अंतिम दिवशी तयार केलेली नामनिर्दिष्ट उमेदवारांची यादी.तसेच प्राप्त झालेली अनुक्रमांकानुसार सर्व नामनिर्देशनपत्रे

२) भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक खर्चाच्या हिशेबाच्या मुद्यावरून अपात्र ठरविलेल्या उमेदवारांची यादी,

३) मतदारसंघाची / प्रभागाची अद्यावत मतदार यादी,

४) प्राप्त झालेल्या सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननीपूर्व तपासणी करून तयार केलेली माहिती.

५) उमेदवार व त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधींची बैठक व्यवस्था

६) आवश्यकतेनुसार छायाचित्रणाची व्यवस्था.

**प्रश्न २ छाननीची सर्वसाधारण कार्यपध्दती कशी असते ?**

उत्तर छाननीसाठी सर्व उमेदवार, प्रत्येकाचा एक सूचक व प्रत्येक उमेदवाराने लेखी प्राधिकृत केलेली एक व्यक्ती या व्यतिरिक्त अन्य कोणासही उपस्थित राहू दिले जाणार नाही याची दक्षता निवडणूक निर्णय अधिकारी घेतील. नियमानुसार उपस्थित असलेल्या सर्वांची लेखी नोंद घेतली जाईल. उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांची तपासणी उमेदवारनिहाय करण्यात येईल. त्यासाठी एका उमेदवाराने दाखल केलेल्या सर्व नामनिर्देशनपत्रांचा विचार तपासणीसाठी करण्यात येईल. परंतु उमेदवाराने दाखल केलेल्या अनेक नामनिर्देशनपत्रापैकी पहिले किंवा त्यानंतरचे नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहे म्हणून उर्वरित नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्याची आवश्यकता नाही असे निवडणूक निर्णय अधिकारी यांना करता येणार नाही. कोणत्याही नामनिर्देशनपत्रासंबंधी आक्षेप घेण्यात आला असेल, तर त्याबाबत संक्षिप्त चौकशी करून निर्णय घेण्यात येतो. नाकारण्यात आलेल्या नामनिर्देशनपत्रावर ते कोणत्या कारणास्तव नाकारण्यात आलेले आहे याचे कारण नमुद करण्यात येते. या सर्व प्रक्रियेचे आवश्यकतेनुसार छायाचित्रण करता येईल.

**प्रश्न ३ निवडणूक निर्णय अधिकारी यांचे छाननी करीता अपरिहार्य स्थितीमधील अनुपस्थितीत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांना लेखी प्राधिकृत करण्यासाठी जिल्हा निवडणुक अधिकारी यांची मान्यतात घेणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर नाही, मात्र जिल्हा निवडणूक अधिकारी यांना माहितीस्त कळविणे आवश्यक.

**प्रश्न ४ दाखल झालेल्या नामनिर्देशनपत्राच्या अनुक्रमांकानुसार छाननी करण्यात येते काय ?**

उत्तर होय. परंतु प्रत्येक उमेदवाराने दाखल केलेल्या सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी एका पाठोपाठ करण्यात येते.

**प्रश्न ५ नामनिर्देशनपत्रांची छाननी ही आधी राजकीय पक्षांचे व नंतर इतर उमेदवारांचे याप्रमाणे करण्यात येते काय?**

उत्तर नाही. दाखल झालेल्या नामनिर्देशनपत्राच्या अनुक्रमांकानुसार छाननी करण्यात येते. परंतु प्रत्येक एका उमेदवाराने दाखल केलेल्या सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी एका पाठोपाठ करण्यात येते.

**प्रश्न ६ छाननीत उमेदवाराचे नामनिर्देशनपत्रातील नमूद माहिती उपस्थितांना वाचून दाखविणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर नाही. तथापि, नामनिर्देशनपत्रामधील गंभीर दोष आणि त्यासोबत आवश्यक ती प्रतिज्ञापत्रे / घोषणापत्रे सादर केली आहेत अगर कसे ? याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थितांना सांगतील.

**प्रश्न ७ छाननीत उमेदवारांना इतर उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्राची पडताळणी / पाहणी करता येते काय?**

उत्तर होय. परंतु छाननीवेळी दाखल करण्यात आलेली नामनिर्देशनपत्रे व त्यासोबतच्या प्रतिज्ञापत्रांची पडताळणी करण्याची संधी ही उमेदवारांना त्यांची प्रत्यक्ष हाताळणी न करता देण्यात येते.

**प्रश्न ८ एखाद्या उमेदवाराने चार नामनिर्देशनपत्रे दाखल केली आहेत आणि छाननी दरम्यान त्याचे पहिले नामनिर्देशनपत्र वैध आढळून आले आहे, तर त्याच्या उर्वरित तीन नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्याची आवश्यकता आहे काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ९ कोणत्याही एका अथवा अनेक नामनिर्देशनपत्राबाबत कोणीही आक्षेप घेतला नाही, तर केवळ या मुद्द्यावरून ते / ती नामनिर्देशनपत्रे वैध ठरविता येतील काय ?**

उत्तर नाही. कोणत्याही नामनिर्देशनपत्राबाबत आक्षेप घेण्यात आला नसेल तरी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नगरपालिकेचे अधिनियम व निवडणूक नियमाच्या कसोटीवर सर्व नामनिर्देशनपत्रांची वैधता तपासून निर्णय घेणे आवश्यक आहे.

**प्रश्न १० छाननीमध्ये प्रत्येक नामनिर्देशनपत्राचे स्विकारणे अथवा नाकारणे याबाबत कारण / कारणे देऊन नामनिर्देशनपत्रावर निर्णय लिहिणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर छाननीमध्ये स्विकारण्यात आलेल्या नामनिर्देशनपत्राबाबत कारण नमुद करण्याची आवश्यकता नाही. परंतु ज्या नामनिर्देशनपत्राबाबत आक्षेप घेण्यात आला आहे किंवा जे नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्यात येणार आहे त्या प्रकरणी सविस्तर कारणमिमांसा नमुद करून निर्णय देणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(६))

**प्रश्न ११ एखाद्या स्विकारलेल्या अथवा नाकारलेल्या नामनिर्देशनपत्रावरील निर्णयाची साक्षांकित सत्यप्रत मिळू शकेल काय ?**

उत्तर होय. उमेदवाराने अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने लेखी विनंतीव्दारे मागणी केल्यास निर्णयाची साक्षांकित सत्यप्रत ताबडतोब देण्यात येईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १५(४))

**प्रश्न १२ उमेदवाराची पालिका सदस्य होण्यासाठी पात्रता आणि अपात्रता ही कोणत्या दिवशी विचारात घेण्यात येते?**

उत्तर उमेदवाराने दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्राची छाननी ही निवडणूक कार्यकमामध्ये छाननीसाठी विहित केलेल्या तारखेस होते. निवडणूक लढविणा-या उमेदवाराची पात्रता किंवा अपात्रता ही त्यांने नामनिर्देशंनपत्र दाखल केलेल्या तारखेस विचारात घेण्यात येते . नामनिर्देशपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जे उमेदवार अधिनियम,निवडणूक नियमानुसार पात्र असतील त्यांचीच नामनिर्देशंनपत्रे छाननीमध्ये मंजुर होतील व ते निवडणूक लढवू शकतील.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १५(४))

२) Ramchand V Dist.Dy.Collector,Barmati,५६ Bom L.R.९४०,९४२

३) Nisar Ahmad V Deolali Cantonment Board,A १९८८ SC २९०

४) Mangoo Sing V Election Tribunal Bareilly (१९५८) SC.J.१८६,१८७

**प्रश्न १३ छाननीमध्ये नामनिर्देशनपत्र व त्यासोबतच्या कागदपत्रांची छायाप्रत उमेदवारांना तपासण्यासाठी उपलब्ध करून दिली तर ते योग्य होईल काय ? / नामनिर्देशनपत्राच्या छायाप्रतीवरुन छाननी करता येईल काय ?**

उत्तर नाही. दररोज दाखल करण्यात आलेली नामनिर्देशनपत्रे व त्यासोबतची सर्व प्रतिज्ञापत्रे यांच्या छायाप्रती या त्याचदिवशी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येतात. त्यामुळे छाननीवेळी दाखल करण्यात आलेली नामनिर्देशनपत्रे व त्यासोबतच्या प्रतिज्ञापत्रांची पडताळणी करण्याची संधी ही उमेदवारांना त्यांची प्रत्यक्ष हाताळणी न करता देण्यात येईल.

**प्रश्न १४ एखाद्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत सादर केलेल्या शपथपत्रावर दुस-या व्यक्तीस आक्षेप घेता येऊ शकतो काय ? असल्यास कोणत्या प्रकारे ? त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी काय कार्यवाही करु शकतात ?**

उत्तर होय. कोणत्याही प्रतिस्पर्धी उमेदवाराने स्वत: केलेल्या शपथपत्राव्दारे किंवा घोषणापत्राव्दारे परस्पर विरोधी माहिती सादर केली असेल, तर ती माहिती संबंधित उमेदवाराच्या शपथपत्र किंवा घोषणापत्रासोबत निवडणूक निरणय अधिकारी यांच्या कार्यालयातील नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल आणि त्याच्या प्रती शुल्क आकारून निवडणूक लढविणारा कोणताही उमेदवार व मुद्रण / इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमाचा प्रतिनिधी यांना उपलब्ध करून देण्यात येतील.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/कार्या-०५ दिनांक १५ मार्च २००४ मधील परिच्छेद ४(४)(५))

**प्रश्न १५ निवडणूक निर्णय अधिकारी यांना छाननीअंती नामनिर्देशन पत्रावर निर्णय देण्याचे अधिकार आहेत काय?**

उत्तर होय प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर ते स्विकारण्यात आले आहे किंवा नामंजूर करण्यात आले आहे. या संबंधीचा निर्णय निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नमूद करणे आवश्यक आहे. नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्यात आले असल्यास नामंजूर केल्याबद्दल आपल्या कारणांचे संक्षिप्त निवेदन लेखी नमूद करणे आवश्यक आहे.

**प्रश्न १६ छाननीचे इतिवृत्त तयार करण्यात येते काय ?**

उत्तर निवडणूक नियमात त्याविषयी तरतूद नाही. तथापि, छाननीचे इतिवृत्त आवश्यकतेनुसार तयार करण्याचा निर्णय संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी घेतात.

## ६. आक्षेप व आक्षेपकाची जबाबदारी व संक्षिप्त चौकशी

**प्रश्न १ कोणत्याही नामनिर्देशनपत्राबाबत आक्षेप घेण्याचा अधिकार कोणास आहे ?**

उत्तर उमेदवारास, त्याचे सूचकास किंवा उमेदवाराद्वारे लेखी प्राधिकृत प्रतिनिधी यापैकी कोणालाही इतर सर्व उमेदवारांचे अर्ज प्रत्यक्ष पाहण्याचा किंवा त्यावर आक्षेप नोंदविण्याचा अधिकार आहे.

**प्रश्न २ छाननीत उमेदवारास लेखी आक्षेप नोंदविणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर छाननीमध्ये घेण्यात आलेल्या कोणत्याही निर्णयाविरूध्द दाद मागण्याची तरतूद असल्यामुळे उमेदवाराने लेखी आक्षेप नोंदविणे आवश्यक राहील.

**प्रश्न ३ छाननीत उमेदवारानी घेतलेल्या आक्षेपाच्या पृष्ट्यर्थ पुरावा म्हणून कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय. छाननीमध्ये घेण्यात आलेला आक्षेप पुराव्यासह शाबित करण्याची जबाबदारी ही आक्षेप घेणाऱ्याची आहे.

**प्रश्न ४ आक्षेपाच्या समर्थनात पुरावे देण्याची जबाबदारी कोणाची असते ?**

उत्तर छाननीमध्ये घेण्यात आलेला आक्षेप पुराव्यासह शाबित करण्याची जबाबदारी ही आक्षेप घेणाऱ्याची आहे.

**प्रश्न ५ दाखल झालेल्या आक्षेपावर चौकशी कोण करतो ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी हे दाखल करण्यात आलेल्या आक्षेपाबाबतची संक्षिप्त चौकशी करतात. (संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(२))

**प्रश्न ६ अपत्य संबंधात दाखल झालेल्या आक्षेपावर निवडणूक निर्णय अधिकारी चौकशी करुन आक्षेपाच्या उत्तरात निर्णय देऊ शकतात काय?**

उत्तर नाही.

**प्रश्न ७ गुन्हेगारी पार्श्वभूमी व स्थावर मालमत्ता संदर्भात दिलेल्या शपथपत्रात नमुद तपशीलाबाबत आक्षेप प्राप्त झाल्यास निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय देऊ शकतात काय ?**

उत्तर नाही. निवडणूक निर्णय अधिकारी हे शपथ्पत्रामध्ये दिलेल्या माहितीची सारांशाने छाननी करुन अथवा अन्यप्रकारे त्याची सत्यता पडताळून पहाणार नाहीत.परंतु कोणत्याही प्रतिस्पर्धी उमेदवारास स्वत: केलेल्या शपथपत्राव्दारे किंवा घोषणापत्राव्दारे परस्पर विरोधी माहिती सादर करण्याची सूचना निवडणूक निर्णय अधिकारी देतील आणि ती माहिती संबंधित उमेदवाराच्या शपथपत्र किंवा घोषणापत्रासोबत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातील नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल. त्याच्या प्रती शुल्क आकारून निवडणूक लढविणारा कोणताही उमेदवार व मुद्रण / इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमाचा प्रतिनिधी यांना शुल्क आकारून उपलब्ध करून देण्यात येतील.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/कार्या-०५ दिनांक १५ मार्च २००४ मधील परिच्छेद ४(४)(५)(६))

**प्रश्न ८ आक्षेपावर चौकशी करुन निर्णय देण्याचा कालावधी किती असतो? हरकतीच्या निर्णयाची प्रत आक्षेपकाला देण्यात येते काय ?**

उत्तर छाननीच्या दिवशी शक्यतो प्राप्त सर्व नामनिर्देशनपत्राची छाननी करून निर्णय दिला जातो. एखाद्या प्रकरणात दाखल करण्यात आलेला आक्षेप खोडून काढण्यासाठी व त्याविषयीचे पुरावे सादर करण्यासाठी उमेदवाराने वेळ देण्याची विनंती केल्यास किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वत:हून ठरविल्यास छाननीच्या लगतनंतरच्या दिवशी सकाळी ११.०० वाजेपर्यंत वेळ दिला जाऊ शकतो व त्यानंतर लगेचच आक्षेपावर संक्षिप्त चौकशीअंती निर्णय घेण्यात येऊन छाननी प्रक्रिया पूर्ण करण्यात येते. हरकतीच्या निर्णयाची प्रत आक्षेपक किंवा इतर उमेदवार, प्राधिकृत प्रतिनिधी यांनी मागणी केल्यास त्यांना देण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(५))

**प्रश्न ९ नामनिर्देशनपत्रासोबतची शपथपत्रे किती रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर सादर करणे आवश्यक आहे?**

उत्तर शपथपत्र स्टॅम्प पेपरवर सादर करणे आवश्यक नसून साध्या कागदावर सक्षम प्राधिका-यासमोर शपथ घेवून सादर करता येईल.

(संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२२/का.५, दि.०५/०१/२०१५)

## ७. आक्षेपावरील सुनावणी स्थगित करणेबाबत

**प्रश्न १ निवडणूक निर्णय अधिकारी यांना आक्षेपावरील सुनावणी स्थगित करण्याचे अधिकार आहेत काय? असल्यास कोणत्या कारणास्तव ?**

उत्तर निवडणूक निर्‌णय अधिकारी यांनी प्राप्त नामनिर्देशनपत्राची छाननी विहित दिनांकास पूर्ण करणे आवश्यक आहे. तथापि, छाननी प्रक्रियेत दंगल किंवा हिंसाचारामुळे अडथळा आल्यास किंवा मध्येच थांबविणे भाग पडल्याशिवाय इतर कारणांसाठी छाननी स्थगित करता येणार नाही. एखाद्या प्रकरणात दाखल करण्यात आलेला आक्षेप खोडून काढण्यासाठी व त्याविषयीचे पुरावे सादर करण्यासाठी उमेदवाराने वेळ देण्याची विनंती केल्यास किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वत:हून ठरविल्यास छाननीच्या लगतनंतरच्या दिवशी पर्यंत वेळ दिला जाऊ शकतो व त्यानंतर लगेचच आक्षेपावर संक्षिप्त चौकशीअंती निर्णय घेण्यात येऊन छाननी प्रक्रिया पूर्ण करण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(५))

**प्रश्न २ नामनिर्देशनपत्राबाबत आक्षेप घेण्यात आला आहे अशा एखाद्या उमेदवाराने अशा आक्षेपाचे खंडन करण्यासाठी वेळ मागितल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी अशा उमेदवाराला वेळ देऊ शकतात काय ?**

उत्तर होय. एखाद्या प्रकरणात दाखल करण्यात आलेला आक्षेप खोडून काढण्यासाठी व त्याविषयीचे पुरावे सादर करण्यासाठी उमेदवाराने वेळ देण्याची विनंती केल्यास छाननीच्या लगतनंतरच्या दिवशी पर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी वेळ देऊ शकतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(५))

**प्रश्न ३ छाननी कोणत्या कारणासाठी स्थगित ठेवता येते ?**

उत्तर छाननी स्थगित ठेवता येत नाही. परंतु निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या क्षमतेबाहेरील कारणांसाठी जसे, दंगल किंवा उघड हिंसाचारामुळें छाननी प्रक्रिया बंद पडल्यास किंवा त्यात अडथळा आल्यास विहित दिनांकाच्या लगतनंतरच्या दिवसापर्यंत छाननी प्रक्रिया स्थगित ठेवता येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(५))

## ८. नामनिर्देशनपत्र स्विकारणे अथवा नाकारणे यावरील अपील

**प्रश्न १ छाननीमध्ये नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात अथवा नाकारण्यात आले असेल, तर त्याविरूध्द दाद मागता येईल काय ? असल्यास कोणाकडे ?**

उत्तर होय. छाननीमध्ये नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात अथवा नाकारण्यात आलेल्या कोणत्याही निर्णयाविरूध्द जिल्हा न्यायालयामध्ये अपील करण्याची तरतूद आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १५(१))

**प्रश्न २ छाननीमध्ये नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात अथवा नाकारण्यात आले असेल तर त्याविरूध्द अपिल कधीपर्यंत दाखल करता येईल ?**

उत्तर छाननीमध्ये नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात अथवा नाकारण्यात आले असेल तर कोणत्याही उमेदवारास वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून तीन दिवसामध्ये जिल्हा न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १५(२) )

**प्रश्न ३ अपील कालावधीचा शेवटचा दिवस हा रविवार अथवा सार्वजनिक सुट्टी असेल तर नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात अथवा नाकारण्यात आलेल्या निर्णयाविरूध्द सदरचे अपिल केव्हा दाखल करावे लागेल ?**

उत्तर अपील कालावधीचा शेवटचा दिवस सुट्टीचा असल्यास सुट्टीलगतनंतरच्या कार्यालयीन दिवशी अपील दाखल करता येऊ शकते.

(संदर्भ- लक्ष्मीबाई दारपेल विरूध्द निवडणूक निर्णय अधिकारी, कोपरगांव नगरपालिका व इतर, १९९९ (१) महाराष्ट्र लॉ जर्नल ४८६)

**प्रश्न ४ ज्या प्रसंगी अपिल दाखल करण्यात आले असेल त्या प्रसंगी संबंधित उमेदवाराने कोणती जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे ?**

उत्तर १. अपील दाखल करण्यात आलेल्या प्रसंगी संबंधित उमेदवाराने अपील दाखल केल्याच्या लगत नंतरच्या दुसऱ्या दिवशीच्या दुपारी ३.०० वाजेपर्यंत अपिल दाखल केल्यासंबंधीची नोटीस व अपिल मेमोच्या स्वतः व्यतिरिक्त इतर वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांच्या संख्येइतक्या प्रती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास दिल्या पाहिजेत.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १५(२))

**प्रश्न ५ उमेदवाराने अपिल दाखल केल्याची नोटीस निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिल्यानंतर, त्यांनी कोणती जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने त्यास उमेदवारानी अपील दाखल केल्याची नोटीस व अपील मेमोच्या प्रती प्राप्त झाल्यानंतर विहीत नमुना ५ मधील नोटीस त्यांच्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करेल, ज्यामध्ये न्यायालयामध्ये अपीलावरील सुनावणीची तारीख जी अपील कालावधीनंतरचा तिसरा दिवस असेल असा तिसरा दिवस सार्वजनिक सुट्टीचा असल्यास त्याच्या लगतनंतरच्या कार्यालयीन दिवस व अपील मेमोची प्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याचे नमूद करेल.

निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेल्या सर्व नामनिर्देशनपत्रांच्या प्रती व त्यावर छाननी मध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाची प्रत व त्यास योग्य वाटतील अशी इतर कागदपत्रे जिल्हा न्यायालयाकडे पाठवून देईल.

(संदर्भ– महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १५(३))

**प्रश्न ६ उमेदवाराकडून दाखल करण्यात येणाऱ्या अपीलामध्ये इतर सर्व उमेदवारांना प्रतिवादी करणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय. त्याच मतदार संघातील वैधरित्या नामनिर्दिष्ट सर्व उमेदवारांना जिल्हा न्यायालयात दाखल केलेल्या अपिलामध्ये प्रतिवादी करणे आवश्यक आहे.

(संदर्भ– महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १५(५))

**प्रश्न ७ उमेदवाराने दाखल केलेल्या अपीलाच्या सुनावणीसाठी वादी किंवा प्रतिवादी यांना जिल्हा न्यायालयाकडून स्वतंत्ररित्या नोटीस पाठविण्याची तरतूद आहे काय ?**

उत्तर उमेदवाराने दाखल केलेल्या अपीलाच्या सुनावणीसाठी वादी किंवा प्रतिवादी यांना जिल्हा न्यायालयाकडून स्वतंत्ररित्या नोटीस पाठविण्याची तरतूद नाही. निवडणूक निर्णय अधिकारी यांना अपिलाची नोटीस व अपिल मेमो प्राप्त झाल्यानंतर ते नमुना ५ मधील नोटीस त्यांच्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करतात. अशी नोटीस प्रसिध्द करणे हे सर्व प्रतिवादींना सुचित करण्यासाठी पुरेसे आहे.

संदर्भ– महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १५(३)(६))

**प्रश्न ८ जिल्हा न्यायालयाच्या अपीलामधील निर्णयास अनुसरून निवडणूक निर्णय अधिकारी यांना नमुना - ४ मधील वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांची यादी केव्हा दुरूस्त करणे आवश्यक राहील ?**

उत्तर जिल्हा न्यायालयाने अपीलामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांचा निर्णय रद्द केला तर निवडणूक निर्णय अधिकारी यांना नमुना - ४ मधील वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांची यादी दुरूस्त करणे आवश्यक राहील.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १५(९))

**प्रश्न ९ जिल्हा न्यायालयाने अपीलामध्ये दिलेल्या निर्णयाविरूध्द दाद मागता येईल काय ?**

उत्तर नाही. जिल्हा न्यायालयाचा अपिलामधील निर्णय हा अंतिम असतो व त्या विरुध्द अपिल करता येत नाही.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १५(१०))

## ९. वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी तयार करणे व प्रसिध्द करणे

**प्रश्न १ वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार म्हणजे काय ?**

उत्तर ज्या उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे छाननीमध्ये वैध ठरविण्यात आली आहे अशा उमेदवारांना वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार म्हणतात.

**प्रश्न २ वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी केव्हा तयार करण्यात येते ?**

उत्तर छाननी प्रक्रिया पूर्ण होताच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी नमुना - ४ मध्ये तयार करण्यात येऊन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येते.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(९))

**प्रश्न ३ वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी तयार करणेबाबत कोणते निकष / मार्गदर्शक सूचना आहेत ?**

उत्तर सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात आल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी ज्याची नामनिर्देशनपत्रे वैध असल्याचे आढळून आले असेल, अशा उमेदवारांची यादी त्यासाठी विहीत केलेल्या नमुना ४ मध्ये तयार करतील व त्यावर प्रसिध्दीचे ठिकाण व दिनांक नमुद करुन त्यांच्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करतील. एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्रे मंजुर झालेल्या उमेदवाराचे नाव या यादीमध्ये एकदाच नमुद केले जाते. उमेदवारांची नावे नामनिर्देशनपत्रामध्ये जशी देण्यात आली असतील तशीच ती या यादीमध्ये दर्शविण्यात येतील. तसेच या यादीमधील उमेदवारांच्या नावाचा क्रम हा नामनिर्देशनपत्रामधील आडनावे नमूद केलेल्या उमेदवारांच्या आडनावाच्या आणि नावे नमूद केलेल्या उमेदवारांच्या नावाच्या वर्णक्रमानुसार ठरविण्यात येईल.

**प्रश्न ४ वैधरित्या नामनिर्देशित उमेदवाराची यादी कोण प्रसिध्द करतात व कोठे प्रसिध्द करतात?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी हे वैधरित्या नामनिर्देशित उमेदवाराची यादी (नुमना - ४) त्यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(८) )

**प्रश्न ५ वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीत कोणता तपशील देण्यात येतो ?**

उत्तर वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीमध्ये (नुमना - ४) उमेदवाराचे संपूर्ण नाव व पूर्ण पत्ता यांचा तपशील देण्यात येतो.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३(८) )

**प्रश्न ६ छाननीत अवैध ठरविलेल्या उमेदवारांची यादी देखील प्रसिध्द करण्यात येते काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ७** **एखाद्या उमेदवाराने दाखल केलेल्या चार नामनिर्देशनपत्रापैकी फक्त एकच स्विकारण्यात आले असून, उर्वरित तीन फेटाळण्यात आली असतील तर त्या उमेदवाराचे उमेदवारीवर काय परिणाम होऊ शकतो ?**

उत्तर त्या उमेदवाराचे नाव नमुना - ४ मधील वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येईल. सदर उमेदवाराची उमेदवारी कायम राहते.

**प्रश्न ८** **वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी तयार करताना उमेदवारांची नावे कोणत्या क्रमाने असावीत?**

उत्तर उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रामध्ये आडनावे नमुद केली असल्यास आडनावाच्या आणि इतर उमेदवारांच्या नावाच्या वर्णक्रमानुसार नावे असावीत.

**प्रश्न ९** **एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे दाखल केली असून, छाननीमध्ये ती सर्व स्विकारण्यात आली असतील तर वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांच्या यादीमध्ये त्या उमेदवाराचे नाव एकापेक्षा अधिक वेळा नमुद करणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर नाही. उमेदवाराचे नाव एकाच वेळी नमुद करण्यात येईल.

# प्रकरण १२.

# उमेदवारी मागे घेणे

# (Withdrawal of Candidature)

## १. उमेदवारी मागे घेणेबाबत तरतुदी

**प्रश्न १ उमेदवारी मागे घेण्याची नोटीस कोणाकडे व कोणत्या ठिकाणी सादर करणे आवश्यक आहे ?**

उत्तर उमेदवारी मागे घेण्याची नोटीस ही उमेदवाराने लेखी स्वरुपात स्वतः किंवा त्याच्याद्वारे लेखी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारे निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नमुना-१ मधील निवडणूक कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी म्हणजेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(१))

**प्रश्न २ उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिवस कोणत्या तरतुदीन्वये निश्चित करण्यात येतो ?**

उत्तर नगरपालिका निवडणुकीमध्ये उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिवस महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४ (१) (क) अन्वये निश्चित करण्यात येतो. ज्या मतदार संघात निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या छाननीमधील निर्णयाविरूध्द जिल्हा न्यायालयात अपिल दाखल केले नसेल त्यामध्ये अपील कालावधी संपल्यानंतरचा दुसरा दिवस व असा दुसरा दिवस सार्वजनिक सुट्टीचा असल्यास लगतनंतरचा कार्यालयीन कामकाजाचा दिवस उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिवस असेल. ज्या मतदार संघात निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या छाननीमधील निर्णयाविरूध्द जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले असेल अशा प्रकरणात जिल्हा न्यायालयाने निर्णय दिल्यानंतरचा दुसरा दिवस व असा दिवस सार्वजनिक सुट्टीचा असल्यास लगतनंतरचा कार्यालयीन दिवस उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिवस असेल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(१))

**प्रश्न ३ उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या दिवशी उमेदवारी मागे घेण्याची नोटीस कोणत्या वेळेदरम्यान सादर करणे आवश्यक आहे ?**

उत्तर नमुना-१ मधील निवडणूक कार्यक्रमामध्ये नमूद केल्यानुसार उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजण्यापूर्वी उमेदवारी मागे घेण्याची नोटीस सादर करणे आवश्यक आहे. तथापि, छाननीच्या दिवशी छाननी पूर्ण होऊन वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द केल्यानंतर कार्यालयीन वेळ संपण्यापूर्वी उमेदवारी मागे घेण्याची नोटीस सादर करता येईल. तसेच छाननीनंतरच्या दिवशी जर तो दिवस सार्वजनिक सुट्टीचा नसेल तर उमेदवारी मागे घेण्याची

नोटीस ही कार्यालयीन वेळेमध्ये (सकाळी ११.०० पूर्वी आणि दुपारी ३.०० नंतर सुध्दा) सादर करता येईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(२))

**प्रश्न ४ उमेदवारी मागे घेण्याची नोटीस विहित नमुन्यामध्ये असणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७)

**प्रश्न ५ वैधरित्या उमेदवारी मागे घेण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी कोणत्या आहेत ?**

उत्तर उमेदवाराने त्याची उमेदवारी मागे घेण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.:-

१. उमेदवारी मागे घेण्याची सूचना लेखी स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे.

२. उमेदवारी मागे घेण्याच्या सूचनेवर उमेदवाराची स्वाक्षरी / सही / अंगठा असणे आवश्यक आहे.

३. उमेदवारी मागे घेण्याची सूचना उमेदवाराने स्वत: किंवा त्याच्याद्वारे लेखी प्राधिकृत केलेला सूचक किंवा निवडणूक प्रतिनिधीद्वारे निवडणूक निर्णय अधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे.

४. उमेदवारी मागे घेण्याची सूचना त्याकरिता विहित करण्यात आलेल्या अंतिम दिनांकास दुपारी ३.०० वा. पूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(३))

**प्रश्न ६ एखाद्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये फेटाळण्यात आले असेल, तर त्या उमेदवाराने माघारीसाठी सूचना सादर करणे आवश्यक आहे का ?**

उत्तर नाही. छाननी पूर्ण झाल्यानंतर वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येते. फक्त या यादीमध्ये नाव नमूद असलेले उमेदवारच माघारीसाठी सूचना सादर करू शकतात.

**प्रश्न ७ उमेदवारी मागे घेत असलेल्या प्रत्येक उमेदवाराच्या सदर सूचनेबाबतचे कारण निवडणूक निर्णय अधिकारी यांनी तपासणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर नाही. निवडणूक नियमात उमेदवारी मागे घेण्याच्या कारणांची तपासणी करण्याबाबत तरतूद नाही.

**प्रश्न ८ दुसरा किंवा चौथा शनिवार किंवा जिल्हा प्रशासनाकडून स्थानिक सुट्टी जाहीर केली जाते अशा शासकीय कार्यालये बंद असलेल्या दिवशी उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज सादर करता येईल काय?**

उत्तर नाही, सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज सादर करता येत नाही. दुसरा किंवा चौथा शनिवार किंवा जिल्हा प्रशासनाकडून स्थानिक सुट्टी जाहीर केली जाते असा शासकीय कार्यालये बंद असलेला दिवस हा परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ (Negotiable Instruments Act, १८८१) चे कलम २५ अन्वये जाहीर केलेला सार्वजनिक सुट्टीचा दिवस किंवा राज्य शासनाने/जिल्हाधिका-याने शासकिय कार्यालयासाठी अधिसूचीत केलेला सार्वजनिक सुट्टीचा दिवस होय. त्यामुळे दुसरा किंवा चौथा शनिवार किंवा जिल्हा प्रशासनाकडून स्थानिक सुट्टी जाहीर केली जाते

असा शासकीय कार्यालये बंद असलेल्या दिवशी उमेदवारी मागे घेण्याची सूचना सादर करता येणार नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २ (b-१) व १७ )

**प्रश्न ९ नामनिर्देशनपत्रांची छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच त्याच दिवशी उमेदवारी मागे घेता येईल काय?**

उत्तर होय. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याद्वारे वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द केल्यानंतर त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत उमेदवारी मागे घेण्याबाबतची सूचना सादर करता येईल.

**प्रश्न १० छाननीमधील निर्णयाच्या विरोधामध्ये कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल तर त्या उमेदवारासाठी उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी कोणता राहील ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमामध्ये उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी निश्चित करण्यात आलेला असतो. सर्वसाधारणपणे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याद्वारे वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत व उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिनांकास दुपारी ३.०० वा. पर्यंत उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी असतो.

ज्या मतदार संघात छाननीमधील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निर्णयाविरूध्द जिल्हा न्यायालयात अपिल दाखल केले नसेल त्यामध्ये अपील कालावधी संपल्यानंतरचा दुसरा दिवस व असा दुसरा दिवस सार्वजनिक सुट्टीचा असल्यास लगतनंतरचा कार्यालयीन कामकाजाचा दिवस उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिवस असतो.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(१)(अ))

**प्रश्न ११ छाननीमधील निर्णयाच्या विरोधामध्ये अपील दाखल करण्यात आले असेल, तर त्या उमेदवारासाठी उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी कोणता राहील ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमामध्ये उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी निश्चित करण्यात आलेला असतो. सर्वसाधारणपणे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याद्वारे वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत व उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिनांकास दुपारी ३.०० वा. पर्यंत उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी असतो. ज्या मतदार संघात छाननीमधील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निर्णयाविरूध्द जिल्हा न्यायालयात अपिल दाखल केले असेल त्यामध्ये अपील प्रकरणात जिल्हा न्यायालयाने निर्णय दिल्याच्या दिनांकानंतरचा दुसरा दिवस व असा दुसरा दिवस सार्वजनिक सुट्टीचा असल्यास लगतनंतरचा कार्यालयीन कामकाजाचा दिवस उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिवस असतो.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(१)(ब))

**प्रश्न १२ एखाद्या उमेदवाराने नोंदणीकृत राजकीय पक्षातर्फे आणि अपक्ष म्हणून दाखल केलेली सर्व नामनिर्देशनपत्रे छाननीमध्ये स्विकारण्यात आली असतील आणि त्या उमेदवारास अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची इच्छा असेल, तर स्विकारण्यात आलेल्या नामनिर्देशनपत्रापैकी कोणते नामनिर्देशनपत्र त्याने मागे घेणे आवश्यक आहे ?**

उत्तर छाननीनंतर अशा उमेदवाराचे नाव हे विहित नमुन्यात वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांच्या यादीमध्ये समाविष्ट केले जाईल. तसेच या उमेदवाराने ज्या नोंदणीकृत राजकीय पक्षातर्फे नामनिर्देशनपत्र दाखल केले आहे त्या राजकीय पक्षाचा आता तो उमेदवार होईल. यास्तव त्यास अपक्ष म्हणून निवडणूक लढविता येणार नाही. त्यामुळे त्याने उमेदवारी मागे घेण्यासाठीचा अर्ज सादर केल्यास त्याची उमेदवारी संपुष्टात येईल.

**प्रश्न १३ नोंदणीकृत राजकीय पक्षाचा पर्यायी उमेदवार हा मुख्य उमेदवार केव्हा होऊ शकतो ?**

उत्तर नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या मुख्य उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये नामंजूर झाल्यास किंवा मुख्य उमेदवाराने निवडणुकीमधून उमेदवारी मागे घेतल्यास व नोंदणीकृत राजकीय पक्षाने सादर केलेल्या जोडपत्र दोनमध्ये मुख्य उमेदवाराचा पर्यायी उमेदवार म्हणून नाव नमूद असलेल्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र स्विकृत झाल्यास असा पर्यायी उमेदवार त्या राजकीय पक्षाचा मुख्य उमेदवार होऊ शकेल.

**प्रश्न १४ एखाद्या व्यक्तीने उमेदवारी मागे घेण्याबाबत सूचना दिल्यानंतर ती रद्द करणेबाबत परवानगी देण्यात येते का ?**

उत्तर नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(४))

**प्रश्न १५ मुदतीनंतर उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेली नोटीस वैध ठरते काय ?**

उत्तर नाही. उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेली नोटीस ही उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजण्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(२))

**प्रश्न १६ उमेदवारी मागे घेण्याची नोटीस देताना उमेदवार किंवा प्रतिनिधीची ओळख पटविली जाते काय?**

उत्तर होय. उमेदवारी मागे घेण्याची सूचना मिळाल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी अशा सूचनेच्या खरेपणाची आणि ती सुपूर्द करणाऱ्या व्यक्तीची म्हणजेच उमेदवार किंवा प्राधिकृत प्रतिनिधीच्या खरेपणाची पडताळणी करतात व त्यासाठी त्यांची ओळख पटविली जाते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(५))

## २.  उमेदवारी कोण मागे घेऊ शकतो

**प्रश्न १  उमेदवारी मागे घेण्याबाबतची सूचना उमेदवाराने स्वत: देणे बंधनकारक आहे का ?**

उत्तर  नाही. उमेदवारी मागे घेण्याबाबतची सूचना उमेदवाराने स्वत: किंवा त्याचा सूचक किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, सूचक किंवा निवडणूक प्रतिनिधी यांना उमेदवाराने त्याबाबत लेखी प्राधिकृत करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(३))

**प्रश्न २  उमेदवाराने प्राधिकृत केलेला व्यक्ती उमेदवारी अर्ज मागे घेऊ शकतो काय ?**

उत्तर  उमेदवारी मागे घेण्याबाबतची उमेदवाराने स्वाक्षरी केलेली सूचना उमेदवाराने स्वत: किंवा सूचक किंवा निवडणूक प्रतिनिधीने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, सूचक किंवा निवडणूक प्रतिनिधी यांना उमेदवाराने त्याबाबत लेखी प्राधिकृत करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस उमेदवारी अर्ज मागे घेण्याबाबतची सूचना देण्यासाठी प्राधिकृत करता येत नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(३))

**प्रश्न ३  सूचक हे उमेदवारी मागे घेऊ शकतात काय ?**

उत्तर  होय. उमेदवाराने लेखी प्राधिकृत केल्यास उमेदवाराचा सूचक हा उमेदवाराने स्वाक्षरी केलेली उमेदवारी मागे घेण्याची सूचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करू शकतो.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(३))

**प्रश्न ४  उमेदवाराची संमती नसताना, त्या उमेदवाराच्या सूचकास अथवा निवडणूक प्रतिनिधीस त्या उमेदवाराची उमेदवारी मागे घेण्याचा अधिकार आहे काय ?**

उत्तर  नाही. उमेदवारी मागे घेण्याची सूचना लेखी स्वरूपात व त्यावर उमेदवाराने संमतीदर्शक स्वाक्षरी केली असणे आवश्यक आहे. उमेदवाराच्या संमतीशिवाय इतर कोणालाही त्याची उमेदवारी मागे घेण्याचा अधिकार नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७(३))

**प्रश्न ५  निवडणूक लढविणा-या उमेदवारापैकी एक उमेदवार दुस-या उमेदवाराचा अर्ज मागे घेऊ शकतो काय?**

उत्तर  नाही. निवडणूक लढविणा-या उमेदवारापैकी एक उमेदवार दुस-या उमेदवाराचा अर्ज हा उमेदवार या नात्याने मागे घेऊ शकत नाही.

**प्रश्न ६ राजकीय पक्ष / आघाडी यांचे सचिव / प्राधिकृत पदाधिकारी उमेदवारांचे अर्ज मागे घेण्यासाठी अर्ज करु शकतात का ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ७ उमेदवारी मागे घेण्याची नोटीस सादर करण्यात आल्यानंतर त्या नोटीसीची सत्यता निवडणूक निर्णय अधिकारी कशी पडताळून पाहतात ?**

उत्तर उमेदवारी मागे घेण्याची सूचना मिळाल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी अशा सूचनेच्या खरेपणाची आणि ती सुपूर्द करणाऱ्या व्यक्तीची म्हणजेच उमेदवार किंवा प्राधिकृत प्रतिनिधीच्या खरेपणाची पडताळणी करतात व त्यासाठी त्यांची ओळख पटविली जाते. उमेदवारी मागे घेण्याच्या सूचनापत्रावरील व प्राधिकारपत्र दिले असल्यास त्यावरील उमेदवाराची स्वाक्षरी आणि नामनिर्देशनपत्रावरील स्वाक्षरी पडताळून पाहिली जाते. उमेदवारी मागे घेण्याची सूचना दाखल करणाऱ्या व्यक्तीची ओळख शासनाद्वारे निर्गमित केलेल्या छायाचित्रासह ओळखपत्र उदा. निवडणूक ओळखपत्र (EPIC), आधार कार्ड (UID), आयकर पॅनकार्ड इत्यादीवरून पटविली जाते.

**प्रश्न ८ उमेदवारी मागे घेण्याची नोटीस टपालाने अथवा फॅक्सव्दारे पाठविता येते काय ?**

उत्तर नाही. उमेदवारी मागे घेण्याची सूचना स्वतः उमेदवाराने अथवा त्याच्याद्वारे लेखी प्राधिकृत केलेला सूचक किंवा निवडणूक प्रतिनिधीने निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे टपालाद्वारे व फॅक्सद्वारे पाठविलेली उमेदवारी मागे घेण्याची सूचना वैध ठरत नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७ (१) (३))

**प्रश्न ९ नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या अथवा अपक्ष उमेदवारांच्या संदर्भात, उमेदवारी मागे घेण्याची नोटीस कोणत्या सूचकाने सादर करावी ?**

उत्तर नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या अथवा अपक्ष उमेदवाराच्या संदर्भात त्याच्या कोणत्याही एका सूचकास त्या उमेदवाराने लेखी प्राधिकृत केले असेल तर उमेदवारी मागे घेण्याची नोटीस निवडणूक निर्णय अधिकारी यांना सादर करता येईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७ (३))

**प्रश्न १० उमेदवारी मागे घेण्याची नोटीस विहित मुदतीमध्ये सादर केल्यानंतर त्याची पोहोच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून मिळू शकते काय ?**

उत्तर होय. उमेदवाराकडून अथवा त्याच्या लेखी प्राधिकृत व्यक्तीकडून उमेदवारी मागे घेण्याची सूचना प्राप्त झालेनंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून त्याबाबत पोहोच देण्यात येते.

**प्रश्न ११ वैधरित्या उमेदवारी मागे घेतली असेल तर नामनिर्देशनपत्राबरोबर जमा केलेली अनामत रक्कम परत मिळू शकते काय ?**

उत्तर होय. त्याविषयी लेखी अर्ज केल्यानंतर अनामत रक्कम परत मिळू शकते.

**प्रश्न १२ वैधरित्या उमेदवारी मागे घेतली असेल तर निवडणुकीच्या खर्चाचा दैनंदिन आणि अंतिम हिशोब कधीपर्यंत सादर करणे आवश्यक राहील ?**

उत्तर वैधरित्या उमेदवारी मागे घेतली असेल तर त्यास निवडणूक खर्चाचा दैनंदिन हिशेब ज्या दिवशी उमेदवारी मागे घेतली आहे त्या दिवसाच्या दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे. परंतु निवडणूक खर्चाचा अंतिम हिशोब सादर करण्याची आवश्यकता नाही. निवडणूक खर्चाचा अंतिम हिशोब हा फक्त निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने सादर करणे बंधनकारक आहे.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.रानिआ/१०९५/१०१/ कार्या.३, दि.७/२/१९९५)

**प्रश्न १३ उमेदवारी मागे घेण्याबाबत वाद असल्यास त्याविरूध्द अपील दाखल करता येईल काय ?**

उत्तर नाही. या संदर्भातील निवडणूक निर्णय अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

## ३. <u>उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे</u>

**प्रश्न १ उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या कालावधीमध्ये दररोज प्राप्त होणाऱ्या उमेदवारी माघारीची माहिती कोणत्या नमुन्यात प्रसिध्द करण्यात येते ?**

उत्तर यासाठी राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये दररोज प्राप्त होणाऱ्या उमेदवारी माघारीची माहिती प्रसिध्द करण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७ (५))

**प्रश्न २ उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या कालावधीमध्ये दररोज प्राप्त होणाऱ्या उमेदवारी माघारीची माहिती विहित नमुन्यामध्ये कधी आणि कोणत्या ठिकाणी प्रसिध्द करणे आवश्यक आहे ?**

उत्तर उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिनांका व्यतिरिक्त इतर दिवशी कार्यालयीन कामकाजाची वेळ संपल्यानंतर व उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिनांकास दुपारी ३.०० नंतर उमेदवारी माघारी बाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगाद्वारे विहित केलेल्या नमुन्यात निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयीन सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १७ (५))

**प्रश्न ३ उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या कालावधीमध्ये दररोज प्राप्त होणाऱ्या उमेदवारी माघारीची माहिती कोणास कळविणे आवश्यक आहे ?**

उत्तर दररोज प्राप्त होणाऱ्या उमेदवारी माघारीची माहिती ही जिल्हा निवडणूक अधिकारी आणि राज्य निवडणूक आयोगास कळविणे आवश्यक आहे.

**प्रश्न ४ अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी कधी प्रसिध्द केली जाते ?**

उत्तर उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत ज्या वैधरित्या नामनिर्दिष्ट केलेल्या उमेदवारांनी त्यांची उमेदवारी मागे घेतली आहे अशा उमेदवारांची नावे वगळून आणि त्यांना नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या लगतच्या दिवशी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी विहित नमुन्यामध्ये प्रसिध्द केली जाते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १६ (४))

## ४. बिनविरोध निवडणूक

**प्रश्न १ बिनविरोध निवडणूक म्हणजे काय ?**

उत्तर वैधरित्या नामनिर्दिष्ट केलेल्या उमेवारांच्या यादीमधील फक्त एक उमेदवार वगळता अन्य सर्व उमेदवारांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या कालावधीमध्ये त्यांची उमेदवारी वैधरित्या मागे घेतली असेल तर ती निवडणूक बिनविरोध झाल्याचे समजण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २४)

**प्रश्न २ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे केव्हा व कसे घोषित करण्यात येते ? अशी घोषणा करण्याचा अधिकार कोणाला आहे ?**

उत्तर उमेदवारी मागे घेण्याच्या विहित कालावधीमध्ये वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांपैकी एक वगळता अन्य सर्व उमेदवारांनी त्यांची उमेदवारी वैधरित्या मागे घेतली असल्यास, उमेदवारी मागे न घेणाऱ्या उमेदवारास उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिनांकास दुपारी ३.०० वा. नंतर निवडणूक निर्णय अधिकारी बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करतात. उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतर एकच उमेदवार शिल्लक राहील्यास त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगाला सादर करण्यात येवून आयोगाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी अशी घोषणा करतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २४ आणि राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२००४/ प्र.क्र.३७/ का.५, दिनांक २३ डिसेंबर २००४)

**प्रश्न ३ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्यात येते का ?**

उत्तर होय. उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतर एकच उमेदवार शिल्लक राहील्यास त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगाला सादर करण्यात येवून आयोगाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी उमेदवार बिनविरोध निवडून आल्याची घोषणा करतात.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२००४/ प्र.क्र.३७/ का.५, दि.२३ डिसेंबर २००४)

**प्रश्न ४ उमेदवार बिनविरोध निवडून आला असेल, तर नामनिर्देशनपत्राबरोबर जमा केलेली अनामत रक्कम त्यास परत मिळू शकते काय ?**

उत्तर होय. बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवाराने लेखी अर्ज केल्यानंतर त्यास अनामत रक्कम परत मिळू शकते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १४ )

**प्रश्न ५ उमेदवार बिनविरोध निवडून आला असेल, तर निवडणुकीच्या खर्चाचा दैनंदिन आणि अंतिम हिशोब कधीपर्यंत सादर करणे आवश्यक आहे ?**

उत्तर उमेदवार बिनविरोध निवडून आला असेल तर त्याच्या निवडणूक खर्चाचा दैनंदिन हिशोब तो उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर झाल्याच्या दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे आणि निवडणुकीच्या खर्चाचा अंतिम हिशोब निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/१०९५/१०१/ कार्या.३, दिनांक ०७/०२/१९९५)

**प्रश्न ६ उमेदवार बिनविरोध निवडून आला असेल तर त्यास प्रमाणपत्र केव्हा देण्यात यावे ?**

उत्तर उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाहीर केल्यानंतर लगेचच त्याबाबतचे प्रमाणपत्र उमेदवारास देण्यात यावे.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. रानिआ/१०९५/सीआर-११/ कार्या.३, दिनांक १०/०४/१९९५ )

**प्रश्न ७ उमेदवार बिनविरोध निवडून आला असेल तरीही अशा प्रकरणी निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय. अशा प्रकरणी निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी नमुना - ७ मध्ये तयार करून प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

# प्रकरण १३.

## चिन्ह वाटप व मतपत्रिका छपाई

## (Allotment of Symbol & Printing of Ballot Papers)

### १. चिन्हांची यादी - राखीव व मुक्त चिन्हे

**प्रश्न १ निवडणूक चिन्हांचे प्रकार कोणते ? व ते कोठे पहावयास मिळतील ?**

उत्तर निवडणूक चिन्हांचे आरक्षित चिन्हे व मुक्त चिन्हे असे दोन प्रकार आहेत. राज्य निवडणूक आयोगाकडून शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या एक किंवा अधिक अधिसुचनेव्दारे चिन्हांची सूची जाहिर करण्यात येते. मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकीय पक्षांसाठीची आरक्षित चिन्हे व मुक्त चिन्हांचे तक्ते जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर पहावयास मिळतात.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ४ व १०)

**प्रश्न २ राखीव निवडणूक चिन्हे कोणासाठी आहेत ?**

उत्तर भारत निवडणूक आयोगाद्वारे निर्गमीत केलेल्या निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, १९६८ आणि त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणान्वये राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळालेला आणि महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदविण्यात आलेल्या राष्ट्रीय पक्ष किंवा राज्यस्तरीय पक्ष, इतर राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष ज्याची नोंदणी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे अशा पक्षांतर्फे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना आरक्षित चिन्हे राखीव असतात.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ४ (२))

**प्रश्न ३ मुक्त निवडणूक चिन्हे कोणास मिळू शकतात ?**

उत्तर मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत उमेदवारांव्यतिरिक्त अन्य उमेदवारांना मुक्त निवडणूक चिन्हे मिळू शकतात.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ८)

**प्रश्न ४ राखीव व मुक्त चिन्हांची यादी कोण तयार व प्रसिध्द करते ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाकडून तयार करण्यात आलेली राखीव व मुक्त चिन्हांची सूची ही शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येते.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद १०)

**प्रश्न ५ नोंदणीकृत मान्यताप्राप्त राष्ट्रीय अथवा राज्य पक्षातर्फे निवडणूक लढवित असलेल्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रामध्ये मुक्त चिन्हांची मागणी केली असेल, तर त्यास ते चिन्ह मिळू शकते काय ?**

उत्तर नाही. मान्यताप्राप्त राष्ट्रीय अथवा राज्य पक्षातर्फे निवडणूक लढवित असलेल्या उमेदवारास निवडणूक आयोगाद्वारे त्या पक्षाकरिता आरक्षित करण्यात आलेले चिन्ह वाटप करण्यात येईल आणि इतर कोणतेही चिन्ह दिले जाणार नाही.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ६(१))

**प्रश्न ६ नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष किंवा अपक्ष उमेदवाराने नामनिर्देशनपत्रामध्ये राखीव चिन्हाची मागणी केली असेल, तर त्यास ते चिन्ह मिळू शकते काय ?**

उत्तर नाही. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्ष किंवा अपक्ष उमेदवारांना राखीव चिन्ह वाटप करता येत नाही.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ८(१))

**प्रश्न ७ एखाद्या निवडणुकीमध्ये नोंदणीकृत मान्यता प्राप्त राजकीय पक्षातर्फे उमेदवार उभा केला नसेल तर अशा पक्षाकरिता राखून ठेवलेल्या चिन्हाची निवड अन्य उमेदवार करू शकतात काय ?**

उत्तर नाही. मान्यताप्राप्त पक्षाकरिता राखीव असलेले चिन्ह त्या पक्षातर्फे पुरस्कृत असलेल्या उमेदवाराशिवाय इतर कोणासही मागणी करता येत नाही किंवा वाटप करता येत नाही.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ६(३))

**प्रश्न ८ नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष किंवा अपक्ष उमेदवारास राज्य निवडणूक आयोगाने नुकत्याच अधिसूचित केलेल्या मुक्त चिन्हांच्या यादी व्यतिरिक्त अन्य चिन्हची मागणी करता येईल काय ?**

उत्तर नाही. नगरपरिषद अथवा नगरपंचायतीची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ मधील व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणानुसार निर्गमित निवडणूक चिन्हांच्या तक्त्यामधील चिन्हांचीच मागणी करता येते. परंतु नोंदणीकृत अमान्यता प्राप्त राजकीय पक्ष अथवा अपक्ष उमेदवारांची संख्या मुक्त चिन्हापेक्षा जास्तीची असल्यास अशा परिस्थितीत निवडणूक निर्णय अधिकारी गरजेनुसार नवीन चिन्हांचा अंतर्भाव करुन चिन्ह वाटप करतील व आयोगास अहवाल सादर करतील.

(संदर्भ– महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ८ व १० आणि राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी–२००९/प्रक्र.४९/का–११ दिनांक ४.२.२०१२)

**प्रश्न ९ भारत निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या चिन्हांच्या यादीमधील चिन्हाचे वाटप नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये करता येईल काय ?**

उत्तर नाही. **नगरपरिषद अथवा नगरपंचायती**ची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ मधील व त्यामध्ये राज्य निवडणूक आयोगाद्वारे वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार निर्गमित निवडणूक चिन्हांच्या तक्त्यामधील चिन्हांचीच मागणी करता येते. याविषयी राज्य निवडणूक आयोगाद्वारे शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या चिन्हांच्या सूची व्यतिरिक्त अन्य चिन्हांचे वाटप करता येत नाही.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद १०)

**प्रश्न १० दोन किंवा अधिक नोंदणीकृत राजकीय पक्षांनी निवडणूकपूर्व आघाडी केली असून, नामनिर्देशनपत्रामध्ये आघाडीतर्फे निवडणूक लढविणार असल्याचे नमूद केले असेल तर त्या आघाडीच्या उमेदवारांना कोणते चिन्ह मिळू शकेल ?**

उत्तर दोन किंवा अधिक नोंदणीकृत राजकीय पक्षांनी निवडणूकपूर्व आघाडी केली असेल तर, त्या आघाडीची त्यांनी महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ मधील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. अशी नोंदणी झाल्यानंतरच त्या आघाडीचे उमेदवार हे नामनिर्देशनपत्रामध्ये आघाडीतर्फे निवडणूक लढविणार असल्याचे नमूद करू शकतील. त्यानंतर या आघाडीच्या उमेदवारांना कोणत्याही मुक्त चिन्हाची मागणी करता येईल आणि हे मुक्त चिन्ह त्यांना महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ चे परिच्छेद ८ मधील तरतुदीनुसार वाटप करण्यात येईल. परंतु या आघाडीस कोणत्याही परिस्थितीमध्ये राखीव चिन्ह मिळू शकणार नाही.

राजकीय पक्षांनी निवडणूकपूर्व केलेल्या परंतू आयोगाकडे नोंदणी न केलेल्या आघाडीची दखल निवडणूक निर्णय अधिकारी यांना घेता येणार नाही. परंतु तरीही अशा आघाडीच्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रामध्ये आघाडीचा उल्लेख केल्यास, त्या उमेदवारांना अपक्ष उमेदवार समजून चिन्ह वाटप करण्यात येईल.

(संदर्भ - महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश २००९ आणि महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ८)

## २. आघाडीची राखीव / पसंतीक्रमाची चिन्हे

**प्रश्न १ महाराष्ट्रातील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्ष व त्यांच्यासाठी राखीव चिन्हे कोठे पाह येतील ?**

उत्तर मान्यताप्राप्त राजकीय पक्ष व त्यांचेसाठीची राखीव चिन्हे याबाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, व संबंधित नगरपरिषद अथवा नगरपंचायतीचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पाहता येतील.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद १०)

**प्रश्न २  नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या आघाडीसाठी वेगळे चिन्ह राखीव ठेवण्यात येते काय ?**

उत्तर  नाही. तथापि, नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्षांच्या आघाडीच्या उमेदवारांने नामनिर्देशनपत्रात तो उमेदवार आघाडीमधील ज्या पक्षाकडून निवडणूक लढवित असल्याचे घोषीत केले असेल व त्या पक्षाचे जोडपत्र एक व जोडपत्र दोन विहित कालावधीत सादर केले असेल तर त्यास त्या पक्षाचे आरक्षित चिन्ह मिळू शकेल.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९)

**प्रश्न ३  राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या स्थानिक निवडणूकपूर्व आघाडीसाठी चिन्ह राखीव ठेवण्यात येते काय ?**

उत्तर  नाही. अशा आघाडीस महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ चे परिच्छेद ८ मधील तरतुदीनुसार चिन्ह वाटप करण्यात येईल. त्यानुसार निवडणूक लढविणाऱ्या अनेक उमेदवारांनी एकच मुक्त चिन्हाची मागणी केली असेल आणि या अनेक उमेदवारांपैकी केवळ एक उमेदवार हा अशा नोंदणीकृत असलेल्या स्थानिक निवडणूकपूर्व आघाडीचा उमेदवार असेल व उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, ते मुक्त चिन्ह नोंदणीकृत असलेल्या स्थानिक निवडणूकपूर्व आघाडीच्या उमेदवारास मिळू शकेल.

जर या अनेक उमेदवारांपैकी दोन किंवा अधिक नोंदणीकृत आघाडीचे उमेदवार असतील आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यायचे ते ठरवतील आणि ज्या उमेदवाराची चिठ्ठी येईल त्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास त्या मुक्त चिन्हाचे वाटप करण्यात येईल.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ८ (३))

**प्रश्न ४  एखादया उमेदवारास मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केल्याचे केव्हा समजले जाईल किंवा मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे राखीव चिन्ह मिळण्यास उमेदवार पात्र होण्यासाठीचे निकष कोणते आहेत ?**

उत्तर  एखादया उमेदवारास मान्यताप्राप्त राजकीय पक्षाद्वारे पुरस्कृत केल्याचे तेंव्हा समजले जाईल जेव्हा, -

१. त्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रात त्याला सदर राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केले असल्याबाबत घोषणा केलेली असेल.

२. उमेदवाराने नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या बाबतीत जोडपत्र एक व जोडपत्र दोन मधील सूचनापत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे विहित कालावधीत सादर केले असेल.

३. जोडपत्र एक व जोडपत्र दोन मधील सूचनापत्रावर, पक्षाच्या अध्यक्ष, सचिव किंवा सदर सूचनापत्र पाठविण्यास प्राधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्याने शाईने अथवा बॉलपेनने स्वाक्षरी केलेली असेल.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ९)

**प्रश्न ५ उमेदवारांची अनोंदणीकृत आघाडी झाल्यास त्यांना त्यांच्या पसंतीनुसार एकच चिन्ह वाटप करता येईल काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ६ नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षाच्या किंवा अपक्ष उमेदवाराने नामनिर्देशनपत्रात चिन्हांचा उल्लेख केला नसल्यास त्यास ऐनवेळी केलेल्या मागणीनुसार चिन्ह देण्यात येते काय ?**

उत्तर नाही. नामनिर्देशनपत्रात चिन्हाचे घोषणापत्रात चिन्हाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. तथापि, नामनिर्देशनपत्रात चिन्हांचा उल्लेख केला नसल्यास चिन्ह वाटपाच्या दिवशी त्या मतदारसंघातील अपक्षांसह इतर सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी शिल्लक मुक्त चिन्हांमधून सदर उमेदवारास चिन्ह वाटप करतात.

**प्रश्न ७ मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे निवडणूक लढविणा-या उमेदवाराने मागणी केल्यास त्या पक्षाकरिता राखीव असलेल्या चिन्हाव्यतिरिक्त इतर चिन्ह वाटप करता येईल काय ?**

उत्तर नाही. नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुकीत मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत उमेदवारास निवडणूक आयोगाद्वारे त्या पक्षाकरिता आरक्षित केलेल्या चिन्हाची निवड करता येईल व त्याचे त्यांना वाटप करण्यात येईल आणि त्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही चिन्हाचे वाटप करता येणार नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ परिच्छेद-६(१))

**प्रश्न ८ पूर्वी राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्ष असलेल्या व आता मान्यता संपुष्टात आलेल्या नोंदणीकृत पक्षांतर्फे निवडणूक लढविणा-या उमेदवारांना चिन्ह वाटपाकरिता सवलत मिळते काय ? असल्यास त्याचे निकष काय आहेत ?**

उत्तर होय. जर एखादा पक्ष आता अमान्यताप्राप्त पक्ष असेल, तथापि, निवडणुकीच्या तारखेच्या घोषणेपूर्वी सहा

वर्ष अगोदर असा पक्ष राष्ट्रीय किंवा महाराष्ट्रातील राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यताप्राप्त होता, अशा पक्षांनी उभ्या केलेल्या उमेदवारांना नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये, त्या पक्षास, तो पक्ा ज्यावेळी राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यताप्राप्त पक्ष होता, त्यावेळी जे आरक्षित केलेले होते, त्या पक्षाचे चिन्ह राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या मुक्त चिन्हांच्या यादी मध्ये नसले तरी ते चिन्ह आरक्षित करण्याबाबतची सवलत खालील अटींच्या पुर्ततेनंतर देता येते.:-

क) राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यापासून एक आठवड्याच्या आत अशा पक्षाने त्यांच्यातर्फे उभ्या करण्यात येणाऱ्या उमेदवारांना आरक्षित चिन्ह मिळावे म्हणून आयोगाकडे अर्ज सादर केलेला असावा.

ख)	अशा उमेदवाराने त्याच्या नामनिर्देशनपत्रामध्ये तो संबंधित पक्षातर्फे उभा असल्याबाबतची घोषणा केलेली असून, त्याने यथास्थिती नमुना २(अ) व २(ब) किंवा जोडपत्र १ व २ विहित कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर केलेले असावे.

ग)	परंतु, उपरोक्त परिच्छेदामध्ये काहीही नमूद असले तरी, यापूर्वीच एखाद्या राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पक्षासाठी सदर चिन्ह राखीव ठेवण्यात आले असेल तर उपरोक्त तरतुदी लागू होणार नाहीत.

(संदर्भ- महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ परिच्छेद ७)

**प्रश्न ९	जर अनेक उमेदवारांपैकी केवळ एकच उमेदवार हा नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे उभा असून उर्वरित सर्व अपक्ष उमेदवार असतील आणि त्या सर्वांचा पहिला पसंतीक्रम हा समान मुक्त चिन्ह असेल तर ते मुक्त चिन्ह कोणास देण्यात येईल ?**

उत्तर	अशा वेळी निवडणूक निर्णय अधिकारी पहिला पसंतीक्रम असलेले मुक्त चिन्ह नोंदणीकृत अमान्यताप्राप्त

पक्षातर्फे उभा असलेल्या उमेदवारास देईल व इतर कोणासही देणार नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ परिच्छेद ८(३))

**प्रश्न १० जर अनेक उमेदवारांपैकी दोन किंवा अधिक उमेदवार हे वेगवेगळ्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय**

**पक्षातर्फे उभे असून त्या सर्वांचा पहिला पसंतीक्रम हा समान मुक्त चिन्ह असेल तर ते चिन्ह कोणास देण्यात येईल ?**

उत्तर	जर दोन किंवा अधिक नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षातर्फे उभा असलेल्या उमेदवारांचे पहिला पसंतीक्रमाचे चिन्ह समान असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठया टाकून कोणत्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह दयायचे ते ठरविल आणि ज्या उमेदवाराची चिठ्ठी येईल, त्या उमेदवारास त्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल .

(संदर्भ- महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ परिच्छेद ८(३))

**प्रश्न ११ एखाद्या प्रभागामध्ये नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे उमेदवार आणि अपक्ष उमेदवार यांना वाटप करण्यासाठी मुक्त चिन्हे कमी पडत असतील तर काय करावे ?**

उत्तर	प्रभागातील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष अथवा अपक्ष उमेदवारांना मुक्त चिन्हे वाटप करण्याकरिता कमी पडत असतील तर अशा परिस्थितीत निवडणूक निर्णय अधिकारी गरजेनुसार नवीन चिन्हांचा अंतर्भाव करुन चिन्हांचे उमेदवारांना वाटप करतील व तसे राज्य निवडणूक आयोगास कळवतील.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी-२००९/प्रक्र.४९/का-११ दिनांक ४.२.२०१२)

**प्रश्न १२ एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास अथवा अपक्ष उमेदवारास त्याच्या पसंतीक्रमापैकी कोणतेही चिन्ह मिळू शकले नाही तर या उमेदवारास चिन्ह वाटप केव्हा करण्यात यावे ?**

उत्तर एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास अथवा अपक्ष उमेदवारास त्याच्या पसंतीक्रमापैकी कोणतेही चिन्ह मिळू शकले नाही तर अशा उमेदवारांना, प्रभागातील अपक्षांसह इतर सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी हे शिल्लक मुक्त चिन्हांमधून चिन्ह वाटप करतात.

**प्रश्न १३ जर उमेदवाराने त्याच्या कोणत्याही नामनिर्देशनपत्रामध्ये त्यास कोणत्या पक्षातर्फे उभे करण्यात आले आहे या संदर्भातील घोषणापत्र केले नाही परंतु कोणत्याही पक्षाचे जोडपत्र एक व जोडपत्र दोन हे त्या उमेदवाराने विहित मुदतीमध्ये सादर केले असेल तर त्या उमेदवारास त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार समजण्यात येईल काय ? आणि त्या पक्षाचे राखीव निवडणूक चिन्ह असेल तर त्यास मिळेल काय ?**

उत्तर नाही. उमेदवारास मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केल्याचे समजण्याकरिता व त्या पक्षाचे राखीव

चिन्ह मिळण्याकरिता त्याने सादर केलेल्या नामनिर्देशनपत्रामध्ये त्याला त्या राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केल्याचे घोषणापत्र करणे बंधनकारक आहे.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी-२००९/प्रक्र.४९/का-११ दिनांक ५.२.२०१२)

**प्रश्न १४ एका उमेदवाराने दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्रापैकी पहिले नामनिर्देशनपत्र हे नोंदणीकृत मान्यताप्राप्त**

**राजकीय पक्षातर्फे असून अन्य नामनिर्देशनपत्रे ही नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष किंवा अपक्ष तर्फे आहेत. छाननीमध्ये त्यापैकी नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे दाखल केलेले नामनिर्देशनपत्र हे विहित मुदतीमध्ये जोडपत्र एक व जोडपत्र दोन सादर न केल्यामुळे फेटाळण्यात आले आहे आणि उर्वरित नामनिर्देशनपत्रे ही स्विकारण्यात आली आहेत. तर त्या उमेदवारास चिन्ह वाटप करताना त्याच्या कोणत्या नामनिर्देशनपत्रामधील चिन्हांचा पसंतीक्रम विचारात घेणे आवश्यक आहे ?**

उत्तर उमेदवाराने दाखल केलेल्या प्रथम नामनिर्देशनपत्रामधील चिन्हांचा पसंतीक्रम जरी ते नामनिर्देशनपत्र नामंजुर करण्यात आलेले असेल तरीही चिन्ह वाटपासाठी विचारात घेण्यात येतो. एखादया उमेदवाराने मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे पहिले नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल परंतू विहीत मुदतीमध्ये जोडपत्र एक व जोडपत्र दोन सादर न केल्यामुळे असे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले असेल व त्यामध्ये त्या मान्यताप्राप्त पक्षाच्या चिन्हाशिवाय इतर कोणत्याही चिन्हांची मागणी केली नसेल तर अशा परिस्थितीमध्ये त्या उमेदवाराने किंवा त्याच्यावतीने दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्रापैकी जे नामनिर्देशनपत्र नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष किंवा अपक्षतर्फे निवडणूक निर्णय अधिकारी

यांच्याकडे प्रथम दाखल केले असेल त्या नामनिर्देशनपत्रामधील चिन्हांचा पसंतीक्रम विचारात घेणे आवश्यक आहे.

मान्यताप्राप्त पक्षातर्फे सादर केलेल्या परंतू छाननी मध्ये फेटाळण्यात आलेल्या पहिल्या नामिनर्देशनपत्रामध्ये राखीव चिन्हांव्यतिरिक्त इतर मुक्त चिन्हांचा पसंतीक्रम नोंदविला असल्यास तो विचारात घेणे आवश्यक आहे.

## ३. चिन्ह वाटप पध्दती

**प्रश्न १ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप कोण करतात ?**

उत्तर निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप निवडणूक निर्णय अधिकारी हे करतात.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १६(१) )

**प्रश्न २ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप केव्हा आणि कोठे केले जाते? त्याविषयी उमेदवारांना लेखी कळविण्यात येते काय ?**

उत्तर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप हे राज्य निवडणूक आयोगाने निश्चित करून दिलेल्या कार्यक्रमानुसार, उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये केले जाते. त्याबाबत उमेदवाराना लेखी पूर्व सूचना दिली जाते.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १६ (१) व (२))

**प्रश्न ३ चिन्ह वाटपाची सर्वसाधारण कार्यपध्दती काय आहे? चिन्ह वाटप कोणत्या क्रमाने करण्यात यावे ?**

उत्तर चिन्ह वाटप करताना प्रभागनिहाय चिन्हांचे वाटप होईल. प्रभागातील सर्व जागांकरिता चिन्हांचे वाटप एकाच वेळी सुरू करण्यात येते. प्रथमत: राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत असलेले राष्ट्रीय पक्ष, राज्यस्तरीय पक्ष, इतर राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष ज्यांनी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेली आहे अशा पक्षातर्फे पुरस्कृत असणाऱ्या उमेदवारांना त्या पक्षाचे राखीव चिन्ह वाटप करण्यात येते. त्यानंतर नोंदणीकृत राजकीय पक्षाद्वारे पुरस्कृत उमेदवारांना त्यांनी नामनिर्देशनपत्रात नमूद केलेल्या पसंतीक्रमानुसार मुक्त चिन्हामधून एका चिन्हाचे वाटप करण्यात येते व सर्वात शेवटी अपक्ष किंवा अनोंदणीकृत पक्ष / अनोंदणीकृत आघाडीच्या उमेदवारांना त्यांनी नामनिर्देशनपत्रात नमूद केलेल्या पसंतीक्रमानुसार चिन्ह वाटप करण्यात येते.

दोन किंवा त्यापेक्षा जास्त नोंदणीकृत पक्षाच्या उमेदवारांनी किंवा अपक्ष उमेदवारांनी समान मुक्त चिन्हाची मागणी केली असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी चिन्ह वाटपाचा निर्णय चिठ्ठ्या टाकून

ठरवितात. थेट अध्यक्षांची निवडणूक असतांना प्रथम अध्यक्ष पदासाठीच्या उमेदवारांना चिन्ह वाटप होईल त्यानंतर प्रभागातील सदस्यांना चिन्ह वाटप होईल.

(संदर्भ- १. महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९

२. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी-२००९/प्रक्र.४९/का-११ दिनांक- ४.२.२०१२

३. राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्र.एसईसी-२००९/प्रक्र.४९/का-११ दि.- ५.२.२०१२)

**प्रश्न ४ कोणत्या उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाते ?**

उत्तर वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांच्या यादीमधील उमेदवारी मागे न घेणाऱ्या म्हणजेच निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना निवडणूक चिन्हाचे वाटप केले जाते.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १६)

**प्रश्न ५ उमेदवाराने नामनिर्देशनपत्रामध्ये निवडणूक चिन्हाची मागणी केली नसेल तरीही त्यास निवडणूक चिन्ह मिळू शकते काय ? आणि कोणत्या रितीने ?**

उत्तर उमेदवाराने त्याच्या नामनिर्देशनपत्रातील चिन्हांचे घोषणापत्रात चिन्हांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. तथापि, चिन्हांचा उल्लेख केला नसल्यास, चिन्ह वाटपाच्या वेळी प्रभागातील अपक्षांसह इतर सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर शिल्लक मुक्त चिन्हांमधून सदर उमेदवारास निवडणूक निर्णय अधिकारी चिन्ह वाटप करतात.

**प्रश्न ६ एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे दाखल केली असतील तर त्यापैकी कोणत्या नामनिर्देशनपत्रामधील चिन्हांचा पसंतीक्रम विचारात घेण्यात येईल ?**

उत्तर एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे दाखल केली असतील तर त्यामधील प्रथम दाखल

केलेल्या नामनिर्देशनपत्रातील, जरी ते नामंजूर झाले असेल तरी त्यामध्ये नमूद करण्यात आलेला चिन्हांचा पसंतीक्रम विचारात घेण्यात येतो.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोगाकडील परिपत्रक क्र. रानिआ- २००९/प्र.क्र. ४९/का.११, दि.०५/०२/२०१२ )

**प्रश्न ७ एकापेक्षा अधिक उमेदवारांना एकच चिन्ह देता येईल काय ?**

उत्तर नाही. एकाच मतदारसंघातील एकापेक्षा अधिक उमेदवारांना एकच चिन्ह देता येणार नाही.

**प्रश्न ८ एखादया उमेदवाराने एकापेक्षा जास्त मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे जोडपत्र एक व जोडपत्र दोन सादर केले असतील तर त्यास कोणत्या पक्षाचे राखीव चिन्ह वाटप करण्यात येईल ?**

उत्तर एखादया उमेदवाराने एकापेक्षा जास्त मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे जोडपत्र एक व जोडपत्र दोन सादर केले असतील तर त्यास चिन्ह वाटपासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात यावी. :-

१. अशा उमेदवारांच्या बाबतीत उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विहित वेळेत एक राजकीय पक्ष वगळता अन्य राजकीय पक्षाने लेखी सूचना देऊन जोडपत्र दोन मागे घेतले असल्यास त्या उमेदवारास

ज्या पक्षाने जोडपत्र दोन मागे घेतलेले नाही त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे मानण्यात यावे व त्यास पक्षाचे राखीव चिन्ह देण्यात यावे.

२. जर उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विहित कालावधीनंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त राजकीय पक्षाने दिलेले जोडपत्र दोन शिल्लक राहिले असल्यास त्या उमेदवाराने तो कोणत्या पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो याबाबत लेखी दिल्यास त्याला त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे मानण्यात यावे व त्यास त्या पक्षाचे राखीव चिन्ह देण्यात यावे.

३. वरील अनुक्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एखाद्या उमेदवाराने तो कोणत्या पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो याबाबत लेखी न दिल्यास त्याने प्रथम ज्या पक्षाच्या वतीने नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल त्या राजकीय पक्षाचा तो अधिकृत उमेदवार आहे असे मानण्यात यावे व त्यास त्या पक्षाचे राखीव चिन्ह देण्यात यावे.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्र.एसईसी-२००९/प्रक्र.४९/का-११ दि.- ५.२.२०१२)

**प्रश्न ९ एखादया मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना जोडपत्र एक व जोडपत्र**

**दोन देण्यात आले असल्यास, त्या पक्षाचे राखीव चिन्ह कोणास वाटप करण्यात येईल ?**

उत्तर ज्यावेळी एखाद्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षाद्वारे एकापेक्षा जास्त उमेदवारांना जोडपत्र एक व जोडपत्र दोन देण्यात येतात त्यावेळी जर त्या पक्षाने उमेदवारी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी

३.०० वा. पर्यंत नेमक्या कोणत्या उमेदवाराला उमेदवारी द्यावयाची आहे याबाबतचे पत्र संबंधित

३.०१ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दिले असेल तर त्या उमेदवारास त्या पक्षाचा पुरस्कृत उमेदवार

३.०२ समजण्यात यावे. जर असे पत्र उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वा.

३.०३ पर्यंत दिले नसेल तर ज्या उमेदवाराने त्या पक्षातर्फे सर्व प्रथम उमेदवारी अर्ज दाखल केला असेल

३.०४ त्यालाच त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार मानण्यात यावे व त्यापक्षाचे राखीव चिन्ह वाटप करण्यात

३.०५ यावे.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.- रानिअ/मनपा/२००६/प्रक्र-१९/का-५ दि.६.१.२००७)

**प्रश्न १० दोनपेक्षा जास्त नोंदणीकृत पक्षांच्या उमेदवारांनी एकच चिन्ह मागणी केल्यास चिन्ह वाटप कसे केले जाते ?**

उत्तर दोन किंवा त्यापेक्षा जास्त नोंदणीकृत पक्षाच्या उमेदवारांनी समान मुक्त चिन्हाची मागणी केलेली असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यायचे ते ठरवील आणि ज्या उमेदवाराची चिठ्ठी येईल त्या

उमेदवारास त्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल आणि इतर कोणासही करणार नाही.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ८ (३))

**प्रश्न ११ एखादया प्रभागातील नोंदणीकृत पक्षाच्या व अपक्ष उमेदवारांनी एकाच मुक्त चिन्हाची मागणी केल्यास चिन्ह वाटप कसे करण्यात येते ?**

उत्तर एखाद्या प्रभागातील नोंदणीकृत पक्षाच्या व अपक्ष उमेदवारांनी एकाच मुक्त चिन्हाची मागणी केली असल्यास आणि या उमेदवारांपैकी नोंदणीकृत पक्षाचा एकच उमेदवार असेल व उर्वरित उमेदवार अपक्ष असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी ते मुक्त चिन्ह नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास वाटप करेल व इतर कोणासही देणार नाही. नोंदणीकृत पक्षाच्या उमेदवाराची संख्या दोन किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास, त्यांनी मागणी केलेल्या समान मुक्त चिन्हाचे वाटप निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून करतात.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ८ (३))

**प्रश्न १२ दोन किंवा जास्त अपक्षांनी एकाच चिन्हाची मागणी केल्यास चिन्ह वाटप कशा पध्दतीने केले जाते ?**

उत्तर दोन किंवा जास्त अपक्षांनी समान मुक्त चिन्हाची मागणी केली असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या अपक्ष उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यायचे ते ठरविल आणि ज्या उमेदवाराची चिठ्ठी येईल, त्या उमेदवारास त्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल व इतर कोणासही करणार नाही.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगर पंचायती निवडणूक नियम १९६६ चे नियम १६(२) )

**प्रश्न १३ चिन्ह वाटप हे प्रभागनिहाय करण्यात येते काय ?**

उत्तर होय. चिन्ह वाटप हे प्रभागनिहाय करण्यात येते व प्रभागातील सर्व जागांकरिता चिन्हाचे वाटप एकाच वेळी सुरु करण्यात येते.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी-२००९/प्रक्र.४९/का-११ दिनांक ४.२.२०१२)

**प्रश्न १४ चिन्ह वाटपाच्या निर्णयाविरुध्द अपील करता येते काय ? असल्यास कोणाकडे ?**

उत्तर नाही. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना केलेले चिन्ह वाटप हे अंतिम असून त्याविरूध्द अपिलाची तरतूद नाही. तथापि, सदर चिन्ह वाटप राज्य निवडणूक आयोगाद्वारे निर्गमित चिन्ह वाटप आदेश व परिपत्रकामधील तरतुदींशी विसंगत असल्यास राज्य निवडणूक आयोग त्यामध्ये त्यास योग्य वाटतील ते बदल करू शकतात.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १६(३) आणि महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ परिच्छेद ११)

**प्रश्न १५ उमेदवारांने नामनिर्देशनपत्रात नोंदविलेल्या पसंतीक्रमाची चिन्हे इतर उमेदवारांना वाटप झाल्यास त्या उमेदवाराला नवीन पसंतीक्रम देता येईल काय ? अशा वेळी चिन्ह वाटप कसे करता येते?**

उत्तर उमेदवाराने दाखल केलेल्या सर्व नामनिर्देशनपत्रात नोंदविलेल्या पसंतीक्रमाची सर्व चिन्हे इतर उमेदवारांना वाटप झाल्यास त्यास नवीन पसंतीक्रम देता येणार नाही. तथापि, अशा वेळी प्रभागातील अपक्षासह इतर सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर शिल्लक मुक्त चिन्हामधून निवडणूक निर्णय अधिकारी त्या उमेदवारास चिन्ह वाटप करतात.

**प्रश्न १६ निवडणूक निर्णय अधिकारी राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मुक्त चिन्हाच्या यादी व्यतिरिक्तचे चिन्ह उमेदवाराने मागणी केल्यास देऊ शकतो काय ?**

उत्तर नाही. राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या मुक्त चिन्हाच्या यादीमधीलच चिन्हाची मागणी उमेदवाराने करणे अपेक्षित आहे व त्यानुसारच त्यास चिन्ह वाटप करण्यात येते. तथापि, मुक्त चिन्हाच्या संख्येपेक्षा नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या व अपक्ष उमेदवारांची संख्या जास्त असल्यास सर्व मुक्त चिन्हे वाटप करून संपल्यानंतर इतर चिन्हाचा अंतर्भाव करुन निवडणूक निर्णय अधिकारी चिन्हाचे वाटप करु शकतात.

**प्रश्न १७ एखाद्या उमेदवारास त्याच्या पहिल्या पसंतीक्रमांकाचे चिन्ह हे चिठ्ठी टाकून (by lot) मिळू शकले नाही तर त्या उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रामधील चिन्हाचा दुसरा पसंतीक्रम हा पहिला पसंतीक्रम म्हणून विचारात घेणे योग्य होईल काय ?**

उत्तर नाही. अशा परिस्थितीमध्ये त्या उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रामधील चिन्हाचा दुसरा पसंतीक्रम हा पहिला पसंतीक्रम म्हणून विचारात घेता येत नाही.

**प्रश्न १८ नामनिर्देशनपत्रामध्ये नमूद केलेला चिन्हांचा पसंतीक्रम डावलून उमेदवारास अन्य चिन्हांची मागणी करता येईल काय ? अथवा निवडणूक निर्णय अधिकारी यांना वाटप करता येईल काय ?**

उत्तर नाही. उमेदवाराने दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्रातील चिन्हांचा पसंतीक्रम चिन्ह वाटपासाठी ग्राह्य धरण्यात येतो. ऐनवेळी उमेदवारास अन्य चिन्हाची मागणी करता येत नाही. तथापि, उमेदवाराच्या पसंतीक्रमाची सर्व चिन्हे मतदारसंघातील अपक्षासह इतर उमेदवारास वाटप झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी शिल्लक मुक्त चिन्हामधून त्यास निवडणूक चिन्ह वाटप करू शकेल.

**प्रश्न १९ निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चुकीचे चिन्ह वाटप केले असेल तर राज्य निवडणूक आयोगाकडून त्यामध्ये हस्तक्षेप केला जातो काय ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना केलेले चिन्ह वाटप हे अंतिम असून त्याविरूध्द राज्य निवडणूक आयोगाकडे अपिलाची तरतूद नाही. तथापि, निवडणूक

निर्णय अधिकाऱ्याने केलेले चिन्ह वाटप राज्य निवडणूक आयोगाद्वारे निर्गमित चिन्ह वाटप आदेश व परिपत्रकामधील तरतुदींशी विसंगत असल्यास, परिस्थितीनुरूप आवश्यक निर्णय राज्य निवडणूक आयोगाकडून घेतले जाऊ शकतात.

(संदर्भ - महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९ मधील परिच्छेद ११)

**प्रश्न २० निवडणूक चिन्ह वाटपानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने सर्व उमेदवारांना चिन्हाचा नमुना देणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय. निवडणूक निर्णय अधिका-याकडून निवडणूक चिन्ह वाटपानंतर प्रत्येक उमेदवार किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस वाटप करण्यात आलेले चिन्ह व त्याचा नमुना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**प्रश्न २१ चिन्ह वाटपाचे वेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कक्षात कोणास उपस्थित राहता येईल ?**

उत्तर चिन्ह वाटपाचे वेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कक्षामध्ये संबंधित उमेदवार किंवा त्यांचा निवडणूक प्रतिनिधी हे उपस्थित राहू शकतात.

## ४. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे

**प्रश्न १ निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी केव्हा व कोठे प्रसिध्द करण्यात येते ?**

उत्तर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप केल्यानंतर नमुना -७ मध्ये निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी तयार करण्यात येते आणि ही यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येते.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १६(४) )

**प्रश्न २ निवडणूक चिन्हाचे वाटप केल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी कोणत्या नमुन्यामध्ये प्रसिध्द करणे बंधनकारक आहे ?**

उत्तर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्ह वाटप केल्यानंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नमुना -७ मध्ये तयार करून प्रसिध्द करणे बंधनकारक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १६(४) )

**प्रश्न ३ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करताना त्यामध्ये उमेदवारांची नावे कोणत्या क्रमाने लावणे आवश्यक आहे ?**

उत्तर उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रामध्ये आडनावे असलेल्या उमेदवारांच्या आडनावाच्या आणि इतर उमेदवारांच्या नावाच्या संदर्भात वर्णक्रमानुसार, नमुना- ७ मधील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे आवश्यक आहे. नगरपालिका सभेचे कार्यवृत्त ज्या भाषेमध्ये ठेवण्यात येते, त्या भाषेमधील वर्णक्रमानुसार उमेदवारांच्या नावाचा क्रम निश्चित करण्यात येतो.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १६(४) )

**प्रश्न ४ एखाद्या उमेदवाराच्या आडनावाच्या मागे कोणतीही आद्याक्षरे जोडण्यात आली असतील (उदा. आर. टी. शिंदे) तर नावांची क्रमवारी लावताना कोणते अक्षर विचारात घेणे आवश्यक आहे ?**

उत्तर उमेदवाराच्या आडनावाच्या मागे कोणतीही आद्याक्षरे जोडण्यात आली असतील तर, पूर्वोक्त प्रयोजनासाठी त्याकडे दुर्लक्ष करण्यात येईल. अशारितीने " आर. टी. शिंदे " असे नाव असणाऱ्या उमेदवाराच्या बाबतीत, वर्णक्रमानुसार, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीतील त्या उमेदवाराचे स्थान " श " या अक्षराच्या संदर्भात निश्चित करण्यात येईल. परंतु " आर " या अक्षराच्या संदर्भात नव्हे.

**प्रश्न ५ जर दोन उमेदवारांची नावे एकच असतील परंतु आद्याक्षरे वेगवेगळी असतील (उदा. एस. बी. पाटील आणि डी. एस. पाटील) तर नावांची क्रमवारी लावताना कोणते अक्षर विचारात घेणे आवश्यक आहे ?**

उत्तर जर दोन उमेदवारांची आडनावे एकच असतील परंतु आद्याक्षरे वेगवेगळी असतील तेव्हा उदाहरणार्थ एस.

बी. पाटील आणि डी. एस. पाटील अशी असतील तेव्हा त्या दोन आद्याक्षरातील पहिल्या अक्षराच्या संदर्भात एकानंतर एक अशी क्रमाने लावण्यात येतील. म्हणजेच " ए " आणि " डी " या अक्षराच्या संदर्भाने क्रम निश्चित करण्यात येईल. त्यानुसार एस.बी.पाटील यांचे नाव प्रथम व त्यानंतर डी.एस.पाटील यांचे नाव येईल.

**प्रश्न ६ दोन किंवा अधिक उमेदवारांचे संपूर्ण नाव एकच असेल तर नावांची क्रमवारी कशी लावण्यात यावी?**

उत्तर दोन किंवा अधिक उमेदवारांचे संपूर्ण नाव एकच असेल तर, त्यांचा व्यवसाय किंवा राहण्याचे ठिकाण किंवा

इतर कोणत्याही रितीने त्यांच्यात फरक दर्शविण्यात येईल. तसेच अशा उमेदवारांच्या नावाचा क्रम हा उमेदवारांच्या फरक दर्शविणाऱ्या नावाच्या संदर्भात लावण्यात येईल आणि फरक दर्शविणारा संदर्भ हा नमुना-७ मधील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये नमूद करण्यात येईल.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २८(३))

**प्रश्न ७ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये नावांची क्रमवारी लावताना उमेदवारांची कोठे नमूद केलेली**

**नावे विचारात घेणे बंधनकारक आहे ?**

उत्तर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमधील उमेदवारांच्या नावाचा क्रम ठरविण्यासाठी त्याने नामनिर्देशनपत्रात उमेदवाराचे नाव या रकान्यात नमूद केलेले नाव विचारात घेणे बंधनकारक आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १६(४) )

**प्रश्न ८ उमेदवाराच्या नावाअगोदर ॲडव्होकेट, डॉक्टर, प्राध्यापक, पद्मश्री, हिम्मतबहादूर किंवा इतर कोणतीही पदवी नमूद केली असेल तर नावांची क्रमवारी लावताना त्याचा विचार करावयाचा अगर कसे ?**

उत्तर कोणतीही सन्मानदर्शक, विद्याविषयक, वंशपरंपरागत, व्यावसायिक किंवा इतर कोणतीही पदवी उमेदवाराच्या नावाला जोडण्यास कोणतीही हरकत असणार नाही. परंतू अशी पदवी, वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांच्या किंवा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीतील नावे वर्णक्रमाने लावताना केंव्हाही विचारात घेतली जाणार नाहीत.

**प्रश्न ९ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी कोणत्या भाषेमध्ये तयार करणे आवश्यक आहे ?**

उत्तर नगरपालिका सभेचे कार्यवृत्त ज्या भाषेमध्ये ठेवण्यात येते, त्या भाषेमध्ये नमुना - ७ मधील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे आवश्यक आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १६(४) )

**प्रश्न १० निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीची प्रत उमेदवारांना देणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर बंधनकारक नाही. तथापि, उमेदवार अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीची प्रत मागितल्यास ती त्यांना देणे आवश्यक आहे.

**प्रश्न ११ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांबाबतची माहिती कोणास पाठविणे आवश्यक आहे ?**

उत्तर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची माहिती राज्य निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी व शासकीय मुद्रणालय यांना पाठविणे आवश्यक आहे.

**प्रश्न १२ नामनिर्देशनपत्रामध्ये नमूद केलेल्या नावाव्यतिरिक्त इतर नाव छापण्याबाबत उमेदवाराने विनंती केल्यास त्याची मागणी मान्य करता येईल काय ? अशी मागणी मान्य झाल्यास मतपत्रिकेवरील उमेदवारांच्या अनुक्रमांकामध्ये बदल होईल काय ?**

उत्तर होय. नमूना - ७ मधील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करण्यापूर्वी, उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिकारी यांना लेखी मागणी केल्यानुसार नामनिर्देशनपत्रात नमूद केलेल्या नावा व्यतिरिक्त इतर नाव मतपत्रिकेवर छापता येईल. परंतू त्यामुळे मतपत्रिकेवरील उमेदवाराच्या अनुक्रमांमध्ये बदल होणार नाही. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमधील उमेदवाराचा अनुक्रमांक हा मतपत्रिकेमध्येही कायम राहील.

## ५. मतपत्रिका तयार करणे व छपाई

**प्रश्न १ मतपत्रिका तयार करण्याची व छापून घेण्याची जबाबदारी कोणाची असते ?**

उत्तर मतपत्रिका तयार करण्याची व छापून घेण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांची असते.

**प्रश्न २ मतपत्रिकेसाठी नमुना विहीत केलेला आहे काय ?**

उत्तर होय. राज्य निवडणूक आयोगाकडून मतपत्रिकेचा नमुना विहित करण्यात आलेला आहे.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.८/का.०५, दि.२०/०९/२०११)

**प्रश्न ३ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीप्रमाणे मतपत्रिकेची छपाई करणे आवश्यक आहे का ?**

उत्तर होय. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीप्रमाणे मतपत्रिकेची छपाई करण्यात येते. तथापि, उमेदवाराने मतपत्रिकेमध्ये त्याचे वेगळे नाव छापण्याबाबत विनंती केल्यास त्याप्रमाणे मतपत्रिकेमध्ये नाव छापण्यात येते. परंतु त्यामुळे मतपत्रिकेतील उमेदवारांच्या अनुक्रमांकामध्ये बदल होत नाही.

**प्रश्न ४ मतपत्रिका तयार करण्यापूर्वी कोणाची मान्यता घ्यावी लागते ?**

उत्तर मतपत्रिका तयार करण्याची व छापण्याची प्राथमिक जबाबदारी निवडणूक निर्णय अधिकारी यांची असते. मतपत्रिका छापण्यापूर्वी इतर कोणाची मान्यता घेण्याची आवश्यकता नसते.

**प्रश्न ५ निवडणुकीसाठी किती प्रकारच्या मतपत्रिकांची छपाई करावी लागते ?**

उत्तर नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान घेण्यासाठी आदेश पारीत केलेले आहेत. सदर निवडणुकांसाठी दोन प्रकारच्या मतपत्रिकांची छपाई करावी लागते. १.मतदान यंत्रावर लावण्यासाठी व प्रदत्त मतांसाठीची मतपत्रिका २. टपाली मतपत्रिका

**प्रश्न ६ मतपत्रिकांची छपाई कोठे करावी ?**

उत्तर सर्वसाधारणपणे मतपत्रिकांची छपाई शासकीय मुद्रणालयामध्ये करणे आवश्यक आहे. तथापि, शासकीय मुद्रणालयाकडून मतपत्रिका छपाईसाठी काही तांत्रिक अडचण असल्यास अथवा छपाई करावयाची मतपत्रिकांची संख्या कमी असल्यास, मतपत्रिकांची सुरक्षितता व गोपनियता राहील याची दक्षता घेऊन मतपत्रिकांची छपाई स्थानिक मुद्रणालयामध्ये करता येऊ शकेल.

(संदर्भ- आयोगाचे परिपत्रक दि.१७.११.२०१४)

**प्रश्न ७ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये "वरीलपैकी एकही नाही (NOTA)" याचा समावेश नाही. तरी ही मतपत्रिकेवर छपाई करताना त्याचा समावेश करावयाचा काय ?**

उत्तर होय. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीप्रमाणे मतपत्रिकेवरील उमेदवारांची नावे छापण्यात यावीत व शेवटच्या उमेदवाराच्या नावानंतर -None of the above◦ / -वरील पैकी एकही नाही◦ हा पर्याय छापण्यात यावा.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.-रानिआ-२०१३/प्रक्र-११/का-१२ दिनांक-१२/११/२०१३)

**प्रश्न ८  मतपत्रिकेचा नमुना उमेदवाराना उपलब्ध करुन देण्यात येतो काय ?**

उत्तर  निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीची प्रत उमेदवार किंवा त्याचा अधिकृत प्रतिनिधी यांना देण्यात येते. तसेच उमेदवारास वाटप केलेल्या चिन्हाचा नमुना सुध्दा देण्यात येतो.

**प्रश्न ९  प्रत्येक प्रकारच्या मतपत्रिका किती संख्येने छापण्यात याव्यात ?**

उत्तर  मतपत्रिका किती छापाव्यात ही बाब किती मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत यावर तसेच किती मतदान यंत्रे वापरण्यात येणार आहेत (राखीवसह) यावर अवलंबून राहील. प्रत्येक बॅलेटिंग युनिटसाठी एक मतपत्रिका आणि प्रत्येक मतदान केंद्रासाठी २० प्रदत्त मतपत्रिका आवश्यक आहेत. त्यामुळे जितकी मतदान यंत्रे वापरावयाची आहेत (राखीवसह) तेवढ्या मतपत्रिका छापणे जरूरीचे आहे. तथापि, आणिबाणीच्या प्रसंगी उपयोगी पडण्यासाठी १० % राखीव मतपत्रिकेची छपाई करावी. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करून १० च्या पटीमध्ये मतपत्रिका छापण्यात याव्यात. निवडणूक कर्तव्यार्थ किती अधिकारी / कर्मचारी यांना टपाली मतपत्रिका द्यावी लागेल याचा अंदाज बांधून टपाली मतपत्रिकांची छपाई करावी.

**प्रश्न १०  सर्व प्रकारच्या मतपत्रिका या कोणत्या भाषेमध्ये छापाव्यात ?**

उत्तर  स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सर्व प्रकारच्या मतपत्रिका मराठी भाषेमध्ये छापण्यात याव्यात.

**प्रश्न ११  मतपत्रिकेची छपाई मुद्रणालयामध्ये करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी छपाईबाबत कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे ?**

उत्तर  (अ) मतपत्रिका छापताना ती अशारितीने छापणे आवश्यक आहे की, जेणेकरून मतपत्रिका बॅलटिंग युनिटमध्ये घट्ट चिकटविल्यानंतर उमेदवाराचे नाव नमूद केलेला चौकोन हा बॅलटिंग युनिटवरील रेषेशी जुळला पाहिजे. त्यासाठी मतपत्रिका छापताना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. मतपत्रिका योग्यरित्या छापल्या जातील यासाठी आवश्यक वाटल्यास मुद्रणालयाच्या तंत्रज्ञाना बॅलटिंग युनिट दाखविण्यात यावे व त्यांना त्यानुसार आवश्यक ती मोजमापे घेण्यास सांगावे. जेणेकरून मधल्या रेषा व त्यांची जाडी याबाबत बॅलटिंग युनिटवर त्यासाठी ठेवलेल्या जागेशी बरोबर जुळतील. बॅलटिंग युनिटवर वापरण्यासाठी घ्यावयाच्या मतपत्रिकांना स्थळप्रतीची आवश्यकता नसून त्यांचे बंडल देखील शिवून घेण्याची आवश्यकता नाही. मतपत्रिका सुट्ट्याच ठेवाव्यात.

ब) मतपत्रिकेची छपाई करतेवेळी मतपत्रिकेवरील तपशिल नमुना-७ मधील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमधील तपशिलाप्रमाणे अचूक असल्याची खात्री करून घ्यावी, उदा. स्थानिक स्वराज्य संस्थेचे नांव, मतदारसंघाचे / प्रभागाचे नाव, उमेदवाराचे नाव व निवडणूक चिन्ह, उमेदवारांचा अनुक्रम इत्यादी अचूक असल्याची खात्री करणे. तसेच मतपत्रिका योग्य रंगाच्या कागदावर छापण्यात येत आहेत याची खात्री करावी. मतपत्रिकांची सुरक्षितता व गोपनियता राहील

याची दक्षता घेणे व छापलेल्या सर्व मतपत्रिका सुरक्षितरित्या निवडणूक कार्यालयात आल्याची खात्री करणे इ. बाबींची दक्षता घेणे आवश्यक आहे.

**प्रश्न १२ बॅलेट यूनिट वर चिटकविण्यात येणा-या मतपत्रिकेवर उमेदवारांची नावे ही कोणत्या फॉन्ट व किती साईज मध्ये असावित ?**

उत्तर फॉन्ट - UNICODE मधील DVB-TTYogesh. साईज - मराठी - २४ पॉईन्ट

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०१७/प.क्र.१३/का-७ , दि ०३/०२/२०१७)

**प्रश्न १३ टपाली मतपत्रिका व मतदानयंत्रावरील मतपत्रिका यामध्ये कोणता फरक असतो ?**

उत्तर टपाली मतपत्रिका व मतदानयंत्रावरील मतपत्रिका यामध्ये खालीलप्रमाणे फरक असतो.:-

अ) प्रत्येक टपाली मतपत्रिकेस स्थळप्रत (कांऊटर फाईल) असते. परंतु मतदान यंत्रावरील मतपत्रिकेस ती नसते.

आ) टपाली मतपत्रिकेवर उमेदवाराचे नाव व नावाच्याखाली कंसामध्ये उमेदवाराचा पक्ष / आघाडी किंवा अपक्ष असल्यास तसे नमूद करण्यात येते. परंतु मतदान यंत्रावरील मतपत्रिकेवर उमेदवाराचे नाव नमूद करण्यात येते. मात्र उमेदवाराचा पक्ष / आघाडी किंवा अपक्ष असे नमूद करण्यात येत नाही.

इ) टपाली मतपत्रिकेवर उमेदवाराचे चिन्ह छापण्यात येत नाही. परंतु मतदान यंत्रावरील मतपत्रिकेवर उमेदवाराचे चिन्ह छापण्यात येते.

ई) टपाली मतपत्रिका ही मतदान यंत्रावरील मतपत्रिकेपेक्षा कमी लांबीची असते.

**प्रश्न १४ प्रदत्त मतपत्रिका व मतदानयंत्रावरील मतपत्रिका यामध्ये कोणता फरक असतो ?**

उत्तर प्रदत्त मतपत्रिका व मतदानयंत्रावरील मतपत्रिका यामध्ये फरक असत नाही. मतदान यंत्रासाठी ज्या प्रकारची मतपत्रिका छापली जाणार आहे त्याच प्रकारची मतपत्रिका ही प्रदत्त मतपत्रिका म्हणून वापरण्यात येते. मात्र प्रत्येक प्रदत्त मतपत्रिकेच्या मागील बाजूवर "प्रदत्त मतपत्रिका" असा शिक्का उमटिवण्यात येतो.

**प्रश्न १५ टपाली मतपत्रिकेस स्थळप्रत असते काय ?**

उत्तर प्रत्येक टपाली मतपत्रिकेस स्थळप्रत (कांऊटर फाईल) असते. ही स्थळप्रत मतपत्रिकेच्या अगदी वरच्या बाजूस असते.

**प्रश्न १६ टपाली मतपत्रिकेवर उमेदवाराचे चिन्ह छापतात काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न १७ टपाली मतपत्रिकेवर उमेदवाराच्या पक्षाचे नाव छापतात काय ?**

उत्तर होय. टपाली मतपत्रिकेवर उमेदवाराच्या पक्षाचे / आघाडीचे नाव छापण्यात येते आणि उमेदवार हा अपक्ष असल्यास अपक्ष असे छापण्यात येते.

**प्रश्न १८ अन्य सर्व प्रकारच्या मतपत्रिकेच्या छपाईपूर्वी टपाली मतपत्रिकेची छपाई प्राधान्याने करणे का आवश्यक आहे ?**

उत्तर निवडणूक कर्तव्यावर मतदार असलेल्या अनेक शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. या निवडणूक कर्मचाऱ्यांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता येण्यासाठी टपाली मतपत्रिकेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे या निवडणूक कर्मचाऱ्यांना वेळेमध्ये टपाली मतपत्रिका उपलब्ध करून देणे आणि त्यावर त्यांनी मत नोंदवून ती टपाली मतपत्रिका मतमोजणीपूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे प्राप्त होणे आवश्यक आहे. ही सर्व कार्यवाही वेळेमध्ये पूर्ण करण्यासाठी अन्य सर्व प्रकारच्या मतपत्रिकेच्या छपाईपूर्वी टपाली मतपत्रिकेची छपाई प्राधान्याने करण्यात येते.

**प्रश्न १९ मतदान यंत्रासाठीच्या मतपत्रिकेवर उमेदवाराचे चिन्ह व पक्षाचे नाव छापले जाते काय ?**

उत्तर नाही. मतदान यंत्रासाठीच्या मतपत्रिकेवर उमेदवाराचे नाव व त्याला वाटप करण्यात आलेले निवडणूक चिन्ह छापले जाते. परंतु पक्षाचे नाव छापले जात नाही.

**प्रश्न २० प्रदत्त मतपत्रिका कोणत्या आकाराची असावी ?**

उत्तर प्रदत्त मतपत्रिका मतदान यंत्रावरील मतपत्रिकेच्या आकाराप्रमाणेच असते.

**प्रश्न २१ टपाली आणि प्रदत्त मतपत्रिका या कोणत्या रंगाच्या असाव्यात ?**

उत्तर नगरपालिकेच्या निवडणूकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने मतपत्रिकेचा पांढरा रंग निश्चित केलेला आहे. त्यानुसार पांढ-या रंगाची टपाली आणि प्रदत्त मतपत्रिका छापण्यात येते.

**प्रश्न २२ मतदान केंद्रावर मतदानासाठी आलेल्या मतदारास मतदान करण्यापूर्वी एखाद्या उमेदवाराचे नाव आणि त्याचे चिन्ह यांचे मतपत्रिकेवर स्थान कोठे आहे ? हे कसे पाहता येईल ?**

उत्तर यासाठी मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्राच्या बाहेर ठळकपणे मतपत्रिकेचा नमुना किंवा डमी मतपत्रिका लावलेली असते. हा मतपत्रिकेचा नमुना किंवा डमी मतपत्रिका ही मतदान यंत्रावर लावलेल्या मतपत्रिकेसारखीच असते. यावरून मतदान केंद्रावर मतदानासाठी आलेल्या मतदारास मतदान करण्यापूर्वी एखाद्या उमेदवाराचे नाव आणि त्याचे चिन्ह यांचे मतपत्रिकेवर स्थान पाहता येईल.

**प्रश्न २३ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीप्रमाणे मतपत्रिकेचे प्रारूप मुद्रणालयाकडून तपासणीसाठी मिळाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ते प्रारूप तपासताना कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे?**

उत्तर (१) प्रथमता मतपत्रिकेचे प्रारुप मुद्रणालयामध्ये तपासणीसाठी जाताना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी खालील कागपत्रे व साहित्य सोबत ठेवणे आवश्यक राहील.:-

अ) निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांच्या सर्व नामनिर्देशनपत्रांची छायाप्रत (PhotoCopy)

आ) नमुना-७ मधील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची मराठी व इंग्रजी भाषेमधील यादी

इ) निवडणूक निर्णय अधिकारी या पदनामाचे मराठी व इंग्रजी भाषेमधील गोल व आडवे रबरी शिक्के

ई) मराठी बाराखडीची प्रत.

(२) मुद्रणालयाकडून मतपत्रिकेचे प्रारूप प्राप्त झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतपत्रिकेवरील

तपशिल निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमधील तपशिलाप्रमाणे अचूक असल्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे. उदा. स्थानिक स्वराज्य संस्थेचे नांव, मतदारसंघाचे / प्रभागाचे नाव, उमेदवाराचे नाव व निवडणूक चिन्ह, उमेदवारांचा अनुक्रम इत्यादी अचूक असल्याची तसेच मतपत्रिका योग्य रंगाच्या कागदावर छापल्या जात आहे याची खात्री करणे आवश्यक आहे.

**प्रश्न २४ छपाई करण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या मतपत्रिकेची निवडणूक निर्णय अधिकारी यांचेमार्फत पुन्हा तपासणी करणे आवश्यक आहे का ?**

उत्तर होय. छपाई पूर्ण झाल्यानंतर सर्व प्रकारच्या मतपत्रिकांची तपासणी विशेष पथकामार्फत करावी जेणेकरून

कोणत्याही निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे नाव व चिन्ह वगळले गेले नाही अथवा चुकीने छापले गेले असल्यास ते तात्काळ लक्षात येईल. त्याचबरोबर जितक्या मतपत्रिका छापण्याचे आदेश मुद्रणालयास दिले आहेत तितक्या मतपत्रिका छापल्या आहेत किंवा कसे हे तपासणे आवश्यक आहे. तसेच काही मतपत्रिका खराब असल्याचे किंवा मतपत्रिकेच्या अनुक्रमांकाची पुनरावृत्ती झाली असेल तर त्याबाबत वेळीच दुरूस्ती करणे शक्य होते.

**प्रश्न २५ मुद्रणालयामधून सर्व प्रकारच्या मतपत्रिका प्राप्त झाल्यानंतर त्यांची वाहतूक आणि साठवणूक करण्यासंदर्भामध्ये कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे ?**

उत्तर मुद्रणालयामधून सर्व प्रकारच्या मतपत्रिका प्राप्त झाल्यानंतर त्यांची निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मुख्यालयापर्यंतची वाहतूक ही योग्य पोलिस सुरक्षा असलेल्या बंदीस्त वाहनामधून करावी. त्यानंतर सर्व मतपत्रिका असलेली कुलूप लावून सिलबंद केलेली लोखंडी पेटी ही कोषागारामध्ये किंवा अन्य सुरक्षित ठिकाणी योग्य त्या पोलीस बंदोबस्तामध्ये ठेवण्यात यावी.

**प्रश्न २६ वापरून शिल्लक राहिलेल्या सर्व प्रकारच्या मतपत्रिकेचे काय करावे ?**

उत्तर निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अशा वापरून शिल्लक राहिलेल्या सर्व प्रकारच्या मतपत्रिका या एखाद्या लोखंडी पेटीमध्ये ठेऊन जिल्हाधिकारी / निवडणूक अधिकारी यांच्या आदेशानुसार कोषागारात अथवा अन्य सुरक्षित ठिकाणी ठेऊन त्यानंतर आयोगाच्या आदेशानुसार त्या योग्यवेळी नष्ट कराव्यात.

**प्रश्न २७ उमेदवाराने स्वत:च्या प्रचारासाठी नमुना मतपत्रिका छापताना कोणती दक्षता घ्यावी ?**

उत्तर उमेदवाराने आपल्या मतदाराना माहिती देण्यासाठी नमुना (डमी) मतपत्रिका छापण्यास हरकत नाही. तथापि, सदर मतपत्रिकेवर त्यांनी स्वतःचे नाव, अनुक्रमांक आणि चिन्ह इतकीच माहिती छापावी. अन्य कोणत्याही उमेदवाराचे नाव, अनुक्रमांक आणि चिन्ह अशा मतपत्रिकेवर छापू नये. तसेच ज्या रंगाची मतपत्रिका संबंधित मतदान केंद्रावर वापरण्यात येणार आहे त्याऐवजी दुसऱ्या रंगाची नमुना (डमी)

मतपत्रिका छापता येईल. त्याचबरोबर सदर नमुना मतपत्रिका ही मतदान केंद्रावर वापरण्यात येणाऱ्या मतपत्रिकेपेक्षा वेगळ्या आकाराची असावी.

**प्रश्न २८ विवाहित महिलांच्या नावाबद्दल**

उत्तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्यानिवडणूकीमध्ये विवाहित महिला उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्र व मत पत्रिकेवरील नावाबाबत करावयाची कार्यवाही.

( संदर्भ - आदेश क्र. रानिआ/ नप-२०२५/प्र.क्र.१/का-६,दि.१३/०३/२०२५)

## ६. आवश्यक EVM संख्या निश्चिती

**प्रश्न १ निवडणुकीसाठी लागणा-या मतदान यंत्राची संख्या कशी निश्चित केली जाते ?**

उत्तर सर्वसाधारणपणे प्रत्येक मतदान केंद्रासाठी एक कंट्रोल युनिट व एक बॅलेट युनिट यांची आवश्यकता असते.

परंतु मतदारसंघामधील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या १५ पेक्षा अधिक असेल तर त्याप्रमाणामध्ये अधिकच्या बॅलेट युनिटची आवश्यकता असते. त्यामुळे मतदारसंघामधील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या, मतदान कर्मचारी व मतदार यांच्या प्रशिक्षणासाठी आवश्यक मतदान यंत्रे आणि राखीव मतदान यंत्रे यांचा विचार करून निवडणुकीसाठी लागणाऱ्या मतदान यंत्राची संख्या निश्चित केली जाते.

**प्रश्न २ मतदान केंद्रावर वापरण्यात येणा-या कंट्रोल युनिट व बॅलेट युनिटची संख्या वेगवेगळी असू शकते काय ?**

उत्तर होय. एखाद्या प्रभागामध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या ही १४ पेक्षा अधिक असेल तर त्या प्रमाणामध्ये अधिकच्या बॅलेट युनिटची आवश्यकता असते. परंतू कंट्रोल युनिट हे एकच पुरेसे ठरते. त्यामुळे कंट्रोल युनिटपेक्षा बॅलेट युनिटची संख्या अधिक असू शकते.

**प्रश्न ३ प्रत्येक प्रभागासाठी राखीव मतदान यंत्रे ठेवण्यात येतात काय ? त्याची संख्या कशी निश्चित केली जाते?**

उत्तर होय. प्रत्येक मतदारसंघ किंवा प्रभागासाठी स्वतंत्र राखीव मतदान यंत्रे ठेवण्यात येतात व त्यांची संख्या मतदान केंद्रावर वापरण्यात यावयाच्या मतदान यंत्राच्या सर्वसाधारणपणे १० टक्के एवढी निश्चित केली जाते.

**प्रश्न ४ राखीव मतदान यंत्रे मतदानाच्या दिवशी कोठे ठेवली जातात ?**

उत्तर मतदानाच्या दिवशी शक्यतो राखीव मतदान यंत्रे ही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामधील सुरक्षा कक्षामध्ये ठेवली जातात. परंतू मतदारसंघाची व्याप्ती फार मोठी असेल आणि दूरच्या अंतरावरील भागामध्ये पोहोचण्यासाठी वेळ लागणार असेल तर, अशा दूरच्या भागासाठी सुरक्षित मध्यवर्ती

ठिकाणाची निवड निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून केली जाईल आणि अशा ठिकाणी राखीव मतदान यंत्रे योग्य त्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये ठेवता येतील.

**प्रश्न ५ मतदान यंत्रांची संख्या निश्चित करताना मतदान कर्मचारी प्रशिक्षण आणि मतदार प्रशिक्षण यासाठी आवश्यक असलेल्या मतदान यंत्राचा विचार करणे योग्य आहे काय ?**

उत्तर होय. मतदान यंत्रांची संख्या निश्चित करताना मतदान केंद्रासाठी आवश्यक असलेल्या मतदान यंत्रांच्या संख्येव्यतिरिक्त (राखीवसह) मतदान कर्मचारी आणि मतदार प्रशिक्षण यासाठी आवश्यक असलेल्या मतदान यंत्राचा विचार करणे आवश्यक आहे. कारण मतदान कर्मचारी आणि मतदार प्रशिक्षण यासाठी वापरण्यात आलेली मतदान यंत्रे ही शक्यतो मतदान केंद्रावरील मतदानासाठी वापरण्यात येऊ नयेत.

# प्रकरण १४.

# निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे निवडणूक, मतदान तथा मतमोजणी प्रतिनिधी

## १. निवडणूक प्रतिनिधी नेमणूक

**प्रश्न १ उमेदवार निवडणूक प्रतिनिधी नियुक्त करू शकतो काय ? असल्यास किती ?**

उत्तर होय. उमेदवार एक निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती करु शकतो.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १८ (१))

**प्रश्न २ निवडणूक प्रतिनिधीची कर्तव्ये व अधिकार काय आहेत ?**

उत्तर निवडणूक प्रतिनिधीस महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ आणि त्याखाली केलेले नियम याव्दारे जी अधिकृत असतील अशी निवडणूकीच्या संबंधातील कामे पार पाडता येतात. विशेषता दैनंदिन निवडणूक खर्चाचा हिशेब ठेवणे आणि उमेदवाराच्या निवडणूक प्रचारात व निवडणूक विषयक कामात उमेदवाराला मदत करणे हे प्रमुख कर्तव्य आहे. निवडणूक प्रतिनिधी हा उमेदवाराच्या वतीने निवडणूक प्रक्रियेमध्ये सहभाग घेऊ शकतो.

**प्रश्न ३ निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती केव्हा करता येते ? त्याकरिता विशिष्ट नमुना आहे काय ?**

उत्तर उमेदवाराने नामनिर्देशनपत्र दाखल केल्यानंतर किंवा निवडणूकीपूर्वी कोणत्याही वेळी निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक करता येते. त्याकरीता उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला रितसर व औपचारिकरित्या स्वत:च्या सहीनिशी कळविणे आवश्यक आहे. त्यासाठी नमुना - ८ वापरला जातो.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १८ (१))

**प्रश्न ४ निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती रद्द करता येते काय ? त्याकरिता विशिष्ट नमुना आहे काय?**

उत्तर होय. निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती रद्द करता येते. त्यासाठी उमेदवाराने स्वाक्षरी केलेले लेखी निवेदन निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाधीन करून कोणत्याही वेळी निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती रद्द करता येईल. यासाठी विहीत केलेला नमुना नाही.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १८ (२))

**प्रश्न ५ भ्रष्टाचाराबद्दल दोषी ठरविण्यात आलेल्या व्यक्तीची नियुक्ती निवडणूक प्रतिनिधी म्हणून करता येईल काय ?**

उत्तर नाही. भष्ट्राचाराबद्दल दोषी ठरविण्यात आलेल्या व्यक्तीची नियुक्ती निवडणूक प्रतिनिधी म्हणून करता येणार नाही आणि अशा कोणत्याही व्यक्तीस जोपर्यंत तो अपात्र राहण्याचे चालू असेल तोपर्यंत निवडणूक प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करता येत नाही.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १८ (३))

**प्रश्न ६ मंत्री / खासदार / विधानसभा अथवा विधानपरिषद सदस्य किंवा सुरक्षा पुरविलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यावर कोणतेही बंधन आहे का?**

उत्तर होय. मंत्री / खासदार / विधानसभा अथवा विधानपरिषद सदस्य किंवा सुरक्षा पुरविलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करता येणार नाही.

**प्रश्न ७ एखादया उमेदवाराचा सूचक हा निवडणूक प्रतिनिधी होवू शकतो काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ८ निवडणूक प्रतिनिधी उमेदवारांच्यावतीने निवडणूक खर्च सादर करु शकतो काय ?**

उत्तर होय. निवडणूक प्रतिनिधी उमेदवाराच्यावतीने निवडणूक खर्च सादर करु शकतो.
(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .एसईसी/१०९५/१०१ /का.३ ,दिनांक ०७/०२/१९९५ मधील परिच्छेद ४)

**प्रश्न ९ निवडणूक प्रतिनिधीने निवडणूक प्रक्रियेदरम्यान निवडणूक विषयक संदर्भामध्ये एखादी चुकीची कृती केल्यास त्याबद्दल उमेदवाराला जबाबदार धरण्यात येते काय ?**

उत्तर होय. निवडणूक प्रतिनिधीने निवडणूक प्रक्रियेदरम्यान निवडणूक विषयक संदर्भामध्ये एखादी चुकीची कृती केल्यास त्याबद्दल उमेदवाराला जबाबदार धरण्यात येते.

**प्रश्न १० निवडणूक प्रतिनिधींना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून ओळखपत्र देण्यात येते काय ?**

उत्तर होय. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने व शिक्यानिशी निवडणूक प्रतिनिधीचे छायाचित्र असलेले ओळखपत्र देण्यात येते.

**प्रश्न ११ निवडणूक प्रतिनिधीला मतदान व मतमोजणी केंद्रामध्ये थेट प्रवेश असतो काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न १२ उमेदवाराला निवडणूक प्रतिनिधी नेमणे बंधनकारक आहे काय ?**

उत्तर नाही. निवडणूक प्रतिनिधी नेमणे उमेदवाराला बंधनकारक नाही.

## २. मतदान प्रतिनिधी नेमणूक

**प्रश्न १ मतदान प्रतिनिधीच्या नियुक्तीचे अधिकार कोणास आहेत व त्यांची नियुक्ती केव्हा करण्यात येते?**

उत्तर मतदान प्रतिनिधीच्या नियुक्तीचे अधिकार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला आहेत. त्यांची नियुक्ती ज्या निवडणूकीमध्ये मतदान घेण्यात येईल अशा मतदानाच्या दिवसापूर्वी करण्यात येते.
(संदर्भ– महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १९ (१))

**प्रश्न २ मतदान प्रतिनिधींच्या नेमणुकीबाबत केंद्राध्यक्षांनी कोणत्या बाबी तपासाव्यात ?**

उत्तर (i) मतदान प्रतिनिधीच्या नेमणूक पत्रावरील उमेदवाराच्या / निवडणूक प्रतिनिधीच्या स्वाक्षरीची पडताळणी नमुना स्वाक्षरी प्रपत्रावरुन करणे. (ii) मतदान प्रतिनिधीचे नाव त्या मतदान केंद्राच्या मतदारयादीमध्ये आहे किंवा नाही याबाबत पडताळणी करणे. या बाबी मतदान प्रतिनिधीच्या नेमणुकीबाबत केंद्राध्यक्षांनी तपासाव्यात.

**प्रश्न ३ कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती मतदान प्रतिनिधी म्हणून करता येईल काय ?**

उत्तर मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्त करावयाची व्यक्ती ही संबंधित प्रभागातील रहिवाशी असावी व तिला मतदार ओळखता यावेत. ज्या व्यक्तीविरूध्द गुन्हेगारीची नोंद असेल किंवा निवडणूकविषयी गैरव्यवहारात समाविष्ट असल्याची पूर्वीची नोंद असेल किंवा त्याच्या वर्तणुकीमुळे मतदारांमध्ये दहशत पसरू शकेल अशा व्यक्तीना मतदान प्रतिनिधी म्हणून नेमण्यात येणार नाही. तसेच मंत्री / खासदार / विधानपरिषद अथवा विधानसभा सदस्य किंवा सुरक्षा पुरविलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीची नेमणूक मतदान प्रतिनिधी म्हणून करता येणार नाही.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. स्थास्वसं-२००४ / प्र.क्र २५ /कार्या ०५ दिनांक १०/११/२००४)

**प्रश्न ४ मतदान प्रतिनिधीची नियुक्ती करण्यासाठी विहित नमुना आहे काय ?**

उत्तर होय. नमुना ९ (१) लेखी भरुन मतदान प्रतिनिधीची नेमणूक करता येईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १९ (१))

**प्रश्न ५ मतदान प्रतिनिधीचे विहित नमुन्यामधील नियुक्ती पत्र कोणाकडे आणि केव्हा सादर करणे आवश्यक आहे ?**

उत्तर मतदान प्रतिनिधीचे विहित नमुन्यातील लेखी पत्र मतदान केंद्राध्यक्षाकडे मतदानाच्या दिवशी सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १९ (२))

**प्रश्न ६ प्रत्येक मतदान केंद्रासाठी एका उमेदवारास किती मतदान प्रतिनिधी नियुक्त करता येतील ? व ही नेमणूक कधीपर्यंत करता येते ?**

उत्तर प्रत्येक मतदान केंद्रासाठी एका उमेदवाराला तीन मतदान प्रतिनिधीची नियुक्ती करता येईल. ही नेमणूक मतदान सुरु होण्यापूर्वी त्याला अभिरुप मतदानाला उपस्थित राहता येईल अशा पध्दतीने करता येईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १९ (१))

**प्रश्न ७ सर्वच मतदान केंद्रावर उमेदवाराला मतदान प्रतिनिधींची नेमणूक करणे बंधनकारक आहे काय?**

उत्तर नाही. सर्वच मतदान केंद्रावर उमेदवाराला मतदान प्रतिनिधींची नेमणूक करणे बंधनकारक नाही.

**प्रश्न ८ मतदान प्रतिनिधीचे कामकाज कोणत्या दिवशी असते ?**

उत्तर मतदान प्रतिनिधीचे कामकाज मतदानाच्या दिवशी असते.

**प्रश्न ९ मतदान प्रतिनिधीची जबाबदारी व कर्तव्ये कोणती आहेत ?**

उत्तर मतदान अधिकारी क्रमांक १ जेव्हा मतदाराची ओळख पटवितो त्यावेळी ओळखीस आक्षेप असल्यास असा आक्षेप नोंदविण्याची प्रमुख जबाबदारी मतदान प्रतिनिधीची असते. त्याचप्रमाणे मतदान केंद्रात येऊन मतदान करून गेलेल्या मतदारांची नोंद देखील ते आपल्याकडील मतदारयादीत घेतात. मतदान गुप्तपणे होण्यासाठी मतदान केंद्राध्यक्ष यांना आवश्यक ते सहकार्य करण्याची जबाबदारी देखील मतदान प्रतिनिधीची असते. मतदान प्रतिनिधीची इतर कर्तव्ये खालीलप्रमाणे §

(i) मतदार असल्याची बतावणी करु पाहणा-या व्यक्तींना आक्षेप घेऊन मतदारांची तोतयागिरी शोधून काढण्यास केंद्राध्यक्षास मदत करणे.

(ii) मतदानापूर्वी व मतदानानंतर नियमानुसार मतदानयंत्र सुरक्षित व मोहोरबंद करण्यास मदत करणे.

(iii) मतदान समाप्त झाल्यानंतर केंद्राध्यक्षाकडून नोंदविलेल्या मतांचा नमुना व्हीएम - ३ (भाग - एक) मधील हिशोबाची व कागदी मोहरांच्या हिशोबाची प्रत घेणे.

(iv) मतदानाशी संबधित असलेले कागदपत्रे नियमानुसार योग्यप्रकारे सुरक्षित व मोहारबंद केले आहेत का पाहणे.

(v) मोहोरबंद असतांना आवश्यक त्या ठिकाणी स्वतःची स्वाक्षरी करणे.

**प्रश्न १० मतदान प्रतिनिधींनी मतदान केंद्रावर केव्हा हजर राहणे आवश्यक आहे ? व ते किती वाजेपर्यंत मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर हजर होवू शकतात ?**

उत्तर मतदानाचे दिवशी मतदान सुरु होण्याच्या वेळेपूर्वी साधारणत: ४५ मिनिटे अगोदर अभिरुप मतदान घेतले जाते. याकरिता मतदान प्रतिनिधींना मतदान केंद्रावर मतदान सुरु होण्यापूर्वी एक तास आधी हजर राहणे आवश्यक आहे.

**प्रश्न ११ विहित नमुन्यामधील मतदान प्रतिनिधी नियुक्ती पत्रावरील उमेदवार किंवा निवडणूक प्रतिनिधी यांच्या स्वाक्षरीची पडताळणी मतदान केंद्राध्यक्ष यांनी कशी करावी ?**

उत्तर विहित नमुन्यामधील मतदान प्रतिनिधी नियुक्ती पत्रावरील उमेदवार किंवा निवडणूक प्रतिनिधी यांच्या स्वाक्षरीची पडताळणी ही मतदान केंद्राध्यक्ष यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून पुरविण्यात आलेल्या त्यांच्या नमुना स्वाक्षरी प्रपत्रावरुन करावी.

**प्रश्न १२ मतदान केंद्रावर उपस्थित झालेल्या मतदान प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था कोठे व कशी केली जाते ? त्यांचा बसण्याचा क्रम कसा असतो ?**

उत्तर मतदान केंद्रावर मतदान प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था साधारणत: मतदान अधिकारी क्रमांक १ यांच्या उजव्या बाजूस अशारितीने केली जाते की मतदानापूर्वी मतदाराची मतदान अधिकारी क्रमांक १ यांचेव्दारा ओळख पटविली जात असताना मतदाराचा चेहरा मतदान प्रतिनिधीस

स्पष्टपणे दिसेल. मतदाराच्या ओळखीबाबत आक्षेप असल्यास तो सुलभपणे घेता यावा या बाबीची काळजी घेण्यात येते. भारत निवडणूक आयोगातर्फे घेतल्या जाणा-या निवडणुकांमध्ये राष्ट्रीय व राज्यस्तरीय मान्यताप्राप्त राजकिय पक्षाचे प्रतिनिधी, नोंदणीकृत राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व अपक्ष या क्रमाने मतदान प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था असते. तथापि, राज्य निवडणूक आयोगाच्या या संदर्भात सूचना नाहीत.

**प्रश्न १३ एका उमेदवारास एका मतदान प्रतिनिधीच्या मदतीसाठी आणखी दोन मतदान प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे हे सर्व मतदान प्रतिनिधी एकाच वेळी मतदान केंद्रामध्ये उपस्थित राहू शकतात काय ?**

उत्तर नाही. सर्व तीन मतदान प्रतिनिधी एकाच वेळी मतदान केंद्रामध्ये उपस्थित राहू शकत नाहीत. त्यांचे पैकी प्रत्येकवेळी एकाला आळीपाळीने मतदान केंद्रामध्ये उपस्थित राहता येईल.

**प्रश्न १४ मतदान प्रतिनिधीकडे असलेली मतदारयादीची प्रत मतदान केंद्राच्या बाहेर घेऊन जाण्याची परवानगी त्यास आहे काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न १५ मतदान संपण्यापूर्वीच्या दोन तासामध्ये त्याच उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधीची अदलाबदल होऊ शकते काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न १६ मतदान केंद्राध्यक्षाने मतदान केंद्रावर प्राप्त झालेली नमुना ९ (१) मधील मतदान प्रतिनिधी नियुक्ती पत्रे कोणत्या पाकिटामध्ये ठेवावीत ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्षाने मतदान केंद्रावर प्राप्त झालेली नमुना ९ (१) मधील मतदान प्रतिनिधी नियुक्ती पत्रे असांविधिक पाकीटामध्ये ठेवावीत.

**प्रश्न १७ मतदान प्रतिनिधीची नियुक्ती रद्द केली जाऊ शकते काय ?**

उत्तर होय. उमेदवारास त्याने सही करून सादर केलेल्या लेखी निवेदनाव्दारे मतदान प्रतिनिधींची नियुक्ती रद्द केली जाऊ शकते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २१ (१))

**प्रश्न १८ मतदान प्रतिनिधीची नियुक्ती रद्द केल्याबाबत कोणास कळविणे आवश्यक आहे ?**

उत्तर मतदान प्रतिनिधींची नियुक्ती रद्द केल्याबाबत संबंधित मतदान केंद्राचे मतदान केंद्राध्यक्ष व निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळविणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २१ (२))

**प्रश्न १९ मतदान प्रतिनिधीची नियुक्ती रद्द केल्यानंतर पुन्हा मतदान प्रतिनिधी नियुक्तीचे पत्र कोणाकडे आणि कधीपर्यंत सादर करता येऊ शकते ?**

उत्तर मतदान प्रतिनिधीची नियुक्ती रद्द केल्यानंतर पुन्हा मतदान प्रतिनिधी नियुक्तीचे पत्र नमुना-९ (१) मध्ये भरुन मतदान केंद्राध्यक्षाकडे किमान मतदान प्रतिनिधीला निवडणुकीच्या दिवशीच्या अभिरुप मतदानाला उपस्थित राहता येईल या बेताने सादर करता येऊ शकते.

**प्रश्न २० मतदान प्रतिनिधीला तोतया मतदाराबाबत आक्षेप घेता येतो काय? त्याची प्रक्रिया कशी असते?**

उत्तर होय. मतदान प्रतिनिधीला तोतया मतदाराबाबत आक्षेप घेता येतो. असा आक्षेप असल्यास विहित केलेली आक्षेप फी (रू.२/-) मतदान केंद्राध्यक्ष यांचेकडे जमा करावी लागते. आक्षेपासंदर्भातील कामकाज मतदान केंद्राध्यक्ष यांचे कडे वर्ग केले जाते व मतदान केंद्रात अन्य मतदारांची मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू ठेवली जाते. मतदान केंद्राध्यक्ष मतदारास तोतयेगिरी व त्यास संदर्भातील प्रक्रियेबाबत माहिती देतो. त्यानंतर आक्षेपकास त्याच्या आक्षेपाच्या पुष्ठर्थ्य पुरावा सादर करण्याची सूचना दिली जाते. त्याचप्रमाणे मतदारास आपली ओळख सिध्द करण्याची संधी दिली जाते. आवश्यकतेनुसार संक्षिप्त चौकशी करून व उपलब्ध पुराव्याआधारे मतदान केंद्राध्यक्ष अशा आक्षेपाचा निर्णय घेतो. आक्षेप सिध्द झाल्यास आक्षेपकास आक्षेप फी परत मिळते. आक्षेप सिध्द न झाल्यास अशी रक्कम शासन जमा करण्यात येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ३४ )

**प्रश्न २१ मतदान प्रतिनिधीला मतदान केंद्रावर कोणतेही इलेक्ट्रानिक उपकरण उदा. मोबाईल, टॅबलेट, लॅपटॉप इ. वापरता येईल काय ?**

उत्तर नाही. मतदान प्रतिनिधीला मतदान केंद्रावर कोणतेही इलेक्ट्रानिक उपकरण उदा. मोबाईल, टॅबलेट, लॅपटॉप इ. वापरता येणार नाही.

**प्रश्न २२ अभिरुप मतदानाच्या (Mock Poll) वेळी मतदान प्रतिनिधी हजर नसल्यास काय कार्यवाही करण्यात येते ?**

उत्तर अभिरुप मतदानाच्या (Mock Poll) वेळी मतदान प्रतिनिधींनी हजर राहणे अपेक्षित असते. मात्र हजर नसल्यास (मतदानाच्या वेळेपूर्वी किमान ४५ मिनिटे अगोदर) पुढील प्रक्रिया सुरु करता येईल.

**प्रश्न २३ मतदानानंतर नोंदविलेल्या मतदानाच्या हिशोबांच्या प्रतिंवर मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय. मतदानानंतर नोंदविलेल्या मतदानाच्या हिशोबांच्या प्रतींवर मतदान प्रतिनिधीची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

**प्रश्न २४ मतदानानंतर कोणकोणत्या दस्ताऐवजांवर मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी घेण्यात येते ?**

उत्तर अभिरुप मतदानाच्या घोषणापत्रावर मतदान केंद्राध्यक्षांच्या घोषणा पत्राच्या शेवटच्या भागावर, मतदानाच्याहिशोबाच्या नमून्यावर मतदान यंत्रे सिलबंद करतांना त्याच्या पत्ता खुणचिठ्ठीवर मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी घेण्यात येते. मतदान केंद्राध्यक्ष वेगवेगळया प्रकारच्या पाकीटात चिन्हांकीत मतदार यादी, नमूना व्ही.एम-१ या नमून्यातील मतदार नोंदवही, नमूना व्ही.एम-२ मधील प्रदत्त मते व त्यांची यादी ठेवण्यात आलेले पाकीट, विहीत नमून्यात आव्हानित मतांची यादी आणि राज्य निवडणूक आयोगाने सूचना दिल्यानुसार सीलबंद करावयाचे अन्य कोणतेकी कागदपत्र ठेवलेले पाकीट मोहोरबंद केल्यानंतर त्यावर मतदान प्रतिनिधीची स्वाक्षरी घेण्यात येते.

**प्रश्न २५ नियुक्त करावयाचा मतदान प्रतिनिधी हा त्याच प्रभागातील मतदार असावा काय ?**

उत्तर होय. नियुक्त करावयाचा मतदान प्रतिनिधी हा त्याच प्रभागातील मतदार असावा.
(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. स्थास्वसं-२००४ / प्र.क्र २५ /कार्या ०५ दिनांक १०/११/२००४ )

**प्रश्न २६ नियुक्त करावयाच्या मतदान प्रतिनिधीकडे EPIC (Electors Photo Identity Card) नसल्यास उमेदवाराने काय करावे ?**

उत्तर उमेदवाराकडून एखादया व्यक्तीची प्रतिनिधी म्हणून नियुक्ती प्रस्तावित असेल मात्र त्या व्यक्तीकडे EPIC नसले तरी निवडणूक आयोगाने मान्य केलेले कोणतेही एक छायाचित्र असणारे ओळखपत्र मतदान प्रतिनिधीकडे असणे आवश्यक आहे.

**प्रश्न २७ एखादया मतदान प्रतिनिधीचा दुर्दैवी मृत्यु झाल्यास उमेदवाराने मतदान प्रतिनिधीच्या पुर्ननियुक्तीसाठी काय कार्यवाही करणे अपेक्षित आहे?**

उत्तर एखादया मतदान प्रतिनिधीचा दुर्दैवी मृत्यु झाल्यास ही वस्तुस्थिती नमूद करुन नव्याने मतदान प्रतिनिधी नियुक्तीसाठी नमुना- ९ (१) मध्ये केंद्राध्यक्षांकडे विनंती करता येईल.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २१ (३))

**प्रश्न २८ मतदान प्रतिनिधीने मतदान केंद्रावर येताना सोबत कोणते दस्ताऐवज आणणे आवश्यक आहे ?**

उत्तर मतदान प्रतिनिधीने मतदान केंद्रावर येताना सोबत मतदान प्रतिनिधीचे नियुक्ती पत्र आणणे आवश्यक आहे. तसेच त्याने सोबत खालील बाबी आणणे योग्य होईल:-

(i) संबंधीत मतदान केंद्राची मतदार यादी.

(ii) मृत, गैरहजर, स्थलांतरीत व दुबार मतदारांची यादी.

(iii) स्वत:चा शिक्का.

(iv) पेन, कागद, पेन्सील इ.

**प्रश्न २९ मतदान प्रतिनिधी हा उमेदवाराचे नांव असेलेले बिल्ला (Badge) मतदान केंद्राच्या आतमध्ये धारण करु शकतो काय ?**

उत्तर होय. मतदान प्रतिनिधी हा उमेदवाराचे नांव असलेला बिल्ला (Badge) मतदान केंद्राच्या आतमध्ये धारण करु शकतो. मात्र त्यावर उमेदवाराच्या पक्षाचे नांव व निवडणूक चिन्ह असु नये.

## ३. <u>मतमोजणी प्रतिनिधी (Counting Agent)</u>

**प्रश्न १ मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक कोण करते ?**

उत्तर मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी करू शकतो. (संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २० (१))

**प्रश्न २ मतमोजणी प्रतिनिधी नेमण्याबाबत काय तरतुदी आहेत ?**

उत्तर उमेदवार EVM मधील मतांची मोजणी करावयाच्या टेबलांच्या एकूण संख्येइतके व टपाली मत मोजणीसाठी एक एवढे मतमोजणी प्रतिनिधी नेमू शकतो. तथापि, मंत्री / खासदार / विधानपरिषद अथवा विधानसभा सदस्य किंवा सुरक्षा पुरविलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीची नेमणूक मतमोजणी प्रतिनिधी म्हणून करता येणार नाही.

**प्रश्न ३ उमेदवार कोणाला मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्त करु शकत नाही ?**

उत्तर मंत्री, खासदार, विधानसभा किंवा विधान परिषद सदस्य त्याचप्रमाणे सुरक्षा कवच उपलब्ध करुन देण्यात आलेल्या व्यक्तीला उमेदवार मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्त करु शकत नाही.

**प्रश्न ४ मतमोजणी प्रतिनिधी केव्हापर्यंत नियुक्त करण्याची उमेदवाराला मुभा आहे ?**

उत्तर मतमोजणीस प्रारंभ होण्यापूर्वी तीन दिवस अगोदर संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत मतमोजणी प्रतिनिधी नियुक्त करण्याची उमेदवाराला मुभा आहे.

**प्रश्न ५ मतमोजणी प्रतिनिधीची कर्तव्ये व जबाबदा-या कोणत्या ?**

उत्तर मतमोजणी प्रतिनिधीने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या हितसंबंधांचे संरक्षण मतमोजणीच्या वेळी केले पाहीजे. त्याचप्रमाणे मतमोजणी प्रक्रियेच्या गोपनीयतेचा भंग होणार नाही याबाबत दक्षता घेतली पाहीजे.

**प्रश्न ६ मतमोजणीच्या एका टेबलवरील नियुक्त मतमोजणी प्रतिनिधी अन्य टेबलवरील मतमोजणीसाठी हजर राहू शकेल काय ? तसेच तो आक्षेप घेऊ शकेल काय ?**

उत्तर नाही. ज्या क्रमांकाच्या टेबलवरील मतमोजणीसाठी मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती झाली आहे त्याच क्रमांकाच्या टेबलवरील मतमोजणीसाठी त्या मतमोजणी प्रतिनिधीने उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

**प्रश्न ७ मतमोजणी प्रतिनिधींच्या बसण्याची व्यवस्था व प्रवेश नियंत्रणाबाबत काय तरतुदी आहेत ?**

उत्तर मतमोजणी टेबलासमोर जाळीच्या पलीकडे मतमोजणी प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था केली जाते. मतमोजणी प्रतिनिधींच्या बसण्याच्या क्रमवारीबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या निश्चित अशा सूचना नाहीत. तथापि, केंद्रिय निवडणूक आयोगातर्फे घेतल्या जाणा-या निवडणुकींबाबत असणा-या सूचनांनुसार केंद्र व राज्यस्तरावरील नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्षांच्या उमेदवारांच्या प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था पहिल्या रांगेत व त्यानंतर अमान्यताप्राप्त पक्षांच्या आणि अपक्ष उमेदवारांच्या प्रतिनिधींची बैठक व्यवस्था केली जाते. नियुक्तीचे वेळी प्रत्येक मतमोजणी प्रतिनिधीस छायाचित्रासह ओळखपत्र पुरविले जाते व अशा ओळखपत्रावर प्रतिनिधीस नेमून दिलेल्या टेबलचा अनुक्रमांक दर्शविलेला असतो. प्रतिनिधीस आपला टेबल सोडून अन्यत्र जाता येत नाही.

**प्रश्न ८ मतमोजणी केंद्रामध्ये मतमोजणी प्रतिनिधी यांना कोणतेही इलेक्ट्रानिक उपकरण उदा. मोबाईल, टॅबलेट, लॅपटॉप इ. वापरण्याची परवानगी आहे काय ?**

उत्तर नाही. मतमोजणी केंद्रामध्ये मतमोजणी प्रतिनिधी यांना कोणतेही इलेक्ट्रानिक उपकरण उदा. मोबाईल, लॅपटॉप, टॅबलेट इ. वापरण्याची परवानगी नाही.

**प्रश्न ९ मतमोजणी प्रतिनिधींना एखादया प्रकरणात मतदान यंत्रावरील आकडेवारी समजून न आल्यास पुन्हा मतमोजणी करुन दाखविणे कायदेशीरदृष्टया योग्य असेल काय ?**

उत्तर मतमोजणी पर्यवेक्षकाच्या टेबलावर कंट्रोल युनिट असेपर्यन्त पुन्हा पुन्हा रिझल्ट बटन दाबून उमेदवार निहाय मिळालेली मते दाखविता येतात. यामध्ये कायद्याने कोणतेही बंधन नाही. मात्र एकदा कंट्रोल युनिट सुरक्षा कक्षामध्ये पाठविल्यानंतर पुन्हा परत आणून दाखविता येणार नाही.

**प्रश्न १० मतमोजणी प्रक्रिये दरम्यान मतमोजणी प्रतिनिधीला मतमोजणी केंद्राच्या बाहेर जाण्याची परवानगी आहे काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ११ मतमोजणी प्रतिनिधीला निवडणूक निर्णय अधिका-याकडून ओळखपत्र देण्यात येते काय ?**

उत्तर होय.

# प्रकरण १५.

## मतदान प्रक्रियेची तयारी व कर्मचारी प्रशिक्षण

## (Poll Day Preparation Including Training of Staff)

### १. आवश्यक मनुष्यबळ निश्चिती

**प्रश्न १ मतदानासाठी आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाची निश्चिती कशी व कोणाकडून केली जाते?**

उत्तर मतदान केंद्राची एकूण संख्या, एखाद्या मतदान केंद्रावरील मतदारांची अधिकची संख्या, महिला मतदार अथवा पडदानशीन महिला मतदार संख्या यावरुन मतदानासाठी आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाची निश्चिती निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून निश्चित केली जाते.

**प्रश्न २ मतदानासाठी आवश्यक मनुष्यबळाची निश्चिती करताना सर्वसाधारणपणे कोणत्या विभागाकडील कर्मचारी निवडले जातात ?**

उत्तर मतदानासाठी सर्वसाधारणपणे राज्य शासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे सर्व उपलब्ध कर्मचारी निवडले जातात. आवश्यकता भासल्यास शासकीय उद्योग समूह / उपक्रम, राज्यशासन किंवा केंद्रशासनाच्या अनुदानित संस्था यांचे कर्मचारी निवडले जातात.

**प्रश्न ३ निवडणुकीसाठी लागणारे कर्मचारी टप्प्याटप्प्याने नियुक्ती करुन घेण्यात येतात काय ?**

उत्तर आवश्यकतेप्रमाणे संख्या निश्चित करुन शक्यतो एकाच वेळेस निवडणुकीसाठी लागणारे कर्मचारी नियुक्ती करुन घेण्यात येतात.

**प्रश्न ४ कंत्राटी कर्मचारी किंवा अंगणवाडी सेविका यांची नियुक्ती मतदान कर्मचारी म्हणून करता येईल काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ५ निवडणूक कर्तव्यावर असताना कोणताही अधिकारी अथवा कर्मचारी जखमी झाल्यास किंवा मृत्यू पावल्यास त्याबद्दल नुकसान भरपाई देण्याबाबत काय आदेश आहेत ?**

उत्तर निवडणूक कर्तव्यावर असताना कोणताही अधिकारी अथवा कर्मचारी जखमी झाल्यास किंवा मृत्यु पावल्यास त्याबद्दल नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश खालीलप्रमाणे आहेत.:-

निवडणुकीच्या कामावर असताना -

अ) कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्यास त्याच्या वारसास ५,००,०००/- रुपये इतके सानुग्रह अनुदान.

आ) तिरेकी कारवाया, नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बाम्ब स्फोट, सुरुंग अथवा शस्त्रांचा हल्ला यामध्ये मृत झाल्यास त्याच्या वारसास १०,००,०००/- रुपये इतके सानुग्रह अनुदान.

इ) इजा पोहोचून कायमचे अपंगत्व आल्यास २,५०,०००/- रुपये सानुग्रह अनुदान,

ई) अतिरेकी कारवाया, नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बाम्ब स्फोट, सुरुंग अथवा शस्त्रांचा हल्ला

यामध्ये इजा पोहोचून कायमचे अपंगत्व आल्यास ५,००,०००/- रुपये सानुग्रह अनुदान.

महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती निवडणुकांसंबंधी असे अनुदानाचे प्रस्ताव प्रकरणपरत्वे महानगरपालिका आयुक्त किंवा मुख्याधिकारी, नगरपालिका यांनी मंजूर करावेत. जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायत निवडणुकीसंबंधी असे अनुदानाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अभिप्रायासह ग्रामविकास विभागास सादर करावे.

(संदर्भ-राज्यनिवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र.रानिआ/जिपपंस/२००६/प्र.क्र.२०/का.७,दि.१०.०१.२०१२)

**प्रश्न ६ निवडणुक कर्तव्यावर असताना अधिकारी अथवा कर्मचारी जखमी झाल्यास किंवा मृत्यु पावल्यास त्यांना मिळणा-या सानुग्रह अनुदानाचे प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार कुणाला आहेत?**

उत्तर मुख्याधिकारी

( संदर्भ - राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र पत्र क्र रानिआ/जिपपंस-२०१६/प्र.क्र. २४/का-६ दि २८/११/२०१६)

**प्रश्न ७ खाजगी अनुदानित संस्थामधील कर्मचा-यांना निवडणूक कर्तव्यावर घेता येते काय ?**

उत्तर होय. राज्य शासन अनुदानित संस्था यांचे कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यावर घेता येते.

## २ .निवडणुकीसाठी लागणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करणेचे अधिकार

**प्रश्न १ निवडणूक कर्तव्यासाठी आवश्यक असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांची सेवा अधिग्रहित करण्याचे अधिकार कोणास आहेत ?**

उत्तर जिल्हाधिकारी यांना निवडणूक कर्तव्यासाठी आवश्यक असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांची सेवा अधिग्रहित करण्याचा अधिकार आहे.

(संदर्भ- पंचायती आणि नगरपालिका निवडणूक (कर्मचारी, परिसर आणि वहाने इ. अधिग्रहित करणे) आदेश १९९५ मधील परिच्छेद २)

**प्रश्न २ निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी / सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नियुक्तीचे अधिकार कोणाला आहेत ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार जिल्हाधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५ आणि राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ-१०९४/१६४/१९९४, दिनांक २९/११/१९९४)

**प्रश्न ३ निवडणुकीसाठी मतदान केंद्रावरील अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती कोण करतो?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी हे निवडणूकीसाठी मतदान केंद्रावरील अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ९(१))

**प्रश्न ४ निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी हे कोणाचे निर्देश, नियंत्रण व देखरेखीखाली काम करतात ?**

उत्तर निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्देश, नियंत्रण व देखरेखीखाली काम करतात.

**प्रश्न ५ महिला अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती मतदान कर्मचारी म्हणून करताना कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे ?**

उत्तर महिला अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती मतदान कर्मचारी म्हणून करताना त्यांच्याकरिता वेगळी राहण्याची, प्रसाधनाची व इतर आवश्यक सुविधा मतदान केंद्राजवळ उपलब्ध होईल याची विशेष दक्षता घेणे व अशा महिला कर्मचाऱ्यांना त्याची पूर्व कल्पना देणे आवश्यक आहे. तसेच गर्भवती महिला, स्तनदा माता यांची मतदान कर्मचारी म्हणून नियुक्ती करण्यात येवू नये.

**प्रश्न ६ शारिरीकदृष्ट्या निःसमर्थ असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती मतदान कर्मचारी म्हणून करताना कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे ?**

उत्तर शारिरीकदृष्टया नि:समर्थ असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना मतदान केंद्राध्यक्ष / मतदान अधिकारी म्हणून त्यांचे कर्तव्य व्यवस्थित पार पाडता येणार नाही अशी सक्षम प्राधिकाऱ्यांची खात्री पटल्यास त्यांना मतदान केंद्रावर नेमणूक देऊ नये.

**प्रश्न ७ मतदान कर्मचाऱ्यांची मतदान केंद्रावर नियुक्ती करण्यापूर्वी सरमिसळ कशारितीने करणे आवश्यक आहे ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची यादी (डेटा बेस) तयार करून संगणकाच्या मदतीने अथवा स्वैरपणे (Randomly) निवडून मतदान पथक तयार करणे आणि अशा पथकांना स्वैरपणे (Randomly) मतदान केंद्र निश्चित करून देणे म्हणजे सरमिसळ (Randomization) करणे होय. एकाच कार्यालयातील अथवा विभागातील कर्मचा-यांचा एका मतदान पथकात समावेश होऊ नये. तसेच विशिष्ट कर्मचारी विशिष्ट मतदान केंद्रावर येऊ नये याकरिता Randomization केले जाते.

**प्रश्न ८ मतदान कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी विहित नमुना आहे काय ?**

उत्तर होय. या विहित नमुन्यामध्ये नेमणूक करावयाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचे पूर्ण नांव, मूळ पदनाम, कार्यालयाचे नांव, नेमणूकीचे पद ( मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी-१ / सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी २, ३) व नेमणूकीचे मतदान केंद्र इ. तपशिल असतो.

**प्रश्न ९ निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचारी हे कर्तव्यावर हजर न झाल्यास कोणत्या तरतुदीन्वये ते कारवाईस पात्र ठरतात ?**

उत्तर २६ जुलै, २००० रोजी भारत निवडणूक आयोग, केंद्रशासन व इतर राज्यशासन (ज्यामध्ये महाराष्ट्र राज्याचा समावेश आहे) यांच्या मधील करारानुसार व त्यातील तरतुदीनुसार तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिनियम / नियमातील तरतुदीनुसार निवडणुकीसाठी

नियुक्त कर्मचारी कर्तव्यावर हजर न झाल्यास कारवाईस पात्र ठरतात. नगरपालिका निवडणूकीसाठी या संदर्भातील तरतूद ही महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३१ मध्ये करण्यात आली आहे.

(संदर्भ:-राज्य निवडणूक आयोग यांचेकडील परिपत्रक क्र. रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५दिनांक ०२/०८/२००६आणि पंचायती आणि नगरपालिका निवडणूक (कर्मचारी, परिसर आणि वहाने इ. अधिग्रहित करणे) आदेश १९९५ मधील परिच्छेद ९ )

## ३. <u>मतदान पथक व त्यांची कर्तव्ये</u>

**प्रश्न १ निवडणुकीसाठी प्रभागनिहाय निश्चित करण्यात आलेल्या मतदान केंद्रावरील मतदान पथके केव्हा निश्चित करण्यात येतात ?**

उत्तर मतदान पथकाची रचना मतदानाच्या तारखेपूर्वी किमान आठ दिवस अगोदर होईल असे पाहावे. तसेच मतदान पथकातील सर्व व्यक्तींना आदेश किमान ०३ दिवस अगोदर बजावले जातील याची दक्षता घ्यावी.

**प्रश्न २ मतदान पथके तयार करताना काय दक्षता घ्यावी लागते ?**

उत्तर (i) ज्यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी व कर्मचारी हे मतदान केंद्रावर नेमले जातील त्यावेळी मतदान केंद्राध्यक्ष व पहिला मतदान अधिकारी स्थानिक स्वराज्य संस्थांचा अधिकारी / कर्मचारी असू नये. (ii) वरिष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्याला त्याच्यापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अधिनस्त नेमणूक देऊ नये. (iii) आवश्यकतेप्रमाणे महिला मतदान अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. इ. दक्षता मतदान पथके तयार करतांना घ्यावी.

**प्रश्न ३ मतदान केंद्रावरील मतदार संख्येनुसार मतदान पथकात कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात येते का?**

उत्तर होय. मतदान केंद्रावर मतदारांची संख्या १२०० पेक्षा अधिक असेल तर अशा मतदान केंद्रावर एक मतदान अधिकारी अधिक देण्यात यावा. तसेच मतदान पथकात आवश्यकतेनुसार चतुर्थश्रेणी कर्मचारी समाविष्ट करावेत.

**प्रश्न ४ सर्वसाधारणपणे एका मतदान पथकाची रचना कशी असते ?**

उत्तर सर्वसाधारणपणे एका मतदान पथकामध्ये एक मतदान केंद्राध्यक्ष व तीन मतदान अधिकारी (सहाय्यक मतदान केंद्राध्यक्षासह) असावेत.

**प्रश्न ५ एका मतदान पथकामध्ये शासकीय व निमशासकीय कर्मचारी कशारीतीने नियुक्त करावेत?**

उत्तर मतदान पथकामधील मतदान केंद्राध्यक्ष हा निमशासकीय कर्मचारी असल्यास मतदान अधिकारी क्र.१ हा शासकीय कर्मचारी असावा.

**प्रश्न ६ एखादा मतदान अधिकारी मतदान केंद्रावर अनुपस्थित असेल तर मतदान केंद्राध्यक्षास स्थानिकरित्या मतदान अधिकारी नियुक्त करण्याचा अधिकार आहे काय ?**

उत्तर होय. मात्र शक्यतो अशी परिस्थिती उद्भवत नाही. अशा वेळी झोनल अधिका-याकडे असलेल्या राखीव कर्मचा-यातून मतदान अधिकारी उपलब्ध करुन दिला जातो.

**प्रश्न ७ मतदान केंद्राध्यक्ष नियुक्त करताना कोणती दक्षता घ्यावी ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्ष हा शक्यतो राजपत्रित अधिकारी असावा. मात्र राजपत्रित अधिकारी उपलब्ध न झाल्यास वरिष्ठ दर्जाचा / पर्यवेक्षीय काम पाहणारा अधिकारी असावा. मतदान केंद्राध्यक्ष ज्या परिसरातील रहिवासी असेल त्या परिसरातील मतदान केंद्रावर त्याला नियुक्ती देऊ नये.

**प्रश्न ८ मतदान पथकामध्ये कोणत्या परिस्थितीत किमान एका महिला कर्मचा-याचा समावेश करणे आवश्यक असते ?**

उत्तर ज्या मतदान केंद्रावर महिला मतदारांची संख्या अधिक असेल अथवा पडदानशीन महिला मतदार असतील अशा मतदान केंद्रावर किमान एक महिला मतदान अधिकारी नेमणे आवश्यक आहे.

**प्रश्न ९ मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्य कोणते ?**

उत्तर मतदानाच्या सर्व प्रकियेवर पर्यवेक्षण नियंत्रण व मार्गदर्शन करुन मतदानाच्या प्रक्रिया पारदर्शक नि:पक्षपातीपणे निर्भय वातावरणामध्ये पार पाडणे व हे काम पूर्ण करण्यासाठी इतर मतदान अधिकाऱ्यामध्ये कामाची विभागणी करुन देणे इ. मतदान केंद्राध्यक्षांची सर्वसाधारण कर्तव्य आहेत.

**प्रश्न १० मतदान अधिकारी क्र. १ चे कर्तव्य काय आहे ?**

उत्तर मतदान अधिकारी क्र. १ हा मतदार यादीचा चिन्हांकित प्रतीचा प्रभारी असेल व मतदारांची ओळख पटविणे ही त्याची मुख्य जबाबदारी असेल. मतदार मतदान केंद्रामध्ये थेट प्रवेश केल्यानंतर पहिला मतदान अधिका-याकडे जाईल. त्यावेळी मतदान अधिकारी क्र.१ हा मतदार छायाचित्र, ओळखपत्र अथवा पर्यायी कागदपत्रे यांची तपासणी करुन ओळखी विषयी स्वतःची खात्री करुन घेईल.

**प्रश्न ११ मतदान अधिकारी क्र. २ चे कर्तव्य काय आहे ?**

उत्तर दुसरा मतदान अधिका-याकडे पक्क्या शाईच्या मार्करचा पेन असेल. पहिल्या मतदान अधिकाऱ्यांनी मतदारांची ओळख पटविल्यानंतर दुसरा मतदान अधिकारी डाव्या हाताच्या तर्जनीवर कोणतीही खूण / डाग नाही याबाबत तपासणी करुन मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर मार्कर पेनने पक्क्या शाईची खूण करील. व्हीएम - १ या नमुन्यामधील मतदारांची नोंदवहीमध्ये मतदाराचा मतदारयादीतील अनुक्रमांक नमूद करेल व त्यासमोर त्याची सही अथवा अंगठ्याचा ठसा घेतल्यानंतर मतदाराला मतदार चिठ्ठी देईल.

**प्रश्न १२ मतदान अधिकारी क्र. ३ चे कर्तव्य काय आहे ?**

उत्तर मतदान अधिकारी क्र. ३ हा नियंत्रण युनिटचा प्रभारी असेल व तो दुस-या मतदान अधिका-याने दिलेल्या मतदार चिठ्ठयांच्या आधारे व चिठ्ठीवर दर्शविलेल्या अनुक्रमांकानुसार मतदान कक्षामध्ये मतदारास जाण्यास परवानगी देईल.

**प्रश्न १३ मतदान अधिकारी क्र. ४ चे कर्तव्य काय आहे ?**

उत्तर पडदानशीन महिला ज्या भागामध्ये बहुसंख्य असतील अशा भागांमध्ये शक्यतो महिला कर्मचाऱ्याची मतदान अधिकारी क्रमांक ४ म्हणून नेमणूक केली जाते. पडदानशीन महिला मतदाराची ओळख पटविण्यामध्ये मतदान अधिकारी क्रमांक १ यांना सहाय्य करण्याची जबाबदारी अशा कर्मचा-यावर सोपविली जाते. तसेच एखाद्या मतदान केंद्रावर मतदारांची संख्या १२०० पेक्षा जास्त असेल तर अशा वेळीही चौथा मतदान अधिकारी नियुक्त करण्याची आवश्यकता असते. अशा चौथ्या मतदान अधिका-यास मतदान केंद्राध्यक्ष काही कामे स्वतंत्रपणे विभागून देतात.

**प्रश्न १४ मतदान कर्मचाऱ्यांना निवडणूक भत्ता कशा रितीने दिला जातो ?**

उत्तर नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा किंवा विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये मतदान कर्मचाऱ्यांना ज्या दराने निवडणूक भत्ता दिला जातो, त्याच दराने निवडणूक भत्ता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीमध्ये मतदान कर्मचाऱ्यांना देण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडून अशा निवडणूकांवेळी कळविले जाते. त्यानुसार मतदान प्रशिक्षणाकरीता उपस्थित राहणाऱ्या व मतदानादिवशी कार्यरत असणाऱ्या मतदान कर्मचाऱ्यांना त्या त्या वेळी निश्चित केलेल्या संपूर्ण दराने निवडणूक भत्ता दिला जातो. तसेच मतदानाच्या दिवसासाठी त्या त्या वेळी निश्चित केलेल्या संपूर्ण दराने आहार भत्ता देण्यात येतो.

**प्रश्न १५ राखीव मतदान कर्मचाऱ्यांना निवडणूक भत्ता दिला जातो काय ?**

उत्तर होय. राखीव मतदान कर्मचाऱ्यांना निवडणूक भत्ता दिला जातो.

**प्रश्न १६ एखाद्या उमेदवाराची निवडणुकीतील यशाची संभाव्यता वाढेल असे (मत देण्याव्यतिरिक्त अन्य) कोणतेही कृत्य निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान कर्मचारी किंवा निवडणुकीचे कोणतेही काम करण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी यांनी केल्यास त्याच्या विरूध्द कोणती कारवाई होईल?**

उत्तर वर उल्लेखिलेल्या कोणत्याही व्यक्तीने निवडणूकीत मत द्यावे म्हणून मन वळविण्याचा किंवा मत देण्यापासून कोणत्याही व्यक्तीस परावृत्त करण्याचा किंवा मत देण्याच्या बाबतीत कोणत्याहीप्रकारे वजन टाकण्याचा प्रयत्न केला तर त्या व्यक्तीला अपराधसिध्दीनंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची किंवा दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३०)

## ४. <u>मतदान कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण</u>

**प्रश्न १ निवडणुकीसाठी मतदान केंद्रावरील कर्मचा-यांना निवडणूक पूर्व प्रशिक्षण केव्हा व किती वेळा देण्यात येते ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निश्चित केल्याप्रमाणे मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांना निवडणूक पूर्व प्रशिक्षण दोन ते तीन वेळा देण्यात येते. सर्वसाधारणपणे पहिले प्रशिक्षण हे नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी, दुसरे प्रशिक्षण हे निवडणूक लढविणारे उमेदवार निश्चित झाल्यानंतर परंतू मतदान दिवसाच्या एक आठवडा अगोदर आणि तिसरे प्रशिक्षण हे मतदान दिवसाच्या अगोदरच्या दिवशी घेण्यात येते. तथापि, निवडणूक निर्णय अधिकारी हे त्यांच्या सोयीने तीन प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करू शकतात.

**प्रश्न २ निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचा-यांना सर्वसाधारणपणे कोणत्या बाबींवर प्रशिक्षण देण्यात येते व प्रशिक्षण कोण देते ?**

उत्तर (i) निवडणूक कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य (ii) निवडणूक दिवशी टप्प्याटप्प्याने करावयाची कार्यवाही (iii) भरणे आवश्यक असलेले फॉर्मस व (iv) मतदान यंत्र इ. बाबींवर प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षण निवडणुकीमधील तज्ज्ञ व्यक्ती देतात.

**प्रश्न ३ मतदान कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाच्या वेळी किमान कोणत्या सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे ?**

उत्तर मतदान कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाच्या वेळी सर्वसाधारणपणे योग्य पिण्याचे पाणी, प्रथमोपचार,वैद्यकीय सुविधा, प्रसाधनगृहे इ. सुविधा उपलब्ध करुन देणे व प्रशिक्षण हवेशीर अशा हॉलमध्ये आयोजित करणे आवश्यक आहे.

**प्रश्न ४ मतदान कर्मचाऱ्यांसाठीच्या प्रत्येक प्रशिक्षण वर्गाची विभागणी सर्वसाधारणपणे कोणत्या दोन भागांमध्ये करणे आवश्यक आहे ?**

उत्तर मतदान प्रक्रिया प्रशिक्षण व प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळणीचे प्रशिक्षण अशा सर्वसाधारण दोन भागांमध्ये मतदान कर्मचाऱ्यांसाठीच्या प्रत्येक प्रशिक्षण वर्गाची विभागणी करणे आवश्यक आहे.

**प्रश्न ५ निवडणुकीसाठी प्रशिक्षणादरम्यान मतदान यंत्राची अभिरूप चाचणी दाखविण्यात येते का ?**

उत्तर होय.

**प्रश्न ६ मतदानाच्या दिवशी वापरण्यात येणारे फॉर्म्स, पाकिटे व इतर साहित्यांची सिलिंगची माहिती दिली जाते का ?**

उत्तर होय.

**प्रश्न ७ मतदान कर्मचा-यांना प्रशिक्षणादरम्यान काही वाचन साहित्य दिले जाते का? असल्यास कोणते ?**

उत्तर मतदान कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणा दरम्यान वाचन साहित्य दिले जाते. मतदान केंद्राध्यक्षांची हस्तपुस्तिका, मतदान यंत्राबाबतची माहिती असणारे वाचन साहित्य दिले जाते.

**प्रश्न ८ प्रशिक्षणासाठी गैरहजर कर्मचाऱ्यांवर कोणत्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते ?**

उत्तर प्रशिक्षणासाठी गैरहजर कर्मचाऱ्यांविरूध्द महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३१ आणि पंचायती आणि नगरपालिका निवडणूक (कर्मचारी, परिसर आणि वहाने इ. अधिग्रहित करणे) आदेश १९९५ मधील परिच्छेद ९ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते.

## ५. मतदान साहित्य

**प्रश्न १ मतदान केंद्रावर लागणा-या मतदान साहित्याची यादी निश्चित केलेली असते का ? अशी यादी केंद्राध्यक्षांना देण्यात येते काय ?**

उत्तर होय. अशी यादी मतदान केंद्राध्यक्षांना देण्यात येते.

**प्रश्न २ मतदानासाठी वापरण्यात येणारी मतदान यंत्रे व मतदान साहित्य स्विकारण्याची जबाबदारी कोणाकडे आहे ?**

उत्तर मतदानासाठी वापरण्यात येणारी मतदान यंत्रे व मतदान साहित्य स्विकारण्याची जबाबदारी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी क्र.१ यांची आहे.

**प्रश्न ३ मतदान वितरण केंद्रातून मतदान साहित्य घेताना मतदान केंद्राध्यक्षाने कोणती दक्षता घ्यावी ?**

उत्तर मतदान साहित्य प्राप्त करून घेताना असे साहित्य मतदान केंद्राध्यक्षाच्या निर्देश पुस्तिकेमधील यादीनुसार प्राप्त झाले आहे याची खात्री करणे. पक्क्या शाईच्या मार्कर पेनची व पॅडमधील शाई सुकलेली नसल्याची खात्री करणे, आपल्याला नेमुन दिलेल्या मतदार केंद्रावरील मतदार यादीच्या प्रती, ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, विभेदक चिन्ह, पेपर सिल, प्रदत्त मतपत्रिका, मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी, स्ट्रीपसिल, स्पेशल टॅग, इ. साहित्य प्राप्त झाले आहे याची खात्री करणे यासंदर्भातील दक्षता घ्यावी.

**प्रश्न ४ मतदानाच्या वेळी मतदान यंत्रात बिघाड झाल्यास / मतदान साहित्य कमी पडल्यास असे साहित्य कसे उपलब्ध केले जाते ?**

उत्तर झोनल अधिकारी यांचेकडे राखीव साहित्य उपलब्ध असते. त्यामधून मतदानाच्यावेळी मतदान यंत्रात बिघाड झाल्यास / मतदान साहित्य कमी पडल्यास असे साहित्य उपलब्ध करुन दिले जाते.

**प्रश्न ५ मतदान केंद्रासाठी आवश्यक असलेल्या मतदान साहित्यापैकी कोणत्या साहित्याचा तपशिल (संख्या) हा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या संख्येवरून निश्चित करणे आवश्यक आहे ?**


उत्तर बॅलेट युनिट, नोंद झालेल्या मतांचा हिशोब (नमूना व्हीएम - ३ भाग - १), मतदान प्रतिनिधींचे बॅजेस

**प्रश्न ६ मतदान केंद्रासाठी आवश्यक असलेल्या मतदान साहित्यापैकी कोणत्या साहित्याची संख्या ही त्या मतदान केंद्रास जोडलेल्या मतदारांच्या संख्येवरून निश्चित करणे आवश्यक आहे ?**

उत्तर मतदार स्लिप, मतदार नोंदवही (नमूना व्हीएम - १), मार्कर पेन

**प्रश्न ७ प्रत्येक मतदान केंद्रासाठी आवश्यक असलेले विभेदक चिन्ह तयार करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे काय निर्देश आहेत ?**

उत्तर विभेदक चिन्हाचा तपशिल आदेश १९९७ मधील परिच्छेद २ नुसार विभेदक चिन्ह हे वर्तुळामध्ये वरच्या बाजूस प्रभाग क्रमांक आणि त्या खाली रेष मारून खालील भागात मतदान केंद्राचा क्रमांक नमूद करून तयार करण्याचे निर्देश आहेत. उदा.




(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी/जीईएन/१०९७/सीआर-२४१/डी-३ दिनांक २३/०७/१९९७)

**प्रश्न ८ मतदान साहित्यावर राजमुद्रा आणि आयोगाचे बोधचिन्ह व नाव छापण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे काय निर्देश आहेत ?**

उत्तर मतदान साहित्यावर राजमुद्रा आणि आयोगाचे बोधचिन्ह व नांव छापण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे निर्देश खालील प्रमाणे आहेत.:-

१) सदर राजमुद्रा तसेच आयोगाचे बोधचिन्ह व राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र हे शब्द केवळ सर्व प्रकारचे सांविधिक नमुने व निवडून आल्यानंतर उमेदवारास द्यावयाचे प्रमाणपत्र यावरच छापावे.

२) असांविधिक नमुन्यांवर तसेच महत्वाच्या सूचनांवर आयोगाचे बोधचिन्ह व राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र हे शब्द एवढाच मजकूर छापावा. या नमुन्यावर राजमुद्रेची छपाई करु नये.

३) इतर बाबी उदा. उमेदवार तसेच प्रतिनिधी यांचे बिल्ले, ओळखपत्रे इ. साहित्यावर राजमुद्रा तसेच राज्य निवडणूक आयोगाचे बोधचिन्ह छापल्यास त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे याची छपाई इतर कोणत्याही साहित्यावर करण्यात येऊ नये.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. रानिआ/मनपा/२०११/ प्र.क्र.२४/का.०५ दिनांक १७.१२.२०११)

**प्रश्न ९ मतदान केंद्राध्यक्षांच्या दैनंदिनीला अनुक्रमांक देणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न १० निवडणुक निरिक्षक यांनी एकुण किती अहवाल सादर करावयाचे असतात ?**

उत्तर पहिला - उमेदवारांची यादी अंतिम होण्याच्या पुर्वसंधेस

दुसरा - प्रचारा दरम्याण

तीसरा - मतदानापूर्वी दोन दिवस, मतदानाच्या दिवशी व मतमोजनी च्या दिवशी

( संदर्भ - राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र पत्र क्र रानिआ/जिपपंस.२०१६/ प.क्र.३०/का-६ दि.०९/११/२०१६)

**प्रश्न ११ मतदान केंद्रावरील वापरासाठी कंट्रोल युनिटमधील बॅटरी (Power Pack) व्यतिरिक्त जादा बॅटरी (Power Pack) देता येईल काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न १२ मतदान साहित्याची तपासणी मतदान केंद्रावर जाणेपूर्वी केली जाते काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न १३ साहित्य केंद्रनिहाय बरोबर मिळाले असल्याची खात्री / प्रमाणिकरण करण्यात येते काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न १४ मतदान केंद्रावरील साहित्यापैकी त्याच मतदान केंद्रावर पुरवावयाचे विशिष्ट साहित्य कोणते असते ?**

उत्तर मतदार यादीच्या कार्यप्रती, इलेक्ट्रानिक मतदान यंत्र, विभेदक चिन्ह, पेपर सील, प्रदत्त मतांसाठी मतपत्रिका, स्ट्रीप सील, स्पेशल टॅग, मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी हे त्याच मतदान केंद्रावर पुरवायचे विशिष्ट साहित्य असते.

## ६. निवडणूक कार्य प्रमाणपत्र व टपाली मतपत्रिका

**प्रश्न १ निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेले कर्मचारी हे मतदानाचा अधिकार कसा बजावितात?**

उत्तर निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेले कर्मचारी हे मतदानाचा अधिकार टपाली मतपत्रिकेद्वारे बजावितात. कर्मचा-याचे नांव नियुक्त केलेल्या मतदारसंघाच्या मतदार यादीत असल्यास अशा कर्मचा-यास निवडणूक कार्य प्रमाणपत्राआधारे मतदान करता येऊ शकते.

**प्रश्न २ निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या कर्मचा-यास टपाली मतपत्रिका अथवा निवडणूक कार्य प्रमाणपत्र कोणत्या निकषाच्या आधारे मिळू शकते ?**

उत्तर नगरपालिकेच्या मतदार यादीतील मतदार असणे आणि त्यांची नियुक्ती अशा निवडणुकीसाठी झालेली असणे या निकषाच्या आधारे निवडणुकीसाठी नियुक्त झालेल्या कर्मचा-यास टपाली मतपत्रिका अथवा निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळू शकते.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद २ (५) )

**प्रश्न ३ निवडणूक कार्य प्रमाणपत्र व टपाली मतपत्रिका दिलेल्या मतदाराच्या चिन्हांकित मतदार यादीमधील नावासमोर कोणती नोंद घेतली जाते ?**

उत्तर निवडणूक कार्य प्रमाणपत्र व टपाली मतपत्रिका दिलेल्या मतदाराच्या चिन्हांकित मतदार यादीमधील नावासमोर अनुक्रमे " ईडीसी" व "पीबी" असे लिहून नोंद घेतली जाते.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ३ (२) (बी) आणि ५ (२) (बी) )

**प्रश्न ४ निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेल्या मतदान कर्मचाऱ्याने आपला मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी काय करणे आवश्यक आहे ?**

उत्तर निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेल्या मतदान कर्मचाऱ्याने आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आवश्यकतेनुसार पी बी-१ किंवा पी बी-२ या प्रपत्रामधील अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे मतदानतारखेच्या पूर्वी कमीत कमी अनुक्रमे ०७ किंवा ०४ दिवस अगोदर सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या मतदारास पात्रतेनुसार टपाली मतपत्रिका अथवा निवडणुक कार्य प्रमाणपत्र दिले जाईल.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ३ (१) (२) )

**प्रश्न ५ टपाली मतपत्रिका मिळण्यासाठी पी बी -१ या नमुन्यामधील अर्ज सादर करताना कर्मचाऱ्याने कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे ?**

उत्तर टपाली मतपत्रिका मिळण्यासाठी पी बी -१ या नमुन्यामधील अर्ज सादर करताना कर्मचाऱ्याने कमीत कमी मतदान दिवसाच्या ०७ दिवस अगोदर संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे प्रपत्र पी बी-१ या नमुन्यामधील अर्ज सादर करावा. तथापि, असा अर्ज हा त्या कर्मचाऱ्याचे नाव ज्या मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नोंदविले आहे त्या मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे. पी बी-१ या प्रपत्रामध्ये स्वत:चे नांव ज्या मतदारसंघामध्ये आहे तो मतदार संघ, मतदान केंद्र क्रमांक, मतदार यादीतील अनुक्रमांक व टपाली मतपत्रिका पाठविण्याचा पत्ता अचूक नमूद करुन स्वाक्षरी करावी. तसेच सोबत निवडणूक कर्तव्यार्थ नेमणूक झालेल्या आदेशाची झेरॉक्स प्रत जोडावी.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ३ (१))

**प्रश्न ६ निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळविण्यासाठी पी. बी. - २ या नमुन्यामधील अर्ज सादर करताना कर्मचाऱ्याने कोणती दक्षता घ्यावी ?**

उत्तर निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळण्यासाठी पी बी -२ या नमुन्यामधील अर्ज सादर करताना कर्मचाऱ्याने कमीत कमी मतदान दिवसाच्या ०४ दिवस अगोदर संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे प्रपत्र पी बी- २ या नमुन्यामधील अर्ज सादर करावा. तथापि, असा अर्ज हा त्या कर्मचाऱ्याचे नाव ज्या मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नोंदविले आहे आणि तो त्याच मतदारसंघामध्ये निवडणूक कर्तव्यावर असेल तर त्या मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करणे

आवश्यक आहे. पी बी-२ या प्रपत्रामध्ये स्वत:चे नांव ज्या मतदारसंघामध्ये आहे तो मतदार संघ, मतदान केंद्र क्रमांक, मतदार यादीतील अनुक्रमांक व निवडणूक कार्य प्रमाणपत्र पाठविण्याचा पत्ता अचूक नमूद करुन स्वाक्षरी करावी. तसेच सोबत निवडणूक कर्तव्यार्थ नेमणूक झालेल्या आदेशाची झेरॉक्स प्रत जोडावी.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ३ (२))

**प्रश्न ७ निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचा-यांना निवडणूक कार्य प्रमाणपत्र व टपाली मतपत्रिका मिळण्यासाठी अर्ज कोणाकडे व किती दिवसांत सादर करणे आवश्यक आहे ?**

उत्तर टपाली मतपत्रिका आणि निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळण्यासाठी अनुक्रमे पी बी -१ आणि पी बी -२ या नमुन्यामधील अर्ज निवडणूकीसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याने कमीत कमी मतदान दिवसाच्या अनुक्रमे ०७ आणि ०४ दिवस अगोदर संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करावा. तथापि, टपाली मतपत्रिकेसाठीचा अर्ज हा त्या कर्मचाऱ्याने त्याचे नाव ज्या मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये नोंदविले आहे त्या मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे. तर निवडणूक कार्य प्रमाणपत्रासाठीचा अर्ज हा तो कर्मचारी ज्या मतदारसंघामध्ये निवडणूक कर्तव्यावर आहे त्या मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ३ (१)(२))

**प्रश्न ८ कोणत्याही निवडणूक कामकाजासाठी नियुक्ती नसेल तर त्या मतदार असलेल्या व्यक्तीस**

**टपाली मतपत्रिका अथवा निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळू शकेल काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ९ मतदानासाठी नियुक्त कर्मचा-याचे नांव इतर प्रभागात असल्यास त्यांना निवडणूक कार्य प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे का ? त्याचे सर्वसाधारण निकष काय ?**

उत्तर मतदान कर्मचाऱ्यास ज्या प्रभागामध्ये निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात आले आहे, त्याच प्रभागाचा तो मतदार असल्यास आणि ज्या मतदान केंद्रावर त्यास निवडणूक कर्तव्यार्थ नेमण्यात आले आहे त्याच मतदान केंद्रावर मतदान करू इच्छित असल्यास त्याला निवडणूक कार्यप्रमाणपत्र उपलब्ध करुन देता येईल, अन्यथा अशा कर्मचा-यास टपाली मतपत्रिका द्यावी लागेल.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ३ (२))

**प्रश्न १० टपाली मतपत्रिकेत उमेदवारांचा कोणकोणता तपशिल दर्शविण्यात येतो ?**

उत्तर टपाली मतपत्रिकेत उमेदवारांची केवळ नांवे असतात. संबंधित उमेदवारांचे निवडणूक चिन्ह व चिन्हाचे नांव दर्शविण्यात येत नाहीत. तथापि, उमेदवाराच्या पक्षाचे नांव कंसामध्ये नोंदविलेले असते.

**प्रश्न ११ नगरपरिषद निवडणुकीदरम्यान एखाद्या कर्मचाऱ्यास निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केले आहे. परंतु त्याचे नाव ग्रामपंचायतीच्या मतदार यादीमध्ये आहे तर त्याला टपाली मतपत्रिका अथवा निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळू शकेल काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न १२ एखाद्या निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेला कर्मचारी हा टपाली मतपत्रिका अथवा निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असेल तर त्यास टपाली मतपत्रिका अथवा निवडणूक कार्य प्रमाणपत्र कोणी देणे आवश्यक आहे ?**

उत्तर ज्या मतदारसंघाच्या मतदारयादीत संबंधित कर्मचा-याचे नाव असेल त्या मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी टपाली मतपत्रिका अथवा निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असलेल्या कर्मचाऱ्यास ते देणे आवश्यक आहे.

**प्रश्न १३ टपाली मतपत्रिका मिळण्यासाठी पी.बी.-१ या नमुन्यामधील अर्ज प्राप्त झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कोणती कार्यवाही करावी ?**

उत्तर टपाली मतपत्रिका मिळण्यासाठी पी.बी.-१ या नमुन्यामधील अर्ज प्राप्त झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अर्जदार हा निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त मतदार आहे याची खात्री करावी. त्याचे नांव मतदार यादीत असल्याची खात्री करावी व त्यानंतर त्यास टपाली मतपत्रिका द्यावी. त्याचवेळी अशा मतदाराची नोंद मतदान केंद्रावर उपलब्ध करून द्यावयाच्या मतदार यादीच्या कार्यप्रतीवर लाल शाईने पीबी अशी घ्यावी.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ३ (१)आणि ५ (२बी))

**प्रश्न १४ निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळण्यासाठी पी.बी.- २ या नमुन्यामधील अर्ज प्राप्त झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कोणती कार्यवाही करावी ?**

उत्तर निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळण्यासाठी पी.बी.२ या नमुन्यामधील अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जदार हा ज्या प्रभागाचा मतदार आहे त्याच प्रभागातील मतदान केंद्रावर निवडणूक कर्तव्यार्थ नेमला आहे याची खात्री करावी व त्यानंतर त्यास प्रपत्र पी.बी.-३ मध्ये निवडणूक कार्य प्रमाणपत्र द्यावे व त्याचवेळी अशा मतदाराची नोंद मतदान केंद्रावर उपलब्ध करून द्यावयाच्या मतदार यादीच्या कार्यप्रतीवर लाल शाईने ईडीसी अशी घ्यावी.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ३ (२))

**प्रश्न १५ निवडणूक निर्णय अधिकारी हे टपाली मतपत्रिका किंवा निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असलेल्या मतदारास टपाली मतपत्रिका किंवा निवडणूक कार्य प्रमाणपत्र उशिरात उशीरा कधीपर्यंत देऊ शकतात ?**

उत्तर टपाली मतपत्रिका किंवा निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असलेल्या मतदारासंदर्भात,

त्याचे नाव ज्या मतदारयादीमध्ये आहे अशा सर्व मतदारयादीच्या कार्यप्रतीमधील त्याच्या नावासमोर पीबी किंवा ईडीसी अशी नोंद करावी लागते आणि अशा मतदारयादीच्या कार्यप्रती संबंधित मतदानकेंद्राच्या मतदान कर्मचाऱ्यांकडे मतदान साहित्य वाटपाच्या दिवशी द्याव्या लागतात. त्यामुळे टपाली मतपत्रिका किंवा निवडणूक कार्यप्रमाणपत्र हे निवडणक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यास देणे हे शक्यतो वर नमूद केलेली कार्यवाही अचूकरित्या पूर्ण होईल अशारितीने निवडणूक निर्णय अधिकारी यांना करता येईल. तथापि, त्यासाठी कालमर्यादा निश्चित केलेली नाही. तसेच टपाली मतपत्रिका निवडणूक कर्तव्यार्थ नेमलेल्या मतदारास व्यक्तिश: देता येईल.

**प्रश्न १६ टपाली मतपत्रिका मिळण्यास पात्र असलेल्या मतदारास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी टपाली मतपत्रिकेसोबत कोणत्या बाबी पाठविणे आवश्यक आहे ?**

उत्तर (i) पीबी-४ या प्रपत्रातील मतदाराचे घोषणापत्र. (ii) पीबी-५ या प्रपत्रातील मतपत्रिकेसाठीचा लखोटा. (iii) निवडणूक निर्णय अधिकारी यांना उद्देशून पाठवायच्या पीबी-६ या प्रपत्रातील मोठा लखोटा. (iv) मतदाराच्या माहितीसाठी पीबी-७ या प्रपत्रातील मार्गदर्शक सूचना या बाबी टपाली मतपत्रिका मिळण्यास पात्र असलेल्या मतदारास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी टपाली मतपत्रिकेसोबत पाठविणे आवश्यक आहे.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ५ (१))

**प्रश्न १७ निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदारास पाठविण्यात येणाऱ्या टपाली मतपत्रिकेमधील कोणत्या घोषणापत्र व पाकिटावर मतपत्रिकेचा अनुक्रमांक नमूद करणे आवश्यक आहे ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदारास पाठविण्यात येणाऱ्या टपाली मतपत्रिकेमधील प्रपत्र पीबी-४ या मतदाराने करावयाचे घोषणापत्र आणि प्रपत्र पीबी-५ मधील पाकीट - अ वर टपाली मतपत्रिकेचा अनुक्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

**प्रश्न १८ टपाली मतपत्रिका आणि त्यासोबतची प्रपत्रे ही टपाली मतपत्रिका मिळण्यास पात्र असलेल्या मतदारास निवडणूक निर्णय अधिकारी हे समक्ष देऊ शकतील काय ?**

उत्तर होय. निवडणूक निर्णय अधिकारी हे टपाली मतपत्रिका आणि त्यासोबतची प्रपत्रे ही टपाली मतपत्रिका मिळण्यास पात्र असलेल्या मतदारास ओळख पटवून व्यक्तिश: देऊ शकतील.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ५ (१))

**प्रश्न १९ निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिका देण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर मतपत्रिकेच्या स्थळप्रतीचे काय करावे ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी हे निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिका देण्याचे कामपूर्ण झाल्यानंतर सदर मतपत्रिकांच्या स्थळप्रती एका लखोट्यात मोहोरबंद करील व लखोट्यामध्ये काय आहे त्याचे थोडक्यात वर्णन लखोट्या लिहून लखोटा मोहोरबंद केल्याची तारीख त्यावर नमूद करील. (संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ५ (४))

**प्रश्न २० ज्या व्यक्तीस टपाली मतपत्रिका मिळाली आहे त्यांनी आपले मत कशारितीने नोंदविले आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे पाठविले पाहिजे ?**

उत्तर ज्या व्यक्तीस टपाली मतपत्रिका देण्यात आली आहे व जो त्यावर आपले मत नोंदवू इच्छितो अशा मतदाराने प्रपत्र पीबी - ७ मधील सूचना काळजीपूर्वक वाचून त्यानुसार आपले मत नोंदवावे व प्रपत्र पीबी-५ या लखोट्यात ते बंद करावे.

अशा मतदाराने पीबी-४ या प्रपत्रातील घोषणापत्रावर राजपत्रित अधिकाऱ्यासमोर अथवा त्यास ज्या मतदानकेंद्रावर निवडणूक कामासाठी नेमण्यात आले असेल त्या मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षासमोर सही केली पाहिजे व ती सही त्यांचेकडून साक्षांकित करून घेतली पाहिजे.

यानंतर मतपत्रिका व घोषणापत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे प्रपत्र पीबी-७ मध्ये नमूद केलेल्या सूचनानुसार मतमोजणी सुरू करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी परत केले पाहिजे. त्यासाठी प्रपत्र पीबी-६ या लखोट्यावर पोस्टेज लावण्याची आवश्यकता नाही.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ६ आणि ९ (१) )

**प्रश्न २१ टपाली मतपत्रिका वापरुन मत नोंदविताना मतदाराच्या सहीचे साक्षांकन करण्यास कोण अधिकारी सक्षम आहेत ?**

उत्तर राजपत्रित अधिकारी अथवा निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्ती मिळालेल्या मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष अशा टपाली मतपत्रिका वापरुन मत नोंदविणा-या मतदाराच्या सहीचे साक्षांकन करण्यास सक्षम आहेत.

सर्वसाधारणपणे कार्यालयाचे प्रमुख हे राजपत्रित अधिकारी असतात. तथापि, खालील अधिकारी हे सुध्दा राजपत्रित संवर्गामध्ये येतात.

१) सर्व शासकीय महाविद्यालये यांचे प्राचार्य, उपप्राचार्य आणि प्राध्यापक (सहयोगी, सहाय्यक), कनिष्ठ अधिव्याख्याता (वर्ग २) २) सर्व शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये यांचे **फक्त** प्राचार्य / मुख्याध्यापक ३) जिल्हा मुख्यालयातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI), यांचे प्राचार्य, उपप्राचार्य व प्रबंधक तसेच तालुका स्तरावरील ITI चे फक्त प्राचार्य ४) शासकीय अध्यापक महाविद्यालयाचे (बी. एड व डी. एड) प्राचार्य, सहयोगी व सहाय्यक प्राध्यापक

सर्व प्रकारची (अनुदानीत व विनाअनुदानीत) खाजगी महाविद्यालये यांचे प्राचार्य, उपप्राचार्य व प्राध्यापक, खाजगी उच्च माध्यमिक, माध्यमिक व प्राथमिक विद्यालये यांचे प्राचार्य / मुख्याध्यापक आणि खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) यांचे प्राचार्य हे राजपत्रित अधिकारी संवर्गामध्ये येत नाहीत. तसेच विशेष कार्यकारी दंडाधिकारी, राज्य विधानमंडळ व संसदेचे सदस्य हे मतदाराच्या सहीचे साक्षांकन करण्यास सक्षम नाहीत.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ६ (२) )

**प्रश्न २२ टपाली मतपत्रिका प्राप्त झालेला मतदार जर अशिक्षित असेल तर त्याचे मत कशारितीने नोंदविले जाते ?**

उत्तर टपाली मतपत्रिका प्राप्त झालेला मतदार जर त्याच्या अशिक्षितपणामुळे टपाली मतपत्रिकेवर आपले मत नोंदविण्यास व घोषणापत्रावर सही करण्यास असमर्थ असेल तर त्याने घोषणापत्रावरील सहीचे साक्षांकन करण्यास सक्षम असलेल्या राजपत्रित अधिकारी अथवा निवडणूक कर्तव्यर्थ नियुक्ती मिळालेल्या मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष यांच्याकडे जावे आणि सदर अधिकाऱ्यास आपल्यावतीने आपले मत नोंदविण्याची व आपल्यावतीने घोषणापत्रावर सही करण्याची विनंती करावी. सदर अधिकाऱ्याने मतदाराच्या इच्छेनुसार त्याच्या उपस्थितीत त्याचे मत नोंदवावे व त्याच्यावतीने घोषणापत्रावर सही करावी. त्यानंतर प्रपत्र पीबी-४ मध्ये योग्य तो दाखला द्यावा.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ७)

**प्रश्न २३ काही कारणामुळे एकदा पाठविण्यात आलेली टपाली मतपत्रिका व त्यासोबतची इतर कागदपत्रे मतदारास न मिळता परत आल्यास निवडणूक निर्णय अधिकारी संबंधित मतदारास पुन्हा टपाली मतपत्रिका देऊ शकतील काय ?**

उत्तर होय. काही कारणामुळे एकदा पाठविण्यात आलेली टपाली मतपत्रिका व त्यासोबतची इतर कागदपत्रे मतदारास न मिळता परत आल्यास निवडणूक निर्णय अधिकारी अशी कागदपत्रे संबंधित मतदारास टपालाने पुन्हा पाठविण्याची किंवा त्याने विनंती केल्यास त्यास व्यक्तिश: देण्याची व्यवस्था करू शकतील.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ८ (१))

**प्रश्न २४ एखाद्या मतदाराने त्यास देण्यात आलेली टपाली मतपत्रिका व इतर कागदपत्र हे चुकीने हाताळल्यास आणि त्यामुळे त्यांचा योग्य रितीने वापर करणे शक्य नसेल तर निवडणूक निर्णय अधिकारी अशा मतदारास पुन्हा टपाली मतपत्रिका देऊ शकतील काय ?**

उत्तर एखाद्या मतदाराने त्यास देण्यात आलेली टपाली मतपत्रिका व इतर कागदपत्र हे चुकीने हाताळल्यास आणि त्यामुळे त्यांचा योग्य रितीने वापर करणे शक्य नसेल तर निवडणूक निर्णय अधिकारी अशा मतदारास टपाली मतपत्रिका व अन्य कागदपत्रांचा दुसरा संच देण्याबाबत विचार करू शकेल.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ८ (२))

**प्रश्न २५ टपाली मतपत्रिका वापरुन मतदान करताना गोपनीयता कशी पाळली जाते ?**

उत्तर मतदाराला दिलेल्या टपाली मतपत्रिकेचा अनुक्रमांक हा चिन्हांकित मतदार यादीमध्ये लिहीला जात नाही. सही साक्षांकीत करणाऱ्या अधिकाऱ्याला मत नोंदविलेली मतपत्रिका दाखविली जात नाही किंवा कसे मतदान केले हे सांगितले जात नाही. मतदार स्वतंत्रपणे इतरांना कळणार नाही अशारितीने मतत्रिकेवर आपले मत नोंदवितो. तसेच मतपत्रिकेवर मत देण्यासाठी करावयाच्या खुणेव्यतिरिक्त

स्वत:ची सही अथवा कोणताही शब्द अथवा स्वत:चे नाव अथवा कोणतीही अन्य खूण करत नाही. अशा प्रकारे टपाली मतपत्रिका वापरुन मतदान करताना गोपनीयता पाळली जाते.

**प्रश्न २६ निवडणूक कार्य प्रमाणपत्र वापरुन प्रत्यक्ष मतदान कशारितीने केले जाते ?**

उत्तर निवडणूक कार्य प्रमाणपत्र (प्रपत्र पीबी-३) सादर केल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष यांनी ते सादर करणाऱ्या व्यक्तीची सही निवडणूक कार्यप्रमानपत्रावर घेतली जाते. मतदान केंद्राध्यक्ष चिन्हांकित मतदार यादीच्या शेवटी निवडणूक कार्यप्रमाणपत्र सादर करणाऱ्या मतदार व्यक्तीचे नांव व त्यावरील मतदार यादीतील त्याचा अनुक्रमांक नमूद करतील. त्यानंतर त्या मतदान केंद्रावरील अन्य मतदाराने ज्या प्रकारे मतदान केले असते त्याच प्रकारे निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करणाऱ्या व्यक्तीस मतदान करु देईल.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ११ (२))

**प्रश्न २७ टपाली मतपत्रिका प्राप्त झाल्यानंतर मतदान केलेले पाकीट कोठे व किती दिवसात परत करणे आवश्यक आहे ?**

उत्तर टपाली मतपत्रिका प्राप्त झाल्यानंतर मतदान केलेले पाकीट (प्रपत्र पीबी- ६) हे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे प्रपत्र पीबी- ७ मध्ये नमूद केलेल्या सूचनानुसार मतमोजणी सुरु करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी परत करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ९ (१))

**प्रश्न २८ मतदाराने मत नोंदवून टपाली मतपत्रिका निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे परत पाठविताना पाकिटावर पोस्टेज लावावे काय ?**

उत्तर नाही. पोस्टेज निवडणूक निर्णय अधिकारी यांचे वतीने अग्रीम स्वरूपात पोस्ट कार्यालयात जमा केले जाते.

**प्रश्न २९ टपाली मतपत्रिका प्राप्त झालेला मतदार हा त्याचे नाव ज्या मतदान केंद्रावर आहे त्या मतदान केंद्रावर जाऊन मतदान करू शकतो काय ?**

उत्तर नाही.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ५ (२) (c))

**प्रश्न ३० निवडणूक कार्य प्रमाणपत्र व टपाली मतपत्रिकांचा हिशोब कोणाकडे असतो ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे निवडणूक कार्य प्रमाणपत्र व टपाली मतपत्रिकांचा हिशोब असतो.

## ७. मतदार यादीच्या कार्यप्रती (Working Copies of Voter List)

**प्रश्न १ मतदार यादीची कार्यप्रत म्हणजे काय ?**

उत्तर मतदान केंद्रावर वापरासाठी पुरविण्यात आलेल्या मतदार यादीच्या प्रतीस कार्यप्रत म्हणतात.
या यादीमध्ये मतदार यादीतील सर्व मतदारांची व पुरवणी यादीतील मतदारांची नोंद असते. वगळणी यादीमध्ये मतदाराचे नांव वगळलेले असल्यास यादीमध्ये मतदाराच्या नावावर लाल शाईने रेष मारून वगळणी झाल्याचे दर्शविले जाते. या यादीमध्ये ज्या मतदारांना निवडणूक कार्य प्रमाणपत्र किंवा टपाली मतपत्रिका दिली असेल त्यांच्या नावापुढे अनुक्रमे ईडीसी किंवा पीबी अशी नोंद केलेली असते. यादीच्या शेवटी मतदान केंद्रातील एकूण मतदार, स्त्री व पुरूष मतदार इ. चा गोषवारा दिलेला असतो.

**प्रश्न २ मतदार यादीच्या कार्यप्रतीच्या किती प्रती तयार करणे आवश्यक आहे ?**

उत्तर प्रत्येक मतदान केंद्रासाठी मतदार यादी कार्यप्रतीच्या चार प्रती तयार करणे आवश्यक आहे.

**प्रश्न ३ मतदार यादीची कार्यप्रत केव्हा व कशी तयार केली जाते ? याबाबत कोणती दक्षता घ्यावी ?**

उत्तर मतदार यादीची कार्यप्रत निवडणुकीच्या शेवटच्या प्रशिक्षणापूर्वी १ ते २ दिवस आधी तयार करण्यात येते. मतदार यादीच्या कार्यप्रतीमध्ये मतदार यादीतील सर्व मतदारांची व पुरवणी यादीतील मतदारांची नोंद असते. वगळणी यादीमध्ये मतदाराचे नांव वगळलेले असल्यास यादीमध्ये मतदाराच्या नावावर लाल शाईने रेष मारून वगळणी झाल्याचे दर्शविले जाते. या यादीमध्ये ज्या मतदारांना निवडणूक कार्य प्रमाणपत्र किंवा टपाली मतपत्रीका दिली असेल त्यांच्या नावापुढे अनुक्रमे ईडीसी किंवा पीबी अशी नोंद केलेली असते. यादीच्या शेवटी मतदान केंद्रातील एकूण मतदार, स्त्री व पुरूष मतदार इ. चा गोषवारा दिलेला असतो. कार्यप्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या सही शिक्क्यानिशी प्रमाणित केलेली असते.

**प्रश्न ४ मतदार यादीच्या कार्यप्रतीमध्ये नोंदविलेल्या तपशिलासंदर्भात केंद्राध्यक्ष यांना मतदानापूर्वी सविस्तर माहिती देण्यात येते काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ५ मतदार यादीच्या कार्यप्रतीमध्ये नोंदविलेला तपशील मतदानाच्या दिवशी उपस्थित मतदान प्रतिनिधींना दाखविण्यात येतो का ?**

उत्तर होय. मतदानास सुरूवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष सर्व मतदान प्रतिनिधी व इतर उपस्थितांना मतदार यादीच्या कार्यप्रतीमध्ये नोंदविलेल्या खुणा दाखवितात.
(संदर्भ- नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद ८)

**प्रश्न ६ मतदार यादीच्या कार्यप्रतीवर मतदानाचे दिवशी कशी कार्यवाही केली जाते ?**

उत्तर मतदान अधिकारी क्र.१ हा मतदार यादीच्या कार्यप्रतीवरुन मतदाराची ओळख पटवितो. त्यानंतर

ज्या मतदाराची ओळख पटविली आहे तो मतदार पुरूष असेल तर त्या मतदाराच्या मतदार यादीमधील नावास अधोरेखीत करण्यात येईल आणि ती महिला असेल तर नावास अधोरेखीत करून अनुक्रमांकाला वर्तुळ केले जाईल. मतदान पूर्ण झाल्यानंतर अशी चिन्हांकित मतदार यादीची कार्यप्रत सांविधिक लिफाफ्यात सीलबंद केली जाते.

**प्रश्न ७ मतदार यादीच्या कार्यप्रती कोणास दिल्या जातात ?**

उत्तर मतदार यादीच्या कार्यप्रती मतदान अधिकारी क्र.१, मतदान केंद्राध्यक्ष त्याचप्रमाणे मतदान केंद्रावर मतदारास आपले नाव शोधण्यासाठी उपलब्ध ठेवण्यात येतात. उर्वरित प्रत राखीव ठेवण्यात येते.

**प्रश्न ८ मतदार यादीच्या कार्यप्रती मतदानानंतर स्वतंत्र पाकिटात सीलबंद ठेवण्यात येतात का ?**

उत्तर होय. मतदार यादीची चिन्हांकित प्रत ही सांविधीक लखोट्यामध्ये आणि उर्वरित प्रती या असांविधीक लखोट्यामध्ये ठेवण्यात येतात.

**प्रश्न ९ मतदार यादींच्या कार्यप्रती पैकी कोणती प्रत चिन्हांकित मानण्यात येते व कोणत्या पाकिटात ठेवण्यात येते ?**

उत्तर मतदार यादीच्या कार्यप्रती पैकी ज्या प्रतीवर मतदान अधिकारी क्रमांक १ मतदाराची ओळख पटविल्यानंतर खुणा करतात. त्या यादीस चिन्हांकित मतदार यादी मानण्यात येते. अशी यादी विहित केलेल्या संविधिक लिफाफ्यामध्ये ठेवण्यात येते.

## ८. वाहने अधिग्रहित करणे

**प्रश्न १ निवडणुकीसाठी आवश्यक वाहन संख्या कोण निश्चित करतो ?**

उत्तर निवडणुकीसाठी आवश्यक वाहन संख्या निवडणूक निर्णय अधिकारी निश्चित करतो.

**प्रश्न २ निवडणुकीसाठी आवश्यक असलेली वाहने अधिग्रहित करण्याचे अधिकार कोणास व कोणत्या तरतुदीनुसार आहेत ?**

उत्तर निवडणुकीसाठी आवश्यक असलेली वाहने अधिग्रहित करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयुक्त यांनी प्राधिकृत केल्यानुसार जिल्हाधिकारी यांना आहेत.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३५ आणि पंचायती आणि नगरपालिका निवडणूक (कर्मचारी, परिसर आणि वहाने इ. अधिग्रहित करणे) आदेश १९९५ मधील परिच्छेद ३ )

**प्रश्न ३ निवडणुकीसाठी शासकीय / निमशासकीय कार्यालयांची वाहने अधिग्रहित करता येतात काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ४ निवडणुकीसाठी खाजगी वाहने अधिग्रहित करण्याचे अधिकार आहेत का ?**

उत्तर होय.

**प्रश्न ५ निवडणुकीसाठी लागणारी वाहने किती कालावधीसाठी अधिग्रहित करता येतात ?**

उत्तर निवडणुकीसाठी लागणारी वाहने निवडणूक कालावधीसाठी अधिग्रहीत करता येतात.

**प्रश्न ६ निवडणुकीसाठी वाहन अधिग्रहित करण्याच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यास टाळाटाळ अथवा निष्काळजीपणा करणाऱ्याविरूध्द कोणती कारवाई होईल ?**

उत्तर निवडणुकीसाठी वाहन अधिग्रहित करण्याच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यास टाळाटाळ अथवा निष्काळजीपणा करणाऱ्याविरूध्द गुन्हा दाखल करता येवू शकेल. तसेच असे अधिग्रहीत केलेले वाहन बळाचा वापर करून ताब्यात घेता येईल. तसेच गुन्हा शाबीत झाल्यास संबंधितास एक वर्षापर्यंतचा कारावास किंवा दंडाची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा होवू शकतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३५ (५) आणि पंचायती आणि नगरपालिका निवडणूक (कर्मचारी, परिसर आणि वहाने इ. अधिग्रहित करणे) आदेश १९९५ मधील परिच्छेद ९ )

**प्रश्न ७ शासकीय वाहने अधिग्रहित केल्यास, त्याबद्दल भरपाई देणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ८ खाजगी वाहने अधिग्रहित करण्यात आल्यास, संबंधित वाहनाच्या मालकास कशारितीने भरपाई देणे आवश्यक आहे ?**

उत्तर प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडून निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार खाजगी वाहने अधिग्रहीत करण्यात आल्यास संबंधित वाहनाच्या मालकास भरपाई देणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३६ आणि पंचायती आणि नगरपालिका निवडणूक (कर्मचारी, परिसर आणि वहाने इ. अधिग्रहित करणे) आदेश १९९५ मधील परिच्छेद ४ )

**प्रश्न ९ निवडणूक कामकाजासाठी सर्वसाधारणपणे कोणत्या विभागाची वाहने अधिग्रहित करण्यात येऊ नयेत ?**

उत्तर अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या विभागांची उदा. आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, वन विभाग ची वाहने निवडणूक कामकाजासाठी अधिग्रहित करु नयेत.

## ९. पोलिस बंदोबस्त

**प्रश्न १ निवडणुकीसाठी सुरक्षा आराखडा कोण तयार करतात ?**

उत्तर निवडणुकीसाठी सुरक्षा आराखडा हा संबंधित क्षेत्राचे पोलीस अधिकारी तयार करतात. पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस अधिक्षक / जिल्हाधिकारी हे सुरक्षा आराखडयाला मान्यता देतात.

**प्रश्न २ निवडणुकीसाठी लागणाऱ्या पोलिस बंदोबस्ताची व्यवस्था कोण करते ? व त्यावर कोणाचे नियंत्रण असते ?**

उत्तर निवडणुकीसाठी लागणाऱ्या पोलीस बंदोबस्ताची व्यवस्थ प्रभारी बंदोबस्त अधिकारी करतात. त्यावर पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस अधिक्षक आणि जिल्हा दंडाधिकारी यांचे नियंत्रण असते.

**प्रश्न ३ निवडणुकीसाठी पोलिस बंदोबस्त कोठे आवश्यक असतो ?**

उत्तर निवडणुकीसाठी पोलीस बंदोबस्त निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, इतर संवेदनशील ठिकाणे, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर, मतदान यंत्रे मतमोजणीपूर्वी ठेवलेल्या ठिकाणी त्याचप्रमाणे मतमोजणी केंद्रावर आवश्यक असतो.

**प्रश्न ४ मतदान केंद्रावर जाणे आणि परत येणे यासाठी मतदान पथकाबरोबर सुरक्षा कर्मचारी असणे आवश्यक आहे का ?**

उत्तर होय.

**प्रश्न ५ मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर कशा स्वरुपाची सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात येते ?**

उत्तर मतदान केंद्राच्या वर्गवारीनुसार व एका परिसरातील मतदान केंद्राच्या संख्येनुसार पोलीस कर्मचारी अथवा होमगार्ड कर्मचारी यांची सुरक्षा कर्मचारी म्हणून नेमणूक केली जाते.

**प्रश्न ६ संवेदनशील मतदान केंद्र व अतिसंवेदनशील मतदान केंद्रावर सुरक्षा बंदोबस्त वाढवून देण्यात येतो का ?**

उत्तर होय.

**प्रश्न ७ मतदान केंद्रावरील सुरक्षा कर्मचा-यांची कर्तव्ये काय आहेत ?**

उत्तर मतदान केंद्राबाहेरील मतदारांची रांग लावणे, मतदान केंद्राच्या हद्दीमध्ये शांतता व सुव्यवस्था राखणे, मतदान केंद्राच्या बाहेर व आसपास उमेदवार किंवा त्यांच्या समर्थकाकडून गैरवर्तन केल्यास घालवून देणे किंवा त्यांचे विरुध्द गुन्हा नोंदविणे किंवा वेळप्रसंगी मतदान केंद्रामध्ये गैरवर्तणूक केल्यास मतदान केंद्राध्यक्षांनी दिलेल्या लेखी तक्रारीची नोंद घेऊन संबंधित मतदारावर गुन्हा नोंदविणे थोडक्यात मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मतदान केंद्राबाहेर कोणताही अनुचित प्रकार होऊ नये याची दक्षता घेणे. इत्यादी मतदार केंद्रावरील सुरक्षा कर्मचाऱ्यांची कर्तव्ये आहेत.

**प्रश्न ८ सिलबंद मतदान यंत्रे ठेवलेल्या सुरक्षा कक्षाची सुरक्षा व्यवस्था कशी असावी ?**

उत्तर सर्वसाधारणपणे सुरक्षा कक्षास व्दिस्तरीय बंदोबस्त दिला जातो. बाहेरील बाजूस (Outer Corden) स्थानिक हत्यारी पोलीस आणि आतील बाजूस (Inner Corden) राज्य राखीव सुरक्षा बल यांचा उपलब्धतेनुसार बंदोबस्त दिला जातो. सुरक्षा कक्षाचे प्रभारी स्थानिक पोलीस अधिकारी असतात. सुरक्षा कक्षाचे ठिकाणी CC Camera / Video Camera, अग्निशमन यंत्रणा इ. पुरविलेले असतात.

**प्रश्न ९ मतमोजणी केंद्राकरिता सुरक्षा आराखडा कशा पध्दतीने तयार केला जातो ?**

उत्तर मतमोजणी केंद्राच्या सभोवताली आणि प्रवेशव्दारावर पोलीस बंदोबस्त दिलेला असतो. केवळ परवाना / ओळखपत्र धारक व्यक्तीसच मतमोजणी केंद्रात प्रवेश दिला जातो. आवश्यकतेनुसार राज्य राखीव पोलिस दलाचीही मदत घेण्यात येते. सर्वसाधारणपणे पोलिसांना मतमोजणी केंद्रात प्रवेश अनुज्ञेय नसतो. निवडणूक निर्णय अधिकारी आवश्यकतेनुसार पोलिसांना मतमोजणी केंद्रात पाचारण करू शकतात.

**प्रश्न १० कोणती जबाबदारी पार पाडणाऱ्या पोलिस अधिकारी / सुरक्षा कर्मचारी यांना निवडणूक भत्ता अनुज्ञेय आहे ?**

उत्तर मतदान केंद्र तसेच मतमोजणी केंद्रावर कार्यरत पोलीस अधिकारी / सुरक्षा कर्मचाऱ्यांना निवडणूक भत्ता अनुज्ञेय आहे.

**प्रश्न ११ मतदानाच्या दिवशी असामान्य (दंगलसदृश्य) परिस्थिती उद्भवल्यास ती हाताळता यावी याकरिता कशा स्वरुपाच्या बंदोबस्ताची पूर्वतयारी केली जाते ?**

उत्तर मतदाराच्या दिवशी असामान्य (दंगलसदृश्य) परिस्थिती उद्भवल्यास ती हाताळता यावी याकरिता राज्य राखीव दलाच्या तुकडया (Striking force) तैनात केलेल्या असतात.

**प्रश्न १२ मतदान पथकाच्या सुरक्षेची जबाबदारी कोणावर असते ?**

उत्तर मतदान पथकाच्या सुरक्षेची जबाबदारी ही नियुक्त सुरक्षा कर्मचाऱ्याची (पोलिस/होमगार्ड) असते.

## १०. <u>मतदानापूर्वी उमेदवाराचा मृत्यू झाल्यास</u>

**प्रश्न १ निवडणूक लढविणाऱ्या एखाद्या उमेदवाराचा दुर्देवी मृत्यू झाल्याची सूचना मिळाल्यास अशा उमेदवाराच्या मृत्युची खात्री कशी करण्यात यावी ?**

उत्तर निवडणूक लढविणाऱ्या एखादया उमेदवाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची सूचना मिळाल्यास अशा उमेदवाराच्या मृत्यूची खात्री मृत्यू प्रमाणपत्राव्दारे करण्यात यावी.

**प्रश्न २ निवडणूक प्रक्रियेच्या कोणत्या स्थितीमध्ये निवडणूक लढविणारा उमेदवार मरण पावल्यानंतर मतदान थांबविले जाते ?**

उत्तर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या मृत्यूबाबतचे प्रतिवृत्त निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी मिळाले व त्या उमेदवाराच्या मृत्यूची खात्री पटल्यास मतदान थांबविण्यासाठी प्रत्यादेश दिला जातो.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २३)

**प्रश्न ३ एखादा निवडणूक लढविणारा उमेदवार मरण पावल्यानंतर मतदान / निवडणूक प्रक्रिया थांबविण्याचे अधिकार कोणास आहेत ?**

उत्तर निवडणूक लढविणारा उमेदवार मरण पावल्यानंतर मतदान / निवडणूक प्रक्रिया थांबविण्याचे अधिकार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना आहेत. मात्र याबाबत राज्य निवडणूक आयोग व जिल्हाधिकारी यांना कळविणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २३)

**प्रश्न ४ एखादा निवडणूक लढविणारा उमेदवार मरण पावल्यामुळे मतदान थांबविण्याचे आदेश निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिल्यानंतर, पुन्हा निवडणूक कार्यक्रम कशा रितीने सुरू होतो ?**

उत्तर निवडणूक लढविणारा उमेदवार मरण पावल्यामुळे मतदान थांबविण्याचे आदेश निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिल्यानंतर निवडणूकीच्या संबंधातील सर्व कामकाज हे सर्व बाबतीत नवीन निवडणूक असल्याप्रमाणे नव्याने सुरू करण्यात येईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २३)

**प्रश्न ५ एखादा निवडणूक लढविणारा उमेदवार मरण पावल्यामुळे मतदान थांबविण्याचा आदेश देतेवेळी ज्या उमेदवारांना वैधरित्या नामनिर्देशित केले असेल, त्या उमेदवारांना पुन्हा नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची आवश्यकता आहे काय ?**

उत्तर

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील आदेश क्र. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.-२४/का.०६ दि ८/११/२०१६ अन्वये पूर्वीच्या दि १०/०१/२०१२ च्या आदेशात नमूद नूकसान भरपाईची रक्कम दुप्पट करण्यात आलेली आहे. अ. कर्मचा-याचा मृत्यु झाल्यास त्याच्या वारसास - १००००००/- इतके सानुग्रह अनुदान आ. अतिरेकी कारवाया नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बॉम्ब स्फोट. सुरूंग अथवा शस्त्रांचा हल्ला यामध्ये मृत झाल्यास त्याच्या वारसास २००००००/- इतके सानुग्रह अनुदान इ. इजा पोहचून कायमचे अपंगत्व आल्यास ५०००००/- इतके सानुग्रह अनुदान अतिरेकी कारवाया, नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बॉम्ब स्फोट, सुरूंग अथवा शस्त्रांचा हल्ला यामध्ये इजा पोहचून कायमचे ई.अपंगत्व आल्यास १००००००/- इतके सानुग्रह अनुदान

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २३(१), संदर्भ राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र पत्र क्र रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. २४/का.०६. दि. २८/११/२०१६)

**प्रश्न ६ एखादा निवडणूक लढविणारा उमेदवार मरण पावल्यानंतर मतदान थांबविण्याचा आदेश देण्यापूर्वी ज्या उमेदवाराने उमेदवारी मागे घेतल्याची नोटीस दिली असेल त्या उमेदवारास पुन्हा नामनिर्देशनपत्र दाखल करता येईल काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २३(२))

**प्रश्न ७ निवडणूक लढविणारा नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा किंवा अपक्ष उमेदवार मरण . पावल्यानंतर मतदान थांबविण्याचे आदेश दिले जातात काय ?**

उत्तर होय ; कोणताही निवडणूक लढविणारा उमेदवार मरण पावला असेल तर मतदान थांबविण्याचे आदेश दिले जातात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २३)

**प्रश्न ८ मतदानापूर्वी उमेदवार मरण पावल्यामुळे मतदान थांबविण्याचा आदेश दिला असेल तर मयत उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत जमा केलेली अनामत रक्कम त्याच्या वारसांना परत मिळू शकते काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १४(२))

## ११. झोनल ऑफिसर

**प्रश्न १ झोनल ऑफिसर्सची नियुक्ती कोण करतात ?**

उत्तर झोनल ऑफिसर्सची नियुक्ती नगरपालिका निवडणुकांसाठी जिल्हाधिकारी करतात.

**प्रश्न २ झोनल ऑफिसर म्हणून सर्वसाधारणपणे कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करावी ?**

उत्तर झोनल ऑफिसर म्हणून सर्वसाधारणपणे निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचेशी समकक्ष अथवा पर्यवेक्षीय काम पाहणाऱ्या कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

**प्रश्न ३ झोनल ऑफिसर यांचे सर्वसाधारण अधिकार व कर्तव्ये कोणती आहेत ?**

उत्तर झोनल ऑफिसर हे निवडणूक जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ते निवडणूक संपेपर्यंतच्या कालावधीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निर्देशानुसार त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या मतदान केंद्राच्या निवडणूक प्रक्रियेच्या कामकाजाचे व्यवस्थापन करतात.

**प्रश्न ४ एका झोनल ऑफिसरवर सर्वसाधारणपणे किती मतदान केंद्रांची जबाबदारी सोपविली जाते ?**

उत्तर एका झोनल ऑफिसरवर सर्वसाधारणपणे १० ते १२ मतदान केंद्राची जबाबदारी सोपविली जाते.

**प्रश्न ५ सर्वसाधारणपणे झोन निश्चिती कशी करण्यात येते ?**

उत्तर सर्वसाधारणपणे एका सलग भागामधील संपर्क आणि वाहतुकीच्यादृष्टीने सोयीच्या असलेल्या १० ते १२ मतदान केंद्रांचा समावेश करुन एका झोनची निश्चिती करण्यात येते.

**प्रश्न ६ मतदानाचा दिवस आणि त्या अगोदरच्या दिवशी झोनल ऑफिसर यांचेजवळ राखीव मतदान साहित्य असणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय. मतदान केंद्रासाठी देण्यात आलेले साहित्य राखीव स्वरूपामध्ये झोनल ऑफिसर यांच्याकडे दिले जाते. त्यामध्ये मतदान केंद्रासाठी असणारे राखीव EVM याचा ही समावेश असतो. कोणत्याही मतदान केंद्रास मतदान साहित्य कमी पडत असेल तर झोनल ऑफिसर हे त्यांचेकडील राखीव साहित्यामधून त्या मतदान केंद्रास आवश्यक असलेले मतदान साहित्य तातडीने उपलब्ध करून देतात.

**प्रश्न ७ झोनल ऑफिसर्सना किमान कोणत्या सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे ?**

उत्तर झोनल ऑफिसर्सना मतदान केंद्रांना भेटी देण्यासाठी स्वतंत्र वाहन, मतदानाच्या अगोदरचा दिवस व मतदानाचा दिवस या दोन्ही दिवशी सहाय्य करण्यासाठी राखीव मतदान कर्मचाऱ्यांपैकी किमान एक कर्मचारी, शक्य असेल तर हत्यारी पोलिस कर्मचारी, त्यांच्या झोनमधील मतदान केंद्राची मतदारयादी व झोनचा नकाशा आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांना सादर करावयाच्या अहवालाचे नमूने इत्यादी किमान सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

**प्रश्न ८ झोनल ऑफिसर्सना निवडणूक भत्ता अनुज्ञेय आहे काय ?**

उत्तर होय.

# प्रकरण १६.

# मतदान यंत्राबाबत

# (Electronic Voting Machines (EVM))

## १. मतदानयंत्राची सर्वसाधारण माहिती

**प्रश्न १ EVM म्हणजे काय ? पारंपारिक मतदानाच्या पध्दतीपेक्षा त्यांचे कार्य कसे वेगळे आहे ?**

उत्तर Electronics corporation of india Ltd यांनी Electronics system व्दारे महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी तयार केलेले यंत्र म्हणजे इव्हीएम होय. पारंपारिक पध्दतीपेक्षा त्यांचे कार्य सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे वेगळे आहे.:-

| पारंपारिक पध्दती | इव्हीएम |
|---|---|
| मतपत्रिकेव्दारे मतदानाची नोंद केली जाते. | इलेक्ट्रॉनिक मशीनव्दारे मतदान नोंदविले जाते. |
| लोखडी मतपेटीमध्ये मतपत्रिका मतदान करुन टाकली जाते. | नियंत्रण युनिट व कंट्रोल युनिट असे दोन यंत्राचा एकत्रित संच असतो. |
| मतपत्रिकेवर ठसा उमटवून मतदानाची नोंद केली जाते. | EVM पध्दतीमध्ये मतदान नोंदविण्यासाठी बटन दाबुन मतदानाची नोंद होते. |
| अचूकतेबाबत अपवादात्मक परिस्थितीत तफावत येण्याची शक्यता असते. | अचुकतेबाबत १००% खात्री असते |
| अभिरुप मतदान घेता येत नाही केवळ मतपेटी उघडी करुन त्यामध्ये मतपत्रिका नाही असे उपस्थितीत मतदान प्रतिनिधीस दाखवता येते. | अभिरुप मतदान घेऊन EVM रिकामे करण्याची पध्दती |
| मतमोजणीसाठी कालावधी जास्त लागतो व कंटाळवाणी प्रकिया | मतमोजणीसाठी अत्यंत काटकोर व लवकर पार पाडली जाते. |

**प्रश्न २ मतदान यंत्र (EVM) किंवा मतपेटी हाताळण्याचे नियम**

उत्तर आता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे सर्वत्र वापरात असल्याने EVM संदर्भातील विशेष गुन्हे कलमाद्वारे समाविष्ट झाले आहेत. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १३५A अनुसार बुथ कॅप्चरिंग (मतदान केंद्र बळकावणे, ईव्हीएम किंवा मतपत्रिका चुकीच्या मागांने ताब्यात घेणे इ.) हा गभीर गुन्हा असून किमान १ वर्ष ते ३ वर्ष पर्यंत कारावासाची शिक्षा आहे (Section १३५A in The Representation of the People Act, १९५१). तसेच कलम १३६ अनुसार कोणतीही इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची

तोडफोड, अनधिकृत हस्तगत करणे इत्यादीसाठीही ६ महिने ते २ वर्ष तुरुंगवास आणि दंड अशी शिक्षा वाढवून करण्यात आली आहे.

**प्रश्न ३ EVM चा वापर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कधीपासून सुरु झाला ?**

उत्तर EVM चा वापर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नोव्हेंबर २००४ पासून वापर करण्यात येत आहे.

**प्रश्न ४ मतपत्रिकाऐवजी EVM वापरुन मतदान नोंदविण्याबाबत काही कायदेशीर आधार आहे काय ?**

उत्तर होय. राज्य निवडणूक आयोगांनी वेळोवेळी आदेश काढून कायदेशीर आधार प्राप्त करुन दिला आहे.

**प्रश्न ५ भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग यांच्या EVM मध्ये नेमके फरक कोणते ?**

उत्तर भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग यांच्या EVM मध्ये सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे फरक आहेत.:-

| अ.क्र. | भारत निवडणुक आयोगाच्या EVM | राज्य निवडणुक आयोगाच्या EVM |
|---|---|---|
| १. | भारत निवडणूक आयोगाच्या EVM मध्ये Detachable Memory chip चा उपयोग केला जात नाही. | राज्य निवडणूक आयोगाच्या EVM मध्ये Detachable Memory chip चा उपयोग केला जातो. |
| २. | भारत निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्रामध्ये एकाच निवडणुकीसाठी व एकाच पदाकरिता मतदार घेता येते. | राज्य निवडणूक आयोगाच्या मतदानयंत्रामध्ये एकापेक्षा जास्त निवडणुकीसाठी व एकापेक्षा जास्त सदस्यांच्या निवडीसाठी मतदान घेता येते. |

**प्रश्न ६ मतदानयंत्रात मतांची नोंदणी निरपेक्ष / अचूक व्हावी यासाठी कोणत्या प्रकारची काळजी घेतली जाते ?**

उत्तर मतदानयंत्रामध्ये मतांची नोंदणी निरपेक्ष / अचूक व्हावी यासाठी सर्वसाधारणपणे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे पातळीवर मतदानयंत्र तयार करताना आयोगाने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार मतदानयंत्र सील करुन केंद्रध्यक्षाकडे सुपूर्द केले जाते. मतदानाच्या दिवशी उपस्थितीत मतदान प्रतिनिधींना सील केलेले मतदानयंत्र दाखवून तसेच अभिरुप मतदान घेऊन मतदानयंत्राची चाचणी करुन दाखविले जाते व त्यांनतर मतदानयंत्रात नोंदविलेली मते पुसून टाकली जातात व मतदानयंत्र उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदानासाठी सज्ज केले जाते.

**प्रश्न ७ साध्या मतपत्रिका वापरुन निवडणूक घेण्याऐवजी EVM चा वापर करण्याचा नेमका उद्देश काय ?**

उत्तर इव्हीएमव्दारे मतदान प्रक्रीया व मतमोजणी प्रक्रीया अत्यंत सोपी व सुटसुटीत तसेच कमी वेळेत पूर्ण होते. त्याचप्रमाणे संपूर्ण प्रक्रीयेत अचूकता राखली जाऊन पारदर्शकता पार पाडली जाते.

**प्रश्न ८ एका Ballot Unit मध्ये किती उमेदवारांची नावे असू शकतात ?**

उत्तर एका Ballot Unit मध्ये १४ उमेदवारांची नावे असू शकतात. मात्र उमेदवारांची संख्या वाढल्यास अधिक Ballot Unit लावता येऊ शकतात. याबाबतीत असे स्पष्ट करण्यात येते की, जरी Ballot Unit मध्ये १६ बटणे असली तरी १६ वे बटण End Button. तर १५ वे बटण NOTA (None of the Above) असे असते.

**प्रश्न ९ EVM मध्ये एकाच वेळी दोन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेता येतात. तसेच एकापेक्षा जास्त उमेदवारांना निवडून दयावयाचे असेल तर त्यात तशी सोय आहे काय ?**

उत्तर होय. दोन प्रकारच्या निवडणुका घेता येतात.

होय. एकापेक्षा जास्त उमेदवारांना निवडून देण्याची सोय त्यात आहे.

**प्रश्न १० EVM चालविण्यासाठी इलेक्ट्रीक कनेक्शन लागते काय ? नसल्यास EVM कशावर चालते ?**

उत्तर EVM करिता इलेक्ट्रीक कनेक्शनची आवश्यकता नाही. पॉवर पॅकवर (बॅटरीवर) EVM चालते.

**प्रश्न ११ EVM चे एकच बटन वारंवार दाबून एकाच जागेसाठी एकापेक्षा जास्त वेळा मतदान करता येणे शक्य आहे काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न १२ EVM चे बटन दाबतांना शॉर्ट सर्किट किंवा अन्य कोणत्या कारणामुळे मतदाराला शॉक बसू शकतो काय ?**

उत्तर नाही. EVM अत्यंत सुरक्षित यंत्र आहे.

**प्रश्न १३ मतदानयंत्राविषयी तांत्रिक माहिती व ते कसे हाताळावे याबाबत माहिती कोठे उपलब्ध आहे ? (मतदान केंद्राध्यक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवार, मतदार यांचे अनुषंगाने)**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाने प्रसिध्द केलेले EVM हॅन्डबुक तसेच राज्य निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ.

**प्रश्न १४ सर्वसाधारण मतदार, निवडणूक यंत्रणा, उमेदवार, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांना EVM चे प्रशिक्षण कोण देईल ? हे प्रशिक्षण प्रत्येक घटकाला केव्हा देणे अपेक्षित आहे ?**

उत्तर निवडणुकीपूर्वी मास्टर ट्रेनरव्दारे मतदार व राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांना EVM बाबतची माहिती दिली जाते. तसेच निवडणूक यंत्रणा व उमेदवाराचे प्रतिनिधीना निवडणूक अधिका-याच्या कार्यालयामध्ये मास्टर ट्रेनरकडून माहिती दिली जाते.

**प्रश्न १५  NOTA चे बटण कोणत्या क्रमांकावर असते ?**

उत्तर  त्या त्या पदाकरिताचे सर्व उमेदवार संपल्यानंतर त्यापुढील क्रमांकावर NOTA चे बटण असते.

**प्रश्न १६  EVM च्या नोंदी कोणी, कोठे व कशा घ्याव्यात त्यासाठी काही नोंदवहया आहेत का ?**

उत्तर  भारत निवडणूक आयोगाच्या याबाबत निश्चित सूचना आहेत.  मात्र राज्य निवडणूक आयोगाच्या याबाबत सूचना नाहीत किंवा नोंदवहयांचे नमुने आखून दिलेले नाहीत.

**प्रश्न १७  EVM  वर उमेदवारांवी नावे व चिन्हे कशी लिहीली जातात ?**

उत्तर  EVM च्या BU (बॅलेट युनिट) च्या पृष्ठभागावर मतपत्रिका फिक्स केली जाते. उमेदवारांच्या नावासमोर त्यांची चिन्हे दर्शविलेली असतात.

**प्रश्न १८  EVM वापरुन मतदान करताना झालेल्या मतदानामध्ये बदल करणे शक्य आहे काय ?**

उत्तर  नाही.

## २.  मतदानयंत्र आवश्यकता व उपलब्धता – आढावा

**प्रश्न १  राज्य निवडणूक आयोगाकडून जिल्हयांना मतदानयंत्रे पुरविली जातात काय व ती कोठे ठेवलेली असतात ?**

उत्तर  सर्व जिल्हयांना राज्य निवडणूक आयोगाकडून मतदानयंत्रे पुरविली जातात.  अशी सर्व मतदानयंत्रे निवडणूक अधिकारी यांच्या सुरक्षा कक्षामध्ये सुरक्षित ठेवली जातात.

**प्रश्न २  एखादया मतदार संघात किती मतदान यंत्रे (बीयू व सीयू) लागतील हे कसे समजते ?**

उत्तर  उमेदवारांची संख्या व मतदान केद्रांची संख्या यांचा एकत्रित विचार करुन किती मतदारयंत्रे लागतील समजते. याशिवाय झोनल अधिकारी यांचेकडे निश्चित प्रमाणात राखीव मतदानयंत्रे ठेवली जातात.

**प्रश्न ३  उपलब्धतेपेक्षा जास्त मतदानयंत्रांची आवश्यकता असल्यास काय करावे ?**

उत्तर  अशा अधिकच्या मतदान यंत्राबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे मागणी करावी.

## ३.  प्रथम स्तरीय तपासणी (First level checking)

**प्रश्न १  प्रथम स्तरीय तपासणी कोठे केली जाते ?**

उत्तर  निवडणूक अधिकारी / जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये किंवा जेथे EVM चा साठा केलेला असेल त्या ठिकाणी तज्ञ व्यक्तीकडून मतदानयंत्राची जी तपासणी केली जाते त्यास प्रथम स्तरीय तपासणी म्हणतात.

**प्रश्न २ प्रथम स्तरीय तपासणीमध्ये कोणती काळजी घ्यावी लागते ?**

उत्तर प्रथम स्तरीय तपासणीमध्ये इव्हीएम हे मतदानासाठी सुव्यवस्थित आहे काय याबाबत इव्हीएमच्या अंतर्गत व बाहय भागाची संपूर्ण तपासणी केली जाते.

## ४. मतदानयंत्रे मतदानासाठी केव्हा तयार करण्यात येणार आहेत याबाबत उमेदवारांना सूचना

**प्रश्न १ मतदानयंत्रे मतदानासाठी केव्हा (दिनांक, वेळ, व ठिकाण) तयार करण्यात येणार आहेत याबाबत उमेदवारांना सूचना देणे बंधनकारक आहे काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न २ मतदानासाठी मतदानयंत्र तयार करण्याच्या वेळी कोण कोण हजर राहू शकतात ?**

उत्तर उमेदवार किंवा उमेदवारांचा प्रतिनिधी, निवडणूक निर्णय अधिकारी व मतदानयंत्रे तयार करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिका-याद्वारे नेमणूक केलेला अधिकारी व कर्मचारी वर्ग या सर्व व्यक्ती या प्रसंगी हजर राहू शकतात.

**प्रश्न ३ मतदानयंत्र मतदानासाठी तयार करण्यासाठी काय प्रक्रीया आहे ? या प्रक्रीयेदरम्यान उमेदवाराची काय जबाबदारी असते ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निश्चित केलेल्या ठिकाणी म्हणजेच सुरक्षा कक्षामध्ये मास्टर ट्रेनर, क्षेत्रिय / झोनल अधिकारी तसेच उमेदवार किंवा उमेदवारांचा प्रतिनिधी यांचे समक्ष मतदानयंत्र मतदानासाठी तयार करण्याची प्रक्रीया पार पाडली जाते. यामध्ये प्रामुख्याने बॅलेट युनिटवर मतपत्रिका फिक्स करुन विविध प्रकारचे सील केले जाते. त्यानंतर कंट्रोल युनिटमध्ये नवीन बॅटरी टाकून (candidate set) केले जातात. यानंतर बॅलेट युनिट च कंट्रोल युनिटचे विविध सील करुन मतदानयंत्रे मतदानासाठी तयार केली जातात याबाबत उमेदवारांना दिवस, वेळ व ठिकाण कळविणे आवश्यक आहे. उमेदवाराने सदर सर्व प्रक्रीया योग्य रितीने झाल्याची खात्री करुन त्याबाबत स्वाक्षरी करावयाची असते.

## ५. मतदानयंत्रासाठी आवश्यक साहित्य

**प्रश्न १ निवडणूक निर्णय अधिकारी यांचे स्तरावर मतदानसाठी मतदानयंत्र तयार करण्यासाठी काय साहित्य आवश्यक असते ?**

उत्तर मतदानयंत्र तयार करण्यासाठी खालील साहित्य आवश्यक आहे. मतपत्रिका, बॅटरी, मेमरी चीप (आवश्यकतेनुसार), ॲड्रेस टॅग, पक्का दोरा, प्लास्टीक चिकटपट्टी, लाख इ.साहित्य आवश्यक आहे.

**प्रश्न २ मतदान केंद्रावर मतदानयंत्र मतदानासाठी तयार करण्यासाठी कोणते साहित्य आवश्यक असते?**

उत्तर स्पेशल टॅग, पेपर सील, पट्टी (स्ट्रीप) सील, ॲड्रेस टॅग, पक्का दोरा, लाख, प्लास्टीक चिकटपट्टी, ब्लेड / कटर इ.

**प्रश्न ३ मतदानयंत्र तयार करण्यासाठी लागणारे साहित्य कोठून प्राप्त करावे ?**

उत्तर मतदानयंत्र तयार करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे म्हणजे साहित्य बॅटरी, paper seal, paperstrip seal व स्पेशल टॅग हे साहित्य राज्य निवडणूक आयोगाकडून उपलब्ध करुन दिले जाते. उर्वरीत साहित्य शासकीय मुद्रणालय किंवा खाजगी पुरवठादार यांचेकडून लेखांसहितेतील तरतुदीचा अवलंब करुन खरेदी करता येतात.

**प्रश्न ४ निवडणूक निर्णय अधिकारी कोणाच्या मदतीने मतदानयंत्रे मतदानासाठी तयार करतात ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी व या कामासाठी नेमणूक केलेले मास्टर ट्रेनर व अधिकारी व कर्मचारीवर्ग यांचेकडून मतदानयंत्रे मतदानसाठी मतदान केंद्रावर पाठविण्यासाठी तयार केली जातात.

## ६. <u>मास्टर ट्रेनर तयार करणे</u>

**प्रश्न १ मास्टर ट्रेनर म्हणजे काय ?**

उत्तर EVM बाबत परिपूर्ण शास्त्रशुध्द माहिती देणा-या स्थानिक कर्मचा-यास मास्टर ट्रेनर असे म्हणतात.

**प्रश्न २ मास्टर ट्रेनरची नेमणूक कोण करते ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी / निवडणूक अधिकारी.

**प्रश्न ३ मास्टर ट्रेनरची कर्तव्ये काय असतात ?**

उत्तर निवडणूक कामासाठी नेमणूक केलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना EVM बाबत प्रशिक्षण देणे, मतदार जनजागृती (EVM बाबत) करणे, उमेदवार व राजकीय पक्षाचे प्रतिनिधी तसेच उमेदवारांचे निवडणूक प्रतिनिधी इत्यादींना EVM बाबत माहिती देणे, मतदानासाठी EVM तयार करणे याप्रमाणे मास्टर ट्रेनरची कर्तव्ये असतात.

## ७. <u>EVM – BU तयार करणे</u>

**प्रश्न १ मतदानासाठी BU तयार करण्याची नेमकी कार्यपध्दती काय असते ?**

उत्तर बॅलेट युनिट तयार करण्याची कार्यपध्दती म्हणजे बॅलेट युनिटवर मतपत्रिका फिक्स करणे व करुन विविध प्रकारचे मोहोरबंद सील करुन मतदानयंत्र मतदानासाठी तयार करणे.

**प्रश्न २ कमी म्हणजेच ४-५ उमेदवार असतील तर EVM च्या बॅलेट युनिट वरील इतर बटनांचे काय करावे ?**

उत्तर इतर बटणावर सदर यंत्रातील अंतर्गत झाकण (Masking tab) लावून बंद करावे.

**प्रश्न ३ प्रत्यक्ष मतदान केद्रांव्यतिरिक्त किती मतदान यंत्रे राखीव म्हणून तयार करावीत ?**

उत्तर सर्वसाधारणपणे १० %किंवा झोनल अधिका-याच्या संख्येइतके.

**प्रश्न ४ उमेदवारांची संख्या जास्त असल्यास BU ची जोडणी कशी करावी ?**

उत्तर उमेदवारांची संख्या १५ पेक्षा जास्त असल्यास दोन, ३१ पेक्षा जास्त असल्यास तीन, ३८ पेक्षा जास्त आणि ६३ किंवा त्यापेक्षा कमी असल्यास चार बीयूची जोडणी करावी लागेल. एकापेक्षा जास्त बीयू वापरात आणावयाचे असल्यास सर्व प्रथम बीयूचे स्लाईडर स्विच योग्य ठिकाणी सरकावेत. पहिल्या बीयूची कनेक्टींग पीन सीयूला जोडावी व दुस-या बीयूची पहिल्या बीयूला,

तीस-या बीयूची दुस-या बीयूला तसेच चौथ्या बीयूची तिस-या बीयूला याप्रमाणे कनेक्टींग पीन जोडावी. शेवटच्या बीयू वरील उमेदवारांच्या नावानंतर चे शेवटचे बटन NOTA साठी वापरावे.

**प्रश्न ५ एकापेक्षा जास्त BU केव्हा वापरावे लागू शकतात ? अशा प्रसंगी कोणती खबरदारी घ्यावी ?**

उत्तर ज्यावेळी १४ पेक्षा जास्त उमेदवार निवडणुकीसाठी उभे असतील तर त्यावेळी एकापेक्षा जास्त बीयू वापरावे लागतात. हे करित असताना बॅलेट युनिटवरील Sliding Switch योग्य क्रमांकावर निश्चित करणे आवश्यक असते.

## ८. <u>EVM – CU (Control Unit) तयार करणे</u>

**प्रश्न १ मतदानाच्या दिवशी मतदानासाठी CU (Control Unit) तयार करण्यासाठी कार्यपध्दती काय असते ?**

उत्तर मतदानासाठी सीयू तयार करण्याची कार्यपध्दती खालील प्रमाणे आहे.:-

अभिरूप मतदानानंतर निकाल कक्षाच्या अंर्तकक्षाच्या फटीमध्ये कागदी मोहोर लावावी व निकाल विभागाचे बाहय आवरण बंद करावे. त्यानंतर निकाल विभागाचे बाहय आवरण मोहोरबंद करण्यात यावे. बाहय आवरण दाबण्यापूर्वी बाहय आवरणाच्या प्रत्येक बाजूला कागदी मोहरांचे दोन टोके बाहेर येतील. त्यानंतर ABCD पटटी मोहोर निर्देश पुस्तिकेमध्ये सूचित केल्याप्रमाणे सीयू भोवती गुंडाळावी. पट्टी मोहोरचे पहिले A टोक कागदी मोहोरांच्या टोकास जोडले गेलेले असेल व दुसरे टोक D पहिल्या टोकाच्या वर आलेले असेल. अशाप्रकारे नियंत्रण युनिट मतदानासाठी तयार केले जाते.

**प्रश्न २  BU व CU ची जोडणी करुन EVM प्रत्यक्ष कार्यान्वित कसे करावे ?**

उत्तर  बीयूच्या inter connecting cabel ची पीन सीयूला जोडणी करुन इव्हीएम प्रत्यक्ष मतदानासाठी कार्यान्वित केली जातात. एकापेक्षा जास्त बीयू वापरात आणावयाचे असल्यास पहिल्या बीयूची कनेक्टींग पीन सीयूला जोडावी व दुस-या बीयूची पहिल्या बीयूला, तीस-या बीयूची दुस-या बीयूला तसेच चौथ्या बीयूची तिस-या बीयूला याप्रमाणे कनेक्टींग पीन जोडावी.

**प्रश्न ३  स्पेशल टॅग म्हणजे काय ?**

उत्तर  मतदान यंत्रे तयार करण्यासाठी आयोगाने सूचित केलेल्या ७.५ cm (ECIL)x ५.५ cm (BCIL) आकाराचे पोस्टकार्डाच्या जाडी इतकी जाडी व कोप-यावर धातूची रिंग असलेले एक छीद्र असलेली जाड कागदाची चिठ्ठी की ज्यावर मतदान केंद्र पारित अनुक्रमांक केंद्रध्याक्षांची स्वाक्षरी असा मजकूर छापलेली चिठ्ठी म्हणजे स्पेशल टॅग होय.

**प्रश्न ४  मतदानयंत्रातील डिटॅचेबल मेमरी चीप (DMM) म्हणजे काय ?**

उत्तर  मतदानयंत्रात मतदान केल्यानंतर झालेले मतदान साठवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेला एक महत्वपूर्ण भाग म्हणजे मेमरी चीप होय.  ही मेमरी चीप मतमोजणीनंतर मतदानयंत्रातून बाजूला काढून (detach) कोषागारात सुरक्षित ठेवली जाते.

**प्रश्न ५  मेमरी चीप (DMM) कोणत्या रंगाची असते ?**

उत्तर  पांढ-या.

**प्रश्न ६  स्ट्रीप सील म्हणजे काय ?**

उत्तर  स्ट्रीप सील / पट्टी मोहोर म्हणजे नियंत्रण युनिटच्या सभोवताली गुंडाळून वापरण्यात आलेली पेपरपट्टी होय. यामुळे कंट्रोल युनिटचा निकाल भाग सुरक्षित ठेवला जातो. तसेच नियंत्रण युनिटचा मागील भाग देखील सुरक्षितरित्या बंद ठेवला जातो.

**प्रश्न ७  मतदानयंत्रे मतदान होण्यापूर्वी तसेच मतदान झाल्यानंतर (निकालापूर्वी) कोठे ठेवली जातात ?**

उत्तर  सुरक्षा कक्षामध्ये (Strong room) ठेवली जातात

# प्रकरण १७.

# मतदान साहित्य वाटप व मतदान पथकांची रवानगी

# (Distribution of Polling Material & Dispatch of Polling Parties)

## १. मतदान पथकांची सरमिसळ (Randomization) व मतदान केंद्र नियुक्ती आदेश

**प्रश्न१ मतदान कर्मचारी यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांची सरमिसळ करणे म्हणजे काय ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची यादी (डेटा बेस) तयार करून संगणकाच्या मदतीने अथवा स्वैरपणे (Randomly) निवडून मतदान पथक तयार करणे आणि अशा पथकांना स्वैरपणे (Randomly) मतदान केंद्र निश्चित करून देणे म्हणजे सरमिसळ (Randomization) करणे होय. एकाच कार्यालयातील अथवा विभागातील कर्मचा-यांचा एका मतदान पथकात समावेश होऊ नये तसेच विशिष्ट कर्मचारी विशिष्ट मतदान केंद्रावर येऊ नये याकरिता Randomization केले जाते.

भारत निवडणूक आयोगातर्फे घेतल्या जाणा-या निवडणुकांमध्ये मतदान पथकांची सरमिसळ केली जाते. तथापि, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मतदान पथकांची सरमिसळ करण्याची तरतूद नाही.

**प्रश्न २ निवडणूक असलेल्या भागात कार्यरत असलेला किंवा त्या भागातील निवासी कर्मचारी त्याच भागाच्या मतदान केंद्रावर नियुक्त केला जाऊ शकतो का ?**

उत्तर सर्वसाधारणपणे नाही.

**प्रश्न ३ मतदान केंद्राध्यक्ष हा इतर मतदान कर्मचारी यांचेपेक्षा कोणत्या दृष्टीने वरिष्ठ असणे आवश्यक आहे ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्ष पदाने, अनुभवाने व वेतनश्रेणीने इतर कर्मचा-यांपेक्षा वरिष्ठ असणे अपेक्षित आहे.

**प्रश्न ४ मतदान कर्मचारी यांचे नियुक्ती आदेश कोणत्या नमुन्यात द्यावेत ? व त्या आदेशावर कोणाची स्वाक्षरी आवश्यक आहे ?**

उत्तर मतदान कर्मचारी यांचे नियुक्तीचे आदेश संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक नियम मध्ये विहित केलेल्या नमुन्यानुसार देणे अपेक्षित आहे. या आदेशांवर निवडणूक अधिकारी यांची स्वाक्षरी आवश्यक आहे

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ९)

**प्रश्न ५ प्रशिक्षणासाठी हजर राहण्याचे आदेश व मतदान केंद्रावरील नियुक्ती आदेश वेगवेगळे असतात का?**

उत्तर असे आदेश वेगवेगळे असू शकतात.

**प्रश्न ६ मतदान कर्मचारी व अधिकारी यांना बॅजेस (बिल्ला) कोणी व केव्हा देणे अपेक्षित आहे ?**

उत्तर मतदान अधिकारी व कर्मचारी यांना बॅजेस (बिल्ला) संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सक्षम अधिकारी यांनी निवडणुकीच्या अंतिम प्रशिक्षणाचे वेळी देणे अपेक्षित आहे.

**प्रश्न ७ पथकासोबत पोलीस कर्मचारी अथवा सुरक्षा कर्मचारी यांची नेमणूक कोण करते?**

उत्तर पथकासोबतच्या सुरक्षा कर्मचा-यांची नेमणूक संबंधित पोलीस आयुक्त / जिल्हा पोलिस अधिक्षक अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या प्रभारी बंदोबस्त अधिका-यांकडून केली जाते.

## २. मतदान केंद्रनिहाय साहित्य वाटप

**प्रश्न १ प्रत्येक मतदान केंद्रावर कोणकोणते मतदान साहित्य देणे आवश्यक आहे ?**

उत्तर प्रत्येक मतदान केंद्रावर प्रकरण २६ परिशिष्ट येथे दर्शविलेल्या यादीनुसार मतदान केंद्रासाठी निश्चित केलेले मतदान साहित्य देणे आवश्यक आहे.

**प्रश्न २ मतदान साहित्याची यादी निश्चित केलेली आहे का ?**

उत्तर होय. यादी निश्चित केलेली असते. सदर यादी प्रकरण २६ परिशिष्ट अंतर्गत ---- या ठिकाणी दर्शविली आहे.

**प्रश्न ३ मतदान केंद्रनिहाय साहित्य वाटप केव्हा व कोणाकडून केले जाते ?**

उत्तर असे साहित्य निवडणुकीच्या अंतिम प्रशिक्षणाचे वेळी निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सक्षम अधिकारी यांचेकडून केले जाते.

**प्रश्न ४ यादी व्यतिरिक्त मतदान साहित्य आवश्यक असल्यास त्याची व्यवस्था कोण करेल ?**

उत्तर यादी व्यतिरिक्त मतदान साहित्य आवश्यक असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी अथवा सक्षम अधिकारी त्याची व्यवस्था करतील.

**प्रश्न ५ मतदान साहित्याचा पुरवठा सर्वसाधारणपणे कोणी करणे अपेक्षित आहे ?**

उत्तर शासकीय मुद्रणालयाकडून अथवा सक्षम प्राधिका-यांनी ठरवून दिलेल्या पुरवठादार संस्था / व्यक्तीकडून निवडणूक साहित्याच्या पुरवठा होणे अपेक्षित आहे.

**प्रश्न ६ छापील नमुने कुठून प्राप्त केले जातात ? स्थानिकरित्या काही साहित्य / नमुने छापले जाऊ शकतात का ?**

उत्तर छापील नमुने शासकीय मुद्रणालय अथवा विहित पध्दतीने निश्चित केलेल्या खाजगी मुद्रणालयाकडून अथवा पुरवठादाराकडून प्राप्त केले जातात. आवश्यकतेनुसार काही साहित्य / नमुने स्थानिकरीत्या छापून घेतले जातात.

**प्रश्न ७ मतदान साहित्याची त्याच्या उपयोगानुसार वर्गवारी आहे का ? यामध्ये महत्वाचे व कमी महत्वाचे साहित्य असे वर्गीकरण करता येईल काय ?**

उत्तर प्रकरण २६ परिशिष्ट ----- येथे दर्शविल्यानुसार मतदान साहित्याच्या उपयोगानुसार महत्वाचे व तुलनेने कमी महत्वाचे साहित्य अशी वर्गवारी केली जाते.

**प्रश्न ८ प्राप्त साहित्य मतदान केंद्रनिहाय लावताना कोणती काळजी घ्यावी ?**

उत्तर साहित्याची उपलब्धता व मतदान केंद्रासाठी अपेक्षित आवश्यकता याचा विचार करून प्राप्त साहित्य सर्व मतदान केंद्रांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. साहित्याच्या पिशव्या भरताना सर्व पिशव्यांमध्ये सर्व प्रकारचे साहित्य टाकले असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

**प्रश्न ९ मतदान साहित्याच्या किती पिशव्या तयार कराव्यात ?**

उत्तर मतदान केंद्राच्या व क्षेत्रिय अधिका-यांच्या एकूण संख्येइतक्या मतदान साहित्याच्या पिशव्या तयार कराव्या लागतात.

**प्रश्न १० EVM मतदान साहित्याचा एक भाग असते का ?**

उत्तर होय. परंतु, EVM मतदान केंद्राध्यक्षाकडे स्वतंत्रपणे सुपूर्द केले जाते.

**प्रश्न ११ ऋतुमानानुसार मतदान साहित्यात कोणत्या बाबी समाविष्ट केल्या गेल्या पाहिजेत ?**

उत्तर पावसाळी ऋतूमध्ये मतदान साहित्य पाण्यामुळे खराब होवू नये याद्दष्टीने मतदान साहित्यासोबत पुरेशा मोठया आकाराच्या पॉलिथिन पिशव्यांचा समावेश केला जावा.

**प्रश्न १२ सांविधिक(statutory) व असांविधिक(non-statutory) लिफाफे म्हणजे काय ?**

उत्तर मतदानानंतर भरलेले विविध अहवाल / नमुने ठेवण्यासाठी विशिष्ट रंगांचे व आकाराचे लिफाफे उपलब्ध करून दिले जातात. हे लिफाफे खालीलप्रमाणे असतात :-

हिरव्या रंगाच्या पहिल्या लिफाफ्यामध्ये खालीलप्रमाणे जे मोहोरबंद लिफाफे ठेवले जातात त्यांना सांविधिक (statutory) लिफाफे म्हणतात.

१) चिन्हांकित मतदारयादी

२) मतदारांची नोंदवही

३) न वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका

४) वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका

५) मतदार चिठ्ठया असलेला मोहोरबंद लिफाफा.

पिवळया रंगाच्या दुस-या मोठया लिफाफ्यामध्ये खालील प्रमाणे जे मोहोरबंद लिफाफे ठेवले जातात त्यांना असांविधिक (non-statutory) लिफाफे म्हणतात.

१. चिन्हांकित प्रती व्यतिरिक्त मतदारयादीची प्रत ठेवलेला मोहोरबंद लिफाफा.

२. मतदान प्रतिनिधीची नेमणूक पत्राचा लिफाफा.

३. निवडणूक कार्यप्रमाणपत्रे लिफाफा.

४. आक्षेपित मतांची यादी ठेवलेला लिफाफा.

५. अंध व शारिरिकदृष्टया निःसमर्थ मतदारांची यादी व प्रतिज्ञापत्रे मोहोरबंद केलेला लिफाफा.

६. मतदारांच्या वयाबाबतची प्रतिज्ञापत्रे व अशा मतदारांची यांदी.

७. आक्षेपित मताबाबतचे पावतीपुस्तक व रोख रक्कम.

८. न वापरलेल्या व खराब झालेल्या कागदी मोहोरांचा सिलबंद लखोटा.

९. न वापरलेल्या मतदार चिठ्ठया.

१०. न वापरलेल्या व खराब झालेल्या विशेष खूण चिठ्ठया.

११. खराब झालेल्या पटीमोहोर सिलबंद लिफाफा इ.

उपरोक्त १ ते ५ लिफाफे यांना सांविधिक व १ ते ११ लिफाफे यांना असांविधिक लिफाफे म्हणतात.

**प्रश्न १३ मतदानाच्या किती दिवस आधी साहित्य वाटप करावे ?**

उत्तर निवडणुकीच्या एक दिवस आधी, शेवटच्या प्रशिक्षणाच्या वेळी मतदान साहित्य वाटप करावे.

**प्रश्न १४ साहित्य वाटप करतांना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी काय दक्षता घ्यावी ?**

उत्तर सर्व मतदान पथकांना आवश्यक ते सर्व महत्वाचे व अन्य साहित्य मिळाले किंवा नाही याची तपासणी संबंधित मतदान केंद्राध्यक्ष यांचेकडून करवून घेऊन त्याबाबत लेखी अहवाल प्राप्त करून घेण्याची दक्षता निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घ्यावी.

**प्रश्न १५ साहित्य वाटप होत असतांना झोनल अधिकारी यांची काय जबाबदारी आहे ?**

उत्तर झोनल अधिकारी यांनी साहित्य वाटपाचे वेळी स्वत: हजर राहून आपल्या झोनमधील सर्व केंद्राध्यक्ष यांनी साहित्य प्राप्त करून घेवून त्याची १०० टक्के तपासणी केली असल्याची खात्री करणे व काही साहित्याची आवश्यकता असल्यास असे साहित्य निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून प्राप्त करवून देणे अपेक्षित आहे.

**प्रश्न १६ झोनल ऑफीसरला कोणकोणते साहित्य वाटप केले जाते ? व केव्हा ?**

उत्तर केंद्राध्यक्षांना वितरित केल्याप्रमाणे प्रत्येक झोनल ऑफीसरला मतदान साहित्याची पिशवी, झोनकरिता तयार करण्यात आलेले राखीव EVM, शाईचे मार्कर पेन इ. साहित्य मतदान पथकांना वाटप केल्यानंतर झोनल अधिका-यांना वाटप केले जाते.

## ३. मतदान पथकाद्वारे साहित्य पडताळणी

**प्रश्न १ मतदान केंद्रनिहाय मतदान पथकाव्दारे साहित्य पडताळणी करणे म्हणजे काय ? अशी तपासणी केव्हा व कोठे केली जाते ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्ष व पथकातील अन्य मतदान अधिकारी यांनी निवडणूक निर्णय अधिका-यांकडून प्राप्त करून घेतलेले मतदान साहित्य यादीनुसार प्राप्त झाले असल्याची १००% पडताळणी करणे म्हणजेच साहित्य पडताळणी करणे होय. निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून शेवटच्या प्रशिक्षणाचे वेळी असे साहित्य हे साहित्य वितरण कक्षातून वितरित केले जाते त्याचवेळी मंडपामध्ये बसून त्याची पडताळणी केली जाते.

**प्रश्न २ मतदान साहित्य प्राप्त करून घेण्याची प्राथमिक जबाबदारी कोणाची आहे ?**

उत्तर मतदान साहित्य प्राप्त करून घेण्याची प्राथमिक जबाबदारी मतदान केंद्राध्यक्ष यांची आहे. परंतु, अपवादात्मक परिस्थितीमुळे मतदान केंद्राध्यक्ष उपस्थित नसेल तर मतदान अधिकारी क्र.१ यांचेद्वारा मतदान साहित्य प्राप्त करुन घेतले जाते.

**प्रश्न ३ मतदान पथकाने साहित्य प्राप्त करून घेतांना काय तपासण्या कराव्यात ?**

उत्तर मतदान साहित्य प्राप्त करून घेताना असे साहित्य मतदान केंद्राध्यक्षाच्या निर्देश पुस्तिकेमधील यादीनुसार प्राप्त झाले आहे किंवा कसे, पक्क्या शाईच्या मार्कर पेनची शाई, पॅड मधील शाई सुकलेली नसल्याची खात्री करणे इ. तपासण्या कराव्यात.

**प्रश्न ४ EVM तपासणे गरजेचे आहे का ? EVM च्या कोणत्या बाबी तपासाव्यात ?**

उत्तर EVM ची तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. प्राप्त झालेले EVM नेमून दिलेल्या मतदान केंद्राचेच असल्याची खात्री करणे, Slider switch योग्य ठिकाणावर असणे, उमेदवारांच्या नावासमोरील व सर्व उमेदवारांचे शेवटी NOTA समोरील राखाडी रंगाची (Grey) बटने उघडी (unmasked) असणे, अन्य सर्व बटने झाकलेली (masked) असणे, सर्व उमेदवारासमोरील बटने कार्यरत असणे, Connecting cable ची पीन व्यवस्थित असणे, बॅटरी व्यवस्थित चालू असणे, EVM मध्ये योग्यरित्या मत नोंदविता येणे व असे मत EVM वर व्यवस्थित असल्याची खात्री करणे (Display timing सह) इ. बाबी तपासणे आवश्यक आहे.

**प्रश्न ५ EVM शी संबंधित कोणती स्टेशनरी तपासावी ?**

उत्तर स्पेशल (विशेष) टॅग, पेपर सील, ABCD, स्ट्रीप सील (पट्टी मोहोर), अड्रेस टॅग (पत्ता खूणचिठ्ठी), Voter slip (मतदान चिठ्ठी) इ.

**प्रश्न ६ मतदान पथकास काही साहित्य आढळून न आल्यास किंवा कमी असल्याचे दिसून आल्यास पथकाने काय करावे ?**

उत्तर केंद्राध्यक्षाने असे साहित्य तात्काळ निवडणूक निर्णय अधिका-यांकडून प्राप्त करून घ्यावे.

**प्रश्न ७ मतदान पथकाद्वारे साहित्य पडताळणीमध्ये निष्काळजीपणा केल्यास कोणास जबाबदार धरले जाते ?**

उत्तर अशा प्रकरणी मतदान केंद्राध्यक्ष यांना तसेच मतदान पथकातील सर्व मतदान अधिकारी व झोनल अधिकारी यांना सुध्दा जबाबदार धरले जाते.

## ४. <u>मतदान पथके रवानगी</u>

**प्रश्न १ मतदान पथकांना मतदान केंद्रावर सुरक्षित व वेळेवर पोहोचविण्याची जबाबदारी कोणाची असते ?**

उत्तर मतदान पथकांना मतदान केंद्रावर सुरक्षित व वेळेवर पोहोचविण्याची जबाबदारी संबंधित झोनल अधिकारी व रूट गाईड यांची असते. याशिवाय सुरक्षिततेकरिता मतदान पथकासमवेत सुरक्षा कर्मचा-याची नियुक्ती केली जाते.

**प्रश्न २ मतदान पथकाच्या रवानगीमध्ये रुट गाईडची जबाबदारी व कर्तव्य काय असते ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निश्चित करून दिलेल्या रूट वरील सर्व मतदान पथकांना त्याच क्रमाने त्या त्या मतदान केंद्रापर्यंत पोहोचविणे ही रूट गाईडची जबाबदारी असते.

**प्रश्न ३ वाहतूक आराखडा म्हणजे काय ? तो कसा असावा ?**

उत्तर एकाच मार्गावरील अनेक मतदान केंद्रांसाठी मतदान पथके विशिष्ट वाहनाने पोहोचविण्यासाठी केलेले नियोजन म्हणजे वाहतूक आराखडा. असा आराखडा करताना रस्त्याची स्थिती व त्यावरून जाऊ शकणारे वाहन, मुख्यालयापासूनचे अंतर इ. बाबींचा विचार करण्यात येतो. एका झोनसाठी साधारणत: एक किंवा दोन वाहतूक आराखडयांचा समावेश असणे प्रशासकीय दृष्टया सोईचे असते.

**प्रश्न ४ एखाद्या मतदान पथकाला स्वतःच्या खाजगी वाहनाने साहित्य घेऊन मतदान केंद्रावर जाता येईल का?**

उत्तर नाही.

**प्रश्न ५ मतदान पथक रवाना करताना सोबत कोणत्या स्वरुपाची सुरक्षा आवश्यक आहे?**

उत्तर प्रत्येक मतदान पथकासोबत निवडणूक निर्णय अधिकारी / पोलिस अधिकारी यांनी केलेल्या नियोजनानुसार सुरक्षा बंदोबस्तातील कर्मचारी हजर असणे आवश्यक आहे.

**प्रश्न ६ सुरक्षा कर्मचारी नसताना मतदान पथक रवाना करता येईल का ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ७ मतदान पथकातील सर्वच सदस्यांना एकत्र मतदान केंद्रावर जाण्याचे बंधन असते का ?**

उत्तर या संदर्भातील सूचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून प्रशिक्षणाचे वेळी दिल्या जातात. तथापि, भारत निवडणूक आयोगाच्या निवडणुकांमध्ये सरमिसळ पध्दतीने पथक बनवून मतदान केंद्रावर पाठविले जात असल्यामुळे सर्व सदस्यांना सोबतच मतदान केंद्रावर जावे लागते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींमध्ये साधारणपणे मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी क्रमांक १ यांना मतदान साहित्यासह मतदान केंद्रावर जावे लागते, पथकातील अन्य सदस्य नेमून दिलेल्या वेळी परस्पर मतदान केंद्रावर एक दिवस आधी हजर होतात. महिला कर्मचारी मतदानाचे दिवशी मतदान केंद्रावर विहित वेळी परस्पर हजर राहू शकतात.

**प्रश्न ८ पथकातील एखादा सदस्य हजर न झाल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी काय कार्यवाही करावी ?**

उत्तर अशा प्रकरणी राखीव कर्मचा-यांपैकी कर्मचारी अशा पथकात नियुक्त करावा. तसेच अनुपस्थित कर्मचा-यावर निवडणूक नियमांनुसार कारवाई करावी.

**प्रश्न ९ मतदान पथकाच्या रवानगीमध्ये झोनल अधिकारी यांची जबाबदारी व कर्तव्ये काय ?**

उत्तर झोनल अधिकारी यांनी आपल्या झोनमधील सर्व पथके हजर झाल्याची व त्यांनी साहित्य तपासून घेतल्याची खात्री करावी व त्यांना नेमून दिलेल्या वाहनातून मतदान पथकांना मतदान केंद्रापर्यंत विहित वेळेत पोहोचवावे. एखादा मतदान कर्मचारी अपरिहार्य कारणामुळे हजर झाला नसल्यास त्या ऐवजी राखीव कर्मचारी उपलब्ध करवून द्यावा. सर्व कर्मचा-यांची उपस्थिती घेऊन सर्व मतदान कर्मचारी केंद्रावर पोहोचल्याचा OK अहवाल घेऊन निवडणूक निर्णय अधिका-याकडे सुपूर्द करावे. त्याचप्रमाणे मतदान साहित्यापैकी कोणतेही साहित्य कमी पडत असल्यास स्वत:कडील राखीव साहित्याच्या पिशवीतील साहित्य उपलब्ध करून द्यावे.

## ५. मतदान पथके पोहोचल्याची खात्री व पूर्वतयारी

**प्रश्न १ मतदान पथके पोहोचली आहेत किंवा नाहीत याची खात्री कशी केली जाते ?**

उत्तर झोनल अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रावर भेट देऊन पथके पोहोचल्याची खात्री करतात. तसेच रूट गाईड या बाबत स्वतंत्रपणे दूरध्वनीव्दारे निवडणूक निर्णय अधिकारी यांना अहवाल देतात.

**प्रश्न २ मतदान पथकाला मतदान केंद्र असलेल्या गावात तेथील स्थानिक रहिवाशी यांनी केलेले आदरातिथ्य स्विकारता येते का ?**

उत्तर नाही. हे कटाक्षाने टाळावे.

**प्रश्न ३ झोनल अधिकारी यांनी प्रत्येक मतदान केंद्रावर जाऊन कोणकोणत्या बाबींची व्यक्तिशः पाहणी करावी ?**

उत्तर मतदान पथकातील सर्व सदस्य हजर झाले आहेत काय, मतदान केंद्राध्यक्षांना सर्व साहित्य मिळाले असल्याची त्यांनी खात्री केली आहे काय, कमी पडलेले साहित्य उपलब्ध करून घेतले आहे काय, EVM व्यवस्थितपणे काम करत आहे काय, मतदान केंद्रासाठी पुरेसे फर्निचर, पाण्याची व्यवस्था, सावली, रॅम्प इ. उपलब्ध आहे काय, मतदान केंद्राबाहेर १०० व २०० मीटरच्या हद्दीची निशाणी चुना टाकून दर्शविली आहे काय, मतदान केंद्रातील आक्षेपार्ह बाबी झाकल्या आहेत काय इ. ची पाहणी झोनल अधिकारी यांनी करणे अपेक्षित आहे.

**प्रश्न ४ मतदान पथक पोहोचल्याबरोबर त्या दिवशी कोणती पूर्वतयारी करून ठेवावी ?**

उत्तर मतदान केंद्रातील विविध राजकिय नेत्यांची छायाचित्रे, निशाण्या, उदघाटनाचे फलक इ. झाकावेत, मतदान केंद्राची रचना ठरवून त्यानुसार फर्निचर लावून घ्यावे, सर्व उमेदवारांच्या मतदान प्रतिनिधींची बैठक व्यवस्था करावी, मतदान केंद्राबाहेर मतदारांची रांग लावण्याची जागा निश्चित करावी, सर्व साहित्य व EVM पुन्हा तपासून घ्यावे, मतदान केंद्राबाहेर १०० व २०० मीटरच्या हद्दीची निशाण्या चुना टाकून दर्शवाव्यात, मतदान केंद्राबाहेर फळयावर इशारा, नमुना मतपत्रिका, सूचना लावून घ्यावी, विविध बोर्ड लावून घ्यावेत इ. पूर्वतयारी करून घ्यावी.

**प्रश्न ५ वेगवेगळे इशारे, सूचना, पत्रके, मतदार यादी, १०० व २०० मीटर च्या हद्दीच्या खुणा कशा हाताळाव्यात ?**

उत्तर मतदानाच्या आदल्या दिवशी एका फळयावर इशारा, नमुना मतपत्रिका, विविध सूचना इ. डकवून तयार करावेत, विविध बोर्ड लावून घ्यावेत, मतदार यादी त्याच मतदान केंद्राशी संबंधित असल्याची खात्री करून घ्यावी, १०० व २०० मीटर हद्दीच्या खुणा आखून घ्याव्यात. १०० व २०० मिटर हद्दीमध्ये काही आक्षेपार्ह निशाण्या असल्यास त्या झाकून घ्याव्यात. या परिसरात निवासी घरे अथवा उमेदवार / पाठीराखे यांचे कार्यालय इ. असल्यास त्याचे पोलीसांकरवी विनियमन करावे, परिसरात वाद्य, लाऊडस्पिकर वाजत असल्यास त्याचा प्रतिबंध करणे आवश्यक आहे. यासाठी योग्य ते वैध आदेश देण्यास मतदान केंद्राध्यक्ष सक्षम असतात.

**प्रश्न ६ मतदान पथकास मतदान केंद्र सोडून इतरत्र मुक्कामास जाता येईल का ?**

उत्तर नाही. मतदान साहित्याची संपूर्ण जबाबदारी पथकावर असल्यामुळे त्यांना मतदान केंद्र सोडून अन्यत्र मुक्कामास जाता येत नाही. मात्र पथकातील महिला सदस्यांना मुक्कामाचे बंधन नसून त्यांनी मतदानाचे दिवशी मतदान केंद्रावर थेट मात्र विहित वेळेवर हजर होणे बंधनकारक आहे.

## ६. झोनल अधिका-यास द्यावयाचे मतदान साहित्य

**प्रश्न १ झोनल अधिका-याकडे मतदानासाठी आवश्यक काही साहित्य दिले जाते काय ?**

उत्तर होय. मतदान केंद्राध्यक्षांना मतदान केंद्रासाठी दिलेल्या साहित्याप्रमाणेच राखीव साहित्याची पिशवी व त्या मतदान केंद्रासाठी असणारे राखीव EVM झोनल अधिका-याकडे दिले जातात.

**प्रश्न २ झोनल अधिका-यास असे साहित्य देण्याचा उद्देश काय ?**

उत्तर कोणत्याही मतदान पथकास निवडणूक साहित्य कमी पडल्यास झोनल अधिका-यांनी आपल्याकडील साहित्य मतदान केंद्रावरील भेटीच्या वेळी संबंधित केंद्राध्यक्षास उपलब्ध करून देणे अपेक्षित असते. एखाद्या मतदान केंद्रावरील मतदान यंत्रात तांत्रिक बिघाड झाल्यास झोनल अधिका-यांकडील राखीव मतदान यंत्र वापरण्यात येते.

**प्रश्न ३ झोनल अधिकारी असे साहित्य केव्हा ताब्यात घेतात ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्षांना शेवटच्या प्रशिक्षणानंतर साहित्य वाटप करून झाल्यानंतर व अशा साहित्याची त्यांचेकडून तपासणी झाल्यानंतर झोनल अधिकारी साहित्य ताब्यात घेतात.

**प्रश्न ४ झोनल अधिकारी यांनी मतदानाच्या आदल्या दिवशी साहित्य ताब्यात घेतल्या नंतर व सर्व मतदान केंद्रांचा अहवाल निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे दिल्यानंतर त्यांच्याकडील साहित्य कोठे ठेवणे आवश्यक आहे ?**

उत्तर झोनल अधिकारी यांनी असे साहित्य निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात किंवा पोलिस स्टेशनमध्ये सुरक्षित ठेवणे अपेक्षित आहे.

**प्रश्न ५ झोनल अधिकारी असे साहित्य स्वतःच्या घरी ठेवू शकतो काय ?**

उत्तर नाही. असे करणे टाळावे.

**प्रश्न ६ झोनल अधिकारी असे साहित्य इतर व्यक्तींव्दारे पोलिस स्टेशन किंवा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात पाठवू शकतो काय ?**

उत्तर नाही. झोनल अधिकारी हे या साहित्याच्या सुरक्षिततेसाठी स्वत: जबाबदार असल्यामुळे त्यांनी वैयक्तिकरित्या जाऊन साहित्य जमा करावे.

**प्रश्न ७ झोनल अधिका-याकडील साहित्य गहाळ झाल्यास त्याबाबत निवडणूक कायद्यातील तरतुदीनुसार झोनल अधिकारी शिक्षेस पात्र होऊ शकतो काय ?**

उत्तर होय. झोनल अधिकारी हे या साहित्याच्या सुरक्षिततेसाठी स्वत: जबाबदार असल्यामुळे त्यांनी अशा राखीव साहित्याची दक्षता घ्यावी.

# प्रकरण१८.

# मतदानाच्या दिवशीची कार्यवाही

## (Poll Day Activities)

## १. मतदान पथके पोहोचल्याची खात्री व मतदान केंद्रावरील पूर्वतयारी

**प्रश्न १ मतदान पथकाची रचना कशी असते ?**

उत्तर सर्वसाधारणपणे प्रत्येक मतदान पथकामध्ये एक मतदान केंद्राध्यक्ष आणि तीन मतदान अधिकारी असतात.

**प्रश्न २ मतदान पथके मतदानापूर्वी मतदान केंद्रावर कधी पाठविली जातात व ती पोहोचल्याची खात्री कशी केली जाते ?**

उत्तर मतदान पथके मतदान केंद्रावर मतदानाच्या आदल्या दिवशी पाठविली जातात. रुट गाईड व झोनल अधिका-याकडून लेखी अहवाल घेऊन मतदान पथके पोहोचल्याची खात्री केली जाते. काही मतदान केंद्रास निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी हे देखील प्रत्यक्ष भेटी देऊन याबाबत खात्री करतात.

**प्रश्न ३ मतदानापूर्वी आदल्या दिवशी मतदान केंद्रावर काय पूर्वतयारी केली जाते ?**

उत्तर मतदान केंद्रातील विविध राजकीय नेत्यांची छायाचित्रे, निशाण्या, उद्‌घाटनाचे फलक इ. झाकणे,मतदान केंद्राची रचना ठरवून त्यानुसार फर्निचर लावून घेणे, मतदान प्रतिनिधींची बैठक व्यवस्था करणे, मतदान केंद्राबाहेर मतदारांची रांग लावण्याची जागा निश्चित करणे, सर्व साहित्य व EVM तपासून घेणे, मतदान केंद्राबाहेर १०० व २०० मीटरच्या हद्दीची निशाणी चुना टाकून दर्शविणे, मतदान केंद्राबाहेर सूचना फलकावर / फळयावर इशारा, नमुना मतदार यादी, सूचना लावून घेणे, विविध बोर्ड लावून घेणे इ. पूर्वतयारी केली जाते.

**प्रश्न ४ मतदान केंद्रात वेगवेगळे इशारे, सूचना, पत्रके, मतदार यादी इ. साहित्य कसे लावले पाहिजे ?**

उत्तर मतदानाच्या आदल्या दिवशी एका फळयावर इशारा, नमुना मतपत्रिका, विविध सूचना इ. डकवून तयार करणे, विविध बोर्ड लावून घेणे आवश्यक असते. तसेच पुरविण्यात आलेली मतदार यादी तपासून घेणे अपेक्षित असते.

**प्रश्न ५ मतदान केंद्राच्या सभोवती मतदान केंद्राची हद्द (प्रतिबंधात्मक सीमारेषा) निश्चित करण्याबाबत नियमात काय तरतुदी आहेत ?**

उत्तर मतदान केंद्राच्या सभोवती १०० मीटर अंतरावर व २०० मीटर अंतरावर सीमा रेषा आखून घेतल्या पाहिजेत. १०० मीटर सीमारेषेच्या आत उमेदवाराची / राजकीय पक्षाची खूण पटेल असे कृत्य करता येत नाही. या हद्दीत केवळ मतदार अथवा आयोगाने परवानगी दिलेल्या व्यक्ती प्रवेश करू शकतात. या हद्दीत निवडणुकीशी संबंधित कोणत्याही निशाण्या असल्यास त्या हटविणे अथवा झाकणे आवश्यक असते. मतदारांची अथवा उमेदवाराची वाहने २०० मीटर अंतराबाहेर थांबविणे आवश्यक असते. उमेदवारांची मतदार मदत केंद्रे (बूथ) २०० मीटर अंतराच्या बाहेर स्थापित करणे बंधनकारक असते.

## २. अभिरूप मतदान (MOCK POLL) व मतदानासाठी मतदान यंत्र तयार करणे

**प्रश्न १ मतदानाच्या दिवशी मतदान यंत्र केव्हा व कसे तयार केले जाते ?**

उत्तर मतदानाच्या दिवशी मतदान प्रतिनिधी उपस्थित असतील तर त्यांच्या समक्ष मतदान सुरु होण्यापूर्वी किमान ४५ मिनीटे आधी सुरुवात करुन मतदान यंत्र मतदानासाठी तयार केले जाते. मतदान यंत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाकडून सिलबंद करुन दिले जातात. मात्र केंद्राध्यक्षाव्दारे उमेदवार / त्यांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीमध्ये प्रत्यक्ष मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी मतदान केंद्रावर काही पूर्वतयारी करावी लागते. ही पूर्वतयारी करताना एखादा मतदान प्रतिनिधी उपस्थित नसेल त्याची वाट पहात तयारी पुढे ढकलू नये. अभिरुप मतदानास सुरुवात करण्याअगोदर काही मिनिटे मतदान प्रतिनिधींची वाट पहावी. मात्र कोणीही उपस्थित झाले नाही तरी अभिरुप मतदानास सुरुवात करावी.

**प्रश्न २ या मतदान यंत्राची चाचणी / अभिरूप मतदान (Mock Poll) कसे घेतले जाते ?**

उत्तर उपस्थित मतदान प्रतिनिधींच्या समोर मतदानासाठी तयार केलेल्या यंत्रात प्रत्येक उमेदवारासमोरील राखाडी रंगाचे बटन दाबून उमेदवारांना काही मते दिली जातात. शक्यतो सर्व उमेदवारांना समान मते टाकली जातात. उमेदवारनिहाय टाकलेल्या मतांची नोंद एका कागदावर लिहून ठेवली जाते. त्यानंतर मतदान यंत्रावरील Close हे बटन दाबले जाते. त्यानंतर मतदान यंत्रावरील Result हे बटन दाबून उमेदवारनिहाय मिळालेली मते यांची संख्या उपस्थित प्रतिनिधींना दर्शविली जाते. ही संख्या टाकलेल्या मतांच्या संख्येनुसारच असल्याची खात्री केली जाते. शेवटी मतदान यंत्रावरील Clear हे बटन दाबून टाकलेली सर्व मते यंत्रातून काढून टाकली (Delete) जातात. शेवटी मतदान यंत्रात एकही मत दिलेले नसल्याचे प्रतिनिधींना दाखवून सदर यंत्र मतदानासाठी सज्ज करण्यात येते.

**प्रश्न ३ अभिरुप मतदानाचे वेळी एकही मतदान प्रतिनिधी हजर नसल्यास मतदान प्रतिनिधी येईपर्यंत वाट पाहावी का ?**

उत्तर नाही. मतदान प्रतिनिधींनी वेळेवर उपस्थित राहाणे अपेक्षित असते. मतदान वेळेवर सुरू करणे बंधनकारक असल्यामुळे मतदान प्रतिनिधी मतदानाच्या वेळेपूर्वी किमान ४५ मिनिटे आधी पोहोचले नसल्यास त्यांची वाट पहाणे आवश्यक नाही.

**प्रश्न ४ अभिरूप मतदान (Mock Poll) झाल्यावर मशिनच्या सील वर मतदान प्रतिनिधीची सही घेतली जाते का ?**

उत्तर होय.

**प्रश्न ५ पारंपारिक पध्दतीत मतदान सुरू होण्यापूर्वी मतदान केंद्र प्रमुख तेथे उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना मतदानासाठी उपयोगात येणारी मतपेटी पूर्णत: रिकामी आहे हे दाखविण्याची तरतूद आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात सुध्दा मतदान सुरू होण्यापूर्वी त्यात कोणत्याही प्रकारचे छुपे मतदान नाही हे दाखविण्याची तरतूद असते काय ?**

उत्तर होय. अभिरूप मतदानानंतर मतदान यंत्रातील सर्व मते Delete केल्यानंतर व यंत्र मतदानासाठीतयार केल्यानंतर मतदान यंत्रावरील Total हे बटन दाबून यंत्रामध्ये उमेदवारनिहाय व एकूण मते शून्य असल्याचे मतदान केंद्राध्यक्षाव्दारे उपस्थित मतदान प्रतिनिधींना दाखविण्यात येते.

**प्रश्न ६ एकापेक्षा जास्त Ballot Unit असल्यास मतदान केंद्रात त्यांची रचना कशी करावी ?**

उत्तर एकापेक्षा जास्त बॅलट युनिट असल्यास मतदान कक्षात मतदाराच्या डाव्या हातास पहिले व उजव्या हातास दुसरे या क्रमाने बॅलट युनिट ठेवण्यात यावे. ही सर्व बॅलट युनिट मतदान कक्षात व्यवस्थित ठेवून मतदान करता येईल व मतदानाची गुप्तता पाळली जाईल याची दक्षता घ्यावी. (याबाबत अधिक माहितीसाठी पहा § जोडपत्र सहा अ)

## ३. <u>मतदान प्रतिनिधी</u>

**प्रश्न १ मतदान प्रतिनिधीच्या नेमणूकीविषयी कोणत्या बाबी तपासाव्यात ?**

उत्तर (i) मतदान प्रतिनिधीच्या नेमणूक पत्रावरील उमेदवाराच्या / निवडणूक प्रतिनिधीच्या स्वाक्षरीची पडताळणी नमुना स्वाक्षरी प्रपत्रावरुन करणे. (ii) मतदान प्रतिनिधीचे नाव त्या मतदान केंद्राच्या मतदारयादीमध्ये आहे किंवा नाही याबाबत पडताळणी करणे. तसेच त्या व्यक्तीस सुरक्षा दिलेली नसावी.

**प्रश्न २ मतदान प्रतिनिधी त्याच मतदान केंद्राच्या यादीतील मतदार असणे बंधनकारक आहे का ?**

उत्तर होय.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. स्थास्वसं-२००४ / प्र.क्र २५ /कार्या ०५ दिनांक १०/११/२००४)

**प्रश्न ३ उमेदवार प्रत्येक मतदान केंद्रासाठी किती मतदान प्रतिनिधी नेमू शकतात व ही नेमणूक कधीपर्यंत करता येते ?**

उत्तर उमेदवार प्रत्येक मतदान केंद्रासाठी तीन मतदान प्रतिनिधी नेमू शकतात. तथापि, कोणत्याही वेळी त्या पैकी केवळ एक प्रतिनिधी मतदान केंद्रात हजर राहू शकतो. म्हणजेच उर्वरित दोन हे बदली मतदान प्रतिनिधी असतील. मतदान प्रतिनिधींच्या नेमणूकीसाठी कायद्याने मुदत घालून दिलेली नाही. तथापि, मतदानाच्या दिवशी सकाळी अभिरूप मतदानासाठी हजर राहाता यावे याद्दष्टीने उमेदवाराने किमान एक दिवस अगोदर अशी नेमणूक करणे हिताचे आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १९ (१))

**प्रश्न ४ मतदान प्रतिनिधींनी मतदान केंद्रावर किती वाजता हजर राहणे अपेक्षित आहे ?**

उत्तर मतदानाचे दिवशी मतदान सुरू होण्याच्या वेळेपूर्वी साधारणत: ४५ मिनिटे अगोदर अभिरूप मतदान घेतले जाते. याकरिता मतदान प्रतिनिधींनी मतदान केंद्रावर मतदान सुरु होण्यापूर्वी एक तास आधी हजर राहणे आवश्यक आहे.

**प्रश्न ५ मतदान केंद्रावर उपस्थित झालेल्या मतदान प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था कोठे व कशी केली जाते ? त्यांचा बसण्याचा क्रम कसा असतो ?**

उत्तर मतदान केंद्रावर मतदान प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था साधारणत: मतदान अधिकारी क्रमांक १ यांच्या उजव्या बाजूस अशा रितीने केली जाते की मतदानापूर्वी मतदाराची मतदान अधिकारी क्रमांक १ यांचे व्दारा ओळख पटविली जात असताना मतदाराचा चेहरा मतदान प्रतिनिधीस स्पष्टपणे दिसेल. मतदाराच्या ओळखीबाबत आक्षेप असल्यास तो सुलभपणे घेता यावा या बाबीची काळजी घेण्यात येते. भारत निवडणूक आयोगातर्फे घेतल्या जाणा-या निवडणुकांमध्ये राष्ट्रीय व राज्यस्तरीय मान्यता प्राप्त राजकीय पक्षाचे प्रतिनिधी, नोंदणीकृत राजकीय पक्षाचे प्रतिनिधी व अपक्ष या क्रमाने मतदान प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था असते. तथापि, राज्य निवडणूक आयोगाच्या या संदर्भात सूचना नाहीत.

**प्रश्न ६ मतदान प्रतिनिधींची जबाबदारी व कर्तव्ये काय आहेत ?**

उत्तर मतदान अधिकारी क्रमांक १ जेव्हा मतदाराची ओळख पटवितो त्यावेळी ओळखीस आक्षेप असल्यास असा आक्षेप नोंदविण्याची प्रमुख जबाबदारी मतदान प्रतिनिधीची असते. त्याचप्रमाणे मतदान केंद्रात येवून मतदान करून गेलेल्या मतदारांची नोंद देखील ते आपल्याकडील मतदार यादीत घेतात. मतदान गुप्तपणे होण्यासाठी मतदान केंद्राध्यक्ष यांना आवश्यक ते सहकार्य करण्याची जबाबदारी देखील मतदान प्रतिनिधीची असते. मतदान प्रतिनिधीची कर्तव्ये खालीलप्रमाणे -

अ) मतदार असल्याची बतावणी करु पाहणा-या व्यक्तींवर आवश्यकता वाटल्यास आक्षेप घेऊन मतदारांची तोतयेगीरी शोधून काढण्यास केंद्राध्यक्षास मदत करणे.

ब) मतदानापूर्वी व मतदानानंतर नियमानुसार मतदानयंत्र सुरक्षित व मोहोरबंद करण्यास मदत करणे.

भ) मतदान समाप्त झाल्यानंतर केंद्राध्यक्षाकडून नोंदविलेल्या मतांचा नमुना व्हीएम - ३ (भाग - एक) मधील हिशोबाची व कागदी मोहरांच्या हिशोबाची प्रत घेणे.

ड) मतदानाशी संबंधित असलेली कागदपत्रे नियमानुसार योग्यप्रकारे सुरक्षित व मोहोरबंद केली आहेत का पाहणे.

ढ) मतदान विषयक अभिलेख मोहोरबंद केले जात असतांना आवश्यक त्या ठिकाणी स्वतःची स्वाक्षरी करणे.

## ४. मतदान कर्मचारी

**प्रश्न १ मतदान पथकातील मतदान केंद्राध्यक्ष तसेच मतदान कर्मचारी यांच्यात कामाची विभागणी कशी केली जाते ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्ष हा मतदान पथकाचा प्रमुख असून तो मतदान कर्मचा-यांमध्ये कामाची विभागणी करून देतो. मतदान केंद्राचे सर्वसाधारण कामकाज मतदान अधिकारी क्रमांक १ ते ३ यांचे सहाय्याने पार पाडले जाते. असाधारण मतदानाच्या प्रकारात उदा. आक्षेपित मत, प्रदत्त मत, सोबत्याच्या सहाय्याने नोंदवावयाचे मत, इ. बाबतीत मतदान केंद्राध्यक्ष यांचे काम महत्वाचे असते.

**प्रश्न २ मतदान केंद्राध्यक्ष यांची जबाबदारी व कर्तव्ये काय आहेत ?**

उत्तर मतदानाच्या सर्व प्रकियेवर पर्यवेक्षण नियंत्रण व मार्गदर्शन करुन मतदानाच्या प्रक्रिया पारदर्शक नि:पक्षपातीपणे निर्भय वातावरणामध्ये पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी केंद्राध्यक्षांवर असते. हे काम पूर्ण करण्यासाठी केंद्राध्यक्ष इतर मतदान अधिका-यांमध्ये कामाची विभागणी करुन देतात.

**प्रश्न ३ मतदान अधिकारी क्र.१ यांची जबाबदारी व कर्तव्ये काय आहेत ?**

उत्तर मतदार यादीचा चिन्हांकित प्रतीचा मतदान अधिकारी क्र.१ हा प्रभारी असेल व मतदारांची ओळख पटविणे ही त्याची मुख्य जबाबदारी असेल. मतदार मतदान केंद्रामध्ये थेट प्रवेश केल्यानंतर पहिल्या मतदान अधिका-याकडे जाईल. मतदार छायाचित्र, ओळखपत्र अथवा पर्यायी कागदपत्रे यांची तपासणी करुन मतदाराच्या ओळखी विषयी तो खात्री करुन घेईल.

**प्रश्न ४ मतदान अधिकारी क्र.२ यांची जबाबदारी व कर्तव्ये काय आहेत ?**

उत्तर दुसरा मतदान अधिका-याकडे पक्क्या शाईच्या मार्करचा पेन असेल. पहिल्या मतदान अधिकाऱ्यांनी मतदारांची ओळख पटविल्यानंतर दुसरा मतदान अधिकारी डाव्या हाताच्या तर्जनीवर कोणतीही खूण / डाग नाही याबाबत तपासणी करुन मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर मार्कर पेनने पक्क्या शाईची खूण करील. व्हीएम - १ या नमुन्यामधील मतदारांची नोंदवहीमध्ये मतदाराचा मतदारयादीतील अनुक्रमांक नमूद करेल व त्यासमोर त्याची सही अथवा अंगठ्याचा ठसा घेतल्यानंतर मतदाराला मतदार चिठ्ठी देईल. मतदान केंद्र सोडण्यापूर्वी पक्क्या शाईची खूण सुकलेली असेल याची खात्री करुन घेतो.

**प्रश्न ५ मतदान अधिकारी क्र.३ यांची जबाबदारी व कर्तव्ये काय आहेत ?**

उत्तर मतदान अधिकारी क्र.३ हा नियंत्रण युनीटचा प्रभारी असेल दुस-या मतदान अधिका-यांनी दिलेल्या मतदार चिठ्ठयाच्या आधारे व चिठ्ठीवर दर्शविलेल्या अनुक्रमांकानुसार तो मतदारांना मतदान कक्षामध्ये जाण्यास परवानगी देईल. तत्पूर्वी तो Control युनिटवरील Ballot बटन दाबून मतदानासाठी एक मत Ballot युनिटमध्ये सोडेल.

**प्रश्न ६ एखादा कर्मचारी (मतदान केंद्राध्यक्ष / मतदान अधिकारी) काही अपरिहार्य कारणांमुळे हजर राहू न शकल्यास काय करावे ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्ष काही अपरिहार्य कारणांमुळे हजर राहू न शकल्यास मतदान अधिकारी क्रमांक १ मतदान केंद्राध्यक्षांची कामे पार पाडतात. अन्य कोणतेही मतदान अधिकारी हजर राहू न शकल्यास मतदान केंद्राध्यक्ष झोनल अधिकारी यांचे मार्फत राखीव कर्मचा-यांपैकी कर्मचारी उपलब्ध करून घेतात. अपरिहार्य परिस्थितीत स्थानिक स्तरावरील कोणत्याही शासकीय कर्मचा-यांची सेवा उपलब्ध करून घेता येवू शकते. तसेच अगदी शेवटचा पर्याय म्हणून स्थानिक ग्रामस्थाची सेवा देखील अधिग्रहीत करता येवू शकते. तथापि, अशी व्यक्ती कोणत्याही उमेदवाराची किंवा राजकीय पक्षाची समर्थक अथवा विरोधक नसल्याची खात्री करणे आवश्यक असते.

**प्रश्न ७ केंद्राध्यक्ष अनुपस्थित राहिल्यास केंद्राध्यक्ष म्हणून कोण काम करतो ?**

उत्तर मतदान अधिकारी क्रमांक १.

**प्रश्न ८ चौथा मतदान कर्मचारी केव्हा नेमला जातो ? त्याची कर्तव्ये काय आहेत ?**

उत्तर पडदानशीन महिला ज्या भागामध्ये बहुसंख्य असतील अशा भागांमध्ये शक्यतो महिला कर्मचा-याची मतदान अधिकारी क्रमांक ४ म्हणून नेमणूक केली जाते. पडदानशीन महिला मतदाराची ओळख पटवण्यामध्ये मतदान अधिकारी क्रमांक १ यांना सहाय्य करण्याची जबाबदारी अशा कर्मचा-यावर सोपविली जाते. तसेच एखाद्या मतदान केंद्रावर मतदारांची संख्या १२०० पेक्षा जास्त असेल तर अशा वेळीही चौथा मतदान अधिकारी नियुक्त करण्याची आवश्यकता असते. अशा चौथ्या मतदान अधिका-यास मतदान केंद्राध्यक्ष काही कामे स्वतंत्रपणे विभागून देतात.

## ५. मतदान कार्यपध्दती

**प्रश्न १ मतदानाची सर्वसाधारण प्रक्रिया कशी असते ?**

उत्तर मतदार मतदान केंद्रात आल्यानंतर मतदान अधिकारी क्रमांक १ यांचेकडे जातो. तेथे मतदाराची ओळख पटविली जाते व त्याची नोंद मतदार यादीवर अधोरेखित करून (underline) आणि महिला मतदाराच्या बाबतीत अधोरेखन करण्यासह अनुक्रमांकास वर्तुळ करून घेतली जाते. त्यानंतर मतदार मतदान अधिकारी क्रमांक २ यांचेकडे जातो. तेथे त्याचे नांव Voter Register मध्ये नोंदवून त्याच्या ओळखीच्या पुराव्याची नोंद घेतली जाते. अशा रजिस्टर वर त्याची स्वाक्षरी / अंगठा घेतला जातो व त्यास Voter slip दिली जाते. तसेच त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर marker pen ने शाईची निशाणी केली जाते. नंतर मतदार मतदान अधिकारी क्रमांक ३ कडे जातो. तेथे मतदान अधिकारी क्रमांक ३ यांचे व्दारा Voter slip परत घेवून Ballot Command दिली जाते. त्यानंतर मतदार मतदान कक्षात जावून Ballot unit वरील पसंतीच्या उमेदवाराच्या नावासमोरील बटन दाबून आपले मत नोंदवतो.

( संदर्भ -नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद १४ )

**प्रश्न २ मतदार यादीत नाव नसेल तथापि ओळखपत्र (EPIC) असेल तर मतदान करता येईल काय ?**

उत्तर नाही. मतदान करण्यासाठी मतदार यादीमध्ये नांव असणे अनिवार्य आहे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२)

**प्रश्न ३ मतदानाची गोपनीयता म्हणजे काय ? ती राखण्यासाठी काय काळजी घेतली पाहिजे ?**

उत्तर मतदाराने कोणत्या उमेदवारास मत दिले आहे याबाबत मतदाराव्यतिरिक्त अन्य कोणासही माहिती न होऊ देणे म्हणजे मतदानाची गोपनियता राखणे होय. मतदानाची गोपनियता राखण्यासाठी मतदान कक्ष योग्यरित्या व योग्य ठिकाणी स्थापित करणे, मतदान कक्षात पुरेसा उजेड असणे, मतदान कक्षाकडे मतदाराव्यतिरिक्त अन्य व्यक्तीस प्रवेश न देणे, मतदान करतेवेळी मतदार कोणास मत देत आहे हे दिसू नये याची व्यवस्था करणे अशी काळजी घेतली पाहिजे. तसेच मतदारास मतदान करण्यास परवानगी दिल्यानंतर तो / ती मतदान कक्षात ताबडतोब जाईल, पसंतीच्या उमेदवाराच्या समोर बटन दाबून मत नोंदविल व मतदान कक्षातून बाहेर पडून मतदान केंद्रामधून त्वरीत निघून जाईल यावर लक्ष ठेवावे.

( संदर्भ -नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद १५ )

**प्रश्न ४ मतदान कक्ष म्हणजे काय ?**

उत्तर मतदारास मत नोंदवण्यासाठी Ballot Unit ज्या ठिकाणी टेबलावर ठेवलेले असते व मतदानाची गुप्तता राखण्यासाठी त्याच्या सभोवती जो पुठ्ठयाचा कक्ष तयार केला जातो त्यास मतदान कक्ष म्हणतात.

**प्रश्न ५ मतदार नोंदवही कशी असते ? मतदार चिठ्ठी व मतदार नोंदवही यांचा काय संबंध आहे ?**

उत्तर मतदार नोंदवही (नमुना व्हीएम-१) ही शासकीय मुद्रणालयाकडून पुरविण्यात आलेल्या महत्वाच्या मतदान साहित्यापैकी एक असून या नोंदवहीत मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक, मतदाराने ओळखीसाठी सादर केलेल्या पुराव्याचा तपशील, मतदाराची सही अथवा अंगठयाची निशाणी हा तपशील नोंदविला जातो. मतदान अधिकारी क्रमांक २ हा मतदाराची या नोंदवही मध्ये नोंद घेऊन स्वाक्षरी घेतल्यानंतर या तपशिलाआधारे मतदार चिठ्ठी लिहून मतदारास देतो.

**प्रश्न ६ मतदार यादीची चिन्हांकित प्रत म्हणजे काय ? ती कोणाकडे असते ?**

उत्तर मतदारयादीची चिन्हांकित प्रत म्हणजे निवडणूक निर्णय अधिका-याच्या स्वाक्षरी शिक्क्यासह प्राप्त झालेली मतदार यादीची अशी प्रत ज्यामध्ये टपाली मतपत्रिका, इडीसी, वगळलेले मतदार किंवा मयत मतदार, स्थलांतरीत मतदार इ. नोंदी करुन मूळ यादी व पुरवणी मतदार यादी असेल.
( संदर्भ -नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद ८ )

## ६. मतदाराची ओळख पटविणे

**प्रश्न १ मतदाराकडे मतदान ओळखपत्र (EPIC) नसल्यास ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने कोणते पुरावे निश्चित केले आहेत ?**

उत्तर मतदाराकडे मतदार ओळखपत्र नसल्यास ओळख पटविण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या पुराव्यांची यादी प्रकरण २६ येथील परिशिष्ट §---- प्रमाणे आहे.
(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील परिपत्रक क्र. रानिआ/मनपा/२००५/प्र.क्र.१२/कार्या-५ दिनांक ०४/०४/२००५)

**प्रश्न २ ओळख पटविण्यासाठी मतदाराकडे कोणताही पुरावा नसला तरी मतदार यादीत नाव व फोटो असल्यामुळे मतदान करता येऊ शकेल काय ?**

उत्तर नाही. मतदाराकडे ओळख पटविण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या यादीपैकी किमान एक तरी पुरावा असणे आवश्यक आहे.
(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील परिपत्रक क्र. रानिआ/मनपा/२००५/प्र.क्र.१२/कार्या-५ दिनांक ०४/०४/२००५)

**प्रश्न ३ पडदानशीन महिलांची ओळख कशी पटविता येईल ?**

उत्तर पडदानशीन महिला ज्या भागामध्ये बहुसंख्येने असतील अशा भागांमध्ये शक्यतो महिला कर्मचा-याची मतदान अधिकारी क्रमांक ४ म्हणून नेमणूक केली जाते. पडदानशीन महिला मतदाराची ओळख पटवण्यामध्ये मतदान अधिकारी क्रमांक १ यांना सहाय्य करण्याची जबाबदारी अशा कर्मचा-यावर सोपविली जाते. ज्या ठिकाणी महिला कर्मचारी नियुक्त केलेल्या नसतील अशा ठिकाणी स्थानिक महिला कर्मचारी उदा. आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, अन्य महिला कर्मचारी अथवा स्थानिक महिला प्रतिनिधीची मदत घेतली जाते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ३२)

**प्रश्न ४ मतदान चिठ्ठी (Voter॰s Slip) म्हणजे काय ?**

उत्तर मतदाराची ओळख पटवून त्याची नोंद मतदार नोंदवहीत झाल्यानंतर मतदारास मतदानाची परवानगी (Ballot Command) देण्यासाठी जी चिठठी दिली जाते त्यास Voter॰s slip म्हणतात. Ballot Command देण्यापूर्वी मतदान अधिकारी क्रमांक ३ अशी चिठ्ठी परत घेवून जतन करून ठेवतात. या मतदानचिठ्ठीत मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक तसेच मतदार नोंदवहीतील अनुक्रमांक व मतदान अधिकारी यांची स्वाक्षरी असते.

## ७. मतदान केंद्रावरील विविध प्रसंग (Challenged Vote, अपंगाचा सोबती वगैरे)

**प्रश्न १ मतदाराच्या ओळखीबाबत आक्षेप कोण नोंदवू शकतो व असा आक्षेप आल्यास (Challenged Vote) नेमकी काय कार्यवाही करावी ?**

उत्तर मतदाराच्या ओळखीबाबतचा आक्षेप उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी किंवा उमेदवार अथवा निवडणूक प्रतिनिधी हजर असल्यास ते स्वत: नोंदवू शकतात. असा आक्षेप असल्यास विहित केलेली आक्षेप फी (रू.२/-) मतदान केंद्राध्यक्ष यांचेकडे जमा करावी लागते. आक्षेपासंदर्भातील कामकाज मतदान केंद्राध्यक्ष यांचेकडे वर्ग केले जाते व मतदान केंद्रात अन्य मतदारांची मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू ठेवली जाते. मतदान केंद्राध्यक्ष मतदारास तोतयेगिरी व त्या संदर्भातील प्रक्रियेबाबत माहिती देतो. त्यानंतर आक्षेपकास त्याच्या आक्षेपाच्या पृष्ठर्थ पुरावा सादर करण्याची सूचना दिली जाते. त्याचप्रमाणे मतदारास आपली ओळख सिध्द करण्याची संधी दिली जाते. आवश्यकतेनुसार संक्षिप्त चौकशी करून व उपलब्ध पुराव्याआधारे मतदान केंद्राध्यक्ष अशा आक्षेपाचा निर्णय घेतो. आक्षेप सिध्द झाल्यास आक्षेपकास आक्षेप फी परत मिळते आणि मतदारास पोलिसांच्या हवाली केले जाते. आक्षेप सिध्द न झाल्यास अशी रक्कम शासन जमा करण्यात येते आणि मतदारास मतदान करण्याची परवानगी दिली जाते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ३४)

**प्रश्न २ आक्षेप सिध्द न झाल्यामुळे जप्त झालेल्या रकमेचा हिशोब कसा द्यावा ?**

उत्तर आक्षेप धारकांनी भरलेली रु २ फी आक्षेप सिध्द न झाल्यास सरकार जमा केली जाते. नमुना ११ मधील ८ व्या स्तंभामध्ये मतदान केंद्राध्यक्ष रक्कम जप्त केल्याबददल आदेश करतील व पावती पुस्तकातील संबंधित स्थळप्रतीवर अनामत रक्कत भरणा-या व्यक्तीची सही किंवा अंगठा घेण्याऐवजी तेथे जप्त हा शब्द लिहून ती रक्कम असांविधिक लिफाफा क्र.६ मध्ये ठेवून संकलन केंद्रावर अन्य लिफाफ्यांसह परत केली जाते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ३४)

**प्रश्न ३ एखादा मतदार मतदान करून गेल्यानंतर त्याच अनुक्रमांकावरील त्याच नावाचा दुसरा मतदार मतदानासाठी आल्यास काय करावे ?**

उत्तर एखादा मतदार मतदान करून गेल्यानंतर त्याच अनुक्रमांकावरील त्याच नावाचा दुसरा मतदार मतदानासाठी आल्यास प्रदत्त मतदानाबाबतची कार्यवाही अनुसरावी. आलेल्या मतदाराची ओळख पटवून झाल्यानंतर अशा मतदारास मतदान केंद्राध्यक्षाकडे पाठवावे. मतदान केंद्राध्यक्ष यांनी प्रदत्त मतदानाबाबतच्या विहित नमुन्यात (व्हीएम-२) या मतदाराबाबतची आवश्यक माहिती नोंदवून मतदाराची स्वाक्षरी / अंगठयाची निशाणी घ्यावी. अशा मतदारास मतदान केंद्राध्यक्षाजवळील प्रदत्त मतपत्रिकांच्या गठ्ठयातील एक मतपत्रिका व बाण फुलीचा शिक्का मतदानासाठी उपलब्ध करून द्यावा. मतदाराने मतदान कक्षात जावून बाण फुलीच्या सहाय्याने अशा मतपत्रिकेवर मत नोंदवावे व मतपत्रिकेची घडी करून मतदान केंद्राध्यक्षाजवळील विहित केलेल्या सांविधिक लिफाफा क्रमांक ४ मध्ये ठेवावी. कोणत्याही परिस्थितीत प्रदत्त मतदान हे मतदान यंत्रावर नोंदविण्यात येवू नये.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४० आणि नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद १८)

**प्रश्न ४ प्रदत्त मत म्हणजे काय ? ते EVM वर नोंदविता येईल काय ?**

उत्तर एखादा मतदार मतदान करून गेल्यानंतर त्याच अनुक्रमांकावरील त्याच नावाचा दुसरा मतदार मतदानासाठी आल्यास ज्या विशिष्ट पध्दतीने मत नोंदविण्यात येते त्यास प्रदत्त मत असे म्हणतात. प्रदत्त मत EVM वर नोंदविता येत नाही. असे मत हे फक्त मतपत्रिकेव्दारेच नोंदवावे लागते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४० आणि नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद १८)

**प्रश्न ५ अंध, शारिरीकदृष्टया नि:समर्थ मतदारास मतदान करण्यास अन्य व्यक्ती मदत करू शकतात काय?**

उत्तर होय. १८ वर्षावरील सोबती, ज्याने त्या दिवशी अन्य मतदाराची सोबत केलेली नसेल व जो अशा मतदाराच्या वतीने दिलेले मत गोपनीय ठेवण्याबाबत प्रतिज्ञापत्र भरून देईल अशी व्यक्ती अंध, शारिरिकदृष्टया नि:समर्थ मतदारास मतदान करण्यात मदत करू शकते. मतदान केंद्राध्यक्ष अशा मतदारांची नोंद ही व्हीएम -५ या नमुन्यामध्ये ठेवतील.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ३८ आणि नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद १६)

**प्रश्न ६ मतदारयादीतील मतदार मतदानासाठी आल्यानंतर त्याच्या / तिच्या वयाबद्दल शंका आल्यास काय कार्यवाही करावी ?**

उत्तर मतदाराकडून वयाबाबतचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन भरून घेवून अशा मतदारास मतदान करू देता येईल. अशा मतदाराच्या वयाबाबत शहानिशा करण्याचे अधिकार मतदान केंद्राध्यक्ष यांना नसतात.

**प्रश्न ७ ओळख पटवून मतदानाची प्राथमिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर (मतदार नोंदवहीत नाव नोंदवून सही अथवा अंगठा लावल्यानंतर) मतदारास मत देण्याची इच्छा नसल्यास / नकार दिल्यास काय करावे ?**

उत्तर अशा प्रकरणी मतदार नोंदवही (नमुना व्हीएम-१) मध्ये "मतदानास नकार"अशी नोंद घ्यावी व त्यासमोर संबंधीत मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठ्याचा ठसा घेईल. त्यानंतर दिलेले Ballot Command रद्द करावे. यासाठी कंट्रोल युनिट बंद करून पुन्हा चालू करावे. झालेल्या मतदानाचा हिशोब तयार करताना सदर बाब विचारात घेण्यात यावी.

(संदर्भ- नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद १७)

**प्रश्न ८ नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणुकीत जेव्हा मतदारास एकापेक्षा जास्त मते देण्याचा अधिकार असतो, तेव्हा मतदार मतदान केंद्रावर एकापेक्षा जास्त वेळा येऊन मत देऊ शकतो काय ?**

उत्तर नाही. मतदारास एका खेपेमध्ये मतदान करता येईल.

**प्रश्न ९ NOTA (None Of The Above-यापैकी कोणीही नाही) म्हणजे काय? याचा वापर कसा करावा?**

उत्तर जेव्हा मतदारास निवडणुकीतील कोणत्याही उमेदवारास मत देण्याची इच्छा नसेल तर तो त्याच्या मतदानाचा हक्क कोणत्याही उमेदवाराला मतदान न करता गोपनीयतेने बजावू शकतो. तथापि, मतदान करावयाचे असते त्यावेळी Ballot Unit वरील शेवटचे NOTA (None Of The Above- यापैकी

कोणीही नाही) चे बटन दाबणे अपेक्षित असते. (संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र . रानिआ-२०१३/ प्र.क्र. ११/का.१२ ,दिनांक १२/११/२०१३)

**प्रश्न १० मतदान केंद्राध्यक्षाला मतदान कक्षात प्रवेश करण्याचा अधिकार आहे काय ? असल्यास कोणत्या परिस्थितीत ?**

उत्तर होय. मतदानयंत्रात बिघाडाबाबत तक्रार आल्यास मतदान कक्षात ठेवलेले मतदान यंत्र व्यवस्थितपणे चालू आहे किंवा नाही, अथवा मतदार मतदान यंत्रामध्ये गैरवाजवी फेरफार करीत आहे / व्यत्यय, अथवा खोडसाळपणा करुन मतदान कक्षामध्ये अवाजवी विलंब करीत असेल असा संशय आल्यास किंवा संशयास पुरेसे कारण असेल तर मतदार युनिटची तपासणी करण्याकरिता मतदान कक्षामध्ये प्रवेश करण्याचा अधिकार आहे. तथापि, मतदार मतदानासाठी मतदान कक्षात उपस्थित असेल व मत नोंदवित असेल अशा वेळी मतदान कक्षात केंद्राध्यक्ष प्रवेश करु शकत नाहीत. मतदान केंद्राध्यक्ष ज्या ज्या वेळी मतदान कक्षामध्ये प्रवेश करेल तेव्हा तो आपल्यासोबत मतदान प्रतिनिधींना त्यांची इच्छा असल्यास सोबत येण्याची अनुमती देईल.

(संदर्भ- नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद १९)

**प्रश्न ११ मतदान प्रक्रिया चालू असताना मतदार किंवा एखाद्या व्यक्तीने व्यत्यय आणल्यास मतदान केंद्राध्यक्षाने काय कार्यवाही करावी ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्षाने अशा व्यक्तीस सुरक्षा कर्मचा-याच्या ताब्यात द्यावे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २७)

**प्रश्न १२ मतदान प्रक्रियेदरम्यान नवीन मतदान यंत्र वापरावे लागल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती काय असते ?**

उत्तर मतदान प्रक्रियेदरम्यान नवीन मतदान यंत्र वापरावे लागल्यास अशा यंत्रावर उपस्थित मतदान प्रतिनिधींसमोर अभिरूप मतदान घेण्यात यावे. मतदान केंद्राध्यक्ष यांनी आवश्यक ते घोषणापत्र करून नवीन मतदान यंत्र वापरास घ्यावे. मतदान केंद्राध्यक्ष यांनी त्यांच्या दैनंदिनी मध्येही याबाबीची नोंद घ्यावी. मतदानानंतर दोन्ही मतदान यंत्रे सिलबंद करून संकलन कक्षात जमा करावीत.

**प्रश्न १३ मतदार यादीतील मुद्रणदोष किंवा छपाईतील अल्पशा चुकांबाबत मतदारांना मतदान करु दिले जाते का ?**

उत्तर होय. मात्र मतदानासाठी आलेला मतदार व यादीत नाव असलेला मतदार एकच असल्याची खात्री करून मतदान करू दिले जाते.

**प्रश्न १४ तोतया / बोगस मतदारांबाबत केंद्राध्यक्षांची कर्तव्ये व अधिकार काय आहेत ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्ष यांनी मतदान केंद्राबाहेरील बोर्डवर तोतयेगिरीबाबत इशारा देणारा फलक स्पष्टपणे दिसेल अशा पध्दतीने लावावा. निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून मयत, दुबार नोंद

व स्थलांतरीत मतदारांची यादी प्राप्त झाली असल्यास अशा मतदारांची ओळख पटविण्याबाबत जागरूक राहावे. मतदानासाठी मतदार आल्यास व त्याची ओळख न पटल्यास अथवा तोतया मतदाराबाबत मतदान प्रतिनिधींनी आक्षेप घेतला असेल तर संक्षिप्त चौकशी करुन मतदानास परवानगी किंवा मतदानास प्रतिबंध करण्याचा निर्णय केंद्राध्यक्षांनी घ्यावा. जर तोतया अथवा बोगस मतदार असल्याचे सिध्द झाले तर त्यास पोलिस कर्मचा-यांच्या ताब्यात देण्यात यावे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ३५)

**प्रश्न १५ मतदाराचे वयाविषयीचे प्रतिज्ञापत्र म्हणजे काय ?**

उत्तर मतदारयादीत नाव असून मतदानासाठी आलेल्या एखाद्या मतदाराच्या वयाविषयी शंका उपस्थित झाल्यास अशा मतदाराकडून विहित नमुन्यातील वयाविषयीचे प्रतिज्ञापत्र भरून घेतले जाते व मतदारास मतदान करू देण्यात येते. मतदार यादीत नाव असणे हा मतदानासाठी निर्णायक पुरावा असल्यामुळे मतदान केंद्राध्यक्ष यांनी वयाच्या पुराव्याविषयी अन्य कागदपत्रे मागविण्याची अथवा तपासण्याची आवश्यकता नसते.

**प्रश्न १६ मतदाराला मतदानापूर्वी कोणत्या बोटाला शाई लावली जाते ?**

उत्तर मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर मार्कर पेनव्दारे शाईची निशाणी (खूण) केली जाते.

मतदारास डाव्या हाताची तर्जनी नसल्यास अनुक्रमे बाजूच्या बोटास मार्कर पेनव्दारे शाईची निशाणी केली जाते. मतदारास डावा हात नसल्यास उजव्या हाताची तर्जनी व तीही नसल्यास क्रमाने बाजूच्या बोटावर व दोन्ही हातास बोटे नसल्यास डाव्या हाताच्या पेरास (हाताचा शेवटचा भाग) मार्कर पेनव्दारे शाईची निशाणी (खूण) केली जाते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ३५ (३) )

**प्रश्न १७ निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करुन लोकसेवकाने मतदान करण्याची कार्यपध्दती काय असते?**

उत्तर निवडणूक कामासाठी ज्या लोकसेवकांची निवडणूक निर्णय अधिकारी नेमणूक करतात तेव्हा ते लोकसेवक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये म्हणून ते लोकसेवक त्याच मतदारसंघातील असतील तर अशा कर्मचा-यांना इडीसी (इलेक्शन डयूटी सर्टिफिकेट) निर्गमित केली जाते. त्या प्रमाणपत्राव्दारे ज्या मतदान केंद्रावर संबंधितांची नेमणूक असेल त्या केंद्राध्यक्षांकडे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर चिन्हांकित मतदारयादीमध्ये शेवटच्या क्रमांकानंतर त्या मतदाराचे नांव नमूद करुन मतदाराची इडीसी अशी नोंद घेऊन मतदानाचा हक्क देण्यात येतो.

(संदर्भ- टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ११ (२) आणि नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद ११)

**प्रश्न १८ प्राधिकृत व्यक्तीद्वारे (Proxy) मतदान केले जाऊ शकते काय ?**

उत्तर भारत निवडणूक आयोगाकडून घेण्यात येणा-या निवडणुकांबाबत सेवा मतदारांबाबत त्यांनी प्राधिकृत केलेल्या बदली मतदाराकडून असे मतदान केले जाऊ शकते. मात्र नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुकीत अशी तरतूद नाही.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३)

**प्रश्न १९ मतदान प्रक्रिया केव्हा तहकूब केली जाऊ शकते ?**

उत्तर मतदान केंद्राच्या केंद्राध्यक्षांना पुढील कारणास्तव मतदान तहकूब करण्याचा अधिकार आहे.

१) पूर, प्रचंड हिमवर्षाव, प्रचंड वादळ तत्सम नैसर्गिक आपत्ती

२) मतदार यंत्र, मतदार यादीची अधिकृत प्रत आणि तत्सम मतदान सामुग्री न मिळणे, ती गहाळ होणे किंवा त्याला नुकसान पोहोचणे.

३) मतदान केंद्रावर शांतता भंग होऊन मतदान घेणे अशक्य झाल्यास

४) मतदान केंद्रावर जावयाच्या मार्गावर अडथळा निर्माण झाल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही गंभीर अडचणीमुळे मतदान पथक केंद्रावर पोहोचू न शकल्यास.

५) अन्य कोणतेही वाजवी कारण.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४६ (१) )

**प्रश्न २० सूक्ष्म निरीक्षक (Micro Observer) म्हणजे कोणते अधिकारी असतात ? त्यांचे अधिकार व कर्तव्ये कोणती ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणुकीत सुक्ष्म निरिक्षक नेमले जात नाहीत.

**प्रश्न २१ मतदानाची वेळ संपण्याचे वेळी मतदान केंद्रावर मतदारांची रांग असेल तर मतदान केंद्राध्यक्षाने कोणती कार्यपध्दती अवलंबावी ?**

उत्तर मतदानाची वेळ संपण्याचे वेळी मतदान केंद्राध्यक्षाने रांगेमध्ये उभ्या असलेल्या मतदारांना अनुक्रमांक लिहिलेल्या चिठ्ठया रांगेतील शेवटच्या मतदाराकडून सुरू करून पहिल्या मतदारापर्यंत वाटप कराव्यात आणि रांगेत असलेल्या सर्व मतदारांचे मतदान पूर्ण झाल्यानंतरच मतदान बंद करावे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४१ आणि नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद २० )

**प्रश्न २२ मतदानाची प्रक्रिया संपल्यानंतर मतदान यंत्राची नियंत्रण युनिट बंद करण्याची प्रक्रिया कशी असते ?**

उत्तर मतदान यंत्राच्या निकाल विभागातील एका कक्षामध्ये त्याच्या बाहय आवरणातील निळया रंगाच्या रबरी टोपीखाली क्लोज बटनाची तरतूद केलेली असते. मतदान संपल्यानंतर मतदान यंत्राच्या निकाल विभागातील क्लोज हे बटन दाबावे. बटन दाबल्यानंतर नियंत्रण युनिटच्या दर्शनी पटलावर मतदान

यंत्रामध्ये नोंदविलेल्या मतांची एकूण संख्या दिसेल. ती संख्या नमुना व्हीएम-१ च्या भाग १ च्या बाब क्र. ५ मध्ये तात्काळ नोंदवून घ्यावी. त्यानंतर नियंत्रण युनिटपासुन मतदान युनिट अलग करावे आणि नियंत्रण युनिटचा पॉवर स्वीच बंद करावा. क्लोज बटन दाबल्यानंतर व मतदान समाप्त झाल्यानंतर रबरी टोपी पुन्हा त्या जागी लावावी.

**प्रश्न २३ कोणत्याही कारणामुळे मतदान उशिरा सुरु झाले किंवा काही कालावधीकरिता थांबले असेल तर मतदानाची वेळ वाढवून दिली जाते का ?**

उत्तर नाही. तथापि, मतदान संपण्याचे वेळी रांगेत उभ्या असलेल्या सर्व मतदारांचे मत नोंदवून झाल्यानंतरच मतदान प्रक्रिया थांबविण्यात येते.

## ८. दर दोन तासाचे अहवाल

**प्रश्न १ मतदान केंद्रावर दर दोन तासात किती मतदारांनी (स्त्री / पुरुष) मतदान केले याची नेमकी माहिती कशी मिळते ?**

उत्तर झोनल अधिकारी त्यांच्या झोन मधील मतदान केंद्राना साधारणत: दर दोन तासांनी भेट देतात व झालेल्या मतदानाची आकडेवारी नोंदवून घेतात. अशी आकडेवारी ते निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवितात. मतदान केंद्रावरील कंट्रोल युनिट वरील total हे बटन दाबल्यास एकूण मतदानाचा आकडा कळतो. तसेच मतदान अधिकारी क्रमांक १ हे स्त्री पुरूष मतदारांची नोंद ठेवतात. त्यावरूनही मतदानाची आकडेवारी कळते.

**प्रश्न २ दर दोन तासानंतरच्या माहितीचा काय उपयोग होतो ?**

उत्तर अशा आकडेवारीवरून मतदान सुरळीत सुरू आहे किंवा कसे याबाबत माहिती मिळते. सदर माहिती राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयास देखील कळविली जाते व प्रसार माध्यमांना प्रसिध्दीसाठी उपलब्ध करुन दिली जाते.

**प्रश्न ३ दर दोन तासाचे अहवाल निवडणूक आयोगाला कसे पाठविले जातात ?**

उत्तर दर दोन तासाचे अहवाल निवडणूक आयोगाला दूरध्वनी, फॅक्स व ई-मेल व्दारे पाठविले जातात.

## ९. मतदान केंद्रावरील सुरक्षा व्यवस्था व प्रवेशावरील निर्बंध

**प्रश्न १ मतदान केंद्राची हद्द कोठेपर्यंत असते ?**

उत्तर मतदान केंद्राची हद्द १०० मिटरपर्यंत असते.

**प्रश्न २ प्रत्येक मतदान केंद्राबाहेर सुरक्षा व्यवस्था कशी असते ? सुरक्षा कर्मचा-याचे कर्तव्य काय असते?**

उत्तर मतदान केंद्राच्या वर्गवारीनुसार व एका इमारतीच्या परिसरातील मतदान केंद्रांच्या संख्येनुसार पोलीस कर्मचारी अथवा होमगार्ड कर्मचारी यांची सुरक्षा कर्मचारी म्हणून नेमणूक केली जाते. मतदान केंद्राबाहेरील मतदारांची रांग लावणे, मतदान केंद्राच्या हद्दीमध्ये शांतता व सुव्यवस्था राखणे, मतदान

केंद्राच्या बाहेर व आसपास उमेदवार किंवा त्यांच्या समर्थकांकडून गैरवर्तन केल्यास त्यांना दूर घालवून देणे किंवा त्यांचेविरुध्द गुन्हा नोंदविणे किंवा वेळप्रसंगी मतदान केंद्रामध्ये गैरवर्तणूक केल्यास मतदान केंद्राध्यक्षांनी दिलेल्या लेखी तक्रारीची नोंद घेऊन संबंधित मतदारावर गुन्हा नोंदविणे. थोडक्यात, मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मतदान केंद्राबाहेर कोणताही अनुचित प्रकार होऊ नये याची दक्षता घेणे ही सुरक्षा कर्मचा-याची कर्तव्ये आहेत.

**प्रश्न ३ मतदान केंद्रात मतदारा व्यतिरिक्त कोणास प्रवेश मिळू शकतो ?**

उत्तर मतदान केंद्रामध्ये मतदाराव्यतिरिक्त उमेदवार, उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी, अंध व शारिरिक दृष्टया नि:समर्थ मतदाराचे सोबती, मतदाराच्या कडेवरील मूल, निवडणूक कर्तव्यावर नियुक्त कर्मचारी, निवडणूक निरिक्षक, निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेले व्यक्ती व मतदाराची ओळख पटविण्यासाठी मतदान केंद्राध्यक्षाने बोलावलेली व्यक्ती यांना मतदान केंद्रात प्रवेश मिळू शकतो. या व्यतिरिक्त अन्य कोणालाही मतदान केंद्रामध्ये प्रवेश अनुज्ञेय नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ३०)

**प्रश्न ४ प्रसार माध्यमांचे प्रतिनिधीना मतदान केंद्रात प्रवेश आहे काय ? असल्यास त्याबाबत काय तरतुदी आहेत ?**

उत्तर निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेले प्रसार माध्यमांचे प्रतिनिधींना मतदान केंद्राध्यक्षांच्या परवानगीने मतदान केंद्रात प्रवेश मिळू शकतो. तथापि, अशा प्रतिनिधींना मतदान केंद्रात मतदार मतदान करत असतानाचे छायाचित्र घेता येत नाही. असे प्रतिनिधी केवळ मतदान केंद्राध्यक्षाकडून मतदानाबाबतची माहिती प्राप्त करून घेवू शकतात.

**प्रश्न ५ मतदान केंद्राचे आत Mobile Phone नेता येतो का ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी वगळता अन्य व्यक्तींना मतदान केंद्रात मोबाईल नेता येत नाही. मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांनी आपले मोबाईल Silent Mode वर ठेवणे आवश्यक आहे.

**प्रश्न ६ मतदान केंद्राचे आत प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी यांना छायाचित्र काढता येते का ?**

उत्तर अशा प्रतिनिधींना मतदान केंद्रात मतदार मतदान करत असतानाचे छयाचित्र घेता येत नाही. तथापि, मतदानासाठी मतदारांची लागलेली रांग व मतदार अधिकारी बैठक व्यवस्थेचे छायाचित्र काढता येते.

**प्रश्न ७ मतदान केंद्राचे आत प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी यांना VIDEO चित्रीकरण करता येईल का ?**

उत्तर अशा प्रतिनिधींना मतदान केंद्रात मतदार मतदान करत असतानाचे चलचित्र घेता येत नाही.
तथापि, मतदानासाठी मतदारांची लागलेली रांग व मतदान प्रक्रियेचे चलचित्र काढता येते.

## १०. मतदारांची कर्तव्ये

**प्रश्न १ मतदानाच्या दिवशी मतदाराचे काय कर्तव्य असते ?**

उत्तर प्रत्येक मतदाराने निर्भयपणे आपल्या मतदानाच्या हक्काचा वापर करणे, मतदानाची गोपनियता राखणे व कोणत्याही आमिषास बळी न पडणे ही मतदारांची कर्तव्ये आहेत.

**प्रश्न २ मतदाराला मतदान करतांनाची सेल्फि (SELFIE) घेता येईल का ?**

उत्तर मतदानाच्या गोपनियतेचा भंग होत असल्यामुळे व मतदारास मोबाईल अथवा अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरण मतदान केंद्रात नेता येत नसल्यामुळे मतदाराला मतदान करतानाची SELFIE घेता येत नाही.

## ११. उमेदवार व राजकीय पक्षांवरील निर्बंध

**प्रश्न १ मतदान केंद्रावर पोहोचण्यासाठी मतदारांकरिता राजकीय पक्षांना वाहनांची व्यवस्था करता येते काय?**

उत्तर नाही. अशी व्यवस्था करणे बेकायदेशीर आहे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२ (५))

**प्रश्न २ मतदारांनी स्वत:हून अशी व्यवस्था करण्याबाबत काय तरतुदी आहेत?**

उत्तर मतदारांना स्वतःहून कुटुंबातील मतदारांसाठी अशी वाहनांची व्यवस्था करता येईल. मात्र असे वाहन २०० मीटरच्या बाहेर उभे करुन मतदानाचे कर्तव्य संपल्यावर लगेचच ते वाहन परत घेऊन जावे.

**प्रश्न ३ उमेदवार व त्यांचे निवडणूक प्रतिनिधी / समर्थक यांना मतदानाच्या दिवशी किती वाहने निवडणूक कामासाठी वापरता येतात ?**

उत्तर उमेदवार यांना एक वाहन व त्यांचे निवडणूक प्रतिनिधी / समर्थक यांना एक वाहन अशी एकूण दोन वाहने वापरता येतात. तथापि, उमेदवारांच्या अनुपस्थितीत उमेदवाराचे वाहन अन्य समर्थकांना वापरता येत नाही.

**प्रश्न ४ उमेदवारांना मतदानाचे दिवशी प्रचार करण्याची मुभा आहे का ? त्यांचेवर काही निर्बंध लादलेले आहेत का ?**

उत्तर नाही. मतदानाच्या दिवशी २०० मीटरच्या पलिकडे केवळ मतदारांना अनौपचारीक ओळखचिठ्ठी वाटपासाठी उमेदवाराचा निवडणूक मंडप असतो. त्यामध्ये केवळ एक टेबल व दोन खुर्च्या असतात. ऊन पावसापासून संरक्षणासाठी संरक्षण छत्री किंवा ताडपत्री टाकावी. उमेदवारास मतदानाचे दिवशी जाहीर प्रचार करता येत नाही.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २३)

## १२. राजकीय पक्षांचे मतदार सहाय्यता केंद्र (बूथ)

**प्रश्न १ राजकीय पक्षांना मतदारांना सहाय्य करण्यासाठी किती बूथ लावता येतात व त्याबाबतच्या तरतुदी काय आहेत ?**

उत्तर मतदान केंद्राबाहेर दोनशे मीटर अंतर सोडून मतदारांना सहाय्य करण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रासाठी एक या प्रमाणे बूथ लावता येतात. त्यामध्ये मतदारांना केवळ औपचारिकरित्या ओळखचिठ्ठी वाटपाचे काम केले जाते. अशा बूथवर केवळ एक टेबल व दोन खुर्च्या आणि छतासाठी ताडपत्री अथवा छोटा मंडप लावता येतो. अशा बूथमुळे रहदारीस व वाहतुकीस अडथळा येता कामा नये. तथापि, अशा बुथची उभारणी करण्यापूर्वी संबंधित नगरपरिषद अथवा नगरपंचायतीची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रश्न २ मतदार सहाय्यता केंद्राबाबतच्या तरतुदींचे पालन होत नसल्यास कारवाईचे अधिकार कोणास आहेत?**

उत्तर अशा तरतुदीचे पालन होत नसेल तर प्रभाग दंडाधिकारी किंवा झोनल अधिकारी, मतदान केंद्रावरील पोलिस कर्मचारी यांना कार्यवाहीचे अधिकार आहेत.

## १३. केंद्राध्यक्षांची घोषणापत्रे व विविध अभिलेख

**प्रश्न १ मतदान सुरु होण्यापासून ते संपेपर्यंत मतदान केंद्राध्यक्षाला किती व कोणकोणती घोषणापत्रे स्वाक्षरीत करावी लागतात ?**

उत्तर मतदान सुरु होण्यापासून ते संपेपर्यंत मतदान केंद्राध्यक्षांना चार घोषणापत्रे स्वाक्षरीत करावी लागतात.

१) मतदानास प्रारंभ होण्यापूर्वीचे घोषणापत्र.

२) दुसरे मतदानयंत्र उपयोगामध्ये आणल्यास त्यावेळी केंद्राध्यक्षांनी करावयाचे घोषणापत्र.

३) मतदान समाप्तीनंतर करावयाचे घोषणापत्र.

४) मतदानयंत्र मोहोरबंद केल्यानंतर करावयाचे घोषणापत्र.

**प्रश्न २ घोषणापत्राशिवाय केंद्राध्यक्षांनी आणखी कोणते अभिलेखे ठेवणे अपेक्षित आहे ?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्षांनी घोषणापत्राशिवाय केंद्राध्यक्षांची दैनंदिनी, मतदानाबाबतचा हिशेब, अंध व शारीरिकदृष्टया नि:समर्थ व्यक्तींची प्रतिज्ञापत्रे व यादी, मतदाराची वयाबाबतची प्रतिज्ञापत्रे व यादी, कागदी मोहरांचा हिशोब इ. सह सांविधिक व असांविधिक लिफाफे इ. अभिलेखे ठेवणे अपेक्षित आहे.

**प्रश्न ३ मतदान केंद्राध्यक्षाला मतदानाच्या दिवशीची दैनंदिनी लिहिणे आवश्यक आहे का ? त्याचे काय महत्व आहे ?**

उत्तर होय. मतदान केंद्राध्यक्षाला मतदानाच्या दिवशीची दैनंदिनी लिहिणे आवश्यक आहे. अशा दैनंदिनीत दिवसभराच्या नोंदी त्या जसजशा घडतील त्याप्रमाणे व त्याचवेळी नोंदविणे आवश्यक असते. मतदान केंद्रावरील मतदान सुरळीतपणे पार पडल्याची खात्री करण्यासाठी तसेच प्रकरणपरत्वे फेरमतदानाचा

निर्णय घेण्यासाठी दैनंदिनी हा महत्वाचा पुरावा मानला जातो. प्रत्येक दैनंदिनीस छापील अनुक्रमांक दिलेले असतात व दैनंदिनी व्दिप्रतीत ठेवण्याच्या सूचना आहेत.

## १४. मतदानानंतर नोंदविलेल्या मतदानाचा हिशोब

**प्रश्न १ मतदानानंतर नोंदविलेल्या मतांचा हिशोब कसा काढला जातो ?**

उत्तर मतदान केंद्रावरील मतदार नोंदवही (नमुना व्हीएम-१) आणि Control Unit वरील नोंदी, मतदान केंद्रावर EDC व्दारे झालेले मतदान, एखाद्या मतदाराने मत नोंदविण्यास दिलेला नकार, केंद्रावर झालेले प्रदत्त मतदान इ. आधारे मतदान यंत्रात नोंदविलेल्या मतांचा हिशोब काढला जातो. असा हिशोब विहित नमुना व्हीएम - ३ मध्ये नोंदविला जातो.

**प्रश्न २ झालेल्या मतदानाची आकडेवारी मतदान प्रतिनिधींना देणे बंधनकारक आहे काय ? असल्यास ती कोणत्या नमुन्यात दिली जाते ?**

उत्तर होय. मतदानानंतर झालेल्या मतदानाची आकडेवारी मतदान प्रतिनिधींना उपलब्ध करून देणे बंधनकारक असून ही माहिती नोंदविलेल्या मताच्या हिशेबाच्या विहित नमुन्यात (नमुना व्हीएम-३) दिली जाते.

( संदर्भ -नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद २१ (२) )

**प्रश्न ३ मतांचा हिशेब असलेल्या नमुन्यावर मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी घेतली जाते का ?**

उत्तर होय. मतांच्या हिशेबाच्या नमुन्यावर मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी घेतली जाते.

## १५. मतदान संपल्यानंतर अभिलेखे सील करणे व अहवाल

**प्रश्न १ मतदानानंतर मतदान केंद्राध्यक्षांनी नेमके कोणकोणते अभिलेख कोणत्या लिफाफ्यात सिलबंद करणे अपेक्षित आहे ? त्यांची वर्गवारी कशी केली जाते ?**

उत्तर मतदानानंतर मतदान केंद्राध्यक्षांनी सर्व अभिलेख साधारण चार पाकिटामध्ये / लिफाफ्यामध्ये सिलबंद करणे अपेक्षीत आहे.

१) सांविधिक लिफाफे

२) असांविधिक लिफाफे

३) तिसरे पाकिट

४) चौथे पाकिट (इतर सर्व साहित्यासाठी )

अ) सांविधिक लिफाफे § (पहिले पाकिट)

१) मतदारयादीची चिन्हांकित प्रत असलेला मोहोरबंद लिफाफा.

२) मतदार नोंदवही असलेला मोहोरबंद लिफाफा

३) मतदार चिठ्ठ्या असलेला मोहोरबंद लिफाफा.

४) वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका आणि नमुना व्हीएम -२ मध्ये प्रदत्त मतांची यादी

५) वापर करण्यात न आलेल्या प्रदत्त मतपत्रिका असलेला मोहोरबंद लिफाफा.

ब) असांविधिक लिफाफे § दुसरे पाकिट

१) मतदार यादीची प्रत किंवा प्रती (चिन्हांकीत मतदार यादी वगळून)

२) नमुना ९(१) मधील मतदान प्रतिनीधीची नेमणूकपत्रे असलेला लिफाफा.

३) प्रपत्र पीबी-३ मधील निवडणूक कार्य प्रमाणपत्र असलेला लिफाफा.

४) नमुना ११ मधील आक्षेपित मतांची यादी ठेवलेला लिफाफा.

५) नमुना ११(अ-१) मधील अंध व विकलांग मतदाराची यादी आणि त्यांच्या सहका-याचे घोषणापत्रा असलेले लिफाफा.

६) मतदाराकडून त्याच्या वयाबाबत घेतलेली प्रतिज्ञापत्रे व अशा मतदारांची यादी

७) आक्षेपित मताबाबतचे पावती पुस्तक आणि काही रोकड असल्यास ती ठेवलेला लिफाफा.

८) न वापरलेल्या व खराब झालेल्या कागदी मोहरा ठेवलेला लिफाफा.

९) न वापरलेल्या मतदार चिठ्ठया ठेवलेला लिफाफा.

१०) न वापरलेल्या व खराब झालेल्या विशेष खूण चिठ्ठी लिफाफा.

११) न वापरलेल्या व खराब झालेल्या पट्टीमोहर ठेवलेला लिफाफा

क) तिसरे पाकिट

१) मतदान केंद्राध्यक्षांची निर्देश पुस्तिका.

२) इव्हीएमची नियम पुस्तिका.

३) मार्कर पेन

४) शाईचे पॅड

५) रबरी शिक्का, धातूचे सिल, पक्की शाई ठेवण्याचा कप.

ड) चौथे पाकिट § इतर काही बाबी शिल्लक असल्यास सर्व वस्तू चौथ्या पाकिटामध्ये ठेवाव्यात..

याशिवाय मतपत्रीकेच्या हिशेबाचा नमुना ठेवण्याचा लिफाफा, मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी ठेवण्याचा लिफाफा व मतदान केंद्राध्यक्षाची घोषणापत्रे ठेवण्याचा लिफाफा आणि मतदानाची आकडेवारी दर्शविणारा लिफाफा देखील ठेवणे आवश्यक असते.

**प्रश्न २ संविधिक व असंविधिक लिफाफे कोणते ?**

उत्तर प्रश्न १ च्या उत्तरात नमूद केल्याप्रमाणे.

**प्रश्न ३ निवडणूक निर्णय अधिकारी यांना मतदान सुरु होऊन संपेपर्यंत कोणकोणते अहवाल सादर करणे आवश्यक आहे ? त्यांचे नमुने व टप्पे कसे आहेत ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांना मतदान सुरु होऊन संपेपर्यंत खालीलप्रमाणे अहवाल सादर करावे लागतात :-

१) अभिरूप मतदान घेतल्याबाबतचा अहवाल.

२) मतदान सुरु झाल्याबाबतचा पहिला अहवाल. (मतदान सुरु झाल्यानंतर ३० मिनिटात)

३) दर दोन तासाचे मतदानाचे आकडेवारी दर्शविणारे अहवाल.

४) कायदा व सुव्यवस्थेबाबतचा अहवाल.

५) आवश्यकतेप्रमाणे मतदान बंद किंवा तहकूब करण्याचा अहवाल.

६) मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडल्याचा अहवाल (मतदान संपल्यानंतर ३० मिनिटात)

७) मतदानाबाबतच्या अंतिम आकडेवारीचा अहवाल.

**प्रश्न ४ मतदान संपल्यावर मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी कोणकोणत्या ठिकाणी घेतली जाते ?**

उत्तर मतदान समाप्तीचे घोषणापत्र, नमुना व्हीएम -३ मधील नोंदविलेल्या मतांचा हिशेब आणि मतदान यंत्रे सिलबंद करताना त्याच्या पत्ता खुणचिठ्ठीवर मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी घेतली जाते.

## १६. <u>मतदान साहित्य तपासून घेणे</u>

**प्रश्न १ निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संकलन केंद्रावर कोणकोणते अभिलेखे व निवडणूक साहित्य प्राप्त करून घेणे आवश्यक असते ?**

उत्तर मतदानासाठी वापरलेले मतदान यंत्र, नोंदविलेल्या मतांचा हिशेब, मतदान केंद्राध्यक्षांची दैनंदिनी व घोषणापत्रे असलेला लिफाफा, सर्व सांविधिक व असांविधिक लिफाफे, मतदानासाठी पथकास उपलब्ध करून दिलेल्या साहित्यापैकी शिल्लक साहित्य इ. संकलन केंद्रावर प्राप्त करून घेणे आवश्यक असते.

**प्रश्न २ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया व्यविस्थत पार पडल्यामुळे काही अहवाल निरंक असल्यास असे अहवाल संकलन केंद्रावर सादर करण्याची आवश्यकता आहे काय ?**

उत्तर कोणताही अहवाल निरंक असला तरीही तो संकलन केंद्रावर सादर करणे आवश्यक असते. असा निरंक अहवाल सादर केला न गेल्यास अशा मतदान केंद्राचा अहवाल अप्राप्त समजला जाऊ शकतो.

## १७. मतदान साहित्य संकलन केंद्र

**प्रश्न १ मतदान साहित्य संकलन केंद्र म्हणजे काय ?**

उत्तर ज्या ठिकाणी मतदानानंतर वापरलेली मतदान यंत्रे, सांविधिक व असांविधिक लिफाफे, अन्य निवडणूक विषयक अहवाल आणि मतदान पथकाकडील मतदान साहित्य स्विकारले जाते अशा जागेस मतदान साहित्य संकलन केंद्र म्हणतात.

**प्रश्न २ मतदान साहित्य संकलन केंद्र कोण निश्चित करतो ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी आवश्यकतेनुसार जागेची पोलीस अधिका-यांसह स्थळ पाहणी करून मतदान साहित्य संकलन केंद्र निश्चित करतात. अशा जागेचा अहवाल जिल्हा निवडणूक अधिकारी यांना माहितीस्तव पाठविला जातो. तथापि, संकलन केंद्र निश्चित करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या पूर्व परवानगीची आवश्यकता नसते.

**प्रश्न ३ मतदान साहित्य संकलन केंद्र निश्चित करत असताना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कोणती काळजी घ्यावी ?**

उत्तर मतदानानंतर वापरलेली मतदान यंत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी निश्चित केलेला सुरक्षा कक्ष हा संकलन केंद्राच्या आवारात अथवा जवळपास असावा. विजेची व पर्यायी विद्युत व्यवस्था उपलब्ध असावी. संकलन केंद्रावर स्विकृती कक्ष आणि मंडप टाकण्यासाठी पुरेशी मोकळी जागा असावी. संकलन केंद्राबाहेर पार्कींगसाठी मुबलक जागा उपलब्ध असावी. पावसाळी दिवस असल्यास शक्यतो बंदिस्त हॉल उपलब्ध असावा. तसेच सुरक्षेच्या दृष्टीकोनातून जागा सुयोग्य असावी, ही काळजी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घ्यावी.

**प्रश्न ४ मतदान साहित्य संकलन केंद्राच्या निवडीबाबत राज्य निवडणूक आयोग यांच्या काही निश्चित सूचना आहेत काय ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाच्या या संदर्भात काही निश्चित सूचना नाहीत.

**प्रश्न ५ मतदान साहित्य संकलन केंद्रास जिल्हाधिकारी किंवा जिल्हा निवडणूक अधिका-याची मंजूरी आवश्यक आहे काय ?**

उत्तर नाही. तथापि, वस्तुस्थिती दर्शक सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना माहितीस्तव सादर करणे आवश्यक असते.

**प्रश्न ६ मतदान साहित्य संकलन केंद्राची रचना व कार्यपध्दती कशी असते ?**

उत्तर मतदानानंतर सिलबंद मतदान यंत्रे व सोबतचे लिफाफे स्विकारण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन केलेला असतो. सांविधिक व असांविधिक लिफाफे स्विकारण्यासाठी वेगवेगळे कक्ष, मतदान पथकाकडील उर्वरित साहित्य स्विकारण्यासाठी कक्ष, मतदानाची आकडेवारी संकलन करण्यासाठी संगणकासह सुसज्ज कक्ष, कर्मचा-यांचे मानधन, अभिलेख व त्याविषयीच्या तक्रारी हाताळण्यासाठी कक्ष, उदघोषणा कक्ष स्थापन केलेले असतात. मतदान केंद्रांच्या संख्येनुसार / झोनच्या संख्येनुसार या कक्षांची संख्या

निश्चित केली जाते. मतदान पथक संकलन केंद्रावर पोहोचल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम सिलबंद मतदान यंत्र व झालेल्या मतदानाची आकडेवारी विहित नमुन्यात सादर करण्याच्या सूचना दिल्या जातात. त्यानंतर पथक प्रमुख मतदान केंद्राध्यक्ष संकलन केंद्रावरील अन्य काऊंटरवर आपले साहित्य जमा करून विहित पोचपावतीवर संकलन केंद्रातील प्रभारी कर्मचा-याची स्वाक्षरी घेतात. शेवटी सर्व साहित्य जमा करून झाल्यानंतर विहित पोच पावती झोनल अधिकारी यांचे कडे जमा केली जाते व झोनल अधिकारी सर्व साहित्य व अहवाल प्राप्त झाल्याची खात्री करून मतदान पथकास निवडणूक कर्तव्यातून कार्यमुक्त करतात. त्याचवेळी मतदान केंद्राध्यक्ष सुरक्षा कर्मचा-यास कार्यमुक्त करतात.

**प्रश्न ७ मतदान साहित्य संकलन केंद्रावरील साहित्याचे वर्गीकरण सर्वसाधारणपणे कसे केले जाते ?**

उत्तर मतदान संकलन केंद्रावर मतदान यंत्र व अहवाल, सांविधिक व असांविधिक लिफाफे हे महत्वाचे साहित्य आणि मतदान केंद्रावरील अन्य सर्व साहित्य हे कमी महत्वाचे साहित्य असे वर्गीकरण केले जाते.

**प्रश्न ८ मतदान साहित्य संकलन केंद्रावर EVM सोबत कोणते मोहोरबंद लिफाफे सादर करावयाचे असतात ?**

उत्तर संकलन केंद्रावर EVM सोबत नोंदविलेल्या मतांचा हिशेबाचा लिफाफा, मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी आणि मतदान केंद्राध्यक्षाच्या घोषणापत्रांचा लिफाफा सादर करावयाचा असतो.

**प्रश्न ९ मतदानयंत्र व इतर सर्व साहित्य स्विकारल्यानंतर एकाच कक्षामध्ये ठेवले जाते काय ?**

उत्तर नाही. मतदानयंत्र सोबतच्या अहवालासह सुरक्षा कक्षात ठेवले जातात. तर सांविधिक आणि असांविधिक लिफाफे, कोषागारात ठेवले जातात. अन्य साहित्य निवडणूक शाखेतील कक्षात ठेवले जाते.

**प्रश्न १० साहित्य संकलनानंतर बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट कोठे ठेवले जातात ?**

उत्तर स्वतंत्रपणे विशेष सुरक्षा कक्षात ठेवले जातात.

**प्रश्न ११ संकलनानंतर सांविधिक व असांविधिक लिफाफे कोठे ठेवले जातात ?**

उत्तर सांविधिक व असांविधिक लिफाफे लोखंडी ट्रंकमध्ये भरून व सिलबंद करून कोषागारात सुरक्षित ठेवावयाचे असतात.

**प्रश्न १२ मतदान साहित्य संकलन कक्षाची जबाबदारी कोणाकडे असते ?**

उत्तर सर्वसाधारणपणे तहसिलदार / नायब तहसिलदार दर्जाच्या अधिका-याकडे संकलन कक्षाची जबाबदारी सोपविली जाते. तथापि, अंतीम जबाबदारी निवडणूक निर्णय अधिकारी यांची असते.

**प्रश्न १३ मतदान साहित्य संकलन कक्षामध्ये साहित्य स्विकारण्यासाठी सर्वसाधारण किती टीमची नियुक्ती केली जाते ?**

उत्तर मतदान केंद्रांच्या संख्येनुरूप टीमची संख्या ठरते. सर्वसाधारणपणे ४० ते ५० मतदान केंद्रांसाठी एक टीम याप्रमाणे संपूर्ण मतदारसंघातील मतदान केंद्रांची संख्या विचारात घेवून टीम नियुक्त केल्या जातात.

**प्रश्न १४ झालेल्या मतदानाची अंतिम आकडेवारी संकलित करण्यासाठी वेगळी व्यवस्था केली जाते काय ?**

उत्तर होय. मतदानाची अंतिम आकडेवारी संकलित करण्यासाठी संगणकासह सुसज्ज कक्षाची व्यवस्था केली जाते.

**प्रश्न १५ संकलनानंतर केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीची छाननी निवडणूक निर्णय अधिका-यांमार्फत केली जाते काय ? त्याचे काय महत्व असते ?**

उत्तर होय. संकलनानंतर मतदान केंद्राध्यक्षांच्या सर्व दैनंदिनींची छाननी निवडणूक निर्णय अधिका-यामार्फत केली जाते. मतदान सुरळीतपणे पार पडले किंवा कसे आणि एखाद्या मतदान केंद्रावर फेरमतदान घेणे आवश्यक आहे किंवा कसे याचा निर्णय घेण्यासाठी दैनंदिनीची छाननी करणे आवश्यक असते.

## १८. <u>मतदान यंत्रे सुरक्षा कक्षात ठेवणे</u>

**प्रश्न १ मतदान यंत्र सुरक्षा कक्षात ठेवल्यानंतर सुरक्षा कक्षास उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे सील लावता येते काय ?**

उत्तर होय. उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी सुरक्षा कक्षास त्यांचे सिल लावू शकतात.

**प्रश्न २ मतदान यंत्रे सुरक्षा कक्षात ठेवताना, सुरक्षा कक्ष सील करताना अथवा पुन्हा उघडताना उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात काय ?**

उत्तर होय. मतदान यंत्रे सुरक्षा कक्षात ठेवताना, सुरक्षा कक्ष सिलबंद करताना अथवा पुन्हा उघडताना उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी याबाबत उमेदवारांना लेखी कळविणे आवश्यक असते.

**प्रश्न ३ सुरक्षा कक्षास कशा स्वरुपाचा बंदोबस्त दिला जातो ?**

उत्तर सर्वसाधारणपणे सुरक्षा कक्षास व्दिस्तरीय बंदोबस्त दिला जातो. बाहेरील बाजूस (Outer Corden) स्थानिक हत्यारी पोलीस आणि आतील बाजूस (Inner Corden) विशेष हत्यारी सुरक्षाबल यांचा उपलब्धतेनुसार बंदोबस्त दिला जातो. सुरक्षा कक्षाचे प्रभारी सर्वसाधारपणे पोलीस निरिक्षक दर्जाचे अधिकारी असतात. सुरक्षा कक्षाचे ठिकाणी CC Camera / Video Camera, अग्निशमन यंत्रणा इ. व्यवस्था केली जाते.

## १९. फेरमतदान

**प्रश्न १ फेरमतदान म्हणजे काय ?**

उत्तर मतदानादरम्यान मतदान केंद्रावर घडलेल्या अनियमिततेमुळे त्याच मतदान केंद्रावर पुन्हा मतदान घेणे म्हणजे फेरमतदान होय.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४८)

**प्रश्न २ फेरमतदान कोणत्या परिस्थितीत घेतले जाते ?**

उत्तर मतदान केंद्रावरील मतदान यंत्र पळवून नेणे, बळजबरी करून मतदान यंत्रात मतदान नोंदविणे, मतदान यंत्र नष्ट करणे आणि मतदान केंद्रावरील कार्यपध्दतीत जिच्यामुळे मतदानावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असेल अशी कोणतीही चूक किंवा नियमबाह्य गोष्ट घडली असेल तर अशा कारणांमुळे फेरमतदान घेतले जाते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४८(१))

**प्रश्न ३ फेरमतदान घ्यावयाचे असेल तर त्याबाबतची कार्यपध्दती काय आहे ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी हे महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४८(१) मध्ये नमूद केलेल्या कारणांबाबत सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी यांचेमार्फत राज्य निवडणूक आयोगास सादर करतील. त्यानंतर आयोगाने मान्यता दिल्यानंतर संबंधित मतदान केंद्रावरील मतदान हे निरर्थक असल्याचे जिल्हाधिकारी जाहिर करतात आणि नव्याने मतदान घेण्यासाठी दिवस व वेळ निश्चित करतात. त्यानुसार फेरमतदान हे नियमित मतदानाप्रमाणेच घेतले जाते. तथापि, अशा वेळी डाव्या हाताच्या तर्जनी ऐवजी निवडणूक आयोग ठरवून देईल अशा अन्य बोटावर मार्कर पेनने शाईची निशाणी केली जाते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४८ (२)(३))

**प्रश्न ४ फेरमतदानासाठी राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घ्यावी लागते काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४८ (२) आणि राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी/१०९४/२४९/९४ दिनांक २९/११/१९९४)

**प्रश्न ५ फेरमतदान हे संपूर्ण मतदारसंघासाठी असते काय ?**

उत्तर नाही. अनियमितता घडलेल्या काही विशिष्ट मतदान केंद्रासाठीच फेरमतदान घेतले जाते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४८)

**प्रश्न ६ नगरपरिषद अथवा नगरपंचायतीचे निवडणूक निर्णय अधिकारी हे राज्य निवडणूक आयोगाकडे स्वतः अहवाल पाठवू शकतात काय ?**

उत्तर नाही. निवडणूक निर्णय अधिकारी हे जिल्हाधिकारी यांचेमार्फत राज्य निवडणूक आयोगाकडे अहवाल पाठवतील.

**प्रश्न ८ फेरमतदानाच्या प्रक्रियेमध्ये जिल्हाधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदारी काय ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४८(१) मध्ये नमूद केलेल्या कारणांबाबत सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी यांचेमार्फत राज्य निवडणूक आयोगास सादर केला जातो. त्यानंतर आयोगाने मान्यता दिल्यानंतर संबंधित मतदान केंद्रावरील मतदान हे निरर्थक असल्याचे जिल्हाधिकारी जाहिर करतात आणि नव्याने मतदान घेण्यासाठी दिवस व वेळ निश्चित करतात. अशा फेरमतदानासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देणे आणि फेरमतदान सुरळीत पार पडेल यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे ही जिल्हाधिकारी यांची जबाबदारी असते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४८)

**प्रश्न ९ फेरमतदान हे मूळ मतदानाच्या दिवसानंतर किती दिवसांनी घ्यावे लागते ?**

उत्तर फेरमतदान हे मूळ मतदानाच्या दिवसानंतर एक दिवस सोडून तथापि, मतमोजणीपूर्वी घेणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४८(२)(a))

**प्रश्न १० फेरमतदान प्रक्रियेमध्ये संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांची जबाबदारी काय ?**

उत्तर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ व त्या अन्वये केलेले कोणतेही नियम किंवा आदेश ज्याप्रमाणे मूळ मतदानास लागू होतात त्याप्रमाणे ते फेरमतदानास ही लागू होत असल्यामुळे असे नव्याने घेतलेले मतदान सुरळीत पार पडेल यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे ही निवडणूक निर्णय अधिकारी यांची जबाबदारी असते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४८(३))

**प्रश्न ११ फेरमतदान घेताना काय खबरदारी घ्यावी ?**

उत्तर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ व त्या अन्वये केलेले कोणतेही नियम किंवा आदेश ज्याप्रमाणे मूळ मतदानास लागू होतात त्याप्रमाणे ते फेरमतदानास ही लागू होतील याची दक्षता घेणे. उपद्रवी मतदान केंद्रांवर पुरेसा पोलीस बंदोबस्त देणे, पोलीसांची गस्त वाढविणे, मतदान केंद्रावर अनुभवी, सक्षम मतदान कर्मचारी नियुक्त करणे, फेरमतदानाबाबत संबंधित मतदान क्षेत्रात पुरेशी प्रसिध्दी देणे इ. खबरदारी घ्यावी.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ४८(३))

**प्रश्न १२  फेरमतदान घेण्यासाठी निवडणूक निरीक्षक यांचा अभिप्राय आवश्यक आहे काय ?**

उत्तर  राज्य निवडणूक आयोगाच्या प्रचलित सूचनांनुसार फेरमतदानासाठी निवडणूक निरिक्षक यांचा अभिप्राय आवश्यक नाही.

# प्रकरण १९.
# मतमोजणी
# (Counting)

## १. बिनविरोध उमेदवार घोषित करणे

**प्रश्न १ उमेदवाराची निवड बिनविरोध झाली असल्यास ती केव्हा जाहीर केली जाते ?**

उत्तर उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिनांकास दुपारी ३.०० वा. नंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून उमेदवाराची निवड बिनविरोध झाली असल्याचे जाहिर केले जाते. तथापि, उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतर एकच उमेदवार शिल्लक राहील्यास त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगाला सादर करण्यात येवून आयोगाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी अशी घोषणा करतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २४ आणि राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२००४/ प्र.क्र.३७/ का.५, दिनांक २३ डिसेंबर २००४)

## २. मतमोजणीची तारीख, ठिकाण व वेळ निश्चिती

**प्रश्न १ मतमोजणी कोणत्या तारखेस, कोणत्या ठिकाणी व वेळी होईल हे उमेदवारास किती दिवस आधी कळविणे आवश्यक आहे ?**

उत्तर मतमोजणीचा दिवस, ठिकाण आणि वेळ याबाबत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास किमान ३ दिवस आधी लेखी स्वरुपात कळविणे आवश्यक आहे.

**प्रश्न २ मतमोजणी केंद्र ठरविण्याचे निकष काय आहेत ?**

उत्तर मतमोजणी केंद्र पक्क्या इमारतीत असावे. मतमोजणी केंद्रात मतमोजणीसाठी जेवढे टेबल लावावयाचे आहेत त्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध असावी. मतदानानंतर सिलबंद मतदान यंत्रे ज्या सुरक्षा कक्षात ठेवली असतील ती मतमोजणीसाठी मतमोजणी टेबलपर्यंत आणताना पुरेशी सुरक्षितता असावी. मतमोजणी केंद्राबाहेर पुरेशी मोकळी जागा उपलब्ध असावी. मतमोजणी कक्षाभोवती सुरक्षा भिंत असावी. याशिवाय मतमोजणी कर्मचारी आणि उमेदवार व मतमोजणी प्रतिनिधी यांच्या येण्याजाण्यासाठी स्वतंत्र मार्ग असावा. त्याचप्रमाणे विद्युत व्यवस्था जनरेटरसह व दूरध्वनी जोडणी असावी.

**प्रश्न ३ मतमोजणी केंद्र निश्चित करण्यास राज्य निवडणूक आयोगाची मंजूरी लागते का ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ४ मतमोजणी कक्षात मोजणीसाठी सर्वसाधारण किती टेबल लावले जातात ?**

उत्तर मतमोजणीच्या ठिकाणी शक्य तितके टेबले लावण्यात यावीत, जेणेकरून सर्व प्रभागांची, मतमोजणी एकाच वेळी सुरु करता येणे शक्य होईल. तसेच प्रत्येक प्रभागासाठी एकच टेबल लावण्यात यावे.

**प्रश्न ५ उमेदवारास किती मतमोजणी प्रतिनिधी नेमता येतात ?**

उत्तर मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या टेबलच्या संख्येइतके व टपाली मतपत्रिकांच्या मोजणीसाठी एक याप्रमाणे प्रत्येक उमेदवारास मतमोजणी प्रतिनिधी नेमता येतात.

## ३. मतमोजणी अधिकारी, कर्मचारी नियुक्ती

**प्रश्न १ मतमोजणीच्या प्रत्येक टेबलसाठी किती कर्मचा-यांची नियुक्ती केली जाते ?**

उत्तर मतमोजणीच्या प्रत्येक टेबलसाठी एक मतमोजणी पर्यवेक्षक आणि एक मतमोजणी सहाय्यक नियुक्त केला जातो.

**प्रश्न २ प्रत्यक्ष मोजणीशिवाय अन्य कोणत्या कामांसाठी मतमोजणी केंद्रात कर्मचा-यांची नियुक्ती केली जाते ?**

उत्तर सुरक्षा कक्ष प्रभारी, मतमोजणीसाठी मतदान यंत्र मतमोजणी टेबलवर पोहोचविण्यासाठी चतुर्थ श्रेणी कर्मचारी, प्रत्येक टेबलवरुन आकडेवारी संकलनासाठी कर्मचारी, संगणकाव्दारे आकडेवारी संकलनासाठी कर्मचारी, निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे सहाय्यक, स्टेशनरी पुरविण्यासाठी कर्मचारी, हजेरी घेणे, भत्ता वाटप इ. साठी कर्मचारी, सिलिंगसाठी कर्मचारी, भोजन व चहापान व्यवस्थेसाठी कर्मचारी, राखीव कर्मचारी अशा विविध कामांसाठी मतमोजणी केंद्रात कर्मचा-यांची नियुक्ती केली जाते.

**प्रश्न ३ मतमोजणीसाठी अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करण्याचे अधिकार कोणाला आहेत ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीमधील मतमोजणीसाठी अधिकारी व कर्मचारी नियुक्तीचे अधिकार हे निवडणूक निर्णय अधिकारी यांना आहेत.

## ४. मतमोजणी प्रशिक्षण

**प्रश्न १ नियुक्त कर्मचा-यांना मतमोजणीबाबत केव्हा, कशा स्वरुपाचे व किती वेळा प्रशिक्षण दिले जाते ?**

उत्तर नियुक्त कर्मचा-यांना मतमोजणीबाबत साधारणत: दोन वेळा प्रशिक्षण दिले जाते. पहिले प्रशिक्षणामध्ये कर्मचा-यांना मतमोजणीच्या प्रक्रियेबाबत सर्वसाधारण माहिती दिली जाते. तर दुसऱ्या प्रशिक्षणामध्ये प्रात्यक्षिकासह (रंगीत तालीम) सविस्तर माहिती दिली जाते. पहिले प्रशिक्षण मतमोजणीच्या साधारणत: चार ते आठ दिवस आधी आणि दुसरे प्रशिक्षण मतमोजणीच्या अगोदरच्या दिवशी मतमोजणी कक्षामध्ये दिले जाते.

## ५. मतमोजणी केंद्राची रचना

**प्रश्न १ मतमोजणी केंद्राची आदर्श रचना कशी असावी ?**

उत्तर मतमोजणी केंद्रात मतमोजणीसाठी पुरेसे टेबल लावलेले असावेत. या टेबलसमोर बॅरीकेंटीगसह बारीक जाळी लावलेली असावी. सुरक्षा कक्षातील EVM मतमोजणी टेबलवर आणण्याचा स्वतंत्र व सुरक्षित मार्ग असावा. मतमोजणी टेबलासमोर मतमोजणी प्रतिनिधींच्या बसण्याची व्यवस्था अशी असावी की त्यांना मतमोजणी सुरू असताना सर्व दृश्य पाहता यावे. तथापि, मतदान यंत्र / मतपत्रिका हाताळता येवू नये अशी व्यवस्था असावी. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे एका बाजूस टपाली मतपत्रिकेच्या मोजणीचे टेबल असावे. दुस-या बाजूस संकलनाची व संगणकीकरणाची व्यवस्था असावी. मतमोजणी केंद्र शक्यतो पक्क्या इमारतीमध्ये असावे. अशा इमारतीबाहेर पुरेशी मोकळी जागा व सुरक्षा भिंत असावी. मतमोजणीचा निकाल ऐकण्यासाठी आलेल्या गर्दीस थांबण्यासाठी पुरेशी मोकळी जागा असावी. तसेच पार्कींगची व्यवस्था असावी. मतमोजणी केंद्रातून केलेल्या उद्घोषणा स्पष्टपणे सर्व संबंधितांना ऐकता येईल अशी व्यवस्था असावी. मतमोजणी केंद्रात उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी यांची बसण्याची व्यवस्था असावी. याशिवाय प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधींकरिता स्वतंत्र बैठक व्यवस्था असावी. याशिवाय अग्निशामक दल व वैद्यकीय पथक यांची व्यवस्था असावी.

**प्रश्न २ मतमोजणी केंद्रातील कोणत्या टेबलवर कोणत्या प्रभागातील (मतदार संघातील) कोणत्या मतदान केंद्रावरील EVM मधील मतांची मतमोजणी केली जाईल हे कसे ठरते ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी मतदार संघातील एकूण मतदान केंद्र आणि मतमोजणीसाठी लावण्यात आलेले टेबल याचा विचार करून कोणत्या मतदान केंद्रावरील EVM कोणत्या टेबलवर जाईल याचे नियोजन करतात. मतदान यंत्र ठेवलेला सुरक्षा कक्षाचा प्रभारी अधिकारी व मतमोजणी पर्यवेक्षक यांचे टेबलावर कोणत्या फेरीस कोणत्या मतदान केंद्राचे यंत्र द्यावयाचे आहे याबाबतचा मूव्हमेंट चार्ट (वाहतूक आराखडा) दोघांकडेही असतो. त्यावरुन कोणत्या मतदान केंद्रावरील इव्हीएम मधील मतांची मतमोजणी केली जाईल हे निश्चित केले जाते.

**प्रश्न ३ प्रभागातील सर्व मतदान केंद्रातील EVM मधील मतांची मोजणी होऊन निकाल जाहीर करता यावा यासाठी काय व्यवस्था केली जाते ?**

उत्तर प्रभागातील सर्व मतदान केंद्रातील इव्हीएम मधील मतांची मोजणी होऊन निकाल जाहीर करता यावा यासाठी लेखा विभागाचे अनुभवी अधिकारी, कर्मचारी यांची संकलन टेबलावर नियुक्ती केली जाते. त्यांच्या मदतीने प्रभागातील सर्व मतदान केंद्रातील इव्हीएममधील मतांची मोजणी पर्यवेक्षकाकडून झाल्यानंतर संकलन टेबलावरील अधिका-याकडे माहिती दिली जाते. प्रभागातील सर्व मतदान केंद्रावरील मतमोजणीचे संकलन करुन निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे निकाल जाहीर करण्यासाठी फेरीनिहाय निकालपत्र तयार करुन दिले जाते.

## ६. निवडणूक माहिती केंद्र (Media Centre)

**प्रश्न १ Media Centre ची रचना कशी करावी ?**

उत्तर Media Center हे मतमोजणी केंद्राच्या परिसरात तथापि मतमोजणी केंद्रापेक्षा वेगळ्या ठिकाणी स्वतंत्र सभागृह / खोलीमध्ये स्थापन करावे. Media Center चा एक प्रभारी अधिकारी असावा आणि माध्यम प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था व आवश्यक सुविधांची व्यवस्था केलेली असावी.

**प्रश्न २ Media Centre मध्ये सर्वसाधारणपणे कोणकोणत्या सुविधा उपलब्ध असाव्यात ?**

उत्तर Media Center मध्ये सर्वसाधारणपणे पुरेश्या खुर्च्या, Telephone, Fax machine, Internet सह Computer, Cable connection सह TV व Photocopy machine, Mobile phone charger इ. उपलब्ध असावेत. कक्षामध्ये माध्यम प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था केलेली असावी. मतमोजणीच्या प्रत्येक फेरीनंतर मतमोजणीची आकडेवारी या कक्षामध्ये त्वरीत पाठविण्यात यावी.

**प्रश्न ३ Media Centre मध्ये कोणत्या व्यक्तींना प्रवेश अनुज्ञेय आहे ?**

उत्तर विविध प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडिया चे accredation card holder प्रतिनिधी आणि जिल्हाधिकारी / सक्षम प्राधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांनी परवानगी दिलेले माध्यम प्रतिनिधी यांना प्रवेश Media Centre मध्ये अनुज्ञेय आहे.

## ७. सुरक्षा व्यवस्था व प्रवेश नियमन

**प्रश्न १ सिलबंद EVM सुरक्षा कक्षात ठेवल्यानंतर त्याची सुरक्षा कशी केली जाते ?**

उत्तर सर्वसाधारणपणे सुरक्षा कक्षास व्दिस्तरीय बंदोबस्त दिला जातो. बाहेरील बाजूस (Outer Corden) स्थानिक हत्यारी पोलिस आणि आतील बाजूस (Inner Corden) हत्यारी राखीव सुरक्षाबल यांचा उपलब्धतेनुसार बंदोबस्त दिला जातो. सुरक्षा कक्षाचे प्रभारी हे स्थानिक पोलिस अधिकारी असतात. सुरक्षा कक्षाचे ठिकाणी शक्यतोवर CC TV Camera / Video Camera, अग्निशमन यंत्रणा इ. पुरविले

**प्रश्न २ उमेदवारास मतमोजणी केंद्रावर किती मतमोजणी प्रतिनिधी नियुक्त करता येतात ? या नेमणुकीसाठी निश्चित असा नमुना आहे काय ?**

उत्तर टपाली मतांच्या मतमोजणीसह EVM मधील मतांची मोजणी करावयाच्या टेबलांच्या एकूण संख्येइतके मतमोजणी प्रतिनिधी उमेदवारास नियुक्त करता येतात. मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती ही विहीत केलेल्या नमुना ९(२) मध्ये करता येते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २० (१))

**प्रश्न ३ मतमोजणी प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था व प्रवेश नियंत्रणाबाबत काय तरतुदी आहेत ?**

उत्तर मतमोजणी टेबलासमोर जाळीच्या पलीकडे बाहेरील बाजूस मतमोजणी प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था केली जाते. सर्वसाधारणपणे केंद्र व राज्य स्तरावरील नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्षांच्या उमेदवारांच्या प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था पहिल्या रांगेत व त्यानंतर अमान्यताप्राप्त पक्षांच्या आणि अपक्ष उमेदवारांच्या प्रतिनिधींची बैठक व्यवस्था करणे योग्य असते. नियुक्तीचे वेळी प्रत्येक मतमोजणी प्रतिनिधीस छायाचित्रासह ओळखपत्र पुरविले जाते व अशा ओळखपत्रावर मतमोजणी प्रतिनिधीस नेमून दिलेल्या टेबलचा अनुक्रमांक दर्शविलेला असतो. त्या प्रतिनिधीस नेमून दिलेल्या टेबलशिवाय अन्यत्र जाता येत नाही.

**प्रश्न ४ मतमोजणी केंद्राची सुरक्षा कशी निश्चित करावी ? मतमोजणी केंद्रात पोलिसांना प्रवेश अनुज्ञेय आहे का ?**

उत्तर मतमोजणी केंद्राच्या सभोवताली आणि प्रवेशव्दारावर पोलीस बंदोबस्त दिलेला असतो. केवळ परवाना / ओळखपत्र धारक व्यक्तीसच मतमोजणी केंद्रात प्रवेश दिला जातो. आवश्यकतेनुसार राखीव पोलिस दलाचीही मदत घेण्यात येते. सर्वसाधारणपणे पोलिसांना मतमोजणी केंद्रात प्रवेश अनुज्ञेय नसतो. निवडणूक निर्णय अधिकारी आवश्यकतेनुसार पोलिसांना मतमोजणी केंद्रात पाचारण करू शकतात.

**प्रश्न ५ मतमोजणी केंद्रात कोणाकोणाला प्रवेशाची परवानगी आहे ?**

उत्तर उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी, मतमोजणी प्रतिनिधी, निवडणूक कर्तव्यार्थ नेमलेले अधिकारी / कर्मचारी, निवडणूक निरिक्षक, सक्षम प्राधिका-याच्या परवानगीने माध्यम प्रतिनिधी इ. ना मतमोजणी केंद्रात प्रवेशाची परवानगी असते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५० (१))

**प्रश्न ६ मतमोजणी केंद्रात व परिसरात भ्रमणध्वनी (MOBILE) वापराबाबत काय निर्बंध आहेत ?**

उत्तर मतमोजणी केंद्रात उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी, मतमोजणी प्रतिनिधी अथवा मतमोजणी कर्मचारी यांना भ्रमणध्वनी वापर करण्यास प्रतिबंध आहे.

## ८. स्ट्रॉंग रूम उघडणे व कंट्रोल युनिट वाहतूक आराखडा

**प्रश्न १ मतमोजणीपूर्वी स्ट्रॉंग रूम केव्हा उघडण्यात येते व त्यावेळी कोणकोण हजर राहू शकतात ?**

उत्तर मतमोजणीपूर्वी साधारण ४५ मिनीटे ते १ तास अगोदर स्ट्राँगरूम उघडण्यात येते. निवडणूक निर्णय अधिकारी / सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, प्रभारीसुरक्षा अधिकारी, उमेदवार व उमेदवारांचा निवडणूक प्रतिनिधी, सुरक्षा कक्षातील मतमोजणी कक्ष प्रमुख इ. व्यक्ती या प्रसंगी उपस्थित राहू शकतात.

**प्रश्न २ उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नसल्यास सुरक्षा कक्ष उघडता येईल का ?**

उत्तर मतमोजणीच्या दिवशी सुरक्षा कक्ष उघडण्याच्या वेळेबाबत निवडणूक लढविणारे उमेदवार यांना लेखी पत्राव्दारे अगावू कळविले जाते. परंतू उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी हे सुरक्षा कक्ष उघडण्यासाठी निश्चित केलेल्या वेळी उपस्थित नसतील तर सुरक्षा कक्ष उघडण्याचे काम थांबविण्यात येत नाही. सुरक्षा कक्ष उघण्याच्या प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण केले जाते.

**प्रश्न ३ मतमोजणीच्या कोणत्या टेबलवर कोणत्या मतदान केंद्राची EVM मतमोजणीसाठी पाठविली जाईल हे कसे कळते ?**

उत्तर कंट्रोल युनिटचा वाहतूक आराखडा निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणीपूर्वी तयार करतो. त्यावरुन कोणत्या मतदान केंद्रांचे इव्हीएम कोणत्या टेबलावर जाईल याबाबत माहिती कळते.

## ९. टपाली मतपत्रिका मोजणी

**प्रश्न १ मतमोजणी संदर्भात कायदेशीर तरतुदी काय आहेत ? मतमोजणीची सुरुवात करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांना कोणती घोषणा करावी लागते ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिका-यांकडून मतमोजणी प्रारंभ होण्यापूर्वी गुप्तता राखण्याची म्हणजे मतमोजणी कक्षातील प्रत्येक व्यक्तीने मतमोजणीबाबत गुप्तता राखणे व गुप्तता राखण्यास मदत करणे कायद्याने आवश्यक आहे आणि गुप्ततेचा भंग करणारी अशी कोणतीही माहिती त्याने कोणाही व्यक्तीला कळविता कामा नये. या संबंधीच्या कायदयाच्या तरतुदीचे उल्लंघन करणा-या कोणत्याही व्यक्तीला ३ महिन्यांपर्यत किंवा दंडाची किंवा दोन्हींची शिक्षा होऊ शकेल हे निवडणूक निर्णय अधिका-यांना घोषित करावे लागते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५१ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २९)

**प्रश्न २ मतदान केलेल्या टपाली मतपत्रिका केव्हापर्यंत दाखल करता येऊ शकतात ?**

उत्तर मतदान केलेल्या टपाली मतपत्रिका ह्या प्रत्यक्ष मतमोजणी सुरु करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी दाखल करता येऊ शकतात. (संदर्भ -टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद ९ (३) )

**प्रश्न ३ टपाली मतपत्रिकेची मोजणी केव्हा करण्यात येते व ही मोजणी कोणत्या टेबलवर केली जाते?**

उत्तर मतमोजणीमध्ये सर्वात प्रथम टपाली मतपत्रिकांची मोजणी करण्यात येते आणि त्यानंतर मशिनवरील मतमोजणीस सुरूवात करण्यात येते. टपाली मतपत्रिकांची मोजणी ही निवडणूक निर्णय अधिकारी यांचे टेबलवर अथवा त्यांच्या शेजारील टेबलवर करण्यात येते.

**प्रश्न ४ टपाली मतपत्रिकेच्या मोजणीची कार्यपध्दती कशी असते ?**

उत्तर १. टपाली मतपत्रिकांचे विहित वेळेच्या आत प्राप्त झालेले सर्व प्रपत्र पीबी-६ मधील लिफाफे मतमोजणीसाठी ग्राहय धरण्यात येतात. विहित वेळेनंतर प्राप्त प्रपत्र पीबी-६ मधील लिफाफ्यावर दिनांक व वेळ यांचे पृष्ठांकन करून मतमोजणीसाठी ग्राहय धरण्यात येत नाहीत. त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी यांची स्वाक्षरी केली जाते.

२. सर्व प्रथम प्रपत्र पीबी-६ हा मोठा लिफाफा उघडण्यात येतो. त्यातील मतदाराचे घोषणापत्र (प्रपत्र पीबी-४) आणि मतपत्रिका असलेला प्रपत्र पीबी-५ मधील छोटा लिफाफा एकत्र टाचून वेगळे ठेवण्यात येतात. प्राप्त झालेल्या प्रपत्र पीबी-४ मधील घोषणापत्रांची एकानंतर एक या प्रमाणे छाननी केली जाते.

३. प्रपत्र पीबी-४ मधील घोषणापत्र सक्षम प्राधिका-यांकडून साक्षांकीत झाल्याचे तसेच प्रपत्र पीबी-४ मधील घोषणापत्र व मतपत्रिका असलेला प्रपत्र पीबी-५ मधील छोटा लिफाफा या दोन्हीवरील मतपत्रिकेचा अनुक्रमांक एक असल्याची खात्री केली जाते.

४. अशा प्रकारे केवळ वैध घोषणापत्र व त्यासोबत टाचून ठेवलेले प्रपत्र पीबी-५ मधील लिफाफे वेगळे काढण्यात येतात. वैध घोषणापत्र नसणा-या मतपत्रिका ठेवलेले लिफाफे मतमोजणीतून बाद ठरविण्यात येतात. अशा लिफाफ्यांवर कारणांचे पृष्ठांकन करून ते वेगळे ठेवण्यात येतात व त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी यांची स्वाक्षरी केली जाते.

५. वैध घोषणापत्रासोबतचे सर्व प्रपत्र पीबी-५ मधील लिफाफे घोषणापत्रापासून वेगळे काढून सर्व वैध घोषणापत्रे एका स्वतंत्र लिफाफ्यात ठेवून सिलबंद केली जातात.

६. त्यानंतर प्रपत्र पीबी-५ मधील लिफाफ्यातील सर्व मतपत्रिका बाहेर काढण्यात येतात. त्यानंतर सर्व मतपत्रिकांची वैधतेबाबत छाननी करण्यात येते.

७. एकापेक्षा जास्त उमेदवारास मत दिले असल्यास, मतपत्रिका कोरी असल्यास किंवा कोणत्या उमेदवारास मत दिले आहे याचा स्पष्ट बोध होत नसल्यास अथवा मतदाराची ओळख उघड होत असल्यास (मतदाराचे नांव, स्वाक्षरी अथवा अन्य मजकूर लिहिलेला असल्यास) अशा मतपत्रिका अवैध ठरविण्यात येतात. या मतपत्रिकांच्या मागील बाजूस अवैधतेचे कारण पृष्ठांकित करून त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी यांची स्वाक्षरी केली जाते.

८. त्यानंतर सर्व वैध मतपत्रिका उमेदवारनिहाय वेगळया करून त्यांची मोजणी करण्यात येते.

(संदर्भ -टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील परिच्छेद १० )

**प्रश्न ५ टपाली मतपत्रिकेची मोजणी सुरू केल्याशिवाय EVM मधील मतांची मोजणी सुरू करता येते किंवा नाही ?**

उत्तर मतमोजणीमध्ये सर्वात प्रथम टपाली मतपत्रिकांची मोजणी करण्यात येते आणि त्यानंतर मशिनवरील मतमोजणीस सुरूवात करण्यात येते.

## १०. <u>मतदान यंत्राद्वारे नोंदविलेल्या मतांची मोजणी</u>

**प्रश्न १ मतदान यंत्राव्दारे नोंदविलेल्या मतांची मोजणी कशी केली जाते ?**

उत्तर नियोजनानुसार नेमून दिलेल्या टेबलवर मतदान यंत्राचे सिलबंद कंट्रोल युनिट व सोबतची तीन पाकिटे सुरक्षा कक्षातून पाठविण्यात येतात. आपल्या टेबलसाठी योग्य मतदान केंद्राचे कंट्रोल युनिट प्राप्त झाल्याची खात्री करण्यात येते. मतमोजणी पर्यवेक्षक यंत्राचे सील उपस्थित मतमोजणी प्रतिनिधींना दाखवितात. त्यानंतर कंट्रोल युनिट कॅरिंग केस मधून काढून त्यावरील ABCD Strip Seal आणि कागदी मोहोर तसेच अन्य सील सुरक्षित असल्याची खात्री करून टोकदार टोच्याचे सहाय्याने पेपर सील फाडण्यात येते. कंट्रोल युनिटचे पॉवर बटन सुरू करण्यात येते. त्याचवेळी मतपत्रिकेच्या हिशोबाच्या नमुन्यावरून मतदान यंत्रात मतदान झालेल्या मतांची संख्या वाचली जाते. त्यानंतर कंट्रोल युनिटवरील R१ (Result १) बटन दाबून पटलावरील संख्या उपस्थित प्रतिनिधींना दाखविली जाते. त्याचवेळी अशा उमेदवारनिहाय मिळालेल्या मतांच्या संख्या मतमोजणी सहाय्यक विहित प्रपत्रावर नोंदवून घेतात. मतपत्रिकेच्या हिशोबावरील संख्या व प्रत्यक्ष मतदान यंत्रातील मतांची संख्या यामध्ये फरक असल्यास तो ही विहित प्रपत्रावर नोंदविला जातो. अशा प्रकारे उमेदवारनिहाय मिळालेली मते व एकूण मते प्रपत्रावर नोंदविल्यानंतर त्यावर उपस्थित प्रतिनिधींच्या सह्या घेवून प्रपत्र संकलन केंद्राकडे पाठविण्यात येते. मतमोजणीनंतर कंट्रोल युनिट पुनश्च कॅरींग केसमध्ये ठेवून सुरक्षा कक्षाकडे पाठविण्यात येते. अन्य दोन लिफाफे आवश्यकतेनुसार उघडण्यात येतात अथवा आहे त्या परिस्थितीत संकलन केंद्राकडे परत पाठविण्यात येतात.

(संदर्भ- नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांच्या निवडणूकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे आदेश २००४ मधील परिच्छेद २७)

**प्रश्न २ मतमोजणी प्रक्रिया व त्यातील तक्ते यांची क्रमवारी कशी आहे ?**

उत्तर मतमोजणी टेबलवरील सर्व विहित प्रपत्रे संकलन केंद्रात प्राप्त करून घेवून फेरीनिहाय व टेबलनिहाय दुस-या विहित प्रपत्रात नोंदवून संकलित करण्यात येतात. या प्रपत्रामध्ये सर्व मतदान केंद्रनिहाय उमेदवारांना मिळालेल्या मतांची बेरीज केली जाते. या प्रपत्रात टपाली मतपत्रिकेद्वारे मतदानाची नोंद करून अंतिम निकाल तयार करण्यात येतो.

**प्रश्न ३ मतमोजणीचे वेळी मतदान यंत्रासोबत कोणकोणती कागदपत्रे पाठविली जातात ?**

उत्तर नोंद झालेल्या मतांचा हिशेब (नमुना व्हीएम-३ भाग-१) असलेला लिफाफा, मतदान केंद्राध्यक्षांची दैनंदिनी व मतदान केंद्राध्यक्षाव्दारे करण्यात येणारी घोषणापत्रे असणारा लिफाफा मतमोजणीचे वेळी मतदान यंत्रासोबत मतमोजणी कक्षात पाठविले जातात.

**प्रश्न ४ मतमोजणी दरम्यान Ballot Unit ची आवश्यकता आहे का ?**

उत्तर नाही. तथापि, मतमोजणीचे वेळी उमेदवारांच्या मतपत्रिकेवरील क्रमाबाबत वाद उद्भवल्यास बॅलेट युनिट मतमोजणी टेबलवर आणले जावू शकते.

**प्रश्न ५ मतमोजणीसाठी कोणती कागदपत्रे आधीच तयार करुन ठेवावी लागतात ?**

उत्तर मतमोजणी टेबलवर उमेदवारनिहाय मिळालेल्या मतांची नोंद करण्याचा विहित नमुना, संकलन केंद्रातील विहित नमुना, फेरीनिहाय, टेबलनिहाय मतमोजणीचे नियोजन इ. कागदपत्रे आधीच तयार करून ठेवावी लागतात.

**प्रश्न ६ मतांच्या हिशोबाच्या नमुन्यातील संख्येपेक्षा मतदान यंत्रातील मतांची संख्या वेगळी असल्यास काय करावे ?**

उत्तर मतांच्या हिशोबाच्या नमुन्यातील संख्येपेक्षा मतदान यंत्रातील मतांची संख्या वेगळी येत नाही.
परंतु, अपवादात्मक परिस्थितीत मतांच्या हिशोबाचा नमुना भरताना काही अनावधानाने चूक झालेली असेल तर नियंत्रण युनिटमध्ये असलेल्या मतांचा हिशोब विचारात घेतला जातो. अशा वेळी प्रत्यक्ष मोजणीमध्ये आढळून आलेली मतांची संख्या व असलेला फरक मतमोजणी प्रपत्रावर नोंदविला जातो.

**प्रश्न ७ मतदान यंत्र ठेवलेल्या पेटीचे अथवा मतदान यंत्राचे सील तुटलेले असल्यास काय करावे ?**

उत्तर मतदान यंत्र ठेवलेल्या पेटीचे अथवा मतदान यंत्राचे सील तुटलेले असले तरीही एकाच वेळी सर्व सील तुटलेली नसतात. मतदान यंत्रावरील ABCD Strip Seal व कागदी मोहोर व्यवस्थित असल्याची खात्री करून घ्यावी व मतमोजणी प्रतिनिधींनाही दाखवावी. सदर बाब निवडणूक निर्णय अधिकारी यांचेही निदर्शनास आणावी.

**प्रश्न ८ मोजणीचे वेळी मतदान यंत्राची बॅटरी संपल्यास काय करावे ?**

उत्तर अशा वेळी सर्व मतदान प्रतिनिधींचे समक्ष पंचनामा करून मतदान यंत्राच्या उमेदवार कक्षाचे (Candidate Section) सील तोडून नवीन बॅटरी बसवावी व मोजणी करावी. शक्यतो याबाबीचे Video चित्रीकरण करावे. निवडणूक निरिक्षक नेमलेले असल्यास ही बाब त्यांचेही निदर्शनास आणावी. या प्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी विहित नमुन्यातील घोषणापत्र करुन त्यावर मतमोजणी प्रतिनिधींच्या स्वाक्ष-या घ्याव्यात.

( संदर्भ - इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राव्दारे मतदान करण्याबाबतचा (सुधारणा) आदेश २०१३ - क्र. रानिआ २०१३ / प्र.क्र. ८/ का.१२ दिनांक २८/१०/२०१३ )

**प्रश्न ९ मतमोजणी मध्येच थांबविता येते का ? कोणत्या कारणास्तव ?**

उत्तर मतमोजणी ही मतमोजणी पूर्ण होईपर्यंत सतत चालणारी प्रक्रिया असल्यामुळे अत्यंत असामान्य परिस्थिती वगळता थांबविता येत नाही. मोठी नैसर्गिक आपत्ती, उघड हिंसाचार, मतदान यंत्रे बळकावणे, मतमोजणी दरम्यान गंभीर अनियमितता घडणे अशा परिस्थितीत मतमोजणी थांबविण्यात येवू शकते. अशी बाब तातडीने राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणण्यात यावी.

मतमोजणीचे काम स्थगित करावयाचे असेल अशा कोणत्याही कालावधीमध्ये मतदान यंत्रे, पाकिटे व निवडणूकीसंबंधीची इतर कागदपत्रे यावर निवडणूक निर्णय अधिकारी यांची मोहोर लावून आणि ज्या उमेदवारांची किंवा मतमोजणी प्रतिनिधींची मोहोर लावण्याची इच्छा असेल त्यांनी मोहोर लावून ती मोहोरबंद करून ठेवण्यात येतील आणि त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसंबंधी पुरेशी खबरदारी घेतली जाईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५५)

**प्रश्न १० मतमोजणी प्रतिनिधींना एखाद्या प्रकरणात मतदान यंत्रावरील आकडेवारी समजून न आल्यास पुन्हा मोजणी करून दाखविणे कायदेशीरदृष्टया योग्य असेल काय ?**

उत्तर मतमोजणी पर्यवेक्षकाच्या टेबलावर कंट्रोल युनिट असेपर्यंत पुन्हा पुन्हा रिझल्ट दाबून उमेदवारनिहाय मिळालेली मते दाखविता येतात. त्यामध्ये कायद्यानी कोणतेही बंधन नाही. मात्र एखाद्या कंट्रोल युनिटमधील मतांची मोजणी होऊन कंट्रोल युनिट सुरक्षा कक्षामध्ये पाठविल्यानंतर पुन्हा परत आणून दाखविता येणार नाही.

**प्रश्न ११ प्रत्येक टेबलवरील मोजणी, तेथे येणारे कंट्रोल युनिट, मोजली जाणारी मते यांचा मेळ कसा घेतला जातो व कुठे ?**

उत्तर सुरक्षा कक्ष प्रभारी, संकलन कक्ष प्रभारी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे सहाय्यक त्यांचेकडे नियोजन तक्त्यावर या बाबींची नोंद घेत असतात. त्यावरून मोजणी झालेल्या व अद्याप मोजणी न झालेल्या कंट्रोल युनिटची संख्या कळते. संकलन केंद्रात मोजणी झालेल्या मतांचे संकलन केले जाते. त्यावरून उमेदवारनिहाय मिळालेली मते व दोन उमेदवारांमधील मतांचा फरक ही माहिती कळू शकते.

**प्रश्न १२ फेरीनिहाय मतांचा हिशोब व्यवस्थित जुळावा यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी काय काळजी घ्यावी ?**

उत्तर मतमोजणी टेबलवर कंट्रोल युनिटमधील निकालानुसार प्रपत्रावर अचूक नोंदी घेणे, संकलन केंद्रात हस्त मोजणीसह संगणकावर देखील नोंदी घेवून मोजणी करणे इ. उपाययोजना केल्यास त्याचप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी लेखा विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचा संकलन कक्ष तयार करावा म्हणजे हिशोब व्यवस्थित जुळविता येतो.

**प्रश्न १३ मतमोजणीचे फेरीनिहाय आकडे सामान्य नागरिकांना तसेच प्रसारमाध्यमांना त्वरित कळावेत यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कोणती व्यवस्था करावी ?**

उत्तर मतमोजणी केंद्रात मोठया फलकावर उमेदवारनिहाय मतांची आकडेवारी लिहावी. प्रत्येक फेरीनंतर उमेदवारनिहाय मिळालेल्या मतांची आकडेवारी ध्वनीवर्धकाव्दारे जाहीर करावी. संकलित माहिती प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करून द्यावी.

**प्रश्न १४ फेरीनिहाय उमेदवारांना मिळालेली मते जाहीर करताना काय काळजी घ्यावी ? हा निकाल कोणत्या नमुन्यात जाहीर करावा ?**

उत्तर फेरीनिहाय उमेदवारांना मिळालेली मते व फेरी अखेरीस मिळालेली एकूण मते स्पष्ट आवाजात व अचूकपणे जाहीर करण्यात यावीत. अशी आकडेवारी संकलन केंद्रातील विहित प्रपत्राआधारेच जाहीर करण्यात यावी. अशी आकडेवारी जाहीर केल्यानंतर काही आक्षेप आल्यास त्याचे निराकरण करण्यात यावे.

**प्रश्न १५ निवडणूक निरीक्षक यांना मतमोजणी थांबविण्याचा अधिकार आहे का ?**

उत्तर नाही.

**प्रश्न १६ अंतिम निकाल कोणत्या नमुन्यात घोषित करावा ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीसाठी नमुना १४ मध्ये अंतिम निकाल घोषित करणे बंधनकारक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५९)

**प्रश्न १७ एखाद्या Control Unit मधील मते मतमोजणी वेळी दिसून (retrieve) न आल्यास काय कार्यवाही करावी ?**

उत्तर अशा वेळी ज्या कंट्रोल युनिटवरील निकाल दिसत नसेल त्या कंट्रोल युनिटचे कॅन्ड सेट सेक्शन उपस्थित उमेदवार / मतमोजणी प्रतिनिधींच्या उपस्थितीमध्ये उघडावा. मात्र त्यापूर्वी त्यांची स्वाक्षरी घोषणापत्रावर घ्यावी. नंतर बिघडलेल्या कंट्रोल युनिटमधील मेमरी चिप काढून दुस-या कंट्रोल युनिटला जोडून मतांची मोजणी करावी. भारत निवडणूक आयोगाकडील मतदान यंत्र वापरले असल्यास Auxiliary Display Unit चा वापर करून मतमोजणी करण्याचा प्रयत्न करावा. त्यानंतर ही मतांची मोजणी करणे शक्य न झाल्यास अशा मतदान केंद्राचा संपूर्ण तपशील, झालेले एकूण मतदान, मतमोजणीत आघाडीवर असणा-या दोन उमेदवारांची मते, त्यांच्या मतातील फरक इ. तपशिल नोंदवून अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा. आयोगाचे पूर्व परवानगीने अंतिम निकाल घोषित करावा.

( संदर्भ - इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राव्दारे मतदान करण्याबाबतचा (सुधारणा) आदेश २०१३ - क्र. रानिआ २०१३ / प्र.क्र. ८/ का.१२ दिनांक २८/१०/२०१३ )

## ११. समसमान मते व फेर मतमोजणी

**प्रश्न १ मतमोजणीमध्ये एकापेक्षा जास्त उमेदवारांना मिळालेली सर्वाधिक मते समसमान असल्यास अशा प्रकरणात निवडणूक निर्णय अधिकारी यांनी काय कार्यवाही करावी ?**

उत्तर मतमोजणीमध्ये एकापेक्षा जास्त उमेदवारांना मिळालेली सर्वाधिक मते समसमान असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी उक्त उमेदवारांबाबत चिठ्ठ्या टाकून निर्णय घेतील आणि ज्याच्या नावे चिठ्ठी निघेल त्या उमेदवारास एक जादा मत मिळाले आहे असे समजून त्यास विजयी घोषित करेल. या प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रिकरण करणेत यावे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५८)

**प्रश्न २ उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी फेरमतमोजणीचा अर्ज केव्हा करू शकतात ? अशा अर्जाबाबत निवडणूक निर्णय अधिकारी काय कार्यवाही करू शकतात ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी जेव्हा उमेदवारनिहाय मिळालेल्या मतांची आकडेवारी जाहीर करतात अशावेळी अंतिम निकाल घोषित होण्यापूर्वी फेरमतमोजणीचा अर्ज सादर करता येवू शकतो. असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी अर्जातील आक्षेपित मुद्यांच्या आधारे संपूर्ण किंवा अंशत: फेरमतमोजणीचा अथवा असा अर्ज नाकारण्याचा निर्णय घेवू शकतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५७(१)(२))

**प्रश्न ३ फेरमतमोजणीमध्ये उमेदवारांच्या मतात फरक पडत असल्यास काय करावे ?**

उत्तर फेरमतमोजणीमध्ये उमेदवारांच्या मतात फरक पडत असल्यास पूर्वी नोंदविलेल्या विहित प्रपत्रावरील उमेदवारनिहाय मतास वर्तुळ (encircle) करून सुधारित आकडेवारी नोंदवावी व त्या ठिकाणी मतमोजणी पर्यवेक्षक व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आद्याक्षरी करावी. त्यानंतर प्राप्त झालेल्या सुधारित आकडेवारीनुसार निकाल जाहीर करणेत यावा.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५७(५))

**प्रश्न ४ विजयी उमेदवार घोषित झाल्यानंतर फेरमतमोजणीचा अर्ज प्राप्त झाल्यास काय करावे ?**

उत्तर असा अर्ज योग्य पृष्ठांकन करून नाकारावा.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५७(६))

## १२. विजयी उमेदवार घोषित करणे व प्रमाणपत्र देणे

**प्रश्न १ मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर विजयी उमेदवार केव्हा घोषित करावा ?**

उत्तर मतमोजणी पूर्ण होवून संकलित अंतिम आकडेवारी जाहीर करून काही मिनिटांचा कालावधी लोटल्यानंतर (Pause) व फेरमतमोजणीचा अर्ज आला नसल्यास विजयी उमेदवार घोषित करावा.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५९)

**प्रश्न २ विजयी उमेदवारास प्रमाणपत्र कोणत्या नमुन्यात देण्यात येते ?**

उत्तर विजयी उमेदवारांना राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये प्रमाणपत्र देण्यात येते.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र .एसईसी/१०९५/सीआर-११/डेस्क-३ दि.१०/०४/१९९५)

**प्रश्न ३ विजयी उमेदवारास देण्यात आलेले प्रमाणपत्र संबंधित प्राधिका-याकडे जमा करण्याबाबत काय तरतुदी आहेत ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीमधील विजयी उमेदवारास प्रमाणपत्र प्रदान करताना, सदर मूळ प्रमाणपत्र संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे विहित मुदतीत जमा करण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी लेखी सूचना देण्यात याव्यात. पक्षांतर बंदी अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या पहिल्या बैठकीपूर्वी असे करणे बंधनकारक आहे.

(संदर्भ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता नियम १९८७ मधील नियम ४ (२) आणि राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र .एसईसी/१०९५/सीआर-११/डेस्क-३ दि.०८/०६/१९९५ )

**प्रश्न ४ उमेदवाराच्या अनुपस्थितीत प्रमाणपत्र त्यांचे प्रतिनिधी स्विकारू शकतात काय ?**

उत्तर नाही.

## १३. <u>मतमोजणीचा अहवाल</u>

**प्रश्न १ मतमोजणीचे कोणते अहवाल निवडणूक आयोगास पाठवावे लागतात ? त्यांची क्रमवारी, टप्पे व कालावधी कसा आहे ?**

उत्तर मतमोजणी सुरू होण्यापूर्वी सज्जतेचा अहवाल, मतमोजणी वेळेवर सुरळीत सुरू झाल्याचा अहवाल, मतदारसंघनिहाय व फेरीनिहाय मतमोजणीची आकडेवारी, विजयी उमेदवार घोषित केल्यानंतर अशा उमेदवारांची व नजीकच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराचे नांव, पक्ष आणि मिळालेली मते, मतमोजणीच्या शेवटी अंतिम निकालपत्र, निवडणूक अनामत रक्कम जप्त करण्याबाबतच्या आदेशाची प्रत इ. अहवाल त्या त्या टप्प्यानुसार निवडणूक आयोगास सादर करावे लागतात.

**प्रश्न २ मतमोजणी प्रक्रियेचे इतिवृत्त लिहिणे बंधनकारक आहे का ? त्याऐवजी पूर्ण व्हिडिओ चित्रिकरण केले तर चालेल का ?**

उत्तर मतमोजणी प्रक्रियेचे इतिवृत्त आवश्यकतेनुसार लिहिण्याचा निर्णय संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी घेतात. त्या व्यतिरिक्त Video चित्रिकरण करणे इष्ट ठरेल.

## १४. मतमोजणीनंतर मतदान यंत्राबाबत करावयाची कार्यवाही

**प्रश्न १ मतमोजणीनंतर मतदान यंत्रे व मेमरी चिप केव्हा सील केली जाते ? सिलिंग करताना कोण कोण हजर राहू शकतात ?**

उत्तर मतमोजणी पूर्ण होवून निकाल घोषित केल्यानंतर लगेचच मेमरी चिप सील केली जाते. अशा सिलिंगच्या वेळी उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी हजर राहू शकतात. परंतु त्यांची उपस्थिती बंधनकारक नाही. तथापि, मेमरी चिप सिल करून त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी स्वाक्षरी करतील आणि उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना त्यावर स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा उमठविण्याची ईच्छा असल्यास त्यास परवानगी देतील. मात्र मतदानयंत्रे सील केली जात नाहीत.

**प्रश्न २ सील केलेली मेमरी किती कालावधीसाठी व कोठे जतन करून ठेवणे आवश्यक असते ?**

उत्तर सील केलेली मेमरी तीन महिन्यांसाठी अथवा निवडणूक याचिका दाखल असल्यास याचिकेचा निकाल लागेपर्यंत / न्यायालयाच्या आदेशापर्यंत एका लहान ट्रंकमध्ये ठेवून सिलबंद करून कोषागारात जतन करून ठेवली जाते.

## १५. निवडणुकीसंबंधी अन्य कागदपत्रे जतन करणे अथवा त्यांचे निरीक्षण

**प्रश्न १ निवडणुकीसंबंधी कोणकोणती कागदपत्रे कोठे व किती कालावधीसाठी जतन करून ठेवणे आवश्यक असते ?**

उत्तर महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ६१ (१) मध्ये नमूद केलेली पाकिटे एक वर्षापर्यंत ठेवण्यात येतात आणि त्यानंतर शासनाने किंवा सक्षम न्यायालयाने त्याविरूध्द कोणताही निर्देश दिला असल्यास त्यास अधिन राहून ती नष्ट करण्यात येतात. निवडणूकीसंबंधातील इतर सर्व कागदपत्रे ही पुढील सार्वत्रिक निवडणूक संपेपर्यंत राखून ठेवण्यात येतील आणि त्यानंतर ती सक्षम न्यायालयाने त्याबाबत कोणताही निर्देश दिला असल्यास त्यास अधिन राहून नष्ट करण्यात येतील.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ६२ )

**प्रश्न २ जतन करून ठेवलेली कोणती कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करून देता येऊ शकतात व त्याच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करून देऊ शकता येतात ?**

उत्तर उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे, निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी, निकालपत्र, मतदान केंद्राध्यक्षांची दैनंदिनी ही कागदपत्रे निरिक्षणासाठी उपलब्ध करून देता येवू शकतात व त्यांच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करून देता येऊ शकतात. सांविधिक व असांविधिक लिफाफे केवळ सक्षम न्यायालयाच्या निर्देशानुसारच उघडता येऊ शकतात.

## १६. निवडणूक निकाल व राजपत्रामध्ये प्रसिध्दी

**प्रश्न १ निवडणूक निकालाची राजपत्रामध्ये प्रसिध्दी म्हणजे काय ? त्याची प्रक्रिया कशी असते ?**

उत्तर निवडणुकीचा अंतिम निकाल विहित नमुन्यात तयार करून निवडणूक निर्णय अधिकारी यांचे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी असाधारण राजपत्रात प्रसिध्दीसाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठविण्यात येतो.
(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २० )

**प्रश्न २ सर्वसाधारणपणे निवडणूक निकालानंतर किती दिवसांमध्ये निवडणूक निकाल राजपत्रामध्ये प्रसिध्द केला जातो ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या मुदतीत.

**प्रश्न ३ निवडणूक निकाल राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या काय सूचना आहेत ?**

उत्तर निवडणूक निकालपत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून प्राप्त करून घेवून संबंधित निवडणूक अधिका-याव्दारे (जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त) शासकीय मुद्रणालयाकडे असाधारण राजपत्रात प्रसिध्दीकरिता परस्पर पाठविण्याच्या राज्य निवडणूक आयोगाच्या सूचना आहेत.

**प्रश्न ४ नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीचा निकाल राजपत्रामध्ये प्रसिध्द करणे बंधनकारक असते काय ?**

उत्तर होय. नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीमधील निवडून आलेल्या सदस्यांची नावे राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारान्वये जिल्हाधिकारी यांनी राजपत्रामध्ये प्रसिध्द करणे बंधनकारक आहे.
(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २० आणि राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ-१०९४/१६४/१९९४, दिनांक २९/११/१९९४)

**प्रश्न ५ निवडणूक निकाल राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यासाठी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांची काय जबाबदारी आहे ?**

उत्तर निकाल घोषित होताच निकाल पत्रावर स्वाक्षरी करुन त्याच्या प्रती असाधारण राजपत्रात प्रसिध्दीसाठी तातडीने संबंधित निवडणूक अधिका-याकडे सुपूर्द करणे ही निवडणूक निर्णय अधिकारी यांची जबाबदारी असते.

## १७. अनामत रक्कम जप्त करणे / परत करणे

**प्रश्न १ अनामत रक्कम परत मिळविण्याकरिता किती मते मिळणे आवश्यक असते ?**

उत्तर अनामत रक्कम परत मिळविण्याकरिता मतदारसंघातील NOTA ची मते वगळून एकूण वैध मतांच्या १/८ पेक्षा कमी नसतील इतकी मते मिळविणे अथवा विजयी घोषित होणे आवश्यक असते.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १४ (४))

**प्रश्न २ विजयी उमेदवारास NOTA (None Of The Above यापैकी कोणीही नाही) ची मते वगळून वैध मतांच्या १/८ पेक्षा कमी मते मिळाल्यास अनामत रक्कम जप्त होईल काय ?**

उत्तर नाही. अशा प्रकरणी अनामत रक्कम परत केली जाईल.

**प्रश्न ३ अनामत रक्कम जप्त करण्याचे आदेश काढण्याचे अधिकार कोणास आहेत ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी.

**प्रश्न ४ जप्त केलेली अनामत रक्कम कोठे जमा केली जाते ?**

उत्तर अशा रितीने जप्त केलेली अनामत रक्कम ही संबंधित नगरपरिषद अथवा नगरपंचायतीकडे जमा होईल.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १४ (४))

## १८. एकापेक्षा जास्त जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांबाबत

**प्रश्न १ नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणुकीत उमेदवार एकापेक्षा जास्त जागांवर निवडून आला असल्यास त्याने एक जागा वगळता अन्य जागांचा राजीनामा कधीपर्यंत देणे अपेक्षित आहे ?**

उत्तर एखादी व्यक्ती एकापेक्षा अधिक प्रभागामध्ये निवडून आली असेल तर, तिने निकाल प्रसिध्द करण्यात आल्याच्या तारखेपासून ७ दिवसांच्या मुदतीमध्ये स्वत:च्या सहीची लेखी नोटीस जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाधीन करून, ज्या प्रभागात काम करण्याची इच्छा असेल त्या प्रभागाची निवड केली पाहिजे आणि अशी निवड अंतिम असेल.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९ (२))

**प्रश्न २ अशा उमेदवाराने निर्धारित कालावधीत एक जागा वगळता अन्य जागांचा राजीनामा न दिल्यास काय परिणाम होऊ शकतो ?**

उत्तर एकापेक्षा जास्त प्रभागांवर निवडून आलेल्या सदस्याने एका प्रभागाची पसंती नियमानूसार दिलेल्या मुदतीमध्ये जिल्हाधिकारी यांना कळविली नाही तर,जिल्हाधिकारी अशा प्रभागांपैकी ज्या प्रभागामध्ये अशा सदस्याने काम करावे तो चिठठया टाकून ठरविला पाहिजे आणि जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच उर्वरित प्रभागामध्ये नवीन निवडणूका घेण्याबद्दल राज्य निवडणूक आयोगास अहवाल सादर करतील.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९ (४))

# प्रकरण २०

# निवडणूक खर्च

## (Expenditure on Election by Candidates)

## १. कायदेशीर तरतूद

**प्रश्न १ निवडणूक लढविणा-या उमेदवाराने करावयाच्या खर्चाच्या मर्यादेबाबत काही कायदेशीर तरतूद आहे का ?**

उत्तर होय. निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीसाठी कमाल किती खर्च करावा याबाबत राज्य निवडणूक आयोगाने आदेशाद्वारे सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

( संदर्भ:- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० अ (४) आणि राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३, दिनांक ०७/०२/१९९५ मधील परिच्छेद - १)

**प्रश्न २ निवडणूक खर्चाचा हिशेब विहित नमुन्यात व लेखी स्वरूपात ठेवणे बंधनकारक आहे काय ?**

उत्तर होय. निवडणूक खर्चाचा हिशेब आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात व लेखी स्वरुपात ठेवणे बंधनकारक आहे.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५ मधील परिच्छेद - २ व ३)

**प्रश्न ३ हिशेब विहित केलेल्या रितीने सादर न करणा-या उमेदवाराविरूध्द काय कारवाई होऊ शकते ?**

उत्तर हिशेब विहित केलेल्या रितीने सादर न करणा-या नगरपरिषद अथवा नगरपंचायतीची निवडणूक लढविणा-या उमेदवारांना ३ वर्षाच्या कालावधीकरीता अपात्र ठरविण्यात येवू शकते.

(संदर्भ: महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१)(१ ड) , आदेश दि. १५/०२/२०२४ )

## २. उमेदवारासाठी खर्चाची मर्यादा

**प्रश्न १ उमेदवारास निवडणूक खर्चास मर्यादा घालण्याची कारणे काय आहेत ?**

उत्तर निवडणुकीमध्ये सर्व उमेदवारांना समान संधी मिळावी आणि आमिष दाखवून मते मिळविणे शक्य होऊ नये या हेतूने निवडणूक खर्चास मर्यादा घातली जाते.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दि. ०७/०२/१९९५)

**प्रश्न २ निवडणूक लढविणा-या उमेदवारासाठी खर्चाची कमाल मर्यादा किती असते ? ही मर्यादा कोण निश्चित करते ?**

उत्तर स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय निवडणूक लढविणा-या उमेदवाराची निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा राज्य निवडणूक आयोगाकडून निश्चित करुन दिली जाते.

| **अ. क्र.** | **स्थानिक स्वराज्य संस्था** | **उमेदवारांनी करावयाची खर्चाची मर्यादा** |
|---|---|---|
| १ | अ वर्ग मुंबई महानगरपालिका | ५,००,००० |
| २ | ब वर्ग पुणे व नागपूर महानगर पालिका | ४,००,००० |
| ३ | क वर्ग महानगरपालिका पिंपरी चिंचवड, ठाणे, नाशिक, नवी मुंबई | ४,००,००० |
| ४ | ड वर्ग महानगरपालिका उपरोक्त महानगरपालिका वगळून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत इतर महानगरपालिका | ३,००,००० |
| ५ | अ वर्ग नगरपरिषदा | ३,००,००० |
| ६ | ब वर्ग नगरपरिषदा | २,००,००० |
| ७ | क वर्ग नगरपरिषदा | १,५०,००० |
| ८ | नगरपंचायता | १,५०,००० |
| ९ | जिल्हा परिषदा | ३,००,००० |
| १० | पंचायत समिती | २,००,००० |
| ११ | ग्रामपंचायती | २५,००० |

(संदर्भ:- राज्य निवडणूक आयोग आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५ दि. ३० जुलै,२०११)

**प्रश्न ३ उमेदवाराच्या खर्चाचे प्रकार कोणते असू शकतात ?**

उत्तर नामनिर्देशनावरील खर्च, प्रचार सभा, प्रचार साहित्य, प्रचार वाहने, रॅली, स्टार प्रचारकावरील खर्च इ. प्रकार असू शकतात.

**प्रश्न ४ उमेदवाराचा खर्च कोणत्या तारखेपासून सुरु होईल ? आणि कोणत्या तारखेपर्यंतचा खर्च नोंदवावा लागेल ?**

उत्तर उमेदवाराने नामनिर्देशनपत्र दाखल केलेल्या तारखेपासून ते निकाल जाहीर होण्याच्या तारखेपर्यंतचा (दोन्ही दिवस धरून) खर्च उमेदवारास नोंदवावा लागेल.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५ मधील परिच्छेद ४ )

**प्रश्न ५ उमेदवाराच्या वतीने एखादा समर्थक खर्च करत असेल तर तो खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करावा का ?**

उत्तर होय. उमेदवार अथवा उमेदवाराच्या वतीने त्याच्या समर्थकाने केलेला खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करणे बंधनकारक आहे.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५ मधील परिच्छेद ५ )

**प्रश्न ६ उमेदवाराने खर्च कशा पद्धतीने करणे आवश्यक आहे ? (म्हणजे रोख स्वरुपात, धनादेशाद्वारे इ.)**

उत्तर उमेदवाराने निवडणूक खर्चासाठी एक स्वतंत्र बँक खाते उघडून या खात्यामधून शक्यतो धनादेशाद्वारे खर्च करणे आवश्यक आहे. केवळ किरकोळ खर्च रोख स्वरुपात करता येईल.

(संदर्भ:- राज्य निवडणूक आयोग आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५ दि. ३० जुलै,२०११)

**प्रश्न ७ उमेदवाराने प्रचार वाहने, छपाई, प्रचारसाहित्य, जेवणावळी यावर किती प्रमाणात खर्च करावा याबाबत काय सूचना आहेत ?**

उत्तर उमेदवाराने कोणत्या बाबीवर किती प्रमाणात खर्च करावा याबाबत कोणतेही बंधन नाही. तथापि, खर्चाच्या कमाल मर्यादेपर्यंतच निवडणूक खर्च करणे बंधनकारक आहे.

**प्रश्न ८ राखीव व अराखीव उमेदवारास खर्चाची कमाल मर्यादा सारखीच असते का ?**

उत्तर होय.

**प्रश्न ९ पक्षाने केलेल्या खर्चाचा समावेश उमेदवाराच्या खर्च मर्यादेत समाविष्ट केला जातो काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५ आणि राज्य निवडणूक आयोग आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५ दि.२८ डिसेंबर,२००६ )

**प्रश्न १० उमेदवार एकापेक्षा जास्त मतदार संघातून निवडणूक लढवित असल्यास खर्च मर्यादा वाढवून मिळते काय ?**

उत्तर नाही. उमेदवाराची निवडणूक खर्च मर्यादा वाढवून मिळत नाही. तथापि, दोन स्वतंत्र मतदारसंघ असल्याने प्रत्येक मतदारसंघात विहित केलेल्या मर्यादेत स्वतंत्रपणे खर्च करता येईल.

## ३. <u>दर निश्चिती</u>

**प्रश्न १ बाबनिहाय खर्चाची दर निश्चिती कोण व कशी करतात ?**

उत्तर जिल्हा निवडणूक अधिकारी स्थानिक बाजारातून बाबनिहाय दरपत्रक मागवून अथवा प्रचलित दराबाबत माहिती घेऊन बाबनिहाय खर्चाची दर निश्चिती करतात.

**प्रश्न २ दर निश्चिती संदर्भात राजकीय पक्षांशी सल्लामसलत करणे आवश्यक आहे का ?**

उत्तर होय. दर निश्चिती करण्यापूर्वी जिल्हा निवडणूक अधिकारी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बाबनिहाय दरासंबंधी बैठक घेऊन सल्लामसलत करतात.

**प्रश्न ३ अशी दर निश्चिती उमेदवारांवर बंधनकारक असते काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ४ एखादी बाब जर सूचित समाविष्ट नसेल तर ऐनवेळी काय करावे ?**

उत्तर अशावेळी स्थानिक बाजारपेठेतील अथवा एखाद्या प्राधिकरणाने निश्चित केलेले किंवा संबंधित विषयाच्या तज्ञाचे सल्ल्याने निश्चित केलेले दर न्युनतम दर म्हणून विचारात घेतले जातात.

**प्रश्न ५ दर सूचीचा नमुना विहित केलेला आहे काय ?**

उत्तर नाही. असा नमुना विहित केलेला नाही.

**प्रश्न ६ उमेदवाराने कोणत्याही बाबीवर केलेला (दाखविलेला) खर्च योग्य आहे किंवा कसे याची पडताळणी कशी केली जाते ?**

उत्तर उमेदवाराने आपल्या खर्चाच्या विवरणपत्रात दाखविलेल्या दराची निश्चित केलेल्या दर सूचीशी तुलना करण्यात येते. उमेदवाराने दाखविलेला खर्च त्यापेक्षा कमी असल्यास त्यांना या तफावतीबाबत नोटीस पाठवून खुलासा करण्याची संधी देण्यात येते. शेवटी या **खर्चाबाबत** निर्णय घेण्यात येतो.

## ४. दक्षता पथक

**प्रश्न १ दक्षता पथक म्हणजे काय ? त्याची रचना कशी असते ?**

उत्तर (अ) निवडणूक खर्च मर्यादेच्या तरतुदींचे पालन होत असल्याबाबत खात्री करणे व उलंघन होत असल्यास कारवाई करणे याबाबत स्थापन केलेल्या पथकास दक्षता पथक असे म्हणतात. या पथकात पथक प्रमुख म्हणून नायब तहसिलदार पेक्षा कमी दर्जाचा नसेल असा अधिकारी, पोलीस अधिकारी, व्हिडीओग्राफर इ. चा समावेश असतो.

**प्रश्न २ दक्षता पथक कोण स्थापन करते ?**

उत्तर जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केल्यास निवडणूक निर्णय अधिकारी हे अशा पथकाची स्थापना करतात.

**प्रश्न ३ दक्षता पथकाचे अधिकार व कर्तव्ये काय आहेत ?**

उत्तर निवडणूक खर्च मर्यादेच्या तरतुदींचे पालन होत असल्याची पाहणी करणे, मतदारांना पैसे, मद्य अथवा अन्य प्रलोभने दाखविण्यात येत असल्याबद्दलच्या तक्रारींची चौकशी करणे, बेकायदेशीररित्या होत असलेली पैशांची, मद्याची वाहतूक होत असल्यास त्याबद्दल वाहनांची तपासणी करणे इ. बाबत दक्षता घेण्याची दक्षता पथकांची जबाबदारी असते. यासाठी कोणत्याही संशयास्पद वाहनाची अथवा व्यक्तीची झडती घेणे, छापे घालणे, मुद्देमाल जप्त करणे, व्हिडीओ चित्रीकरण करणे असे अधिकार या पथकास असतात. पथक प्रमुखास कार्यकारी दंडाधिकारी यांचे अधिकार प्रदान करण्यात आलेले असतात.

**प्रश्न ४ रोख रकमेची वाहतूक व त्यावर करावयाची कार्यवाही याबाबत निवडणूक कालावधीत काय नियम आहेत ?**

उत्तर आयकर अधिनियमातील तरतुदींनुसार रूपये २०,००० पेक्षा जास्त रोख रकमेची विनापरवानगी वाहतूक करता येत नाही. अशी वाहतूक होत असल्याबाबत माहिती मिळाल्यास अथवा तसा संशय आल्यास अशा व्यक्तीची अथवा वाहनाची झडती / तपासणी करण्याचे अधिकार दक्षता पथकास प्रदान केलेले असतात.

**प्रश्न ५ मतदारांना प्रभावित करण्यासाठी मद्य, भेटवस्तू दिल्या जात असल्यास दक्षता पथकाने नक्की काय करावे ?**

उत्तर दक्षता पथकाने अशा वाटपास तात्काळ प्रतिबंध करावा आणि मुद्देमाल जप्त करून गुन्हा नोंद करावा. अशा वस्तूंचे वाटप करणा-यास अटक करण्यात यावी.
(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२(१))

**प्रश्न ६ दक्षता पथक व खर्च नोंदविणारे पथक यात समन्वय कसा साधावा ?**

उत्तर दक्षता पथकाने केलेल्या कारवाईबाबत खर्च नोंद करणा-या पथकास जप्त केलेल्या मुद्देमालाबाबत व संबंधित उमेदवार / पाठीराखे / कार्यकर्ते याबाबत माहिती द्यावी. खर्च नोंदविणारे पथक यांनी अशा

मुद्देमालाची किंमत निश्चित करून संबंधित उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करण्याबाबत पुढील कार्यवाही करावी.

**प्रश्न ७ दक्षता पथकातील कोणत्या अधिका-यास दंडाधिकारी यांचे अधिकार असतात ?**

उत्तर दक्षता पथकाचे पथक प्रमुख (नायब तहसिलदार) यांना दंडाधिकारी यांचे अधिकार असतात.

**प्रश्न ८ विधानसभा / लोकसभा निवडणुकीमध्ये ज्याप्रमाणे खर्च निरीक्षक असतात तसे स्वतंत्र खर्च निरीक्षक या निवडणुकीत असतात का ?**

उत्तर नाही. राज्य निवडणूक आयोगाकडून अद्याप खर्च निरिक्षक नेमले जात नाहीत.

**प्रश्न ९ दक्षता पथकाला व्हिडिओ चित्रिकरणाचे अधिकार आहेत का ? व्हिडिओ चित्रिकरणातील पुरावे खर्च नोंदविताना गृहित धरावे का ?**

उत्तर होय. दक्षता पथकामध्ये व्हिडीओग्राफरचा समावेश असतो. त्यांचेमार्फत संशयास्पद / बेकायदेशीर कृत्यांचे व्हिडीओ चित्रीकरण केले जाते. व्हिडीओ चित्रीकरणाचे निरिक्षण करून त्यातील दृश्यात आढळून आलेल्या बाबींनुसार उमेदवाराच्या निवडणूक खर्चात अशा खर्चाची नोंद केली जाते.

**प्रश्न १० व्हिडिओ कॅमेरे असलेले पथक कोणत्या परिस्थितीत पाठवावे ? त्याबाबतचा निर्णय कसा घेतला जातो ?**

उत्तर एखाद्या व्यक्ती / वाहनाविषयी गोपनीय माहिती अथवा तक्रार प्राप्त झाल्यास किंवा संशय आल्यास व्हिडीओ कॅमेरे असलेले पथक पाठविले जाते. निवडणुकीच्या अथवा कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने असे करणे आवश्यक असल्यास पथक पाठवण्याचा निर्णय घेतला जाते.

**प्रश्न ११ एखाद्या उमेदवाराने लेखी विनंती केल्यास त्या उमेदवारामागे व्हिडिओ पथक पाठविणे थांबवले जाते काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न १२ आयकर खात्यातील अधिकारी यांची मदत कोणत्या प्रकरणात घ्यावी ?**

**उत्तर** मोठया प्रमाणावर रोख रक्कमेची संशयास्पद वाहतुक दिसून आल्यास आयकर खात्यातील अधिका-यांची मदत घेतली जाते.

**प्रश्न १३ ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये दक्षता पथकाची स्थापना करण्यात येते काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न १४ रोख रक्कम बाळगणे याबाबत कोणत्या कायद्यात तरतूद आहे ? उमेदवारास अथवा एखाद्या व्यक्तीस किती रोख रक्कम बाळगता येते ?**

उत्तर रोख रक्कम बाळगण्याबाबत आयकर अधिनियम, १९६१ मधील तरतुदींनुसार उमेदवारास अथवा एखाद्या व्यक्तीस एका वेळी रू. १०,०००/- पेक्षा जास्त रोख रक्कम बाळगण्यास अथवा त्याची वाहतुक करण्यास प्रतिबंध आहे.

## ५. <u>राजकीय पक्षाने केलेला खर्च सादर करणे</u>

**प्रश्न १ राजकीय पक्षांनी केलेला खर्च उमेदवारांच्या खर्च मर्यादेत समाविष्ट केला जातो काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५ आणि राज्य निवडणूक आयोग आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५ दि.२८ डिसेंबर, २००६ )

**प्रश्न २ राजकीय पक्षांनी केलेला खर्च कोणाकडे सादर करावा लागतो ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीसाठी राजकीय पक्षांनी केलेला खर्च हा जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करावा.

(संदर्भ:- राज्य निवडणूक आयोग आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५ दि.२८ डिसेंबर,२००६ )

**प्रश्न ३ राजकीय पक्षांना खर्चाचे विवरण सादर करण्याचा कालावधी काय असतो ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीमध्ये राजकीय पक्षामार्फत जो खर्च करण्यात येतो तो त्या नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीमध्ये त्या पक्षाने उभ्या केलेल्या उमेदवारांमध्ये कोणकोणत्या प्रमाणात वाटून दाखविण्यात यावा या संदर्भातील खर्चाचे विवरण हे राजकीय पक्षांनी ३ वेळा सादर करावयाचे असते. पहिले विवरण आचारसंहिता सुरू झाल्यापासून २० दिवसांनी, दुसरे विवरण आचारसंहिता सुरू झाल्यापासून ३५ दिवसांनी आणि शेवटचे विवरण निवडणुकीचा निकाल लागल्यापासून ३ दिवसात सादर करावयाचे असते.

(संदर्भ:- राज्य निवडणूक आयोग आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५ दि.२८ डिसेंबर,२००६ )

**प्रश्न ४ राजकीय पक्षांनी अथवा स्टार प्रचारकाने एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या प्रचारासाठी केलेल्या खर्चाची विभागणी उमेदवाराच्या खर्चात समविष्ट करण्याची तरतूद कशी आहे ?**

उत्तर राजकीय पक्षांनी अथवा स्टार प्रचारकाने एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या प्रचारासाठी केलेल्या खर्चाची विभागणी संबंधित उमेदवाराच्या संख्येनुसार केली जाते व असा खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चात गृहीत धरला जातो.

**प्रश्न ५ राजकीय पक्षांनी आपला खर्च सादर न केल्यास त्याचे काय परिणाम होऊ शकतात ?**

उत्तर आयोगाकडून अशा राजकीय पक्षाची नोंदणी रद्द केली जावू शकते.

**प्रश्न ६ टी. व्ही. वरील पक्षाच्या जाहिराती किंवा वृत्तपत्रातील पक्षाच्या जाहिरातीत उमेदवाराचा फोटो असेल तर त्याचा खर्च कोणाच्या खात्यात लावावा ?**

उत्तर असा खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करावा.

**प्रश्न ७ राजकीय पक्षांच्या कार्यालयातील पगारी कार्यकर्त्यावर केला जाणारा खर्च निवडणूक खर्चात घेतला जातो का ?**

उत्तर नाही. राजकीय पक्षांच्या कार्यालयातील नियमित आस्थापनेवरील पगारी कर्मचा-यांवर होणारा खर्च निवडणूक खर्चाचा भाग नसल्यामुळे तो उमेदवाराच्या निवडणूक खर्चात घेतला जात नाही.

**प्रश्न ८ निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर उमेदवाराने किती दिवसाच्या आत खर्चाचा हिशोब सादर करणे आवश्यक आहे ?**

उत्तर ३० दिवसाच्या आत

( संदर्भ - राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र आदेश रानआ २०२३/उनिख/ प्र.क्र.१३/ संगणकीकरण कक्ष का-१२ दि.१५/०२/२०२४)

## ६. <u>स्टार प्रचारकांबाबत</u>

**प्रश्न १ स्टार प्रचारक म्हणजे काय ?**

उत्तर स्टार प्रचारक म्हणजे राजकीय पक्षप्रमुख प्रचारासाठी पक्षातील प्रमुख, नामांकित, अतिमहत्त्वाचे व्यक्ती किंवा सिनेकलाकार यांची निवड करतात. ज्यांचा मतदारांवर प्रभाव पडून आपल्या पक्षांच्या उमेदवारास चांगली मते मिळतील अशा व्यक्तींची नेमणूक करणे म्हणजे स्टार प्रचारक होय.

**प्रश्न २ स्टार प्रचारकाच्या नेमणुकीबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या काय सूचना आहेत ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना प्रसिध्द केल्यापासून ७ दिवसांच्या आत राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्या राजकीय पक्षांनी त्यांचे महत्वाचे राजकीय पुढारी (Star Campaigners) यांची यादी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावी.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/का-५ दि.०८/११/२०११)

**प्रश्न ३ नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्ष, नोंदणीकृत पक्ष, अपक्ष किती स्टार प्रचारकांची नियुक्ती करू शकतात ?**

उत्तर मान्यताप्राप्त नोंदणीकृत राष्ट्रीय, राज्यस्तरीय तसेच इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष यांना २० महत्वाचे राजकीय पुढारी (Star Campaigners) यांची यादी सादर करता येईल. तसेच इतर अमान्यताप्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्ष यांना १० महत्वाचे राजकीय पुढारी (Star Campaigners) यांची यादी सादर करता येईल.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/का-५ दिनांक ०८/११/२०११)

**प्रश्न ४ स्टार प्रचारकांची यादी केव्हापर्यंत व कोणाकडे सादर करावी लागते ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना प्रसिध्द केल्यापासून ७ दिवसांच्या आत राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्या राजकीय पक्षांना त्यांचे महत्वाचे राजकीय पुढारी (Star Campaigners) यांची यादी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावी लागते.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/का-५ दिनांक ०८/११/२०११)

**प्रश्न ५ स्टार प्रचारकांची यादी कोठे पाहायला मिळेल ?**

उत्तर स्टार प्रचारकांची यादी संबंधित जिल्हाधिकारी आणि संबंधित निवडणूक निर्णय अधिका-याकडे पाहण्यासाठी उपलब्ध असते.

**प्रश्न ६ स्टार प्रचारकांनी प्रचारावर केलेला खर्च उमेदवारांच्या खर्चात धरावा का ?**

उत्तर स्टार प्रचारकांच्या प्रवास खर्चावरील खर्च वगळता प्रचारावर केलेला इतर सर्व खर्च (उदा. रॅली, सभा इ.) उमेदवारांच्या खर्चात गृहीत धरावा लागतो.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/का-५ दिनांक ०८/११/२०११)

**प्रश्न ७ स्टार प्रचारकासोबत उमेदवारांनीही प्रवास केल्यास असा प्रवास खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट होईल काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ८ एखाद्या उमेदवाराने सिने कलाकारांना अथवा नामवंत व्यक्तींना प्रचारासाठी आणले तर त्यांना स्टार प्रचारक म्हणता येईल का ? त्यांचा खर्च कशाप्रकारे नोंदवावा ?**

उत्तर अशा व्यक्तींचे नाव स्टार प्रचारकाच्या यादीत नसल्यास त्यांना स्टार प्रचारक म्हणता येणार नाही. अशा व्यक्तींच्या प्रवास खर्चासह निवडणूक प्रचारावर केलेला खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात नोंदवावा लागेल.

**प्रश्न ९ स्टार प्रचारक स्वत: उमेदवार असल्यास व त्यांनी स्वत:च्या प्रचारासाठीच प्रवास केलेला असेल तर असा खर्च त्यांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट होईल काय ?**

उत्तर होय. कोणत्याही उमेदवारास स्वत:च्या प्रभागामध्ये स्वताचे नाव स्टार प्रचारक म्हणून घोषित करता येणार नाही. प्रत्येक उमेदवाराने त्याच्या स्वत:च्या प्रभागामध्ये निवडणूक प्रचाराकरीता केलेल्या सर्व प्रवास खर्चाचा समावेश त्याच्या निवडणूक खर्चात होईल.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/का-५ दिनांक ०८/११/२०११)

**प्रश्न १०  स्टार प्रचारकाचे वाहन (विमान, हेलिकॉप्टर इत्यादी) खर्च, वाहनाचा पार्किंग व इतर खर्च तसेच व त्याचेसोबत असणारे इतर व्यक्ती यांचा सुद्धा खर्च पक्ष खर्चात धरता येईल का ?**

उत्तर  स्टार प्रचारकांचा खर्च पक्ष खर्चात धरता येईल. तथापि, त्यांचे सोबत इतर व्यक्ती आल्या असल्यास व त्यांनी प्रचारात सहभाग घेतला असल्यास असा खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चात नोंदवावा लागेल.

**प्रश्न ११  निवडणुकीमध्ये स्टार प्रचारकांची संख्या किती असावी ?**

उत्तर  भारत निवडणुक आयोगाकडून मान्यताप्राप्त पक्षांकरिता - ४० इत्तर पक्षांकरिता २०

( संदर्भ - राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र पत्र क्र रानिआ/नप-२०१६/प.क्र.४१/का.६, दि. २५/१०/२०१६)

## ७. पेड न्यूजबाबत

**प्रश्न १  पेड न्यूज म्हणजे काय ?**

उत्तर  काही उमेदवार, राजकीय पक्ष निवडणूकांमध्ये वर्तमानपत्रामधील बातम्यांच्या स्वरूपात आपली जाहिरात करतात. या जाहिरातीचे दृश्य स्वरूप जरी बातमीसारखे असले तरी ही प्रत्यक्षात प्रसार माध्यमांना  किंमत देवून अशा बातम्या छापून आणल्या जातात. उदा. अ) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक असलेल्या क्षेत्रामध्ये प्रसिध्द होणा-या / वितरीत होणा-या वृत्तपत्रामध्ये येणा-या बातम्या विशिष्ट पक्षाशी अथवा उमेदवाराशी संबंधित असून, त्याची वारंवारता फार जास्त असते. ब) एखाद्या प्रसार माध्यमामार्फत विशिष्ट पक्षाची अथवा उमेदवाराची प्रचार सभा, भाषणे अथवा इतर कार्यक्रम ज्याला अवास्तव प्रसिध्दी देण्यात येते.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .रानिआ/मनपा/२००९/प्र.क्र. १/का-५ दिनांक १६/०१/२०१२)

**प्रश्न २  एखादी न्यूज ही पेड न्यूज आहे हे ठरविण्याचे अधिकार कोणास आहेत ?**

उत्तर  नगरपरिषद किंवा नगरपंचायत निवडणूकीच्या संदर्भामध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा स्तरावरील समितीस सदरचे अधिकार आहेत.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .रानिआ/मनपा/२००९/प्र.क्र. १/का-५ दिनांक १६/०१/२०१२)

**प्रश्न ३  पेड न्यूजबद्दल कायदेशीर तरतुदी काय आहेत ?**

उत्तर  एखादी बातमी पेड न्यूज आहे असे समितीचे मत झाल्यास या पेड न्यूजवर झालेला खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करण्याबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिका-यांना कळविण्यात येते. (संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .रानिआ/मनपा/२००९/प्र.क्र. १/का-५ दिनांक  १६/०१/२०१२)

**प्रश्न ४ पेड न्यूज आहे असे निदर्शनास आल्यावर त्यासंबंधीचा खुलासा कोणाकडून घ्यावा ?**

उत्तर एखादी राजकीय जाहिरात / उमेदवाराची बातमी पेड न्यूजच्या स्वरूपात असल्याचे समितीचे मत झाल्यास या बातमीवर, जाहिरातीवर झालेला खर्च उमेदवाराच्या खर्चात का समाविष्ट करण्यात येवू नये अशी नोटीस संबंधित पक्ष / उमेदवार यांना देण्यात येईल.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .रानिआ/मनपा/२००९/प्र.क्र. १/का-५ दिनांक १६/०१/२०१२)

**प्रश्न ५ एखादी बातमी पेड न्यूज असल्याचे सिध्द झाल्यास त्याचा उमेदवारावर काय परिणाम होतो ?**

उत्तर अशा बातमीचा खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट होईल. तसेच निवडणूक याचिका दाखल झाल्यास न्यायालयाकडूनही अशा कृत्याची पुरावा म्हणून दखल घेतली जावू शकेल.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .रानिआ/मनपा/२००९/प्र.क्र. १/का-५ दिनांक १६/०१/२०१२)

**प्रश्न ६ जिल्हा स्तरावरील पेड न्यूज विषयक समितीची रचना कशी असते ? समितीच्या निर्णयावर अपीलाबाबत काय तरतुदी आहेत ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीसंदर्भात जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा स्तरावरील समितीची रचना खालीलप्रमाणे असते.

१. संबंधित जिल्हाधिकारी - अध्यक्ष

२. संबंधित पोलिस आयुक्त / पोलिस अधिक्षक यांचा प्रतिनिधी - सदस्य

३. जिल्हाधिकारी यांनी नेमलेला जिल्हाधिकारी कार्यालयातील अपर / उप जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी - सदस्य

४. प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचा नामनिर्देशित प्रतिनिधी - सदस्य

५. संबंधित प्रभागाचे निवडणूक निर्णय अधिकारी - सदस्य

६. संबंधित तहसिलदार अथवा नगर परिषदेचे मुख्याधिकारी- सदस्य

७. जिल्हा माहिती अधिकारी - सदस्य सचिव

जिल्हा स्तरावरील समितीने दिलेल्या निर्णयाविरूध्द अपिल करण्याची तरतूद नाही.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .रानिआ/मनपा/२००९/प्र.क्र. १/का-५ दिनांक १६/०१/२०१२)

**प्रश्न ७ पेड न्यूज ही संकल्पना केवळ वर्तमानपत्रातील बातम्यांसाठीच लागू आहे की दृकश्राव्य माध्यमांनाही लागू आहे ?**

उत्तर पेड न्यूज ही संकल्पना वर्तमानपत्र तसेच दृकश्राव्य माध्यमातील बातम्यांसाठी लागू आहे.

**प्रश्न ८ संबंधित उमेदवार यांनी पेड न्यूजचा आरोप मान्य केल्यास किंवा अमान्य केल्यास काय कार्यवाही करणे आवश्यक आहे ?**

उत्तर उमेदवाराने पेड न्यूजचा आरोप मान्य केल्यास अशा जाहिरातीचा खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट केला जातो.

**प्रश्न ९ जाहिरात व पेड न्यूज यात निश्चितपणे फरक कसा करावा ?**

उत्तर एखाद्या एकांगी बातमीमुळे विशिष्ट उमेदवारास निवडणुकीत थेट फायदा पोहोचत असल्यास अशा बातमीची जिल्हास्तरावरील समितीमार्फत छाननी करून शहानिशा करण्यात यावी . एखाद्या निवडणूक सभेसंबंधी सर्वसाधारण वार्तांकन पेड न्यूज या सदरात मोडत नाही.

## ८. निवडणूक खर्च विहित नमुन्यात सादर करण्याबाबत विवरणपत्रे

**प्रश्न १ नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणुकीतील उमेदवारास आपला दैनंदिन निवडणूक खर्च कोणत्या नमुन्यात ठेवावा लागतो ? असा खर्च निवडणूक निर्णय अधिकारी यांना केव्हा सादर करावा लागतो ?**

उत्तर उमेदवारास निवडणुकीतील दैनंदिन खर्च हा प्रपत्र - २ या नमुन्यात ठेवावा लागतो. असा खर्च निवडणूक निर्णय अधिकारी यांना दुस-या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत सादर करावा लागतो. (संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५ मधील परिच्छेद ३)

**प्रश्न २ उमेदवाराला खर्च सादर करण्याबाबतच्या विवरणपत्राचे नमुने कोण व केव्हा देईल ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी हे निवडणूक खर्च सादर करण्याबाबतच्या विवरणपत्रांचे नमुने उमेदवारास नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी देतात.

**प्रश्न ३ उमेदवाराला खर्चविषयक प्रशिक्षण देण्याची तरतूद आहे का ? असे प्रशिक्षण कोणी व केव्हा देणे अपेक्षित आहे ?**

उत्तर उमेदवाराने आपला निवडणूक विषयक दैनंदिन खर्च कसा ठेवावा यासंबंधी त्यांना निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून बैठकीत सविस्तर माहिती दिली जाते. सर्वसाधारणपणे उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या वेळेनंतर व चिन्ह वाटपानंतर निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या बैठकीमध्ये अशी सविस्तर माहिती देणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे उमेदवारास याबाबत लेखी सूचना देखील देण्याचा प्रघात आहे.

**प्रश्न ४ निवडणूक खर्च सादर करावयाच्या विवरणपत्रासोबत काय काय जोडणे आवश्यक आहे ?**

उत्तर दैनंदिन निवडणूक खर्च सादर करावयाच्या विवरण पत्रासोबत देयकाची / पावतीची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे. अशी प्रत तपासणी करून उमेदवारास परत दिली जाते. ती उमेदवाराने जतन करून ठेवणे व अंतिम हिशेबासोबत मूळ प्रतीत सादर करणे आवश्यक असते.

**प्रश्न ५ निवडणूक प्रतिनिधी उमेदवाराचे वतीने खर्च सादर करू शकतो का ?**

उत्तर होय.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५मधील परिच्छेद ४)

**प्रश्न ६ एखाद्या बाबीवरील देयक / बिल टप्प्याटप्प्याने दिले असेल तर विवरणपत्रात ते कसे दाखवावे ?**

उत्तर टप्प्याटप्प्याने केलेल्या खर्चानुसार नोंदी घेऊन दैनंदिन खर्च दर्शवावा. मात्र अंतिम खर्चाच्यावेळी खर्च एकत्रित करुन बाबनिहाय दर्शवावा.

**प्रश्न ७ निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर केलेला निवडणूक खर्च सर्वसाधारण जनतेस कसा कळतो ? पत्रकारांसाठी या संदर्भात काय सुविधा आहेत ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर केलेला खर्च निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केला जातो व त्याची माहिती प्रसिध्दीसाठी पत्रकारांसाठी दिली जाते.

## ९. दैनंदिन निवडणूक खर्च सादर करणे व न केल्यास होणारी कारवाई

**प्रश्न १ उमेदवारांनी दैनंदिन निवडणूक खर्च निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे काय ?**

उत्तर होय.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५मधील परिच्छेद ३)

**प्रश्न २ खर्चाचा हिशोब नेमका कोणाकडे सादर करावा ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडे निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करावा.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५ मधील परिच्छेद ३)

**प्रश्न ३ उमेदवाराला स्वतः येऊन खर्च सादर करावा लागतो का ?**

उत्तर नाही. हे आवश्यक नाही. उमेदवार अथवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीव्दारा स्वाक्षरी केलेले विवरणपत्र प्रतिनिधी सोबत पाठविले तरी चालते.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५ मधील परिच्छेद ४)

**प्रश्न ४ निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या कालावधीत दैनंदिन खर्च दाखल केला नाही तर काय होईल ?**

उत्तर दैनंदिन खर्च दाखल न केल्यास उमेदवारास नोटीस बजावून त्यास खुलासा करण्याची संधी देण्यात येते. खुलासा समाधानकारक नसल्यास अथवा सादर न केल्यास भारतीय दंड विधानाच्या कलम १७१(आय) नुसार गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही केली जावू शकते.

**प्रश्न ५ उमेदवाराने केलेल्या खर्चाबद्दल ति-हाईत व्यक्तीने तक्रार अथवा माहिती दिल्यास त्याचा समावेश खर्चात कसा करावा ?**

उत्तर अशी तक्रार प्राप्त झाल्यानंतर चौकशी करून सकृतदर्शनी तथ्य आढळल्यास उमेदवारास नोटीस बजावून त्यास खुलासा करण्याची संधी देण्यात येते. खुलासा समाधानकारक नसल्यास अथवा सादर न केल्यास व तक्रार योग्य असल्याची खात्री झाल्यास असा खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट केला जावू शकतो.

**प्रश्न ६ उमेदवाराने दाखविलेला खर्च व प्रत्यक्ष झालेला खर्च यात पुराव्यानिशी तफावत आढळत असेल तर खर्च पथकाने काय कार्यवाही करावी ?**

उत्तर उमेदवाराने दर्शविलेल्या खर्चात व प्रत्यक्ष झालेल्या खर्चात फरक आढळल्यास उमेदवारास नोटीस बजावून त्यास खुलासा करण्याची संधी देण्यात येते. खुलासा समाधानकारक नसल्यास अथवा सादर न केल्यास असा खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट केला जावू शकतो.

**प्रश्न ७ प्रमाणके / vouchers यावर उमेदवार किंवा त्याचे प्रतिनिधीची सही नसल्यास ती स्विकारावीत का ?**

उत्तर नाही. मात्र, सर्व प्रमाणके उमेदवार अथवा प्रतिनिधी यांनी साक्षांकीत केलेली असणे आवश्यक आहे.

**प्रश्न ८ राजकीय पक्षाकडून केलेला खर्च पक्षप्रमुख कोणाकडे सादर करतात ?**

उत्तर राजकीय पक्षाकडून केलेला खर्च हा जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करण्यात येतो.

(संदर्भ:- राज्य निवडणूक आयोग आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५ दि.२८ डिसेंबर,२००६ )

**प्रश्न ९ थेट निवडून येणारे नगराध्यक्ष निवडणुकीकरिता उमेदवाराने करावयाची खर्चाची मर्यादा स्वतंत्र देण्यात आली आहे काय**

उत्तर होय

( संदर्भ - महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २५/१०/२०१६)

## १०. निवडणूक खर्चासाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे

**प्रश्न १ उमेदवाराचे यापूर्वीच बचत खाते असेल तरी निवडणूक खर्चासाठी स्वतंत्र खाते उघडणे आवश्यक आहे का ?**

उत्तर होय. राज्य निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार निवडणूक खर्चासाठी स्वतंत्र खाते उघडणे आवश्यक आहे.

(संदर्भ:- राज्य निवडणूक आयोग आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५ दि.३० जुलै,२०११)

**प्रश्न २ प्रत्येक निवडणुकीसाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे आवश्यक आहे का ?**

उत्तर होय. राज्य निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार प्रत्येक निवडणुकीसाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे आवश्यक आहे.

(संदर्भ:- राज्य निवडणूक आयोग आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५ दि.३० जुलै,२०११)

**प्रश्न ३ निवडणूक खर्चासाठी कोणत्या प्रकारच्या बँकेत खाते उघडावे ? व खात्याचा प्रकार कोणता ?**

उत्तर राष्ट्रीयकृत बँकेत बचत खाते उघडावे.

**प्रश्न ४ खाते मतदारसंघातच उघडणे आवश्यक आहे का ?**

उत्तर होय.

**प्रश्न ५ निवडणूक प्रतिनिधीच्या नावे खाते उघडता येईल का ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ६ उमेदवारास आपल्या निवडणूक प्रतिनिधीसोबत संयुक्त खाते उघडता येईल काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न ७ एकाच प्रभागातील एकाच पक्षाच्या पक्षाच्या दोन उमेदवारांना संयुक्त खाते उघडता येऊ शकते काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ८ पोस्ट ऑफिसमध्ये खाते उघडता येईल काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ९ अशा खात्यात, उमेदवारी दाखल करतानाच पूर्ण रक्कम जमा करणे बंधनकारक आहे काय?**

उत्तर नाही. असे बंधनकारक नाही.

**प्रश्न १० निवडणूक संपल्यानंतर बँकेचे प्रमाणित विवरणपत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या खर्च पथकास सादर करणे आवश्यक आहे का ?**

उत्तर होय.

**प्रश्न ११ एखाद्या व्यक्तीने एका निवडणुकीसाठी उघडलेले खाते नंतरच्या निवडणुकीसाठी वापरता येऊ शकते काय ?**

उत्तर नाही. प्रत्येक निवडणुकीसाठी स्वतंत्र खाते उघडण्याच्या सूचना आहेत.
(संदर्भ:- राज्य निवडणूक आयोग आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५ दि.३० जुलै,२०११)

## ११. <u>निवडणूक निकालानंतर अंतिम हिशोब सादर करणे व होणारी कार्यवाही</u>

**प्रश्न १ निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर उमेदवारास किती दिवसात अंतिम हिशोब सादर करणे बंधनकारक आहे ? हया कालावधीची गणना कशी केली जाते ?**

उत्तर निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून उमेदवाराने तीस दिवसांमध्ये अंतिम हिशेब सादर करणे बंधनकारक आहे. निवडणूक निकालानंतरचा दिवस हा पहिला दिवस गणला जातो. त्या दिवसापासून तीस दिवसाची गणना करताना शेवटचा दिवस जर सार्वजनिक सुटीचा दिवस असेल तर त्याच्या नंतरचा कार्यालयीन कामकाजाचा दिवस हा शेवटचा दिवस समजण्यात येतो.

**प्रश्न २ अंतिम हिशोब उमेदवाराने कोणाकडे दाखल करावा ?**

उत्तर उमेदवाराने निवडणूकीचा अंतिम हिशेब हा जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिका-याकडे दाखल करावा.
(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५ मधील परिच्छेद ७)

**प्रश्न ३ याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांची काय जबाबदारी आहे ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक लढविणा-या उमेदवारास अंतिम हिशोब कधी व कोणाकडे आणि कशा प्रकारे दाखल करणे आवश्यक आहे यासंबंधी लेखी नोटीस द्यावी.

**प्रश्न ४ खर्चाबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये काय आहेत ?**

उत्तर जिल्हाधिकारी हे उमेदवाराकडून प्राप्त झालेला अंतिम खर्चाचा हिशेब हा आयोगाने ठरवून दिलेल्या पध्दतीनुसार सादर केला असल्याची खात्री करतात. मात्र ठरवून दिलेल्या पध्दतीनुसार नसेल तर आवश्यकतेनुसार चौकशी सुरू करू शकतात. तसेच ज्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांचा अंतिम खर्चाचा हिशेब हा आयोगाने ठरवून दिलेल्या पध्दतीनुसार बरोबर व परिपूर्ण असल्याचे दिसून आले तर अशा उमेदवारांनी सादर केलेला अंतिम खर्चाचा हिशेब हा नियमानुसार असल्यामुळे स्विकारण्यात आल्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करतात.
(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५मधील परिच्छेद १२)

**प्रश्न ५ खर्चाचा अंतिम हिशेब सादर करताना त्यासोबत प्रमाणकांची (बिलांची) व त्यासोबत प्रतिज्ञापत्राची आवश्यकता असते काय ?**

उत्तर होय. खर्चाचा अंतिम हिशेब हा प्रपत्र - १ मध्ये सादर करण्यात येतो. त्यासोबत प्रमाणकांची मूळ प्रत आणि प्रपत्र - ३ मधील प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५ मधील परिच्छेद १०)

**प्रश्न ६ अंतिम हिशेब उमेदवाराच्या व्यतिरिक्त अन्य व्यक्तीस सादर करता येतो काय ?**

उत्तर उमेदवाराची स्वाक्षरी असलेला परिपूर्ण खर्चाचा हिशेब उमेदवाराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस कार्यालयात सादर करता येतो.

**प्रश्न ७ अंतिम हिशेबाच्या प्रपत्रावर उमेदवाराबरोबर उमेदवाराच्या निवडणूक प्रतिनिधीची स्वाक्षरी आवश्यक असते काय ?**

उत्तर अंतिम हिशेब हा निवडणूक प्रतिनिधीने दाखल केला असेल तर त्यावर उमेदवाराने प्रतिस्वाक्षरी करणे आणि निवडणूक प्रतिनिधीने ठेवलेल्या हिशेबाची सत्यप्रत आहे असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५ सोबतचे प्रपत्र - १)

**प्रश्न ८ निवडून न आलेल्या उमेदवारांना सुद्धा खर्च अंतिमरित्या सादर करावा लागतो का ?**

उत्तर होय. निवडणूक लढविणा-या सर्व उमेदवारांना असा खर्च सादर करणे बंधनकारक असते.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. एसईसी-१०९५/१०१/ डेस्क-३,दिनांक ०७/०२/१९९५ मधील परिच्छेद ४)

**प्रश्न ९ निवडून आलेल्या किंवा निवडून न आलेल्या उमेदवाराने विहित पद्धतीने खर्च सादर केला नाही तर त्याचे काय परिणाम होतील ?**

उत्तर नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या किंवा निवडून न आलेल्या उमेदवाराने विहित पद्धतीने खर्च सादर केला नाही तर अशा उमेदवारास राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार जिल्हाधिकारी हे निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्याबरोबरच त्याची निवड रद्द करू शकतात.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१)(१D) आणि राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.रानिआ/नप-२००९/प्र.क्र.१३/का.०५, दि.०५/०६/२०१०)

## १२. खर्च मर्यादेचे उल्लंघनाबाबत

**प्रश्न १ खर्च मर्यादा उल्लंघन व त्याद्वारे उमेदवार अपात्र ठरणे याबाबत कायदेशीर तरतूद काय आहे?**

उत्तर अशा उमेदवारास अपात्र ठरविण्याची कार्यवाही केली जाऊ शकते. **नगरपरिषद अथवा नगरपंचायतीची** निवडणूक लढविणा-या उमेदवारांना ३ वर्षासाठी सदस्य म्हणून राहण्यास अथवा निवडणुका लढविण्यास अपात्र ठरविण्यात येवू शकते. नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या निवडणूकीमध्ये हिशोब सादर न केल्यास अनर्हतेचे आदेश काढण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१)(1D) आणि राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/नप-२००९/प्र.क्र. १३/का.०५,दि. ०५/०६/२०१०)

**प्रश्न २ खर्च मर्यादेचे उल्लंघन झाल्याबाबत सक्षम प्राधिका-याने दिलेल्या निर्णयाविरुध्द अपील करता येऊ शकते काय ? असल्यास कोणाकडे ?**

उत्तर होय. याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे दाद मागता येते.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१)(1D) आणि राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. रानिआ/नप-२००९/प्र.क्र. १३/का.०६, दिनांक ०५/०६/२०१० )

# प्रकरण २१.

# निवडणुकीसंदर्भातील गुन्हे

## (Offences related to Elections)

### १. आदर्श आचारसंहितेसंदर्भातील गुन्हे

**प्रश्न १ आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास उमेदवार किंवा इतरांवर कोणकोणत्या कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल होऊ शकतात?**

उत्तर आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास भंग करणा-या व्यक्तिविरुध्द प्रामुख्याने खालील कायद्यातील तरतुदींनुसार गुन्हे दाखल होऊ शकतात :-

i. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५
ii. भारतीय दंड संहिता
iii. फौजदारी प्रक्रिया संहिता
iv. महाराष्ट्र पोलीस अधिनियम
v. ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम, २०००
vi. महाराष्ट्र मालमत्ता विरुपण (प्रतिबंध) कायदा, १९९५
vii. शस्त्र अधिनियम, १९५९
viii. मोटार वाहन अधिनियम, १९८८
ix. धार्मिक स्थळे (गैरवापरास प्रतिबंध) अधिनियम, १९८८
x. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९

**प्रश्न २ आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास गुन्हा कोणी दाखल करावा ?**

उत्तर ज्या कायदयाचा भंग झाला आहे त्या संबंधित कायदयाच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार अधिकारी यांनी देखील गुन्हा दाखल करावयाचा आहे.निवडणूक आचारसंहितेच्या भंगाच्या प्रकरणी निवडणूक निर्णय अधिका-यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी किंवा संबंधित पोलिस अधिकारी गुन्हा दाखल करु शकतात. विरुपणाचे बाबतीत संबंधित नगरपरिषद अथवा नगरपंचायतीचे अधिकारी किंवा जागेचे मालक यांनी गुन्हा दाखल करावयाचा आहे.

**प्रश्न ३ आदर्श आचारसंहितेचा भंग शासकिय कर्मचा-याकडूनही होऊ शकतो. यासंदर्भात गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया उमेदवारासारखीच आहे का ?**

उत्तर होय. भारतीय दंड संहिता कलम १८८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३० व ३१ अन्वये अशा प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात येतात.

**प्रश्न ४ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर विनापरवाना सभा घेता येतील अथवा मिरवणुका काढता येऊ शकतात काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ५ धर्म, वंश, जन्मस्थान, निवास, भाषा इत्यादी कारणावरुन समाजातील गटामध्ये शत्रुत्व वाढविणे व एकोपा टिकण्यास बाधक अशी कृती केल्यास भारतीय दंड संहिता अंतर्गत कोणत्या कलमान्वये गुन्हा नोंदविला जातो?**

उत्तर अशा प्रकरणी भारतीयदंड संहिता कलम १५३(ए), भारतीय दंड संहिता कलम ५०५(२), आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२ (३) अंतर्गत गुन्हा नोंदविला जातो.

**प्रश्न ६ जातीय किंवा धार्मिक तेढ उत्पन्न करणारे पोस्ट किंवा भाषण करण्यासंदर्भात कायद्याने काय शिक्षा आहे?**

उत्तर कोणत्याही माध्यमातून (व्यक्तिसमोर असो वा ऑनलाईन) धार्मिक किंवा जातीय द्वेष पसरवणारे प्रचार करणं हे गभीर निवडणूक गुन्हा आहे. आरतीय दंड संहिता अंतर्गत कलम १५३A अनुसार धर्म, जात इत्यादी आधारे संमुदायांत शत्रुत्व निर्माण करणाऱ्यास ३ वर्षापर्यंत कारावास आणि दंड अशी शिक्षा आहे. तसेच निवडणुकीच्या संदर्भात विशेष तरतूद देखील आहे लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १२५ अनुसार कोणत्याही उमेदवाराने अथवा त्यांच्या समर्थकाने जात-पंथ यात तेढ निर्माण होईल असे भाषण/प्रचार केल्यास ३ वर्षापर्यतच्या कारावासाची किंवा दंडाची शिक्षा लागू होते ([PDF] provisions of law relating to electoral offences and corrupt practices). या गुन्ह्यास दखलपात्र आणि अजामीनपात्र स्वरूप देण्यात आले आहे. उदाहरणार्थ, २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयानेही निवडणुकीत धर्म अथवा जातीच्या आधारावर मतदानाची अपील करणे अवैध ठरवले आहे. त्यामुळे धार्मिक जातीय भावनाचा गैरवापर हा कठोर शिक्षेस पात्र गुन्हा आहे.

**प्रश्न ७ शासकिय वाहनाचा उमेदवाराच्या प्रचारासाठी गैरवापर केल्यास संबंधित कार्यालयीन प्रमुखाविरुध्द गुन्हा नोंदविता येतो का ?**

उत्तर होय. भारतीय दंड संहिता कलम १७१C, १७१F तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९ अंतर्गत कायदेशीर कारवाई केली जाते.

**प्रश्न ८** **रिकाम्या शासकिय जागांचा अथवा कार्यालयीन परिसराचा प्रचारासाठी उपयोग केला गेल्यास त्याबाबतची तक्रार पोलिस स्टेशनमध्ये कोणी दिली पाहीजे ?**

उत्तर संबंधित विभागाचे कार्यालय प्रमुखाने किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या इतर अधिकारी व कर्मचा-याने तक्रार पोलिस स्टेशनमध्ये देणे अभिप्रेत आहे.

**प्रश्न ९** **शासकीय सेवेतील अधिकारी किंवा कर्मचारी उमेदवाराच्या प्रचारात प्रत्यक्षात अथवा अप्रत्यक्षात मदत करत असल्यास त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविता येतो का ?**

उत्तर होय. अशा प्रकरणी भारतीय दंड संहिता कलम१८८ आणि महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३० व महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९ अन्वये कारवाई केली जाते.

**प्रश्न १०** **मतदान पूर्ण करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेचा भंग करुन प्रचार किंवा जाहीर सभा भरविल्यास कोणत्या कलमाअंतर्गत गुन्हे नोंदविले जातात ?**

उत्तर महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २३

**प्रश्न ११** **मतदारांना प्रलोभन / आमिष दाखविल्यास कशा स्वरुपाची कार्यवाही केली जाते?**

उत्तर लाच घेणे-देणे या प्रकरणी भारतीय दंड संहिता १७१ (ई), १७१(बी) आणि महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२ (१) अन्वये कारवाई केली जाते.

**प्रश्न १२** **सोशल मीडियावर किवा अन्यत्र एखाद्या उमेदवाराबद्दल जाणीवपूर्वक खोटे दावे फेक न्यूज पसरवणे हा निवडणूक गुन्हा आहे काय?**

उत्तर होय. कोणत्याही उमेदवाराच्या वैयक्तिकं चारित्र्याबद्दल अथवा आचाराबद्दल खोटी किंवा बदनामीकारक माहिती प्रसारित करणे हा IPC आणि निवडणूक कायद्यांतर्गत गुन्हा आहे. आरतीय दंड संहितेच्या कलम १७१G अंतर्गत मतदारांची निर्णयप्रक्रिया प्रभावित करण्यांच्या उद्देशाने खोटे विधान प्रसृत करणे हा गुन्हा असून त्यासाठी दंड (जेल ऐवजी) ची तरतूद आहे (Offences Related to Elections in IPC- Drishti Judiciary). उदाहरणार्थ, कोणीतरी उमेदवार बदनाम होईल अशी खोटी अफवा सोशल मीडियावर पसरवली, तर त्या व्यक्तीवर कलम १७१G अन्वये कारवाई होऊ शकते. तसेच जर ही खोटी माहिती समाजात अशांतता पसरवणारी असेल तर IPC कलम ५०५ (जनतेमध्ये अफवा पसरवणे) अंतर्गतही कारवाई  निवडणूक आयोग देखील अशा "फेक न्यूज प्रकरणाकडे कठोर लक्ष देऊन संबंधितांवर कारवाईची शिफारस करत आहे. त्यामुळे अनधिकृत, असत्य माहिती पसरवणं हा निवडणूक गुन्हा ठरतो.

## २. मालमत्ता विरुपण संदर्भातील गुन्हे

**प्रश्न १ मालमत्ता विरुपण म्हणजे नेमके काय ? या संदर्भात कोणता कायदा अस्तित्वात आहे ?**

उत्तर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी अथवा जनतेच्या दृष्टीस पडेल अशा ठिकाणी पोस्टर्स, बॅनर्स, किऑक्स किंवा पेंटीग लावण्यासाठी संबंधित मालमत्ता खात्याची / संस्थेची /मालकाची परवानगी न घेता केलेली कृती म्हणजे मालमत्ता विरुपण होय. या संदर्भात महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंध कायदा १९९५ अस्तित्वात आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंध कायदा १९९५ मधील कलम २ (b))

**प्रश्न २ मालमत्ता विरुपण प्रतिबंध कायदयाचे अंमलबजावणी यंत्रणा म्हणून कोणता शासकीय विभाग कार्य करतो ? याबाबत गुन्हा कोणास दाखल करता येईल ?**

उत्तर मालमत्ता विरुपण प्रतिबंध कायदयाची अंमलबजावणी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत केली जाते. याबाबत गुन्हा दाखल करण्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा जागेचे मालक कार्यवाही करु शकतात.

(संदर्भ- महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंध कायदा १९९५)

**प्रश्न ३ या कायद्याअंतर्गत उमेदवाराला प्रचार करण्यासाठी कोणाची परवानगी घेणे आवश्यक आहे?**

उत्तर या कायद्याअंतर्गत प्रचार करण्यासाठी संबंधित जागा मालकाची ना हरकत व स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी आवश्यक असते.

(संदर्भ- महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंध कायदा १९९५)

**प्रश्न ४ मालमत्ता विरुपण प्रतिबंध कायदयाचा भंग झाल्यास गुन्हा कोणावर दाखल होईल?**

उत्तर या संबंधी उमेदवार व जाहिरात इत्यादी प्रसिध्द करणारे प्रकाशक यांच्याविरुध्द गुन्हा दाखल होऊ शकतो.

(संदर्भ- महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंध कायदा १९९५ मधील कलम ३)

**प्रश्न ५ एखाद्याची खाजगी मालमत्ता उमेदवाराने प्रचाराकरिता विरुपित केल्यास मालमत्ताधारकास नुकसान भरपाई दिली जाऊ शकते का ?**

उत्तर नाही. संबंधितास दोषसिध्दीनंतर तीन महिन्यापर्यंत कारावासाची किंवा रु.२०००/- दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा होऊ शकतात. तसेच विरुपण करणा-याने दंड व भरपाई न दिल्यास त्याचेवर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार थकबाकी कसुरदार म्हणून वसूलीची कार्यवाही करता येईल.

(संदर्भ- महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंध कायदा १९९५ मधील कलम ३ व ५)

**प्रश्न ६ शासकीय मालमत्तेच्या व्याख्येमध्ये कोणत्या मालमत्ता समाविष्ट होतात ?**

उत्तर शासकीय मालमत्तेमध्ये शासनाच्या मालकीच्या इमारती, मोकळ्या जागा, रस्ते, पूल, भुयारी मार्ग, शासकीय मालकीची किंवा शासकीय यंत्रणेच्या वापरात असलेली वाहने, विजेचे/ टेलिफोनचे खांब इत्यादीचा समावेश होतो.

(संदर्भ- महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंध कायदा १९९५ मधील कलम २(d))

**प्रश्न ७ खाजगी मालमत्तेवर प्रचार फलक, हॅन्ड बिल, मजकूर लिहिणे, आदी बाबींसाठी परवानगी घेणे बंधनकारक आहे का ?**

उत्तर होय.

(संदर्भ- महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंध कायदा १९९५ मधील कलम ३ (i))

**प्रश्न ८ मालमत्ता विरुपण प्रतिबंधक कायदा केवळ निवडणूक आचारसंहिता अस्तित्वात असतानाच लागू असतो काय ?**

उत्तर नाही, सदैव अंमलात असतो.

**प्रश्न ९ मालमत्ता विरुपण प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन केल्यास काय शिक्षा होते?**

उत्तर संबंधितास दोषीसिध्दीनंतर तीन महिन्यापर्यंतचे कारावासाची किंवा रु.२०००/- दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा होऊ शकतात.

(संदर्भ- महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंध कायदा १९९५ मधील कलम ३)

## ३. मतदान प्रक्रियेदरम्यान व्यत्यय

**प्रश्न १ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया चालू असताना कोणकोणती कृत्ये गुन्हा नोंदविण्यास पात्र ठरतात व अशा कृत्यांबाबत कोणत्या कलमाखाली कार्यवाही केली जाऊ शकते?**

उत्तर अशा प्रकरणी

| अ.क्र. | गुन्ह्याचा प्रकार | कायद्यातील तरतूद |
|---|---|---|
| १ | मतदारांना लाच देणे | भारतीय दंड संहिता कलम १७१B, महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२ (१) |
| २ | मतदारांवर गैरवाजवी प्रभाव टाकणे | भारतीय दंड संहिता कलम १७१C व १७१F, महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२ (२) |

| | | |
|---|---|---|
| ३ | तोतयागिरी करणे | भारतीय दंड संहिता कलम १७१D, १७१F |
| ४ | अपप्रचार करणे | भारतीय दंड संहिता कलम १७१G, महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२ (४) |
| ५ | उमेदवाराचे परवानगीशिवाय उमेदवाराच्या प्रचारासाठी खर्च करणे | भारतीय दंड संहिता कलम १७१H |
| ६ | मतदानाचे दिवशी मतदारांची बेकायदेशीरपणे ने-आण करणे | महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२ (५) |

**प्रश्न २ मतदानापूर्वीच्या ४८ तासांच्या 'मौन कालावधीत जर सोशल मीडियावर प्रचार केला तर तो गुन मानला जाईल का? त्यासाठी काय शिक्षा आहे. ?**

उत्तर होय, मलदानापूर्वीच्या ४८ तासात (मतेमहार कालावधीत) कोणतेही प्रचारmaterial प्रसारित करणे हा गुन्हा आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ अंतर्गत कलम १२६ अनुसार मतदानापूर्वीच्या दोन दिवसांत टीव्ही, दूरदर्शन आणि तत्सम माध्यमाद्वारे प्रचार करण्यास बंदी आहे (Press Release: Press Information Bureau) (Press Release: Press Information Bureau). निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की सोशल मीडिया पोस्ट मेसेजेसही या 'तत्सम माध्यमां मध्ये येतात. हा कायदा मोडल्यास २ वर्षांपर्यंत कारावास किंवा दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात ( Press Release. Press Information Bureau), (कलम १२६(२)). त्यामुळे फेसबुक, ट्विटर, WhatsApp इत्यादीवर निवडणूक प्रचार संबंधित पोस्ट/अपीले मतदानाच्या ४८ तासांच्या शांत कालावधीत केल्यास तो निवडणूक गुन्हा ठरतो.

**प्रश्न ३ निवडणुकांमध्ये प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्यातील प्रत्येक प्रतीवर प्रत क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर निवडणुकामध्ये प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्यावर मुद्रणालयाचे नाव, प्रकाशकाचे नाव व छापण्यात येणाऱ्या प्रतीची संख्या हा तपशील नमूद करणे आवश्यक आहे. याबाबत स्पष्ट करण्यात येते कि, प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्याच्या प्रत्येक प्रतीवर प्रत क्रमांक नमूद करणे आवश्यक नाही.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग पत्र क्रमांक- रानिआ/मनपा/-२०१७/प्र.क्र.२०/का.५ दि.१३ फेब्रुवारी २०१७),

**प्रश्न ४** **एखादा मतदार मतदान करतांना मोबाईलने बॅलेटचा ईव्हीएमचा फोटो घेऊन सोशल मीडियावर टाकेल, तर ते कायदेशीर आहे काय?**

उत्तर नाही, असे करणे हे निवडणूक गोपनीयता नियमांचे उल्लंघन असून गुन्हा ठरू शकतो. भारतात मतदानाची गुप्तता ही मूलभूत तत्व आहे, जी कायद्याने संरक्षित केली आहे. कलम १२८ (लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१) नुसार मतदानाचे गोपनीयतेचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यास ३ महिन्यापर्यंत कारावास होऊ शकतो (Secret ballot: Taking selfie, making video in polling booth may land you in jail India Today). मतदारानेही स्वतःच्या मतदानाचा पुरावा उघडपणे प्रदर्शित करू नये निवडणूक नियमावलीचे नियम ३९ आणि ४९MA अनुसार मतदान कक्षात मोबाइल कॅमेरा नेणे मनाई आहे (Secret ballot: Taking selfie, making video in polling booth may land you in jail India Today). जर कोणी मतदानाचे चित्रफीता काढून समाजमाध्यमात टाकले, तर त्या व्यक्तीवर भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ अतर्गत (सरकारी आदेशाचे उल्लघन) कारवाई होऊ शकते (३ ते ६ महिन्यांचा कारावास). २०२४ च्या निवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाने मतदान केंद्रात सेल्फी घेणे किंवा व्हिडिओ बनवणे यांना कठोर मनाई केली असून उल्लंघन केल्यास थेट पोलिस कारवाईचा इशारा दिला आहे (Secret ballot: Taking selfie, making video in polling booth may land you in jail India Today). त्यामुळे मतदानाचा गोपनीयता भंग हा दंडनीय अपराध आहे.

**प्रश्न ५** **सोशल मीडियावर बनावट खाते उघडून विरोधी उमेदवाराची बदनामी करणे किंवा मतदारांना दिशाभूल करणारा प्रचार चालवणे याबाबत काय कारवाई होऊ शकते?**

उत्तर अशा प्रकारचा बनावट डिजिटल प्रचार अनेक कायद्यांचे उल्लंघन करु शकतो. माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अंतर्गत जर कोणीतरी बनावट सोशल मीडिया account द्वारे स्वतःची ओळख लपवून फसवणूक करत असेल तर कलम ६६D अनुसार तो ३ वर्षापर्यतच्या कारावास आणि दंडाचा गुन्हा आहे. त्याचबरोबर, बनावट खाते वापरून विरोधकांविरुद्ध खोटे आरोप/पोस्ट टाकणे. हे वरीलप्रमाणे IPC १७१G (खोटी विधाने) किंवा IPC ४९९ (मानहानी) चेही उल्लंघन ठरते. नुकतेच निवडणूक आंयोगाने मोठ्या सोशल मीडिया कंपन्यांसोबत एका "स्वयंसेवी आचारसंहिता करारावर सह्या केल्या आहेत (मार्च २०१९) ज्यामुळे बनावट खाते, फेक न्यूज, हिंसक सामग्री यावर तत्परतेने कारवाई करणे या कंपन्यांनी मान्य केले आहे (Press Release: Press Information Bureau). त्यामुळे अशा बनावट सोशल मीडिया प्रचाराला आळा घालण्यासाठी तांत्रिक पातळीवरही यंत्रणा सज्ज आहे. कोणत्याही स्वरुपात डिजिटल फसवणूक वा अपप्रचारे आढळल्यास आयटी ॲक्ट आणि भादंवि अनुसार कठोर कारवाई होऊ शकते.

**प्रश्न ६ मतदान प्रक्रिये दरम्यान व्यत्यय आणल्यास अशा वेळी गुन्हा दाखल करण्याची जबाबदारी कोणावर आहे ?**

उत्तर मतदान केंद्रातील व १०० मीटर परिसरातील निवडणूक विषयक अपराधाबाबत मतदान केंद्राध्यक्ष हे गुन्हा दाखल करण्यास सक्षम असतात. मतदान केंद्रामध्ये घडलेल्या घटनेबाबत मतदान केंद्राध्यक्षाने तर बाहेरील घटनांबाबत सुरक्षा पथकातील कर्मचाऱ्याने गुन्हा दाखल करणे अपेक्षित आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २५)

**प्रश्न ७ मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशीन जबरदस्तीने ताब्यात घेणे, कागदपत्रे (मतपत्रिका, चिन्हांकित मतदान यादी, इतर मतदान साहित्य) ताब्यात घेणे किंवा नष्ट करण्याचा प्रयत्न करणे अशा प्रकारच्या कृतीस कोणत्या कायदयाअंतर्गत प्रतिबंध घालता येतो ?**

उत्तर यासाठी खालील कायदयातील तरतुदींप्रमाणे कारवाई करता येईल.

भारतीय दंड संहिता कलम ३५१,३५३,३५६ आणि महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३२

**प्रश्न ८ मतदान प्रकियेदरम्यान कायदा व सुव्यवस्था बिघडल्यास व पोलिसांना बळाचा वापर करावयाच असल्यास कार्यकारी दंडाधिकारी म्हणून कोण कार्य करेल ?**

उत्तर अशा प्रकरणी संबंधित क्षेत्रीय अधिकारी ज्यांना कार्यकारी दंडाधिकारी म्हणून प्राधिकार दिलेले असतील ते कार्यकारी दंडाधिकारी म्हणून कार्य करतील.

**प्रश्न ९ मतदान प्रक्रियेदरम्यान कायदा व सुव्यवस्था कायम राखण्याकरिता दाखल केलेले गुन्हे व निवडणुकीचे गुन्हे यात फरक आहे काय ?**

उत्तर नाही. तथापी संवेदनशिल मतदान केंद्र निश्चित करताना फक्त निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर / अनुषंगाने घडलेले गुन्हे विचारात घेतले जातात.

**प्रश्न १० एखादया व्यक्तीकडून मतदान केंद्र परिसरात शस्त्र बाळगले गेल्यास काय कार्यवाही केली जाते?**

उत्तर अशा प्रकरणी भारतीय दंड संहिता चे कलम १५३ (अअ) खाली फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ चे आदेशान्वये उल्लंघन केल्याबद्दल कार्यवाही केली जाते. तसेच, शस्त्र अधिनियम, १९५९ मधील तरतुदीनुसार देखील कार्यवाही केली जाते.

**प्रश्न ११ मतदान प्रक्रियेदरम्यान गुप्ततेचा भंग केल्यास मतदाराविरुध्द कोण गुन्हा नोंदवू शकते?**

उत्तर मतदान केंद्राध्यक्ष.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २९)

**प्रश्न १२ मतदानाच्या दिवशी उमेदवाराने मतदाराची ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था केल्यास काय कार्यवाही करावी ?**

उत्तर अशा प्रकरणी महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२ (५) व २८, तसेच भारतीय दंड संहिते मधील तरतुदी अन्वये कायदेशीर कारवाई करावी.

**प्रश्न १३ मतदान केंद्रामध्ये अथवा परिसरात प्रचार अथवा विशिष्ट उमेदवारांविषयी मतदाराचे मन वळविण्याचा प्रयत्न केल्यास निवडणूक विषयक गुन्हा होतो काय?**

उत्तर होय. अशा प्रकरणी भारतीय दंड संहिता १७१C आणि महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २५ अन्वये कारवाई केली जाते.

**प्रश्न १४ मतदानासाठी बनावट/बोगस मतदार तयार करणे किवा एकाहून अधिक ठिकाणी मतदार म्हणून नोंदवणे याबाबत काय शिक्षा आहे?**

उत्तर मतदारयादीमध्ये बनावट नाव नोंदवणे, एका व्यक्तीने अनेक ठिकाणी स्वतःची नोंदणी करणे किंवा खोटी ओळखपत्रे वापरणे हे कायद्याने दंडनीय आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० चे कलम ३१ अनुसार जर कुणी मतदार म्हणून खोटी माहिती दिली, बनावट अर्ज भरला किंवा अयोग्यरीत्या नोंदणी केली तर ते १ वर्षपर्यंतच्या कारावास आणि दंड या शिक्षेस पात्र आहे (Representation Of The People Act, १९५० Section ३२(१)). उदाहरणार्थ, एका व्यक्तीने वेगवेगळ्या विधानसभा क्षेत्रात वेगळी नावे नोंदवली तर तो कलम ३१ अंतर्गत दोषी ठरेल. याशिवाय, निवडणुकील बनावट मतदार ओळखपत्र तयार करणे हा देखील भारतीय दंड संहिता कलम ४६५/४६८ (कूटरचना) अनुसार गुन्हा ठरु शकतो निवडणूक आयोगाने आता आधार-संघ (Aadhaar) जोडणीद्वारे बोगस नोदणी रोखण्याची तरतूद केली आहे. तरीही जाणीवपूर्वक बनावट मतदार तयार करणे हा कायद्याने शिक्षेय अपराध आहे. Today). त्यामुळे मतदानाचा गोपनीयता भंग हा दंडनीय अपराध आहे.

**प्रश्न १५ एखाद्या उमेदवाराने, नामनिर्देशन पत्रासोबत द्यावयाच्या शपथपत्रात (उमेदवाराची माहिती जसे की शिक्षण, गुन्हेगारी प्रकरणे इ.) खोटी माहिती दिल्यास काय कारवाई होते?**

उत्तर उमेदवाराने निवडणुकीसाठी आवश्यक शपथपत्रात जाणूनबुजून खोटी माहिती भरल्यास तो निवडणूक गुन्हा आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १२५A यासाठी विशेष शिक्षा निधर्धारित करते अशा खोट्या शपथपत्रासाठी ६ महिन्यांपर्यंत कारावास किंवा दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात (Section १२५A in The Representation of the People Act. १९५१). निवडणूक सुधारणा कायदा २००२ दद्वारे ही तरतूद आणण्यात आली. उदा. जर उमेदवाराने आपल्या विरोधातील गुन्हेगारी खटल्यांची माहिती लपवून खोटी घोषणापत्र दिले, आणि ते सिद्ध झाले तर त्याच्यावर कलम १२५A अंतर्गत कारवाई होऊन त्याची उमेदवारी रद्द होऊ शकते व पुढील ६ महिन्यांसाठी तो कारावासाचा भागी होऊ शकतो. याशिवाय आदवि कलम १७७ किंवा

१९३ अंतर्गतही (खोटे प्रतिज्ञापत्र/पुरावे) शिक्षेची तरतूद लागू होऊ शकते. त्यामुळे उमेदवारांसाठी शपथपत्रात सत्य माहिती देणे बंधनकारक आहे खोटी माहिती गंभीर परिणामांना कारणीभूत ठरते.

**प्रश्न १६ बुथ कॅप्चरिंग म्हणजेच मतदान केंद्र बळकावणे किवा EVM मशीनची तोडफोड केल्यास कोणत्या कलमाखाली कारवाई होईल ?**

उत्तर मतदान केंद्र बळकावणे, बॉक्स किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राशी छेडछाड करणे हा अत्यंत गंभीर निवडणूक गुन्हा आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मधील कलम १३५A विशेषतः बुरा कॅप्चरिंगच्या गुन्हयाला लागू होते. या कलमानुसार असा अपराध केल्यास किमान १ वर्ष कारावासाची शिक्षा अनिवार्य असून ती ३ वर्षापर्यंत वाढू शकते आणि दंडही होऊ शकतो (Section १३५A in The Representation of the People Act, १९५१). तसेच कानम १३६ अनुसार जो कुणी मतदान यत्र, मतपत्रिका इत्यादीची चोरी, नाश किंवा छेडछाड करील त्यालाही ६ महिने ते ५ वर्षापर्यंत कारावास आणि दंड अशी शिक्षा आहे (गुन्हयाच्या प्रकृतीनुसार). भारतीय दंड संहितेतदेखील सार्वत्रिक शांतता भंग केल्याबददल किवा शासकीय कामात अडथळा (कलम ३५३ इ.) अंतर्गत वाढीव शिक्षाही लागून राहतात ([PDF] Maharashtra Municipal Councils Court Kutchehry) ([PDF] Maharashtra Municipal Councils Court Kutchehry). निवडणूक आयोग अशा घढ़ना गभीर गुन्हे म्हणून नोंदवतो. परिणामी, निवडणूक प्रक्रियेचे संरक्षण करण्यासाठी बुथ कॅप्चरिंग ईवीएम छेडछाडीस कठोर शिक्षा निर्धारित केली गेली आहे.

**प्रश्न १७ निवडणुकीत पेड न्यूज (पैसे देऊन अपून आणलेल्या खोट्या आमक बातम्या) चालवणे कायदेशीर आहे का? त्याला कोणत्या तरतुदी लागू होतात?**

उत्तर पेड न्यूज" म्हणजेच पैशांच्या बदल्यात प्रसारमाध्यमात उमेदवारासाठी जाहिरात स्वरूपात बातम्या छापणे/दाखवणे हा निवडणूक प्रक्रिया कलंक मानला जातो आणि अप्रत्यक्ष गुन्हा आहे. अशा पेड न्यूज प्रसारित करून जनतेमध्ये चुकीचा प्रभाव टाकणे हे दोन प्रकारे गैर आहे (१) निवडणूक खर्च मर्यादा लपवणे (कारण उमेदवाराने जाहिरातीचा खर्च जाहीर केला पाहिजे; न केल्यास कलम ७७ व १२३(६) अंतर्गत अष्ट आचार) आणि (२) खोटे माहिती प्रसारण असेल तर IPC १७१G/लोकप्रतिनिधित्व अधिनियम कलम १२३ (४) चे उल्लंघन. निवडणूक आयोगाने 'पेड न्यूज" प्रकरणे आढळल्यास ती भ्रामक जाहिरात म्हणून उमेदवाराच्या खर्चात जोडून पाहतो आणि लपवल्या खर्चाबद्दल उमेदवाराला अपात्र ठरवण्याची कारवाई करतो (Ahead of Maharashtra civic polls: Poll panel ups spending limit for candidates | Mumbai News The Indian Express) (Ahead of Maharashtra civic polls: Poll panel ups spending limit-for candidates | Mumbai News The Indian Express). उदाहरणार्थ, महाराष्ट्र विधानसभा २०१९ मध्ये काही उमेदवाराच्या निवडणुका 'पेड न्यूज प्रकरणांमुळे रद्द ठरवण्यात आल्या आहेत. चैट

शिक्षेच्या दृष्टीने पाहिले तर 'पेड न्यूज'ला स्वतत्र कलम नसले तरी ती एकत्रितपणे वरील आर्थिक आणि फौजदारी तरतुदीच्या चौकटीत येतेः प्रेस कॉन्सिलचे मार्गदर्शक नियमही याला निषिद्ध ठरवतात. सारांश, पेड न्यूज हा गंभीर निवडणूक गैरप्रचार असून संबंधित उमेदवार/प्रतिनिर्धीवर अपात्रता आणि फौजदारी कारवाई दोन्ही होऊ शकते.

**प्रश्न १८ १०. निवडणूक कालावधीत मतदारांना रोख रक्कम, दारुच्या बाटल्या, वस्तू वा लाभाचे वाटप केले तर तो कोणता गुन्हा आहे. ?**

उत्तर मतदारांना प्रलोभने देऊन मतदान प्रभावित करणे है निवडणूक अष्ट आचार आणि फौजदारी गुन्हा दोन्ही आहे. भारतीय दंड संहितेच्या कलम १७१८ मध्ये लबाड़ी (briberi) ची व्याख्या केली असून कलम १७१E अनुसार मतदारांना पैसे वस्तू देण्यावर १ वर्ष पर्यंत कारावास अथवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा आहे, लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मधील कलम लम १२३ (१) अनुसार है है एक अष्ट आचार (Corrupt Practice) ठरते ज्यामुळे निवडणूक रद्द होऊ शकते. २०१५ नंतर निवडणूक आयोगाने उचलेल्या पावलांमुळे मोठ्या प्रमाणात रोख आणि पदार्थ हस्तांतरणांवर छापे टाकून जप्ती होऊ लागली आहे. उदाहरणार्थ, तमिळनाडू विधानसभा पोटनिवडणुकीत (२०१७) प्रचंड प्रमाणात रोख वाटप उघडकीला आल्याने पूर्ण निवडणूकच रद्द करण्यांत आली होती. केंद्र सरकारनेदेखील निवडणुकीत लाच देणे हा अजामीनपात्र गुन्हा करावा अशी दुरुस्ती प्रस्तावित केली होती. त्यामुळे मतदार खरेदी करण्याचा कोणताही प्रयत्न हा कायद्याने दंडनीय आहे रोख रक्कम असो की मद्यवाटप किंवा अन्य भेटवस्तू, अशा कृत्यांसाठी संबंधितांना कारावासाचीही नामुष्की उद्भवू शकते.

**प्रश्न १९ नगरपरिषद आणि नगरपचायत निवडणुकांदरम्यान सोशल मीडियाच्या वापरामुळे कोणते संभाव्य निवडणूक संबंधित गुन्हे घडू शकतात ?**

उत्तर मतदारांना प्रभावित करण्यासाठी चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती पसरवणे (भारतीय न्याय संहितेतील खोट्या विधानासंबंधी संबंधित कलमांचा संदर्भ, आचारसंहितेचे ऑनलाइन उल्लंघन (राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांचा संदर्भ १०), ऑनलाइन द्वेषपूर्ण भाषण (शत्रुत्वाची भावना वाढवण्यासंबंधी भारतीय न्याय संहितेतील कलमांचा संभाव्य संदर्भ "), आणि निवडणुकीच्या प्रतिबंधित काळात सोशल मीडियावर अनधिकृत प्रचार.

**प्रश्न २० सोशल मीडियाद्वारे निवडणूक गुन्हा घडल्यास तक्रार कोण दाखल करु शकते आणि त्यासाठी कोणते पुरावे आवश्यक आहेत?**

उत्तर अशा तक्रारी स्वीकारणे आणि त्यावर कारवाई करण्यामध्ये निवडणूक आयोग, निवडणूक अधिकारी आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांची भूमिका स्पष्ट केली जाईल, स्क्रीनशॉट, यूआरएल आणि ऑनलाइन गतिविधींच्या नोंदी यासारख्या आवश्यक पुराव्यांच्या प्रकारांवर चर्चा केली जाईल.

**प्रश्न २१ जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणीचे निष्कर्ष प्रसिद्ध करण्याबाबत काय निर्देश आहेत ?**

उत्तर जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदान समाप्ती पर्यंतच्या कालावधीत जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणीचे निष्कर्ष प्रसिध्द करण्यावर बंदी राहील. वर्तमानपत्रे, नियतकालिके, माहितीपतर्के, फलक किंवा तत्सम प्रसिध्दी, खाजगी किंवा सरकारी रेडीओ, टि.व्ही. केबल, डीटीएच, प्रादेशिक किंवा स्थानिक केबल टि.व्ही., सॅटेलाईट, एसएमएस, इंटरनेट, फेसबुक आणि तत्सम उपलब्ध सोशल मिडिया यांच्याद्वारे जनमत चाचणी व मतदानोत्तर चाचणी यांचे असे कुठलेही निष्कर्ष प्रसिध्द करता येणार नाहीत.

(संदर्भ-राज्य निवडणूक आयोग पत्र क्रमांक- रानिआ/मनपा/-२०१७ /प्र.क्र.०७/का.५ दि.१५ एप्रिल २०१७).

## ४. <u>मतमोजणी प्रक्रियेदरम्यान व्यत्यय</u>

**प्रश्न १ मतमोजणी प्रक्रियेदरम्यान कोणकोणती कृत्ये गुन्हा नोंदविण्यास पात्र ठरतात व अशा कृत्यांबाबत कोणत्या कलमाखाली कार्यवाही केली जाऊ शकते ?**

उत्तर मतमोजणी अधिका-यावर दबाव टाकणे, गोपनियतेचा भंग करणे, निवडणूक निर्णय अधिकारी यांचे आदेशाचे उल्लंघन करणे या कृत्यांबाबत अनुक्रमे भारतीय दंड संहिता कलम १७१,३५३ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २९ व ३३ अन्वये कारवाई केली जाते.

**प्रश्न २ उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी, मतमोजणी प्रतिनिधी यांनी गोंधळ घातल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल होऊ शकतात काय ?**

उत्तर होय.

## ५. <u>निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कामकाजात अडथळा व व्यत्यय</u>

**प्रश्न १ निवडणूक निर्णय अधिकारी / सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशनाचे वेळी अडथळा निर्माण करणा-याविरूध्द कोणता गुन्हा दाखल होईल ? हा गुन्हा निवडणूक संदर्भातील गुन्हा म्हणून गृहीत धरता येईल का ?**

उत्तर होय. भारतीय दंड संहिता कलम ३५३ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३३ अन्वये अशा प्रकरणी गुन्हा दाखल होतो.

**प्रश्न २** **निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कामकाजाच्यावेळी (छाननी, निवडणुकीची तयारी, प्रशिक्षण,निवडणूक विषयी इतर कार्यवाही ) अडथळा आणू नये यासाठी काही विशेष कायदे किंवा नियम आहेत का ?**

उत्तर या संदर्भात प्रतिबंधात्मक आदेश काढण्यात येतात. तसेच, आयोगाचे आदेश / निर्देश यांचे पालन करण्यात येते. प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग झाल्यास भारतीय दंड संहिता कलम १८८ अन्वये कार्यवाही होऊ शकते.

**प्रश्न ३** **उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्र स्विकारल्यानंतर ते कपटपूर्वक विरुपित केले (खाडाखोड केली) अथवा कपटपूर्वक नष्ट केले गेल्यास संबंधिताविरुध्द गुन्हा नोंदविता येतो काय ?**

उत्तर होय. महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३३(१)(a) अन्वये गुन्हा नोंदविला जातो.

**प्रश्न ४** **निवडणूक निर्णय अधिका-यांनी किंवा त्यांच्या प्राधिका-याने लावलेली यादी, सूचना, कागदपत्रे खराब करणे किंवा नष्ट करणे गुन्हा होऊ शकतो काय ?**

उत्तर होय. महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३३ (१)(b) अन्वये गुन्हा नोंदविला जातो .

## ६. भारतीय दंड संहिता(Indian Penal Code) मधील इतर तरतुदी

**प्रश्न १** **मतदारावर प्रभाव टाकणे यासंबंधी आयपीसीमध्ये (भारतीय दंड संहिता) काय तरतूद आहे ?**

उत्तर भारतीय दंड संहिता कलम १७१ (क) अन्वये अशा कृत्यांना प्रतिबंध असून त्यासाठी एक वर्षापर्यंत कारावास व द्रव्यदंड किंवा दोन्हीही शिक्षेची तरतूद केली आहे. याशिवाय महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२ (२) अन्वये गुन्हा दाखल होउ शकतो.

**प्रश्न २** **उमेदवारांनी मतदारांना लाच देऊन त्यांचे मत आपल्या बाजूने वळविणेसाठी भारतीय दंड संहिता मधील कोणते कलम लागू होईल?**

उत्तर अशा प्रकरणी भारतीय दंड संहिता कलम १७१ (ब) तसेच महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२ (१) अन्वये कारवाई केली जाते.

**प्रश्न ३** **मतदानाच्या दिवशी सत्ताधारी पक्षाचे मंत्री अथवा इतर कोणत्याही पक्षाचे पदाधिकारी आपला स्वत:चा मतदारसंघ सोडून इतर मतदार संघात (जेथे निवडणूक आहे) हजर असतील तर अशा मंत्र्याविरूध्द आयपीसीच्या (भारतीय दंड संहिता) कोणत्या कलमाद्वारे गुन्हा दाखल होऊ शकतो**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.४/का.५, दिनांक ९ एप्रिल २०११ अन्वये प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदार नसलेल्यांना त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमध्ये वास्तव्य न करण्याचे आदेश दिले आहेत. सदर आदेशाचे उल्लंघन करणा-यांना पोलीस हद्दीबाहेर हलविण्याबाबतची कार्यवाही करू शकतील. याबाबत जारी केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाच्या उल्लंघनाबद्दल भारतीय दंड संहिता कलम १८८ अन्वये देखील गुन्हा दाखल होऊ शकतो.

**प्रश्न ४** **निवडणूक प्रचारादरम्यान उमेदवार किंवा त्यांचे समर्थक यांच्या जवळ मोठया स्वरुपात रोख रक्कम आढळल्यास त्यांच्यावर आयपीसीचे (भारतीय दंड संहिता) कोणत्या कलमाद्वारे कार्यवाही होऊ शकते ?**

उत्तर भारतीय दंड संहिता कलम १७१ (ब) चे गुन्हयासाठी कलम १७१ (इ) अन्वये शिक्षा होऊ शकते. तसेच, आयकर अधिनियमातील तरतुदीनुसार देखील कारवाई केली जाऊ शकते.

**प्रश्न ५** **मतदाराला मतदानापासून रोखणे अथवा एखादया विशिष्ट उमेदवारास मतदान करण्यास बाध्य करणे या कृतीस आयपीसीच्या (भारतीय दंड संहिता) कोणत्या कलमद्वारे प्रतिबंध आहे ?**

उत्तर अशा प्रकरणांना भारतीय दंड संहिता १७१(सी) व १७१ (एफ) तसेच महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायत आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२ अन्वये प्रतिबंध आहे.

# प्रकरण २२.

# आदर्श आचारसंहिता

# (Model Code of Conduct)

## १. सर्वसाधारण

**प्रश्न १ आदर्श आचारसंहिता म्हणजे काय ?**

उत्तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निपक्षपाती, निर्भय वातावरणात व मुक्तपणे पार पाडल्या जाव्यात तसेच सत्ताधारी पक्षाच्या व सत्तेत नसलेल्या पक्षाचे उमेदवार यांना समान पातळीवर वाव मिळावा या हेतूने अस्तित्वात असलेल्या विविध कायदयांमधील तरतुदींचे अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने जारी केलेल्या सूचनांचा संच म्हणजे आदर्श आचार संहिता होय. ही आदर्श आचार संहिता राजकीय पक्षांच्या तसेच उमेदवारांच्या मार्गदर्शनासाठी असून सर्व राजकीय पक्षांनी, सत्ताधारी पक्षाने पालन करावयाची असून सर्व सामान्य नागरिक व मतदारांनी देखील या संहितेमधील तत्वांचा आदर करणे व तत्वांचे पालन करणे अपेक्षित आहे.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .स्थास्वसं-११०३/प्र.क्र. ३२/कार्या-०५ दिनांक २९/०३/२००४)

**प्रश्न २ राज्य निवडणूक आयोगाची यात काय भूमिका आहे ?**

उत्तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आचार संहितेची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेड ए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १८ ए (४), महाराष्ट्र महानगरपालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-ए (४) अनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वच्छ पारदर्शक, मोकळया व भयमुक्त वातावरणात व्हाव्या यासाठी आचारसंहितेची अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक ते आदेश देण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला आहेत. यामध्ये प्रामुख्याने निवडणूक लढविणारे उमेदवार संविधानातील कर्तव्ये पार पाडत आहेत व सत्ताधारी पक्ष तसेच इतर राजकीय पक्षांकडून आचार संहितेचे पालन केले जात आहे यांची खात्री करुन शासकीय यंत्रणेचा निवडणुकीच्या प्रयोजनासाठी गैरवापर केला जाणार नाही याचीदेखील खात्री करुन घेणे व आवश्यक उपाययोजना करणे या बाबतचे अधिकार आयोगास आहेत. तसेच तोतयेगिरी, लाचखोरी व मतदारांना प्रलोभने दाखविणे, मतदारांना धमक्या देणे व धाकदपटशा दाखवणे यासारखे निवडणूक विषयक अपराध, गैरव्यवहार व भ्रष्ट प्रथांना प्रतिबंध करण्याकरिता आवश्यक उपाययोजना करण्याचे राज्य निवडणूक आयोगास अधिकार आहेत.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १० - A)

**प्रश्न ३ आदर्श आचारसंहिता केव्हा लागू होते आणि कधीपर्यंत जारी राहते ?**

उत्तर निवडणूक आयोगाद्वारे निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याच्या दिवशी मध्यरात्री बारा वाजल्यापासून आदर्श आचारसंहिता अंमलात येईल आणि निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत (म्हणजेच निकाल जाहीर होईपर्यंत) चालू राहील.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .स्थास्वसं-२०११/ प्र.क्र. २५ / का-५ दिनांक २९/१२/२०११)

**प्रश्न ४ सार्वत्रिक निवडणूक आणि पोटनिवडणूक यांच्या काळात आदर्श आचारसंहितेचे क्षेत्राची व्याप्ती काय असते व आचारसंहितेची अंमलबजावणी कशी केली जाते ?**

उत्तर सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या संपूर्ण क्षेत्रात लागू राहील व पोटनिवडणुकीची आचारसंहिता संबंधित प्रभागापुरतीच लागू असेल. त्यानुसार त्या क्षेत्रापुरतीच आचारसंहितेची अंमलबजावणी केली जाते.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .स्थास्वसं-२०११/ प्र.क्र. २५ / का-५ दिनांक २९/१२/२०११)

## २. <u>कर्मचारी</u>

**प्रश्न १ आचार संहिता लागू असताना निवडणूक कामाशी संबंधित अधिका-यांच्या बदल्या करता येतील का ?**

उत्तर निवडणूक घेण्याशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असलेले सर्व अधिकारी / कर्मचारी यांची बदली किंवा अन्य ठिकाणी नियुक्ती करण्यावर या कालावधीत संपूर्णपणे बंदी असेल. जर एखाद्या अधिकाऱ्याची कोणतीही बदली किंवा नियुक्ती करण्याची आवश्यकता असेल तर आयोगाची पूर्व मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .एसईसी/१०९५/सीआर-५/९५/डेस्क-३, दिनांक १५/०३/१९९५)

**प्रश्न २ निवडणूक कामाशी संबंधित एखाद्या अधिका-याची आचार संहिता लागू होण्यापूर्वी बदली झाली असेल आणि संबंधित अधिका-याने बदली झालेल्या पदाचा नवीन ठिकाणी पदभार स्विकारला नसेल तर आचार संहिता लागू होण्याची घोषणा झाल्यानंतर सदर अधिकारी नवीन ठिकाणी पदभार स्विकारु शकेल काय ?**

उत्तर नाही. अशा प्रसंगी “ जैसे थे ” स्थिती ठेवण्यात येईल.

**प्रश्न ३ केंद्र किंवा राज्य शासनातील मंत्री हे निवडणुकीशी संबंधित मतदारसंघातील किंवा राज्यातील अधिका-यांना निवडणूक कालावधीमध्ये चर्चेला बोलावू शकतील काय ?**

उत्तर कोणताही मंत्री मग तो केंद्रीय मंत्री असो किंवा राज्याचा मंत्री असो, मतदारसंघाच्या किंवा राज्याच्या कोणत्याही निवडणुकीशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्याला शासकीय अथवा अन्य स्वरुपाच्या चर्चेसाठी कोठेही बोलावू शकत नाही.

**प्रश्न ४ मंत्री हे निवडणूक कालावधीत खाजगी दौ-यावर (भेटीवर) असताना, एखाद्या अधिका-याला मंत्र्यांस भेटता येईल काय ?**

उत्तर नाही. आचारसंहितेच्या कालावधीत मतदारसंघात मंत्र्यांना त्यांच्या खाजगी भेटीत कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने भेटणे हे संबंधित सेवा नियमाखालील गैरवर्तन ठरेल आणि सदर अधिकारी कारवाईस देखील पात्र असेल.

**प्रश्न ५ एखादे मंत्री, आचारसंहिता प्रभावित क्षेत्राचे दौऱ्यावर असताना त्यांचे समवेत मंत्री आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना जाता येईल का ?**

उत्तर नाही. मंत्र्यांना आचारसंहितेच्या कालावधीत शासकीय यंत्रणेचा वापर करता येत नसल्यामुळे त्यांना त्यांचे आस्थापनेवरील कर्मचा-यांना निवडणूक प्रचार दौ-यात समवेत जाता येणार नाही.

**प्रश्न ६ स्थानिक स्वराज्य संस्थेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याचे कुटुंबिय उमेदवार असतील तर अशा कर्मचाऱ्यावर कोणकोणती बंधने असतात ?**

उत्तर स्थानिक स्वराज्य संस्थेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याचे कुटुंबिय उमेदवार असतील तर अशा कर्मचा-याचा निवडणूक प्रचार कार्यात कोठेही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध असता कामा नये. तसेच, अशा कर्मचा-याला निवडणूक कर्तव्यापासून दूर ठेवण्यात येईल.

**प्रश्न ७ अनुदानीत व विनाअनुदानीत खाजगी संस्थांच्या कर्मचाऱ्यांना प्रचारात भाग घेता येईल का ?**

उत्तर अनुदानित व विनाअनुदानित खाजगी संस्थेच्या कर्मचा-यांना निवडणुकीच्या कर्तव्यावर नियुक्त केले नसेल तर व त्या संस्थेच्या सेवा व वर्तणूक नियमात प्रतिबंध नसेल तर अशा कर्मचा-याला निवडणुकीच्या प्रचार कार्यात सहभाग घेण्यास प्रतिबंध नाही.

## ३. नामनिर्देशन व छाननी

**प्रश्न १ उमेदवार उमेदवारी अर्ज भरण्यासाठी निवडणूक निर्णय अधिका-याकडे मिरवणुकीने जाऊ शकतो काय ? असल्यास मिरवणूक किती अंतरावर थांबविली जाते ?**

उत्तर सक्षम प्राधिका-याची परवानगी घेऊन उमेदवार उमेदवारी अर्ज भरण्यासाठी मिरवणुकीने निवडणूक निर्णय अधिका-यांच्या कार्यालयापासून १०० मीटर अंतरापर्यंत जाऊ शकतो. तसेच परवानगी देण्यात आलेल्या वाहनांची कमाल मर्यादा ३ इतकी निर्बंधित केलेली आहे.

**प्रश्न २ उमेदवार उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवारासोबत निवडणूक निर्णय अधिका-याच्या कक्षात किती व्यक्तीना प्रवेश असतो ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिका-यांच्या कार्यालयात प्रवेश करण्यासाठी परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तींची कमाल संख्या ५ इतकी (उमेदवारासह) मर्यादित करण्यात आलेली आहे.

**प्रश्न ३ नामनिर्देशनपत्राच्या छाननीसाठी निवडणूक निर्णय अधिका-यांना छाननीचे ठिकाणी किती व्यक्तींना प्रवेश देता येईल ?**

उत्तर नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी उमेदवार, प्रत्येक उमेदवाराचा एक सूचक आणि प्रत्येक उमेदवाराने लेखी प्राधिकृत केलेल्या एका व्यक्तीला उपस्थित राहता येईल. याशिवाय अन्य कोणीही उपस्थित राहू शकत नाही.

(संदर्भ - महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १३)

## ४. जाहिराती व प्रचार

**प्रश्न १ निवडणूक जाहीर झाल्यानंतर राज्य शासनाचे / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या खर्चाने निवडणूक कालावधीत सत्ताधारी पक्षाला निवडणुकीत लाभ होण्याच्या उद्देशाने दिल्या जाणा-या जाहिराती देण्यावर काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर होय. छापील आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये, शासकीय खर्चाने अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या खर्चाने सत्ताधारी पक्षाच्या कामगिरीच्या संबंधात जाहिरात देण्यास आणि निवडणुकीच्या कालावधीत शासकीय प्रसिध्दी माध्यमांचा गैरवापर करण्यास प्रतिबंध आहे.

**प्रश्न २ उमेदवार व राजकीय पक्षांना निवडणुकीचे प्रचारासंदर्भात महत्त्वाच्या काय मार्गदर्शक सूचना आहेत?**

उत्तर कोणताही पक्ष किंवा उमेदवार हा निवडणूक प्रचार मोहिमेदरम्यान ज्यामुळे विद्यमान मतभेद अधिक वाढतील किंवा परस्परांमध्ये द्वेष निर्माण होईल किंवा विविध जाती व समाज यांच्यामध्ये धार्मिक किंवा भाषिक तणाव निर्माण होईल अशा कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होणार नाही. तसेच जेव्हा इतर राजकीय पक्षावर टीका करण्यात येईल तेव्हा ती टीका त्यांची धोरणे व कार्यक्रम, मागील अभिलेख व काम एवढयापर्यंतच मर्यादित असेल. पक्षांनी उमेद्वारांनी इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्यक्रमांशी संबंधित नसलेल्या खाजगी जीवनाच्या सर्व बाबतीतील टीकेपासून अलिप्त रहावे. खरे किंवा खोटे यांची शहानिशा न केलेले आरोप किंवा विपर्यास होईल, अशा रीतीने इतर पक्षांवर किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांवर टीका करणे टाळावे.

**प्रश्न ३ धार्मिक स्थळांचा निवडणूक प्रचारासाठी वापर करण्याबाबत काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर होय. मंदिर, मशिद, चर्च, गुरुद्वारा यासारखी धार्मिक ठिकाणे किंवा पूजे-अर्चेची इतर ठिकाणे निवडणूक प्रचारासाठी चर्चापीठ म्हणून वापरण्यात येणार नाहीत. तसेच, मते मिळविण्यासाठी जात किंवा समुदायाच्या भावनांना आवाहन करता येणार नाही.

**प्रश्न ४ धार्मिक स्थळांवर प्रचार करण्याबाबत नियम**

उत्तर धार्मिक स्थळांचा राजकीय प्रचारासाठी गैरवापर टाळण्यासाठी केंद्र सरकारने आधीपासूनच एक कायदा केला होता धार्मिक स्थळे (गैरवापर प्रतिबंध) अधिनियम १९८८. या कायद्यानुसार कोणतीही मंदिर, मस्जिद, चर्च इ. धार्मिक संस्था राजकीय प्रचारासाठी वापरता येत नाही. आता निवडणूक आयोगही या कायद्याच्या कलम ३, ५ व ६ ची कठोर अंमलबजावणी करते ([PDF] ELECTION COMMISSION OF INDIA). या उल्लंघनासाठी ५ वर्षापर्यंतचा कारावास आणि दंड होऊ शकतो (कायद्याचे कलम ६). त्यामुळे धार्मिक स्थळी प्रचार नं करणे ही आला कडक कायदेशीर जबाबदारी आहे.

**प्रश्न ५ शैक्षणिक संस्थांची (शासकीय, अनुदानित व खाजगी) मैदाने निवडणूक प्रचार व रॅलीसाठी वापरण्याबाबत काही निर्बंध आहेत काय?**

उत्तर राजकीय प्रचार मोहीमेसाठी व मेळाव्यांसाठी शैक्षणिक संस्थांच्या मैदानाचा (शासन अनुदानित, खाजगी किंवा शासकीय असो) वापर करण्यासाठी शाळेच्या नियमित कामकाजावर परिणाम होणार नाही याचा दक्षता घेऊन आणि संबंधित शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था व उपविभागीय दंडाधिकारी यांची परवानगी आवश्यक आहे.

**प्रश्न ६ निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणा-या वाहनाचे बाहय भागावर फिटींग करण्यास व आकारात बदल करण्यास परवानगी आहे काय ?**

उत्तर वाहनांच्या बाहेरील फेरबदल, त्यावर लाऊडस्पीकर लावण्यासह मोटार वाहन अधिनियम / नियम तसेच इतर स्थानिक अधिनियम / नियम यांच्या तरतुदीच्या अधीन असतील. फेरबदल केलेली वाहने आणि व्हीडीओ रथ इत्यादी सारखी विशेष प्रचार वाहने ही, मोटार वाहन अधिनियमान्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडून आवश्यक ती परवानगी मिळाल्यानंतरच फक्त वापरली जाऊ शकतात.

**प्रश्न ७ शासकीय विश्रामगृहे, डाक बंगले किंवा इतर शासकीय / निमशासकीय निवासस्थाने यांचा निवडणूक प्रचार कार्यालये म्हणून किंवा निवडणूक प्रचाराची सार्वजनिक सभा घेण्यासाठी वापर करण्याबाबत काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर होय. विश्रामगृहे, डाक बंगले किंवा इतर शासकीय जागा सत्ताधारी पक्षाची किंवा त्यांच्या उमेदवाराची मक्तेदारी असणार नाही आणि अशा जागेचा इतर पक्षांना व उमेदवारांना वापर करता येईल. परंतु कोणत्याही पक्षाला किंवा उमेदवाराला तिचा निवडणूक प्रचार कार्यालय म्हणून वापर करता येणार नाही. तसेच पुढील गोष्टींची सुनिश्चिती करण्यात येईल.

(१) विश्रामभवन / डाकबंगले हे केवळ तात्पुरत्या मुक्कामासाठी (भोजन व निवास) असल्यामुळे

कोणत्याही पदाधिकाऱ्यांना मार्गस्थ असताना विश्राम भवनाचा / डाक बंगल्याचा त्यांचे निवडणूक प्रचार कार्यालय म्हणून वापर करता येणार नाही.

(२) राजकीय पक्षाच्या सदस्यांना शासनाच्या मालकीच्या विश्रामगृह इत्यादीमधील जागांमध्ये नैमित्तिक सभा देखील घेता येणार नाहीत आणि त्याचा कोणताही भंग झाल्यास तो आदर्श आचारसंहितेचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल.

(३) विश्रामगृहामध्ये निवासाची जागा दिलेल्या व्यक्तीची ने-आण करण्यासाठी असलेल्या वाहनालाच केवळ प्रवेशासमुभा असेल आणि अशा व्यक्तींकडून वापरण्यात येणाऱ्या दोन पेक्षा अधिक वाहनांना विश्रामगृहाच्या आवारात प्रवेशास मुभा असणार नाही.

(४) कोणत्याही एका व्यक्तीला ४८ तासापेक्षा अधिक कालावधीसाठी खोल्या उपलब्ध करुन देता येणार नाहीत आणि

(५) कोणत्याही विशिष्ट क्षेत्रात मतदान समाप्त होण्यापूर्वी ४८ तास, मतदान किंवा फेरमतदान पूर्ण होईपर्यंत अशा खोल्या उपलब्ध करुन देणे बंद असेल.

**प्रश्न ८ निवडणुकीचे पोस्टर व बॅनर म्हणून प्लॅस्टिकचा वापर करण्यास काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी, पर्यावरणाच्या रक्षणासाठी भित्तीचित्रे, बॅनर इत्यादी तयार करण्यासाठी प्लास्टिक / पॉलिथिनचा वापर शक्यतो टाळावा.

**प्रश्न ९ पोस्टर व हस्त पत्रिका छपाई करण्यास काही निर्बंध आहेत काय?**

उत्तर होय. उमेदवाराने ज्यावर मुद्रक आणि प्रकाशक यांची दर्शनी नावे आणि पत्ते नसतील असे कोणतेही निवडणूक पोस्टर व हस्तपत्रिका यांचे मुद्रण करु नये किंवा ते प्रकाशित करु नये. तसेच छपाई केलेल्या पोस्टर व हस्तपत्रिकांची संख्या त्यावर नमूद करावी.

(संदर्भ: पंचायत आणि नगरपरिषद निवडणूकीमध्ये पत्रके आणि भित्तीपत्रके छापणे व प्रकाशित करणे यावरील निर्बंध आदेश १९९५ - दिनांक २८/०८/१९९५)

**प्रश्न १० उमेदवाराने विविध साहित्य जसे टोप्या, मास्क व उपकरणे वापरण्याबाबत परवानगी आहे काय?**

उत्तर होय. मात्र संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात त्याचा हिशेब घेण्यात येतो. तथापि, साड्या, शर्ट इत्यादी सारख्या मुख्य वस्त्रांचा पक्षाकडून / उमेदवाराकडून होणाऱ्या पुरवठ्यास आणि त्यांच्या वाटपाला परवानगी दिलेली नाही. कारण ते कृत्य मतदारांना लाच देणे या सदरात मोडते.

**प्रश्न ११ उमेदवारास इव्हीएमचे डमी बॅलेट युनिट तयार करुन त्यांना मतदारांना प्रशिक्षण देता येईल काय ?**

उत्तर होय. अशी प्रतिरुप मतदान युनिटे, अधिकृत मतदान युनिटांच्या अर्ध्या आकारमानात, लाकडी, प्लास्टिक किंवा प्लाय बोर्डाच्या पेट्यामधून तयार करता येतील आणि त्यांना तपकिरी, पिवळा किंवा करडा रंग देता येईल व त्यावर केवळ स्वतःचे नाव व अनुक्रमांक छापता येईल. इतर उमेदवारांचा कोणताही तपशील छापता येणार नाही.

**प्रश्न १२ निवडणुकीशी संबंधित सिनेमॅटोग्राफ, टेलिव्हिजन किंवा अशा प्रकारचे सार्वजनिक प्रचार व प्रसार करण्यास काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर इलेक्ट्रॉनिक मिडीयाव्दारे कोणतेही साहित्य प्रसारित करण्यापूर्वी या संदर्भात महानगरपालिका अथवा जिल्हाधिकारी कार्यालयात गठीत केलेल्या समितीकडून सदर साहित्य तपासून प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील. प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मिडियाव्दारे देखील प्रचारावर बंदी राहील. यामध्ये एसएमएसचा देखील समावेश होतो.

**प्रश्न १३ उमेदवारास स्वतःचे चित्रासोबत देव देवतांची चित्रे असलेल्या डाय-या, कॅलेंडर, स्टीकर छापून वाटप करता येतील काय ?**

उत्तर नाही. हे कृत्य भारतीय दंड संहितेच्या कलम १७१-ड अन्वये लाच देण्याच्या सदरात मोडते.

**प्रश्न १४ पक्षाचे / उमेदवाराचे चिन्ह यासह स्टेपनी कव्हर किंवा असे साहित्य वाटप हे आचारसंहितेचे उल्लंघन आहे काय ?**

उत्तर : होय. असे साहित्य वाटप केल्याचे सिध्द झाल्यास उक्त साहित्याच्या वाटपाविरुध्द, जिल्हा प्रशासनाकडून भारतीय दंड संहितेचे कलम १७१-ख अन्वये क्षेत्रीय दंडाधिकाऱ्यासमोर तक्रार दाखल करण्यात येईल.

**प्रश्न १५ उमेदवाराचे किंवा पक्षाचे तात्पुरते कार्यालय स्थापन करण्यास किंवा चालविण्यासंबंधात काही अटी वा मार्गदर्शन सूचना आहेत काय ? स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये प्रत्येक उमेदवारास किती प्रचार कार्यालये उघडता येतील ?**

उत्तर होय. मात्र अशी कार्यालये, सार्वजनिक किंवा खाजगी मालमत्तेवर / कोणत्याही धार्मिक ठिकाणी जागेत / कोणत्याही शैक्षणिक संस्थेला / रुग्णालयाला लागून अथवा विद्यमान मतदान केंद्राच्या २०० मीटरच्या आत, कोणतेही अतिक्रमण करुन उघडता येणार नाहीत. शिवाय, अशा कार्यालयांवर पक्षचिन्ह / छायाचित्रे असलेला केवळ एकच पक्ष ध्वज आणि बॅनर लावता येईल आणि अशा कार्यालयांमध्ये वापरण्यात येणाऱ्या बॅनरचा आकार स्थानिक कायद्याद्वारे फलक / जाहिरात फलक इत्यादींचा याहून लहान आकार विहित केला असेल तर स्थानिक कायद्याद्वारे विहित केलेला लहान आकार लागू असेल या शर्तीच्या अधीन राहून ४ फूट x ८ फूट यापेक्षा अधिक असता कामा नये. प्रचार कार्यालयांच्या संख्येवर मर्यादा नाही. तथापि, अशा सर्व प्रचार कार्यालयांवर करण्यात आलेला खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करण्यात येईल.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .रानिआ/मनपा/२००७/प्र.क्र. ६/का-५ दिनांक ०४/०२/२०१२)

**प्रश्न १६ प्रचारासाठी बाहेरुन आलेल्या तथापि मतदार नसलेल्यांना प्रचार कालावधी संपल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत थांबण्याबाबत काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीमध्ये प्रचार करण्यासाठी जे राजकीय नेते, कार्यकर्ते व इतर व्यक्ती की जे मतदार नाहीत, त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीबाहेरून येतात त्यांनी त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीमधील जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमध्ये वास्तव्य करू नये. सदर आदेशाचे उल्लंघन करणा-यांना पोलीस हद्दीबाहेर हलविण्याबाबतची कार्यवाही करु शकतील.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.४/का.५, दिनांक ९ एप्रिल २०१०)

**प्रश्न १७ सार्वजनिक सभा आयोजनाबाबत, मिरवणुका काढण्याबाबत व कॉर्नर मिटींगबाबत काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर होय. सार्वजनिक सभा आयोजनाबाबत, मिरवणुका काढण्याबाबत व कॉर्नर मिटींगबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून व पोलीस प्राधिकाऱ्याकडून लेखी पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

**प्रश्न १८ प्रचाराच्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुकीचे वेळी ध्वनिक्षेपक (लाऊडस्पीकर) हे पोलिस अधिका-याच्या पूर्व परवानगी शिवाय वापरता येतील काय ?**

उत्तर नाही. ध्वनीक्षेपकांच्या वापरांसाठी संबंधित पोलिस प्राधिकाऱ्याची लेखी पूर्व परवानगी घ्यावी.

(संदर्भ - मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३६ (ea) आणि राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. एसईसी-१०९५/ सीआर - ९/९५/ डेस्क-३, दिनांक १८/०३/१९९५)

**प्रश्न १९ ध्वनिक्षेपक (लाऊडस्पीकर) वापरण्यास वेळेची मर्यादा लागू आहे काय ?**

उत्तर होय. रात्री १०.०० ते सकाळी ६.०० या कालावधीत ध्वनीक्षेपकाचा वापर करता येत नाही.

पर्यावरण मंत्रालयाने ध्वनी प्रदूषण नियमन नियम २००० मध्ये २०१७ साली सुधारणा करून विशिष्ट प्रसंगी रात्री १२ वाजेपर्यंत लाऊडस्पीकर वापरास राज्य सरकारला परवानगी देता येईल अशी छूट दिली आहे. याचा उपयोग काही राज्यांमध्ये सांस्कृतिक धार्मिक कार्यक्रमांसाठी केला जातो ([Solved] As per the Noise Pollution (Regulation and Control) Amendmen) ([Solved] As per the Noise Pollution (Regulation and Control) Amendmen). निवडणुकीत मात्र रात्री १० नंतर प्रचारावर बंदी कायम आहे.

(संदर्भ - मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३६ (ea) आणि राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. एसईसी-१०९५/ सीआर - ९/९५/ डेस्क-३, दिनांक १८/०३/१९९५)

**प्रश्न २० कोणत्या कालमर्यादेनंतर सार्वजनिक सभा घेता येणार नाहीत व मिरवणुका काढता येणार नाहीत?**

उत्तर रात्री १०.०० ते सकाळी ६.०० या वेळेत कोणतीही सार्वजनिक सभा घेता येणार नाही व मिरवणूक काढता येणार नाही. निवडणूकीमधील जाहिर प्रचार हा मतदान सुरू होण्याच्या दिनांकापूर्वी २४ तास अगोदर समाप्त होईल. म्हणजे १० तारखेस मतदान असेल तर ८ तारखेच्या रात्री १२.०० वाजता प्रचार बंद होईल. परंतू रात्री १०.०० वाजलेनंतर ध्वनीवर्धक वापरता येणार नसल्यामुळे, ८ तारखेच्या रात्री १०.०० वाजता जाहिर प्रचार बंद होईल.

(संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .स्थास्वसं-२०११/ प्र.क्र. २५ / का-५ दिनांक २९/१२/२०११)

**प्रश्न २१ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये कोणकोणत्या बाबींचे व्हिडीओ चित्रीकरण करता येते व कोणकोणत्या बाबींचे व्हिडीओ चित्रीकरण करता येत नाही ?**

उत्तर खालील बाबींचे व्हिडिओ चित्रण करावे :-

1. मंत्र्यांनी, राष्ट्रीय / राज्य पातळीवरील मान्यताप्राप्त पक्षाच्या अग्रणी नेत्यांनी ज्या सभेमध्ये भाषण केलेले असेल / ज्या सभेत ते उपस्थित राहीलेले असतील अशा सभा.
2. दंगे किंवा दंग्याची परिस्थिती किंवा विक्षोभ, दगडफेक, बेभान जनता इत्यादी.
3. हिंसक घटना, मालमत्तेची हानी, लुटमार, जाळपोळ, शस्त्र वापर इत्यादी.
4. मतदान केंद्र ताब्यात घेणे.
5. मतदारांना धाकदपटशा दाखविणे,
6. साडी, धोतर, चादर इत्यादी वस्तु वाटप करुन मतदारांना लाच देणे.
7. मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या परिसराच्या आत प्रचार करणे.
8. मोठया पोस्टरवर होणारा अनावश्यक खर्च.

खालील बाबींचे चित्रीकरण करु नये.

१) मतदान केंद्राबाहेर लावलेल्या सुव्यवस्थित रांगा.
२) मतमोजणी सभागृहातील दृष्य
३) दारोदार करण्यात येणारा प्रचार
४) प्रचारासाठी ध्वनीवर्धक संच जोडलेली फिरती वाहने.

**प्रश्न २२ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे प्रचार करणेबाबत काही निर्बंध आहेत का ?**

उत्तर होय. इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे कोणतेही साहित्य प्रसारीत करण्यापूर्वी या संदर्भात महानगरपालिका अथवा जिल्हाधिकारी कार्यालयात गठीत केलेल्या समितीकडून सदर साहित्य तपासून प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील. प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे देखील प्रचारावर बंदी राहील.

**प्रश्न २३ आचारसंहितेच्या कालावधीत विविध धार्मिक सण - उत्सवा निमित्त, स्थानिक स्वराज्य संस्थांना सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करता येतील का ?**

उत्तर आचारसंहितेच्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांना फक्त परंपरागत धार्मिक सण अथवा यात्रा-उत्सवानिमित्त सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करता येतील मात्र अशा कार्यक्रमात निवडणूक लढविणारे उमेदवार व पदाधिकारी यांना सहभागी करुन घेता येणार नाही.

**प्रश्न २४ प्रचार फेरी किंवा मिरवणुका यामध्ये किती वाहने वापरावीत ?**

उत्तर प्रचार फेरी किंवा मिरवणुका यामध्ये जास्तीत जास्त ३ वाहने वापरता येतील. (संदर्भ- राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/ मनपा-२००६/ प्र.क्र.१९/का-५ दिनांक ११/१०/२००६)

**प्रश्न २५ मतदानाच्या दिवशी प्रचार सभा घेता येते का?**

उत्तर मतदानापूर्वी ४८ तास संपूर्ण प्रचार बंदी लागू आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १२६ अनुसार मतदानाच्या वेळेपूर्वीच्या ४८ तासांत कुठलाही प्रचार (टीवी, सिनेमा तसेच इतर तत्सम माध्यमावर ज्यात सोशल मीडिया देखील येतो) पूर्णतः निषिद्ध आहे

**प्रश्न २६ जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्या नंतर वृत्तपत्र, टिव्ही, रेडीओ या माध्यमांतून जाहिराती देता येतील का ?**

उत्तर अशा बाबींवर आचारसंहितेत प्रतिबंध नाही. तथापि, त्यावर झालेला खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करण्यात येईल.

**प्रश्न २७ जनमत चाचणीचे निष्कर्ष प्रसिद्ध करण्यावर काय निर्बंध आहेत ?**

उत्तर घेण्यात आलेल्या जनमत चाचणीचा किंवा मतदानोत्तर चाचणीचा निकाल कोणत्याही वेळी मुद्रित, इलेक्ट्रॉनिक किंवा कोणत्याही इतर माध्यमातून कोणत्याही प्रकारे एकाच टप्प्यात घेतलेल्या एखाद्या निवडणुकीतील मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या तासासह लगतपूर्वीच्या ४८ तासाच्या कालावधी दरम्यान जनमत चाचणीचे निष्कर्ष प्रसिध्द करता येणार नाहीत.

**प्रश्न २८ निवडणुकीत प्रचारादरम्यान प्राण्यांचा वापर करण्यास बंदी आहे काय ? प्राण्यांचा वापर केल्यास त्यावर काय कार्यवाही करण्यात येते ?**

उत्तर होय. निवडणूक प्रचारादरम्यान प्राण्यांचा वापर करण्यास निर्बंध असून प्राण्यांचे वापर केल्याचे निदर्शनास आल्यास प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६० नुसार कार्यवाही करण्यात येते. (संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील परिपत्रक क्र .रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.२६/का-५, दिनांक २३/१२/२०११)

**प्रश्न २९ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संकेतस्थळावर (Website) प्रसिद्ध मजकूर, छायाचित्रे याबाबत आचारसंहिता काळात काय निर्बंध आहेत ?**

उत्तर होय. आचारसंहिता कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संकेतस्थळावरील पदाधिका-यांची छायाचित्रे व मतदारांवर प्रभाव पडेल असे त्यांचे लेख व मजकूर प्रसिध्द करता येणार नाही व असल्यास काढण्यात यावा.

**प्रश्न ३० निवडणूक काळात सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थाच्या विक्रीवरील वैधानिक इशा-याबाबत अथवा पर्यावरणविषयक जनजागृती प्रसिध्दी मोहिम राबविता येईल काय?**

उत्तर होय. परंतु, राजकीय व्यक्ती, इत्यादींची छायाचित्रे / संदेशाचा वापर प्रचाराच्या दरम्यान करता येणार नाही.

**प्रश्न ३१ विमान / हेलिकॉप्टर राजकीय पक्षांनी / उमेदवारांनी वापरण्याबाबत काही अटी लागू आहेत काय ?**

उत्तर होय. राजकीय पक्षांना / उमेदवारांना किंवा खाजगी कंपन्या इत्यादींना विमान / हेलिकॉप्टरर्स भाड्याने देताना पुढील शर्ती अनुसरण्यात येतील :-

(१) एका बाजूस सत्ताधारी पक्ष आणि दुसऱ्या बाजूस इतर पक्ष व निवडणूक लढविणारे उमेदवार यांच्यात कोणताही भेदभाव करण्यात येऊ नये.

(२) त्यासाठी राजकीय पक्ष किंवा निवडणूक लढविणारे उमेदवार यांच्याकडून रकमेचे प्रदान करण्यात येईल त्याचा योग्य तो अभिलेख ठेवण्यात येईल.

(३) दर आणि अटी व शर्ती या सर्वांसाठी एक सारख्याच असतील.

(४) विमान कंपन्याद्वारे प्रत्यक्ष वाटप हे प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर करण्यात येईल. या प्रयोजनाकरिता अर्ज स्वीकारणाऱ्या अधिकृत प्राधिकाऱ्याकडून अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक व वेळ नमुद करण्यात येईल.

(५) क्वचित प्रसंगी दोन किंवा अधिक अर्जदारांचा दिनांक व वेळ दोन्ही एक सारखीच असेल तर चिठ्ठ्या टाकून वाटप करण्यात येईल.

(६) कोणतीही व्यक्ती वैयक्तिक संस्था, पक्ष किंवा उमेदवार यांना एका वेळी तीन दिवसांपेक्षा

अधिक कालावधीसाठी विमान / हेलिकॉप्टर भाड्याने देता येणार नाही.

**प्रश्न ३२ निवडणूक जाहीर झाल्यानंतर केंद्र किंवा राज्य शासनातील / स्थानिक स्वराज्य संस्थेत सत्ताधारी पक्षाने केलेल्या कामगिरीच्या होर्डिंग्ज व जाहिराती शासनाच्या खर्चाने प्रसिध्द करता येतील काय ?**

उत्तर नाही. लावण्यात आलेली अशी सर्व होर्डिंग्ज, जाहिराती इत्यादी, संबंधित प्राधिकाऱ्यांकडून तात्काळ काढून टाकण्यात येतील. याशिवाय, शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या खर्चाने वर्तमानपत्रामध्ये आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमासह इतर माध्यमांमध्ये जाहिराती देण्यात येवू नयेत.

**प्रश्न ३३ निवडणूक काळात महत्त्वाच्या व अतिमहत्त्वाच्या नेत्यांच्या जयंत्या, पुण्यतिथी किंवा वार्षिक समारंभाच्या निमित्ताने चित्रफितीचे प्रसारण करता येईल काय ?**

उत्तर होय. परंतु त्याचा राजकीय प्रचारांसाठी किंवा शासनाची सार्वजनिक कामगिरी ठळकपणे निदर्शनास आणण्यासाठी निमित्त म्हणून वापर करु नये . तसेच त्यात डामडौल असणार नाही आणि अशा बैठकीत कोणताही राजकीय कार्य अधिकारी राजकीय स्वरूपाचे भाषण करणार नाही. वरील निर्बंध अशा प्रकारच्या इतर सर्व कार्यक्रमांसाठी तितकाच लागू राहील.

**प्रश्न ३४ शासनाच्या मालकीच्या बसेसच्या मागे, तिकिटांच्या पाठीमागे राजकीय जाहिराती छापता येतील काय ?**

उत्तर नाही.

## ५. <u>वाहने व मालमत्ता</u>

**प्रश्न १ निवडणुकीचे / प्रचाराचे कामाकरीता शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या, सार्वजनिक परिवहन उपक्रमांच्या वाहनांचा वापर करता येतो का ?**

उत्तर नाही.

**प्रश्न २ मंत्र्यांना निवडणूक कालावधीत शासकीय वाहन वापरता येते का ?**

उत्तर मंत्र्यांना त्यांच्या निवासस्थानापासून कार्यालयांपर्यंत कार्यालयीन कामकाजासाठी फक्त सदर वाहन वापरता येईल.

**प्रश्न ३ मंत्री किंवा राजकीय पदाधिका-यांना निवडणूक कालावधीत दिव्याची गाडी / पायलट कार सायरनसह वापरता येईल काय ?**

उत्तर मंत्री किंवा कोणत्याही इतर राजकीय कार्याधिकारी निवडणुकीच्या काळामध्ये पायलट कार, कोणताही रंग असलेला संकेतदिप असलेली मोटारगाडी किंवा कोणत्याही प्रकारचा सायरन (Siren) लावलेली मोटारगाडी खाजगी किंवा कार्यालयीन कामकाजासाठी, जरी राज्य प्रशासनाने अशा भेटीसाठी त्यांच्यासोबत त्याला सुरक्षेसाठी सुरक्षा पुरविलेली असली तरीही, ती वापरण्याची

मुभा नाही. वाहन, शासनाच्या मालकीचे असेल तर तेथेही ही बंदी लागू आहे. तथापि, पदाधिकारी यांना त्यांच्या निवासस्थानापासून कार्यालयापर्यंत कार्यालयीन वापरासाठी फक्त सदर वाहन वापरता येईल.

**प्रश्न ४ महामहिम राष्ट्रपती / उपराष्ट्रपती यांचे राज्यातील भेटीचे वेळी निवडणूक चालू असताना मंत्र्यांना व्हीआयपी कार व राजशिष्टाचार याचा वापर करता येईल काय ?**

उत्तर होय. मंत्र्यांना इतर राजशिष्टाचारासह विशेष मान्यवर व्यक्तींसाठी असलेल्या गाडीने त्यांच्या मुख्यालयापासून राष्ट्रपती / उपराष्ट्रपती यांच्या भेटीच्या ठिकाणी जाता येईल आणि कोणत्याही इतर राजकीय कार्याधिकाऱ्याबरोबर कोणताही इतर कार्यक्रम / बैठक यांमध्ये उपस्थित न राहता त्याच्या मुख्यालयात परत येता येईल. हा निर्बंध त्याने मुख्यालय सोडल्याच्या वेळेपासून आणि मुख्यालयात परत येईपर्यंत लागू असेल.

**प्रश्न ५ आचारसंहितेच्या निमित्ताने जमा करण्यात आलेली विविध पदाधिकाऱ्यांची वाहने अधिकाऱ्यांना शासकीय कर्तव्यार्थ वापरता येतील का ?**

उत्तर होय.

**प्रश्न ६ ज्या मंत्र्यांकडून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होईल त्यांचे शासकीय वाहनाची सुविधा काढून घेता येईल काय ?**

उत्तर होय. निवडणूक अधिकारी आपल्या शासकीय पदाचा गैरवापर करणाऱ्या मंत्र्यांकडून वाहन काढून घेतील व झालेला खर्च संबंधित पक्षाच्या / उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करतील.

**प्रश्न ७ राज्य शासनाने ज्या मंत्री व पदाधिका-यांना सुरक्षा प्रदान केलेली आहे, त्यांना वाहन वापरण्याबाबत काही मार्गदर्शक सूचना आहेत काय ?**

उत्तर होय. ज्यांना सुरक्षा दिलेली आहे अशा व्यक्तींच्या संबंधात, विशिष्ट व्यक्तींसाठी जेथे गुप्तवार्ता प्राधिकाऱ्यासह सुरक्षा अभिकरणास अशा वापरासाठी विहित करण्यात आले आहे, अशा सर्व प्रकरणांमध्ये, राज्याच्या मालकीच्या एका बुलेटप्रुफ वाहनाचा वापर करण्यास परवानगी देण्यात येईल.सुरक्षा अभिकरणाने तसे विनिर्देशपूर्वक विहित केले असल्याखेरीज, राखीव असणाऱ्या अनेक मोटार गाड्यांच्या वापरास परवानगी देण्यात येणार नाही. जेथे अशा बुलेटप्रुफ वाहनाचा वापर विनिर्दिष्ट केलेला असेल तेथे अशी बुलेटप्रुफ वाहने चालविण्याचा खर्च त्या विशिष्ट व्यक्तीलाच सोसावा लागेल. पथदर्शक, संरक्षक्र वाहने इत्यादींचा समावेश असणाऱ्या वाहनांच्या ताफ्यासोबतच्या वाहनांची संख्या ही काटेकोरपणे सुरक्षा प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांनुसार असेल आणि ती संख्या कोणत्याही परिस्थितीत त्याहून अधिक असणार नाही. अशी सर्व वाहने मग ती शासनाच्या मालकीची असोत किंवा भाड्याने घेतलेली असोत, चालविण्याचा खर्च राज्य शासनाकडून भागविण्यात येईल.

**प्रश्न ८ एका उमेदवाराने प्रचारासाठी परवानगी घेतलेले भाडेतत्वावरील खाजगी वाहन दुस-या उमेदवारासाठी वापरता येईल काय?**

उत्तर नाही. दुसऱ्या उमेदवाराने निवडणूक प्रचारासाठी अशा वाहनाचा वापर केल्यास तो भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ एच अन्वये कारवाईस पात्र असेल.

**प्रश्न ९ निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिका-याच्या परवानगीशिवाय वाहन वापरता येईल काय?**

उत्तर नाही. उमेदवाराने प्रचारासाठी वापरलेले असे वाहन अनधिकृत असल्याचे मानण्यात येईल आणि तो भारतीय दंड संहितेच्या प्रकरण ९ए च्या दंडनीय तरतुदीनुसार कारवाईस पात्र असेल आणि म्हणून ते वाहन निवडणुकीच्या प्रचार कार्यातून तात्काळ बाहेर काढण्यात येईल आणि ते पुढील प्रचार कार्यासाठी वापरण्यात येणार नाही.

**प्रश्न १० राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांना सार्वजनिक मालमत्तेवर पोस्टर, बॅनर, झेंडे लावता येतील काय ?**

उत्तर नाही. अशा प्रकरणी मालमत्ता विरुपण कायद्याखाली गुन्हा दाखल होईल. तथापि, प्रचार सभेच्या वेळी अशा प्रचार स्थळाकरिता तात्पुरत्या स्वरुपाची परवानगी देण्यात येईल.

**प्रश्न ११ जर स्थानिक कायदे / पोटनियमानुसार खाजगी मालमत्तेवरील भिंतीवरची पेंटींग, पोस्टर चिकटविणे, बॅनर व होर्डिंग लावणेबाबत तरतुद असेल तर खाजगी मालमत्तेच्या मालकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर होय. उमेदवाराने मालमत्तेच्या जागांच्या मालकांकडून संमती मिळविणे आवश्यक आहे. तसेच स्थानिक प्राधिकरणाची परवानगी मिळविणे आवश्यक आहे. अशा परवानगीची छायाप्रत / प्रती निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला किंवा या योजनासाठी त्याने पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याला ३ दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक असेल.

**प्रश्न १२ मिरवणुकीचे वेळी पक्षाचे / किंवा उमेदवाराचे पोष्टर, माहितीपत्रक, बॅनर, झेंडे लावण्याबाबत किंवा घेऊन जाण्याबाबत काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर उमेदवारास मोटार वाहन अधिनियम आणि इतर कोणतेही स्थानिक कायदे / उपविधी यांच्या तरतुदींना अनुसरुन सक्षम अधिका-यांच्या परवानगीने मिरवणुकी दरम्यान वाहनावर त्यांच्या पक्षाचे किंवा त्याचे स्वत:चे एक चित्र घोषणा फलक / बॅनर्स, झेंडा प्रदर्शित करता येईल लावता येईल / लावता येतो / वाहून नेता येईल.

**प्रश्न १३ प्रचारासाठी वाहनाचा विनापरवाना वापर केल्यास शिक्षा काय?**

उत्तर मोटर वाहन (दुरुस्ती) अधिनियम २०१९ ने प्रचारात वाहने गैरपरवाना वापरल्यास दंड व शिक्षेत वाढ केली आहे. परवाना नसताना प्रवासी वाहतूक केल्यास आता ₹१०,००० पर्यंत दंड किंवा ६ महिने तुरूंगवास अशी शिक्षा निश्चित केली आहे (पूर्वी ₹५,००० पर्यत दंड होता) (New Motor Vehicle (Amendment) Act २०१९ Rules & Penalties) (New Motor Vehicle (Amendment) Act २०१९ Rules & Penalties

## ६. <u>मंत्री व लोकप्रतिनिधी</u>

**प्रश्न १ मंत्री / पदाधिकारी यांनी प्रशासकीय कामकाजाकरीता केलेल्या दौ-याची सांगड निवडणूक कामाशी घालता येईल का ?**

उत्तर नाही. मंत्री, त्यांच्या शासकीय भेटीची निवडणूक प्रचार कार्याशी सांगड घालू शकत नाही आणि निवडणूक प्रचार कार्यादरम्यान शासकीय यंत्रणेचा किंवा कर्मचारी वर्गाचा सुध्दा वापर करु शकत नाहीत.

**प्रश्न २ निवडणूक कालावधीत विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय आयोगाच्या / महामंडळाच्या अध्यक्ष / सदस्यांचे दौ-यावर काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर <u>(Verify Shri Pulkundwar)</u>

**प्रश्न ३ मुख्यमंत्री / मंत्री किंवा एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पदाधिकाऱ्यास राष्ट्रीय सणांच्या / राज्य निर्मिती दिवस, सदभावना दिवस, हुतात्मा दिन इत्यादी निमित्ताने आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहता येईल काय, ध्वजारोहण करता येईल का ?**

उत्तर त्यास कोणतीही हरकत नाही. परंतु याप्रसंगी ते कोणतेही राजकीय स्वरुपाचे भाषण करणार नाहीत आणि केवळ शासकीय अधिकारीच हा कार्यक्रम आयोजित करतील. तसेच मुख्यमंत्री / मंत्री / पदाधिकारी / यांचे छायाचित्र दर्शविणारी कोणतीही जाहिरात प्रदर्शित करता येणार नाही. संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. एसईसी/जीईएन/२००२/सीआर-१०/डेस्क-१०, दिनांक २५/०१/२००२)

**प्रश्न ४ निवडणूक काळात राज्यपाल / मुख्यमंत्री / मंत्री यांना विद्यापीठाचे पदवीदान समारंभात उपस्थित राहून भाषण करता येईल काय ?**

उत्तर राज्यपालांना दीक्षांत समारंभात सहभागी होता येईल व भाषण करता येईल. मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना दीक्षांत समारंभात सहभागी न होण्याचा व भाषण न करण्याचा सल्ला देण्यात येईल.

**प्रश्न ५ निवडणूक काळात इफ्तार पार्टी किंवा अशा स्वरुपाच्या पाटर्यांना राजकीय पदाधिका-यांना त्यांच्या घरी राज्य शासनाचे खर्चाने आयोजित करता येतील काय ? अथवा गणेशोत्सवा-सारख्या कार्यक्रमात सहभाग घेता येईल का ?**

उत्तर नाही. तथापि, अशी कोणतीही पार्टी कोणतीही व्यक्ती तिच्या वैयक्तिक अधिकारात आणि स्वखर्चाने आयोजित करण्यास स्वतंत्र आहे. मात्र त्यावर झालेला खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करण्यात येईल. तसेच त्यांना गणेश उत्सवासारख्या कार्यक्रमात वैयक्तिक पातळीवर सहभागी होता येईल.

**प्रश्न ६ जयंत्ती - पुण्यतिथी साजरी करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करता येतील काय व त्यात पदाधिकाऱ्यांना सहभागी होता येईल का ?**

उत्तर होय. परंतु त्याचा राजकीय प्रचारांसाठी किंवा शासनाची सार्वजनिक कामगिरी ठळकपणे निदर्शनास आणण्यासाठी निमित्त म्हणून वापर करु नये. तसेच त्यात डामडौल असणार नाही आणि अशा बैठकीत कोणताही राजकीय कार्यअधिकारी राजकीय स्वरुपाचे भाषण करणार नाही. वरील निर्बंध अशा प्रकारच्या इतर सर्व कार्यक्रमांसाठी तितकाच लागू राहील.

**प्रश्न ७ निवडणूक काळात कवी संमेलने, मुशायरा किंवा इतर सांस्कृतिक कार्यक्रम जे स्वातंत्र्य दिन / प्रजासत्ताक दिनाचे समारंभाचे पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात येतात. त्या कार्यक्रमांना राजकीय पदाधिका-यांना उपस्थित राहता येईल काय ?**

उत्तर होय. राजकीय कार्याधिकारी कार्यक्रमाला उपस्थित राहू शकतात. तथापि, याप्रसंगी सत्ताधारी पक्षाची कामगिरी व ठळक वैशिष्ट्ये दर्शविणारी राजकीय भाषणे करण्यात येणार नाहीत. याची खात्री करुन घेण्यात येईल.

**प्रश्न ८ आचारसंहिता काळात भोजनावळी आयोजित करणे, प्याऊ ( पाणपोई) सुरु करणे यावर काही निर्बंध आहेत का ?**

उत्तर होय. आचारसंहिता कालावधीत असे कार्यक्रम घेता येणार नाहीत.

**प्रश्न ९ आचारसंहिता काळात लग्न, बारसे, वाढदिवस अशा खाजगी कार्यक्रमास विविध पदाधिकाऱ्यांना, उमेदवारांना उपस्थित राहाता येईल का ?**

उत्तर होय.

## ७. <u>शासकीय योजना व स्थानिक स्वराज्य संस्थांची कामे</u>

**प्रश्न १ निवडणूक काळात मंत्री किंवा सक्षम प्राधिकारी यांना स्थानिक विकास निधी / स्वेच्छा निधीतून मंजूरी किंवा खर्च करता येईल काय ?**

उत्तर नाही. मंत्री आणि इतर प्राधिकारी निवडणुका घोषित झाल्यापासून स्थानिक विकास निधी / स्वेच्छा निधीतून अनुदाने / रकमा मंजूर करणार नाहीत.

**प्रश्न २ निवडणूक काळात मंत्र्यांचे स्वेच्छा निधीतून मान्यता दिलेल्या रकमा या लाभार्थ्यांचे नावे कोषागारातून काढता येतील काय ?**

उत्तर निधी संबंधित विभागाच्या "वैयक्तिक खातेवही लेखा" मध्ये ठेवता येईल किंवा निवडणुका पूर्ण होईपर्यंत ती देण्यास स्थगिती देण्यात येईल.

**प्रश्न ३ समजा एखाद्या कामाचे कार्यरंभ आदेश दिल्यानंतर असे काम निवडणूक घोषित झाल्यानंतर सुरू करता येईल काय ?**

उत्तर निवडणूक घोषित होण्यापूर्वी कार्यादेश देण्यात आला असेल, परंतु त्या क्षेत्रामध्ये प्रत्यक्षपणे काम सुरू करण्यात आलेले नसेल त्या संबंधात, काम सुरु करण्यात येणार नाही. त्या क्षेत्रामध्ये जर काम प्रत्यक्षपणे सुरू झाले असेल तर ते चालू ठेवता येईल.

**प्रश्न ४ निवडणूक काळात खासदार / विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य यांचे स्थानिक विकास कार्यक्रमातून एखाद्या कामासाठी नव्याने निधी मंजूर करता येईल काय ?**

उत्तर नाही. जेथे निवडणूक चालू आहे अशा कोणत्याही क्षेत्रात निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत कोणत्याही योजनेसाठी संसद सदस्य / विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य यांच्या अधीन असलेल्या स्थानिक क्षेत्र विकास निधीमधून कोणताही नवीन निधी देता येणार नाही.

**प्रश्न ५ केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या निधीतून तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निधीतून सुरु असलेल्या विविध योजनांची कामे निवडणूक कालावधीत चालू ठेवण्याबाबत काही मार्गदर्शक सूचना आहेत काय ?**

उत्तर होय. खाली नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक योजना / कार्यक्रम यांच्या संबंधात पुढील मार्गदर्शक तत्वे अनुसरण्यास येतील.:-

**(1)इंदिरा आवास योजना (इं. आ. यो.):**

इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरांची योजना मंजूर झालेल्या आणि बांधकाम सुरु झालेल्या लाभार्थींना मानकांनुसार सहाय्य करण्यात येईल. निवडणुका पूर्ण होईपर्यंत, कोणतीही नवीन बांधकामे हाती घेण्यात येणार नाहीत किंवा नवीन लाभार्थींना सहाय्य मंजूर करण्यात येणार नाही.

**(2)राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (रा. ग्रा. रो. ह. अ.):**

ग्राम विकास मंत्रालय, निवडणुका घोषित झाल्यानंतर ज्या जिल्ह्यामध्ये त्या घेण्यात येणार आहेत त्या जिल्ह्याच्या संख्येत वाढ करणार नाही. निवडणुका घोषित झाल्यानंतर, जॉब कार्ड धारकांना, त्यांची कामाची मागणी असेल तर, चालू कामामध्ये त्यांना रोजगार पुरविण्यात येईल. चालू कामामध्ये कोणताही रोजगार पुरवता आला नाही, तर त्याबाबतीत सक्षम प्राधिकाऱ्यास संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना (जि. नि. अ.) मान्यता दिलेल्या मागे पडलेल्या प्रकल्पांमध्ये आणि त्यांना या वस्तुस्थितीची माहिती देऊन, नवीन काम (कामे) सुरू करता येतील. चालू कामामध्ये रोजगार देण्यात येऊ शकेपर्यंत, सक्षम प्राधिकाऱ्याकडून कोणतेही नवीन काम सुरू करण्यात येणार नाही. कोणताही मागे पडलेला

प्रकल्प उपलब्ध नसेल किंवा मागे पडलेल्या प्रकल्पामधील उपलब्ध असलेली सर्व कामे पूर्णपणे संपविण्यात आली असतील तर, संबंधित सक्षम प्राधिकारी, संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यामार्फत मान्यतेसाठी आयोगाकडे प्रकरण निर्देशित करील, सक्षम प्राधिकारी चालू प्रकल्पामध्ये, जॉब कार्ड धारकांना, रोजगार देण्यात येऊ शकला नाही म्हणून नवीन कामास मंजूरी देण्यात आली अशा अर्थाचे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला एक प्रमाणपत्र देखील देईल.

**प्रश्न ६ मंत्र्यांना, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना आर्थिक अनुदानाची घोषणा, आश्वासन किंवा एखाद्या कामाचे भूमीपूजन करता येईल काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ७ एखादी योजना मंजूर असेल व अशा योजनेसाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असेल तर अशा योजनेची निवडणूक कालावधीत घोषणा किंवा पूर्ण झालेल्या कामांचे उद्घाटन करता येईल काय ?**

उत्तर नाही. निवडणूक कालावधीत अशा योजनेचे उद्घाटन करण्यात / घोषित करण्यास मनाई आहे. तथापि, कोणताही कार्यक्रम आयोजित न करता सार्वजनिक सुविधेचा वापर सुरु करता येऊ शकेल.

**प्रश्न ८ निवडणूक काळात पूर्वीच्या चालू असलेल्या लाभार्थ्यांच्या योजना चालू ठेवता येतील काय ?**

उत्तर नाही. लाभार्थी अभिमुख योजनेची प्रक्रिया, ती जरी चालू असली तरी निवडणूक कालावधीमध्ये स्थगित करण्यात येईल. तसेच कल्याणकारी योजनांसाठी आणि कामांसाठी कोणताही नवीन निधी देता येणार नाही.

**प्रश्न ९ पूर्ण झालेल्या कामाची देयके देण्यावर काही निर्बंध आहेत काय?**

उत्तर संबंधित शासकीय अधिकाऱ्याच्या संपूर्ण खात्रीच्या अधीन राहून पूर्ण झालेल्या कामाकरिता रकमांचे प्रदान करण्यासाठी कोणताही अडथळा नाही.

**प्रश्न १० ज्या वित्तीय संस्थांना अंशतः अथवा पूर्णतः शासकीय अनुदाने देण्यात येतात अशा संस्था वैयक्तिक, कंपनीचे, फर्मचे कर्जे निवडणूक काळात निर्लेखित करु शकतात काय ?**

उत्तर नाही. शासनाने, अंशत: किंवा पूर्णत: निधी दिलेल्या वित्तीय संस्था, कोणत्याही व्यक्तीला, कंपनीला, भागीदारी संस्था, इत्यादींना दिलेली आगाऊ कर्जे निर्लेखित करण्याचा अवलंब करता येणार नाही. तसेच कर्जे मंजूर करताना किंवा वाढविताना, अशा संस्थांच्या वित्तीय मर्यादा देखील, लाभार्थींना तारतम्य न ठेवता कर्जे देऊन वाढविता येणार नाहीत.

**प्रश्न ११ मद्यांची, तेंदुपत्यांची निविदा किंवा लिलाव प्रक्रिया निवडणूक काळात करता येईल काय ?**

उत्तर नाही. अशा प्रकरणांच्या प्रक्रिया निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्थगित ठेवाव्यात आणि शासनास जेथे टाळता न येण्यासारखी आवश्यक परिस्थिती असेल तेथे अंतरिम व्यवस्था करता येईल.

**प्रश्न १२ समजा टोल टॅक्स वसुलीचे कंत्राट वित्तीय वर्ष अखेरीस संपत असेल व ज्याची लिलावाची तारीख निश्चित करुन प्रसिध्द करण्यात आली असेल तर निवडणूक काळात असा कंत्राट मंजूरीसाठी लिलाव करता येईल काय ?**

उत्तर होय. परंतु आयुक्त / विभागीय आयुक्त अथवा आयुक्तास / विभागीय आयुक्तास प्रत्यक्ष जबाबदार असलेल्या अन्य कोणताही वरिष्ठ अधिकारी कंत्राटावर पर्यवेक्षण करील आणि आधीच्या धोरणामध्ये किंवा लिलाव पध्दतीमध्ये कोणताही बदल करणार नाही.

**प्रश्न १३ निवडणूक काळात महानगरपालिका, नगरपंचायत, शहर समित्या यांचा महसूल वसूलीचा आढावा घेऊन प्रारुप वार्षिक अर्थसंकल्प तयार करण्यासाठी बैठक बोलावता येईल काय ?**

उत्तर होय. परंतु अशा बैठका दैनंदिन प्रशासनाशी संबंधित असणाऱ्या नित्याच्या स्वरुपाच्या बाबींवरच केवळ घेता येतील. तथापि, त्या बैठका धोरणे व कार्यक्रम याच्याशी संबंधित असणाऱ्या बाबींवर घेता येणार नाहीत.

**प्रश्न १४ निवडणूक काळात आरोग्य विषयक कार्यक्रमाचे आयोजन करुन त्याचे उद्घाटन राजकीय पदाधिका-याच्या हस्ते करता येईल काय ? तसेच आरोग्य विषयक दिनाची जाहिरात प्रसिध्द करता येईल काय ?**

उत्तर यास हरकत नाही. परंतु,

(१) उद्घाटन सोहळ्यामध्ये, कोणतीही राजकीय भाषणे करता येणार नाहीत.

(२) पदाधिका-यांच्या छायाचित्रासह जाहिरात देता येणार नाही, आणि

(३) जाहिराती व भाषणे केवळ आरोग्य विषयापुरतीच मर्यादित असतील.

**प्रश्न १५ शासन निवडणूक काळात विहित कार्यपध्दती अनुसरून गुन्हेगारांना पॅरोलवर सोडू शकेल काय?**

उत्तर : ज्या प्रकरणी काही अनिवार्य कारणांसाठी, पॅरोलवर असलेल्या कोणत्याही सिध्दपराध्यास मुक्त करणे अत्यंत आवश्यक आहे, असे शासनास वाटत असेल तर, अशा प्रकरणी, शासन, पॅरोल मंजूर करण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाशी विचार विनिमय करील.

**प्रश्न १६ आचारसंहितेच्या काळात दुष्काळ, पाणी टंचाई विषयक नवीन उपाय योजनांना मंजुरी देता येईल का ? तसेच दुष्काळ, पाणी टंचाई, गंभीररित्या आजारी असलेल्यांना पूर्वीपासून देण्यात येत असलेली मदत पुढे चालू ठेवता येतील का ?**

उत्तर : होय. परंतु सत्ताधारी पक्षाच्या बाजूने, मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या दृष्टीने केवळ ती करण्यात येत आहे, अशी छाप पाडण्यात येणार नाही किंवा प्रभाव निर्माण करण्यात येणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

**प्रश्न १७ आचारसंहितेच्या कालावधीमध्ये नेमणुका / भरती करण्याच्यादृष्टीने जाहिराती देणे, मुलाखती घेणे व प्रत्यक्ष नियुक्त्या करणेबाबत कार्यवाही करता येईल का ?**

उत्तर नाही. मात्र केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांना या विषयी प्रतिबंध नाही.

**प्रश्न १८ आचारसंहितेच्या कालावधीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध समित्या / सर्वसाधारण समितीच्या बैठका घेता येतील का ?**

उत्तर होय. तथापि, सदर बैठकांमध्ये कोणताही धोरणात्मक निर्णय घेता येऊ शकत नाही.

**प्रश्न १९ निवडणूक आचारसंहितेच्या काळात नवीन शस्त्र परवाने मंजूर करता येतील का ?**

उत्तर नाही.

## ८. <u>मतदानाचा दिवस व मतमोजणी</u>

**प्रश्न १ उमेदवार व राजकीय पक्षांनी मतदारांना द्यावयाच्या अनौपचरिक ओळख चिठ्ठया देण्याबाबत काही मार्गदर्शक सूचना आहेत काय?**

उत्तर होय. पांढऱ्या कागदावरील अनौपचारिक ओळख चिठ्ठीत केवळ मतदाराचा तपशील म्हणजेच मतदाराचे नाव, त्याचा अनुक्रमांक, मतदार यादीतील भाग क्रमांक, मतदान केंद्राचा अनुक्रमांक व नांव आणि मतदानाचा दिनांक अंतर्भूत असेल. त्यात उमेदवाराचे नाव, त्याचे छायाचित्र आणि चिन्ह अंतर्भूत असता कामा नये.

**प्रश्न २ एखाद्या मंत्री / खासदार / विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य किंवा एखादा व्यक्ती ज्यांना सुरक्षा कवच आहे त्यांना निवडणूक प्रतिनिधी / मतदान प्रतिनिधी / मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नेमणूक करण्यास काही निर्बंध आहेत काय?**

उत्तर होय. उमेदवारास सुरक्षा पुरविलेला मंत्री / खासदार / विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य किंवा इतर कोणतीही व्यक्ती यांची निवडणूक प्रतिनिधी / मतदान प्रतिनिधी / मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करता येत नाही. कारण अशा नियुक्तीमुळे त्यांची वैयक्तिक सुरक्षा धोक्यात येईल. त्यामुळे, त्यांच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत

मतदान केंद्राचा परिसर असे वर्णन केलेल्या मतदार केंद्राच्या १०० मीटर परिघाच्या क्षेत्रात आणि मतदान केंद्रात आणि मतमोजणी केंद्राच्या परिसरात आणि मतमोजणी केंद्राच्या आत त्याच्या सोबत येऊ दिले जाणार नाही. अशा सुरक्षा दिलेल्या कोणत्याही व्यक्तीस एखाद्या उमेदवाराचा असा प्रतिनिधी म्हणून कार्य करण्यासाठी त्याची सुरक्षा सोडण्याची परवानगीही देण्यात येणार नाही.

**प्रश्न ३ उमेदवारास मतदान प्रतिनिधी म्हणून कोठेही राहणा-या व्यक्तीची नियुक्ती करता येईल काय?**

उत्तर नाही. उमेदवाराने मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केलेली व्यक्ती सामान्यपणे संबंधित मतदान केंद्राच्या भागातील रहिवाशी आणि संबंधित मतदान प्रभागातील मतदार असला पाहिजे आणि संबंधित मतदान केंद्राच्या क्षेत्राबाहेरील असता कामा नये. अशा व्यक्तींकडे निवडणूक छायाचित्र ओळखपत्रही असले पाहिजे.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र .स्थास्वसं - २००४/ प्र.क्र. २५/ कार्या.- ०५, दिनांक १०/११/२००४)

**प्रश्न ४ राजकीय पक्षानी स्टार प्रचारकांची यादी कोणास व केव्हा कळविणे आवश्यक आहे ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोग / निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी.

**प्रश्न ५ एसएमएस करण्यास काही निर्बंध आहेत काय?**

उत्तर होय. निवडणुकीदरम्यान लघु संदेश सेवेमार्फत आक्षेपार्ह संदेश पाठविण्यास बंदी आहे. तसेच याविषयीचा खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट केला जाईल.

**प्रश्न ६ मतदानाचे दिवशी मतदान केंद्राचे बाहेर पक्षाचे / उमेदवाराचे निवडणूक बूथ उभारण्यास काही मार्गदर्शक सूचना आहेत काय?**

उत्तर मतदान केंद्रापासून २०० मीटर अंतरापलीकडे निवडणूक मंडप उभारता येईल. तो दोन व्यक्तीचे संरक्षण करण्यासाठी छत्रीचा किंवा ताडपत्रीचा अथवा कापडाच्या तुकड्याचा बनविलेला असेल व त्यात केवळ एक टेबल (मेज) व २ खुर्च्या असतील. तथापि, एकाच इमारतीमध्ये दोन मतदान केंद्रे उभारण्यात आली असल्यास दोन मतदान मंडपही उभारता येऊ शकतील. मात्र असे बूथ उभारण्याकरिता संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घ्यावी लागेल.

**प्रश्न ७ मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राचे जवळ प्रचार करण्यास काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर होय, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रापासून शंभर मीटर परीघाच्या आत मतांसाठी प्रचार करण्यास प्रतिबंध आहे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २५)

**प्रश्न ८ मतदान केंद्रात मोबाईल फोन (भ्रमनध्वणी), आय पॅड, टॅबलेट ई. ईलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरण्यास परवानगी आहे काय ?**

उत्तर १०० मीटर परीघाच्या आत मतदान केंद्र परिसर म्हणून वर्णन केलेल्या मतदान केंद्राच्या परिसरात आणि मतदान केंद्रामध्ये भ्रमणध्वनी, तार विरहित दूरध्वनी आणि बिनतारी संदेश संच अथवा अन्य ईलेक्ट्रॉनिक उपकरणे इत्यादी बाळगण्यास किंवा वापरण्यास कोणत्याही व्यक्तीला मुभा नाही. केवळ निरिक्षक / सुक्ष्म निरिक्षक, मतदान केंद्राध्यक्ष व सुरक्षा कर्मचारी वर्ग यांनाच भ्रमणध्वनी बाळगण्यास मुभा आहे. परंतु त्यांचे भ्रमणध्वनी नि:शब्द (सायलेंट मोडवर) ठेवतील.

**प्रश्न ९ मतदान केंद्रात किंवा जवळ शस्त्रासह प्रवेश करण्यास काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर होय. कोणत्याही व्यक्तीला, शस्त्र अधिनियम १९५९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या शस्त्रांनी सुसज्ज होऊन मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या जवळपास जाण्यास मुभा नाही.

**प्रश्न १० मतदानाचे दिवशी उमेदवारास किती वाहने वापरण्यास परवानगी आहे ?**

उत्तर मतदानाच्या दिवशी प्रत्येक उमेदवारास स्वत:च्या वापरासाठी एक वाहन व त्याचा निवडणूक प्रतिनिधी किंवा कार्यकर्ते यांच्यासाठी एक वाहन वापरण्यास परवानगी देता येईल. तथापि, हे वाहन मतदारसंघातच वापरणे आवश्यक आहे.

**प्रश्न ११ मतदानाचे दिवशी उमेदवार मतदारसंघाचे बाहेर असेल तर त्याचे नावे परवानगी असलेले वाहन इतर व्यक्तींना वापरता येईल काय ?**

उत्तर नाही. इतर कोणत्याही व्यक्तीला उमेदवाराच्या वापरासाठी वाटप केलेले वाहन वापरण्याची मुभा नाही.

**प्रश्न १२ मतदानाचे दिवशी ॲम्ब्यूलन्स, दुग्ध विकास इत्यादी अत्यावश्यक सेवांची वाहने यांचा वापर निवडणूक कामासाठी करता येतो का ?**

उत्तर नाही.

**प्रश्न १३ उमेदवार / पक्षास मतदारांना मतदान केंद्रावर ने-आण करण्याची व्यवस्था करता येते काय ?**

उत्तर नाही. मतदाराची ने-आण करण्यासाठी वापरलेल्या कोणत्याही प्रकारच्या वाहनाद्वारे मतदान केंद्राकडे व मतदान केंद्रापासून मतदारांची ने-आण करण्याची कोणतीही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष व्यवस्था करणे हा अपराध आहे.

(संदर्भ-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २२ (५))

**प्रश्न १४ मतदानाचे दिवशी शासकीय / खाजगी वाहनांच्या वापरावर काही निर्बंध आहेत काय ?**

उत्तर नाही, बस, मिनीबस, यासारखी शासकीय वाहने वापरण्यास मुभा आहे. परंतु ती मतदारांनी येण्याजाण्यासाठी चोरुन वापरली जात नाहीत, याची खातरजमा करुन घ्यावी. याशिवाय मतदान मंडपा व्यतिरिक्त रुग्णालये, विमानतळ, रेल्वे स्थानके, बस स्थानके, मित्र किंवा नातेवाईक यांची घरे, क्लब आणि रेस्टॉरंट यांसारख्या ठिकाणाहून रस्त्याने प्रवाशांची ने-आण करणाऱ्या खाजगी कार, टॅक्सी यांना चालविण्यास मुभा देण्यात येईल परंतु मतदारांची ने-आण करण्यासाठी त्यांना मतदान केंद्राजवळ वाहने चोरटेपणाने आणण्यास मुभा देता येणार नाही.

**प्रश्न १५ राजकीय पक्षाच्या नेत्यास खाजगी विमान आणि हेलिकॉप्टर हे मतदानाच्या व मतमोजणीच्या प्रक्रियेचे पर्यवेक्षणासाठी वापरता येईल काय ?**

उत्तर नाही. एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्याला मतदानाच्या व मतमोजणीच्या दिवशी, मतदानाचे व मतमोजणी प्रक्रियेचे पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्याच्या प्रयोजनाकरिता खाजगी विमानाचा व हेलिकॉप्टरचा वापर करण्यास मुभा असणार नाही.

**प्रश्न १६ मतदान व मतमोजणीच्या दिवशी मद्य (दारु) विक्रीस बंदी असते का ?**

उत्तर होय.

(संदर्भ - राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. एसईसी-१०९५/ सीआर - १/९५/ डेस्क-३, दिनांक ०७/०३/१९९५)

**प्रश्न १७ उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस मतदान केंद्रात मुक्त प्रवेश आहे का ?**

उत्तर होय. तथापि, उमेदवार किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या वारंवार प्रवेशामुळे मतदान प्रक्रियेस बाधा येत असल्यास त्यांच्या प्रवेशावर मतदान केंद्राध्यक्षास निर्बंध घालता येतील.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम १० आणि ३०)

**प्रश्न १८ मतदानाचे दिवशी आठवडी बाजार किंवा यात्रा असल्यास काय करावे ?**

उत्तर मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार किंवा यात्रा असल्यास सदर बाजार / यात्रा बंदीबाबतचे जिल्हादंडाधिकारी व सक्षम विभागाचे अधिकारी यांचे आदेश काढण्यात यावेत व त्याला आगाऊ प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रश्न १९ सरकारी, खाजगी आस्थापनांमधील कर्मचाऱ्यांना मतदानाचे दिवशी सुट्टी दिली जाते का ? याबाबतचे अधिकार कोणाला आहेत ?**

उत्तर होय. प्रस्तुत अधिकार हे जिल्हाधिका-यांना आहेत.

## ९. <u>विविध परवानग्या</u>

**प्रश्न १ वृत्तपत्र प्रतिनिधीस पासेस देण्याचे अधिकार कोणाला आहेत ? वृत्त प्रतिनिधींवर काय निर्बंध असतात ?**

उत्तर वृत्तपत्र प्रतिनिधींना निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून पासेस देण्यात येतात. सदर पासेस प्राधान्याने अधिस्विकृती धारक वृत्तप्रतिनिधींना देण्यात येतात.

**प्रश्न २ उमेदवाराने मतदान केंद्राबाहेर बूथ उभारण्यास शासकीय / स्थानिक प्राधिका-यांची परवानगी घेणे आवश्यक आहे काय ? ही परवानगी कोण देतो ?**

उत्तर होय. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे ही परवानगी दिली जाते.

**प्रश्न ३ खाजगी मालमत्तेच्या संबंधातील पोस्टर, बॅनर तसेच झेंडे इ. लावण्यासाठी परवानगी कोणत्या अधिकाऱ्याकडून घ्यावी ?**

उत्तर खाजगी मालमत्ताधारकाच्या लेखी संमती आधारे प्रचार साहित्य लावण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राधिकृत अधिका-याकडून अशी परवानगी देण्यात येते.

**प्रश्न ४ प्रचाराकरिता वाहन वापरण्यासाठी परवानगी देण्यास कोण अधिकारी सक्षम आहेत ?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी.

**प्रश्न ५ प्रचार सभांकरिता कोणाची परवानगी घ्यावी लागेल ?**

उत्तर संबंधित पोलिस ठाणे अधिकारी

**प्रश्न ५ उमेदवाराचा प्रचार करण्यासाठी प्रचार फेरी / प्रभात फेरी / रॅली या करिता कोणाची परवानगी घ्यावी लागेल ?**

उत्तर संबंधित पोलिस ठाणे अधिकारी .

**प्रश्न ६ लाउडस्पिकर / ध्वनिक्षेपक वाहनावर लावून प्रचार करण्यासाठी कोणाची परवानगी लागते ? अशा वापरावर काय निर्बंध आहेत ?**

उत्तर संबंधित पोलिस ठाणे अधिकारी यांचेकडून परवानगी घ्यावी लागते. अशा वापरा**साठी** सकाळी ६ ते रात्री १०.०० वाजेपावेतो परवानगी आहे. चालत्या वाहनावर तसेच शांतता क्षेत्रामध्ये ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. तसेच ध्वनिच्या उच्चतम मर्यादेचे (डेसिबल) उल्लंघन करता येणार नाही.

(संदर्भ - मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३६ (ea) आणि राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. एसईसी-१०९५/ सीआर - ९/९५/ डेस्क-३, दिनांक १८/०३/१९९५)

**प्रश्न ७ हस्तपुस्तिका, पॅम्पलेट, बॅजेस इ. प्रचार साहित्य छापण्यासाठी परवानगी घेणे आवश्यक आहे का? ही परवानगी कोण देतो ?**

उत्तर पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता नाही. परंतू छापलेल्या किंवा कोणत्याही प्रक्रियेव्दारे प्रती काढलेल्या (हाताने प्रती काढणेखेरीज) निवडणूकीच्या प्रत्येक प्रचार साहित्याच्या प्रतीवर पुढील बाजूला मुद्रकाचे नाव व पत्ता आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता असलाच पाहिजे. अशा कोणत्याही प्रचार साहित्याच्या मुद्रकाने इच्छूक प्रकाशकाकडून त्याने सही केलेले आणि त्याला व्यक्तीश: ओळखणा-या दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेले त्याच्या ओळखीसंबंधीचे प्रतिज्ञापन दोन प्रतीमध्ये मिळविले पाहिजे. प्रचार साहित्य छापल्यानंतर लवकरात लवकर मुद्रकाने प्रतिज्ञापनाची एक प्रत आणि प्रचार साहित्याची एक प्रत ही जिल्हाधिकारी यांना पाठविली पाहिजे.

(संदर्भ: पंचायत आणि नगरपरिषद निवडणूकीमध्ये पत्रके आणि भित्तीपत्रके छापणे व प्रकाशित करणे यावरील निर्बंध आदेश १९९५ - दिनांक २८/०८/१९९५)

**प्रश्न ८ प्रचारासाठी मैदाने वापरण्याची परवानगी देण्याचे अधिकार कोणाला आहेत ?**

उत्तर संबंधित जागेचे मालक यांचे पूर्वपरवानगीने व पोलिस अधिकारी यांच्या परवानगीने स्थानिक स्वराज्य संस्थेला परवानगी देण्याचे अधिकार आहेत.

**प्रश्न ९ मतदानाचे दिवशी उमेदवाराने/निवडणूक प्रतिनिधीने वापरावयाच्या वाहनांची परवानगी कोण देतो?**

उत्तर निवडणूक निर्णय अधिकारी.

**प्रश्न १० दृक्-श्राव्य माध्यमातून प्रचार करण्यासाठी (इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे) / व्हिडिओ फिल्म कोणाची परवानगी लागते?**

उत्तर यासाठी गठीत केलेल्या समितीची.

# प्रकरण २३.

# कायदा व सुव्यवस्था

# (Law & Order)

## १.सर्वसाधारण

**प्रश्न १ कायदा व सुव्यवस्था म्हणजे काय ? ही राखण्याची प्रमुख जबाबदारी कोणाची असते ?**

उत्तर कायदा व सुव्यवस्था म्हणजेराज्यातील किंवा विशिष्ट क्षेत्रातील व्यवस्था संपूर्णत: कायदयाच्या अमलाखाली असणे. यामध्ये धनदांडग्या व गुंड अशाअपप्रवृत्तींना कायदयाच्या नियंत्रणात ठेवून सामान्य नागरीकांस सुरक्षितता अनुभवास देणे अभिप्रेत आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची प्रमुख जबाबदारी ही जिल्हा दंडाधिकारी व पोलिसअधिक्षकांची /पोलिस आयुक्तांची असते.

**प्रश्न २ निवडणूकीची आदर्श आचार संहिता कधी पासून लागू होते ?**

उत्तर निवडणूकीची आचारसंहिता ही निवडणूककार्यक्रम घोषित झालेल्या दिवशी रात्री १२ वाजल्या पासून लागू होते व निकाल घोषित होईपर्यंत अमलात राहते.

**प्रश्न ३ आचार संहितेच्या काटेकोर पालनाचे अनुषंगाने आवश्यक असणारे प्रतिबंधात्मक आदेश कोणत्या तरतूदीनुसार व कोणाकडून काढण्यात येतात ?**

उत्तर आचारसंहितेच्या काटेकोर पालनसाठी आवश्यक असणारे विविध प्रतिबंधात्मक आदेश हे फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४(२) अन्वये तसेच, महाराष्ट्र पोलिसअधिनियम चे कलम ३७(१)(३) अन्वये जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून काढण्यात येतात.

**प्रश्न ४ निवडणूक जाहिर झाल्यापासून मतमोजणी पर्यंत सवर्साधारणपणे कोणकोणत्या कारणांसाठी पोलीस बंदोबस्त पुरविला जातो** ?

उत्तर निवडणूक जाहीर झाल्यानंतर नामनिर्देशनपत्र स्विकारणे, नामनिर्देशनपत्रांचीछाननी, उमेदवारी मागे घेणे, मतदान पथके रवाना करणे, मतदान प्रक्रिया व सुरक्षा कक्षाचा बंदोबस्त व मतमोजणीच्या कामी आवश्यकतेनुसार व मागणीनुसार पोलिस बंदोबस्त पुरविण्यात येतो.

## 2. प्रतिबंधात्मक आदेश

**प्रश्न १ निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कोणत्या प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात येतात?**

उत्तर निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था आबाधित ठेवण्यासाठी जमावबंदी व शस्त्रबंदी चे आदेश महाराष्ट्र पोलिस अधिनियमचे कलम ३७(१)(३) अन्वये लागू करण्यात येतात. तसेच, आवश्यकतेनुसार फौ.प्र.स.१९७३ चे कलम १४४(२) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश काढण्यात येतात.

**प्रश्न २ प्रतिबंधात्मक आदेशांना कालमर्यादा लागू असते काय ?**

उत्तर होय, प्रतिबंधात्मक आदेशांना कालमर्यादा लागू असते व ती आदेशात नमूद असते

**प्रश्न ३ निवडणूक काळात शस्त्र वापरावर कोणते निर्बंध लागू होतात ?**

उत्तर निवडणूक काळात विशेष सूट आसलेली शस्त्रे खेरीज करुन वैयक्तिक सुरक्षिततेसाठी दिलेली शस्त्रे काढून घेण्यात येतात.

**प्रश्न ४ शस्त्रे काढून घेण्याचे आदेश कोणाकडून काढले जातात ?**

उत्तर शस्त्रे काढून घेण्याबाबतचे आदेश जिल्हास्तरीय समिती कडुन छाननी अंती जिल्हादंडाधिकारी किंवा पोलिस आयुक्त यांचेकडून काढण्यात येतात.

**प्रश्न ५ निवडणूक कालावधीत शस्त्रे कोणाकडे जमा केली जातात ?**

उत्तर निवडणूक कालावधीत काढून घेण्यात आलेली शस्त्रे संबधीत पोलिस स्टेशनला जमा करण्यात येतात.

**प्रश्न ६ कोणत्या शस्त्रांना जमा करण्यापासून सूट दिली जाते ?**

उत्तर बँक व विशेष सुरक्षाप्राप्त प्रतिष्ठांनाकडे सुरक्षेसाठी असलेली शस्त्रे जमा करण्यापासुन सूट दिली जाते

**प्रश्न ७ निवडणूक कालावधीत नवीन शस्त्र वापर परवाने दिले जातात काय ?**

उत्तर नाही.

**प्रश्न ८ शस्त्रे जमा करुन घेण्याची काय रित आहे ?**

उत्तर छाननी समिती मार्फत शस्त्रे जमा करुन घेण्याचा निर्णय झाल्यानंतर शस्त्रधारकांची शस्त्रे जमा करण्याबाबत पोलिस स्टेशन अधिका-याकडून संबंधित शस्त्र परवाना धारकास सूचना पाठवण्यात येते व त्यानंतर शस्त्रे पोलिस स्टेशन येथे जमा करून घेण्यात येतात.

**प्रश्न ९ शस्त्रे जमा करून घेण्याबाबत असलेल्या छाननी समितीची रचना कशी असते ? शस्त्र जमा करून घेण्यामध्ये या समितीचे कार्य काय असते ?**

उत्तर शस्त्र जमा करुन घेण्यासाठी १.जिल्हादंडाधिकारी, २. पोलिस अधिक्षक, ३. ठाणे प्रभारी, ४.

अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी यांची समिती असते. ही समिती कोणाची शस्त्रे जमा करावयाची व कोणत्या शस्त्रांना सूट दयावयाची याचा निर्णय घेते.पोलिस आयुक्तालयाचे क्षेत्रात पोलिस आयुक्तांचे अध्यक्षतेखालील समिती कडून हे कार्य पार पाडले जाते .

**प्रश्न १० निवडणूक कालावधीत सराईत गुन्हेगारांवर कोणत्या प्रकारची कारवाई केली जाते ?**

उत्तर निवडणूक कालावधीत सराईत गुन्हेगार यांच्याविरुध्द फौ.प्र.सं. चे कलम १०७, १०९, ११० नुसार बंधपत्र घेण्यात येते. तसेच, त्यांचेविरुध्द प्रसंगी महाराष्ट्र पोलिस अधिनियमान्वये हदद्पारीचीही कार्यवाही करण्यात येते.

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०७ - शांतता राखण्यासाठी जामीन

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०९ - संशयीत व्यक्तिकडून चांगल्या वागणूकीसाठी जामीन

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ११० - सराईत अपराध्याकडून चांगल्या वागणूकीसाठी जामीन

**प्रश्न ११ निवडणूकीत मद्य विक्रीवर व वाहतूकीवर काय निर्बंध असतात ? सदर आदेशाची अंमलबजावणी कोणाकरवी केली जाते ?**

उत्तर मतदानाच्या पुर्विचा एक दिवस, मतदानाचा दिवस व मतमोजणीच्या दिवशी जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून मद्यविक्री व वाहतुकीवर बंदी घालण्यात येते. तसेच, संपूर्ण कालावधीत मदयांची अवैध वाहतुक व किंवा अवैध वाटप यावर पोलिस अधिकारी व राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून प्रभावी नियंत्रण ठेवले जाते.

**प्रश्न १२ निकडीच्या प्रसंगी प्रतिबंधात्मक आदेश एकतर्फी काढण्यात येतात काय ?**

उत्तर होय.

**प्रश्न १३ मतदान व मतमोजणी या दिवशी मद्य विक्रीस प्रतिबंध घोषित करणेबाबतचे आदेश कोणाकरवी काढले जातात ?**

उत्तर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पोलिस आयुक्त

**प्रश्न १४ विश्रामगृहाचा वापर, ध्वनीक्षेपकाचा वापर, सभा, रॅली, मिरवणूका इत्यादीमध्ये लाऊडस्पीकरप्रचार अथवा / वाहनांचा वापर याविषयी कोणत्या तरतूदीनुसार प्रतिबंधात्मक आदेश काढून आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली जाते ?**

उत्तर फौ.प्र.सं. १९७३ चे कलम १४४(२) अन्वये.

**प्रश्न १५ मतदानाचे दिवशी आठवडी बाजाराच्या बंदीचे आदेश कोण काढतात व कोणत्या तरतूदीनुसार ?**

उत्तर जिल्हाधिकारी यांचेकडून प्रस्ताव केला गेल्यानंतरपणन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून असे आदेश काढण्यात येतात

**प्रश्न १६ निवडणूक निर्णय अधिकारी यांना प्रतिबंधात्मक आदेश काढता येऊ शकतात काय ?**

उत्तर नाही.

## 3. निवडणूकीसाठी सुरक्षा प्रबंध

**प्रश्न १ निवडणूक सुरक्षा आराखडा कोणाकरवी केला जातो ? यामध्ये जिल्हा दंडाधिकारी व पोलिस अधिक्षक यांची काय भूमिका असते ?**

उत्तर संबधीत क्षेत्राचे पोलिस अधिकारी हे निवडणूकीचा सुरक्षा आराखडा तयार करतात. यामध्ये जिल्हादंडाधिकारी व पोलिस अधिक्षक हे आराखडयास मान्यता देतात.

**प्रश्न २ मतदान पथकाच्या व इव्हीएमच्या सुरक्षेची जबाबदारी कोणावर असते ?**

उत्तर मतदान पथक व ईव्हीएमच्या सुरक्षेची जबाबदारी ही नियुक्त सुरक्षापथकावर असते.

**प्रश्न ३ मतदान व मतमोजणीचा सुरक्षा आराखडा (Security Plan) तयार करतांना काय दक्षता घ्यावी लागते ?**

उत्तर मतदान व मतमोजणीचा सुरक्षा आराखडा तयार करतांना पूर्वइतिहास, उमेद्वारामधील स्पर्धा, नागरीकांच्या प्रतिक्रिया, होणारी गर्दी इत्यादी बाबत माहीती घेवुन सुरक्षा आराखडा तयार करणे आवश्यक असते.

**प्रश्न ४ मतदान केंद्रावरील सुरक्षा रक्षकाची कर्तव्ये कोणती ?**

उत्तर मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात जाहीर प्रचार होणार नाही, निवडणूकीचे चिन्ह यांचा वापर होणार नाही, मतदारांच्या स्वंतत्र रांगा लावून मतदारांना शिस्तीने मतदान केंद्रात प्रवेश देणे इत्यादी कामे मतदान केंद्रावरील सुरक्षारक्षकास करावी लागतात.

**प्रश्न ५ निवडणूक कर्तव्यावर असलेल्या सुरक्षा कमर्चा-यांना टपाली मतदानाची सुविधा मिळू शकते काय ?**

उत्तर होय. संबधीतांनी मागणी केल्यास व त्यांचे नांव मतदार यादीत समाविष्ट असेलतर त्यांना टपाली मतपत्रिका पुरविण्यात येते.

**प्रश्न ६ निवडणूक भत्ता कोणत्या सुरक्षा कर्मचा-यांना अनुज्ञेय असतो ?**

उत्तर मतदान केंद्रावरील सुरक्षा कर्मचा-यांना निवडणूक भत्ता अनुज्ञेय असतो.

**प्रश्न ७ तोतया मतदारांवर पोलिसांनी कोणती कार्यवाही करणे अभिप्रेत आहे ?**

उत्तर तोतया मतदाराविरुध्द मतदान केंद्राध्याक्षांनी अर्ज भरुन दिल्यास त्यास संबधीत पोलिस स्टेशनमध्ये हजर करुन गुन्हा दाखल करण्यात येतो.

**प्रश्न ८ मतदान केंद्रावर १०० मीटर व २०० मीटर अंतराच्या बाबतीत कोणत्या गोष्टींना प्रतिबंध लागू असतो ?**

उत्तर २०० मीटर अंतराच्या बाहेर उमेद्वाराचे बुथ लावण्यात येतात. तर १०० मीटर अंतराच्या आत प्रचारास प्रतिबंध असतो.

**प्रश्न ०९ मतदान / मतमोजणी केंद्रावर मोबाईल, पेजर वा तत्सम इलेक्ट्रानिक साधने वापरावर आयोगाच्या काय मागर्दशर्क सूचना आहेत ?**

उत्तर वापरास निर्बंध आहेत.

**प्रश्न १० मतदान केंद्रावरील सुरक्षा व्यवस्था कोणाचे अधिनस्त असते ?**

उत्तर सुरक्षारक्षक.

**प्रश्न ११ मतमोजणी केंद्राचे सुरक्षिततेबाबत कोणाचे प्रमाणीकरण आवश्यक आहे ?**

उत्तर मतमोजणी केंद्राचे सुरक्षिततेबाबत सार्वजनिक निवडणूक निर्णय अधिकारी, बांधकाम विभाग, संबंधितपोलिस अधिकारी, अग्निशमन विभाग यांच्याकडून संयुक्त पहाणी करून तदनंतर त्या त्या विभागाकडून प्रमाणिकरण करण्यात येते.

**प्रश्न १२ मतमोजणी केंद्राची निश्चिती कोण करतात ?**

उत्तर राज्य निवडणूक आयोगाच्या सुचनांच्या अधिन राहून, जिल्हाधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी पोलिस विभागाच्या सल्ल्याने निश्चित करतात.

( SEC/GEN-११९९/ प्र.क्र.६७/का १० दि. १८ ऑगस्ट, १९९९ )

**प्रश्न १३ संवेदनशील भागामध्ये / परिस्थितीमध्ये निवडणूक पार पाडत असताना केंद्रीय सुरक्षा दलांची मदत घेण्याबाबत काय प्रक्रिया असते ?**

उत्तर संवेदनशील प्रसंगी केंद्रीय सुरक्षाबळाची मदत घेण्यासाठी जिल्हादंडाधिकारी यांच्यामार्फत गृह विभागाची परवानगी घ्यावी लागते.

## ४.संवेदशील व अतिसंवेदशील मतदान केंद्रे निश्चित करणे

**प्रश्न १ संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्र म्हणजे काय ? त्यांच्या निश्चितीचे निकष काय आहेत ?**

उत्तर संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्र म्हणजे मागील निवडणूकीत ज्या मतदान केंद्रावर, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली असेल, मतदान यंत्र ताब्यात घेण्याचा प्रयत्न झाला असेल, मतदान अधिकारी/कर्मचारी यांच्यावर हल्ला झाला असेल अशी मतदान केंद्र होत.

**प्रश्न २ संवेदनशील व अतिसंवेदनशीलमतदान केंद्र निश्चित करण्याचे अधिकार कोणास आहेत ?**

उत्तर पोलिस अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने निवडणूक अधिकारी

**प्रश्न ३ संवेदनशील व अतिसंवेदनशीलमतदान केंद्राबाबत विधानसभा निवडणुकीतील मतदान केंद्र स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीसाठी सुध्दा संवेदनशील ठरते काय ?**

उत्तर जश्यास तसे लागू होणार नाही.तथापी,राज्य निवडणूक आयोगाच्या सुचनांनुसार परिस्थितीनुरुप निर्णय घेण्यात येतो

**प्रश्न ४ सदर केंद्राबाबत कोणत्या विशेष उपाय योजना करण्यात येतात ?**

उत्तर अशा मतदान केंद्रांवर विशेष सुरक्षा व्यवस्थेसहव्हीडीओ चित्रिकरण करण्याबाबत निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून परिस्थितीनुरुप निर्णय घेण्यात येतो

# प्रकरण २४.

## प्रसार माध्यमाविषयक तरतुदी

**प्रश्न १ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये मतदानपूर्व वेगवेगळ्या टप्प्यांची माहिती कोणामार्फत प्रसारित केली जाते ?**

उत्तर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकींबाबत मतदानपूर्व कार्यक्रमांची माहिती राज्य निवडणूक आयोग, निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय व निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामार्फत वेळोवेळी प्रसारीत केली जाते.

**प्रश्न २ प्रसिध्दी माध्यमांना मतदानापूर्वी व मतदानानंतरची माहिती कशी दिली जाते ?**

उत्तर निवडणूक प्रक्रिये दरम्यान निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी स्वतंत्र माहिती कक्ष स्थापन करुन त्याव्दारे निवडणुकीसंबंधीची माहिती प्रसिध्दी माध्यमांना दिली जाते.

**प्रश्न ३ पत्रकारांना मतदान केंद्रामध्ये / मतमोजणी केंद्रामध्ये थेट प्रवेश देता येतो काय ? असल्यास त्यांना मतदान केंद्रामध्ये भ्रमणध्वनी वापरता येतो का ?**

उत्तर पत्रकारांना मतदान केंद्र व मतमोजणी केंद्रात थेट प्रवेश देता येत नाही. तथापि, राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार पत्रकाराना प्रवेशपत्र (पासेस) देण्यात येतात. मतदान केंद्र व मतमोजणी केंद्रात भ्रमणध्वनीचा वापर अनुज्ञेय नाही.

**प्रश्न ४ अधिस्वीकृतीधारक वृत्तपत्र प्रतिनिधी तसेच इलेक्ट्रॉनिक मीडिया यांच्या प्रतिनिधींना मतदान/ मतमोजणी प्रक्रियेदरम्यान प्रवेशपत्र देण्याचे अधिकार कोणास आहेत ?**

उत्तर निवडणूक अधिकारी / जिल्हाधिकारी हे निवडणूक आयोगाच्या सूचनांच्या अधिन राहून प्रवेशपत्र (पासेस) देऊ शकतात

**प्रश्न ५ मतदानादरम्यान छायाचित्र काढतांना कोणती दक्षता घ्यावी ?**

उत्तर मतदानकक्षात प्रवेश न करता दरवाजातून किंवा मतदान कक्ष दिसतच नसेल तर दरवाज्याचे आत परंतू प्रत्यक्ष मतदान कक्षापासून दूर वरुन मतदान गोपनीयतेचा भंग होणार नाही अशाप्रकारे अधिस्विकृती धारक छायाचित्रकारास छायाचित्र काढता येईल. छायाचित्र काढताना फक्त उमेदवार मतदान कक्षात असताना किंवा मतदान केल्यावर हातावर शाईची खूण दाखवताना छायाचित्र काढता येईल. इतर बाबींचा की ज्यामुळे आदर्श आचारसंहिता व मतदान गोपनीयतेचा भंग होईल अशी कोणतीही छायाचित्रे काढता येणार नाहीत.

**प्रश्न ६ प्रसारमाध्यमांकरिता माहिती केंद्राची रचना कशी असते व तेथे काय सुविधा असतात ?**

उत्तर निवडणूक कालावधीत निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात मिडीया सेंटरची स्थापना जबाबदार अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात करण्यात येते. निवडणूक प्रक्रियेबाबतची माहिती या केंद्रामार्फत प्रसारमाध्यमांना देण्यात येते.

मतमोजणी केंद्राजवळ स्वतंत्र कक्ष स्थापन करुन प्रसार माध्यमाची बसण्याची व्यवस्था केली जाते. सर्व साधारणपणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाहीर केलेला निकालाचा आवाज जाईल अशी ध्वनिक्षेपन व्यवस्था त्या ठिकाणी पुरवलेली असते. माहिती केंद्रामध्येपिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था, दूरचित्रवाणी संच (TV), दूरध्वनी, इंटरनेटसह संगणक इ. मुलभूत व्यवस्था केलेली असते.

**प्रश्न ७ मतमोजणी व्यवस्था व मतमोजणी वेळी माहिती प्रसारित करण्याची व्यवस्था कशी असते ?**

उत्तर मतमोजणी प्रक्रियेदरम्यानची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातून देण्यात येते. तर मतमोजणी वेळी एक स्वतंत्र माहिती कक्ष स्थापन करुन त्याव्दारे माहिती देण्यात येते.

**प्रश्न ८ अधिस्वीकृतीधारक पत्रकार कोणास म्हणतात ?**

उत्तर ज्यांना माहिती व जनसंपर्क विभागाने अधिस्विकृती परवाना/ओळखपत्र दिले आहे, असे पत्रकार.

**प्रश्न ९ मतमोजणीच्या दिवशी माहिती केंद्रामध्ये कोणाकोणास प्रवेश असतो ?**

उत्तर अधिस्वीकृतीधारक पत्रकार व छायाचित्रकार, आयोगाने प्रधिकृत केलेले पत्रकार,निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रवेशपत्र दिलेले पत्रकार, मिडीया कक्षाशी संबंधित नेमणूक झालेले अधिकारी.

**प्रश्न १० पेड न्यूज संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी कोणती व्यवस्था असते?**

उत्तर पेड न्यूज संदर्भात तक्रार आल्यास किंवा स्वइच्छेने (Suo-moto) कार्यवाही करण्यासाठी सदर तक्रारींची छाननी करणे, नोटीसा देणे, निर्णय घेणे, वेळ पडल्यास सदर पेड न्यूजचा खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ठ करणे यासाठी राज्य निवडणूक आयोगाने जिल्हाधिकारी/मनपा आयुक्त यांचे स्तरावर पेड न्युज चौकशी समित्यांची स्थापना केलेली आहे.

(संदर्भ: क्र. रानिआ/मनपा/२००१/प्र.क्र.१/का-५ दि.१६ जानेवारी २०१२)

**प्रश्न ११ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या वेळी आकाशवाणी, दूरदर्शन, केबल, एफ.एम.वर जाहिरात प्रसारणाबाबत काय तरतुदी आहेत ? व मान्यता देण्याचे अधिकार कोणास आहेत?**

उत्तर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांचे आचारसंहिता कालावधीमध्ये इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे केबल नेटवर्क, आकाशवाणी, टेलिव्हिजन, खाजगी FM वाहिन्या, रेडिओ यांना राजकीय स्वरुपाच्या मुलाखती / इतर कार्यक्रम / जाहिराती / प्रचार प्रसारण इत्यादीव्दारे प्रचार / जाहिरात करता येईल परंतु त्यासाठी राजकीय पक्षांनी / उमेदवारांनी सदर जाहिरात प्रसारीत

करण्यापूर्वीजिल्हाधिकारी/मनपा आयुक्त यांचे स्तरावरील समितीकडून प्रसारण योग्य असल्याबाबत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

(संदर्भ: १. राज्य निवडणूक आयोग राजपत्र असाधारण, ६ जानेवारी, २००९,

२. रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.०१/का.०५/२२ डिसेंबर, २०११)

**प्रश्न १२ निवडणूक कार्यक्रम जाहिर झाल्यानंतर एकूण किती वेळा, कोणकोणत्या टप्प्यांवर व कोणाद्वारे पत्रकार परिषदेचे आयोजन करणे अपेक्षित आहे ?**

उत्तर : निवडणुकीशी संबंधीत यंत्रणा गरजेप्रमाणे पत्रकार परिषदा आयोजित करुन माहिती देऊ शकतात.

**प्रश्न १३ मतमोजणीचे वेळी छायाचित्रकार / पत्रकार यांना मतमोजणी कक्षात छायाचित्र काढता येईल / छायाचित्रण करता येईल काय ?**

उत्तर छायाचित्रकार / पत्रकार यांना मतमोजणी कक्षातील सर्वसाधारण छायाचित्र काढता येईल. तथापि, कोणत्याही परिस्थितीत मतमोजणी यंत्र / टपाली मतपत्रिका याचे फोटो काढता येणार नाहीत. तसेच एका ठिकाणी थांबून मतदानाची गोपनियता भंग होईल अशारितीने चित्रीकरण करता येणार नाही.

# प्रकरण २५.

# निवडणुकीबाबत विविध अहवाल

# (Reports on Elections)

## १. विविध अहवाल

**प्रश्न १ निवडणुकीसंदर्भात सर्वसाधारण कोणते अहवाल पाठविणे आवश्यक आहे?**

उत्तर सर्वसाधारणपणे निवडणुकीसंदर्भात शहराची लोकसंख्या, सदस्य संख्या ठरविणे, जागांचे आरक्षण ठरविणे, तसेच विविध प्रसिध्दी अहवाल, मतदारयाद्या संदर्भातील अहवाल व निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्यावर टप्पेनिहाय अहवाल जसे - उमेदवार व उमेदवारांकडून प्राप्त नामनिर्देशन पत्रांची संख्या , उमेदवारी मागे घेणाऱ्यांची संख्या ,निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या,मतदानाची टक्केवारी,मतदानाचे दिवशी घडलेल्या विशिष्ट घडामोडीं ,मतमोजणी नंतर निकाला बाबतचे अहवाल राज्य निवडणूक आयोगास तसेच निवडणूक अधिकाऱ्यास पाठविणे आवश्यक आहे.

**प्रश्न २ राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेले अहवाल संबंधितांनी विहित कालावधीत न पाठविल्यास काय परिणाम होऊ शकतो ?**

उत्तर निवडणुका पार पाडणे ही राज्य निवडणूक आयोगाची सांविधानिक जबाबदारी आहे. ही जबाबदारी पार पाडताना विविध अहवाल वेळेत मिळणे आवश्यक आहे. विहित केलेले अहवाल संबंधितांनी विहित कालावधीत न पाठविल्यास निवडणूक प्रक्रियेमध्ये बाधा उत्पन्न होऊन कायदेशीर अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे हयगय करणा-यांवर राज्य निवडणूक आयोग कारवाई करु शकतो.

**प्रश्न ३ या अहवालांचा राज्य निवडणूक आयोगास काय उपयोग होतो ?**

उत्तर प्राप्त झालेल्या अहवालांवर राज्य निवडणूक आयोगाला निवडणुकीच्या वेगवेगळया टप्प्यांवर नियोजन करण्याच्या दृष्टीने निर्णय घ्यावे लागतात. या अहवालांचे संकलन करून एकत्रित माहिती तयार करणे व आवश्यकता भासल्यास प्रसार माध्यमांना उपलब्ध करून देणे, तसेच निवडणूक अहवाल प्रसिध्द करणे याचा यासाठी उपयोग होतो.

**प्रश्न ४ सार्वत्रिक निवडणुका व पोटनिवडणुका या दोन्ही बाबतीत अहवाल सारखेच असतात काय ?**

उत्तर सार्वत्रिक निवडणुकांमध्ये अहवालांची व्याप्ती मोठी असते. तर पोटनिवडणुकीमध्ये अहवालांची व्याप्ती मर्यादित असते. मात्र अहवालाचे स्वरुप सर्वसाधारणपणे सारखेच असते.

## २. अहवालांचे नमुने

**प्रश्न १ राज्य निवडणूक आयोगाला जे अहवाल वेगवेगळ्या टप्प्यांवर पाठवावे लागतात, त्यांचे नमुने एकत्रितरित्या कोठे पाहता येतील ?**

उत्तर अशा सर्व अहवालांचे नमुने प्रकरण २६ मधील परिशिष्टामध्ये देण्यात आलेले आहेत. तसेच, हे नमुने राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर एकत्रितरित्या पाहता येतील.

**प्रश्न २ या अहवालांना स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय Unique Id किंवा विशिष्ट क्रमांक आहेत का?**

उत्तर होय. परिशिष्टामध्ये Unique-Id नुसार अहवालाचे नमुने देण्यात आलेले आहेत.

**प्रश्न ३ अहवालांची टप्पेनिहाय वर्गवारी आहे काय?**

उत्तर होय. अहवाल टप्पेनिहाय विभाजित करण्यात आले असून निवडणूकपूर्व, निवडणुकीदरम्यान व निवडणूक संपल्यानंतर सादर करावयाचे अहवाल असे टप्पे पाडण्यात आलेले आहेत.

## ३. अहवालाकरिता वेळापत्रक / कालमर्यादा

### (अ) पूर्वतयारी :-

**प्रश्न १ सदस्य संख्या निश्चित करताना कोणता अहवाल पाठवावा लागतो?**

उत्तर सदस्य संख्या निश्चित करताना आयोगाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये लगतच्या जनगणनेनुसार त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राची एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीची लोकसंख्या याबाबत अहवाल पाठवावा लागतो.

**प्रश्न २ पद रिक्त झाल्यास व त्या पदासाठी निवडणूक घेणेसंबंधी अहवालाचा नमुना कोणता ?**

उत्तर याबाबत नमुना विहित करण्यात आलेला असून परिशिष्टामध्ये देण्यात आलेला आहे.

**प्रश्न ३ पद रिक्त झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल कोणी व किती दिवसात पाठवावा?**

उत्तर पद रिक्त झाल्याबाबत कळविण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सचिवाची म्हणजेच नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांची असून, त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगाला १५ दिवसांच्या आत मुख्याधिकारी यांनी पाठविणे आवश्यक आहे.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४८ (२))

**प्रश्न ४ नवीन नगरपरिषद अथवा नगरपंचायत स्थापन झाल्यावर प्रथम निवडणुकीसाठी कोणते अहवाल पाठविणे आवश्यक आहे?**

उत्तर नवीन नगरपरिषद अथवा नगरपंचायत स्थापन झाल्यानंतर त्या नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या क्षेत्राची एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या आणि नकाशे राज्य निवडणूक आयोगास पाठविणे आवश्यक आहे. नगरपरिषद अथवा नगरपंचायतीच्या बाबतीत सदस्य संख्या निश्चित करण्यासाठी विभागीय आयुक्तांना अहवाल पाठवावा लागतो.

**प्रश्न ५ प्रभाग / वार्ड रचना निश्चितीचा प्रारूप / अंतिम प्रसिध्दी अहवाल राज्य निवडणूक आयोगास पाठवावा लागतो काय ? कोणत्या नमुन्यात ?**

उत्तर होय. याबाबत प्रकरण २६ मधील परिशिष्ट- ..... मध्ये नमूद करण्यात आलेला आहे.

**प्रश्न ६ आरक्षण संदर्भातील अहवालात कोणकोणती माहिती समाविष्ट करावी?**

उत्तर मागील निवडणुकीत आरक्षित झालेले प्रभाग / वॉर्ड, नागरिकांचा मागास प्रवर्ग, महिला आरक्षण याविषयीच्या सोडती बाबतची माहिती आरक्षण संदर्भातील अहवालात समाविष्ट करण्यात यावी.

**प्रश्न ७ अधिकारी / कर्मचारी (निवडणूक विषयक) यांचे रिक्त पदांचा अहवाल पाठवावा का ? कोणत्या नमुन्यात ?**

उत्तर अधिकारी / कर्मचारी यांच्या रिक्त पदाविषयीचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास पाठविणे आवश्यक नाही. तथापि, निवडणूक कालावधीत अधिकारी / कर्मचारी यांच्या रिक्त पदाचा प्रश्न स्थानिक पातळीवर संबंधित मंत्रालयीन विभागाचे पातळीवर सोडविला जाणे शक्य नसल्यास त्याबाबत राज्य निवडणूक आयोगास अवगत करावे. यासाठी निश्चित असा नमुना नाही.

**प्रश्न ८ निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नेमणुकीबाबत प्रस्ताव / अहवाल कोण सादर करेल ? केव्हा ?**

उत्तर नगरपालिका निवडणुकीकरिता सर्वसाधारणपणे उपजिल्हाधिकारी संवर्गामधील किंवा त्यांच्या समकक्ष अधिका-यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार जिल्हाधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करतात. अशी नियुक्ती केल्यानंतर त्याबाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगास पाठविली जाते. सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी जिल्हयात या दर्जाचे पुरेसे अधिकारी उपलब्ध नसल्यास याबाबत विभागीय आयुक्त यांच्याकडे मागणी करता येईल .

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम ५ आणि राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ-१०९४/१६४/१९९४, दिनांक २९/११/१९९४ व आदेश क्र. रानिआ/मनपा /२०११/प्र.क्र. १६/का ०५ दिनांक १२/११/२०११)

**प्रश्न ९ मतदार यादी संदर्भात कोणता अहवाल पाठवावा लागतो ? तो कोणी पाठवावा ?**

उत्तर मतदार यादीसंदर्भात मतदार यादीचे मतदान केंद्रनिहाय भाग संख्या, प्रत्येक मतदार यादीला / मतदान केंद्राला जोडलेले मतदार याबाबत प्राधिकृत अधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अहवाल पाठविणे आवश्यक आहे.

**प्रश्न १० मतदान केंद्र निश्चिती / इमारत बदल / नवीन इमारत / वाढीव मतदान केंद्र / सहाय्यकारी मतदान केंद्र यांचेबाबत अहवाल पाठवावा लागतो की मंजूरीचा प्रस्ताव सादर करावा लागतो?**

उत्तर मतदान केंद्र निश्चिती व केंद्राच्या बाबतीत होणारे बदल व वाढीव मतदान केंद्र याबाबतचा निर्णय जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर स्थानिक पोलिस यंत्रणेशी विचारविनिमय करुन घेतला जातो. या बदलाबाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगाला कळविणे आवश्यक आहे.

**प्रश्न ११ मतमोजणी केंद्र निश्चितीबाबत राज्य निवडणूक आयोगास अहवाल पाठविणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर मतमोजणी केंद्र सुरक्षितता व सोयी सुविधानुसार निश्चित करून त्याची माहिती राज्य निवडणूक आयोगास जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेमार्फत कळविणे आवश्यक आहे.

**प्रश्न १२ EVM तसेच इतर मतदान साहित्य आवश्यकता व उपलब्धता याबाबतचा अहवाल कोणता आहे?**

उत्तर उपलब्ध असलेले साहित्य व ईव्हीएम व निवडणुकीकरिता आवश्यक असलेले साहित्य व ईव्हीएम याबाबतच्या अहवालाचा नमुना प्रकरण २६ मधील परिशिष्ट- .... मध्ये दिलेला आहे.

**प्रश्न १३ नामनिर्देशनपत्र दाखल झाल्याबाबत दैनंदिन अहवालाचा नमुना कोणता?**

उत्तर नामनिर्देशनपत्र दाखल झाल्याबाबत दैनंदिन अहवालाचा नमुना प्रकरण २६ मधील परिशिष्ट- ..... मध्ये दिलेला आहे.

**प्रश्न १४ नामनिर्देशन पत्रे मागे घेतल्यानंतर राज्य निवडणूक आयोगास कोणत्या नमुन्यात अहवाल सादर करावा?**

उत्तर नामनिर्देशनपत्र पत्रे मागे घेतल्यानंतर सादर करावयाच्या दैनंदिन अहवालाचा नमुना प्रकरण २६ मधील परिशिष्ट- ..... मध्ये दिलेला आहे.

**प्रश्न १५ निवडणूक लढविणा-या उमेदवारांची चिन्ह वाटप झाल्यावर यादी विहित नमुन्यात राज्य निवडणूक आयोगास पाठवावी का ?**

उत्तर होय. चिन्ह वाटप झाल्यानंतर लगेच ही यादी संबंधित नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूक नियमात विहित केलेल्या नमुना - ७ मध्ये राज्य निवडणूक आयोगास पाठवावी.

**प्रश्न १६  बिनविरोध निवडणूक असल्यास अहवाल केव्हा पाठवावा ? कोणत्या नमुन्यात?**

उत्तर   उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतर एकच उमेदवार शिल्लक राहिला असल्यास त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगाला सादर करण्यात येवून आयोगाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी उमेदवार बिनविरोध निवडून आल्याची घोषणा करतात. या संदर्भातील अहवालासाठी विशिष्ट नमुना विहित केलेला नाही.

(संदर्भ- महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ चे नियम २४ आणि राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२००४/ प्र.क्र.३७/ का.५, दिनांक २३ डिसेंबर २००४)

**प्रश्न १७  आदर्श आचारसंहिता भंग प्रकरणे व कायदा सुव्यवस्था संदर्भातील दैनंदिन अहवाल पाठविणे आवश्यक आहे काय** ?

उत्तर   कायदा व सुव्यवस्था या संदर्भातील दैनंदिन अहवाल जरी निरंक असला तरी ही आयोगास सादर करणे आवश्यक आहे. आदर्श आचारसंहिता भंगाची महत्वाची प्रकरणे व ज्यात राज्य निवडणूक आयोगाचा हस्तक्षेप आवश्यक आहे केवळ अशाच प्रकरणांच्या संदर्भातील अहवाल राज्य निवडणूक आयोगास पाठवावा.

## (ब) मतदानादरम्यान :-

**प्रश्न १  मतदान पथके मतदान केंद्रावर पोहोचल्याबाबत अहवाल राज्य निवडणूक आयोगास पाठविणे आवश्यक आहे का?**

उत्तर   होय.

**प्रश्न २  मतदानाचे दिवशी सकाळी कोणता अहवाल प्रथम पाठवावा व किती वाजता ?**

उत्तर   मतदानाच्या दिवशी सर्व मतदान केंद्रांवर अभिरूप मतदान घेण्यात आले असून मतदान सुरळीतपणे सुरु झाले आहे किंवा नाही, याबाबतचा अहवाल मतदानाची वेळ सुरु झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगास लगेच पाठवावा.

**प्रश्न ३  झालेल्या मतदानाची टक्केवारी कशा प्रकारे आयोगाला कळवावी ? त्याचे टप्पे कसे आहेत ? नमुना कोणता ?**

उत्तर   झालेल्या मतदानाची टक्केवारी (पुरुष, स्त्री, इतर व एकूण ) दर दोन तासांनी प्रकरण २६ मधील दिलेल्या परिशिष्ट- .... मध्ये आयोगाला कळवावी.

**प्रश्न ४  मतदानादरम्यान हिंसाचार, मतदानात अडथळा, EVM मध्ये बिघाड होऊन मशीन बदलणे याबाबत कोणते अहवाल आयोगाला सादर करणे आवश्यक आहे ? किती वाजता ?**

उत्तर   उपरोक्त पैकी कोणतीही घटना घडल्यानंतर तात्काळ राज्य निवडणूक आयोगाला अहवाल पाठविणे आवश्यक आहे.

**प्रश्न ५ मतदान संपल्यानंतर अंतिम टक्केवारी साधारणपणे केव्हा पाठवावी? मतदान केंद्रनिहाय आकडेवारी या अहवालात अपेक्षित आहे का ?**

उत्तर मतदान संपल्यानंतर सर्व मतदान केंद्रांवरील मतदानाची आकडेवारी प्राप्त झाल्यावर त्याबाबतचा एकूण मतदानाच्या अंतिम टक्केवारीचा अहवाल तात्काळ सादर करावा. मतदान केंद्रनिहाय अहवाल संबंधित निवडणूक अधिकारी यांचेकडे सादर करावा.

## (क) मतदानोत्तर :-

**प्रश्न १ मतदान प्रक्रियेत अडथळा निर्माण झाल्यास व पुनर्मतदान घेण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली असल्यास त्याबाबतचा अहवाल कोणी व कोणत्या नमुन्यात पाठवावा?**

उत्तर उपरोक्त बाबतीत अहवाल निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांना सादर करावा व सदरचा अहवाल जिल्हाधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे निर्णयार्थ पाठवावा. यासाठी विशिष्ट नमुना विहित केलेला नाही.

**प्रश्न २ मतमोजणी सुरु झाल्याबाबत राज्य निवडणूक आयोगास अहवाल पाठविणे आवश्यक आहे का?**

उत्तर होय. टपाली मतपत्रिकांची मोजणी सुरु झाल्यावर राज्य निवडणूक आयोगास तात्काळ अहवाल पाठविणे आवश्यक आहे.

**प्रश्न ३ फेरीनिहाय मतमोजणी अहवाल आयोगास पाठविणे आवश्यक आहे काय ?**

उत्तर नाही. हा अहवाल राज्य निवडणूक आयोगास पाठविणे आवश्यक नाही.

**प्रश्न ४ अंतिम निकालपत्र कोणत्या नमुन्यात असते. ते राज्य निवडणूक आयोगाला केव्हा पाठविणे अपेक्षित आहे ?**

उत्तर अंतिम निकालपत्राचा नमुना प्रकरण २६ मधील परिशिष्ट- .... मध्ये दिलेला आहे. हा अहवाल राज्य निवडणूक आयोगास पाठविणे आवश्यक नाही.

**प्रश्न ५ निवडून आलेल्या उमेदवारांविषयी कोणता अहवाल पाठवावा?**

उत्तर निवडून आलेल्या उमेदवारांविषयीचा अहवालाचा नमुना प्रकरण २६ मधील परिशिष्ट ...... मध्ये दिलेला आहे.

**प्रश्न ६ मतमोजणी संपल्यानंतर निवडणूक निकालासंदर्भात कोणते अहवाल राज्य निवडणूक आयोगाला पाठवावे लागतात ?**

उत्तर मतमोजणी संपल्यानंतर अनामत रक्कम जप्त झालेल्या उमेदवारांची संख्या, निवडून आलेले उमेदवार व दुसऱ्या क्रमांकाची मते घेणारे उमेदवार, वैध व अवैध मतांची संख्या, संबंधित नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीमधील अंतीमत :पक्षनिहाय स्थिती आणि पक्षनिहाय पडलेली वैध मते या संबंधीचे अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांचेमार्फत राज्य निवडणूक आयोगास पाठवावे लागतात.

**प्रश्न ७ अनामत रक्कम जप्त करणे याबाबत कोणता अहवाल आहे ?**

उत्तर याबाबतचा नमुना प्रकरण २६ मधील परिशिष्ट .... मध्ये दिलेला आहे.

**प्रश्न ८ नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणुकीमध्ये पक्षनिहाय मिळालेली मते व निवडून आलेले उमेदवार याबाबत गोषवारा आयोगास कोणत्या नमुन्यात पाठवावा लागतो?**

उत्तर याबाबतचा नमुना प्रकरण २६ मधील परिशिष्ट .... मध्ये दिलेला आहे.

**प्रश्न ९ भारत निवडणूक आयोगाचे धर्तीवर निवडणुकीबाबत Comprehensive Report राज्य निवडणूक आयोगाला पाठविणे आवश्यक आहे का ?**

उत्तर नाही.

## ४. अहवाल पाठविण्याची जबाबदारी

**प्रश्न १ राज्य निवडणूक आयोगास जे अहवाल पाठवावे लागतात त्यापैकी प्रत्येक अहवाल जिल्हाधिकारी यांचेमार्फत पाठविणे बंधनकारक आहे काय ?**

उत्तर जे अहवाल ऑनलाईन सादर करावयाचे आहेत ते वगळता इतर अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी सदरचे अहवाल संकलीत करून आयोगास सादर करतात.

**प्रश्न २ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावतीने सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अहवालावर स्वाक्षरी करू शकतात काय ?**

उत्तर होय. मात्र अशी स्वाक्षरी करताना सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणूनच स्वाक्षरी करावी.

# प्रकरण २६

## प्रपत्रांची यादी

## (List of Annexures)

| अ.क्र | प्रकरण क्रमांक | उपप्रकरण क्रमांक | प्रश्न क्रमांक | प्रपत्राचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| १ | ०२ | ०३ | ०९ | नगरपरिषद अथवा नगरपंचायतीमधील पद रिक्त झाल्याबाबतचा अहवाल | |
| २ | २ | १० | ०१ | राज्य निवडणूक आयोगाकडून नगरपरिषद अथवा नगरपंचायत सार्वत्रिक व पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यासाठीचा नमुना | |
| ३ | २<br>१० | १०<br>०१ | ०२<br>०१ | जिल्हाधिकारी यांचेकडून नगरपरिषद अथवा नगरपंचायत सार्वत्रिक व पोट निवडणूकीचा कार्यक्रम प्रसिध्द करण्यासाठीचा नमुना -१ | |
| ४ | ०३ | ०२ | ०१<br>०४ | परिशिष्ट-एक मधील राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याकरीता अर्जाचे प्रारूप (केवळ मान्यताप्राप्त पक्षांकरीता) | |
| ५ | ०३ | ०२ | ०१<br>०४ | परिशिष्ट-दोन मधील राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याकरीता अर्जाचे प्रारूप (मान्यताप्राप्त पक्ष वगळता इतर संघ / संस्था/ राजकीय पक्षांकरीता) | |
| ६ | ०३ | ०२ | ०२ | परिशिष्ट-तीन मधील राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याकरीता घोषणापत्राचा नमुना | |
| ७ | ०४ | ०७ | ०२ | नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीसाठी प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यासाठीचा नमुना | |
| ८ | ०४ | १० | ०१ | नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीसाठी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यासाठीचा नमुना | |
| ९ | ०५ | १० | ०३ | मतदार संख्येबाबतचा अहवाल - विवरणपत्र -१ | |
| १० | ०७ | ०३ | ०३ | विधानसभा मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी करावयाचा अर्ज नमुना - ६ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | ०७ | ०३ | ०३ | विधानसभा मतदार यादीमध्ये भारताबाहेरील मतदाराचे नाव समाविष्ट करण्यासाठी करावयाचा अर्ज नमुना - ६अ | |
| १२ | ०७ | ०३ | ०४ | विधानसभा मतदार यादीमधील नोंदीच्या तपशिलामध्ये करावयाच्या दुरूस्तीसाठी अर्ज नमुना - ८ | |
| १३ | ०७ | ०३ | ०५ | विधानसभा मतदार यादीमधील नोंदीचे स्थानांतर करण्यासाठी अर्ज नमुना - ८अ | |
| १४ | ०७ | ०३ | ०७ | विधानसभा मतदार यादीमधील नावास आक्षेप घेण्यासाठी किंवा नाव वगळण्यासाठी करावयाचा अर्ज नमुना - ७ | |
| १५ | ०७ | ०६ | ०५ | नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीसाठी प्रारूप मतदार यादीचा नमुना | |
| १६ | ०७ | ०९ | ०१ | नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीसाठी अंतिम मतदार यादीचा नमुना | |
| १७ | ०७ | ११ | ०२ | नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीसाठी मतदान केंद्रावर वापरण्याच्या मतदार यादीचा नमुना | |
| १८ | ०८ | ०१ | ०२ | मतदान केंद्राची आदर्श रचना | |
| १९ | ०८ | ०५ | ०२ | मतदान केंद्राची यादी नमुना | |
| २० | ०८ | ०२ | ०१ | मतदान केंद्रांची संख्या व संवेदनशील मतदान केंद्रांची संख्या - विवरणपत्र - २ | |
| | ०८ | ०६ | ०१ | | |
| २१ | १० | ०३ | ०१ | नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीसाठी नामनिर्देशनपत्राचा नमुना | |
| | | | ०६ | | |
| २२ | १० | ०३ | ०३ | निवडणूक निर्णय अधिका-यांपुढे नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने द्यावयाचे मालमत्ता, दायित्व आणि गुन्हेगारी संदर्भातील परिशिष्ट - एक मधील शपथपत्र | |
| २३ | १० | ०३ | ०३ | नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने द्यावयाचे अपत्यासंदर्भातील शपथपत्र | |
| | १० | ०५ | ०१ | | |
| | | | ०९ | | |
| २४ | १० | ०३ | ०३ | राजकीय पक्षांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींबाबत द्यावयाचे सूचनापत्र जोडपत्र - एक | |
| | | १० | ०१ | | |
| २५ | १० | ०३ | ०३ | राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १० | ०१ | कळविणारे सूचनापत्र जोडपत्र - दोन | |
| २६ | १० | ०६ | ११ | अनामत रक्कम जप्त करण्याच्या आदेशाचा नमुना | |
| २७ | १० | ०६ | १३ | अनामत रक्कमेच्या परताव्यासाठी उमेदवाराने करावयाचा अर्ज | |
| २८ | १० | १४ | ०१ | नामनिर्देशनाची सूचना - दररोज प्राप्त होणा-या नामनिर्देशनपत्रांची माहिती प्रसिध्द करण्याचा नमुना | |
| २९ | ११ | ०८ | ०५ | नामनिर्देशनपत्र स्विकारण्याची किंवा नाकारण्याच्या निर्णयाविरूध्द अपिलाच्या सुनावणीची सूचना नमुना - ५ | |
| ३० | ११ | ०९ | ०५ | वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांची यादी नमुना - ४ | |
| ३१ | १२ | ०१ | ०४ | उमेदवारी मागे घेण्यासंबंधीची सूचना | |
| ३२ | १२ | ०३ | ०१ | उमेदवारी मागे घेण्यासंबंधीची सूचना सादर केलेल्या वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांची यादी | |
| ३३ | १२ | ०४ | ०६ | बिनविरोध निवडून आला असेल तर द्यावयाचे प्रमाणपत्राचा नमुना | |
| ३४ | १३ | ०४ | ०२ | निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी नमुना - ७ | |
| ३५ | १३ | ०५ | ०२ | मतदान यंत्रासाठीच्या मतपत्रिकेचा नमुना | |
| ३६ | १३ | ०५ | १४ | टपाली मतपत्रिकेचा नमुना | |
| ३७ | १३ | ०५ | १९ | प्रदत्त मतपत्रिकेचा नमुना | |
| ३८ | १४ | ०१ | ०३ | निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती नमुना - ८ | |
| ३९ | १४ | ०१ | ०४ | निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती रद्द करण्यासाठीचा नमुना | |
| ४० | १४ | ०२ | ०४ | मतदान प्रतिनिधीची नियुक्ती नमुना - ९ (१) | |
| ४१ | १४ | ०३ | ०१ | मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती नमुना - ९ (२) | |
| ४२ | १५ | ०२ | ०८ | मतदान पथक नियुक्तीच्या आदेशाचा नमुना | |
| | १७ | ०१ | ०४ | | |
| ४३ | १५ | ०३ | १४ | मतदान कर्मचा-यांना वाटप करण्यात येणा-या निवडणूक भत्त्याच्या पोचपावतीचा नमुना | |
| ४४ | १५ | ०५ | ०१ | मतदान केंद्रावरील साहित्याची यादी | |
| | १७ | ०२ | ०१ | | |
| ४५ | १५ | ०६ | ०४ | टपाली मतपत्रिका मिळण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांना द्यावयाचे सूचनापत्र - प्रपत्र पी.बी. १ | |
| ४६ | १५ | ०६ | ०४ | निवडणूक कार्य प्रमाणपत्र मिळण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांना द्यावयाचे सूचनापत्र - प्रपत्र पी.बी. २ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४७ | १५ | ०६ | १४ | निवडणूक कार्य प्रमाणपत्र - प्रपत्र पी.बी.३ | |
| ४८ | १५ | ०६ | १६ | मतदाराचे घोषणापत्र - प्रपत्र पी.बी. ४ | |
| ४९ | १५ | ०६ | १६ | पाकिट -अ - प्रपत्र पी.बी. ५ | |
| ५० | १५ | ०६ | १६ | पाकिट -ब - प्रपत्र पी.बी. ६ | |
| ५१ | १५ | ०६ | १६ | मतदारांसाठी मार्गदर्शक सूचना - प्रपत्र पी.बी. ७ | |
| ५२ | १६ | ०८ | ०७ | मतदानासाठी मतदान यंत्रे तयार करण्यासंदर्भातील नोंदवही | |
| ५३ | १८ | ०२ | ०२ | अभिरूप मतदानाचे प्रमाणपत्र | |
| ५४ | १८ | ०६ | ०१ | स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये मतदान करताना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळखपत्र अथवा अन्य पुरावा सादर करण्याबाबतचे राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक | |
| ५५ | १८ | ०७ | ०२ | हरकत घेण्यात आलेल्या मतांची यादी- नमुना ११ | |
| ५६ | १८ | ०७ | ०४ | प्रदत्त मतांची यादी - नमुना व्हीएम - २ | |
| ५७ | १८ | ०७ | ०५ | अंध व अपंग मतदारांची यादी - नमुना व्हीएम - ५ | |
| ५८ | १८ | ०७ | ०५ | अंध व अपंग मतदारांच्या सोबत्याचे प्रतिज्ञापत्र | |
| ५९ | १८ | ०७ | ०६ | मतदाराकडून घ्यावयाच्या वयाबाबतच्या प्रतिज्ञापनाचा नमुना | |
| ६० | १८ | ०७ | १५ | | |
| ६१ | १८ | ०८ | ०३ | मतदानाची टक्केवारी - विवरणपत्र - ४ | |
| ६२ | १८ | १३ | ०१ | मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे प्रतिज्ञापन | |
| ६३ | १८ | १३ | ०१ | मागाहून दुस-या मतदान यंत्राचा वापर करताना मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे प्रतिज्ञापन | |
| ६४ | १८ | १३ | ०१ | मतदान समाप्तीचे मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे प्रतिज्ञापन | |
| ६५ | १८ | १३ | ०१ | मतदान यंत्र मोहोर बंद केल्यानंतर करावयाचे प्रतिज्ञापन | |
| ६६ | १८ | १३ | ०३ | मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनाचा नमुना | |
| ६७ | १८ | १४ | ०१ | नोंदविलेल्या मतांचा हिशेब - नमुना व्हीएम- ३ | |
| ६८ | १८ | १८ | ०२ | मतदान यंत्रे ठेवलेल्या सुरक्षा कक्षासाठी लॉग-बुकचा नमुना | |
| ६९ | १९ | ०८ | ०१ | | |
| ७० | १८ | ०५ | ०५ | मतदार नोंदवही - नमुना व्हीएम - १ | |
| ७१ | १९ | १० | ०२ | मतमोजणीचा निकाल (मतदान केंद्रनिहाय) नमुना व्हीएम - ४ | |
| ७२ | १९ | १० | ०८ | कंट्रोल युनिटमधील बॅटरी संपल्याने ती बॅटरी बदलून नविन बॅटरी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बसविण्यासंदर्भातील घोषणापत्र | |
| ७३ | १९ | १० | १६ | अंतिम निकालपत्र नमुना-१४ | |
| ७४ | १९ | १० | १७ | कंट्रोल युनिटमधील निकाल दिसत नसल्यामुळे त्या कंट्रोल युनिटमधील काढता येणारी मेमरी राखीव कंट्रोल युनिटमध्ये घालून निकाल पाहण्यासंदर्भातील घोषणापत्र | |
| ७५ | १९ | १२ | ०२ | विजयी उमेदवारास द्यावयाचे प्रमाणपत्र | |
| ७६ | १९ | १३ | ०१ | नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीमध्ये प्रभागनिहाय विजयी उमेदवार व दुस-या क्रमांकाची मते मिळालेला उमेदवार यांचे नाव, मिळालेली वैध मते व पक्ष - विवरणपत्र - ५ | |
| ७७ | १९ | १३ | ०१ | नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीमधील प्रभागनिहाय एकुण मतदार, झालेले मतदान आणि वैध व अवैध मतांची संख्या - विवरणपत्र - ६ | |
| ७८ | १९ | १३ | ०१ | नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीच्या मतमोजणीचा अहवाल - विवरणपत्र - ७ | |
| ७९ | १९ | १३ | ०१ | नगरपरिषद अथवा नगरपंचायत निवडणूकीमध्ये पक्षनिहाय पडलेली मते - विवरणपत्र - ८ | |
| ८० | ०६ | ०२ | ०१ | प्रभागनिहाय आरक्षण / नामनिर्देशनपत्र / उमेदवारी मागे घेणा-यांची संख्या / अंतिमता निवडणूक लढविणा-यांची संख्या / अनामत रक्कम जप्त झालेल्या उमेदवारांची संख्या - विवरणपत्र - ३ | |
| | ११ | ०९ | ०४ | | |
| | १२ | ०३ | ०१ | | |
| | १३ | ०४ | ०१ | | |
| | १९ | १७ | ०३ | | |
| ८१ | २० | ०८ | ०१ | उमेदवाराने दैनंदिन निवडणूक खर्च सादर करण्यासंबंधीचा नमुना- जोडपत्र २ | |
| ८२ | २० | ११ | ०५ | उमेदवाराने अंतिम निवडणूक खर्च सादर करण्यासंबंधीचा नमुना - जोडपत्र १ | |
| ८३ | २० | ११ | ०५ | उमेदवाराने अंतिम निवडणूक खर्चासोबत सादर करावयाचे शपथपत्र- जोडपत्र - ३ | |
| ८४ | २२ | ०९ | ०७ | निवडणूकविषयक भित्तीपत्रके, पत्रके इत्यादीबाबत प्रकाशकाने सादर करावयाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना | |